# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

### इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखाअंतर्गत 'इतिहास' विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर
करण्यात आलेला प्रबंध

# पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवनप्रवाह

(इ.स.१७२०- इ.स. १८१८)

**नोव्हेंबर २०१३**


श्री.अशोक ज्ञा. पाटील
संशोधक

डॉ.व्ही.ए.पाटील
मार्गदर्शक

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | विषय परिचय | १ ते ५१ |
| २ | पेशवे पूर्वकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने | ५२ ते ८९ |
| ३ | रोमांचकारी मनोरंजनाचा विकास | ९० ते १३९ |
| ४ | तमाशा - नव्या मनोरंजन साधनाचा उदय व विकास | १४० ते १८७ |
| ५ | धार्मिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह | १८८ ते २५४ |
| ६ | पारंपरिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह | २५५ ते ३०४ |
| ७ | उपसंहार | ३०५ ते ३२१ |
| ८ | परिशिष्ट | ३२२ ते ३३७ |
| ९ | फोटो | ३३८ ते ३४३ |
| १० | संदर्भसूची | ३४४ ते ३५५ |

# परिशिष्ट यादी
## (संदर्भ : पुणे पुराभिलेखागार, पुणे)



| क्रमांक | तपशिल | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | नारायणराव पेशव्याच्या वधाचा पोवाडा (प्रकाशित) | ३२२ |
| ०२ | गर्भदान समारंभाचे पत्र (अप्रकाशित) | ३२३ |
| ०३ | हरिहरेश्वर येथे वर्षभर अनुष्टान करणेबाबत (प्रकाशित) | ३२४ |
| ०४ | संक्रांत खर्चाची यादी (अप्रकाशित ) | ३२५ |
| ०५ | इ.स. १७७५ मधील श्रावणमास दक्षिणा (प्रकाशित) | ३२६-३२८ |
| ०६ | कुरधे येथे गणपती उत्सव साजरा करण्यासाठी इनाम जमीन (अप्रकाशित) | ३२९ |
| ०७ | पुरंदर किल्ल्यावरील गणपती उत्सव (प्रकाशित) | ३३० |
| ०८ | गणपती उत्सवामधील हरिदास व गुणीजनांवरील खर्च (प्रकाशित) | ३३१-३३२ |
| ०९ | दसऱ्यामध्ये बळी देण्यासाठी बकरी (अप्रकाशित) | ३३३ |
| १० | दत्तजयंती उत्सव साजरा करण्याबाबत (अप्रकाशित) | ३३४ |
| ११ | संत तुकाराम महाराजांचा उत्सव साजरा करण्याबाबत (अप्रकाशित) | ३३५ |
| १२ | जेजुरी यात्रेचे आठ कर माफ केल्याबद्दल (प्रकाशित) | ३३६ |
| १३ | पहिलवानांस दिला जाणारा रतीब (अप्रकाशित) | ३३७ |

# फोटोंची यादी


| क्रमांक | फोटोचे नाव | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | राज्यकर्त्यांचे मनोरंजन | ३३८ |
| ०२ | पेशवेकालीन भित्ती चित्रामधील स्त्रियांचे नृत्य,वादन | ३३९ |
| ०३ | भित्ती चित्रामधील गणेशभक्ती | ३४० |
| ०४ | कथा चित्रामधील विवाह विधी | ३४१ |
| ०५ | भित्ती चित्रामधील सण व उत्सव | ३४१ |
| ०६ | कळसुत्री बाहुल्या | ३४२ |
| ०७ | चित्रकथींची कथाचित्रे | ३४२ |
| ०८ | मनोरंजनाचे विविध खेळ | ३४३ |

| प्रकरण १ले | # विषय परिचय |
|---|---|
| | १.१ प्रस्तावना<br>१.२ संशोधनाचा विषय<br>१.३ संशोधनाची गरज<br>१.४ संशोधनाचा सारांश<br>१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये<br>१.६ संशोधनाची गृहितके<br>१.७ गृहितकांचे विश्लेषण<br>१.८ संशोधन विषयाचा कालखंड<br>१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा<br>१.१० संशोधनाची कार्यपध्दती<br>१.११ आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा<br>१.१२ विषय प्रवेश<br>१.१३ पेशवेकालीन समाज व मनोरंजन<br>१.१४ पेशवेकालीन समाजव्यवस्थेची वैशिष्टे |

## प्रकरण पहिले

# विषय परिचय

## १.१ प्रस्तावना

"पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवनप्रवाह" हा विषय मी संशोधनासाठी निवडला आहे. पेशवेकालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासामधील महत्वाचा कालखंड मानला जातो. या काळात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रवहाला गतीमान करण्याचे काम मनोरंजनाच्या विविध साधनांनी केले.त्यामुळे सांस्कृतिक जीवनामधील मनोरंजनांच्या साधनांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. हा अभ्यास करताना मला असे जाणवले की पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणामध्ये मनोरंजनाची वेगवेगळी साधने असून काळानुसार त्यामध्ये बदल होत चालले आहेत.

अगदी अलीकडील काळात घराघरात पोहचलेल्या दुरदर्शन संचामुळे तर मानवी जीवनात मनोरंजनाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. दुरदर्शनवरील विशिष्ट प्रकारचे कार्यक्रम पाहिल्यानंतर प्रेक्षकांना कांही दिवसांनी त्या कार्यक्रमांचा कंटाळा येतो.त्यामुळे पुन्हा वेगळ्या पध्दतीचे कार्यक्रम सादर करुन प्रेक्षकांना आपल्या वाहिनीकडे आकृष्ट करावे लागते. चित्रपट, नाटक, लोकनाट्य इत्यादी मध्येही काळानुरुप बदल होत चालले आहेत. पारंपरिक मनोरंजनाच्या प्रकारामध्ये देखील बदल होत असून कांही मनोरंजनाचे प्रकार तर लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. मराठ्यांच्या काळात उदयास आलेल्या या प्रकारांनी तत्कालिन लोकांचे चांगले मनोरंजन केले होते. म्हणून मी पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाच्या साधनांचा अभ्यास करावयाचे ठरविले. त्याकरिता उपरोक्त संशोधनाचा विषय निश्चित केला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला शाहूच्या सुटकेनंतर गती प्राप्त झाली होती. म्हणून पेशवे काळात मनोरंजनाची कोणती साधने उदयास आली, त्यामध्ये काय बदल होत गेले, शिवकाळात व त्यापूर्वी असणाऱ्या साधनात पेशवेकाळात काय बदल झाले, मनोरंजन करणारे कलाकारांचा सामाजिक व आर्थिक दृष्टिने विचार करणे व धार्मिक गरजेतून उदयास आलेल्या मनोरंजन साधनांचा अभ्यास करणेसाठी हा संशोधन विषय निश्चित केला. शिवकाळापेक्षा पेशवेकाळात राजकीय स्थैर्य व

शांतता बऱ्यापैकी होती. राज्यकर्ते व सरंजामदार वर्गात विलासी वृत्ती निर्माण झाली होती. त्यामुळे सामाजिक मनोरंजनाच्या साधनांचा विकास पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात झाला होता. म्हणून पेशवेकालीन मनोरंजनाची परिस्थिती जाणून घेण्यासाठी ''पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवनप्रवाह (इ.स.१७२०- १८१८)'' हा संशोधनाचा विषय निवडला आहे.

## १.२ संशोधनाचा विषय :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर पुढील पन्नास वर्षामध्ये त्यांच्या राज्यातील सामान्य जनतेला सुख समाधान लाभले होते. त्यांच्या निधनानंतर मात्र इ.स. १६८३ ते इ.स.१७०७ या काळात औरंगजेबाच्या प्रत्यक्ष स्वाऱ्यामुळे महाराष्ट्रातील जनतेची राजकीय, सामाजिक, धार्मिक,आर्थिक व सांस्कृतिक हानी मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राची प्रगती खुंटली होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची मोगली कैदेतून सुटका झाली आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रवाहाला पुन्हा गती आली. शाहूने जरी सत्तासुत्रे हाती घेतली असली तरी त्याने राज्यकारभाराची सर्व जबाबदारी आपल्या पेशव्यांवर सोपविली होती. त्याने पेशवेपद हे मुळच्या श्रीवर्धनच्या भट घराण्याकडे सोपविले आणि ते वंशपरंपरागत त्या घराण्याकडे ठेवले. सुरुवातीला सेनाकर्ते म्हणून हुद्दा असणाऱ्या बाळाजी विश्‍वनाथला पेशवेपद बहाल केल्यामुळे, त्याने फुटीर वृत्तीच्या कान्होजी आंग्रेला केवळ मुत्सद्देगिरीच्या जोरावर शाहूच्या पक्षात परत आणले होते. पेशवे पदाब-ल शाहूने त्याला महाल १६ व किल्ले २ सरंजाम करुन दिला होता. बाळाजीच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र बाजीराव बल्लाळ यांस पेशवाईचा धंदा सांगितला व त्याबद्दल १३००० सालिना होन, शिवाय सरंजामी महाल वगैरे दिले.पेशवा बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र बाळाजी बाजीराव पंडित प्रधान यास पेशवाई सांगितली. त्याब-ल त्यांनाही सालिना १३००० होन शिवाय सरंजामी महाल वगैरे बहाल केला होता. शाहूप्रमाणेच त्याच्यानंतर सत्ताधिश झालेल्या छत्रपतीनींही हेच धोरण पुढे चालू ठेवले. परिणामी छत्रपती नामधारी सत्ताधिश आणि त्यांचे प्रधान कार्यकारी सत्ताधिश बनले. त्यामुळे शाहूच्या कारकिर्दीपासूनचा काळ हा मराठ्यांच्या इतिहासात पेशवेकाळ म्हणून ओळखला जातो.

बाजीराव पेशव्याच्या काळापासून मराठ्यांच्या राज्याला स्थिरता मिळण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे लक्ष विविध मनोरंजनाच्या साधनांकडे वळण्यास सुरुवात झाली. ही मनोरंजनाची साधने म्हणजे मनोरंजनाचे विविध मार्ग होय. पेशवेकालीन जी मनोरंजनाची साधने समाजातील सर्व घटकांचे सार्वजनिक कार्यक्रमांमधून मनोरंजन करत होती त्यांना सामाजिक मनोरंजनाची साधने असे म्हणतात. त्यावेळी अशीही कांही मनोरंजनाची साधने उदयास आली होती की जी ठराविक लोकांचे किंवा श्रीमंत वर्गाचे मनोरंजन करत होती. त्या साधनांना वैयक्तिक मनोरंजनाची साधने असे म्हटले जाते. (उदा.पुस्तक वाचन, नाईकिनीचा राज्यकर्ते व श्रीमंत लोकांसाठीचे नाचगाणे, एकांतामधील गायन व वादन, इ.) सामाजिक मनोरंजन करणाऱ्या शाहीरी पोवाड्यांच्या कार्यक्रमांचा आणि तमाशा या स्वच्छंदी मनोरंजनाच्या साधनांचा उगम पेशवेकाळात झाला.तसेच यावेळी धार्मिक मनोरंजन, परंपरागत मनोरंजन व इतर काही मनोरंजनाच्या साधनांचा विकास घडून आला होता. या मनोरंजन साधनांच्या उदय व विकासामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला गती मिळाली. त्या साधनांचा अभ्यास करण्यासाठी ''पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने आणि सांस्कृतिक जीवनप्रवाह (इ.स. १७२०-१८१८)'' या विषयाची निवड केलेली आहे.

## १.३ संशोधनाची गरज

पेशवेकालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाबद्दल मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आहे. मात्र या काळातील सामाजिक मनोरंजनाच्या साधनावर फारशे संशोधन झालेले नाही. म्हणून महाराष्ट्राचे संस्कृतिक जीवन समृध्द बनविण्याऱ्या पेशवेकालीन मनोरंजन साधनावर प्रकाश टाकणे या उ-ेशाने या संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

## १.४ संशोधनाचा सारांश

पेशवेकालखंडात (इ.स.१७२०-१८१८) समाजाची उभारणी परंपरेनुसार चालत आलेल्या चातुर्वण्य व्यवस्थेवर आधारीत होती. पेशवेकालीन महाराष्ट्रातील समाज स्थायी समाज व अस्थायी समाज अशा दोन गटामध्ये विभागलेला होता. ज्या सामाजिक गटाकडे कायमस्वरुपी

उत्पन्नाची साधने होती तो स्थायी समाज व ज्यांच्याकडे ही साधने नव्हती तो अस्थायी समाज होय. स्थायी समाजामध्ये छत्रपती, पेशवे, सरदार, पाटील, कुलकर्णी, वतनदार, मिरासदार, बलुतेदार व आलुतेदार इत्यादी लोकांचा समावेश होता. अस्थायी लोकांना फिरस्ते लोक असेही म्हणत असून त्यांच्यामध्ये कलाकार आणि व्यवसायिक असे दोन गट होते. सामाजिक मनोरंजनामध्ये कलाकार लोकांची भूमिका महत्वाची होती. या कलाकारामध्ये वासूदेव, दरवेशी, कोल्हाटी, गारुडी, माकडवाले, बहुरुपी, नंदीबैलवाले, भोप्ये, भगत, भुत्ये, अराधी, वाघ्या-मुरळा, डौरी, पांगूळ, बाळसंतोष, कानफाटे, उदासी, गोसावी इत्यादी लोकांचा समावेश होता.

पेशवेकालीन लोक मोठ्या प्रमाणात खेड्यात राहणारे होते. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने दिवसभर त्यांना शारीरिक कष्टाची कामे करावी लागत होती. त्यामुळे त्यांना श्रमपरिहारार्थ करमणुकीची अथवा मनोरंजनाची आवश्यकता होती. यावेळी मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर होण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे अनेक मराठी लोकांनी शिपाईगिरीचा धंदा स्विकारला होता. उत्तरेकडील मोहिमांच्या निमित्ताने मराठी सरदार आपल्या फौजा घेऊन वर्षातील सुमारे आठ महिने घराबाहेर पडत. मोघलांप्रमाणे मराठ्यांच्या सैनिकांची करमणूक करण्याकरता मनोरंजनाची अनेक साधने या काळात निर्माण झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये फक्त लढणाऱ्या सैनिकांचा समावेश होता. मात्र पेशवेकाळात मुस्लीम सत्ताधिशांच्या सैन्याप्रमाणे इतर लोकांचा समावेश मोठ्या प्रमाणात झाला. तसेच त्यांच्या छावनीमध्ये मनोरंजनाचे कार्यक्रम होऊ लागले. यावरुन मनोरंजनाच्या विविध साधनांना अतिशय महत्व मिळत गेल्याचे दिसून येते.

पेशवेकाळात सामाजिक मनोरंजनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सण, उत्सव, यात्रा, उरुस व सुगीच्या दिवसात केले जात होते. गणेशचतुर्थी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, वसंतपंचमी, वर्षप्रतिपदा, शिमगा, रंगपंचमी, पोळा इत्यादी सण समारंभ साजरे केले जात होते. त्यावेळी कथा, कीर्तन, ळळीत, दशावतार व तमाशा असे मनोरंजनाचे कार्यक्रम केले जात होते. तमाशा हा पेशवेकाळात उदयास आलेला सामाजिक मनोरंजनाचा महत्वाचा प्रकार होय. तमाशाचे ताफे गावोगावी हिंडून लोकांचे मनोरंजन करत होते. पोवाडे आणि लावण्यांनी मनोरंजनामध्ये

मोठी भर घातली होती. विवाह समारंभ आणि नगरप्रवेश अशाप्रकारच्या समारंभामधुनही लोकांचे चांगले मनोरंजन होत होते.

अस्थायी अथवा फिरस्ते लोक सुगीच्या दिवसात गावोगावी फिरुन लोकांचे मनोरंजन करत होते. डोंबारी, कोल्हाटी, गोपाळ हे लोक शारीरिक ताकदीची व कसरतीची कामे करुन लोकांचे मनोरंजन करत होते. कोल्हाटी लोक कसरतीच्या खेळाबरोबर नाच-तमाशा सुध्दा करीत. नंदीवाले, दरवेशी, वाघवाले व गारुडी हे लोक आपआपल्या जनावरांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून खेळ करुन लोकांचे मनोरंजन करीत. बहुरुपी हा खेडेगावातील लोकांचे मनोरंजन करणारा कुशल कलावंत होता. निरनिराळी सोंगे काढून गावोगावी फिरुन तो लोकांचे मनोरंजन करीत असे.

धर्माच्या नावाखाली मनोरंजन करणारे कांही लोक पेशवेकाळात महाराष्ट्रात फिरत होते. त्यांनी धर्माला जरी जास्त महत्व दिले असले तरी त्यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात सामाजिक मनोरंजनही होत होते. अशा लोकामध्ये वासूदेव, गोंधळी, चित्रकथी, भुत्ये, डौरी, लक्ष्मी-आईवाले, कुडमुडे जोशी, वाघ्या-मुरळी, गुरुबाळ, पांगूळ, कानफाटे, उदासी, गोसावी इत्यादी लोकांचा समावेश होता.

पेशवेकालीन सर्वसामान्य लोकामध्ये कुस्ती, दांडपट्टा, काठीचे खेळ इत्यादी मर्दानी प्रकार लोकप्रिय झालेले होते. यात्रा आणि उरुसामध्ये कुस्त्या आणि नाचगाण्यांचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. छत्रपतींनी व पेशव्यांनी मनोरंजनासाठी मोठा प्राणीसंग्रह केला होता. याशिवाय पेशवेकालीन लोकांचे शिकार, सोंगट्या व गंजिफायासारखे खेळ ही मनोरंजनाची साधने होती. मनोरंजनाच्या या विविध साधनांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला गती देण्याचे काम केले होते.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

१. पेशवेकाळात (इ.स.१७२० - १८१८) मनोरंजनाची साधने कोणती होती ते जाणून घेणे.

२. मनोरंजन करणारे लोक कोणत्या जाती-जमाती मधून आले होते ते अभ्यासणे.

३. सामाजिक मनोरंजनाबद्दल पेशव्यांनी कांही नियमावली तयार केली होती काय ते जाणून घेणे.

४. मनोरंजन करणाऱ्या लोकांच्या सामाजिक स्थानाचा अभ्यास करणे.

५. मनोरंजन करणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती कशी होती ते जाणून घेणे.

६. सामाजिक मनोरंजनाचे कार्यक्रम कोणत्या निमित्ताने आयोजित केले जात होते ते जाणून घेणे.

७. पेशव्याकडून मनोरंजन करणाऱ्या लोकांना वतन किंवा आर्थिक सहाय्य मिळत होते काय ते अभ्यासणे.

८. मनोरंजनाच्या साधनामुळे सांस्कृतिक जीवनात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

९. मनोरंजनाशी निगडीत असणाऱ्या लोकांना राजाश्रय मिळत होता काय ते अभ्यासणे.

## १.६ संशोधनाची गृहितके

१. पेशवेकाळात (इ.स.१७२० - १८१८) सामाजिक मनोरंजनाला अतिशय महत्व प्राप्त झाले होते.

२. अस्थायी लोक पेशवेकाळात लोकांचे मनोरंजन मोठ्या प्रमाणात करत होते.

३. कांही मनोरंजनाच्या साधनाबाबत पेशव्यांनी नियमावली केलेली होती.

४. मनोरंजन करणाऱ्या लोकांचे सामाजिक स्थान दुय्यम होते.

५. मनोरंजन करणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती बेताची होती.

६. पेशव्यांकडून मनोरंजन करणाऱ्या कांही लोकांना आर्थिक मदत होत होती.

७. मनोरंजनाचे कार्यक्रम सण, उत्सव, यात्रा, उरुस व सुगीच्या दिवसात आयोजित केले जात होते.

८. पेशवेकालीन मनोरंजनाच्या साधनामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनप्रवाह टिकून राहिला होता.

९. मनोरंजन करणाऱ्या कांही कलाकारांना राज्यकर्त्यांनी आश्रय दिला होता.

## १.७ गृहितकांचे विश्लेषण

१. प्रकरण पहिले - विषय परिचय

२. प्रकरण दुसरे - पेशवे पूर्वकालीन सामाजिक मनोरंजनाची साधने

३. प्रकरण तिसरे - रोमांचकारी मनोरंजनाचा विकास

४. प्रकरण चौथे - तमाशा - नव्या -२- साधनाचा उदय व विकास

५. प्रकरण पाचवे - धार्मिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

६. प्रकरण सहावे - पारंपरिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

७. प्रकरण सातवे - उपसंहार

८. परिशिष्ट

९. फोटो

१०. संदर्भ सूची

## १.८ संशोधन विषयाचा कालखंड

मोगलांच्या कैदेतून शाहूची सुटका झाल्यानंतर महाराष्ट्राच्या खंडीत झालेल्या सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा मिळाली होती. समाजाचे मनोरंजन करणारी नवनवी साधने उदयास येत होती तर पारंपरिक साधनामध्येही बदल होऊ लागले होते. सांस्कृतिक जीवनात होत असलेल्या या बदलाचा अभ्यास करण्यासाठी संशोधन विषयाचा कालखंड हा इ.स.१७२० ते १८१८ असा निश्चित केलेला आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात विविध प्रकारची मनोरंजनाची साधने प्रचलित होती. मात्र पेशवे काळात त्याच्यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण आणि रचनात्मक बदल झालेला होता. तो दाखविण्यासाठी हा कालखंड ठरविला आहे. इ.स.१७२० मध्ये छत्रपती शाहूने पहिला बाजीराव पेशवा याला पेशवेपदाची वस्त्रे दिली. त्यावेळेपासून पेशवेपद वंशपरंपरागत बनले. तरुण पेशव्यावर शाहूने दाखविलेला विश्वास सार्थ करुन दाखविण्याचे काम पेशव्याने केले. मात्र बाजीरावास पेशवाईची वस्त्रे बहाल केल्यापासून ते शाहूच्या मृत्यूपर्यंत पेशव्यांचे महत्व वाढत गेले आणि छत्रपतीचे महत्व हळूहळू कमी होत गेले. शाहूच्या मृत्यूनंतर तर छत्रपती पूर्णपणे नाममात्र सत्ताधिश झाले आणि पेशव्यांना पेशवाईची वस्त्रे देणे एवढीच कामगिरी त्यांच्याकडे

उरली. तरीदेखील सर्व पेशव्यांनी स्वत:ला छत्रपतींचे नोकर म्हणूनच राज्यकारभार चालविला. पेशवा बाजीराव पहिला याच्या काळापासून मराठी सत्तेच्या उत्कर्षाला सुरुवात झाली तेंव्हापासून पेशवाईच्या अस्तापर्यंतचा म्हणजे १८१८ पर्यंतचा कालखंड संशोधनासाठी निश्चित केला आहे.

## १.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

पेशवेकाळाचा विचार करता पेशव्यांचे राज्य आजचा महाराष्ट्र आणि त्याच्या बाहेर खूप मोठ्या प्रदेशावर पसरलेले होते. त्या कालखंडातील सामाजिक मनोरंजनाच्या साधनांचा अभ्यास करण्याकरिता फक्त कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राचा प्रदेश संशोधनासाठी निवडला आहे. सामाजिक मनोरंजन करणाऱ्या कलाकारांची संख्या प्रचंड असल्यामुळे त्या सर्वांच्या वैयक्तिक योगदानाचा आढावा घेता आलेला नाही. पेशवेकाळात नव्याने उदयास आलेल्या कलाप्रकारामध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचलेल्या कलाकारांचा नामोल्लेख व कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## १.१० संशोधनाची कार्यपध्दती

सदरचे संशोधन कार्य ऐतिहासिक व वर्णनात्मक पध्दतीनुसार करण्यात आले आहे. त्याकरिता प्राथमिक व दुय्यम साधने वापरण्यात आली आहेत. प्राथमिक साधने म्हणून पेशवा दप्तर, चिटणीस दप्तर, पुरंदरे दप्तर, शाहू दप्तर इत्यादी दप्तरातील अस्सल कागदपत्रांचा व प्रकाशित कागदपत्रांचा वापर केलेला आहे. याशिवाय दुय्यम संदर्भग्रंथ, पीएच.डी. प्रबंध, नियतकालिके, विश्वकोश व संस्कृतिकोश, चरित्रे व बखरी आणि गॅझेटियरचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधन हे मनोरंजन साधनांच्या संदर्भातील असल्यामुळे पोवाडे संग्रह, लावणी संग्रह व संकलित केलेली गीते यांचीही मदत घेतलेली आहे.

## १.११ आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा

पेशवे कालखंडातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक घडामोडीवर आजपर्यंत भरपूर संशोधन झालेले आहे. तसेच मराठी साहित्याच्या दष्टीने कांही संशोधकांनी

पेशवेकाळातील कलाप्रकारावर प्रकाश टाकला आहे. मात्र पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाच्या साधनांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात जी भर घातली आहे त्या साधनांचा ऐतिहासिक दृष्टिने अभ्यास अद्याप झाला नसल्यामुळे त्यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी या विषयाची निवड केली आहे. आतापर्यंत या विषयाच्या संदर्भात पुढील संशोधकांनी संशोधन केले आहे.

| | | |
|---|---|---|
| **१. डॉ. कुंटे बी.जी.** | - | 'छत्रपती शाहू'<br>: -२- ापीठ, १९६४ |
| **२. डॉ. माने एम.एन** | - | 'बलुतेदारी सिस्टीम इन महाराष्ट्रा अंडर द मराठाज'<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००२ |
| **३. डॉ. गवळी पी.ए.** | - | 'सोसायटी ॲन्ड सोशल डिसॲबिलेटी इन पेशवाज'<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७९ |
| **४. डॉ. खांडेकर एस.** | - | 'मराठी पोवाडा' एक वाङ्मय प्रकार या दृष्टिने अभ्यास<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७० |
| **५. डॉ. चव्हाण एस.आर.** | - | 'मराठी अध्यात्मिक शाहीरी : परंपरा व वाङ्मय'<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८० |
| **६. डॉ. मोरजे गंगाधर** | - | 'मराठी लावणी वाङ्मय' (प्रारंभ ते १८५०)<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६८ |

## १.१२ विषय प्रवेश

सतराव्या शतकाच्या सुरुवातीला मराठी सत्तेचा झालेला उदय ही मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना होय. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व परंपरा, धार्मिक परिस्थिती, दक्षिणेतील इस्लामी शाह्यांच्या विरोधातील प्रतिक्रिया, त्यांच्या दरबारातील अनुभव, विजयनगर साम्राज्यापासून मिळालेली प्रेरणा, मराठ्यांची स्वभाववैशिष्ट्ये, मराठी भाषा, शिवाजीचे नेतृत्व इत्यादी बाबी या सत्तेच्या उदयास कारणीभूत ठरल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुयोग्य नेतृत्वामुळे मराठ्यांना नवसंजीवनी मिळाली. मुघल, दक्षिणेतील शाह्या व पोर्तुगीजांशी संघर्ष करुन त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली

आणि मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतरही मुस्लिम राज्यकर्त्यांच्या वाढत चाललेल्या सत्तेला रोखण्यात मराठे यशस्वी झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचा जेष्ठ पुत्र संभाजी ३० जुलै १६८० रोजी सिंहासनावर बसला. त्यावेळी त्याला सत्तासंघर्ष करुन सत्ता मिळवावी लागली. त्याच्या काळात मुघल सम्राट औरंगजेब आपल्या पुत्राचा (अकबर) बंदोबस्त करण्यासाठी व दक्षिणेतील विजापूर, गोवळकोंडा व मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेवर चालून आला. विजापूर व गोवळकोंडा जिंकल्यानंतर त्याने आपली संपूर्ण शक्ती संभाजीच्या विरोधात एकवटली. स्वत: औरंगजेब दक्षिणेत आल्यामुळे मोगल-मराठा संघर्ष अतिशय तीव्र बनला होता. मात्र संभाजी राजांच्या असावधपणामुळे व स्वकियांच्या फितुरीमुळे त्यांना पकडण्यात औरंगजेब यशस्वी झाला. त्याने ११मार्च १६८९ रोजी संभाजी व कवी कलश यांचा अतिशय क्रूरपणे वध केला. संभाजीने स्वराज्य व स्वधर्मासाठी मुघलाविरुध्द तीव्र लढा दिला. त्याच्या आत्मबलीदानामुळे मराठा राज्यात मोघलांविरुध्द एकजूट व संघटीतपणा येऊ शकला. संभाजीने वधापूर्वी दाखविलेले धाडस व स्वाभिमान यामुळे मोगलांशी संघर्ष करण्याची प्रेरणा मराठ्यांना मिळाली.[१]

संभाजीच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्र भाऊ राजाराम यास येसूबाईने सिंहासनावर बसवून राज्यकारभार सुरु केला. त्याच्याकाळातही मोगल-मराठा संघर्ष तीव्र बनत गेला. औरंगजेबाने मराठ्यांच्या राजकुटूंबाला पकडण्यासाठी झुल्फिकार खानास रायगडच्या मोहिमेवर पाठविले. त्याचबरोबर स्वराज्याच्या अन्य भागातही मोगल सैन्याने मोठा धुमाकूळ घातला होता. त्यामुळे राजाराम किल्ल्याबाहेर पडला आणि येसूबाईने किल्ला लढविला. मात्र अखेरीस झुल्फिकारखानाने रायगड ताब्यात घेऊन संभाजीची पत्नी येसूबाई, पुत्र शाहू, दोन दासीपुत्र, छत्रपती शिवाजीची राणी सकवारबाई आणि नोकर-चाकर यांना कैद करुन औरंगजेबाच्या छावनीत पाठविले.[२] महाराष्ट्रात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राजारामाला कर्नाटकात जिंजी किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. मुघल सैन्य झुल्फिकारखानाच्या नेतृत्वाखाली जिंजीला वेढा देऊन बसल्यावर मराठा सरदारांनी आपल्या शौर्याचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन केले. संताजी घोरपडे, रामचंद्रपंत, धनाजी जाधव व इतर सरदारांनी केवळ मोगलांना हैराण केले नाही तर त्यांच्या प्रदेशात सतत लूटमार चालू ठेवली. त्यातच राजाराम जिंजीच्या वेढ्यातून सुटून

महाराष्ट्रात आल्यामुळे मराठा सरदारामध्ये जोश निर्माण झाला. मात्र सततच्या धावपळीमुळे तो आजारी पडला व वयाच्या ३० व्या वर्षी १२ मार्च १७०० रोजी त्याचे निधन झाले. दुर्दम्य आत्मविश्वास आणि प्रचंड इच्छाशक्ती यांच्या जोरावर अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्याने मराठ्यांचे राज्य वाचविण्याचा फार प्रयत्न केला. त्याच्या मृत्यूमुळे दक्षिणेतील मराठ्यांच्या सत्तेचा अंत झाला असे मोगलांना वाटले होते. मात्र त्याची पत्नी ताराबाईने आपल्या तीन वर्षाच्या मुलाला सिंहासनावर बसवून स्वत: राजकारभार करण्यास प्रारंभ केला.[३]

मराठ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील शेवटच्या पर्वाचे नेतृत्व ताराबाईने केले. राजारामाच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली पोकळी तिने आपल्या कर्तृत्वाने भरुन काढली. मोगलांनी मराठ्यांच्या सत्तेला दिलेले आव्हान स्वीकारुन तिने हिंदुस्थानच्या इतिहासातील कर्तृत्ववान व शौर्यशाली राणी म्हणून लौकिक मिळविला. त्यामुळेच कवी शिवभारतकार परमानंदाचा नातू गोविंद याने ताराबाईचे स्तुतिकाव्य रचले होते.[४] त्यामध्ये तो म्हणतो-

तुजला प्रसन्न झाली। पातशाही हाती आली।
जयलक्ष्मी माळ घाली। शिवाजीस आदरें।।
दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचे गेलें पाणी।
ताराबाई रामराणी। भद्रकाली कोपली।।

या काळात प्रत्ययाला आलेल्या तिच्या कर्तृत्वामुळे केवळ भारतीयच नव्हे तर परकीय इतिहासकारांनीही तिची मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आढळते. विजरई मार्केज द ताव्हर याने आपल्या एका पत्रात 'Mulher sumamente espirituosa' अर्थात 'अत्यंत बुध्दिमान स्त्री' म्हणून ताराबाईचा उल्लेख केला आहे.[५] औरंगजेबासारख्या धूर्त, राजकारणात मुरलेल्या, अनेक युध्दांचा अनुभव असलेल्या, कावेबाज, कपटी व सामर्थ्यवान अशा दिल्लीपतीशी त्याच्या मानाने राजकारणाचा अतिशय कमी अनुभव असलेल्या, केवळ पंचवीस वर्षाच्या विधवा स्त्रीने सतत सात वर्षे दिलेला लढा हे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या शेवटच्या पर्वाचे खास वैशिष्ट्य होय. मुघल सैन्याला टक्कर देत भद्रकाली ताराबाईच्या सरदारांनी मोगलांच्या प्रदेशात छापे मारुन बऱ्हानपूर, सुरत व भडौच सारखी समृध्द शहरे लुटलीत. तिने व तिच्या सरदारांनी मुघल सेनापतींना अतिशय हैराण केले. या संघर्षामध्येच मराठ्यांची सत्ता नष्ट करण्यासाठी दक्षिणेत

आलेल्या औरंगजेबाला परत उत्तरेत जाता आले नाही. शहाजादा अकबराचा बंदोबस्त करण्यासाठी आलेल्या औरंगजेबाची कानउघडणी अकबराने पत्र पाठवून केली होती.[६] त्यामध्ये त्याने राज्य विनाशाकडे चालले असून त्याला आपणच जबाबदार असल्याचे ठणकावून सांगितले होते. आपला अंत:काळ जवळ आल्याची जाणीव औरंगजेबाला झाल्यानंतर त्याने आपला पुत्र कामबक्ष याला पाठविलेल्या पत्रामध्ये आपण आयुष्यभर अनेक चुका केल्याचे मान्य केले आहे.तो म्हणतो, ''आता मी सर्व सोडून जाणार - माझ्या धड पडीबद्दल आता मला वाईट वाटते. कारण त्या धडपडींचा मला काय फायदा? माझ्या पापांची व अदूरदर्शी कृत्यांची फळें मात्र माझ्याबरोबर येणार आहेत! ईश्वरी लीला अतर्क्य आहे. ........मी जी असंख्य दुष्कृत्यें केली त्याबद्दल मला किती दंड भोगावा लागेल कोण जाण!''[७] अशा निराराशामय अवस्थेत औरंगजेबाचा २० फेब्रु. १७०७ रोजी मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूमुळे मराठ्यांच्या राजकारणाला नवी दिशा मिळाली.

## १.१२.१ शाहूचे आगमन आणि पेशव्यांच्या उदयाला पोषक परिस्थिती

रायगडचा ताबा घेऊन औरंगजेबाच्या सैन्याने संभाजी पूत्र शाहू आणि पत्नी येसूबाई यांना कैद केले होते. तेंव्हापासून औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत ते मोगलांच्या कैदेतच होते. इ.स.१६९६ मध्ये त्याला सोडविण्याचा प्रयत्न राजारामाने केला होता. मात्र त्यामध्ये तो असफल ठरला होता. या घटनेमुळे औरंगजेब शाहूबाबत साशंक झाला होता. परंतु शाहूने मोठ्या कौशल्याने तो स्वत: राजारामाचा विरोधक असल्याचे भासवून वेळ निभावून नेली होती. इ.स.१७०० मध्ये राजारामाचाही मृत्यू झाल्याने तर, कैदेतून सुटका होण्याची शाहूच्या जीवनातील आशेचा किरणही पार मावळला होता. तरीदेखील त्याने रामचंद्रपंत अमात्यांना पत्र पाठवून आपण काकासाहेबांच्या (राजारामाच्या) ठिकाणी असल्याचे कळविले होते. त्यामध्ये तो लिहितो की, ''आम्हास नेण्याचा उपयोग करीतच आहात, श्री इच्छेने घडेल तो सुदिन.'' या पत्राब-ल रामचंद्रपंतांनी ''ऋणानुबंध'' असे उदगार काढले.[८] औरंगजेबाच्या छावणीत शाहू आणि येसूबाई यांची जबाबदारी झीनतुन्निसा उर्फ पातशाहबेगम हिच्यावर सोपविण्यात आली होती. तिच्या कृपेमुळेच शाहूचे धर्मांतर करण्याचा अैरंगजेबाचा डाव यशस्वी झाला नाही.[९] इ.स.१७०३ मध्ये औरंगजेबाच्या पदरी असणाऱ्या जोत्याजी केसरकर आणि मोरोपंत सबनीस

या मराठा सरदारांनी शाहूच्या विवाहाबाबत पुढाकार घेऊन जाधव व शिंदे या दोन घराण्यातील मुलींशी त्याचा विवाह लावून दिला होता.[१०] शाहू जरी मोगली कैदेत असला तरी औरंगजेबाने त्याची नीट व्यवस्था ठेवलेली दिसून येते.त्याच्या व्यवस्थेचे वर्णन गोविंद खंडेराव चिटणीसकृत 'श्री शाहूमहाराज यांची बखर' मध्ये असे म्हटले आहे की,''बेगमेंनी(झीनतुन्निसा) बडदास्त उत्तम प्रकारे ठेविला... घोडी, तट्टे, उंट, हत्ती, रथ, पालख्या, स्वार, शिबंदी, शागीर्द, पेशा, थटी, जीलीब, बाजेलोकसुध्दा एकंदर किंचित जे आपले घरी काही उणे पडू दिले नाही. मुलास वस्त्रे, पात्रे, अलंकार, लेणे, खाऊ, मेवामिठाई, जो जे समयी पदार्थ मागतील तो आणून द्यावा. त्यामुळे मुघल घराण्याच्या एकूण छानछोकीचा परिणाम त्याच्यावर झाल्यावाचून राहिला नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे औरंगजेबाने त्याला 'राजा' ही पदवी व सप्तहजारी मनसबदारी बहाल केली होती.[११] यावरुन औरंगजेबानेच सुरुवातीला शाहूच्या राजेपदाला मान्यता दिल्याचे सिध्द होते. इ.स.१७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला आणि त्याच्या मुलामध्ये वारसायुध्द सुरु झाले. झुल्फिकारखानाच्या सल्ल्यामुळे औरंगजेबाचा पुत्र आजमशहा याने शाहूची मोगली कैदेतून सुटका ८ मे १७०७रोजी केली. त्यावेळी मोगली साम्राज्याचा जहागीरदार म्हणून त्याने शिवाजीच्या स्वराज्यावर राज्य करावे असा त्याच्याबरोबर तोंडी करार झाला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यप्राप्ती केल्यानंतर जे सुख सामान्य जनतेला मिळाले होते, ते त्यांच्या निधनानंतर नष्ट झाले होते. कारण १६८३ ते १७०७ या काळात स्वत: औरंगजेबच दक्षिणेत येऊन राहिल्यामुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक प्रगती खुंटली होती. शाहूची मोगली कैदेतून सुटका होऊन त्याने साताऱ्याला आपली गादी स्थापन केल्यानंतर महाराष्ट्राच्या अर्वाचीन सांस्कृतिक जीवनाला प्रारंभ झाला. शाहूने दक्षिणेत येत असतानाच अनेक सरदारांना पत्रे पाठवून त्यांना आपल्या बाजूला वळवून घेतले.[१२] त्याच्या आगमनामुळे महाराष्ट्रात शाहू आणि ताराबाई यांच्यातील संघर्षाला सुरुवात झाली. मराठ्यामध्ये दुफळी निर्माण करण्याचा मुगलांचा हेतू सफल होणार अशी चिन्हे दिसू लागली. ताराबाईने शाहूला विरोध करावा हे तत्कालिन परिस्थितीला, तिच्या महत्वकांक्षी स्वभावाला धरुनच होते. अनेक हाल-अपेष्टा सहन करुन तिने मराठ्यांचे राज्य टिकवून ठेवण्याचे कार्य केल्यामुळे सहजासहजी ते शाहूच्या ताब्यात देण्याची शक्यता नव्हती. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या राज्याचा खरा मालक कोण हे सिध्द करण्यासाठी शाहू व

ताराबाई या दोन्ही पक्षाकडून एकमेकावर आरोप-प्रत्यारोप होऊन दोघांमधील संघर्षाला सुरुवात झाली. छत्रपतींच्या घराण्यातील दोन शाखांमध्ये मराठा राज्याच्या स्वामित्वाकरिता झालेला लढा खेडची लढाई म्हणून ओळखली जाते. १२ ऑक्टो.१७०७ रोजी झालेल्या या लढाईत ताराबाईच्या पक्षाचा पराभव करुन शाहूने आपल्या राजाकिय कारकिर्दीला सुरुवात केली. या लढाईत शाहूने विजय मिळविल्यामुळे अनेक मराठा सरदार शाहूच्या पक्षात दाखल होत गेले. शाहू व ताराबाई यांच्यामध्ये चाललेल्या संघर्षाचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे मराठी राज्याचे दोन तुकडे पडले. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने आपला राज्याभिषेक करुन साताऱ्याहून राज्यकारभार करण्यास सुरुवात केली. त्याच्या राज्याभिषेकाचे वर्णन ‘‘हर्षे केला नगारासहित नृपवरा पातले श्री सातारा ।। आला राजा ग्रहाने विभुषित सुत्के पातले सर्व भेटी ।। तारा सारा विचारा करुनि नृपवरा स्थापिता राज्यपाटा।।’’[१३] असे केले जाते. ताराबाई सुरुवातीला पन्हाळ्याहून आणि नंतर कोल्हापूर येथून राज्यकारभार करु लागली.

शाहूचे आगमन झाल्यानंतर त्याला अनेक सरदार येऊन मिळाले. त्यापैकी एक म्हणजे बाळाजी विश्वनाथ हा एक होय. तो श्रीवर्धनच्या भट घराण्यातील असून त्या घराण्याकडे दंडराजापूरची देशमुखी मलिकंबरच्या काळापासून होती.[१४] हा प्रदेश सि-ीच्या ताब्यात गेल्यावर भट कुटुंबास सिद्दीचा आश्रय पत्करावा लागला होता. मात्र सि-ीबरोबर न पटल्यामुळे तो श्रीवर्धनहून चिपळूणला गेला. तेथून राजारामाच्या काळात तो घाटावर आला आणि स्वकर्तृत्वाच्या जोरावर पुणे प्रांताचा सरसुभेदार बनला होता. मोगलांच्या हालचाली सतत पुणे प्रांतात होत असल्यामुळे त्याचा नेहमीच कैदेतील शाहूबरोबर संपर्क होता. जेंव्हा शाहूचा सेनापती धनाजी जाधव मरण पावला, तेंव्हा चंद्रसेन जाधवाला सेनापती पद देण्यात आले. मात्र चंद्रसेनाच्या निष्ठेबद्दल शाहूला शंका वाटत असल्यामुळे त्याने आपला विश्वासू सेवक बाळाजी विश्वनाथ यास ‘सेनाकर्ते’ पद दिले. त्यामुळे त्याने फौज उभी करणे, पैसा उभा करणे व अंतर्गत विरोधकांचे पारिपत्य करणे ही कामे अतिशय निष्ठेने पार पाडली. शाहूच्या सत्तेला विरोध करणाऱ्या अंतर्गत विरोधकांचा बिमोड करण्यामध्ये त्याने दाखविलेली हुशारी, मुत्सद्देगिरी व शौर्य या गुणांमुळे शाहू त्याच्या कामगिरीवर खुष होत गेला. त्यामुळे चंद्रसेन शाहूचा पक्ष सोडून ताराबाईला मिळाला होता. त्याच्याबरोबर मराठ्यांचा आरमारप्रमुख कान्होजी आंग्रे हादेखील

ताराबाईच्या पक्षात जाऊन शाहूविरोधी हालचाली करत होता. राजारामाच्या काळात तो मराठी आरमाराचा प्रमुख झाला असून त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल ताराबाईने त्याचा 'सरखेल' हा किताब देऊन गौरव केला होता.[१५] त्याचा बंदोबस्त करण्यासाठी शाहुने पेशवा बहिरोपंत पिंगळे याला पाठविले होते. मात्र कान्होजीने त्यालाच कैदेत टाकले होते.कान्होजी आंग्रेला तोंड देण्याची ताकद बाळाजी शिवाय दुसऱ्या कोणत्याही सरदारात नाही असे शाहूला वाटल्यामुळे त्याने बाळाजीला पेशवेपद देऊन त्याला कान्होजीवर पाठविले. शाहूच्या पक्षामध्ये असणाऱ्या प्रमुख सरदाराबरोबर विचारविनिमय करुनच शाहूने हा निर्णय घेतला होता.[१६] पुण्याच्या दक्षिणेला ८ मैलावर मांजरी या गावी बाळाजी बिन विश्वनाथ उपनाम भट दे।। श्रीवर्धन यांना १७ नोव्हें. १७१३ (विजयनाम संवत्सर, मार्गशीर्ष शुध्द ११ शके १६३५) रोजी पेशवेपदाची वस्त्रे बहाल करण्यात आली.[१७] बाळाजी विश्वनाथ हा शिवशाहीच्या प्रारंभापासूनचा आठवा पेशवा होय.श्रीवर्धनच्या गार्ग्य गोत्री भट घराण्यातील सातारकर छत्रपतींच्या पेशवा पदाची जबाबदारी स्विकारणारा तो पहिला गृहस्थ होय. अशाप्रकारे मराठ्यांच्या राज्यात पेशवे म्हणून भट घराण्याचा उदय झाला.

बाळाजीने लष्करी तयारी केली असली तरी त्याची मुख्य भिस्त मुत्सद्देगिरीवर होती. त्याने कान्होजीशी सतत पत्रव्यवहार करुन शाहूच्या गटात सामिल होणे कसे फायद्याचे आहे हे त्याला पटवून दिले. त्यामुळे तो शाहूच्या गटात सामिल होण्यास तयार झाला. ८ फेब्रु.१७१४ रोजी लोणावळ्याजवळ वळवण या गावी पेशवे - आंग्रे यांच्यात सलोख्याचा तह होऊन कान्होजी शाहूला येऊन मिळाला.[१८] बाळाजीच्या या कामगिरीबद्दल सरदेसाई म्हणतात, ''आंग्र्यासारखा बलिष्ठ सरदार केवळ मुत्सद्देगिरीच्या जोरावर किंवा अन्य कलह बिलकूल न करता, बाळाजीने शाहूच्या पक्षात आणिला, ही त्याची करामत राष्ट्रात विशेष वाखाणली गेली...... एवढे मोठे प्रकरण गोळी झाडल्याशिवाय सिध्दीस गेल्याने बाळाजीची छाप सर्वत्र बसली.''[१९] कान्होजीने शाहू महाराजांची अधिसत्ता मान्य करुन त्याच्या ताब्यात असणाऱ्या कोकणातील प्रदेशाची वाटणी तिघामध्ये केली. त्याप्रमाणे शाहू, कान्होजी व कोल्हापूरकर यांजकडे कोणता प्रदेश राहवा हे स्पष्ट झाले.

बाळाजीने सुरुवातीला दक्षिणेचा सुभेदार सय्यद हुसेन याच्याबरोबर करार करुन शाहूचा राज्यावरील हक्क मान्य करुन घेतला. त्यानंतर त्याने दिल्लीची मोहीम करुन चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या. तसेच येसुबाई आणि राजकुटूंबियांची सुटका करुन घेतली. त्यामुळे आपआपसात लढणाऱ्या मराठी सरदारांना उद्योग करण्यास बाहेर क्षेत्र उपलब्ध करुन दिले. मराठा मंडळाच्या विस्तारास या सनदा जरी उपयोगी पडल्या असल्या तरी मराठा राज्याच्या ध्येयधोरणावर या सनदांचा गंभीर परिणाम घडून आला. या सनदामुळे शाहू मोंगलांचा मांडलिक बनला आणि पुढील काळात मराठे सामर्थ्यशाली बनले तरी ते स्वत:ला मोगलांचे नोकर समजत राहिले. बाळाजीने नोव्हें. १७१३ ते एप्रिल १७२० या त्याच्या पेशवेपदाच्या कालखंडात शाहू महाराजांची राजवट स्थिर व भक्कम करण्यात मोठे योगदान दिले. त्यामुळे शाहुचा भट घराण्यावरील विश्वास वाढत जाऊन त्याने पेशवे पद भट घराण्याकडे वंशपरंपरागत कायम ठेवले.

मराठी राज्याच्या अष्टप्रधान मंडळामधील पेशवा हा एक प्रधान होता. इतर प्रधानापेक्षा त्याचा दर्जा जरी थोडा मोठा असला तरी राजारामकालीन प्रतिनिधीपेक्षा तो खालच्या दर्जाचा होता. मात्र बाळाजी विश्वनाथ व बाजीरावाने आपल्या हुषारी व पराक्रमाच्या जोरावर या पदाचे श्रेष्ठत्व वाढविले. त्यामुळे शाहूच्या कारकिर्दीतच पेशवे सर्वसत्ताधिश बनले. छत्रपतीपासून पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतर अतिशय सावकाश व काळजीपूर्वक घडले की, सर्व मराठी सरदारांना ते स्वीकारुन पेशव्यांचे हात बळकट करावे लागले. राजकारणात नेहमी सामर्थ्यवानांचाच विजय होतो या तत्वानुसार पेशव्यांचा उदय झाला.

## १.१२.२ राज्यकर्त्यांची मनोरंजनाच्या दृष्टिने कामगिरी

इ.स.१७२० मध्ये बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या निधनानंतर शाहूने बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिली. त्याने आपल्या पराक्रमाच्या जोरावर मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर केले. अनेक मराठ्यांची घराणी पुढे येऊन त्यांना कर्तबगारी सिध्द करण्याची संधी मिळाली. याबरोबरच मराठ्यांचा संबंध उत्तर भारताशी आल्यामुळे ते मनोरंजनाकडे जास्त आकर्षित होण्यास सुरुवात झाली. कोणत्याही राज्यकर्त्याच्या दरबारात जर कलाकारांना मानसन्मान व त्यांच्या कलेला उत्तेजन मिळाले तरच ती कला उत्कर्षाला पोहचत असते. छत्रपती शाहूची सतरा

वर्षे मोगली कैदेत गेल्यामुळे त्याला नाचगाण्याची चांगली आवड होती.त्यामुळे त्यांने दूरदूरच्या ठिकाणाहून गवई, नट, भाट, नायकिणी इत्यादींचा संच जमविला होता. उत्तरेतील दिल्लीसह अनेक शहरे कलाकारांसाठी प्रसिध्द असल्यामुळे तिकडून गुणी कलाकर मिळवण्याचा तो प्रयत्न करत असे. नाचगाणे करणाऱ्या कलावंतीणी पाठविण्याची तो सतत मागणी करत असे. त्याने पेशव्यांना व सरदारांना वारंवार पत्रे पाठवून चांगल्या गाणाऱ्या व नाचणाऱ्या कलावंतिणींचे दोन ताफे आणले होते.[२०]उत्तर हिंदुस्थानातील कलावंतिणीसाठी प्रसिध्द असलेल्या सिरोंचे या शहरातील तीन पोरी नारो शंकर राजेबहाद्दर या मराठ्यांच्या प्रांताधिकाऱ्याने शाहूकरिता पाठविल्या होत्या.[२१] कर्नाटकातील कलाकारही ललित कलामध्ये ख्यातनाम असल्यामुळे तिकडील गुणी कलाकारही शाहूच्या दरबारात आणले होते. पुढे परप्रांतातून पोरी आणून त्यांच्यावर जादा पैसा खर्च करावा लागतो म्हणून महाराष्ट्रातीलच चांगल्या मुली शोधून त्यांना नृत्यकलेत तरबेज करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यामध्ये त्याला यश आले नाही. ही जबाबदारी त्याने खंडोजी माणकर या अधिकाऱ्यावर सोपविली होती.त्याला कळविण्यात आले होते की, 'बटकीच्या पोरी, दोन बहुत चांगल्या, दहा अकरा वर्षाच्या, निरोगी, नाचावयास लायक, लावलियाने उपयोगी पडतील अशा पाठवाव्या.' खंडोजीने भरपूर तपास करुन कळविले की, 'कुणबी माणूस काळेरीस, देखणे नव्हे. पाहता वीट येतो. त्या कुरुप असल्या तरीही यावयास कबूल होत नाही.' त्यामुळे शाहूने परप्रांतातून मुली आणून नृत्य गायनाचा विकास घडविला.अशाप्रकारे शाहूच्या काळात महाराष्ट्रात नाचगाण्याच्या विकासाला सुरुवात होऊन राज्यकर्त्यांपाठोपाठ सामान्य लोकांच्याही मनोरंजनाची सोय झाली. ज्या मराठ्यांच्या राज्यामध्ये लावण्यवती आणि उत्कृष्ट कपडे परिधान करणाऱ्या नर्तकी दिसणे ही दुर्मिळ बाब होती, त्यांच्या राज्यात शाहूच्या काळापासून ती दरबारी वातावरणाचे एक अविभाज्य अंग बनली.[२२] नाचगाणे करणाऱ्या कलावंतीणींना शाहूने जमिनी इनाम देऊन त्यांच्या कलेची कदर केली. त्यामुळे त्यांनी आपले आयुष्य राज्यकर्त्यांचे व समाजाचे मनोरंजन करण्यासाठी घालविले. त्याने अनेक कलावंत नाईकीनींना इनाम जमिनी दिल्या असून त्याच्या सनदा शाहू दप्तरातील रोजकिर्दीत पुढील प्रमाणे आढळतात.

१. नुरा नाईकींन हिला कसबे वाळवे पैकी इनाम जमीन चाहूर ·।·

नुरा व तुळा नाईकीन कलावंत यांना मौजे वडगाव तर्फ उंबरज येथे इनाम जमीन पाव चाहूर।[२३]
नुरा नाईकीनीला मौजे बोरगाव तर्फ शिराळे येथे बिघे ॢ १०[२४]

**२.** पिरा नाईकीन इजला कसबे मसूर तर्फ उंब्रज येथे इनाम जमीन चाहूर १ [२५] तसेच तिला कसबे सिरवळ परगणे मजकूर येथे जमीन इनाम चाहूर १ [२६]

**३.** धना नाईकीन व अमना नाईकीन यास मौजे बारगुडे तर्फ निमरडी प्रांत पुणे इनाम जमीन बिघे ॢ २०[२७]

**४.** बना नाईकीन कलावंत इजला मौजे बाम्हणोली तर्फ कुडाळ येथे इनाम जमीन बिघे ॢ १०[२८] तिलाच मौजे मंदरुळ तर्फ कोले येथे पड जमीन बिघे ॢ२० दुतर्फा दिल्ही असे.[२९]

याप्रमाणेच बिबिणा नाईकीन, माना नाईकीन, राधा नाईकीन, हमला नाईकीन, शामा नाईकीन, सुलतान नाईकीन इत्यादींना जमिनी इनाम देण्यात आल्या होत्या. छत्रपतीप्रमाणे पेशव्यांनीही कलाकारांचा यथोचित सन्मान करण्याचे धोरण पुण्यामध्ये चालविले होते. पहिल्या बाजीराव पेशव्यांना छत्रसाल बुंदेला याच्याकडून इ.स. १७२९ मध्ये मस्तानी भेट मिळाली होती. तारीख-मुहम्मद - शाहीतील वर्णनानु -२- चनी असून संगीत, नृत्य, घोडेस्वारी आणि तलवार चालविण्यामध्ये तरबेज होती.'[३०] ती छत्रसाल बुंदेल्याची अनौरस मुलगी असून, तिच्या पुण्यातील आगमनामुळे साताऱ्यापाठोपाठ पुण्यामध्येही नाचगाण्याचे विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होऊ लागले. यावेळी विविध सण उत्सव आणि समारंभप्रसंगी नाचगाण्यांचे कार्यक्रम आयोजित केले जात असत. बाजीरावाच्या काळापासून मराठ्यांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलाडूंन उत्तरेत मोहिमा सुरु केल्या होत्या. नानासाहेब पेशव्यांच्या काळात त्यांचा धाकटा भाऊ रघुनाथराव याच्यावर उत्तरेची जबाबदारी सोपविण्यात आली होती. तो अतिशय रसिक असल्यामुळे त्याने उत्तरेतील अनेक नर्तकींना पुण्यामध्ये आणून ठेवले होते. त्यांना सरकारी खजिन्यामधून मासिक पगार देण्याची व्यवस्था केली होती.[३१] त्यानुसार केशरी चपलेची आई ४५ रुपये, बसंतीची आई ४५रुपये, यमनी ३० रुपये, गहिना ३० रुपये, उमेदा ६ रुपये याप्रमाणे पगार दिला जात होता. सवाई माधवराव पेशव्यांच्या काळात तर नाचगाण्यांच्या परंपरेचा चांगलाच विकास झाला होता. पुढे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात व्यंकट नरसी आणि धर्मी पारी या दोन नर्तकींना अतिशय लोकप्रियता मिळाली होती. व्यंकट नरसी ही नुसती नाचणारी व गाणारी नसून, कोणतेही वाद्य

वाजविण्यात ती अतिशय कुशल होती. कर्नाटकातून आलेल्या या कलावंतिणीशी गायनवादनात आणि नर्तनामध्ये साऱ्या भारतामध्ये कोणीही बरोबरी करण्यास धजू शकत नव्हता, अशी तिच्यासंबंधीची अख्यायिका आहे.[३२] ती अत्यंत कलावान असल्यामुळे राजे लोकांत व सरदारांमध्ये तिला आपल्याकडे नोकरीला ठेवण्यासाठी चढाओढ लागलेली असे. तिला आपल्या दरबारात आश्रित म्हणून ठेवता आले नाही तरी तिला दोन चार महिन्यासांठी आपल्या दरबारी आणून तिच्या स्वर्गीय कलांचा आस्वाद चाखावा असा प्रयत्न प्रत्येक रंगेल व रसिक सरदार करत असे. चिंतामणराव आप्पा पटवर्धनांनी व्यंकट नरसीचे नाचगाणे पाहिल्यानंतर ते अतिशय खुश झाले होते. कुरुंदवाडकर पटवर्धन तर तिला दरमहा अडीचशे रुपये पगार देण्याचा करार करुन तिला कुरुंदवाडला नेण्यास किती उताविळ झाले होते हे १७९३ मधील पुढील दोन पत्रांमधून लक्षात येते.[३३]

**१.** ''यादी व्यंकटनसरी कलावंत यांचे दरमहाच ठराव - स्वारी पुण्यात आहे तो दरमहा दीडशे रुपये द्यावे. कलावंत मजकूर कुरूंदवाड व मैंदरगीस आली असता दरमहा अडीचशे रुपये द्यावे. पुण्यास जावयाचा निरोप घेईल या समयी पुण्यास पोहोचवून द्यावी.सरकारातून कृपा करुन इनाम पावले ते द्यावे. दरमहा स्वारी पुण्यात आहे तो चार नाच करावे, सु।। आर्षा तिसैन मय्या व अल्लफ येणेप्रमाणे करार''

**२.** ''राजश्री रघुनाथ नीलकंठ तथा व्यंकटनरसी कलावंत पुणेकर सु।। आर्षातिसैन मय्या व अल्लफ तुला दरमहा करार करुन कुरूंदवाडास व मैदरगीस यावयाचा करार केला आहे. तर तू चार महिने येऊन राहून जावे. तुला दरमहा आल्या दिवसाचा देऊन तुला पुण्यास पावती करुन देऊ. तुला कोणे गोष्टीची आम्हाकडून तोसीस लागणार नाही. खारतजमेने जावे. जाणिजे.छ.२६ माहे सवाल मोतब.''

या दोन पत्रांमधून दिसून येते की, पेशवेकाळात उत्तम कलावंतांना चांगली मागणी असून त्यांना भरपूर पगार दिला जात होता. मनोरंजन करणारी कलावंत स्त्री जरी बाजारबसवी, वेश्या, नायकीण असली तरी तिच्या इच्छेविरुध्द कोणालाही तिच्यावर जुलूम करता येत नाही. आपल्याकडे येणाऱ्या कलावंतांची काळजी घेण्याचे काम राज्यकर्ते करत होते, त्यामुळेच दूरदुरचे कलाकार आपली कला सादर करण्यासाठी त्यांच्या दरबारात येत होते. इ.स १८०२ मध्ये दुसऱ्या

बाजीराव पेशव्यांने व्यंकट नरसी हिला सतत तीन रात्री नृत्य केल्याबद्दल २६,००० रुपये बक्षिस दिले होते.[३४] बाजीराव व इतरांकडून भारी पगार व बक्षिसांचा वर्षाव तिच्यावर होत राहिला.त्याबरोबरच बाजीरावाने तिला वैजापूर तालुक्यातील करंजगाव हा इनाम दिला होता. नानासाहेब पेशव्यांच्या काळापासून पेशवे दरबारात छैया गोसावी पैठणकर हा हरदास अतिशय लोकप्रिय झाला होता. त्याचाच नातू रामचंद्र गोसावी हा दुसऱ्या बाजीरावाच्या दरबारात गवय्या म्हणून आणि मर्जितील व्यक्ती म्हणून लोकप्रिय झाला होता. बाजीरावाच्या अनेक विलासी मागण्या तो पूर्ण करत होता. पहिल्या बाजीरावापासून दुसऱ्या बाजीरावापर्यंतचे सर्वच पेशवे हे कलाप्रेमी असून त्यांनी कलाकारांना दिलेल्या आश्रय, इनाम जमिनी आणि चांगली बक्षिसे यामुळे मनोरंजनाच्या विविध प्रकारांचा अथवा साधनांचा विकास झाला होता. पेशवे दरबारात अनेक कीर्तनकार, शाहीर, तमासगिर, गायक, गायिका, वादक, कलावंतिणी इत्यादींना आपली कला सादर करण्याची संधी विविध कार्यक्रमांच्या प्रसंगी मिळत होती. त्यावेळी त्यांच्या कलेची कदर केली जात होती. पेशवे हे ब्राम्हण धर्माभिमानी असल्यामुळे धार्मिक सण, समारंभ व उत्सव प्रसंगी लोकांच्या मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्याची प्रथा पडली होती. तत्कालीन सर्वसामान्य जनता ही राज्यकर्त्यांचे अनुकरण करणारी होती. त्यामुळे राज्यकर्त्यांचे अनुकरण करुन विविध सण, समारंभ व उत्सव ते साजरे करत असत. त्यानिमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमातून सामान्य जनतेचे चांगले मनोरंजन होत होते. अशाप्रकारे महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन समृध्द होण्याची सुरुवात शाहूच्या आगमनानंतर झाली. पुढील काळात पेशव्यांनीही शाहूचेच धोरण आंगिकारले होते. त्यामुळे त्यांच्या काळात मराठ्यांची सत्ता राजकीय व सांस्कृतिक दृष्टिने सर्वश्रेष्ठ सत्ता म्हणून हिंदुस्थानात ओळखली जाऊ लागली.

## १.१३ पेशवेकालीन समाज व मनोरंजन

पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाचा अभ्यास करताना प्रथम त्यावेळची सामाजिक परिस्थिती जाणून घेणे आवश्यक ठरते. कारण सामाजिक परिस्थिती आणि सामाजिक मनोरंजनाची साधने यामध्ये अतिशय घनिष्ट संबंध आहे. समाजातीलच कांही घटकांनी मनोरंजनाची नवी नवी साधने विकसीत करुन त्याद्वारे समाजाचे मनोरंजन करण्याचे कार्य

चालविले होते. अशा मनोरंजन करणाऱ्या कलाकार लोकांना विविध नावांनी ओळखले जात होते. उदा. शाहीर, तमासगिर, कलावंतीणी, गोंधळी, वासूदेव, दरवेशी, कोल्हाटी, गारुडी, माकडवाले, बहुरुपी, नंदीबैलवाले, भोप्ये, भगत, भुत्ये, अराधी, वाघ्या -मुरळा, डौरी, पांगूळ, बाळसंतोष, कानफाटे, उदासी, गोसावी इत्यादी. हे लोक ज्या समाजाचे मनोरंन करत होते त्या समाजाचे वर्गीकरण स्थायी समाज व अस्थायी समाज अशा दोन गटामध्ये करता येते.

## १.१३.१ स्थायी समाज

ज्या सामाजिक गटाकडे कायमस्वरुपी उत्पन्नाची साधने होती तो स्थायी समाज होय. स्थायी समाजामध्ये राज्यकर्ते म्हणजेच छत्रपति व पेशवे आणि  सरदार, पाटील, कुलकर्णी, वतनदार, मिरासदार, बलुतेदार व आलुतेदार इत्यादी लोकांचा समावेश होता.समाजातील या घटकाचे मनोरंजन करण्यासाठी अनेक मनोरंजन साधने उदयास आली होती.या गटातील अनेक लोक आर्थिकदृष्ट्या संपन्न असल्यामुळे त्यांनी कलाकारांच्या कलेची पारख करुन त्यांचा योग्य सन्मान केला, त्यामुळे लोकांचे मनोरंजन होऊ शकले. या समाज घटकाची माहिति थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### अ. राज्यकर्ते

पेशवेकालीन समाजातील सर्वात महत्वाचा सामाजिक घटक म्हणजे राज्यकर्त्यांचा वर्ग हा होय. या वर्गामध्ये छत्रपती, पेशवे आणि त्यांचे सरदार यांचा समावेश होता. समाजातील या वर्गाचा इतर वर्गावर मोठा प्रभाव असून त्यांचे अनुकरण करण्याचे काम इतर लोक करीत होते. इ.स.१७०८ मध्ये शाहूची मोगली कैदेतून सुटका झाली आणि तो एक स्वतंत्र राजा म्हणून राज्य करु लागला. सुरुवातीला त्याला आपले आसन स्थिर करण्यासाठी ताराबाईबरोबर संघर्ष करावा लागला. सत्ता ताब्यात आल्यानंतर त्याने हळूहळू राज्यकारभाराची आणि लष्करी मोहीमांची जबाबदारी पेशव्यांकडे सोपवली आणि सांस्कृतिक बाबींकडे स्वत: लक्ष देण्यास सुरुवात केली. नृत्य आणि गायन या कलांच्या विकासासाठी त्याने खास प्रयत्न केले.[३५] शाहूच्या मृत्यूपर्यंत छत्रपती या पदाला अतिशय दरारा होता. त्याच्यानंतरच्या साताऱ्याच्या गादीवर दुसऱ्या शिवाजीचा मुलगा रामराजा याला बसविण्यात आले. बालपणी त्याच्या जीवास कोल्हापूरकर संभाजी व

जिजाबाई यांच्यापासून धोका असल्यामुळे बावड्याजवळ पानगाव येथे एका जोगतीनीच्या घरात गुप्तपणे ठेवण्यात आले होते. बालपणातील १५/१६ वर्षे राजकारणाचे धडे घेण्याऐवजी त्याने गळ्यात कवड्याच्या माळा घालून देवीचा जागर व गोंधळ घालण्याचेच काम केले होते.[३६] त्यामुळे छत्रपतींचा राजकीय दरारा कमी होऊन पेशव्यांचे राज्यकर्ते म्हणून महत्व वाढत गेले. राजकारणाचा त्याला कसलाही गंध नसल्यामुळे त्याने सर्व जबाबदारी पेशव्यावर सोपवून त्यांच्याकडून सालीना ६५ लाखाचे वेतन घेऊन त्यावर समाधान मानले.

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे पेशवेकाळात मराठी साम्राज्यात रूपांतर झाले. त्यासाठी आपले तन - मन अर्पण करणारी अनेक मराठी सरदारांची घराणी उदयास आली होती. त्यापैकी दाभाडे, शिंदे, होळकर, पटवर्धन, धुळप, पुरंदरे, गायकवाड, फडणीस, घोरपडे, पवार, बिनीवाले, रास्ते, तुळशीबागवाले, पेठे, प्रतिनिधी ही घराणी पराक्रमाच्या जोरावर प्रसिध्दीस आली होती. त्या घराण्यातील पराक्रमी सरदारांनी मराठी साम्राज्याच्या उभारणीला हातभार लावला होता. त्यांनी आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशामध्ये छत्रपती व पेशव्यांचे अनुकरण करुन अनेक धार्मिक व सांस्कृतिक चालीरिती सुरु केल्या होत्या. त्यांच्या कांही चालीरितींचे अनुकरण पेशव्यानी केलेले आढळते. श्रावणमास दक्षिणेची पध्दत खंडेराव दाभाडेच्या काळापासून त्यांच्या घराण्यात सुरु झाली होती. पेशव्यांनी पुण्यामध्ये याचपध्दतीचा श्रावणमासातील रमना सुरु करुन देशभरातील विद्वान ब्राम्हणांना दक्षिणा वाटण्यास प्रारंभ केला. होळकर घराण्यातील अहिल्याबाईनी तर आपली खाजगी संपत्ती दानधर्म, देवळे व धर्मशाळा बांधणे व अन्नछत्रे चालविण्यामध्ये खर्च केली होती. या दानधर्माचा त्यांनी कधीच गाजावाजा केला नव्हता. त्यांनी महाराष्ट्रात केलेल्या या कार्याची साक्ष आजही त्र्यंबकेश्वर, नाशिक, कोल्हापूर, जेजुरी, निफाड, परळी, पंढरपूर, पैठण, पुणतांबे, वेरुळ, संगमनेर, सातारा, सप्तशृंगगड इत्यादी ठिकाणी पहावयास मिळते.[३७] पटवर्धन घराण्यातील सरदारांचे पेशव्यांप्रमाणेच गणपती हे अराध्य दैवत होते. त्यामुळे त्यांनीही आपल्या वाड्यामध्ये गणपती उत्सव सुरु केला. त्यामुळे पेशवेकाळात पुण्यापाठोपाठ तासगांव, मिरज व कुरुंदवाड मधील गणपती उत्सवात अनेक कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. भजन,

कीर्तन, लळीत व पुराण असे कार्यक्रम गणपती उत्सवात साजरे होत असत. त्यामुळे लोकांचे चांगले मनोरंजन होत होते.

### आ. वतनदार

'वतन' हा शब्द अरेबिक भाषेतून मराठीत आला आहे. वतन याचा अर्थ देश; राहण्याचे ठिकाण असा आहे. मुस्लिमांच्या संपर्कामुळे मराठ्यांच्यात वतनदारीची पध्दत सुरु झाली होती. गावाची कामे करणाऱ्या व त्यासाठी सारामुक्त जमीन असणाऱ्या लोकांना 'वतनदार' या नावाने ओळखले जाते.[३८] सर्व वतनदारांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही संपूर्ण गावाची होती. गावकऱ्याकडून त्यांना मिळणारी रोख रक्कम 'नख्त' म्हणून आणि वस्तुरुप प्राप्ती 'गला' म्हणून ओळखली जात होती. त्याला मिळणाऱ्या मोबदल्याला 'हकलजिमा' असे म्हणतात. पेशवेकालीन समाजामध्ये वतनदाराचे स्थान अतिशय मानाचे होते. राजकीय सत्तेपर्यंत पोहचण्याचा वतन हा एक महत्वाचा मार्ग होता. समाजातील कोणत्याही व्यक्तिचा सामाजिक, राजकीय, धार्मिक अथवा अर्थिक दर्जा हा त्याच्या वतनावरुन ठरत होता. त्यामुळे सामाजिक ताणतणाव निर्माण होण्यास वतन हे प्रमुख कारण होते. वतनदारांना सामाजिक प्रतिष्ठा मिळत असल्यामुळे वतनदारी मिळण्यिासाठी अनेक लोकांची सतत धडपड चालत असे. वतनावरील अधिकार प्राप्त करण्यासाठी दावेकऱ्यामध्ये भांडणे, रक्तपात व खटले चालत असत. देशमुखी, पाटीलकी, देशपांड्याचे, मुकादमीचे, कुलकर्णीपणाचे, चौगुलकीचे, महारकीचे, शेटेपणाचे, सोनारकीचे, न्हावीपणाचे, भांडपणाचे, सुतारकीचे व लोहारकीचे, मेहतरकीचे व गुरवकीचे अशी वतने पेशवेकाळात दिली जात होती. ती मिळविण्यासाठी लोकांची चाललेली धडपड तत्कालीन अनेक कागदपत्रात पहावयास मिळते. हे सर्व वतनदार सामान्य लोकांतून आल्यामुळे ते अतिशय लोकप्रिय असत. पाटील व कुलकर्णी हे गावातील महत्वाचे वतनदार होते. सामान्य जनता आणि राजसत्ता यांना जोडणारा महत्वाचा दुवा म्हणजे पाटील हा वतनदार होय. त्याला गावाचा राजा असे म्हटले जात होते. राज्यव्यवहारकोशात त्याचा उल्लेख 'ग्रामगोपक' असा केलेला आहे.[३९] 'उतरंडीला नसेना दाणा पण दादला असावा पाटीलराणा' ही म्हण पाटीलकीचे महत्व दर्शविते. गावात सणाच्यावेळी पाटलाला अग्रमान दिला जात असे. सणाच्या दिवशी त्याला गावकरी अनेक

गोष्टी देत. उदा. होळीची पोळी, संक्रातीला तिळगूळ इत्यादी. शेतकऱ्याकडून कांही उत्पन्न, तसेच गावातील बलुतेदारांना आणि आलुतेदारांना पाटलाची विनामोबदला सेवा करावी लागत होती. लागवडीखालील जमीन वाढविणे, सारा वसुल करणे आणि गावात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे ही त्याची महत्वाची कामे होती. पाटीलकीचे वतन मिळवण्यासाठी पेशवेकाळात अनेक गावामध्ये तंटे झालेले आढळतात. हणमंतराव व दौलतराव पवार आणि संभाजी पवार यांच्यामध्ये अरफळ येथील पाटीलकीच्या वतनाबद्दल तंटा सुरु होता,त्याचा लवकर निवाडा करण्याबाबत विनंती पत्र दाखल झाले होते.[४०] शाहूने त्याच्याशी एकनिष्ट राहणाऱ्यांना अतिशय प्रतिष्ठिचे मानले जाणारे पाटीलकीचे वतन दिलेले आढळते. इंदापूरची पाटीलकी मात्र छत्रपतीने स्वत:कडेच ठेवली होती. पाटीलकीचे वतन हे कोणत्याही जातीच्या व्यक्तिला त्याच्या कर्तबगारीवरुन दिले जात होते. नागेवाडी येथील पाटीलकीच्या वतनाबद्दल महार व गुरव यांच्यामध्ये तंटा होऊन पाटीलकीचे वतन पुरातन महाराचे आहे हे सिध्द झाले. त्यामुळे महजूर सेटी बीन नाग नाक महार यास वंशपरंपरागत ते वतन देण्यात आले.[४१]

कुलकर्णी हा गावातील दुसरा महत्वाचा वतनदार असून तो पाटलाच्या मदतीने काम पाहत होता.[४२] त्याला देण्यात येणाऱ्या वतनाला 'लेखनवृत्ती' असे म्हणत. गावातील जमिनीची, उत्पन्नाची व सारा वसूलीची नोंद त्याला दप्तरात ठेवावी लागत होती. दप्तरखर्चासाठी त्याला सादिलवारपट्टी मिळत असे. अनेकदा एकच कुलकर्णी एकापेक्षा जास्त खेड्यातील कुलकर्णीपणाचे काम पहात असे. तसेच कांहीवेळा त्याला जोशीपणाचेही काम करावे लागे. पाटलाप्रमाणे त्यालाही गावकऱ्याकडून अनेक वस्तू व सेवा मिळत होत्या.मात्र प्रत्येक गावच्या रुढीप्रमाणे त्यामध्ये थोडाफार फरक पडत असे. गावच्या पेठेमध्ये त्याचे हक्क काय होते याचा खुलासा पुढील पत्रामध्ये आढळतो.[४३]

**श्री**

नकल

याविराजित राजमान्ये राजेश्री मोरोपंत व महिपतराव व गुऱ्हारपंत व मैरालपंत कुलकर्णी मौजे बहुल गोसावी यासी

जाणो मुदगल कुलकर्णी क्र। तुलापूर स। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जानऊन तुम्ही आपले स्वकुशल लिहित जाणे या नंतर पत्र पाठविले ते पोहोचले वर्तमान विदित जाले.

पेठेत कुलकर्णी याचा हक काये आहे तो लेहून पाठवणे म्हणोन लि।। त्यास येथील हाकाचा वर्तमान जर बैल ढोर विकले तर चिठी ल्याहावी चिठीस पैसा टके व गोनी दाल तांदूल मीट दाल बाहेर भरून गेली तर ठोलीच्या (१) कवंड्या (१) दर गोनीस .... गावात आली तर पानसुपारी दाखल देखील कयास कराव चारा वगैरे बैलाचा तांडा पेठेत आला तर पानसुपारा मागून घ्यावयी मग तो काही साली कोष्टी धनगर तेली तांबोळी याजवर काही हाक नाही येथील हा विचार आहे विदित व्हावे बहुत काय लिहिणे हे विनंती पौ। सन ११९१ शके १७०३ प्लवनाम सवछरे भादवा वा। १५ रोज शुक्रवार छ.२५ माह रमजान

गावच्या पाटलाला गावकीच्या कामात मदतनीस म्हणून काम करणारा महत्वाचा वतनदार म्हणजे चौगुला हा होय.[४४] सारा वसुलीमध्ये त्याची कामगिरी महत्वाची ठरत असे. परांगंदा झालेल्या रयतेला परत गावात आणण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. गावचा सारा मुख्य तिजोरीत भरणे, गावातील कोठारे व गोदामांची व्यवस्था पाहण्याची त्याची जबाबदारी होती.

गावातील पेठेचा वंशपरंपरागत अधिकारी असणारे वतनदार म्हणजे शेट-महाजन हे होत. गावात पेठ वसविण्याची आणि गावच्या गोतसभेच्या कामकाजात सहभागी होणे ही त्यांची महत्वाची कामे होती. पेठेची जबाबदारी शेट्याची तर हिशेबाची जबाबदारी महाजनाची होती. पेशवेकाळात राज्याचा व्यापार वाढावा हे धोरण असल्यामुळे अनेक नवीन पेठा वसविल्या जात होत्या. सुरुवातीच्या काळात पेठेत दुकाने घालणाऱ्या वाणी उदम्यांना सरकारकडून कौल (अभय) आणि सवलती दिल्या जात होत्या.[४५] नवीन पेठ वसविण्या संदर्भात राज्यकर्त्यांचे धोरण किती अनुकुल होते हे पुढील पत्रावरुन लक्षात येते.

५, साबान, तिसैन मया अलफ, वैशाख.                २० एप्रिल १७९०

**श्री**

यादी बाळाजी जनार्धन फडणिस सु।। तिसैन मया व अलफ.शहर पुणे येथे नवी पेठ वसवावया करिता कौल देऊन गणेश पेठेचे पूर्वेस नागझरीचे पलीकडे भवानी पेठेचे उत्तरेस रास्ते यांचे पेठेचे दक्षणेस वोढा आहे.तेथपर्यंत दक्षण उत्तर रुंदी गज ४५० साडे च्यारशे व लांबी पूर्व पश्चम नागझरीपासून गज ६०० साहासे गज लांबी या प्रो नवी पेठ वसवावयास जमीन नेमून

दिल्ही असे. या प्रो बाळाजी जानार्धन फडणीस याचे हवाली जमीन करणे. तेथे वसाहत करतील. म्हणोन बापूजी आनंदराव कमावीसदार कसबे पुणे यास सनद देववावी देणे.

ख.५ साबाब तिसैन मया व अलफ, वेशाख मास.

अशाप्रकारचे व्यापाराला उत्तेजन देणारे धोरण राज्यकर्त्यानी राबविल्यामुळे व्यापार वाढला, त्याबरोबरच शेटेपनाच्या वतनालाही महत्व आले. पेशवेकाळात असंख्य नव्या पेठा वसविणाऱ्या लोकांना ही वतने देण्यात आली. महादशेट रेडीज यांना कोकणातील माखजन येथील शेटेपणाचे वतन इ.स.१७७४-७५ मध्ये देण्यात आले होते.[४६]

गावपातळीवर जसे वतनदार होते तसेच परगण्याच्या पातळीवरही वतनदार होते. देशमुख व देशपांडे हे परगणा स्तरावरील महत्वाचे वतनदार होत.[४७] परगण्यातील पाटलांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे, शेतसाऱ्याचा दर कमी-जास्त करणे, पडीक जमीन गरजूंना देणे, नव्याने लागवड केलेल्या जमिनीचा शेतसारा ठरविणे ही देशमुखाची कामे होती. युध्दाच्यावेळी संबधीत प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारीही त्याचीच होती. त्याचे हकलजिम्यामध्ये रोख रक्कम, दौऱ्यावेळी शिधा, व्यापाऱ्याकडून अनेक वस्तू, सरकारी जकातीच्या दोन टक्के उत्पन्न व गावाकडून मिळणारा कर यांचा समावेश होता. याशिवाय त्याच्या तैनातीला राबता महार मिळत होता. देशपांडे या परगण्यातील वतनदाराचा उल्लेख कांहीवेळा देशकुलकर्णी असा आढळतो. परगण्याचे हिशेब ठेवणे व हिशेब तपासणी ही त्याची मुख्य जबाबदारी होती. कुलकर्ण्याप्रमाणे त्याचीही प्राप्ती होती, मात्र ती देशपांडेपेक्षा कमी होती.

अनेकदा वतनदारांच्या वतनावर दुसरी व्यक्ती आपला हक्क सांगत असे. अशावेळी वतनदाराला आपला हक्क सिध्द करावा लागत होता. त्यासाठी त्याला राज्यकर्त्यांकडे फिर्याद दाखल करावी लागत होती. वतनदारामध्ये वतनाच्या हक्कावरुन होणारे तंटे राज्यकर्त्यांना सोडवावे लागत होते. लोणी येथील सोनारकीच्या वतनाचा निर्माण झालेला तंटा माधवराव पेशव्यांनी इ.स.१७६४ -६५ मध्ये सोडविला होता.[४८] एखाद्या वतनाच्या संदर्भात कांही तंटा निर्माण झाल्यास त्यावर जप्ती आणली जात होती. तंटा मिटविल्यानंतर जप्ती उठविण्यात येत होती.[४९]

वरील प्रमुख वतनदाराशिवाय प्रत्येक गावामध्ये महारकीचे, सोनारकीचे,न्हावीपणाचे, भांडपणाचे, सुतारकीचे व लोहारकीचे, मेहतरकीचे, गुरवकीचे अशी वतने दिलेली होती. या वतनदारांना मिळालेले हक्क अनेक कागदपत्रांमधून पहावयास मिळतात. पुण्यामधील मगर घराण्याकडे न्हावीपणाचे वतन असून त्यांना मिळत असले हक्क पुढील यादीत दिसतात.[५०]

**श्री**

यादी वतनदार नाईक मगर मेहेत्रे पुणेकर यांच्या बाबी पुण्यात आठरा पेठात आहेत, त्याचा तपशील -

**१.** मुंजी गावात कोठे जाल्या तर त्याचा हक्क आम्हाकडे चालत होता.

**२.** नागोबाची पूजा १८ पेठात नागपंचमीचे दिवशी तो हक्क आमचेकडे चालत होता.

**३.** जावळ कोठे मुलाचे गावात जाले तर आम्हाकडे हक्क चालत आहे.

**४.** कंदुरीची बाब आम्हाकडे चालत होती.

**५.** वंकारेश्वराचा हक्क आम्हाकडे चालत आहे.

**६.** आमचे जातीत कोठे लग्नकार्य जाले वगैरे हजार बाबी आमचेकडे चालत आहे व शहरात व गावात लग्न जाले म्हणजे नवऱ्याचे पांघरुण तो हक्क आमचा आहे. सदरहू प्रमाणे वंशपरंपरा चालत आल्या आहेत.

### इ. मिरासदार

पेशवेकाळातील वतनदारानंतरचा महत्वाचा समाजातील दुसरा महत्वाचा घटक म्हणजे मिरासदार वर्ग हा होय. एखाद्या गावातील जमीन अनेक प्रकारचे प्रयत्न करुन लागवडीखाली आणण्याचे काम समाजातील कांही लोकांच्या गटाने केल्याबद्दल त्यांना मिराशीचे अधिकार प्राप्त झालेले असत. वेळप्रसंगी त्यांनी बाहेरगावातून लोकांना आणून त्या गावातील जमीन लागवडीखाली आणलेली असे. गावातील जवळजवळ ४/५ जमिनीवर मिरासदारांची मालकी असे. सरकारने ठरविलेला शेतसारा भरणारा वर्ग म्हणून मिरासदारांना ओळखले जात होते. [५१] त्यांना वतनदाराकडून वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क आकारण्याचा व गोतसभेच्या कामकाजात भाग

घेण्याचा अधिकार होता. मिरासदार हा तत्कालीन खेड्यातील बहुसंख्य व प्रभावी वर्ग असल्याने त्याचे समाजव्यवस्थेत अत्यंत महत्वाचे स्थान होते.

## ई. बलुतेदार

वतनदार व मिरासदारानंतरचा गावातील महत्वाचा वर्ग म्हणजे बलुतेदार हा वर्ग होय. गावात विविध प्रकारच्या सेवा जो वर्ग पुरवित असतो व त्या वर्गाच्या उदरनिर्वाहाबद्दल गाव जो मोबदला देते त्याला बलुता असे म्हणतात. त्यांच्या वर्षभराच्या कामाचा मोबदला म्हणून धान्याचा कांही भाग सुगीच्या दिवसामध्ये दिला जात होता. बलुतेदारीबद्दल त्यांना सरकारकडून सारामुक्त जमीन मिळत असते. आजपर्यंत मध्ययुगीन महाराष्ट्रातील बलुतेदारीचा अभ्यास अनेक लेखकांनी व संशोधकांनी केला आहे. श्री. त्र्यं. ना. आत्रेंनी बलुतेदारीच्या संदर्भामधील 'गावगाडा' नावाचा पहिला ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी गावगाड्यातील बलुतेदारांची भूमिका मांडलेली आहे. वि. का. राजवाडेंच्या मतानुसार बलुतेदारांना द्यावयाचा मोबदला हा निश्चित स्वरुपाचा असे. प्रत्येक वर्षी ठराविक धान्य शेतकऱ्यांने बलुतेदाराला दिल्यावर संपूर्ण वर्षभर त्या बलुतेदाराला त्या शेतकऱ्याची कामे करावी लागत असत. बलुतेदारांची संख्या ही जरी बारा मानली असली तरी कांही वेळा हा आकडा कमी जास्त झालेला दिसून येतो.[५२] डॉ. अ. रा. कुलकर्णींनी 'Maharashtra in the Age of Shivaji' या ग्रंथामध्ये बलुतेदारीचा अर्थव्यवस्थेचा कणा यादृष्टीने संतुलीत अर्थ लावलेला आढळतो. त्यांनी बलुतेदारांची विभागणी १. कारागीर आणि व्यवसायिक, २. सेवकवर्ग, ३. धार्मिक सेवा करणारा वर्ग अशा तीन गटामध्ये केली आहे.[५३] त्यांच्या मतानुसार प्रत्येक विभागात मोडणाऱ्या जाती पुढीलप्रमाणे.

१. **कारागीर आणि व्यवसायिक :** ज्या प्रकारच्या सेवा तत्कालीन समाजाला अत्यावश्यक वाटत होत्या, त्यांचा समावेश या गटात केला होता. सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, धोबी व चर्मकार यांच्या सेवा समाजाला अत्यावश्यक स्वरुपाच्या वाटत होत्या.
२. **सेवक वर्ग :** या वर्गात महार, मांग, तराळ, रामोशी यांचा समावेश केला होता. गावाची अनेक प्रकारची कामे या वर्गाला करावी लागत होती. महार व तराळ

यांना निरोप पोहचविणे व आणण्याचे काम करावे लागत होते. मांग व रामोशी यांच्याकडे गावचे संरक्षण, चोरीचा तपास आणि चोरांचा बंदोबस्त ही कामे करावी लागत होती.

३. **धार्मिक विधी करणारा सेवकवर्ग :** जोशी, गुरव, जंगम, ठाकूर, कोळी व मुलाणी यांचा समावेश या वर्गात केला आहे.

जपानी विद्वान प्रा. फुकाजावा यांनी आपल्या ग्रंथामध्ये परंपरेने गावकऱ्यांनी गावाच्या सेवेसाठी नेमलेला वर्ग म्हणजे बलुतेदार असा सिध्दांत मांडला आहे.[५४] प्रो. सेन यांनी सुतार, लोहार, कुंभार, चांभार, मांग, न्हावी, धोबी, कुलकर्णी, जोशी, ज्योतिषी, पोतदार व महार यांना बलुतेदार म्हटले आहे. डॉ. अ.स.आळतेकर या यादीतील कुलकर्ण्याला वगळून पाटीलाचा समावेश करतात. ग्रँड डफने कुलकर्णी व पोतदाराला या यादीतून वगळून त्याऐवजी भाट (स्तुतीपाठक) व मुलाण्याचा समावेश केला आहे. तसेच त्याने आणखी एका यादीमध्ये पाटील, कुलकर्णी, चौधरी, पोतदार, देशपांडे, जोशी, गुरव, न्हावी, परीट, सुतार, कुंभार व महार यांना बलुतेदारांच्या यादीत घातले आहे. बलुतेदार व अलुतेदार यांच्या संख्येबाबत विद्वानामध्ये मतभिन्नता आढळते. तसेच बलुतेदारामध्ये कोणकोणत्या जातींचा समावेश होता याबद्दलही विद्वानात मतभिन्नता आढळते.

बलुतेदारांना बलुते, हक्क [५५] व मानपान या स्वरुपामध्ये मोबदला मिळत होता. त्यापैकी सर्वात महत्वाचा मोबदला म्हणजे तो देत असलेल्या सेवेबद्दल त्याला मिळणारे बलुते हे होय. हे बलुते त्याला गावप्रमुखामार्फत महसुलामधून, प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून धान्याच्या स्वरुपात अथवा रोख रकमेच्या स्वरुपामध्ये अशा तीन मार्गाने वसुल करता येत होते.[५६] रोख रकमेच्या स्वरुपामध्ये बलुतेदारांच्या बलुत्याची वाटणी पुढीलप्रमाणे होत होती.[५७]

श.१७२१
इ.स.१७९९

**श्री**

याो बलुते याजवर बयेदामुळे येक साला सु।। मयातैन व अलफ रु ।।

४० कास थोरली
१० सुतार
१० चांभार
१० मांग
१० महार
**४०**

२० कास मधली
५ कुंभार
५ न्हावी
५ परीट
५ लोहार
**२०**

१० धाकटी कास
२।। जोसी
२।। गुरव
२।। सोनार
२।। मुलाणा
**१०**

**७०**

पाौ वजा माहार वतनदार चाकरीस नाहीत सबब रु ाौ १० बाकी रु।। ६०

वरीलप्रमाणे बलुतेदारांची कास किंवा ओळ तीन विभागात झालेली होती.यावरुन त्यांच्यातील दर्जा समजतो.त्यांचा दर्जा हा आर्थिक मिळकतीवरून पडलेला होता. बारा बलुतेदारांपैकी सुतार हा बलुतेदार श्रेष्ठ मानला जात होता, हे पुढील पत्रावरुन स्पष्ट होते.[५८]

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी

पाो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणें विशेष. समस्त सुतारांचा बारा बलुत्यामध्ये वडीलपणाचा मानपान सुदामत चाल(त) असतां कोठे नवीन दिकत करितात ती करुं नये. सुदामत बाराबलुत्यामध्ये सुताराचे वडीलपण चालत आल्याप्राो चालवावयाचा करार करुन देऊन नजरेचा ऐवज सुतार वगैरे ज्ञात खूम तीन यांजपासून सरकारांत घ्यावयाचा करार केला. त्यास तुम्हाकडील सरकार कमाविसीचे माहाल व फुटगावदेखील दुमाले येथील कमाल बेरजेवर दर सद्ये

१ सुतार बलुत्यांत श्रेष्ट साा

॥ लोहार

॥ परीट

२

येकून दोन रुाो प्राो सरकारांत करार करुन हे सनद सादर केली असे.तरी सदरहूप्राो तिनी खुमापासून ऐवज वसूल घेऊन शंकराजी वली खिजमतगार हुजुरून पाठविला आहे याचे मारफातीने ऐवज सरकारांत पावता करणें.

पेशवेकालीन समाजाचा प्रमुख व्यवसाय हा शेती होता.त्यामुळे शेतकऱ्याला सर्वात अधिक गरज भासणारा बलुतेदार म्हणजे सुतार हा होय. त्यामुळे त्याचे महत्व लक्षात घेऊन त्याला बारा बलुतेदारामध्ये श्रेष्ठ मानलेले आहे. सरकारकडून मिळणारी इनाम जमीन व बलुता वतन यामधुनही त्याला चांगला मोबदला मिळत होता. याशिवाय त्याला मिळणारे हक्क व मानपान यामुळे तो आपल्या गावात वंशपरंपरागत वास्तव्य करुन राहिलेला आढळतो. बलुतेदारांना त्यांचे बलुता वतन हे वंशपरंपरागत देण्यात येत होते. या वतनामुळे त्यांच्या धंद्याला अथवा व्यवसायाला स्थैर्य प्राप्त होत होते व गावाला त्या वतनदाराची चाकरी हक्काने मिळत होती. हे वतन जरी पुरातन असले तरी त्याची वाटणी करता येत होती किंवा त्याची खरेदी विक्रीही केली जात होती. बलुतेदार लोक सामाजिक व धार्मिक बाबतीत त्यांच्यावर घालण्यात आलेल्या बंधनांचे

काटेकोरपणे पालन करीत. सामाजिक व धार्मिक परंपरेचे जो उल्लंघन करेल त्याला पेशवे कडक शिक्षा देत असत. पेशवेकाळात शुद्र जातींना देवालयामध्ये प्रत्यक्ष आत जाऊन दर्शन घेता येत नसे. त्र्यंबकेश्वराच्या मंदिराबाबत पेशव्यांनी केलेल्या नियमावली नुसार शुद्र लोकांना बाहेरील प्रवेश व्दारापासून दर्शन घेता येत होते. जर शुद्र व्यक्तिने मंदिरात जाऊन दर्शन घेण्याचे धाडस केले तर त्याला दंड आणि शिक्षा होत होती. लख्या ठाकूर नाशिककर हा त्रिंबकेश्वराच्या देवळात गेल्याबद्दल त्याच्याकडून एक हजार रुपये दंड घेऊन त्यास सोडण्यात आले.

## उ. अलुतेदार

पेशवेकाळात गावची सेवा करणारा सेवक वर्ग बलुतेदार व अलुतेदार या दोन गटामध्ये विभागला होता. बलुतेदारांची संख्या बारा आणि अलुतेदारांची संख्या अठरा सांगितली जाते. ग्रँड डफने आलुतेदारामध्ये सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ, माळी, डवऱ्यागोसावी, घडशी, गोंधळी, रामोशी किंवा भिल्ल, तेली, तांबोळी, पोतदार व भट यांचा समावेश केला आहे.[५९] मात्र यापैकी कांही बलुतेदारामध्ये मोडतात तर पोतदार हा सोनारामध्ये येतो. पेशवेकाळात तेली, तांबोळी,शिंपी, माळी, भोई, साळी, गोंधळी, गोसावी, धनगर, जिनगर, जोगी, कासार, कोष्टी,कोळी, कुणबी, गवळी, पारधी, भंडारी इत्यादींचा समावेश अलुतेदारात होत होता. प्रत्येक गावामध्ये जसे बारा बलुतेदार आढळत होते तसे सर्व अलुतेदार आढळतीलच असे नाही. बलुतेदाराप्रमाणेच अलुतेदारांनाही पेशवे काळात वतने दिलेली आढळतात.[६०] अलुतेदार लोक आपल्या जातीचा निश्चित असणारा व्यवसाय करुन उदरनिर्वाह करत असत. त्यांच्या जातीमध्ये अंतर्गत उपजाती असल्याचे आढळतात. त्यांच्यामध्ये अंतर्गत जातीमध्येच रोटी-बेटी व्यवहार होत असत. प्रत्येक जात आपल्या जातीने घालून दिलेल्या नियमांचे पालन करीत असे.

## ऊ. उपरी

उपरी म्हणजे एखाद्या गावात कामासाठी बाहेरुन आलेली माणसे होत.[६१] कौलनामा करुन त्यांना कसण्यासाठी अल्प मुदतीने जमिनी दिल्या जात होत्या. कांहीवेळा त्यांना नोकरीचेही

कौलनामे दिले जात होते. खेडेगावामध्ये जशी मिरासदारांना मानाची वागणूक मिळत होती तशी उपरी लोकांना मिळत नसे. मिरासदारांच्या मर्जीवर उपरी लोकांचे जीवन अवलंबून होते. एकाच गावात अनेक वर्षे वास्तव्य केल्यानंतर उपरीचेच मिरासदारात रुपांतर होत होते. त्यावेळी त्यांना मिरासदाराप्रमाणे हक्क प्राप्त होत होते. अशावेळी हे मिरासदारांचे घरभाऊ किंवा बापभाऊ झाले असे समजले जाई.

## **१.१३.२ अस्थायीसमाज**

ज्या सामाजिक गटाकडे उत्पन्नाची कायमस्वरुपी साधने नव्हती तो अस्थायी समाज होय. अस्थायी लोकांना फिरस्ते किंवा भटके लोक असेही म्हणत. त्यांच्यामध्ये कलाकार आणि व्यवसायिक असे दोन गट होते. व्यवसायिक लोक आपल्या जातीचा निश्‍चित असणारा व्यवसाय करुन उदरनिर्वाह चालवत असत. या लोकांमध्ये घिसाडी, वडार, बेलदार, पाथरवट, कैकाडी यांचा समावेश होता. हे लोक कष्टाची कामे करणारे असल्यामुळे त्यांना श्रमपरिहारार्थ मनोरंजनाची गरज असे. त्यांची ही गरज भागविण्यासाठी पेशवेकाळात अनेक मनोरंजन साधने उदयास आली होती. अस्थायी समाजातील दुसरा महत्वाचा गट म्हणजे कलाकार अथवा लोककलावंत हा होय. सामाजिक मनोरंजनामध्ये कलाकार लोकांची भूमिका महत्वाची होती. या कलाकारामध्ये वासूदेव, दरवेशी, कोल्हाटी, गारुडी, माकडवाले, बहुरुपी, नंदीबैलवाले, भोप्ये, भगत, भुत्ये, अराधी, वाघ्या -मुरळी, डौरी, पांगूळ, बाळसंतोष, कानफाटे, उदासी, गोसावी इत्यादी लोकांचा समावेश होता. प्रत्येक जातीची स्वतंत्र जातपंचायत, स्थायी समाजापेक्षा जन्मोत्सव, विवाह व मयत विधी साजरा करण्याच्या स्वतंत्र पध्दती ही या समाजाची खास वैशिष्ट्ये आहेत. सर्व अस्थायी लोकांना एका गावामध्ये तीन चार दिवस राहता येत होते.[६२] एखाद्या गावाशेजारी राहण्याची व आपला उदरनिर्वाहाचा व्यवसाय करण्याची परवानगी त्यांना गावच्या पाटलाकडून मिळत होती. विशिष्ट प्रकारची पाले ठोकून ते वस्ती करत असत. त्यांच्या पालावरुन कोणत्या जातीचे भटके लोक आपल्या गावात आले आहेत हे समजत होते.[६३] फासेपारधी समाजामध्ये तर दिवा पाहण्याची अनेगा असल्यामुळे त्यांची पाले तर लोकवस्तीपासून फार दूर असत. तर कैकाडी लोक पाल न ठोकताच झाडाच्या सावलीला आपले बिऱ्हाड मांडत असत.अस्थायी लोकांची एकापेक्षा अधिक बिऱ्हाडे एकत्र येऊन ती गावोगावी फिरत असत.

या लोकांसोबत त्यांच्या व्यवसायाला उपयुक्त असणारी आणि त्यांच्या कुटूंबाला आर्थिक हातभार ठरणारी पाळीव जनावरे असत. घिसाडी, बेलदार, वडार, कैकाडी यांच्या बिऱ्हाडाबरोबर गाढवे, बकरी, शेळ्या, कोंबड्या, कुत्री इत्यादी प्राणी असत.[६४] फासेपारधी लोकांबरोबर गाई, म्हैशी, कोंबड्या, कुत्री हे पाळीव प्राणी असत. तर प्राण्यांच्या मदतीने मनोरंजन करणाऱ्या लोकांकडे त्यांच्या मनोरंजन प्रकारानुसार प्राणी असत. त्या लोकांच्या कार्याची ओळख पारंपरिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह या प्रकरणामध्ये करावयाची असल्याने येथे फक्त व्यवसायिक गटामधील लोकांचा थोडक्यात आढावा घेऊ.

**अ. बेलदार : -**

बेलदार ही महाराष्ट्रातील भटकी जमात असून शारिरीक कष्ट व प्रचंड परिश्रम घेणारे म्हणून ते ओळखले जातात. राना-वनातील व माळरानातील जमिनीतून दगड उकरून काढून व सुतकीने फोडून ते गाढवाच्या पाठीवरुन त्यांची वाहतूक करीत. हे लोक राजस्थान- मेवाड प्रांतातून महाराष्ट्रात आले होते.[६५] रजपूत व इस्लामी सत्ता यांच्यामध्ये मध्ययुगीन काळात सतत संघर्ष सुरु होता.त्यामध्ये रजपूत सत्तेचा ऱ्हास झाल्यामुळे धर्मांतराच्या भीतीने ते दक्षिणेत स्थलांतरीत झाले होते.[६६] महाराष्ट्रातील वास्तव्यामुळे येथील संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव पडल्यामुळे ते आपली जुनी संस्कृती व परंपरा विसरुन महाराष्ट्रातील राहणीमानात सामावून गेले होते.गावोगावी कष्टाची कामे करुन उपजिवीका करणारा हा समाज गाढवगोती समाज म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो.[६७] पेशवेकाळात या समाजातील लोक एक-एकटे न राहता कुटुंबासह फिरतात. पाच-दहा कुटुंबे एकत्रित भटकंती करत फिरत.त्यामुळे त्यांना रोजगार मिळून उपासमारीची वेळ येत नव्हती.[६८] इतर फिरस्त्या लोकाप्रमाणे हे कधीही भिक मागत नाहीत. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत असल्यामुळे त्यांना फिरस्ते बेलदार असे संबोधले जाते. पेशवेकाळात अनेक ठिकाणी सरकारी बांधकामे चालत असल्यामुळे या लोकांना प्रचंड मागणी होती.[६९]

महाराष्ट्रातील वास्तव्यामुळे या समाजातील लोकांवर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा हळूहळू परिणाम होत गेला. त्यामुळे त्यांच्या राहणीमानात व कुलदैवतामध्ये बदल झाला. तुळजाभवानी, कानिफनाथ आणि खंडोबा या देवदेवतांचा कुलदैवत म्हणून त्यांनी स्वीकार केला.

### आ. कैकाडी किंवा बुरुड

कळक किंवा बांबूपासून घरगुती वापरासाठी लागणाऱ्या छोट्यामोठ्या वस्तू तयार करुन, पिढ्यान् पिढ्या आपली उपजीविका करणारा कैकाडी किंवा बुरुड समाज पेशवेकाळात होता.[७०] कांही विद्वानांच्या मते कैकाडी आणि बुरुड या वेगवेगळ्या जाती आहेत तर कांहींच्या मते कैकाड्यांची बुरुड ही उपजात आहे. बांबूपासून वस्तू बनविण्याची कला या समाजाची पारंपरिक हस्तकला असून ती त्यांच्या जीवनाचे महत्वाचे साधन आहे. त्यामुळेच 'बांबूशिवाय बुरुड म्हणजे पंखाशिवाय गरुड' ही प्रसिध्द म्हण त्याचे महत्व पटवून देते. घरगुती वापरासाठी लागणारी पाटी, टोपली, हाऱ्या, डुरकुली, सुपे अशा वस्तू ते शेतकऱ्यांना तयार करुन देत होते. श्रीमंत वर्गातील लोकांच्या घरामध्ये विवाह समारंभ असेल तेंव्हा बुरुडांना अनेक वस्तू या विवाहाला पुरवाव्या लागत होत्या.इ.स.१७९०-९१ मध्ये सातारच्या छत्रपतींच्या दोन कन्यांच्या विवाहप्रसंगी अनेक कारागिरांकडून वस्तू घेण्यात आल्याचा तपशिल आहे. त्यामध्ये बुरुडांकडून तट्ट्ये, हाऱ्ये, दुरड्या, शिपतरे, पाट्या, सुपे, वारोळ्या, केरसुण्या आणि चाळणी या वस्तूंचा समावेश होता. पेशवेकाळात वेगवेगळ्या कारणावरुन दोन जातीमध्ये अनेकदा संघर्ष होत होते. तसाच संघर्ष बुरडांच्या जुन्या चपला सांधाव्या की सांधू नये यावरुन बुरूड व चांभारांमध्ये झाला होता.

### इ. घिसाडी

घिसाडी लोक मुळचे राजस्थानातील असून त्यांच्या वेगवेगळ्या पारंपरिक जातधंद्यावरुन आणि स्थानावरुन त्यांना महाराष्ट्रात ओळखले जाते.[७१] राजस्थानातील चित्तोडगड ही त्यांची जन्मभूमी असून मेवाडी ही त्यांची भाषा आहे. इ.स.१५६८ मध्ये मुघल बादशहा अकबर याने चित्तोड जिंकल्याची घटना तेथील राजपूत लोहारांना अत्यंत अपमानास्पद वाटून त्यांनी चित्तोडगडाचा त्याग केला. जोपर्यंत चित्तोडगड जिंकत नाही तोपर्यंत गडावर जाणार नाही, पक्क्या घरात राहणार नाही, पाणी काढण्याचा दोर जवळ बाळगणार नाही, पलंगावर झोपणार नाही आणि एका ठिकाणी वास्तव्य करणार नाही अशी त्यांनी प्रार्थना केली होती. मात्र महाराणा प्रतापाला पुन्हा किल्ला जिंकता न आल्यामुळे या लोकांनी भटकंती सुरु केली आणि ते महाराष्ट्रात आले. आपली जन्मभूमी, जात, आणि प्रतिज्ञा शत्रूला समजू नये म्हणून स्वत:ची

ओळख घिसा या गावचे रहिवाशी आणि लोहार काम करणारे अशी करुन दिली. त्यावरुन त्यांना घिसाडी म्हणून ओळखले जाऊ लागले. यांच्यामध्ये लग्नसोहळा चार दिवस चालत असे. लग्नासाठी आलेल्या वऱ्हाडाला बकरी कापून मांसाहारी जेवण दिले जात होते, त्याला मांडवजेवण असे म्हणत. लग्नाच्या रात्री 'गोपा खेळणे' हा मनोरंजनाचा खेळ त्यांच्यामध्ये प्रसिध्द होता.[७२] त्यामध्ये मांडवात पाळणा बांधून त्यात छोटी बाहुली ठेवली जाई. ती रडते व ओरडते असे कल्पून तिला समजाविण्याचा हा खेळ चालत असे. मुलाचा जन्मोत्सव हे लोक आनंदोत्सव म्हणून साजरा करीत.

पेशवेकाळात घिसाडी लोक सैनिकांना लागणाऱ्या तलवारी, भाले, बान, शिरस्त्रान यासारखी हत्यारे तयार करत. शेतकऱ्यांना लागणारे नांगराचे फाळ, पाभरीचे फाळ, कुदळ, खुरपे, विळा, कुऱ्हाडी यासारख्या वस्तूदेखील त्यांच्याकडून करुन घेतल्या जात होत्या. याशिवाय घरगुती वापरासाठी लागणाऱ्या विळी, उलथणे, जात्याचे खुंट, सांडशी, सुऱ्या हातोडे यासारख्या वस्तूदेखील तेच बनवित होते. बलुतेदारामध्ये आढळणारा लोहार हा पांचाळ विश्वकर्मा लोहार असतो तर घिसाडी लोक हे त्याच्यापेक्षा वेगळे असून ते भटके असतात. दोघामधील फरक पुढीलप्रमाणे सांगता येतो.

| **घिसाडी** | **लोहार** |
|---|---|
| १. मूळचे चित्तोड येथे राहणारे. | १. मूळचे महाराष्ट्रातील |
| २. मातृभाषा मेवाडी | २. मातृभाषा मराठी |
| ३. ग्रामव्यवस्थेत सहभाग नाही. | ३. ग्रामव्यवस्थेत सहभाग |
| ४. भटकत उपजीविका करणारे | ४. स्थिर राहून उपजीविका करणारे |
| ५. स्त्रियांकडे घण मारण्याचे काम | ५. स्त्रिया घण मारत नाहीत |
| ६. स्त्रिया आडवे कुंकू लावतात | ६. स्त्रिया गोल कुंकू लावतात |
| ७. पुरुष जानवे घालत नाहीत | ७. पुरुष जानवे घालतात. |
| ८. स्वत:ला रजपूत समजतात | ८. स्वत:ला रजपूत मानत नाहीत |

### ई. पारधी

गेल्या अनेक शतकांपासून गावगाड्याशी कसल्याही प्रकारचा संबंध न ठेवता उपजिवीकेसाठी भटकंती करत असलेला समाज म्हणजे पारधी समाज होय. छोटे-मोठे प्राणी आणि पक्षांची शिकार करणे हा या लोकांचा पारंपरिक व्यवसाय होय. महाराष्ट्रामध्ये हा समाज फासेपारधी या नावाने परिचित आहे.[७३] या समाजामध्ये गावाच्या आश्रयाने राहणारे गावपारधी, जंगलाच्या आश्रयाने राहणारे भिल्लपारधी, हरणपारधी, राजपारधी, पालपारधी व चित्तापारधी अशा पोटजाती आहेत. हे लोक वेगवेगळ्या प्राण्यांच्या शिकारीसाठी वेगवेगळे फासे तयार करतात व त्यांच्या सहाय्याने प्राणी व पक्षांची शिकार करतात. इतर भटक्या जमातीपेक्षा हे लोक मोठ्या जथ्थ्याने फिरत असत.[७४] त्यांच्या एका तळावर शंभर पर्यंत माणसे, गायी, म्हैशी, कोंबड्या, कुत्री इत्यादी असत. शेतकऱ्याच्या उभ्या पिकात गुरे घालण्यामध्ये आणि चोरी करण्यामध्ये ते अतिशय पटाईत होते.[७५]

## १.१४ पेशवेकालीन समाजव्यवस्थेची वैशिष्टे

### अ. जातीवर आधारित समाजरचना

जातीवर आधारित समाजरचना हा भारतीय समाजरचनेचा मूलभूत असा घटक आहे. भारतातील कोणत्याही विभागातील सांस्कृतिक जीवन प्रवाहाचा अभ्यास करताना तेथील जातीव्यवस्थेचा आढावा घ्यावाच लागतो. प्राचीन काळापासून प्रचलीत असलेली जातीवर आधारित समाजरचना शिवकाळात व पेशवेकाळात कायम होती.[७६] त्यामुळे समाज ब्राम्हण, क्षत्रिय,वैश्य आणि शूद्र या चार प्रमुख जाती आणि इतर असंख्य उपजाती यामध्ये विभागला होता.शिवकाळ व पेशवेकाळात समाजात ब्राम्हणांना उच्च स्थान होते. पेशवेकाळात ब्राम्हण वर्गाचे प्रभावी राजकीय वर्चस्व निर्माण झाले की जे शिवकाळात नव्हते. ब्राम्हणांच्या खालोखाल स्वत:ला शहाण्णव कुळीचे मराठे म्हणवून घेणाऱ्या मराठ्यांचे स्थान होते. मराठ्यामध्ये मराठा आणि कुणबी असा भेद असून मराठ्यांकडे अनेक वतनांचे केंद्रीकरण झाल्यामुळे त्यांना चांगली सामाजिक प्रतिष्ठा होती, तशी कुणब्यांना नव्हती. मराठ्यांच्या खालोखाल बारा बलुतेदार व

अलुतेदारांचे स्थान होते. सर्वात खालचा थर हा अस्पृश्य जातींचा असून त्यामध्ये महार, मांग, चांभार या जातींचा समावेश होता. या सर्व जाती व उपजातीमध्ये नेहमी बरे वाईट प्रसंग घडत असत.

### आ. समाजजीवनावर ब्राम्हणवर्गाचा प्रभाव

ब्राम्हण म्हणजे ज्याला पारंपरिक व धर्मशास्त्राच्या आधाराने पूजाअर्चा करण्याचा अधिकार असणारा, पुरोहितपणा करणारा व अध्ययन आणि अध्यापन करणारा समाजातील उच्च वर्ग होय. सुरुवातीपासूनच भारतीय समाजावर या वर्गाचा प्रभाव होता. पेशवेकाळात राज्यकारभाराची सुत्रे ब्राम्हण वर्गाच्या हातात गेल्यामुळे महाराष्ट्रातील समाजजीवनावर ब्राम्हणांचा प्रभाव खूपच वाढला होता.[७७] त्यामुळे कांहीवेळेला ब्राम्हण व अब्राम्हण यांच्यामध्ये वाद निर्माण होत असत. धर्मशास्त्राने आणि परंपरेने नेमून दिलेली जातीची कामे सोडून इतर कामे करण्यामध्ये ब्राम्हणांसह अनेक जाती गुंतलेल्या आढळतात. ब्राम्हणवर्ग ब्राम्हणांची कामे करुन क्षत्रिय आणि वैश्याचीही कामे करु लागला होता. त्यामुळे देखील त्यांचा सामाजिक प्रभाव वाढत गेला.त्यांचा सामाजिक दर्जा जरी वाढला असला तरी त्यांच्या जाती व उपजातीमध्ये विविध कारणाने संघर्ष अथवा वाद होत होते.

### इ. अस्पृश्यता

प्राचीन काळापासून प्रचलित असलेली चातुर्वर्ण्य पध्दत पेशवेकाळातही अस्तित्वात होती. हिंदू समाज चार मुख्य गट आणि इतर उपगटामध्ये म्हणजेच जातीमध्ये विभागलेला होता. या समाजामध्ये शूद्र गटातील जातींना अस्पृश्य समजले जात होते. त्यामध्ये महार, मांग व चांभार या प्रमुख जाती व त्यांच्या उपजातींचा समावेश होता.[७८] प्रत्येक खेड्याच्या गावकुसाबाहेर अस्पृश्यांची वस्ती असणे हे तत्कालीन समाजव्यवस्थेचे लक्षण होते. प्रत्येक जातीला नेमून दिलेली कामे त्यांना करावी लागत होती. त्याबदल्यात त्यांना बलुते मिळत होते. अस्पृश्य जातीपैकी महार हा गावचा वतनदार सेवक होता. गावकीची दवंडी पिटण्यापासून ते शेतसारा गोळा करण्यापर्यंतची सर्व कामे त्याला करावी लागत होती. जमिनीच्या संदर्भातील सर्व

तंट्यामध्ये महाराची साक्ष महत्वाची मानली जात होती. गावकीची जी कामे महार करत नव्हता ती मांगाला करावी लागत होती. गुन्हेगारांचा माग काढण्याचे कामही त्याला करावे लागत होते.कातडी वस्तू बनविण्याचे काम चांभाराचे आणि कातडी कमविण्याचे काम ढोराचे होते.अशाप्रकारची दुय्यम दर्जाची कामे अस्पृश्य जातींना करावी लागत होती.

### ई. गुलामगिरी

प्राचीन काळापासून चालत आलेली गुलामगिरीची पध्दत पेशवेकाळात आणि त्यानंतर पुढे इंग्रजांच्या काळातही सुरु होती.मात्र कालानुरुप तिच्यामध्ये बदल होत गेलेले होते. पेशवेकाळात गुलामगिरीची पध्दत टिकून राहण्यास अनेक घटक कारणीभूत होते. युध्दात सापडलेल्या स्त्री-पुरुषांना पेशवाईत गुलाम बनविले जात होते. त्यावेळी बायका व मुलींना पकडून कुणबींनी म्हणून विकले जात होते.[७९] कर्जबाजारीपणा व दुष्काळ या कारणामुळेही गुलामांचा व्यापार मोठ्या प्रमाणात वाढत होता. बदकर्म करणाऱ्या स्त्रीयांनाही गुलाम म्हणून विकले जात होते. गुलामांना मिळणारी वागणूक ही त्यांच्या मालकावर अवलंबून होती. अनेक मालक आपल्या गुलामांना चांगली वागणूक देत असल्याचे दाखले सापडतात. शुभप्रसंगी व सणाच्यावेळी त्यांना भेट, बक्षीस व कपडे दिले जात होते.

### उ. वेठबिगारी

प्राचीन काळापासून प्रचलीत असलेली वेठबिगारीची पध्दत पेशवेकाळात आणि त्यानंतर पुढे १९६० पर्यंत महाराष्ट्रात प्रचलीत होती. महाराष्ट्रात प्रचलीत असलेल्या अनेक अनिष्ट व अमानवी प्रथांपैकी ही एक होय. या पध्दतीमध्ये सक्तीने प्रजेकडून विनावेतन काम करुन घेतले जात होते. विनावेतन काम करुन घेण्याचा अधिकार पेशवेकाळात राज्यकर्ते, सरदार,सरंजामदार, वतनदार, इनामदार व सरकारी अधिकाऱ्यांना मिळाला होता.[८०] पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या ज्या जाती यावेळी होत्या त्या ज्या वस्तूंचे उत्पादन करीत असत त्या उत्पादित वस्तू वेठबिगारीच्या बदल्यात मोबदला म्हणून देत असत. सर्व बलुतेदार आणि अलुतेदार लोकांना यावेळी वेठबिगारी

करावी लागत होती. फक्त छत्रपती शाहूने इ.स.१७४४-४५ मध्ये कासार लोकांच्या विनंतीवरुन त्यांची वेठबिगारी माफ केली होती.

प्रजेचे पालन-पोषन करणे आणि आपल्या राज्यात समृध्दी आणणे हे प्रत्येक राज्यकर्त्याचे नैतिक कर्तव्य असते. तरच प्रजेच्या मनात राज्यकर्त्याबद्दल प्रेम व आपलेपणाची भावना निर्माण होत असते. वेठबिगारी करावी लागणाऱ्या प्रजेला उपद्रव होऊन किंवा त्रासाला कंटाळून ती परागंदा होणार याची काळजी राज्यकर्ते या नात्याने पेशवे घेत होते.[८१] वेठबिगार प्रजा परागंदा होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश सरकारकडून अधिकाऱ्यांना दिले जात होते.

## ऊ. बलुतेदारी

प्राचीन काळापासून भारतात प्रचलीत असलेली बलुतेदारी ही पध्दत पेशवेकाळ आणि त्यानंतरही महाराष्ट्रात सुरु होती.[८२]बलुतेदारीमध्ये बलुतेदार आणि अलुतेदार यांचा समावेश होता. ही पध्दत जातीव्यवस्थेवर अधारलेली होती. बलुतेदार लोक गावातील लोकांची सेवा करत.त्याच्या मोबदल्यात त्यांना बलुते मिळत होते.बलुतेदारांची सेवा ही गावकऱ्यांना अतिशय आवश्यक वाटत होती.जोपर्यंत बलुतेदार गावासाठी काम करीत होता तोपर्यंत त्याला मोबदला म्हणून बलुते मिळत होते.सरकारकडून वतनदार बलुतेदारांना इनाम जमीन मिळत होती.जसे महारवतन, मांगवतन, सुतारकीचे वतन, इत्यादी.

## ए. वतनदारी :

पेशवेकालीन समाजात वतनदारांना अतिशय मानाचे स्थान मिळत होते.राजकीय सत्तेपर्यंत पोहोचण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणून वतनाकडे पाहिले जात होते.[८३]वतनाला सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठा लाभली असल्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होण्यास वतनदारी कारणीभूत ठरत होती. वतनाचे अधिकार मिळावेत म्हणून दावेकऱ्यामध्ये संघर्ष आणि कांहीवेळा रक्तपात होत होता. वतनदारी निर्माण करण्याचा हेतू प्रशासकीय विकेंद्रीकरण

करण्याचा असल्यामुळे तिची पेशवेकाळात अत्यंत आवश्यकता होती. वतनाचा हक्क मिळालेल्या वतनदारांची सामाजिक प्रतिष्ठा खूप वाढत होती.

## ऐ. धार्मिक श्रध्दा व चालीरीती

भारतीय समाजरचनेवर धर्माचा अत्यंत जबरदस्त प्रभाव प्राचीन काळापासून पडलेला आहे तो अद्यापही कमी झालेला दिसून येत नाही. पेशवे काळात तर महाराष्ट्रातील जनता धार्मिक श्रध्दा व चालीरीती यांच्या अति आहारी गेलेली दिसून येते.[८४] पेशवेकाळात राज्यकर्त्यांनी धार्मिक चालीरितींना राजाश्रय दिल्यामुळे राज्यकर्ते या नात्याने आणि धर्म जानणारे म्हणून अशा दोन्ही अंगांनी ब्राम्हण वर्गाने समाजावर वर्चस्व मिळविले होते.कोणतेही काम करण्यासाठी शुभमुहूर्त पाहण्याची पध्दत समाजामध्ये रुढ होती. मुलाचे बारशे करण्यासाठी, लग्न करण्यासाठी, मुंज करण्यासाठी, कोणतीही बोलणी करण्यासाठी, प्रवासासाठी, शत्रूवरील मोहिमेसाठी, इत्यादी कामे ही मुहुर्तावरच केली जात होती. समाजामध्ये देवाला संतुष्ट करण्यासाठी किंवा आपली इच्छा देवामार्फत पूर्ण करण्यासाठी अनुष्ठाने केली जात होती. ही अनुष्ठाने आजारपणातून बरे होण्यासाठी, पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून, पाऊस पडावा म्हणून किंवा युध्दामध्ये शत्रूचा पराभव व्हावा म्हणून केली जात होती. आपल्या विविध प्रकारच्या मनोकामना पूर्ण व्हाव्या म्हणून विविध देवदेवतांना नवस करण्याची प्रथा यावेळी समाजामध्ये होती. मनातील इच्छा पूर्ण झाल्यावर नवस फेडण्यासाठी भरपूर पैसा खर्च केला जात होता. आपल्या मनातील इच्छा देवाकडून पूर्ण करुन घेण्यासाठी म्हणजेच त्याबद्दल देवाला प्रसन्न करुन घेण्यासाठी व्रत केले जात होते. पेशवेकाळात दशाफलाव्रत, बुधाष्टमीव्रत, त्रिपुरी पौणिमाव्रत, संकष्टी चतुर्थीव्रत, प्रतिपदाव्रत, द्वितीयाव्रत,तृतीयाव्रत, मौनव्रत, एकादशीव्रत, गोकुलाष्टमीव्रत, रथसप्तमीव्रत, ॠषिपंचमीव्रत इत्यादी अनेक व्रते केली जात होती. नैसर्गिक आपत्ती व संकटे यापासून सुटका व्हावी म्हणून विविध प्रकारचे शांतिकर्म केले जात होते. त्यामध्ये रोगशांति, ग्रहशांति, वास्तुशांति इत्यादि शांतिकर्मे केली जात होती. याशिवाय पेशवेकाळात होम, यजन व यज्ञ मोठ्या प्रमाणात केले जात होते.

प्राचीन काळापासून जसे सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण म्हणजे मोठे अरिष्ठ वाटत होते तसेच पेशवेकाळातील लोकांनाही वाटत होते. त्यामुळे ग्रहणकाळात दानधर्म आणि जप करण्यासाठी इतर सर्व व्यवहार बंद असत. श्रीमंत लोक ग्रहांचा कोप शांत करण्यासाठी तुलादान करत.पेशवेकाळात दानधर्म मोठ्या प्रमाणात केला जात होता.श्रावणमास आणि चार्तुर्मास यावेळी तर मोठ्या प्रमाणात दानधर्म केला जात होता. हिंदू धर्मियांनी काशीची यात्रा केल्याशिवाय त्याला मोक्ष मिळत नाही अशी समाजाची धारणा होती. त्यामुळे अनेक लोक या यात्रेला जात. अनेक ठिकाणचे लोक एकत्र येऊन काशीयात्रेला चालल्यास पेशवे त्यांच्या संरक्षणाची व प्रवासाची व्यवस्था करीत असत. या सर्व बाबीमधून पेशवेकालीन समाजावर धर्माचा असणारा प्रभाव दिसून येतो.

पेशवेकालीन लोकांचा जसा देवावर विश्वास होता तसा भुताखेतावरही होता. भटभिक्षुकापासून ते पराक्रमी सरदारापर्यंत सर्वांना भुतबाधेची मोठी भीती वाटत होती. तत्कालीन समाजामध्ये भाऊबंदकीची आणि इतर भांडणे असल्यामुळे विरोधकाचे परिपत्य करण्यासाठी त्याच्यावर भुत घालण्यासारखे प्रकार केले जात होते. विषेशकरुन कोकणामध्ये अशाप्रकारच्या विविध करणी केल्या जात होत्या. कोकणातील लांजे या गावच्या बाळ महाजन खोत याने लोकांवर भुते घातल्याचा अपराध कबुल केल्यावर सरकारने त्याचे खोती वतन जप्त करुन त्यास कोकणातून देशावर पाठविले होते. देशावरही कांही लोकांनी भुते घालण्याचा व्यवसाय चालविला होता. भुताप्रमाणे चेटकाचीही कल्पना महाराष्ट्रातील समाजामध्ये प्रचलीत होती. चेटूक करणाऱ्या अपराध्यावर सरकारने कठोर कारवाई केल्याचे अनेक पुरावे मिळतात. जारणमारणाची विद्या ज्याच्याकडे आहे अशा देवऋषी आणि पंचाक्षरींचा धंदा चांगला चालत होता. औषध उपचार करुन आजार बरा झाला नाही तर लोक देवऋषींकडे धाव घेत आणि ते सांगतील ते उपाय करत. पेशवेकालीन समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे व लोक मागासलेले जीवन जगत असल्यामुळे अशा अंधश्रध्दा समाजात निर्माण झाल्या होत्या.

## ओ. जाती-उपजातीमधील संघर्ष

हिंदू समाजाची रचना जातीय श्रेष्ठत्वावर अवलंबून असल्याने प्राचीन काळापासून समाजामध्ये जातीय संघर्ष निर्माण झालेले आढळतात. पेशवेकाळातही जाती-जातीमध्ये किंवा उपजातीमध्ये संघर्ष किंवा झगडे अनेकदा होत असत.[८५] जातींचे पारंपरिक कायदेकानून, चालीरीती परंपरा यामध्ये जर दुसऱ्याने अतिक्रमण केले तर  संघर्ष होत असत.जातीय कर्मठपणा हे जातीय संघर्षाचे महत्वाचे कारण होते. भारतीय समाजामध्ये प्रत्येक जातीला परंपरेने चालत आलेला व्यवसाय करावा लागत होता. पेशवेकाळात कांही वेळा दुसऱ्या जातीचा व्यवसाय करण्याचा प्रयत्न कोणी केला तर दोन जातीमध्ये संघर्ष होत होता. यावेळी ब्राम्हणांचे राजकीय वर्चस्व निर्माण झाल्यामुळे त्यांनी आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबरच क्षत्रियांचे व वैश्याचे कामही करण्यास सुरुवात केली, ही एक विसंगती होती. जातीचा  सामाजिक दर्जा हे जातीय संघर्षाचे दुसरे कारण होते. जाती आणि उपजातीमध्ये असणारी उच्चनीचतेची भावना हीदेखील जातीय संघर्षाला कारणीभूत ठरत होती. प्रत्येक जातीचे मानपान हे ठरलेले असून त्यामध्ये दुसऱ्या एखाद्या जातीने अगर उपजातीने हस्तक्षेप केला तरीही जातीय वाद निर्माण होत. समाजाने आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली नसल्याने असा विवाह घडून आला तर त्यावेळी जातीय संघर्ष उफाळून येत असे. त्यामुळे रोटीबेटी व्यवहार करताना जातीने घालून दिलेली बंधने पाळावी लागत होती. वतनदारांना समाजात मोठा मानपान असल्यामुळे वेगवेगळी वतने मिळविण्यासाठीही अनेकदा दोन जातींमध्ये संघर्ष होत असे. अशा विविध कारणांमुळे पेशवेकाळात जातीय संघर्ष होत असत. या संघर्षाचे स्वरुप ब्राम्हण जातीअंतर्गत, ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर जातीमधील, बलुतेदारामधील व अस्पृश्य जातीमधील असे होते. याबाबतची माहिती पेशवेकालीन अनेक कागदपत्रांमध्ये मिळते.

## औ. स्त्रियांना दुय्यम स्थान

कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना स्त्रीयांचा दर्जा काय होता हे पाहावे लागते. त्यावरुन संस्कृतीचा मोठेपणा आणि मर्यादा समजतात. पेशवेकाळात एकत्र कुटुंबपध्दती प्रचलीत असून ती पितृसत्ताक होती. त्यामुळे समाजामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान

किंवा दर्जा दिला जात होता. प्राचीन काळापासून पितृसत्ताक कुटुंबामध्ये जसे मुलग्याच्या जन्माचे स्वागत केले जात होते तसे मुलीच्या जन्माचे होत नव्हते. ही परंपरा पेशवेकाळात आणि त्यानंतरही चालू राहिल्याचे दिसते.[८६] तरीदेखील जन्माला आलेल्या मुलीचे पालनपोषन आणि विवाह लावून देण्यापर्यंतच्या जबाबदाऱ्या कुटुंबातील लोक स्वीकारत होते. 'मांडीचा पाळणा आणि डोळ्याचा दिवा करुन माझ्या मायबाईनं मला वाढवलं, त्याचा उपकार केव्हा फेडू' अशातऱ्हेची कृतज्ञतेची भावना मराठी स्त्रियांच्या गीतामधून व्यक्त होते.त्यावरुन मुलीला देखील आस्थेने आणि कौतुकाने वाढविले जात असल्याचे स्पष्ट होते. मुलींचे बालपण खेळण्या-बागडण्यात जात असतानाच त्यांचा विवाह लावून दिला जात होता. फक्त श्रीमंत व राजघराण्यातील मुलीखेरीज इतरांना शिक्षण घेता येत नव्हते.[८७] त्यामुळे ब्राम्हण व मराठा सरदार यांच्या स्त्रिया साक्षर आढळतात, मात्र समाजातील इतर स्त्रिया साक्षर आढळत नाहीत. राजकीय कुटुंबातील मुलींना लष्करी आणि राजकारभाराचे शिक्षण दिले जात होते. ताराबाई, उमाबाई दाभाडे, महादजीची पत्नी लक्ष्मीबाई शिंदे व यमुनाबाई, अहिल्याबाई होळकर अशा अनेक स्त्रियांनी लष्करी व राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटविला होता. पेशवेकाळातील स्त्रियांची ही परंपरा पुढे राणी लक्ष्मीबाई हिने चालविली. यावेळी बालविवाहाची प्रथा प्रचलीत असली तरी मुलगी वयात येईपर्यंत तिला माहेरी ठेवली जात होती. यावेळी सामान्य कुटुंबातील मुलींना गृहकृत्यदक्षतेचे शिक्षण दिले जात होते.

पेशवेकाळात महाराष्ट्रातील विविध जाती जमातीमध्ये विवाहाच्या निरनिराळ्या पध्दती होत्या. विवाह भंग होण्यापासून ते घटस्फोटापर्यंत आणि पत्नीचे दान घेण्यापासून ते हुंडा देण्यापर्यंतचे सर्व प्रकार यावेळच्या महाराष्ट्रात आढळतात. समाजामध्ये बालविवाहाची प्रथा प्रचलीत असून आठ वर्षापेक्षा मोठी मुलगी घरात अविवाहित ठेवणे म्हणजे अधर्म मानला जात होता.[८८] म्हणूनच दुसऱ्या बाजीरावाने नऊ वर्षापेक्षा मोठी मुलगी अविवाहित राहू नये असा हुकुम काढला होता. अनेकदा सात आठ वर्षाच्या मुलीचा विवाह तीस पस्तीस वर्षाच्या घोडनवऱ्याबरोबर लावले जात होते. अशावेळी बालनवरीवर जूलुम होत असे. कांहीवेळा तिच्यावर लवकरच विधवा होण्याचाही प्रसंग येत असे. अशा विधवांना एक तर सती जावे लागत होते किंवा वैधव्यामध्ये जीवन कंठावे लागत होते. विधुर पुरुष दुसरा विवाह करत होता मात्र

विधवा स्त्रिला दुसरा विवाह करता येत नव्हता. समाजातील कांही जातीमध्ये काडीमोड घेऊन दुसरा विवाह करण्याचा आधिकार स्त्री-पुरुष असा दोघांनाही होता.श्रीमंत कुटुंबामध्ये बहुपत्नीकत्वाची चाल रुढ होती. त्यामुळे कांही वेळेला जबरदस्तीने मुली पळवून आणून त्यांच्याशी विवाह केला जात होता. यामुळे वैवाहिक आणि कौटुंबिक जीवनामध्ये स्त्रियांवर अन्याय होत असल्याचे दिसून येते.

बहुपत्नीकत्वाच्या पध्दतीबरोबरच विवाहबाह्य संबंध ठेवण्याला पेशवेकाळात सामाजिक मान्यता होती.[८९] नाटकशाळा, कुणबिनी, उपस्त्री, रक्षा, मर्जी अशी वेगवेगळी नावे ठेऊन स्त्रिया बाळगणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. त्यामुळे राज्यकर्ते आणि श्रीमंत कुटुंबामध्ये अशाप्रकारच्या स्त्रिया मोठ्या प्रमाणात ठेवलेल्या आढळतात. शाहू महाराजांचे तर इस्लामी राज्यकर्त्याप्रमाणे जनानखाने असून त्यावर विश्‍वासू अधिकारी नेमलेले असत. विरुबाई या शाहूच्या रक्षेला पत्नीचा दर्जा मिळाला होता. तिने शाहूवर केलेल्या निष्ठापूर्वक प्रीतीमुळे त्यांच्या संबंधाला सामाजिक प्रतिष्ठा मिळाली होती. विवाहित स्त्री जेवढा त्याग करणार नाही तेवढा त्याग मस्तानीने बाजीरावासाठी केला, मात्र तिला व बाजीरावाला घरातला आणि समाजातला प्रक्षोभ सहन करावा लागला. लग्नाच्या पत्नीखेरीज अनेक स्त्रिया ठेवण्याची त्या काळात पध्दत असताना देखील ती केवळ मुसलमान होती म्हणून तिला खूप विरोध झाला.मात्र मस्तानीला बाजीरावाची प्रेयसी म्हणून शाहूची मान्यता होती. मस्तानीला विरोध करणाऱ्या नानासाहेबाने आपल्या कारकिर्दीत अनेक स्त्रियांशी संबध ठेवले. चिमाजी आप्पा आणि माधवराव पेशवे मात्र यापासून पूर्णपणे अलिप्त होते. बाजीराव पेशव्याने तर विवाहबाह्य स्त्रियांशी संबंध ठेवण्यामध्ये कळस गाठला होता. त्यामुळेच होणाजी बाळाने त्याचे वर्णन ''पौर्णिमेसि तारांगणि जसा बाई चंद्र उदेला। मध्यभागी आपुण भोवत्या नाटकशाला'' असे केले आहे. राज्यकर्तेच असे वागत असल्यामुळे मराठी सरदार, मोठे अधिकारी आणि श्रीमंत वर्गामध्ये स्त्रिया बाळगणे ही बाब ऐश्‍वर्याचे व वैभवाचे लक्षण मानले जात होते. त्यामुळे सामान्य लोकांनीही हाच मार्ग धरल्यामुळे विवाहबाह्य संबंधाचे प्रमाण वाढले. अशा संबंधापासून झालेल्या संततीला सामाजिक मान्यता मिळत नव्हती.

पेशवेकाळात स्त्रियांचा ढासळलेला दर्जा कुणबीनींच्या खरेदी विक्री व्यवहारातून समजतो. प्राचीन काळापासून चालत आलेली स्त्रियांची आणि गुलामांची खरेदी विक्री पेशवेकाळातही मोठ्या प्रमाणात सुरु होती. पन्नास रुपयापासून ते शंभर रुपयापर्यंत कुणबिणी विकत मिळत होत्या.[१०] गरीबी, दुष्काळ, विधवेने बदकर्म केले म्हणून फर्मावलेली शिक्षा अशा अनेक कारणामुळे कुणबीनींची विक्री केली जात होती. पेशवेकाळात पुण्याचा जसजसा विस्तार वाढत गेला तशी कुणबीनींची गरज तेथे वाढत गेली होती. कुणबीनींचा व्यापार हा चारण, हेडे किंवा वंजारी यांच्यामार्फत किंवा प्रत्यक्ष विकत देणारा आणि घेणारा यांच्यामध्ये चालत होता.[११]

## अं. कुटुंबाचे सामाजिक स्थान

एकत्र कुटुंबपध्दती हे प्राचीन भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट्य होय. पेशवेकाळातही हीच पध्दत प्रचलीत होती. कुटुंबव्यवस्थेचा मुख्य आधार जात असून व्यक्तिकडे व्यक्ती म्हणून न पाहता जातीसंस्थेचा घटक म्हणून पाहिले जात होते. आपल्या कुटूंबाकडे वतनदारीचे हक्क रहावेत म्हणून लोक प्रयत्नशिल असत. एकत्र कुटुंबपध्दती ही पितृसत्ताक असून कुटूंबप्रमुखाचे स्थान मानाचे होते.[१२] एका कुटुंबामध्ये साधारणपणे तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत होते. कुटूंबप्रमुखाला कुलधर्म, कुलाचार व कुलदैवत यांना आवाहन करणे व प्रसन्न ठेवणे हे मुख्य काम करावे लागत होते. याशिवाय वर्षभरातील सण व उत्सव साजरे करणे, दरवर्षी श्राध्दविधी करणे, ब्राम्हण कुटुंब असल्यास मुलांची मुंज करणे, मुलामुलींचे विवाह करणे व सरकारकडून व गावाकडून घराण्याला मिळालेल्या आधिकाराची अमंलबजावनी करणे ही कामे करावी लागत होती. घराण्याची मालमत्ता ही सार्वजनिक समजून तिची वाटणी केली जात होती. कुटुंबावर झालेले कर्जही फेडण्याची जबाबदारी कुटुंबातील सर्व घटकांची होती. कुटुंबातील सर्व सदस्यांची मान्यता घेऊन मालमत्ता विकणे, दान देणे किंवा गहाण टाकणे असे व्यवहार केले जात होते.

**संदर्भ :**


१. नागोरी एस.ए., नागोरी कान्ता, मराठोंका इतिहास, पृ.६७

२. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खं.२ पृ.२५४

३. नागोरी एस.ए., नागोरी कान्ता, पूर्वोक्त, पृ.६७

४. आपटे द. व. व प्रा. ओतुरकर रा. वी.(संपा.),महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, ले.६२
सरदेसाई गो.स., पूर्वोक्त, खं.२ पृ.२७४

५. डॉ. पिसुर्लेकर, पां.स.पोर्तुगीज-मराठे संबंध, पृ.३०

६. आपटे द.व., प्रा.ओतुरकर रा.वी. (संपा.), पूर्वोक्त, ले.६४

७. कित्ता, ले.६६

८. चिटणीस मल्हार रामराव, संभाजी राजे यांचे चरित्र, पृ.८७

९. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त, खं.२ पृ.२५५

१०. किशोरे ब्रिज, ताराबाई ॲन्ड हर टाईम्स, पृ.९५

११. चिटणीस गोविंद खंडेराव, शाहूमहाराजांची बखर, पृ.१२

१२. पगडी सेतु माधवराव, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द, पृ.२०-२१

१३. चिटणीस मल्हार रामराव, थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, पृ.१३

१४. डॉ. खोबरेकर वि.गो.,कोकणचा राजकीय इतिहास, पृ.१३०

१५. कित्ता, पृ.१८२

१६. आपटे द. व., प्रा.रा.वि ओतुरकर (संपा), पूर्वोक्त, ले.७३

१७. सरदेसाई, गो. स. पूर्वोक्त, खं.३ पृ.१००, १०१

१८. कित्ता, खं.३ पृ.१०१

१९. कित्ता, खं.३ पृ.१०७

२०. भावे वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.११०

२१. कित्ता, पृ.११०

२२. कुंटे. बी. जी. छत्रपती शाहू (पीएच.डी प्रबंध मुं.विद्या), पृ.३३५

२३. शाहू दप्तर रोजकीर्द, रु.४ पु.२ का.१४५

२४. कित्ता, रु.९ पु.१ का.१४

२५. कित्ता, रु. २ पु.४ का.४८

२६. कित्ता, रु.४ पु.४ का.१३६

२७. कित्ता, रु. ७ पु.३ का.४८

२८. कित्ता, रु.३पु.३ का.१६८

२९. कित्ता, रु. ६ पु.२ का.३७

३०. सरदेसाई जी. एस., न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज, व्हा.२ पृ.१८७-१८९

३१. केळकर य. न., इतिहासातील सहली, खं.२.पृ१०८

३२. केळकर य. न., कांही अप्रसिध्द ऐतिहासिक चरित्रे, पृ.१५४

३३. कित्ता, पृ.१५५

३४. खरे, वा.वा.(संक), ऐतिहासिक लेखसंग्रह भा.१३.पृ.६८९६

३५. डॉ. शिरगावकर वर्षा, पेशव्यांचे विलासी जीवन, पृ.११

३६. प्रा. कुलकर्णी म.रा.,महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणी, पृ.५३

३७. जहागिरदार विजया, तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, पृ.६७-७०

३८. प्रा. डॉ. अत्रे, प्रा.रायरीकर,केंजळे, महाराष्ट्र संस्कृती, पृ.६५

३९. कित्ता, पृ.६६

४०. चिटणीस दप्तर, रु.६ पु.१ का.३१२१

४१. प्रा. कुलकर्णी अ.रा., डॉ.म.रा.कुलकर्णी, डॉ.कंटक मा.रा.(संपा), मराठ्यांचा इतिहास साधन परिचय, क्रं.२१ पृ२७२ - २७४

४२. प्रा. डॉ. अत्रे, प्रा.रायरीकर,केंजळे, पूर्वोक्त, पृ.६८

४३. प्रा. कुलकर्णी,डॉ.कुलकर्णी, डॉ. कंटक (संपा.), पूर्वोक्त, क्र.६७ पृ.३५५

४४. प्रा. डॉ. अत्रे, प्रा.रायरीकर,केंजळे, पूर्वोक्त, पृ.६८

४५. प्रा. कुलकर्णी,डॉ.कुलकर्णी,डॉ. कंटक (संपा.), पूर्वोक्त, क्र.८३ पृ.३८४

४६. चिटणीस दप्तर, रु.५ पु.३ का.२५०३

४७. प्रा. डॉ. अत्रे, प्रा.रायरीकर,केंजळे, पूर्वोक्त, पृ. ६८

**४८.** चिटणीस दप्तर, रु.६ पु.१ का.३०५१

**४९.** कित्ता, रु.३२ पु.१ का.१६४६३

**५०.** केळकर, य. न. मराठेशाहीतील वेचक वेधक, पृ.४२

**५१.** डॉ. खोबरेकर वि.गो., मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन,पृ.२८

**५२.** ओतुरकर रा.वि., पूर्वोक्त, ले.४६

**५३.** कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०

**५४.** फुकाजावा हिरोशी, दि मिडिव्हल डेक्कन, पृ.१९९

**५५.** चिटणीस दप्तर, रु.४८ पु.२ का.२५१३०

**५६.** डॉ. गवळी पी.ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.२८६,२८७

**५७.** प्रा. कुलकर्णी, डॉ. कुलकर्णी, डॉ. कंटक (संपा.), पूर्वोक्त, क्र.१०१ पृ.४१३

**५८.** सरदेसाई गो.स., पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं.४३.प.२७

**५९.** डॉ. गवळी पी.ए., पूर्वोक्त, पृ.२८३

**६०.** चिटणीस दप्तर, रु.६ पु.१ का.३०५१

**६१.** प्रा. डॉ. अत्रे, प्रा. रायरीकर, केंजळे, पूर्वोक्त, पृ.७०

**६२.** आत्रे त्रिं. ना.,गावगाडा, पृ.१२९

**६३.** कित्ता, पृ.१२९

**६४.** कित्ता, पृ.१२२

**६५.** जोशी पं. महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खं.८ पृ.१
चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती पृ.९५

**६६.** भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक, जाने - मार्च २०११ पृ.११
चव्हाण रामनाथ, पूर्वोक्त पृ.९५

**६७.** भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जाने - मार्च २०११ पृ.१३

**६८.** आत्रे त्रिं.ना., पूर्वोक्त, पृ.१२२

**६९.** चिटणीस दप्तर, रु.६.पु.१ का.३०३४

७०. कित्ता, रु.६ पु.३ का.३४०६

७१. चव्हाण रामनाथ, पूर्वोक्त, पृ.५६

७२. कित्ता, पृ.६०

७३. कित्ता, पृ.१३८

७४. आत्रे त्रिं., ना., पूर्वोक्त, पृ.१२९

७५. कित्ता, १२९

७६. प्रा. डॉ. अत्रे, प्रा. रायरीकर, केंजळे, पूर्वोक्त, पृ.६०

७७. डॉ. गवळी पी.ए., पूर्वोक्त, पृ.२१७

७८. प्रा. डॉ. अत्रे, प्रा.रायरीकर, केंजळे, पूर्वोक्त, पृ.६२

७९. डॉ. खोबरेकर वि.गो., पूर्वोक्त, पृ.३०

८०. डॉ. गवळी पी.ए., पूर्वोक्त, पृ.३००

८१. कित्ता, पृ.३०६

८२. कित्ता, पृ.२७८

८३. प्रा.डॉ.अत्रे, प्रा.रायरीकर,केंजळे, पूर्वोक्त, पृ.६६

८४. भावे वि. कृ., पूर्वोक्त, पृ.२१०-२२२

८५. डॉ. गवळी पी.ए., पूर्वोक्त, पृ.२१६

८६. डॉ. देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन, पृ.३९

८७. कित्ता, पृ.४५

८८. कित्ता, पृ.६३

८९. कित्ता, पृ.१२४

९०. डॉ. शिरगावकर वर्षा, पेशव्यांचे विलाशी जीवन, पृ.४०

९१. कित्ता, पृ.३९

९२. डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ.१०९, ११०

| प्रकरण २ रे | # पेशवे पूर्वकालीन सामाजिक मनोरंजन |
|---|---|
| | २.१ प्रस्तावना<br>२.२ प्राचीन भारतातील सामाजिक मनोरंजन<br>२.३ प्राचीन महाराष्ट्रातील सामाजिक मनोरंजन<br>२.४ यादवकालीन मनोरंजनाचे कांही प्रकार<br>२.५ भारतावरील इस्लामी आक्रमणांचा सांस्कृतिक परिणाम<br>२.६ महाराष्ट्रावरील इस्लामी राजवटीचे परिणाम<br>२.७ भक्ती चळवळ व मनोरंजन<br>२.८ धार्मिक मनोरंजनाचे लोकप्रिय प्रकार (१३ वे शतक ते १७ वे शतक)<br>२.९ धार्मिक मनोरंजनाचा अर्थ आणि हेतू<br>२.१० महाराष्ट्रातील मनोरंजनाचे इतर प्रवाह |

### प्रकरण दुसरे

# पेशवे पूर्वकालीन सामाजिक मनोरंजन

## २.१ प्रस्तावना

मनोरंजनाचा इतिहास हा मानवी संस्कृतीच्या इतिहासाइतका जुना आहे. जगातील प्रत्येक मानव आपली दु:खे व चिंता विसरण्याकरीता आणि श्रमपरिहारार्थ करमणुकीचा आधार घेत असतो. त्यामुळे प्रत्येक संस्कृती मधील मानव कमी अधिक प्रमाणात आपले लक्ष मनोरंजनाच्या विकासाकडे देत आला आहे. मनोरंजनाचे विविध मार्ग आणि प्रवाह मानवाने वेळोवेळी निर्माण केले आहेत. त्यांनाच मनोरंजनाची विविध साधने असे म्हणतात. मनोरंजनाच्या साधनामध्ये काळानुरुप बदल होत गेला आहे. मनोरंजन अथवा करमणूक हे वैयक्तिक आणि सार्वजनिक मूल्य आहे. अगदी सुरुवातीच्या काळात लोकांचे मनोरंजन करणे या मुख्य ध्येयासाठी करमणुकीचे प्रकार उदयास येऊ लागले. उत्तर स्पेनमध्ये इतिहासपूर्व कालामधील गुंफाचित्रे आढळली आहेत. ती चित्रे घोडा, रेनडियर, रानरेडा, अस्वल, पानघोडा या प्राण्यांची आहेत. चित्रामधील हे प्राणी धावताना, उड्या मारताना व हल्ला करताना दाखवले असून त्यामधून त्यांचा अर्थ स्पष्ट होतो.[१] या चित्रामधून आपल्याला तत्कालीन मानवाला मनोरंजनाची आवड होती हे स्पष्ट होते.

संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच मानवाच्या दृष्टीकोनामध्ये देखील खूप बदल झाला आणि मानव जीवनाकडे एका वेगळ्या दृष्टिने पाहू लागला. काळाच्या प्रवाहाबरोबर मानवाच्या साहित्य छंदामध्ये परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. साहजीकच या काळात दंतकथांचा उदय झाला. या दंतकथामधून एकपात्री, पूर्णत्ववादी भूमिकांचा विकास झाला. ही पात्रे म्हणजे एखादा राजा किंवा सेनापती होय. मात्र तो सामान्य माणूस नव्हता. संपूर्ण चित्रण हे समाजातील उच्च व्यक्तिच्या भूमिकेभोवती केंद्रित झालेले असायचे. यामध्ये सामान्य माणसाला प्रतिनिधित्व मिळत नव्हते. त्यामुळे या भूमिकेला सामाजिक परिस्थितीचा स्पर्श होत नव्हता. महाकाव्य काळानंतर

करमणुकीच्या रुपामध्ये हळूहळू बदल होऊन त्याचा कल समाजाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे दर्शन घडविण्याकडे झाला. महाकाव्ये, नाटके व लोकगीते ही करमणुकीची नवी साधने म्हणून सुसंस्कृत जगात उदयास आली. त्यामुळे संगीत, नृत्य, क्रीडा, घोडेस्वारी व कुस्तीसारखे अनेक कला व क्रिडाप्रकार आज त्याचे प्रतिनिधित्व करीत आहेत. ग्रीक लोकांनी सर्वप्रथम ऑलिंपिक स्पर्धेच्या कल्पनेला जन्म दिला. या स्पर्धेच्या विकासामुळे पुढील काळात विविध क्रीडाप्रकारांचा उदय व विकास झाला. तसेच त्यांनी करमणुकीचा एक कलाप्रकार म्हणून नाटकांच्या विकासावर भर दिला. नाटकीय करमणूकीमध्ये नाटकाच्या सादरीकरणासाठी रंगमंचाच्या सुनियोजित बांधणीला अतिशय महत्व प्राप्त झाले. ग्रीकांच्या प्रत्येक शहराजवळील टेकडीशेजारी दगडात खोदकाम करुन नैसर्गिक प्रेक्षागृहाची उभारणी करण्यात आली होती. [२] एखादा मोठा विजय मिळवून आलेल्या सेनापतीपेक्षा मोठा सन्मान निवडक आणि यशस्वी नाटककारांचा केला जात होता.[३]

या गतीमान संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेपेक्षा समृध्द आणि सुरक्षित संस्कृतीकरण असलेल्या भारत आणि चीन या देशातील लोकांचे स्वत:चे असे सामाजिक मनोरंजनाचे मार्ग होते. चिनी संस्कृतीच्या लोकजीवनामध्ये चित्रकला आणि काव्य हे दोन कलाप्रकार प्रमुख होते.[४] इ.स. १२० मध्ये चिनी सम्राटाच्या दरबारात एकदा दरवेशांच्या (माकडवाले) एका समुदायाने प्रवेश केला आणि त्यांनी स्वत: रोमन सम्राटाचे वंशज असल्याचे भासविले होते. [५]

## २.२ प्राचीन भारतातील सामाजिक मनोरंजन

भारतीय संस्कृतीकरण ही जगातील सर्वात जुनी आणि समृध्द अशी संस्कृतीकरणाची प्रक्रिया आहे. तिने अगदी सुरुवातीपासून मनोरंजनाचे अनेकविध मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सिंधू संस्कृतीच्या काळात नृत्य व जुगार हे मनोरंजन प्रकार लोकांना वेळ घालविण्यासाठीची प्रमुख साधने होती.[६] मुलांच्या मनोरंजनासाठी भाजलेल्या मातीपासून अनेक खेळणी बनवली जात होती.[७] यावेळी बनविलेल्या खेळण्यामध्ये पाठीला पोक आलेले सांड, कुत्रे, हत्ती, मेंढ्या, गेंडे, मगरी, कासव, यांचा समावेश होता.[८] उत्खननात सापडलेली अनेक खेळणी हे दर्शवितात की त्या काळातील मुलांना खेळण्याची खूप आवड होती. मनोरंजनाचा

विचार करता त्यावेळचे लोक मैदानी खेळापेक्षा बंदिस्त खेळांना जास्त पसंती देणारे होते. [९] उत्खननात सापडलेल्या खेळण्यामध्ये चाकाच्या गाड्या हा एक विशेष प्रकार होता. त्यावरुन प्रत्यक्षामध्येसुध्दा अशा गाड्या वापरल्या जात असाव्यात असा तर्क बांधता येतो. कांही खेळण्यातील प्राण्याची हालचाल दोऱ्याच्या सहाय्याने करता येईल अशी खेळणी बनविण्यात आली होती. [१०]

सिंधू संस्कृतीनंतरचा कालखंड भारतीय इतिहासामध्ये वैदिक संस्कृतीचा कालखंड (इ.स.पू. १५००-१२००) म्हणून ओळखला जातो. पूर्व वैदिक काळामध्ये स्तोत्रगाण करणे हे अतिशय लोकप्रिय होते. स्तोत्रपठण हे देवांचे भजन म्हणून किंवा त्यांची स्तूती करण्यासाठी केले जात होते. या काळातील आर्य लोक संगीतप्रेमी होते.[११] ते बासरी, विणा व सारंगीचे वादन करणारे होते. या वादनाला झांज आणि ढोल यांची साथ दिली जात होती. याशिवाय ते सप्तसुरांच्या वाद्याचा उपयोग करणारे होते की ज्याचा उगम सुमेरियामध्ये झाला असे मानले जाई.[१२] इशस्तोत्रामध्ये गायन, नर्तन आणि नर्तिका यांचा संदर्भ आढळतो. नृत्यामध्ये स्त्रिया आणि पुरुष दोघेही सहभागी होत होते. नृत्याला संगीताची साथ दिली जात होती. आनंदी प्रसंग साजरे करण्यासाठी नृत्य व संगीताचे कार्यक्रम ते आयोजित करीत. स्त्रियांना आपले नृत्यकौशल्य व गायनकौशल्य दाखवण्याची आवड होती. [१३] मनोरंजनासाठी ते घोड्यांच्या आणि रथांच्या शर्यती लावत.[१४] मुष्टीयुध्द हा देखील त्यांचा अन्य मनोरंजनाचा एक प्रकार होता. भारतोलन हा क्रीडाप्रकार मनोरंजनसाठी व शरीर तंदुरुस्तीसाठी लोकप्रिय होता. दगडापासून बनवले जाणारे भारतोलक हलके व वजनदार अशा दोनप्रकारचे होते. हालके भारतोलक घनाकृती आकाराचे तर वजनदार शंखाकृती आकाराचे होते. मेसोपोटेमियातील भारतोलकांशी तुलना करता भारतीय भारतोलकांची बनावट अतिशय तंतोतंत व एकसंघ होती.[१५] जुगार व फासे ही त्यांची मनोरंजनाची अन्य लोकप्रिय साधने होती. जुगारामुळे कुटुंबाची बरबादी होते याची जाण असुनदेखील समाजातील जुगारी लोक जुगार अड्ड्यावर नियमीत जाणारे होते.[१६] ऋग्वेदकालीन भारतीयांनी आपले जीवन कधीही अस्वस्थ आणि निराश अवस्थेत घालविले नाही तर त्यांना आनंद उपभोगण्याची आवड होती. तत्कालीन गायक हे जीवनानंदात डुंबून गेलेले असत. जीवनात खिलाडूवृत्ती वाढावी अशी मनोरंजनाची साधने त्यांनी निवडली होती.

उत्तर वैदिक काळामध्ये संगीत, गायन, नृत्य, घोड्यांच्या शर्यती, रथांच्या शर्यती,द्यूत इत्यादी करमणूकीची साधने होती. तत्कालीन वाङ्मयामध्ये शल्युस (Sailusha) किंवा नट असा उल्लेख आढळतो. यावेळी स्त्रियांना संगीत, नृत्य व गायनाचे शिक्षण दिले जात होते.[१७] उत्सवकाळात वीणा वाजवून गाथा म्हणणाऱ्या लोकांचा, बासरीवादकांचा व ढोल वाजविणाऱ्यांचा उल्लेख तत्कालीन वाङ्मयात आढळतो.

वैदिक कालखंडामधील बरेचसे मनोरंजनाचे प्रकार पुढे महाकाव्यांच्या काळात अखंडीत राहिले. या काळातील लोक मैदानी खेळांचे चाहते होते. ते हत्तींच्या झुंजींचा आस्वाद भरभरुन घेत असत.[१८] श्रीमंत लोक जुगार आणि द्यूत यांच्या आहारी जात होते. लोकांना नृत्याची आवड असून नृत्याचे कार्यक्रम होत असत. वेश्यागमन ही समाजमान्य संस्था असून राजे व श्रीमंत लोक वेश्यागमन करीत.[१९] वैदिक धर्मातील कांही प्रथा पध्दती आणि विचार न पटल्यामुळे बौध्द आणि जैन धर्मांचा उदय झाला. भारताच्या सामाजिक, राजकीय व धार्मिक जीवनावर या दोन धर्मीचा परिणाम झाला. यावेळी सामाजिक जीवनामध्ये शिकार, मासेमारी, नृत्य, अभिनय, व गारुड्याचे खेळ ही मनोरंजनाची साधने होती.[२०] मनोरंजन करणारे लोक व्यवसाय म्हणून आपल्या कला लोकांपूढे नेत असत.

मौर्यपूर्वकालीन लोकांची मनोरंजनांची अनेक साधने होती. मुलांना खेळण्याची आणि स्त्रियांना गायन, नर्तन व संगीताची आवड होती.[२१] शिकार, जुगार व प्राण्यांच्या झुंजी त्यावेळी लोकप्रिय होत्या. त्यावेळी नाटकीय खेळ लोकप्रिय असून तत्कालीन राजांनी लोकांच्या मनोरंजनासाठी नृत्यसभागृहांची उभारणी केलेली होती.[२२] मौर्यकाळात वसंत उत्सव, दीपावली व गिरीपूजा यासारखे सण आणि उत्सव साजरे करीत. स्त्रियांमध्ये कंदुक-क्रीडा मनोरंजनाचे साधन होते. शिकार, नौकानयन, बैलांच्या झुंजी, हत्तींच्या टकरी व बुध्दीबळ यांचा संदर्भ बौध्द वाङ्मयात मिळतो. यावेळी वीणा हे वाद्य लोकप्रिय झाले होते.समाजात नृत्य व अभिनय शिक्षकाला दुय्यम स्थान होते.

भारतातील मनोरंजनाचे वैयक्तिक मनोरंजन आणि सामाजिक मनोरंजन असे दोन प्रमुख प्रकार आहेत. सामाजिक मनोरंजनामध्ये प्रामुख्याने नाटक,संगीत लोकगीते, लोकनृत्ये, घोड्यांच्या शर्यती, रथशर्यती, कुस्ती, मुष्टीयुध्द इत्यादींचा समावेश होतो. नाटकांच्या बाबतीत

भारताला महान नाट्यलेखकांची परंपरा लाभलेली आहे. नाट्यकलेच्या उगमावेळी नाटकांचे स्वरुप हे परंपरागत आणि दैवी किंवा ईश्वरी असून ती एक विकसीत कला म्हणून समोर आली.[२३] नाटके ही एक ईश्वरीय कला म्हणून समजली जात होती. इ.स.दुसऱ्या शतकामधील अगदी सुरुवातीची भासाची नाटके अतिशय लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचली होती असे मानले जाते.[२४] त्याने संस्कृतमध्ये लिहिलेले 'स्वप्नवासवदत्ता', कालीदासाचे 'अभिज्ञ शाकुंतल' आणि शुद्रकाचे 'मृच्छकटीक' ही प्रसिध्द नाटके होत. कालीदासाच्या काव्य व नाटकांचे केवळ भारतीयांनीच नव्हे तर विदेशी विद्वानांनी कौतुक केले आहे.[२५] त्याची नाटके एक साहित्य, सौंदर्य, पात्रांचे वास्तवचित्रण, मानवी भावभावना या गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण होती. भारतीय लोककथांची परंपरा ही प्रामुख्याने प्रथम भारतीय पुराणात आणि महाकाव्यामध्ये आढळते. या लोककथांचा भारतभर प्रसार करण्याचे काम पुढील काळातील पुराणीकांनी केला.अध्यात्मिक कथा या प्रामुख्याने पूर्णत: जादूमय आणि काल्पनिक होत्या.त्या भारताच्या वेगवेगळ्या भागामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने सांगितल्या जात होत्या. नंतरच्या काळातील विष्णू शर्मा या विद्वानाने आपल्या 'पंचतंत्र' या कल्पीत व लोकप्रिय कथाग्रंथांमध्ये अशा अनेक कथा समाविष्ट केलेल्या आहेत की, ज्यामधून एक नैतिक शिकवण मिळते. 'सिंहासण बत्तीशी' व 'वेताळ पंचविशी' या कांही अन्य लोकप्रिय लोककथा आहेत.

भारतामध्ये नृत्य ही कला सिंधू संस्कृतीच्या उदयापासून लोकप्रिय झालेली आहे. नृत्याच्या जोडीला वाद्यवृंदाची मदत पुढील काळामध्ये घेतली जाऊ लागली. त्यामध्ये झांज, ढोल, बासरी, दुदंभी, करकरी, तुणतुणे, इत्यादींचा समावेश होता.[२६] दक्षिण भारतातील अनेक मंदिरामध्ये प्रशिक्षीत नृत्यांगणांचे गट असत. त्यांचे व्यवस्थापन हे मंदिर व्यवस्थापन समितीकडून पाहिले जात होते. खास प्रसंगानिमित्त त्यांच्या नृत्याचे कार्यक्रम सादर होत असत.[२७] काळाच्या ओघात नृत्याला अतिशय महत्व प्राप्त होत गेल्यामुळे तो एक व्यवसाय झाला. राजदरबारातील लोकांना खूष करण्यासाठी देशाच्या विविध भागातून कुशल व गुणी नृत्यांगणा आमंत्रित केल्या जाऊ लागल्या.[२८] तसेच वर्षातील कांही महत्वाच्या मंगलदिनी लोकनृत्य केली जात असा संदर्भ मिळतो.

कुस्ती हा शारीरिक तंदुरुस्ती राखण्यासाठी आणि वैयक्तिक शक्तिचे प्रदर्शन घडविण्याचा प्राचीन काळापासूनचा एक लोकप्रिय व महत्वाचा मार्ग होय. नियमित व्यायाम केल्यामुळे ते शक्य होत होते. मल्लांच्या शरिरयष्टीची व त्यांच्या क्षमतेची माहिती देणारा संदर्भ मिळतो.[२९] त्यामध्ये अनेक तंत्रशुध्द प्रकारांचे वर्णन केलेले आहे. वास्तव हे आहे की कुस्तीचे शास्त्र हे प्रामुख्याने भारतीयांनी भरभराटीला आणले. अनेक शिल्पकारांनी कुस्तीचे दाखले देणारी व तिच्या लोकप्रियतेसंदर्भात उदाहरण देणारी शिल्पे तयार केलेली आहेत. कुस्ती ही कला आजही प्रेक्षकांना आकर्षित करत असून ती समाजामध्ये मनोरंजनाचे एक महत्वाचे साधन म्हणून ओळखली जाते.

अलिकडे सूचित केलेल्या करमणुकीच्या प्रकारांपैकी संगीताला पूर्वी एक करमणूकीचे लोकप्रिय साधन म्हणून भारतामध्ये मान्यता होती. भारतीय संगीताच्या परंपरेची सुरुवात ही वैदिक काळानंतर (इ.स.पू.१२००-इ.स.पू. ६००) झालेली आहे. सामवेद या प्राचीन ग्रंथामध्ये भारतीय संगीताच्या उदयाची माहिती मिळते.त्यानंतरच्या काळामध्ये शतकानुशतके संगीत कलेचा विकास होत गेला.विशेष करुन इ. स.१ ल्या शतकामध्ये शास्त्रीय संगीताचा प्रवाह आपणास ज्ञात होतो.भारतीय शास्त्रीय संगीत ''रागदरी'' म्हणून ओळखले जाते. धर्म हा संस्कृतीकरणाचा आत्मा असल्यामुळे मनोरंजनाच्या प्रकारामध्ये धर्म ही संकल्पना आधारभूत आहे.

## २.३ प्राचीन महाराष्ट्रातील सामाजिक मनोरंजन

उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी सह्याद्रीची रांग आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या सातपुडा व विंद्य पर्वताच्या रांगा यामध्ये वसलेला प्रदेश म्हणजे महाराष्ट्र होय.[३०] याशिवाय कमीअधिक उंचीच्या अनेक पर्वतरांगामधून वाहणारे पाण्याचे लहानमोठे झरे व नद्यानाले हे शेवटी कृष्णा आणि गोदावरी या प्रमुख नद्यामध्ये विलीन होतात. महाराष्ट्रासारखा कडेकपारींचा आणि ओबडधोबड प्रदेश भारतामध्ये कोठेही आढळणार नाही.[३१] सह्याद्री पर्वत आणि अरबी समुद्र यांच्यामधील लांब पट्टीच्या आकाराचा प्रदेश कोकण म्हणून ओळखला जातो, तर घाटमाथ्याचा प्रदेश हा देश म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये लहानमोठ्या दऱ्या आणि कमी-अधिक खोलीच्या नद्या वाहतात. या प्रदेशाचे महाराष्ट्र असे नाव दोन हजार वर्षापूर्वीच्या

उल्लेखामध्ये आढळत नाही. दक्षिणापथ व दंडकारण्य या नावांचा उल्लेख मात्र रामायण-महाभारत या महाकाव्यातून मिळतो. नर्मदेच्या उत्तरेस आर्यांची वस्ती होती म्हणून तो विभाग आर्यावर्त व दक्षिणेस विस्तृत पसरलेला दक्षिणापथ अथवा दंडकारण्याचा प्रदेश असा उल्लेख आढळतो.[३२] इ.स.तिसऱ्या शतकापर्यंत हा प्रदेश महाराठ्ठ या नावाने ओळखला जात होता. [३३] इ.सनाच्या चौथ्या शतकापासून तो महाराष्ट्र या नावाने ओळखला जात असल्याचे उल्लेख मिळतात.[३४]

आधुनिक काळातील कवी गोविंदाग्रजानी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राचा प्रदेश राकट, कणखर व पहाडी आहे. त्यामुळे येथे ललीतकलांचा विकास कमी प्रमाणात झालेला होता. लोकांचे कष्टमय जीवन व विरक्त संतापी वृत्ती याला कारणीभूत होती. गाणे-बजावणे हे आपले उद्योग नसून ते हीन व्यवसाय आहेत असा समज येथील लोकांचा होता. [३५] महाराष्ट्राची भौगोलीक परिस्थिती संगीताच्या विकासाला अनुकूल नसल्यामुळे येथील जनतेला पूर्वी संगीताची फारशी आवड नव्हती. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की महाराष्ट्राच्या संस्कृतीने मनोरंजनाच्या साधनांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. मानवी संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत आणि मनोरंजनामध्ये महाराष्ट्रातील जनतेने दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. महाराष्ट्राने देशातील इतर प्रांताकडून मिळालेल्या वारशाचा पाठपूरावा केलेला आहे. भारतीय मनोरंजन हे धार्मिक दृष्टिने प्रभावित होते. महाराष्ट्रीयन संस्कृतीमध्ये देखील हिंदुत्ववादी धार्मिक चैतन्याचे प्रतिबिंब मनोरंजनाच्या वेगवेगळ्या प्रकारामध्ये पहावयास मिळते. जरी महाराष्ट्राच्या मनोरंजनाच्या कलेला वैभवशाली आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी नसली तरीदेखील अनेक पारंपरिक प्रकार अस्तित्वात होते. इ.स.पू. ३ ऱ्या शतकापासून मनोरंजनाचे अनेक प्रकार येथे आढळून येतात. सातवाहन (इ.स. पू.२५०-इ.स.२२७) काळापासून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाला सुरुवात होते. या काळामध्ये नृत्य, गीत-गायन, जुगार (सोंगट्या), कुस्तीचे फड हे लोकांचे करमणूकीचे प्रकार होते.[३६] इ.स.पहिल्या शतकातील सातवाहन राजा हाल याच्या काळात मनोरंजनाच्या साधनांचा विकास झाला. त्याची राजधानी प्रतिष्ठान उर्फ पैठण येथे नाट्य आणि काव्य या कलांचा चांगला विकास झाला. त्याने 'गाथासप्तशती' हा प्राकृत पद्यसंग्रह संपादित केला होता. शृंगाराची वर्णने असणाऱ्या या गाथांचा उपयोग त्यावेळी मनोरंजनासाठी करण्यात आला. त्यावेळी कलावंतीणींचे

मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत. त्यांना 'रतिनाट्य' असे म्हणत.[३७] या कार्यक्रमाची सुरुवात मंगलचरणाने म्हणजेच गणाने होई. पहिला गण शंकर-पार्वतीचा, दुसरा लक्ष्मी-नारायणाचा व तिसरा गणपतीचा असे. गणानंतर पौराणिक सोंगांचे कार्यक्रम होत. वाकाटक कालीन गुंफाचित्रे ही भारतीय करमणुकीच्या कलेचे एक महत्वपूर्ण अंग होते. वाकाटक (इ. स. २८०-इ. स ५२५), राष्ट्रकुट (इ. स. ७५३-इ .स. ९७३) आणि शिलाहार (इ.स. १०१३-इ. स. १२१८) यांना गुंफाचित्रे व शिल्पकलेची आवड होती. सातवाहन राजवटीच्या काळापासून महाराष्ट्रात लेणी खोदण्यास सुरुवात झाली. स्वत: सातवाहन राजे बौध्दधर्मीय नसतानादेखील त्यांनी बौध्द भिक्षूंची लोककल्याणाची इच्छा पाहून त्यांना आपल्या राज्यात विहार व चैत्य खोदून राहण्यास परवानगी दिली.[३८] अजिंठा लेण्यामधील चित्रे व शिल्पे लोकांची अध्यात्मिक व नैतिक उन्नती आणि मनोरंजन करण्याचे काम करीत होती. या कलाकृती बौध्द भिक्षूंनी कारागिरांकडून काढून घेतल्या होत्या. तसेच कांही कुशल भिक्षू स्वत:ही आकृती काढण्याचे काम करणारे होते.[३९] या गुंफाचित्रातून आणि शिल्पातून आपल्याला वास्तवाची ओळख होते की बौध्द धर्माच्या प्रसारासाठी खास प्रयत्न केले गेलेत. तरी देखील प्राचीन महाराष्ट्रीय जनता मोठ्या प्रमाणावर शिवभक्तच राहीली.

## २.४ यादवकालीन मनोरंजनाचे कांही प्रकार

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला गती देणारा व वैभवशाली कालखंड म्हणूंन यादवकाळ (इ.स.१०९२-१३१२) ओळखला जातो. कारण याच काळात महाराष्ट्राच्या सांस्कृतीकरणाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. अनेक कलांचा विकास या कालखंडात झाला. राजकीय, धर्म, अर्थ,समाज, व्यापार, उद्योग, कला, साहित्य या सांस्कृतिकरणाच्या अनेकविध क्षेत्रामध्ये या काळात उल्लेखानीय प्रगती झाली. मराठी भाषेला एक भाषिक आकार देण्याचे, तसेच मोडी व देवनागरी या लिपींचा योग्य साचा करण्याचे काम याच कालखंडात झाले. यादवकाळात जादूगार लोक आपल्या खेळाचे सादरीकरण करुन लोकांचे मनोरंजन करीत. यावेळी नृत्याचे अनेक प्रकार प्रचलीत होते. नृत्य आणि शारीरिक कसरती करण्यामध्ये कोल्हाटी ही जमात पटाईत होती. त्यांची नृत्ये ही शहरांच्या रस्त्यावर सादर होत असत.[४०] यादव

राज्यकर्त्यांना नृत्याची फार आवड होती. त्यामुळे नृत्याचे कार्यक्रम पाहण्यासाटी त्यांनी सभागृहे बांधली असून त्यामध्ये नृत्य व संगीताचे कार्यक्रम सादर होत. अमन या राजाला नृत्यमैफलीचे वेड लावून रामदेवरायाने त्याला दगा दिला होता. आपल्या सैनिकांना नृत्यकलाकारांचे वेश घालून देवगिरीच्या किल्ल्यामध्ये घुसविले आणि अमनला कैद करुन स्वत: देवगिरीचा राजा झाल्याचे घोषित केले.[४१] यादव राज्यकर्त्यांना संगीताचे खूप ज्ञान होते. रामदेवरायाचा जावई राजा हरदेव (इ. स. १३१० -१३१९) हा एक ख्यातनाम संगीतकार होता. त्याने 'संगीत सुधाकर' हा भारतीय संगीत व नृत्य या विषयीचा महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला.[४२] याशिवाय महाराष्ट्रातील लोकगीते, अभंग, आर्या, ओवी इत्यादि बद्दल माहिती देणारा 'संगीत रत्नाकर' हा ग्रंथ शारंगदेव याने लिहिला आहे.यादवकाळात स्त्री नृत्यांगणा प्रेक्षकांची करमणूक करत असून त्यांचे नृत्याचे सादरीकरण हे रात्री होत असे. रस्त्यावरील नृत्यप्रदर्शनाद्वारे कोल्हाटी जमातीतील स्त्री नृत्यांगणा महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेचे मनोरंजन करण्याचे काम करत होत्या.[४३] 'सत्तक' हा यादवकालीन महाराष्ट्रातील मनोरंजनाचा एक प्रकार होता. तो प्राकृतमध्ये नाटकांच्या स्वरुपात सादर केला जाई.[४४] हा प्रकार महाराष्ट्रात लोकप्रिय करण्याचे काम 'कर्पुरमंजीरी' चा लेखक राजशेखर याने केले. यावेळी अनेक संस्कृत नाटके लिहिली गेली. मात्र त्यांचा उद्देश सादरीकरण करणे हा नव्हता तर त्यांची संकल्पना ही समाजातील उच्च वर्गाशी बाधली गेलेली होती.

कळसुत्री बाहुल्यांचा खेळ हा यादवकालीन मनोरंजनाचा आणखी एक खास प्रकार होय. लाकडी बाहुल्या तयार करुन, त्यांना दोरा बांधुन व पाठीमागून तो दोरा कौशल्याने ओढून मानवी हालचालींचा आभास निर्माण करणे ही या खेळाची महत्वाची कला होय. संस्कृतमध्ये या खेळाला 'काष्टपांचालिका' असे म्हणतात.[४५] या कलाप्रकारामधूनच पुढील काळात नाटकांचा जन्म झाला असे मानले जाते. या खेळाच्या उगमाबाबत विद्वानामध्ये मतभेद आहेत. काहींच्यामते इ.स.पहिल्या शतकापासून बाहूल्यांचे खेळ भारतात सुरु आहेत. ज्ञानेश्वरी या ग्रंथामध्ये या खेळाचा उल्लेख सापडतो. 'दारुयंत्र' आणि 'साईखेडे' या नावाने ज्ञानेश्वरीत या खेळाचे वर्णन आले आहे.[४६] ज्ञानेश्वरीतील कांही ओव्या १३ व्या शतकातील बाहुल्यांच्या खेळाच्या स्वरुपाबाबतची माहिती देतात.[४७] बाहुल्यांचा खेळ हा बाहुल्या आणि दोरा यांच्या सहाय्याने सादर केला जाई. बाहुलीला बांधलेल्या दोऱ्याद्वारे तिचे नृत्य व हालचाल सादर होई. दोरा ओढणारा हा

नेहमी पडद्यामागे असे आणि त्याला सूत्रधार म्हणून ओळखले जाई.[४८] याच खेळाप्रमाणे कलात्मक मनोरंजनाबरोबरच क्रीडात्मक मनोरंजन देखील महाराष्ट्रात लोकप्रिय होते. त्यामध्ये विटी-दांडू, चेंडू व कुस्ती [४९] इत्यादींचा समावेश होता. जुगाराचा एक प्रकार म्हणून ओळखला जाणारा सारीपाटाचा खेळसुध्दा लोक आवडीने खेळत होते. यादव राजा रामदेवराय याला जुगार आणि वेश्याव्यवसाय आवडत नसून त्याने त्यावर बंधने घातली होती.

इ.स. १३ व्या शतकात नाटकीय काव्य म्हणून वैशिष्ट्यपूर्ण असलेले 'भारुड' महाराष्ट्रात अस्तित्वात होते. त्याचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी केला आहे. त्यांचे 'उड उड रे काऊ, तुझे सोन्याने मडवीन पाऊ'[५०] हे भारुड अतिशय लोकप्रिय बनले आहे. तसेच नामदेवानी लिहिलेले 'कुतन्या थमाल रे थमाल आपल्या गाई'[५१] हा एक नाटकीय काव्याचा उत्कृष्ट नमुना आहे. भारूडाच्या परंपरेला चालना देण्याचे काम १६व्या शतकात एकनाथांनी केले. गंमत म्हणून ओळखला जाणारा मनोरंजनाचा प्रकार मध्यकालीन महाराष्ट्रात सुरु होता. ज्ञानदेवांनी देखील त्याचे वर्णन केले असून त्याला लोकमान्यता व राज्यमान्यता होती. यासाठी गावकीच्या उत्पन्नातून 'देकार' नावाची देणगी बाजूला काढून ठेवली जात होती.[५२]

## २.५ भारतावरील इस्लामी आक्रमणांचा सांस्कृतिक परिणाम

यादवांच्या नेतृत्वाखाली ज्यावेळी महाराष्ट्राच्या सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती आली होती त्यावेळी उत्तर भारतातील शासकांना परकीय आक्रमणांना तोंड द्यावे लागत होते. ही आक्रमणे प्रामुख्याने इस्लाम धर्मियांची असून त्यांची सुरुवात इ.स.८ व्या शतकापासूनच झालेली होती. इ.स.७१२ मध्ये [५३] महमद बिन कासीमच्या नेतृत्वाखाली सिंधचा राजा दाहिर याच्यावर आक्रमण झाले. या आक्रमणाला धैर्याने तोंड देण्याचे काम दाहिरने केले. मात्र फंदफितुरीच्या मार्गाचा अवलंब केला गेल्यामुळे दाहिरचा इ.स.७१३ मध्ये पराभव झाला. त्यामुळे मुलतानसह सिंध प्रांत महमद बिन कासिमच्या ताब्यात गेला.[५४] त्याचे विजय जरी उत्कृष्ट व्यवस्थापनाचे प्रतिक असले तरी त्याचा फारसा प्रभाव तत्कालीन भारतीय शासकांवर पडला नाही. त्याचा विजय सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत गांभीर्याने घेतला गेला नाही.

इ. स. १००१ मध्ये गझनीच्या महमदाने पेशावरवर स्वारी केली.[५५] त्यावेळी येथील भारतीय शासक जयपाल याने धाडसाने शत्रूला प्रतिकार केला. यावेळी त्याला युध्दाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. त्यामुळे त्याला सैन्याच्या वेगाने हालचाली करता आल्या नाहीत आणि महमद गझनीला विजय मिळवणे शक्य झाले. जयपाल व त्याच्या कुटुंबियांना कैद करुन ठेवण्यात आले.[५६] त्यानंतर सतत त्याच्या भारतावर स्वाऱ्या होत राहिल्या. त्याने एकूण सतरा स्वाऱ्या करुन प्रचंड संपत्तीची लूट केली. त्याबरोबरच भारतीय प्रदेश आपल्या प्रतिनिधींच्या ताब्यात ठेवला. उत्तर भारतात मुस्लीमांचे एक सार्वभौम राज्य स्थापन करण्याचे कार्य तिसरा आक्रमक महमद घोरी याने केले. इ.स.११९२ मध्ये त्याने तराईनच्या लढाईत पृथ्वीराज चव्हाण या मात्तबर रजपूत राजाचा पराभव केला व त्यामध्येच त्याचे निधन झाले.[५७] तराईनचा पराभव आणि पृथ्वीराजचे निधन या रजपूताना बसलेला जबरदस्त धक्का होता. कारण त्यानंतर रजपूतांचे मोठे नुकसान झाले.

महमद घोरीच्या या विजयानंतर कोणताही भारतीय शासक त्याच्याविरुध्द यशस्वीपणे लढा देऊ शकला नाही. त्यामुळे त्याला भारतात अनेक विजय मिळाले. जिंकलेल्या प्रदेशाची जबाबदारी त्याने आपला विश्वासू सेवक कुतुबुद्दिन ऐबक याच्यावर सोपवून तो गझनीला निघून गेला. त्याने घोरीचे भारतातील राज्य वाढविण्याचे कार्य केले. इ.स.१२०६ मध्ये घोरीचे निधन झाले आणि भारतीय प्रदेशाचा सत्ताधिश ऐबक बनला. त्याने इ.स. १२०६ - १२१० या काळात दिल्लीचा सुलतान म्हणून राज्य केले. त्याच्यानंतर सत्तेवर आलेल्या अल्तमशने या राज्याला भक्कमपणा प्राप्त करुन दिला म्हणून आधुनिक इतिहासकार त्याला सुलतानशाही राज्याचा खरा संस्थापक मानतात. मुस्लीम आक्रमकांना आणि सत्ताधिशांना आपल्या धर्माचा खुप अभिमान वाटत होता. त्यांना संपूर्ण भारत इस्लाम धर्माच्या प्रभावाखाली आणावयाचा होता.त्यामुळे ऐबकापासूनच्या सर्वच सुलतानांनी दिल्लीचे तख्त ताब्यात घेतल्यापासून इस्लामच्या प्रसारासाठी प्रयत्न केलेत. त्याकरिता अनेकदा हिंदूच्यावर जबरदस्ती करुन त्यांना इच्छेविरुध्द आपला धर्म स्विकारण्यास भाग पाडले. कांहीवेळा हिदू लोकांना ठार मारणे व हिदूंच्या मुलींना पळवून नेऊन भ्रष्ट करणे असे प्रकार झालेत. इस्लामी राज्यकर्त्यांच्या या अन्यायकारी धोरणामुळे उत्तरेकडील हिंदू राजे आणि जनता भरडली गेली.

दिल्लीच्या सुलतानानी स्विकारलेल्या आक्रमक धोरणामुळे उत्तर भारतातील हिंदू राज्यांचा टिकाव लागला नाही. सुलतान जलालउद्दिनच्या काळापर्यंत त्यांनी उत्तर भारतात लक्ष केंद्रित केले होते. उत्तर भारतात सुलतानशाही राज्याला भक्कमपणा आल्यानंतर इस्लामी राज्यकर्त्यांचे लक्ष दक्षिणेकडे गेले. सुलतानाचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी याने दक्षिणेवर पहिली स्वारी केली आणि दक्षिण भारताच्या इतिहासाला नवे वळण मिळाले. दक्षिणेवरील मुस्लीम आक्रमणाला पहिले बळी पडले ते देवगिरीच्या यादवांचे राज्य. ते दक्षिणेचे प्रवेशद्वार व समृध्द राज्य म्हणून ओळखले जात होते. इ.स.१२७१ मध्ये रामदेवराय यादव याने देवगिरीची गादी मिळविली होती.[५८] सत्ताधिश बनल्यावर त्याने खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रदेशाचा कांही भाग व कोकणच्या प्रदेशावर प्रभुत्व स्थापन केले होते. इ.स.१२९४ मध्ये देवगीरीवर अल्लाउद्दीनने स्वारी करुन किल्ल्याला वेढा दिला. रामदेवरायाने किल्ल्यामधून आणि त्याचा पुत्र शंकरदेव याने वेढ्यावर बाहेरील बाजूने हल्ले केले. मात्र यादवांच्या सैन्याला यश आले नाही. रामदेवरायाला अल्लाउद्दीनबरोबर अपमानास्पद तह करुन स्वत:ची सुटका करुन घ्यावी लागली. त्यावेळी एलिचपूर व त्याच्या आसपासचा प्रदेश आणि वार्षिक खंडणी देण्याचे रामदेवरायाने मान्य केले.[५५] देवगिरीवर मिळालेला विजय व प्रचंड संपत्ती यांच्या जोरावर पुढील काळात अल्लाउद्दीनला संपूर्ण दक्षिणेवर वर्चस्व मिळवणे सोपे गेले.

इ.स. १३०६ मध्ये अल्लाउद्दीनने दक्षिणेवर पुन्हा एकदा मोहीम पाठविली. या मोहिमेचे नेतृत्व मलिक कफूर या पराक्रमी सेनापतीकडे सोपविले होते. रामदेवरायाने कबूल केलेली खंडणी पाठविली नसल्यामुळे ही मोहीम काढण्यात आली होती.[६०] मुसलमान सैन्य यादवांच्या राज्यावर चालून आल्यानंतर त्यांनी वाटेवर यादवांच्या राज्यात मोठी नासधूस केली. यावेळीही रामदेवरायाचा पराभव होऊन त्याला मलिक कफूरने कैद करुन दिल्लीस नेले. सुलतानाने त्यास 'रामरायन' ही सन्मानाची पदवी व संपत्ती देऊन परत पाठविले. त्याबदल्यात त्याला सुलतानाच्या दक्षिणेतील मोहीमांना मदत करावयाची होती.पुढील काळात सुलतानाच्या वारंगळ व म्हैसुरवर स्वाऱ्या झाल्या आणि शेवटी देवगिरीवर बंडखोर हरपाळदेवचा बंदोबस्त करण्याकरीता खुश्रुखानाला पाठविण्यात आले. त्याने हरपालदेव व राघव यांना ठार मारुन दक्षिणेच्या राजकारणातून यादवांचे नाव पुसून टाकले. सुलतान महंमद बिन तघलकाच्या काळात

तर राजधानी दिल्लीहून देवगिरीला आणली गेली. त्यामुळे यादवांच्या राजधानीचा कायापालट होऊन तेथे मुस्लीम वर्चस्व प्रस्थापित झाले. राजधानी देवगिरीचे दौलताबाद असे नामांतर करण्यात येऊन इस्लामी धर्म व संस्कृतीच्या महाराष्ट्रामधील प्रसाराला वेग आला. सुलतानाला जरी पुढे जास्त काळ दौलताबादला राजधानी ठेवता आली नसली तरी दक्षिणेतील इस्लामी सत्तेचे महत्वाचे केंद्र म्हणून दौलताबादचा लौकीक झाला.

## २.६ महाराष्ट्रावरील इस्लामी राजवटीचे परिणाम

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रकुटांच्या काळात सर्वप्रथम इस्लाम धर्मियांचे आगमन झाले. व्यापाराच्या निमित्ताने अरब लोक पश्चिम किनारपट्टीवर उतरले होते त्यावेळी त्यांची धर्मप्रचाराची भूमिका नसल्यामुळे त्यांना राष्ट्रकुटांनी परवानगी दिली होती. त्यांनी एकदोन मशिदी देखील बांधलेल्या होत्या. तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत इस्लाम धर्माचा येथे प्रभाव निर्माण होऊ शकला नाही. यादव राजवटीच्या अस्तापासून ते शिवाजी महाराजाच्या उदयापर्यंतचा तीन-साडेतीनशे वर्षाचा काळ हा महाराष्ट्राच्या जीवनातील 'तमोयुगाचा' कालखंड होता.[६१] या काळात इस्लामधर्मियांचे प्रस्थ दिवसेंदिवस वाढत गेले.त्याबाबत 'महाराष्ट्र संस्कृती' या ग्रंथात पु. ग.सहस्त्रबुध्दे म्हणतात, ''तेराव्या शतकाच्या अखेरपासून सुरु झालेली मुस्लीमांची आक्रमणे, त्यानंतर कांही काळ चाललेली दिल्लीच्या सुलतानांची सत्ता आणि त्यानंतर स्थापन झालेली बहामनी सत्ता ही महाराष्ट्रावर आलेली अस्मानी प्रलयापत्तीच होती. मराठ्यांची राजसत्ता तर मुस्लीमांनी नष्ट केलेलीच होती, पण त्याबरोबरच मराठ्यांचा हिंदू धर्म, त्यांच्या प्राचीन परंपरा, हा सर्व महाराष्ट्र समाज आणि लोकांचे स्वत्व यांचा संपूर्ण नाश करण्याची प्रतिज्ञाच बहामनी सुलतानांनी केली.'' त्यांनी आपल्या मताच्या पुष्टीसाठी मुस्लीम तवारिखकारांची मते विचारात घेतली आहेत की ज्यामध्ये अतिशयोक्ती व अलंकारांचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे.

न्या. रानडे यांनी दक्षिणी सुलतान हे फारसे धर्मवेडे किंवा धार्मिक अतिरेकी नव्हते हे मान्य केले होते, मात्र त्यांची सत्ता ही हिंदू धर्माला शापच होती व त्यामुळे 'महाराष्ट्र धर्माचा' उदय झाल्याचे प्रतिपादन केले आहे.[६२] रियासतकार सरदेसाई यांनीदेखील सुलतानशाहीचे

मूल्यमापन याच पध्दतीने केले आहे. यावरुन असे वाटते की दिल्लीच्या सुलतानांनी, बहामनी सुलतानांनी व नंतरच्या बहामनी शाह्यांच्या शासकांनी महाराष्ट्रातील जनतेवर अन्याय-अत्याचार मोठया प्रमाणात केलेत. प्रत्यक्षात मात्र त्यांना या प्रदेशावर सत्ता गाजवायची असल्याने त्यांना येथील प्रजेशी जास्त शत्रुत्वाच्या भावनेने वागता आलेले नाही. मराठ्यांचा समाज व त्यांचा धर्म नष्ट करण्याची ताकद देखील कोणत्याही सलतनीत नव्हती. स्वार्थासाठी ते स्वधर्मियांना व परधर्मियांना जवळ करीत तर कधी त्यांच्या आकांक्षेच्या आड येणाऱ्या स्वधर्मीय अथवा परधर्मीय शत्रूचा ते सारख्याच निष्ठूरपणे निकाल लावीत. राज्यकर्ते आणि प्रजा यांचे धर्म भिन्न असल्यामुळे व सांस्कृतिक परंपरा भिन्न असल्यामुळे वेळोवेळी त्यांच्यामध्ये संघर्ष झालेत,घातपात झाले, रक्तपातही झाला, मात्र ते राजकीय व सामाजिक जीवनाचे अंग होते. परकियांच्या संपर्कामुळे भाषा,संस्कृती, चालीरिती व समाजजीवनामध्ये मात्र त्यांच्या गोष्टींचा शिरकाव झाला. तरीदेखील महाराष्ट्रातील जनतेने आपली भाषा, संस्कृती, सामाजिक व धार्मिक चालीरीती टिकवून ठेवल्या.

उत्तर भारतात ज्याप्रमाणे हिंदू धर्मियावर सुलतानांनी अन्याय-अत्याचार केलेत तेवढ्या मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील प्रजेवर केलेले नव्हते. महाराष्ट्रातील प्रजेबरोबर तडजोड करुनच त्यानी आपले राज्य वाढविण्याचा प्रयत्न केला. इतिहारकारांनी मात्र उत्तर भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही हिंदू प्रजेवर अन्याय-अत्याचार झाल्याचे मत व्यक्त केलेले आहे. महाराष्ट्रात सामुदायिक धर्मांतराचा अथवा सक्तिने सामुदायिक धर्मांतर करण्याचा प्रकार कोठे घडला असल्याची साधार माहिती मिळत नाही.[६३] इस्लामी सत्ताधिशांच्या सेवेत गेलेल्या महाराष्ट्रातील हिंदूंनी स्वार्थापोटी धर्मांतर केल्याचे कांही तुरळक पुरावे मिळतात.[६४] वंशपरंपरागत शासकवर्गाने देखील कांही प्रमाणात आपली 'वृत्ती' टिकविण्यासाठी धर्मांतर पत्करले असले तरी बहुसंख्य लोकांनी आपल्या हिंदू धर्मात राहणेच पसंत केले.[६५] महाराष्ट्रातील हिंदू व मुस्लीम समाज आणि संस्कृती ही एकमेकांच्या अतिशय जवळ आली होती. त्यामुळेच पीरांची पूजाअर्चा व नवस मोठ्या प्रमाणात हिंदू करत होते.[६६]

देवगिरीच्या यादवांच्या पराभवापासून ते शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंत म्हणजे सुमारे साडेतीनशे वर्षे जर हिंदूंचा उच्छाद करण्याचे काम जर सल्तनती राजवटीनी केले असते तर महाराष्ट्राच्या भूमीवर हिंदू शिल्लक राहिले नसते.[६७] म्हणजेच या भूमीतील सर्वसामान्य जनतेने

आपला धर्म, भाषा, चालीरिती व संस्कृती टिकविण्यासाठी खास प्रयत्न केले असावेत.हिंदू धर्मियांचे अस्तित्व टिकविण्यामध्ये भक्ती चळवळीचे योगदान मोठे आहे.

मध्ययुगीन महाराष्ट्रीय संस्कृतीला प्रगतीची नवी दिशा दिसली ती परकीय राजकीय आक्रमणामुळेच होय. इस्लामी आणि युरोपिय या दोन संस्कृतींचा संबंध महाराष्ट्राशी आला.[६८] महाराष्ट्रीय संगीत, चित्रकला व नृत्यकला यावर इस्लामी संस्कृतीचा बराच परिणाम झाला.संगीतावरील प्रभाव तर प्रकर्षाने जाणवतो. अमीर खुस्राव या ख्याल गायकाचे महाराष्ट्रातील वास्तव्य संगीताच्या विकासाला अतिशय उपयुक्त ठरले.

## २.७ भक्ती चळवळ व मनोरंजन

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रहामध्ये भक्ती चळवळीचे योगदान अतिशय महत्वाचे आहे.महाराष्ट्रावरील इस्लामी राजवटीमुळे सांस्कृतिक विकासाला अडथळा निर्माण झाला होता. अशावेळी उदयास आलेल्या भक्ती चळवळीने धर्म व संस्कृतीचे जतन, अध्यात्मिक जागृती व सर्वसामान्यांचे मनोरंजन करण्याचे काम केले. धार्मिक मनोरंजन हा एकमेव मार्ग याकाळातील लोकांच्यासाठी शिल्लक होता. ज्यावेळी राजकीय शक्ती हिंदूच्या हातातून निघून चालली होती, त्याचवेळी महाराष्ट्रात नव्या चळवळीचा उदय होऊ लागला होता. ही धार्मिक चळवळ म्हणजेच ज्ञानेश्वरांनी (इ.स.१२७५ - १२९६) सुरु केलेली भक्ती चळवळ होय.ही चळवळ वारकरी संप्रदाय म्हणून ओळखली जाऊ लागली.[६९] या चळवळीची मुळे महाराष्ट्रामध्ये खोलवर रोवली व तिचा वेगाने संपूर्ण महाराष्ट्रात प्रसार झाला. समाजाच्या विविध घटकांचे लोक या चळवळीत सामील झाले. त्यामध्ये ब्राम्हण, शिंपी, न्हावी, कुंभार व महार यांसारख्या जातीतील लोकांचादेखील समावेश होता. शिक्षीत, अशिक्षीत, अहंकारी, प्रतिगामी, पुरोगामी, पुरुष, स्त्रिया, वृध्द व तरुण या सर्वांच्यावर वारकरी संप्रदायाच्या लाटेचा प्रभाव पडला.[७०] समाजाला अध्यात्मिक संदेश देण्याचे काम या संप्रदायामधील संत करत होते. त्याचबरोबर सामाजिक ऐक्य साधण्याचे कार्य त्यांच्याकडून केले जात होते. भक्ती ही शुध्द अंत:करणाने केल्यास ईश्वरापर्यंत पोहचता येते असा तत्कालीन लोकांचा समज होता. भक्ती संप्रदायाचा प्रसार करण्यासाठी मनोरंजनाच्या भजन, कीर्तन, भारुड अशा विविध साधनांचा उपयोग संतांनी केला.

भक्तीचळवळीत सहभागी झालेल्या महाराष्ट्रीयन संतांना सामाजिक जागृती करुन महाराष्ट्राला पुर्न:स्थापित करावयाचे होते. वारकरी संप्रदायामध्ये पंढरपूरच्या वारीला अनन्यसाधारण महत्व आहे. पंढरीची वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक लोकजीवनाचा संस्कार प्रवाह आहे.[७१] ती निश्चित केंव्हा सुरु झाली हे सांगणे कठीण असून तिला सुमारे एक हजार वर्षांची परंपरा आहे. वारी हा अध्यात्मिक सुखाचा व सामाजिक एकात्मतेचा प्रवाह होता.सारे भेदभाव विसरुन लोकांना एकत्र करण्यात वारी अतिशय उपयुक्त ठरली. तिच्यामधील भजन, कीर्तन, खेळ, फुगड्या व रिंगण या कार्यक्रमातून लोकांचे चांगले मनोरंजन होई. त्यामुळे वारीची आणि विठ्ठल भेटीची सर्व वारकऱ्यांना ओढ लागलेली असे.

इस्लामी शासकाकडून हिंदूंना अन्यायकारी वागणूक मिळत असली तरी कोणीही त्याचा प्रतिकार करु शकत नव्हते म्हणून महाराष्ट्रातील संतांनी धार्मिक जागृती निर्माण करुन समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. विखुरलेल्या महाराष्ट्रीय समाजामध्ये ऐक्याची गरज आहे याची जाणीव त्यांना होती. म्हणून त्यांनी जनतेला अन्यायाविरुध्द लढण्याची प्रेरणा दिली. धार्मिक भावना ही एकमेव शक्ती समाजाला ऐक्यामध्ये बांधु शकत होती. म्हणूनच संतानी भक्तीसंप्रदायावर जोर दिला होता. वारकरी संप्रदाय आणि इस्लाममधील सुफी संप्रदाय यांच्यामध्ये अनेक बाबतीत साम्य होते. हिंदू धर्म व तत्वज्ञानामधील पुष्कळशी वैशिष्ट्ये सुफी तत्त्वाशी साम्य साधणारी होती. सुफी संत हुसेन बिन मन्सुर याने आत्म्याची ओळख सांगितली आहे.[७२] जी आत्मा आणि परमात्मा या हिंदू संकल्पनेशी अतिशय जवळीक साधते. धार्मिक मनोरंजनाच्या विविध प्रकाराद्वारे महाराष्ट्रीयन संतानी भक्ती चळवळीचा प्रसार केला. धार्मिक मनोरंजनासाठी भजन, कीर्तन, भारूड व गोंधळ या साधनांचा उपयोग करण्यात आला. वारकरी संप्रदायाच्या उदयापूर्वी अस्तित्वात असलेली मनोरंजनाची साधने ही बाल्यावस्थेत होती. मात्र वारकरी संप्रदायातील संतानी त्यामध्ये नव्या प्रवाहांची भर घालण्याचे कार्य केले.

## २.८ धार्मिक मनोरंजनाचे लोकप्रिय प्रकार (१३ वे शतक ते १७ वे शतक)

### २.८.१ पुराणकथन

पुराणकथन हा महाराष्ट्रातील लोकांचा देवाचे स्मरण करण्याचा वैशिष्ट्यपूर्ण मार्ग होता. राजघराण्यातील लोकांपासून ते समाजातील सामान्य लोकांपर्यंत सर्वांचे पुराणकथन ऐकणे हे धार्मिक मनोरंजनाचे महत्वाचे साधन होते. इ.स. ८ व्या शतकापासून महाराष्ट्रीय जनता पुराणांकडे आकर्षित झालेली होती.[७३] पुराणकथनाचा सरळपणा आणि भाषेचा सोपेपणा या दोन गुणामुळे सर्वसामान्य जनतेला त्यामधून ज्ञानप्राप्ती होत होती व मनोरंजनही होत होते. गावोगावच्या देवळामधून पुराणांचे प्रवचन चालत होते. सामान्यजनतेला वेगवेगळ्या संस्कृत ग्रंथांतील ज्ञान मराठी भाषेमधून सांगितले जात असल्यामुळे महाराष्ट्रीय जनता त्याकडे आकर्षित झाली.[७४] पुराणकथनामधून जनतेला अध्यात्मिक ज्ञानाचे धडे मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील भक्तीमार्गाचा विकास होण्यास मदत झाली.

### २.८.२ कीर्तन

कीर्तन ही मराठी जनतेची महत्त्वाची सांस्कृतिक संस्था आहे. लोकांचे मनोरंजन, मनोविकास व शांतीसमाधान मिळवून देण्याची कामगिरी या संस्थेने बजावली आहे.भारतीय पुराणांची परंपरा हीच नंतर कीर्तनामध्ये रुपांतरीत झाली आहे. नारदीय कीर्तन, वारकरी कीर्तन व रामदासी कीर्तन असे कीर्तनाचे प्रमुख प्रवाह आहेत. कीर्तनाचा उदय हा भारतीय पुराणामधून झाला असला तरी पुराणापेक्षा कीर्तन आधिक लोकप्रिय होते. पुराणकथन करणारे पुराणिक हे फक्त एखादी मुख्य कथा लोकांना सांगत. कीर्तनामध्ये मात्र अनेक उदाहरणे, विनोद व लघुकथांचा समावेश कीर्तनकार किंवा हरदास करीत. साहित्यिक सौंदर्याच्या बाबतीतही कीर्तन हे पुराणापेक्षा जास्त सरस होते. त्यामुळे पुराणापेक्षा कीर्तने ही वेगाने आकर्षक, आवडीची आणि लोकप्रिय अशी करमणुकीची साधने बनली. कीर्तनामध्ये विविध संप्रदाय असले तरी सर्वांचे उद्दीष्ट एकच होते ते म्हणजे सदाचाराचा प्रसार मनोरंजनाद्वारे करणे. परमेश्वर भक्तीच्या ज्या नऊ पायऱ्या सांगितल्या आहेत त्यापैकी कीर्तन ही दुसरी पायरी आहे. भगवंताचे चरित्रकथन व गुणगाण करणे आणि जगाला सन्मार्गाचा उपदेश करणे हा कीर्तनाचा हेतू असतो. वीणा, पखवाज व टाळ या वाद्यांच्या मदतीने कीर्तनाला रंग भरतो. संसारी मनाला हसवून खेळवून ईश्वरप्राप्तीचा

मार्ग दाखविण्याचे कार्य कीर्तनसंस्थेने केले. हास्यप्रियता हा मानवी मूळ स्वभाव असल्यामुळे कीर्तन रटाळ अथवा नीरस होऊ नये म्हणून रुचीपालट किंवा विरंगुळा म्हणून कीर्तनात विनोद सांगितले जात.[७५] मानवी जीवनातील मार्मिक व्यंगावर अचुकपणे बोट ठेऊन मिस्किलपणे हसतखेळत जीवन कसे जगावे हे विनोदी मार्गाने समाजाला सांगण्याचे काम हरदास करीत. त्यांच्या विनोदाला श्रोत्यांकडून चांगली दाद मिळत असे. शिवाय श्रोत्यांनाही भरपूर आनंद मिळत असे. त्यामुळे मध्ययुगीन काळात कीर्तन अतिशय लोकप्रिय झाले होते. कीर्तनाच्या निमित्ताने गावोगावी फिरताना कीर्तनकार बुवांना आलेल्या अनुभवातीलही किस्से ते आपल्या कीर्तनामध्ये सांगत असत.

महानुभव पंथाच्या काळापासून महाराष्ट्रातील कीर्तनपरंपरेची माहिती मिळते.कीर्तनाचे वर्णन संतवाङ्मयात मोठ्या प्रमाणात आढळते. ज्ञानदेवापासूनच्या सर्व संतांनी कीर्तनभक्तीचा गजर केला आहे. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील चौदाव्या श्लोकावरील भाष्य कीर्तनाचे श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी पुरेसे आहे. संतश्रेष्ठ नामदेव हे महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार होत. इ.स.१३ व्या शतकामध्ये संत नामदेवाने महाराष्ट्रात कीर्तनाची परंपरा सुरु केली. त्यांच्यावर ज्ञानेश्वरानी सुरु केलेल्या भक्ती चळवळीच्या तत्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव होता. त्यांनी ही चळवळ देशभर पसरविण्याकरीता अतिशय परिश्रम घेतले. त्यासाठी त्यांनी कीर्तन या माध्यमाचा वापर केला.देशातील अनेक प्रदेशामध्ये फिरुन त्यांनी लोकांना हरीकिर्तनाचे महत्व पटवून दिले. 'नाचु किर्तनाचे रंगी।। ज्ञानदिप लावू जगी।।'[७६] या अभंगातून त्यांनी कीर्तनाचे महत्व सांगितले.ज्ञानाचा प्रसार हेच कीर्तनाचे मुख्य ध्येय असल्याचे ते सांगत. ज्ञान हे फक्त दृश्य आनंद देत नाही तर ती एक अध्यात्मिक शक्ती आहे, जी सांगणाऱ्याला व ऐकणाऱ्याला आनंद देते. नामदेवांनी भक्ती चळवळीच्या विकासामध्ये अमुल्य असे योगदान दिले आहे. महाराष्ट्राबाहेर जाऊन त्यांनी पंजाब व गुजराथमध्ये कीर्तनाचा प्रसार केला.[७७] त्यामुळे कीर्तनाला सर्वत्र लोकप्रियता मिळत गेली. महाराष्ट्राबाहेर भक्ती संप्रदायाच्या प्रसारासाठी त्यांनी हिंदी भाषेचा उपयोग केला. पंजाबमध्ये लोकप्रियता मिळालेल्या नामदेवांची कांही पदे शिखांच्या 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात समाविष्ट करण्यात आली. यावरुन महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील त्यांची लोकप्रियता लक्षात येते. त्यांनी महाराष्ट्रातील कीर्तन परंपरेचा विकास केल्यामुळे त्यांना कीर्तन

परंपरेचे आद्य संस्थापक मानले जातात.[७८] ते स्वत: उत्तम कीर्तनकार असल्यामुळे अनेक संतानी त्यांचा गौरव केला आहे. नामदेवांच्या पावलावर पाऊल ठेऊन पुढे महाराष्ट्रात सावता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा, एकनाथ व तुकाराम यांनी भक्ती चळवळीच्या विकासासाठी कीर्तन या माध्यमाचा उपयोग केला. त्यामुळे लोकांना अध्यात्माची मनोरंजनाद्वारे शिकवण देणारे कीर्तन दिवसेंदिवस लोकप्रिय होत गेले. कीर्तनामुळे समाजातील अनेक जातीमधील लोक एकत्र येण्यास मदत झाली. महाराष्ट्रातील भक्ती चळवळीची वाढती लोकप्रियता ही पुढे सामाजिक करमणुकीचे साधन बनलेल्या कीर्तन परंपरेमध्ये लोकप्रिय पावली.

इ.स. १३ व्या शतकानंतर अखिल महाराष्ट्रामध्ये कीर्तन परंपरा लोकप्रिय झाली .या परंपरेच्या विकासासाठी नामदेवांनी केलेले प्रयत्न पुढे चालू ठेवण्याचे काम एकनाथ, तुकाराम व रामदासांनी केले. खास करुन एकनाथ व तुकारामांनी याकडे विशेष लक्ष दिले होते. एकनाथ (इ.स.१५३२ - १५९९) हे महाराष्ट्रातील अग्रणी संत म्हणून १६ व्या शतकाच्या उत्तरार्धात ओळखले जात होते. त्यांना भारतीय अध्यात्माचे, सामाजिक व राजकीय परिस्थितीचे सखोल ज्ञान होते. त्यांनी लोकांच्या अध्यात्मिक विकासासाठी आणि मनोरंजनासाठी कीर्तनाचा उपयोग केला त्यांनी आपले सर्व विचार हे आपल्या 'भागवत' या सुप्रसिध्द ग्रंथामध्ये प्रकट केले आहेत. जर आपण अत्यंत भक्तिभावाने आणि प्रसन्न मनाने कीर्तनाचा मार्ग अंगिकारला तर साक्षात परमेश्वर आपल्या मनामध्ये प्रकट होतो असे त्यांचे मत होते.[७९] त्यांनी पैठण येथे सादर केलेल्या कीर्तनामधून लोकांना सामाजिक ऐक्याची जान करुन दिली. त्यांनी आपले आयुष्य लेखन व कीर्तनासाठी खर्ची घातले. ते कीर्तनामधून मुक्तीचे चार मार्ग पहात होते. त्यामध्ये सरुपता मुक्ती, सलोखता मुक्ती, सगुनता मुक्ती आणि संयोजा मुक्ती यांचा समावेश होता.[८०]

संत तुकारामांनी (इ.स.१६०८ - १६५०) देखील महाराष्ट्राच्या कीर्तन परंपरेत मोलाचे योगदान दिलेले आहे. ते सुरुवातीला आपल्या गावी देहू येथे स्थानिक कीर्तनकारांकडून दिली जाणारी कीर्तने ऐकत असत. त्यानंतर ते स्वत: कीर्तन करु लागले. कीर्तनामध्ये ते स्वत: रचलेले अभंग आणि श्लोक गात असत. ते एक प्रतिभावंत कवी असून त्यांची कीर्तन सांगण्याची शैली अतिशय आकर्षक होती. ते उत्तम दर्जाचे वक्ते असल्यामुळे त्यांच्या कीर्तनाला लोकांची प्रचंड गर्दी होत असे. त्याचबरोबर लोकांकडून त्यांचे कौतुक होत असे.[८१] टाळ आणि विणा या

वाद्यवृंदांच्या मदतीने ते आपली कीर्तने सादर करीत असत. पंढरपूर, लोहगाव व देहू याठिकाणी त्यांची कीर्तने होत असत.[८२]

तुकारामांच्या अभंगाशिवाय कीर्तनाला रंग येत नाही. त्यांनी आपल्या कीर्तनामध्ये स्वत: रचलेले अभग वापरलेच पण इतर नारदीय कीर्तनकारसुध्दा जास्त प्रमाणात तुकारामांचेच अभंग विवेचनासाठी वापरत. ज्ञानदेवापासून चालत आलेला वारसा पुढे चालविण्याचे काम त्यांनी केले. पोटार्थी कीर्तनकारावर त्यांनी टीका केली. कीर्तनकारांनी कोणत्या मर्यादा पाळाव्यात याचे अचूक मार्गदर्शन त्यांनी केले आहे. आपल्या कीर्तनामधून ते समाजातील अनिष्ट प्रथावर कडाडून टिका करीत. कीर्तनाच्या कार्यक्रमाला उशिरा येणाऱ्या श्रोत्यावरही ते टिका करीत. देहभान विसरुन कीर्तनात रंगल्यावर ते हास्यविनोद करायलाही कमी करत नसत. प्रापंचिकांचा, विषयीजनांचा, लोभ्यांचा किंवा दांभिकाचा जाता जाता उपहास करुन विनोदनिर्मीती करीत.

महाराष्ट्रीय संताकडून दिली जाणारी कीर्तने ही पारंपरिक कीर्तनशैलीपेक्षा वेगळी होती. पारंपरिक कीर्तने ही संगीत लोककथांच्या संदर्भात असत.त्यामधील कांही कथा संत सादरीकरणासाठी वापरत होते. देवांचा आशीर्वाद मिळविणे हा एकच पारंपरिक कीर्तनाचा उद्देश होता. मराठी संत जेंव्हा कीर्तन सांगत तेंव्हा ते समाजाला ऐक्याचा संदेश देत. संस्कृतपेक्षा मराठी भाषेला कीर्तनात प्राधान्य देणारे संत हे प्रामुख्याने ब्राम्हणेत्तर जातीमधून आलेले होते. संस्कृतचे कमी ज्ञान असूनदेखील ते संस्कृतमधील अनेक संकल्पना सर्वसामान्य लोकांना अतिशय सहजपणे आपल्या कीर्तनामधून समजावून देत होते.संतांच्या या योगदानामुळे मराठा समाजाचा विठ्ठल हा देव बनला की ज्याच्याद्वारे भागवत धर्माच्या ध्वजाखाली मराठा समाज एकत्र आला.

तुकारामांच्या समकालीन असणाऱ्या समर्थ रामदासानींही महाराष्ट्रातील समाजाला जागृत करण्याचे काम केले. त्यांनी सज्जनगडी कीर्तनसंमेलन आयोजित केल्याचा उल्लेख मिळतो.[८३] रामदास आणि त्यांचे शिष्य गावोगावी हिंडून कीर्तने करीत, त्याचबरोबर समर्थ-संप्रदायाचा प्रसार करीत. रामभक्तीचा संदेश घरोघरी पोहचविण्यासाठी त्यांनी कीर्तनकारांची संघटना उभी केली होती. त्यामुळे रामदासी कीर्तन हा वेगळा कीर्तन प्रवाह उदयास आला. स्वत: रामदास कीर्तनाचे उत्कृष्ट दिग्दर्शक असल्यामुळे कीर्तन परंपरेचा चांगला विकास झाला होता.

### २.८.३ भजन

भजन हा धार्मिक मनोरंजनाचा प्रकार महाराष्ट्रात यादव काळापासून लोकप्रिय होता.भजन आणि कीर्तन हे अनेक बाबतीत सारखेपणा दाखविते. भजनामध्ये अभंग व इतर काव्याचा उपयोग केला जाई तर कीर्तनामध्ये कथाकथन व गीतगायन या दोन्हींचाही वापर केला जाई. भजन हे देवाच्या कृपेसाठी गायले जात असले तरी त्याद्वारे समाजाचे मनोरंजन देखील होत होते.महाराष्ट्रातील भजनांचा प्रवाह हा प्राचीन गीतप्रवाहातून उदयास आला आहे. भजनामध्ये आर्या, ओव्या, अभंग व आरती गायली जात होती. त्यांची रचना महाराष्ट्रातील अनेक संतांनी केलेली होती. सुरुवातीच्या काळात फक्त ओव्या आणि आर्या भजनात गायल्या जात होत्या. नंतर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, बहीनाबाई, निळोबाराय, वेणाबाई इत्यादी संतानी लिहिलेल्या अभगांचे व ओव्यांचे लोकांकडून मोठयाप्रमाणात कौतुक झाले. मराठी संतानी आपला परमार्थविचार ओवीतून मांडला तर आपला परमार्थानुभव मात्र अभंगातून व्यक्त केला.[८४] अभंग हे प्रामुख्याने अध्यात्मिक आणि तात्विक संकल्पनेवरती लिहिले जात होते. ज्ञानेश्वरांनी आपल्या अनेक अभंगामधून विठ्ठलाला भजले आहे. त्यांचे ‘पांडूरंगी मन रमले’ आणि ‘सुध्दबुध्द झाला’ असे अभंग महाराष्ट्रात किती लोकप्रिय होते याची आजही जाणीव करुन देतात. तुकारामांचे अभंग इतके बोलके आहेत की त्यांचे अंतर-बहिरंग जाणून घेण्याचे सर्वोत्कृष्ट साधन तेंच आहेत.[८५] तुकारामांनी आपल्या अभंगातून शाब्दिक पांडित्याचा, दांभिकपणाचा, कर्मकांडाचा, सोवळ्या अवडंबराचा निषेध केला. त्यांनी शुध्द आचरण, खरा भक्तीभाव, नितीधर्म, सामाजिक समता, दया, क्षमा व शांतीचा पुरस्कार केला. जातीव्यवस्थेवर व ब्राम्हणांच्या जातीक्षेष्ठत्वावर टीका करणारा तो पहिला संत होय.

भजनांमध्ये अभंगाप्रमाणेच ओव्यांनासुध्दा अतिशय महत्वाचे स्थान होते. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास इत्यांदीनी रचलेल्या ओव्या भजनांमधून गायल्या जात होत्या. ओव्या ह्या गद्य व पद्य स्वरुपात असून पद्य स्वरुपातील ओव्या भजनामध्ये घेतल्या जाात होत्या. सुंदर माझे जाते ग फिरते बहुत। ओव्या गाऊ कौतुके तू येरे बा विठ्ठला। [८६] ही जनाबाईची ओवी महाराष्ट्रात आजही लोकप्रिय आहे.

## २.८.४ लळीत

महाराष्ट्रातील कोकण विभागामध्ये व घाटमाथ्यावरील भागात धार्मिक मनोरंजनाचा हा अतिशय लोकप्रिय प्रकार होता. विनोदी शैलीच्या माध्यमातून सामान्य लोकांचे मनोरंजन या साधनाद्वारे होत होते. विविध प्रकारची आकर्षक वेशभुषा, मजेशिर कृती याद्वारे पात्रांच्या अभिनयाला व बुध्दीला वाव मिळत होता. या मनोरंजनाच्या साधनाचा विकास होण्यासाठी कोकण व घाटमाथ्यावरील भूमी उपयोगी पडली.

महाराष्ट्र-शब्दकोशात लळीताचा अर्थ नवरात्र इत्यादी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी उत्सवदेवता सिंहासनारुढ झाली, असे कल्पून वासूदेव, दंडीगाण इत्यादी इश्वरभक्तांची सोंगे आणून त्या सोगांनी स्वयंप्रदायानुरूप देवतेस प्रसाद मागून सभासदास वाटण्याचा विशिष्ट समारंभ होय.[८७] उत्सवप्रसंगी सोंगे आणून नाटकाप्रमाणे खेळ करणे म्हणजे लळीत होय. डॉ. आनंद कुमारस्वामी यांच्यामते लळीत हा शब्द 'लीला' या शब्दावरुन तयार झाला असावा. लीला म्हणजे देवाने घेतलेले अवतार व त्यांने केलेली कामे होय. म्हणून लीला वर्णनाची सोंगे घेऊन उत्सवप्रसंगी जे कार्यक्रम लोक पार पाडीत त्याला लळीत असे म्हणतात.[८८] लळीताचे बीज भारूडात असून भारूडासाठी नवनवीन सोंगे आणण्याच्या पध्दतीतूनच लळीताचा उदय झाला आहे.[८९] लळीतामध्ये जी भारूडे म्हणत त्यात नुसत्या गाण्यापेक्षा अधिक नाट्यात्मकता असे. ते फक्त गाऊन न दाखविता हरदासी पध्दतीने त्याची संपादनी करीत. उत्सवप्रसंगी हौसी मंडळी मनोरंजनासाठी लळीताचा कार्यक्रम सादर करीत. लळीताचे कार्यक्रम हे त्यावेळी अर्थोत्पादक धंदा म्हणून केला जात नव्हता.[९०] त्यात छडीदार, भालदार, चोपदार, वासुदेव, दिंडीगाण, गोंधळी, वाघ्यामुरळी, बहिरा, मुका, आंधळा, गावभट, जंगम,इत्यादी सोंगे रंगभूमीवर आणली जात. याशिवाय देवतांची सोंगे आणून दशावतारांची लीलाही दाखविली जाई. रामाकडून रावणाचा वध करून लळीताचा शेवट केला जात असे.

## २.८.५.भारूड

महाराष्ट्रातील धार्मिक मनोरंजनाचा आणखी एक प्रकार म्हणजे भारूड हा होय. इ.स.१७ व्या शतकामध्ये हा मनोरंजन प्रकार लोकप्रिय बनला. महाराष्ट्र शब्दकोशामध्ये 'लांबच लांब, गुंतागुंतीची, कंटाळवाणी वृत्तांतकथा, अवघड कूटकविता, लेख, रुपक इत्यादी म्हणजे

भारूड होय' अशी व्याख्या सांगीतली आहे.[११] परंतु मुळातच भारूड सुटसुटीत व रंजक असल्यामुळे ही व्याख्या लागू पडत नाही. 'भारूड' हा शब्द मराठीतील 'बहुरुढ' या शब्दापासून तयार झाला आहे, असे मत कै. पांगारकरांनी मराठी वाङमयाचा इतिहास व मायबोलीची कहानी या ग्रंथात मांडला आहे.[१२] बहुरूढ म्हणजे लोकप्रिय गीत आणि बहु या शब्दाचा अपभ्रंश भा असा करुन भारूड हा शब्द तयार झाला असावा असे त्यांना वाटते. भा म्हणजे प्रतिभा आणि प्रतिभेवर आरूढ असलेले म्हणजेच प्रतिभा जागृत होताच एकदम स्फुरण पावलेले शीघ्रकाव्य म्हणजे भारूड होय.[१३]

हरिकीर्तनाच्या परंपरेमधून भारूडांचा जन्म झाला असावा.[१४] संत नामदेवांनी हरिकिर्तनाची परंपरा महाराष्ट्रात प्रथम सुरु केली. ळळीत आणि भारूड यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. भारूड हा प्रबोधनासाठी उपयुक्त प्रकार असल्यामुळे बहुतेक संप्रदायांनी त्याचा उपयोग करुन घेतला आहे. ज्ञानदेवांनी सर्वप्रथम भारूड या काव्यरचनेची निर्मिती केली. त्यांची लोकप्रिय भारूडरचना पुढीलप्रमाणे:-

काट्याच्या अणीवर वसती तीन गावे ।
दोन ओसाड एक वसेचि ना ।।१।।
वसेचि ना तेथे आले तीन कुंभार ।
दोन थोटे एक घडेची ना ।।२।। [१५]

ज्ञानदेव हे पूर्णत: तत्वज्ञानाचे प्रणेते असल्यामुळे त्यांच्या भारूडामधून विनोद आणि उपहास कमी प्रमाणात आढळतो. त्यांच्या अंबुला, सौरी, फ़ुगडी, घोंगडी, जोहार, वासुदेव, डौर इत्यादी भारूडामधून केलेला पारमार्थिक उपदेश सर्वसामान्यांना खडबडून जागे करतो. ज्ञानदेवानंतर पुढे अनेक संतानी हा रचना प्रकार हाताळला. संत एकनाथानी त्याला शिखरावर पोहचविण्याचे कार्य केले.[१२] ज्ञानदेवांचा समकालीन संत नामदेवानेही अनेक भारूडे लिहिली. मात्र भारूडापेक्षा त्यांचे अभंग जास्त रसाळ वाटतात. तुकाराम महाराजांच्या भारूडावर ज्ञानदेव व नामदेवाच्या भारूडांचा प्रभाव पडलेला जाणवतो. त्यांची भारूडे संख्येने कमी असली तरी त्यांचा दर्जा चांगला असल्यामुळे ती लोकप्रिय झाली. त्यांनी वासुदेव, आंधळा, पांगळा, जोहार, जोगी, सरवदा, कावडे, गोंधळ, वारी, सौरी इत्यादी भारूडे लिहिली. भागवत संप्रदायातील बहुतेक

संतानी भारूडे लिहली आहेत. जनाबाई, चोखामेळा, भानुदास, बहिणाबाई, निळोबाराय यांनी लिहिलेली भारूडे अतिशय लोकप्रिय झालीत. चोखामेळ्याची जोहारावरील रचना भारूड विश्वात लोकप्रिय ठरलेली आहे.[१३]

भागवत संप्रदायाप्रमाणेच महाराष्ट्रातील इतर संप्रदायांनी देखील धार्मिक प्रबोधनासाठी व सामाजिक मनोरंजनासाठी भारूडांचा यथायोग्य वापर केला आहे. एकनाथांचा प्रभाव असणारी व महानुभव पंथाचे तत्त्वज्ञान सांगणारी कांही भारूडे लोकप्रिय आहेत. त्यांची रचना महानुभव पंथीय स्त्रियांनी केली असावी. समर्थ संप्रदायाचे प्रणेते संत रामदास यांनी महाराष्ट्रात प्रबोधनाचे मोठे कार्य केले. त्यांनीदेखील भारूडे व भारूडासारखी काव्यरचना केली होती.त्यानी सुमारे पन्नासच्या आसपास भारूडे रचली असुन त्यांचे विषय अंजन, उंदीर, कोडे, गोंधळ, चेटूक, टिपरी, वासुदेव, पांगुळ, होळी, कानफाट्या, कुत्रे, जागल्या, जोगी, डवरी इत्यादी आहेत. त्यांच्या भारूडांचा उपयोग सामाजिक प्रबोधनासाठी व मनोरंजनासाठी चांगला झाला.त्यांचे मोठे भाऊ रामीरामदास यांनीदेखील सरवदा, वासुदेव, जोगवा व माया अशी चार भारूडे लिहिली. याशिवाय या संप्रदायातीलच केशवस्वामी, रामानंद, अच्यताक्षम यांनीदेखील भारूडांची रचना करुन समाजप्रबोधन केले.

नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगणारी भारूडे या संप्रदायातील संतांनी लिहिली. नरहरीनाथांचे गोंधळावरील, महीपतीनाथांचे योगमार्गावरील, अनंत बोधांचे फुगडीवरील भारूड लोकप्रिय ठरले आहे. दत्त संप्रदायातील दासोपंत या एकट्या संताने एकनाथांचे अनुकरण करुन कांही भारूडे लिहिली होती. भारूडांना लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचविण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. समाजातील बहुजनांचे मनोरंजन व प्रबोधन करण्यासाठी त्यांनी भारूडांचा उपयोग केला. भारतीय संस्कृतीमधील अध्यात्माचे तत्त्वज्ञान समाजातील अतिसामान्य माणसापर्यंत पोहचविण्यासाठी भारूडांचा उपयोग करण्यात आला. त्यामुळे अध्यात्माचे तत्त्वज्ञान म्हणजे कांहीतरी वेगळे आहे, गूढ आहे, ते अतिशय गंभीर स्वरुपाचे आहे, सर्वसामांन्यांनी त्याच्या वाटेला जाऊ नये अशी तत्कालीन सामान्य लोकांची भावना होती. मात्र एकनाथांनी साध्या साध्या रूपकामधून अतिशय गंभीर किंवा अनाकलनीय वाटणांऱ्या तत्त्वज्ञानाबद्दल लोकांना गोडी लावली. एकनाथाच्या काळातील सामाजिक परिस्थिती ढासळत चाललेली होती. त्यामुळे

समाजप्रबोधनासाठी समाजातीलच कांही पात्रे लोकांसमोर वेगळ्या पध्दतीने ऊभी करुन समाज सुधारण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यासाठी त्यांनी सुमारे दिडशे विषयांवरील तीनशे चौतीस भारूडे लिहिली.[९८] त्यांच्या भारूडामध्ये विषयांची आणि रुपकांची विविधता असल्यामुळे ती आजदेखील लोकप्रिय आहेत. नातीगोती सांगणारे त्यांचे पुढील भारूड अत्यंत लोकप्रिय आहे -

मोडकेसे घर तुटकेसे छप्पर ।
देवाला देवघर नाही ।
मला दादला नलगे बाई ।।धृ ।। [९९]

अशी एकापेक्षा एक सरस भारूडांची रचना त्यांनी केली. ती प्रबोधनात्मक, जाती व्यवसाय दर्शवणारी, शारीरिक व्यंगात्मक, व्यवसायात्मक, नाती-गोती सांगणारी, सामाजिक वृत्तीदर्शक, दैवी भूमिकांची, पिशाच्यविषयक, पशु-पक्षीविषयक, कूटे व कोडे, सण व उत्सवांची, जोहाराची, दरबारविषयक व संसारविषयक अशा नानाविध विषयांवर आधारित होती. सामान्यत: भारूडे ही प्रतिकात्मक व लोकांना आत्मिक संदेश देणारी असत. त्यांचा जन्मच मुळी लोकांना नैतिकतेचे व आत्मिक विकासाचे धडे देण्यासाठी झाला होता.त्यासाठी प्रतिकात्मक उदाहरणांची मदत घेतली जात होती.

लोकरंजनातून प्रबोधन करणे हा भारूडाचा मुख्य उद्देश असल्यामुळे त्यात विनोदाला भरपूर वाव देण्यात आला आहे. विंचू, एडका, मुका, नकटी, बायला, रहाट, कुत्रे, गावगुंड या एकनाथांच्या भारूडामधील विनोद लोकांचे खूप मनोरंजन करतो. त्यांचे विंचू चावला या मनोरंजनात्मक भारूडामधून मानवी दोषांचे व त्याच्या विंचवासारख्या प्रवृत्तीचे वर्णन केलेले आहे.

## २.८.६ गौळण

महाराष्ट्रीय लोकांना रिझवीत-खिजवीत उपदेश करण्यासाठी मध्ययुगीन संतानी जी रुपक काव्यरचना केली ती म्हणजे गौळण होय. गोकुळच्या गौळणींनी कृष्णाला उद्देशून म्हटलेली पदे म्हणजे गौळणी अशी सामान्यपणे गौळणींची व्याख्या करता येते.[१००] वरवर पाहता गोकुळातील गौळणींनी कृष्णाला उद्देशून काढलेले उद्‌गार गौळणीत आढळत असले तरी त्यामध्ये अध्यात्मिक तत्त्वज्ञान सांगीतले आहे. अध्यात्माचा अर्थ शृंगाराच्या माध्यमातून

सांगण्यासाठी कृष्णचरित्रातील लौकिक लोकजीवन निवडल्यामुळे त्या जास्त लोकप्रिय झाल्या.[१०१] समाजामध्ये कृष्णचरित्र विशेष मनोरंजक असल्यामुळे त्याच्या विविध लीलांचा विषय संतांनी रुपकासाठी निवडला आहे. समाजात असणारा इष्की आणि छक्कड लोकसमूह अध्यात्माकडे वळविण्यासाठी शृंगारात घोळलेल्या गौळणींची रचना संतानी केली. गौळणीतील शृंगारमिश्रीत अध्यात्मात श्रोते रंगतील हा संतांचा अंदाज खरा ठरला आणि गौळणीला खूप लोकप्रियता मिळाली. संतांनी रचलेल्या कांही गौळणीमध्ये शृंगार आढळत नाही, तरीदेखील त्या लोकप्रिय ठरल्या होत्या.

महाराष्ट्रातील नामदेवापासून निळोबापर्यंतच्या सर्व संतांनी गौळणींची रचना केलेली आहे. वारकरी संप्रदायातील संतानी विठ्ठल आणि कृष्ण यांना एकरुप मानल्यामुळे लोकरंजनासाठी गौळणींची रचना केली. नामदेवांची 'पंचभाषेची गौळण' प्रसिध्द असून त्यामध्ये गोपींच्या वस्त्राहरणाचा प्रसंग नामदेवांनी अतिशय संयमाने मांडला आहे. वस्त्राहरण हे अध्यात्मक रुपक त्यांनी यथार्थपणे मांडले आहे. त्यांच्या या गौळणीत कोठेही संयम सुटलेला आढळत नाही. ज्ञानेश्वरांची गौळणीविषयी तात्त्विक भूमिका मूलत:च उच्च आहे. एका गौळणीमध्ये त्यांनी गौळणीने ज्ञानरुपी दुधाची घागर डोक्यावर घेतली आहे आणि घागरीतील दूध हे उपनिषदरुपी गाईचे दूध आहे असे वर्णन केले आहे. त्यांची एक बोबडी गौळण म्हणते -

जात होते पानिया तेथे भेतला सावला
दोयवर तोपी मयुल पिछांची, खांद्यावरी कांमला ।

संत एकनाथांनी अनेक गौळणी रचल्या असून त्या भजनामध्ये अतिशय लोकप्रिय झाल्या. त्यांच्या गौळणीतील शृंगार आणखी एक पाऊल पुढे सरकला आहे.त्यावेळच्या समाजाला अध्यात्माकडे वळविण्याकरिता शृंगारिक गौळणींची रचना करावी लागली.भक्त आणि भगवान यांच्या वर्णनात कितीही शृंगार आला तरी तो एकनाथांना पवित्रच वाटतो. एका गौळणीमध्ये राधा-कृष्णाचे शृंगारिक वर्णन करताना ते म्हणतात-

वारियाने कुंडल हाले । डोळे मोडीत राधा चाले ।।
राधेला पाहुन भुलला हरी । बैल दोहीतो नंदा घरी ।।
हरीला पाहुन भुलली चित्ता । मंदिरी घुसळी डेरा रिता ।।
मन मिळालेंसें मना । एका भुलला जनार्दना ।। [१०२]

संत तुकारामांनीही आपल्या गौळणी मधून बालकृष्णाच्या खोड्यांचे वर्णन केले आहे. त्यामुळे त्यांच्या गौळणीदेखील लोकप्रिय झाल्या. एका गौळणीमध्ये झोपलेल्या स्त्रीपुरुषाच्या वेणीची व दाढीची गाठ मारुन केलेल्या फजितीचे वर्णन आहे. यामधील गाठ ही भक्तीची, ईश्वराबरोबरीची किंवा पतीपत्नीचा अभेद्य संबंध दाखविणारी आहे. तुकारामांचे शिष्य निळोबा यांच्या गौळणीसुध्दा अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या. जनाबाईनी आपल्या गौळणीमधून सात्विक भाव व्यक्त केला आहे. अशाप्रकारे संतांनी गौळणींची रचना करुन तत्कालीन लोकांचे मनोरंजन केले. संतानी आपल्या गौळणीत रंगविलेल्या गोपी आणि राधा प्रतिकात्मक वाटतात. गोपीकृष्णांच्या परस्पराविषयीचे संबंध शारीरिक नसून तो एक मानसिक एकात्मतेचा भाव होता. संतांनी गौळणीत रंगविलेला बाळकृष्ण हा रांगणारा, धावणारा, बालीश खोड्या करणारा, गोपींचे दही-दुध चोरणारा, गाई चारणारा असा दाखविला आहे. राधा-कृष्ण किंवा गोपी-कृष्णाचे प्रेम हे जीवात्म्याचे परमात्म्याविषयी असणारे आत्यंतिक प्रेम आहे.[१०३]

## २.८.७ गोंधळ

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये गोंधळ परंपरेचे स्थान महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रातील अनेक घराण्यांमध्ये कुळधर्म व कुळाचार पाळण्यासाठी गोंधळ घालण्याची प्रथा आहे. गोंधळाचे पौरोहित्य करणारे गोंधळी हे प्रामुख्याने रेणुकाचे आणि तुळजाभवानीचे उपासक असतात. ते आपली उत्पत्ती जमदाग्नी व रेणुका यांच्यापासून झाली असून माहूर हे आपले मुळस्थान मानतात. गोंधळ्याशिवाय भुत्ये व डवरी हे देखील गोंधळ घालण्याचे काम करतात. गावच्या बारा बलुत्यांमध्ये डवरी लोकांचा समावेश होतो. त्यांना दिलेल्या इनाम जमीनीला डवरक्या अथवा गोंधळक्या म्हणतात.[१०४] रेणुकामहात्म्यात गोंधळ परंपरेविषयी रंजक कथा सांगीतली आहे. गोंधळाची प्राचीनता सांगणे कठीण असले तरी तुळजाभवानीच्या उपासनेसाठी जो गोंधळ घातला जातो त्याची प्राचीनता इ.स. १००० पूर्वी जाते आणि रेणुका तिच्याहुनही प्राचीन आहे.[१०५] 'आमलिका ग्राम माहात्म्य' या अप्रकाशित संस्कृत ग्रंथात रेणूकेच्या उपासनेतील गौंडलीनृत्याचे वर्णन केलेले आहे. महाराष्ट्रात अनेक स्थानिक देवींच्या नावानेही गोंधळ घालण्याची प्रथा आहे. श्री. वि. कृ. जोशी यांच्या मते गोंधळ हा शब्द 'गण-दल' वरुन

आला असावा की ज्याचा अर्थ 'गण' म्हणजे भक्त आणि 'दल' म्हणजे समुदाय यावरुन 'गणदल' उपासना प्रकार उदयास आला असावा. या गणदलाचे अपभ्रंश रुप गणदल-गंदल-गोंदल आणि पुढे गोंधळ असे झाले असावे.[१०६] पुढे पार्वतीच्या उपासनेमधून देवीची उपासना करणारी गोंधळाची परंपरा जन्मास आली. देवीला आदिशक्ती किंवा शक्तीदेवता माणून तिच्या उपासनेसाठी गोंधळ प्रथा उदयास आली. ज्ञानेश्वरीमध्ये गोंदळी शब्द पिशाच्य या अर्थाने वापरला आहे.

दैवी आपत्ती टाळण्यासाठी प्राचीनकाळी वैशाख वद्य प्रतिपदा ते आमावस्या या पंधरवड्यात भूतमातेचा उत्सव केला जात असल्याची माहिती स्कंदपुराणात आढळते. भूतपिशाच्याची बाधा होऊ नये म्हणून भूतमातेचा उत्सव सुरु झाला होता.कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा याने आपल्या राजधानीत भूतमातेच्या उत्सवप्रसंगी गोंधळाचा कार्यक्रम केल्याचा उल्लेख मिळतो. यावेळी नृत्यामध्ये सुधारणा करुन त्याला चित्रगोंडली असे नाव दिले होते. हे गोंधळीनृत्य म्हणजेच मध्ययुगीन महाराष्ट्रातील गोंधळ परंपरा होय.गोंधळ ही शुध्द महाराष्ट्रीयन धार्मिक मनोरंजनाची कला असून ती मराठा समाजाच्या प्रत्येक शुभकार्याच्या प्रसंगी आवश्यक मानली जाते. त्यामुळे महाराष्ट्रात लग्न समारंभानंतर गोंधळ सादर केला जातो.कौटुंबिक स्तराबरोबरच सामाजिक स्तरामध्येही गोंधळ परंपरा चालू राहिली.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील भक्ती आविष्काराच्या, शक्तीच्या उपसनेच्या आणि धर्मजागृतीच्या कार्यातील प्राकृतिक नाट्यप्रकार म्हणून गोंधळाचे महत्व अतिशय मोठे आहे हे मान्य करावे लागते.[१०७] भारतीय संस्कृतीमध्ये वैदिक काळाच्या पूर्वीपासून देवीची उपासना रुढ झाली आहे. आदिशक्तीने अथवा देवीने असुरी शक्तीविरुध्द म्हणजेच राक्षसाविरुध्द केलेल्या युध्दाची स्मृती जागविण्यासाठी शारदीय नवरात्र उत्सव साजरा केला जातो. देवीने मिळविलेल्या विजयाचा आनंद व देवीच्या शक्ती सामर्थ्याचे स्मरण घडविण्यासाठी हा उत्सव सुरु झाला. भारताच्या प्रत्येक प्रदेशामध्ये देवीला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. महाराष्ट्रात ती जगदंबा व भवानी, बंगालमध्ये दुर्गा, कर्नाटकात तिला रेणुका अथवा यल्लमा तर म्हैसूरमध्ये चामंडादेवी या नावाने ती प्रसिध्द आहे. नवरात्र उत्सवात रात्री जागविण्यासाठी पूजा, याग, आरती, गोंधळ, भोंडला व कथा-कीर्तन असे कार्यक्रम साजरे केले जातात. त्यामुळे लोकांचे चांगले मनोरंजन

होई. महाकाली,महालक्ष्मी आणि महासरस्वती अशी तिची तीन प्रमुख रूपे मानली जातात. भारतातील बहुतेक गावामध्ये देवीचे कोणत्यातरी रूपातील देऊळ असले तरी देवीची एक्कावन्न शक्तिपीठे आहेत असे मानले जाते. त्यापैकी पाकिस्तान, श्रीलंका व तिबेटमध्ये प्रत्येकी एक, नेपाळमध्ये दोन आणि भारतात बेचाळीस शक्तिपीठे आहेत. महाराष्ट्रात यापैकी साडेतीन पीठे आहेत. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची भवानी आणि माहुरची रेणुका ही तीन पूर्ण पीठे असून अंबेजोगाईची योगेश्वरी हे अर्धे पीठ मानले जाते.[१०८] लक्ष्मीचा विष्णूशी, भवानीचा शिवाशी आणि रेणुकेचा जमदग्नीशी विवाह झाल्यामुळे या तीन पीठांना पूर्ण पीठे व योगेश्वरी अविवाहीत राहिल्यामुळे त्याला अर्धे पीठ मानले जाते.

संशोधकांच्या मते सहाव्या शतकातील कदंब घराण्याने तुळजाभवानीला आपली कुलदेवता मानली होती, तेंव्हापासून गोंधळाचा प्रकार सुरु असावा.[१०९] ही परंपरा पुढच्या सात-आठशे वर्षामध्ये अतिशय फैलावली गेली. संतांनी या परंपरेचा उपयोग धर्मजागृतीचा प्रसार करण्यासाठी करुन घेतला. संत नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास व इतर संतानी गोंधळ स्वरुपातील रचना केल्या. त्यामुळे धार्मिक जागृती व लोकांचे मनोरंजन झाले. संत एकनाथांनी आपल्या लोकप्रिय भारूडामधून आदिशक्तिला 'बये दार उघड' म्हणून तळमळीने हाक मारली आणि स्वत: हातात संबळ घेऊन अंबेचा गोंधळ घातला.पिढ्यानपिढ्या गोंधळावर उपजीविका करणाऱ्या गोंधळ्यांना यजमानाच्या मतानुसार निरनिराळ्या देवतांची स्तुती करावी लागे. त्यामुळे समाजात द्वैतभाव वाढेल अशी भिती मध्ययुगीन संतांना वाटली. सारे देव एकाच हरीची रुपे आहेत असे सांगून आदिशक्तिच्या उपासनेला मान्यता दिली होती. म्हणून ते म्हणतात-

गोंधळा ये वो जगदंबे। विठाबाई तू मूळस्तंबे ।।

गोंधळ कलाप्रकार सादर करण्यासाठी परंपरेने ठरलेल्या संबळ, तुणतुणे आणि झांज किंवा टाळ या वाद्यांचा वापर केला जातो. या वाद्यांच्या निर्मितीबद्दलच्या अख्यायिका किंवा कथा प्रसिध्द आहेत. संबळ हे तबल्याप्रमाणे दोन वाद्यांची जोडी असुन ती एकत्र जोडलेली असतात.नर संबळ डग्ग्याचे आणि मादी संबळ तबल्याचे बोल पुरविते. बकऱ्याच्या कातडीपासून बनविलेले संबळ वाजविण्यासाठी एक सरळ छडी व दुसरी छत्रीच्या दांड्याच्या आकाराची छडी वापरली जाते. खणखणीत आवाजाचे तालवाद्य म्हणून संबळ लोकप्रिय ठरले आहे. स्वरवाद्य

आणि तालवाद्य म्हणून तुणतुण्याचा वापर गोंधळात केला जातो. या वाद्यातून 'तुणतुण' असा नाद निघत असल्यामुळे त्याला हे नाव पडले आहे.गोंधळामध्ये तालवाद्य म्हणून टाळ किंवा झांज या वाद्याचा उपयोग केला जातो.

गोंधळाच्यावेळी पूजेसाठी नव्या कापडावर गव्हा-तांदळाचा चौक मांडतात. त्याच्यावर पूजा मांडतात. एका काठीला चिंध्या बांधून त्यावर कणिक लावतात. त्यावर गोडतेल घालून दिवटी तेवत ठेवतात. जोपर्यंत यजमान दिवटी तेल घालून तेवत ठेवील तोपर्यंत गोंधळाचा कार्यक्रम चालू ठेवला जातो.[११०] गोंधळाच्या सादरीकरणात देवीच्या स्तुतीची पारंपरिक गाणी, गौळणी, सदगुरुचे महत्व सांगणारी पदे, प्रार्थना व कथा इत्यादिंचा समावेश असतो. नृत्य, नाट्य, विनोद, संवाद व बतावनी यामुळे गोंधळाला चांगला रंग येतो.

कांहीवेळा प्रथम गण आणि नंतर अवातन घेतात तर कांहीवेळेला प्रथम अवातनं आणि देवीची स्तुती करुनच गणाला प्रारंभ करतात.[१११] गोंधळ सादर करणारी चार प्रमुख पात्रे असतात. मुख्य गोंधळी कथा निरुपण करतो, त्याला नाईक म्हणतात. दुसरा त्याला साथ देण्याचे आणि मधून मधून विनोद आणि कोट्या करण्याचे काम करतो. तिसऱ्याच्या हातात संबळ व चौथा तुणतुणे वाजविण्याचे काम करतो. गोंधळाला विनोदाची झालर दिल्यामुळे रात्रभर चाललेल्या गोंधळामध्ये सर्वसामान्य लोक पोटभरुन हसत. त्याचबरोबर कथानकातील दु:खाचा प्रसंग प्रेक्षकांपुढे उभा केल्यानंतर लोकांना रडू येते. गोंधळी लोकांची हाताच्या बोटावर बसविलेली करपल्लवी भाषा असते.[११२] या भाषेमधून एकमेकापासून लांब अंतरावर उभे राहिलेले दोन गोंधळ्यांपैकी एक दान देणाऱ्याचे नाव बोटाने खुणा करुन ओळखतो. या भाषेत कोणतीही फसवाफसवी नसून त्यांची ती सांकेतिक भाषा आहे. त्याचबरोबर एखादे अध्यात्मिक कोडे सांगून गोंधळी एखादे भेदिक कवन सादर करतो आणि आपल्यातील तत्त्वचिंतकाची ओळख करुन देतो.त्यामुळे गोंधळाला अध्यात्मिक उंची प्राप्त होते.

गोंधळ लोकप्रिय होण्यास त्यामधील कथा जशा कारणीभूत झाल्या, तसेच पोतनृत्यही कारणीभूत ठरले.[११३] गोंधळामधील पोत खेळण्याचा कार्यक्रम हा खास मनोरंजनाचा कार्यक्रम होय.त्यामध्ये पोतराज (तुळजापूरचा गोंधळी) आपला पेटता पोत हातात घेतो. संबळदार संबळ वाजवितो आणि पोतराज पायात घुंगरु घालून चारी दिशांना नृत्य करतो. त्यावेळी प्रेक्षकामध्ये

निराळे वातावरण तयार होते. पोतराजाचे तालबध्द नृत्य, हावभाव आणि अंगविक्षेप पाहून त्याच्या अंगात भवानीचा संचार झाला असे समजून उपस्थित भक्तगण आपली साकडी घालतात. जनतेंतून स्वयंस्फूर्तीने निर्माण झालेला आणि सामान्य लोकांनी चालू ठेवलेला नृत्यप्रकार यादृष्टिने पोतनृत्य महत्वाचे आहे. यावेळी भक्तांनी घातलेल्या साकड्यांना तो दु:ख निवारण्याचे उपाय सांगतो.

देवीचा संचार संपल्यानंतर निरनिराळ्या कथा सांगितल्या जातात की ज्या प्रामुख्याने देवीच्या असतात. गोंधळातील पूर्वरंग व उत्तररंग शब्दावरुन त्याची मनोरंजकता व लोकप्रियता लक्षात येते. शिवशाहीच्या काळात गोंधळाला राष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले होते. गोंधळ्यांनी स्वराज्यस्थापनेच्या कामी चिरस्मरणीय कामगिरी केली आहे.[११४] त्यांनी धार्मिक व सामाजिक कार्याबरोबरच राजकीय क्षेत्रामध्ये महत्वाचे योगदान दिले. शत्रूच्या प्रदेशात आणि प्रसंगी शत्रूच्या छावणीत घुसून गोंधळी लोकांनी खरोखरच गोंधळ उडवून दिला होता. तसेच हेरगिरीचेही काम त्यांनी केले होते.

## २.९ धार्मिक मनोरंजनाचा अर्थ आणि हेतू

महाराष्ट्रातील धार्मिक मनोरंजनाच्या विविध साधनांमूळे जनतेची आत्मिक जागृती व धार्मिक प्रबोधन झाले. महाराष्ट्रावर झालेल्या मुस्लीम आक्रमणांचा प्रभाव कमी करण्यासाठीचा हा एक प्रयत्न होता. समाजाने अन्यायाविरुध्द लढण्यासाठी महाराष्ट्रीय संतांनी प्रयत्न केलेत. त्यासाठी अनेक अवघड धार्मिक कल्पना त्यांनी सोप्या पध्दतीने समाजाला पटवून दिल्या. त्यांनी सामाजिक मनोरंजनासाठी मराठी भाषेचा माध्यम म्हणून वापर केला.त्यामुळे संस्कृत भाषेच्या समाजावरील प्रभावाला पर्याय निर्माण झाला. धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्रात ब्राम्हणांची असणारी मक्तेदारी कमी होऊन इतर जातीतील संतांना लोकप्रियता मिळत गेली. जीवनाच्या कोणत्याही माध्यमातून देवाला जाणून घेण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करू शकतो यावर संतांचा विश्वास होता.[११५] धार्मिक मनोरंजनामध्ये आणि अध्यात्मामध्ये मराठी भाषा वापरली जाऊ लागल्यामुळे सामान्य माणसाची अध्यात्मिक गरज भागू लागली. त्यामुळे लोकांना आपल्या धर्माचे आणि वैभवशाली संस्कृतीचे ज्ञान मिळाले. अशाप्रकारे महाराष्ट्रीयन संतांनी मनोरंजनांच्या साधनांतून लोकांना धर्मरक्षणासाठी प्रोत्साहीत केले.

मनोरंजनाच्या विविध प्रकारामुळे मराठी समाजातील सामाजिक दोषावर टीका झाली. त्यामुळे समाजसुधारणेला संधी मिळाली. सामाजिक विषमता नष्ट करुन सामाजिक ऐक्य

साधन्याचा प्रयत्न झाला. सामाजिक विषमता, अस्पृश्यता, जातीवाद व कालबाह्य परंपरा याच्यावर कडाडून हल्ला चढविण्यात आला. ईश्वरासमोर सर्वजण समान आहेत हे प्रमुख तत्व मान्य केल्यामुळे अनेक जातीपंथातील लोक एकत्र येण्यास मदत झाली. श्री.म.गो.रानडे म्हणतात, 'विठ्ठलाची पुजा, आराधना महाराष्ट्राचा इतिहास घडविण्यासाठी, विचार व वर्तनाचे नवे प्रवाह स्थापन करण्यासाठी महत्वपूर्ण ठरते. जर ज्ञानेश्वर व नामदेवांचे वास्तव्य महाराष्ट्रात नसते तर महाराष्ट्राचा इतिहास वेगळा झाला असता.'[११६]

## २.१० महाराष्ट्रातील सामाजिक मनोरंजनाचे इतर प्रवाह

विठ्ठलाच्या आराधनेशिवाय इतर देवतांची आराधनादेखील महाराष्ट्रात केली जात होती. महाराष्ट्रातील समाज खंडोबाचा चांगला भक्तगण असून त्याच्या सन्मानार्थ 'वाघ्या-मुरळीचे' नृत्य केले जात होते. अशा समारंभप्रसंगी रात्रभर 'जागरण' हा कार्यक्रम केला जात असे. जागरणामध्ये स्त्री नृत्यांगणा म्हणजे मुरळी हे खास आकर्षण असे. तिच्या नृत्याला घुंगरू आणि डिमडीची साथ असे. इ.स.१६व्या शतकात महाराष्ट्रात वाघ्या-मुरळीचे नृत्य हा मनोरंजनाचा खास प्रकार होता.[११७] डोक्यावर मोरपिसांची टोपी घालून आणि मधूर गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करण्याचे कार्य 'वासूदेव' करीत होता. याशिवाय पारंपरिक मनोरंजन करणारे कलाकार आपआपली कला सादर करुन लोकांचे मनोरंजन करत होते. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह चालत होता.

महाराष्ट्रातील कोळी, कातकरी, ठाकर, वारली यांच्यासारख्या जातीजमातींना लोकनृत्याची खूप आवड होती. कोळी बांधवांच्या नृत्याला कोळीनृत्य आणि कातकरी लोकांच्या नृत्याला लेंडानृत्य असे म्हणतात. हे नृत्यप्रकारही महाराष्ट्रात लोकप्रिय होते.याशिवाय विटी-दांडू, कबड्डी, लगोरी यासारखे खेळ १५व्या आणि १६ व्या शतकात लोकप्रिय होते. बुध्दीबळ हा खेळ उत्तर भारतातून महाराष्ट्रात आला होता.[११८] गंजिफाहा खेळदेखील यावेळी महाराष्ट्रात लोकप्रिय होता. यासारख्या साधनामुळे महाराष्ट्रीयन लोकांचे चांगले मनोरंजन होत होते.

**संदर्भ**


१. डी. क्रुझ एडवर्ड, अ सर्वे ऑफ वर्ल्ड सिव्हिलायझेशन, पृ.५

२. व्हॅनलुन हेंन्ड्रीक, अ स्टोरी ऑफ मनकाईंड, पृ.६५

३. कित्ता, पृ. ६६

४. पवार जयसिंगराव,मानवजातीचा इतिहास, पृ. ५४

५. फायरबँक जे. के., एडवीन रिश्युअर, चायना ट्रॅडीशन अॅन्ड ट्रान्सफोरमेशन, पृ.७६

६. डी. क्रुझ एडवर्ड, पूर्वोक्त, पृ.४०

७. शास्त्री निलकंठ, श्रीनिवासाचारी, अॅडव्हान्स हिस्ट्री ऑफ इंडीया ,पृ.२४

८. कित्ता, पृ. २४

९. महाजन व्ही. डी., अ हिस्ट्री ऑफ इंडीया, व्हा.२,पृ.३२

१०. डॉ. बाबर सरोजिनी, कारागिरी, पृ.१६९

११. शास्त्री निलकंठ, श्रीनिवासाचारी, पूर्वोक्त, पृ.४१

१२. कित्ता, पृ. ४१

१३. त्रिपाटी राम शंकर, हिस्ट्री ऑफ एन्शंट इंडीया,पृ.३६

१४. महाजन व्ही. डी., पूर्वोक्त, पृ.४९

१५. त्रिपाटी राम शंकर, पूर्वोक्त, पृ .२०

१६. कित्ता, पृ. ३६

१७. महाजन व्ही.डी., पूर्वोक्त, पृ. ५९

१८. कित्ता, पृ.७०

१९. कित्ता, पृ.७०

२०. त्रिपाटी राम शंकर, पूर्वोक्त, पृ.१०६

२१. महाजन व्ही. डी., पूर्वोक्त, पृ.९४

२२. कित्ता, पृ.९४

२३. चापेकर नलिनी, एशंट इंडीया अँन्ड ग्रीस, पृ.५३

२४. कित्ता, पृ.५३

२५. शास्त्री निलकंठ, श्रीनिवासाचारी, पूर्वोक्त, पृ.२२०

२६. महाजन व्ही. डी., पूर्वोक्त, पृ. ४९

२७. सिंग वाय. बी., सोशल लाईफ इन एन्शंट इंडीया, पृ.१४५

२८. कित्ता, पृ.१४६

२९. कित्ता, पृ .१५१

३०. रानडे एम. जी., राईस ऑफ मराठा पॉवर, आ. ४, पृ.८

३१. कित्ता, पृ. ८

३२. जोशी प्र. न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. १

३३. सहस्त्रबुध्दे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, पृ. ३१

३४. कित्ता, पृ.३१

३५. प्रा. डॉ. पाठक यशवंत, नाचू कीर्तनाचे रंगी पृ. २२

३६. अग्नीहोत्री डी. एच., महाराष्ट्र संस्कृतीचे तात्वीक आधिष्टान, पृ. ११०

३७. जोशी वि. कृ., लोकनाट्याची परंपरा, पृ.९१

३८. भावे वा. कृ., मुसलमानपूर्व महाराष्ट्र (लोकजीवन), ख़.२ पृ.१०५

३९. कित्ता, पृ. १०५

४०. पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, पृ. १२७

४१. कित्ता, पृ. १७०

४२. कित्ता, पृ. १७१

४३. कित्ता, पृ. १७७

४४. कित्ता, पृ. २१

४५. ब्रम्हे मो. द. (कार्यकारी संपा.), प्रा. जोशी, अ.म.व इतर; मराठीनाट्यतंत्र, पृ.४

४६. कित्ता, पृ. ४

४७. जोशी वि. कृ., लोकनाट्याची परंपरा, पृ. ८

४८. कित्ता, पृ. १

४९. पानसे मु. ग., पूर्वोक्त, पृ. १२७

५०. व्हटकर नामदेव, मराठीचे लोकनाट्य - तमाशा - कला आणि साहित्य, पृ. ११

५१. कित्ता, पा. ११

५२. जोशी वि. कृ, पूर्वोक्त, पृ.९५

५३. मिश्रा आर. जी., इंडीयन रेसीसटंन्स टू द अर्ली मुस्लीम इन्व्हेशन अपटू १२०६, पृ.१७

५४. कित्ता, पृ. १७

५५. कित्ता, पृ. ३५

५६. कित्ता, पृ. ३५, ३६

५७. कित्ता, पृ. ९३

५८. पानसे मु. गो., पूर्वोक्त, पृ. ३४

५९. कित्ता, पृ. ३६

६०. शर्मा एस. आर., द फाऊंडींग ऑफ मराठा फ्रीडम, पृ. ३०

६१. प्रा.माटे म. श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र (सामा. आणि सांस्कृ. जीवन ), पृ.१३

६२. कित्ता, पृ. १३

६३. कित्ता, पृ. २२ व पृ. २४

६४. कित्ता, पृ. २४

६५. कित्ता, पृ. २६

६६. शाहू दप्तर रोजकिर्द, रु.१ पु.१६ का. २९
सरदेसाई गो.स., पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं.४३पृ.९१ का.१०६

६७. प्रा. माटे म. श्री. पूर्वोक्त, पृ. १४

६८. सरदार गं.बा.(संपा), महाराष्ट्र-जीवन (परंपरा, प्रगती आणि समस्या), खं.२ पृ. ३६५

६९. प्रा.शेणोलीकर, ह.श्री; डॉ.देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती (घडण आणि विकास), पृ.१८५

७०. चिटणीस के. एन., सोशो. इकॉनॉमिक असपेक्टस ऑफ मिडीव्हल इंडीया, पृ.१७७

**७१.** डॉ. देखणे रामचंद्र, वारी : स्वरुप आणि परंपरा, पृ.५

**७२.** कित्ता, पृ. १४३

**७३.** पानसे मु. ग., पूर्वोक्त, पृ.२१

**७४.** कित्ता, पृ.१६७

**७५.** प्रा. डॉ. पाठक यशवंत, पूर्वोक्त, पृ. १५

**७६.** कित्ता, पृ. २५

**७७.** पानसे मु. ग., पूर्वोक्त, पृ. १९३

**७८.** कित्ता, पृ. १९३

**७९.** मोघे पांडूरंग व काटकर वामन (संपा), किर्तन तरंगिनी, खं १ पृ. ६

**८०.** श्रीमती भोळे तारा, ज्ञानदूत दिवाळी अंक, १९८५ पृ. १०५

**८१.** भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत,पृ. २९०

**८२.** कित्ता, पृ. २९८

**८३.** प्रा. डॉ. पाठक यशवंत, पूर्वोक्त, पृ. ८

**८४.** डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ. ५७

**८५.** सरदार गं. बा., पूर्वोक्त, पृ. २६४

**८६.** डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ. ६०

**८७.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. २९

**८८.** कित्ता, पृ. ३०

**८९.** ब्रम्हे व इतर, पूर्वोक्त, पृ. ७

**९०.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. ४३

**९१.** कित्ता, पृ. ३०

**९२.** देखणे डॉ. रामचंद्र, भारूड वाङ्मयातील तत्वज्ञान, पृ.१६

**९३.** कित्ता, पृ. १६

**९४.** कित्ता, पृ. १८

**९५.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. ३२

९६. देखणे डॉ. रामचंद्र, पूर्वोक्त, पृ. २५

९७. कित्ता, पृ. २१

९८. कित्ता, पृ. ३६

९९. डॉ. जोशी वासंती, एकनाथांची निवडक भारुडे पृ. १५, क्र. ३७४२

१००. जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. १३३

१०१. डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ. ६०

१०२. जोशी वि. कृ., पूर्वोक्त,पृ. १३९

१०३. डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ. ६२

१०४. जोशी वि. कृ. पूर्वोक्त, पृ.९३

१०५. डॉ. देखणे रामचंद्र, गोंधळ : परंपरा, स्वरुप आणि आविष्कार, पृ. १९

१०६. कित्ता, पृ.२०

१०७. कित्ता, पृ. २६

१०८. कित्ता, पृ. ५२

१०९. जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ.९३

११०. कित्ता, पृ.७३

१११. डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ.९७

११२. कित्ता, पृ. ११७

११३. जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. ७८

११४. कित्ता, पृ. ८१

११५. चिटणीस के. एन., पूर्वोक्त, पृ.१७७

११६. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्र संस्कती : घडण आणि विकास पृ. १८५

११७. कित्ता, पृ. ३५२, ३५३

११८. कित्ता, पृ. ३६४

प्रकरण

३ रे

# रोमांचकारी मनोरंजनाचा विकास


३.१ प्रस्तावना

३.२ शाहीरी काव्याचे प्रकार व प्रयोजन

३.३ शाहीरी वाङ्मयातील काव्यमय जोडपे

३.४ मराठी बाण्याचा पोवाडा

३.५ इतिहासाचे एक साधन पोवाडा

३.६ पेशवेकालीन पोवाड्यांचे विषय

३.७ पोवाड्यामधून प्रतिबिंबित होणारे राजकीय जीवन

३.८ पोवाड्यामधून प्रतिबिंबित होणारे सामाजिक जीवन

३.९ पोवाड्यामधून प्रतिबिंबित होणारे आर्थिक जीवन

३.१० पोवाड्यामधून प्रतिबिंबित होणारे धार्मिक जीवन

३.११ पोवाडे लोकप्रिय करणारे प्रमुख शाहीर

## प्रकरण तिसरे

# रोमांचकारी मनोरंजनाचा विकास

## ३.१ प्रस्तावना

शाहीरी काव्याचा झालेला विकास हा पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाच्या इतिहासामधील महत्वाचा टप्पा होय. 'शाहीर' हा शब्द व 'शाहीरी काव्य' हा त्यावरुन बनविलेला शब्दप्रयोग यांना वास्तविक मराठीत परंपरा नाही. 'शायर' किंवा 'षाइर' या फारसी शब्दापासून तो तयार झाला असून त्याचा अर्थ 'कवी' असा होतो.[१] बहामनी राज्याच्या अंमलापासून शाहीर व शाहीरी हे शब्द मराठीमध्ये रुढ झाले आहेत. हे शब्द परकीय संस्कृतीमधून आले असले तरी त्यांच्यात नावाखेरीज परकीय संस्कृतीचा भाग नाही.[२] केवळ ऐट म्हणून ते स्विकारले गेले असे मत म. ना. सहस्त्रबुध्दे यांनी व्यक्त केले आहे. त्यांना शाहीरी काव्याची प्रेरणा मध्ययुगीन भक्तीसंप्रदायामधून झाली असावी असे वाटते.[३] अध्यात्मिकता आणि भक्ती ही शाहीरी वाङ्मयाची बीजभूत प्रेरणा असल्याचे ते मान्य करतात. या वाङ्मय निर्मितीची प्रेरणा नाथसंप्रदायी असून त्याचे उद्दिष्ट परमार्थाचे ज्ञान लोकापर्यंत पोहचविणे हे होते. मराठीमध्ये शाहीर व शाहीरी यांना विशिष्ट प्रकारची कविता करणारे व त्यांचे काव्य असा अर्थ प्राप्त होतो. हे काव्य पूर्वीच्या संतकाव्य आणि पंडिती काव्यापेक्षा वेगळे होते. रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, परशराम इत्यादी अनेक शाहीरांच्या लेखणीतून आणि वाणीतून निघालेले हे काव्य डफ-तुणतुण्याच्या साथीने लोकांचे मनोरंजन करु लागले.[४] संतांनी लोकांना ईश्वरभक्तीचा मार्ग दाखविला आणि त्यासाठी अनेक साधने वापरली की, ज्यामधून लोकांचे मनोरंजन झाले व त्याबरोबरच त्यांना अध्यात्माची गोडी लागली. पंचमहाकाव्यातील विविध विषय आणि संकेत घेऊन त्यांना लौकिकाचा रंग देण्याचे कार्य पंडितानी केले. शाहीरांनी मात्र लोकजीवनात समरस होऊन काव्यरचना केल्यामुळे ती जास्त लोकप्रिय ठरली. शाहिरी हा नृत्य, नाट्य व संगीतप्रधान असा कलाप्रकार आहे. त्यामध्ये कडी, ढोलकी, डफ, तुणतुणे, झांज, करंडी (बाजा) ही संगीताची साधने वापरली जातात.

## ३.२ शाहीरी काव्याचे प्रकार व प्रयोजन

शाहीरी काव्यामध्ये पोवाडा, लावणी, तमाशा, डफगाणे, भेदिक आणि कटाव व साकी असे प्रकार आढळतात. ते एकमेकाशी इतके एकजीव झाले आहेत की त्यांना पूर्णपणे अलग करता येत नाही. मात्र त्यांच्या प्रेरणा भिन्नभिन्न असल्यामुळे त्यांचे प्रकार पाडता येतात. त्यांचा थोडक्यात विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

### ३.२.१ पोवाडा

पोवाड्याला कांही शाहीर 'कडाका' तर काही शाहीर 'बिरमाल' असे म्हणतात.[५] पोवाड्यात वीररसप्रधान ऐतिहासिक प्रसंगांचे व घटनांचे चित्रण केलेले असते. पोवाड्यामार्फत लोकजागृतीमधून लोकांच्या मनोरंजनाचे कार्य साधले जात होते. वि. का. राजवाड्यांनी 'महिकावतीच्या बखरी' च्या प्रस्तावनेमध्ये पोवाड्यातील गद्य पद्यावरुन 'चंपू' या श्राव्य आणि दृश्य काव्यप्रकारात समावेश केलेला आहे.[६] पोवाड्याच्या उत्पत्तीबाबत डॉ. गंगाधर मोरजे यांनी मांडलेले मत महत्वाचे वाटते. त्यांच्या मते संस्कृत प्र + वद - सांगणे, बोलणे, उद्देशून बोलणे या शब्दापासून 'पवाड' शब्द आला असावा. प्रवदचे - प्रवड - पवाड - पवाडा -पोवाडा आणि अनेकवचनी पवाडे - पोवाडे असे रुप सिध्द झाले असावे. त्यांचे हे मत डॉ. सूर्यकांत खांडेकरानीही मान्य केले आहे.

### ३.२.२.लावणी

लावणी ही पद्य स्वरुपामध्ये असते.तिच्यामध्ये ऐतिहासिक आणि आदरणीय व्यक्तींचे गुणगाण आढळते असे नाही तर विविध विषयावर लावण्या रचून शाहिरांनी लोकांचे मनोरंजन केले आहे. लावण्या केवळ शृंगारिक असतात असा समज आहे. मात्र शृंगाराबरोबरच लावण्यामध्ये भक्ती, अध्यात्म आणि ऐतिहासिकतेचा धागादेखील असतो हे नाकारता येत नाही. १८व्या शतकातील शाहीरांनी ते आपल्या लावण्यामधून दाखवून दिले आहे.

### ३.२.३. भेदिक

मराठी शाहीरी काव्याचा हा तिसरा प्रकार होय.त्यातील पदाला शाहीर भेदिक लावणी म्हणतात. ही लावणी शृंगारिक लावणीपेक्षा वेगळी असून तिची रचना कथनप्रधान व गद्याकडे झुकणारी असते. तिच्यामध्ये नृत्य, नाट्य व संगीत आढळते. ती शुध्द अध्यात्म, पौराणिक, रुपकात्मक, शृंगारादी लौकीक जीवन, कला आणि शास्त्रे अशा सर्वच विषयावरती लिहिलेली आढळते. या लावणीच्या जोडीला 'सकी', 'चतराअी' अशा श्लोकसदृश्य कांही वेगळ्या रचनाही असतात. भेदिक लावणीची अभिव्यक्तीची शैली ही प्रश्नोत्तर स्वरुपाची असते. त्यांच्या गायकात कलगी आणि तुरा असे दोन पक्ष किंवा गट असतात. त्यांना आखाडे असेही म्हणतात. सवाल जबाब आणि कलगी तुरा एक नसून त्यांच्यामध्ये फरक आहे.

भेदिक शाहीरीची प्रेरणा अध्यात्मिक आहे. सुफी संतांच्या आगमनामुळे तिचा विकास झाला. सुफी संत बाबा रतन हाजी याने आपल्या शेकडो अनुयायासह गोरक्षनाथांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यामुळे त्यांनी नाथ संप्रदाय काबूलपर्यंत वाढविला होता. नाथपंथीयांची 'नाथवाणी' नावाची गायनशैली होती. तिच्यापासूनच भेदिक लावणी उदयास आली आहे. त्यामुळे नाथ संप्रदाय आणि भेदिक लावणीचे नाते असल्याचे स्पष्ट होते. नाथपंथीय धर्मविधीप्रसंगी या वैशिष्टपूर्ण काव्यशैलीचा अवलंब करीत होते.

नाथपंथी एकेश्वरवादी अव्दैत तत्वज्ञानाचे प्रतिपादन, आध्यात्मिक भक्तीचा प्रसार आणि प्रचार करणे हे भेदिक शाहीरीचे मुख्य प्रयोजन होते.[७] काळानुरुप भेदिक शाहीरीमध्ये बदल होत गेल्याचे दिसून येते. 'नाथवाणी' रुप या सांप्रदायिक गायकीचा महाराष्ट्रात अतिशय झपाट्याने प्रसार करण्याचे कार्य वडवालसिध्द नागनाथ यांनी केले. त्यांनी मोहोळ (सध्याच्या सोलापूर जिल्ह्यातील) येथे वास्तव्य केल्यापासून 'नाथवाणी'ला शाहिरी असे नाव प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना मराठीतील पहिले शाहीर म्हणावे लागते.[८] त्यांच्यापासून पुढे शाहीरीची एक स्वतंत्र परंपरा सुरु झाली.

त्रिमलदास पाठक हा वडवलसिध्द नागनाथांचा शिष्य अध्यात्मविद्या आणि गायनातही प्रवीण होता. त्याच्या पारमार्थीक गायनावर खूष होऊन बीदरचा शासक अल्लाउद्दीनने त्याचा इ.स.१४४१ मध्ये सनद व बक्षिस देऊन गौरव केला. त्याच्या 'नाथवाणी' च्या पारमार्थीक गायनासाठी वापरण्यात आलेला 'कलगी' हा शब्द आणि गायकासाठी वापरण्यात आलेला

'शाहीर' शब्द प्रथम या सनदेत एकत्र आला आहे.[९] महीकावतीच्या बखरीत आलेला 'शाहीर' हा शब्द त्यासमकालीन ठरतो.

शाहीरीच्या संदर्भातील 'तुरा' या शब्दाचा पहिला उल्लेख अहमदनगरच्या बुऱ्हानोद्दिन निजामशहाने (इ.स.१५०३-१५५३) शाहीरांना दिलेल्या दुसऱ्या सनदेत मिळतो. इ.स.१५४५ मध्ये ही सनद दिली आहे.[१०] त्यामुळे नाथवाणीला शाहिरी हे नाव व तिची कलगी व तुरा ही विशेषनामे इस्लामी संस्कृतीच्या प्रभावामुळे प्राप्त झालीत हे स्पष्ट होते. भेदिक शाहिरी किंवा कलगी तुऱ्याची शाहिरी ही नाथपंथाचे प्रचार साधन असल्याने तिचा उदय नाथपंथाच्या महाराष्ट्रातील प्रभावाच्या काळात झाला होता.

डफगाणे हेही शाहिरी काव्याचे आणखी एक नाव आहे. डफाच्या साथीवर म्हणावयाच्या सवाल जबाबात्मक गीताला डफगाणे म्हणतात. समर्थ रामदासांच्या काळात हा प्रकार प्रचलीत होता. स्वत: रामदासांनी डफगाणे गाऊन शाहीरांना निरुत्तर केले होते.[११] त्यावरुन पोवाडे आणि लावणी या काव्य प्रकाराच्या अगोदर शाहीर डफगाणे गाऊन मराठी लोकांचे मनोरंजन करत होते. डफगाणे हा प्रश्नोत्तर स्वरुपातील संवादात्मक गायनशैली प्रकार आहे. त्याचे कलगी-तुऱ्याच्या शैलीशी साम्य आहे. याचा अर्थ असा होतो की समर्थपूर्व काळापासून कलगी तुऱ्यालाच डफगाणे हे नाव रुढ होते. समर्थांच्या काळात हा काव्यप्रकार लोकप्रिय असून त्यांचे स्वत:चे सर्वात जुने डफगाणे उपलब्ध आहे.[१२] तरीदेखील समर्थांची शाहीरांबद्दलची आणि शाहिरी काव्याबद्दलची भूमिका फारशी चांगली दिसत नाही.[१३]

## ३.२.४. तमाशा

शाहीरी काव्याचा हा चौथा प्रकार असून लावणीच्या जोडीला गद्य संवादात्मक रचना करुन लोकसमुदायासमोर सादर केला की, तमाशा निर्माण होतो. त्यामध्ये नृत्य, नाट्य व संगीताबरोबरच अभिनयालादेखील वाव असतो. नाट्यमयता हे तमाशाचे वैशिष्ट्य असून लोकांचे मनोरंजन करणे हा त्याच्या प्रयोजनाचा मुख्य हेतू असतो. तमाशासारखे लोकरंजनाचे विविध प्रकार प्राचीन काळापासून महाराष्ट्रामध्ये चालू असलेले आढळतात. काळानुरुप त्यांचा विकास जलसा - तमाशा - वगनाट्य - लोकनाट्य असा होत गेला. तमाशाच्या विकासासंबधी आजपर्यंत भरपूर संशोधन झाले असून त्यासंदर्भात दोन विचारप्रवाह निर्माण झाले आहेत. पु. गो.

काणेकरांना तमाशा इस्लामी संस्कृतीची फलश्रूती वाटते तर वि. कृ. जोशींना तो खास मराठी मातीतून जन्मास आला असे वाटते. संशोधनाच्या भिन्न पध्दतींचा व वेगवेगळ्या दृष्टिकोनांचा स्वीकार केल्यामुळे हे दोन विचारप्रवाह निर्माण झाले आहेत.

## ३.३ शाहीरी वाङ्मयातील काव्यमय जोडपे

शाहीरी काव्यामध्ये वर सांगितल्याप्रमाणे प्रकार असले तरी त्यापैकी पोवाडा व लावणी हे दोन महत्वाचे प्रमुख प्रकार आहेत. त्यांच्या अनन्यसाधारण महत्वामुळेच य. न. केळकरांनी त्यांचे वर्णन काव्यमय जोडपे असे केले आहे.[१४] सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या मराठ्यांच्या काबाडकष्टमय, परंतु आनंदी आणि सुखी जीवनाचे चित्र शाहीरांनी रंगविले आहे. लोकजीवनातील वेगवेगळे प्रसंग, जीवावर उदार होऊन पराक्रम गाजविणारे वीरपुरुष, अहोरात्र बेदरकारपणे वावरणाऱ्या आणि चौफेर मुलुखगिरी करणाऱ्या मराठी मर्दांचे जीवनातील वीररस शाहीरांनी पोवाड्यातून व्यक्त केला तर मर्दांच्या घरातील वातावरण, त्यांच्या स्त्रियांचा शृंगार आणि विरह, त्यातील निष्ठा आणि क्वचित बेइमानीपणा, त्यातील आनंद आणि विनोद, रुपगुणसौंदर्याने भुरळ घालणाऱ्या सुंदरीचे प्रेमोत्कट भाव, समाजातील रगेलपणा आणि रंगेलपणा यासारख्या विविध छटा शाहीरांनी लावण्यातून व्यक्त केल्या आहेत. पोवाड्यांमधून त्यांनी प्रामुख्याने पुरुषांचे चित्र तर लावणीमध्ये मुख्यत्वे स्त्रीचे चित्र श्रोत्यांपुढे उभे केले. त्यांच्या काव्यातील बोल हे हृदयापासून निघालेले असून हृदयास जाऊन भिडणारे आहेत.[१५] शाहीरांनी लोकांच्या भावना लोकांच्या शब्दात मांडल्या, त्यामुळे त्यांना अधिक लोकप्रियता मिळाली. म्हणून शाहीरी कविता म्हणजे 'मराठ्यांची खरी गाणी' असे मानले जाते. कारण यापूर्वीच्या काव्यामध्ये महाराष्ट्राची विशिष्टता कमी प्रमाणात उतरली आहे, म्हणून त्याला भारतीय काव्य म्हणावे असे वि. पा. दांडेकर म्हणतात. शाहीरी काव्याच्या मराठीपणाबद्दल ते म्हणतात की, ''मराठ्यांचे मनगट, मराठ्यांचे मन, मराठ्यांच्या भावभावना, मराठ्यांचे आचारविचार, मराठ्यांचे पोशाख आणि मराठ्यांचा मानधनी मोठेपणा या सर्वांचे प्रतिबिंब लावण्यांत व पोवाड्यांत उत्तम प्रकारे पडले आहे. हे खरे मराठी काव्य होय''.[१६]

शाहीरी काव्याला उत्तम राजाश्रय मिळाल्यामुळे त्याची विविध अंगांनी चांगली भरभराट झाली. महाराष्ट्रातील सर्व थरांतील लोकांनी या काव्याच्या निर्मितीला हातभार लावल्यामुळे ते बहुजन समाजाचे काव्य बनले होते.[१७] त्याच्या निर्मितीत जसा रामजोशी सारख्या व्युत्पन्न ब्राम्हण शाहीराचा समावेश होता तसा रामा गोंधळी, होनाजी सारखा गवळी, परशुरामा सारखा शिंपी व सगनभाऊ सारख्या मुसलमान शाहीरांचा समावेश होता. त्यामुळे शाहीरी काव्याकडे महाराष्ट्राचे पहिले निधर्मी काव्य म्हणून बोट दाखविता येते. या काव्यामध्ये कांहीवेळा अतिरेक झालेला आढळतो. परंतु तेवढ्याने ते टाकाऊ व हीन ठरत नाही. शाहीरांनी बहुजन समाजाचा उपदेशक, नाटककार, कवी आणि नट या सर्वच भूमिका चांगल्या वठवल्यामुळे शाहीरी काव्य अधिक लोकप्रिय बनले.

## ३.४ मराठी बाण्याचा पोवाडा

पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुध्दीमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय. पोवाडा म्हणजे 'ठासून स्तुती करणे' हा अर्थ लावून प्र + स्तुती = प्रशस्ती ही कल्पना आर्यसंस्कृतीत अगदी प्राचीनकाळापासून चालत आली आहे.[१८] इंद्राचा सम्राटपदाचा अभिषेक झाल्यावर तो आसंदीवर बसला असता विश्वदेवांनी 'अभ्युत्क्रोश' केला, असे ऐतरेय ब्राम्हणात वर्णन आहे. सम्राटपद स्वीकारल्यानंतर त्याला त्याच्या पराक्रमाची आठवण करुन दिल्याशिवाय तो कार्यक्षम होणार नाही. म्हणून सर्व देवांनी त्याच्या स्तुतीचा जो अभ्युत्क्रोश केला तो म्हणजे इंद्राचा पोवाडा होय. शाहीरांनी गाइलेली कवने ही पवाडे किंवा पोवाडे म्हणून ओळखली जातात. पोवाडा म्हणजे कीर्तिकाव्य, यशोगीत व स्तुतीगीत होय. ते प्रामुख्याने समकालीन प्रसिध्द व्यक्तिंचे अथवा राजांचे असते. निवृत्ति मुक्ताबाई चांगदेव गाढा। हरिचा पवाढा झेलताती।।[१९] असे पोवाड्यासंदर्भात वर्णन ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयात आढळते. ज्ञानेश्वरांना ज्ञानेश्वरीमध्ये अर्जुनाच्या धाडसाचे वर्णन करताना पोवाडा या संकल्पनेचा वापर केलेला आहे.[२०] यादवकाळाच्या पूर्वीपासून राजस्थानसारख्या उत्तरभारतीय प्रदेशात यशोगान अथवा बिरुदगान गाणाऱ्या भाटांची परंपरा असून तो एक कीर्तिकाव्याचाच प्रकार होता. भाट लोकांनी पृथ्वीराज चौहान, राणाप्रताप, दुर्गादास राठोड अशा वीरपुरुषांची चरित्रे गाऊन तेथे राष्ट्रजागृतीचे कार्य केले. असे भाट लोक

राजपूत कुळांबरोबर महाराष्ट्रात यादवपूर्व काळात आले होते. त्यांचाच उत्तरकालीन आविष्कार म्हणजे शाहीर होय. बाराव्या तेराव्या शतकातील महिकावतीच्या बखरीत पोवाड्याचा सर्वात जुना उल्लेख सापडतो. वि. का. राजवाड्यांनी पोवाड्याची परंपरा चंपू काव्याशी निगडीत असल्याचे मत संपादित बखरीच्या विवेचक प्रस्तावनेत केलेले आहे.

यादवकाळ ते शिवकाळ या दरम्यानच्या काळातील पोवाडा उपलब्ध होत नाही. तरीदेखील यादवकालीन भाट आणि शिवकालीन शाहीर यांच्यामध्ये कांहीतरी दुवे असावेत असे विद्वानांना वाटते. परंपरेने स्वत:ला शाहीर म्हणून घेणारे कवी महाराष्ट्रातील गोंधळी समाजातून आलेले होते.[२१] ते आदिशक्तीचा म्हणजे देवी महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी यांचा गोंधळ घालण्याचे काम परंपरेने करत होते. शिवाजी महाराजांनी जेंव्हा स्वराज्य स्थापनेचे महाकार्य केले तेंव्हा वीररसात्मक पोवाडे म्हणण्याचे काम गोंधळ्यांनी केले.[२२] शिवकाळात गोंधळ्यांनी सुरु केलेल्या या कार्याचा विकास करण्याचे काम वेगवेगळ्या जातीधर्मातील शाहीरांनी पुढील काळात केले. त्यामुळे शाहीर नावाची वेगळी जात महाराष्ट्रात अस्तित्वात नाही हे सिध्द होते.[२३]

पोवाडा हा दृकश्राव्य प्रकार असल्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांच्या मनामध्ये रोमांच अथवा थरार निर्माण करण्याचे काम सुरुवातीच्या पोवाड्यांनी केले. इस्लामी राजवटीच्या अन्यायअत्याचाराचे पाढे वाचून मराठी वीरांच्या पराक्रमाचे गोडवे गाण्याचे काम शाहीरांनी पोवाड्याद्वारे केले. तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या वर्णनातून लोकांच्या मनामध्ये एक वादळ निर्माण करण्याचे कामही पोवाड्यांनी केले. शिवकाळामध्ये पोवाड्यांचा उदय झाला आणि पेशवेकाळात त्यांचा विकास झाला. शिवाजी महाराजापासून शाहू महाराजापर्यंच्या काळातील सात पोवाडे उपलब्ध आहेत. त्यापैकी सर्वात जुना पोवाडा आगिनदास, अग्निदास, अथवा अज्ञानदास याने लिहिलेला आणि गायलेला विरमल शिवाजीचा अफझलखान वधाचा पोवाडा होय.[२४] हा पोवाडा केवळ रोमांचक मनोरंजनाचा प्रकार म्हणून महत्वाचा नसून त्यामधील ऐतिहासिक प्रसंगाला मराठ्यांच्या इतिहासामध्ये अतिशय महत्व आहे. हा पोवाडा समकालीन असल्यामुळे त्याचे ऐतिहासिक मूल्य मोठे आहे. जरी अज्ञानदासाने शिवाजी महाराजांना मानले असले तरी आपल्याला अश्वासक अशी माहिति अफझलखानाचा वध या वादातीत प्रसंगाबद्दल

त्यातून मिळते. हा प्रसंग घडल्यानंतर जिजाबाईनी ताबडतोब शाहीरांना बोलावून आनंदप्रदर्शक पोवाडा रचण्यास लावला. त्यावेळी अज्ञानदासाने अतिशय तडाक्याने त्या प्रसंगाचा 'कडाका गाइला'.[२५] अशाप्रकारे उल्लेखनीय प्रसंग रेखाटून अज्ञानदासाने शिवाजीचा गौरव केला त्याब-ल शिवाजीकडून त्याचा सन्मान एक घोडा व सोन्याचा तोडा देऊन करण्यात आला.

शिवकालीन दुसरा पोवाडा यमाजीकृत दत्ताजी जाधवाचा आहे. दत्ताजी जाधव आणि विजापूरी सरदार सर्जाखान यांच्यामध्ये निलंग्याजवळ लढाई होऊन त्यामध्ये दत्ताजी मारला गेला.यावेळी कमी सैन्यानिशी दत्ताजी व त्याच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या लढ्याचे वर्णन शाहीर यमाजीने केले आहे.[२६] या पोवाड्याच्या शेवटी दत्ताजीची पत्नी बहिनाबाई सती गेल्याचे वर्णन केले आहे. तिसरा पोवाडा तुळशीदासाने रचलेला तानाजी मालुसऱ्यावरील आहे. या पोवाड्यात पंचावन्न चौक असून त्याच्याइतका विस्तृत पोवाडा इतर कोणावर रचलेला आढळलेला नाही. त्यामधील पौराणिक पध्दतीच्या अलौकिक दैविक चमत्काराच्या गोष्टी व अतिशयोक्ती सोडली तर ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने सदर पोवाडा अतिशय महत्वाचा आहे. पोवाड्याची साधीसोपी, रांगडी, तडफदार व जिवंत भाषा पोवाडा रंजक होण्यास उपयुक्त ठरली. तानाजी, शेलारमामा, शिवाजी व जिजाबाई यांची स्वभावचित्रे अतिशय सुंदर रेखाटली आहेत. तानाजीची स्वामीनिष्ठा मराठी मनाला पुढे प्रेरणादायी ठरली. तानाजीबद्दल व शिव छत्रपतीबद्दल एकूणच मराठी मनाला जो आदरमिश्रित जिव्हाळा समकालीनामध्ये असेल याची साक्ष या पोवाड्यात दिसून येते. तुळशीदास शाहीराने कोंडाण्याचा अदभुतरम्य समरप्रसंग अतिशय उत्तम रेखाटल्यामुळे तो प्रसंग तीनशे वर्षापाठीमागील असूनदेखील अबालवृध्दामध्ये लोकप्रिय आहे.[२७] शिवकालीन पोवाड्यापैकी शाहीर यमाजीचा बाजी पासलकराचा पोवाडा हा एक अस्सल पोवाडा आहे. बाजीचे पूर्ण नाव बाजी वल्लद बापूजी यशवंतराव पासलकर असे असून 'यशवंतराव' हा त्याचा किताब होता.[२८] तो आठ गावचा देसाई असून त्याच्याकडे 'यशवंता' नावाची उत्तम घोडी होती. ती पळविण्यासाठी जावळीच्या चंद्रराव मोऱ्याने विजापुरच्या बादशहाकडून अनुमती मिळविली. या कामगिरीवर सोनू दळवी आणि बाजीचा जावई मकरतराव पाचशे सैन्य घेऊन बाजीच्या कुरडू गावाजवळ गेले. चांगयान धोब्याला स्त्री वेशात वाड्यावर पाठवून तेथील परिस्थितीचा अंदाज घेण्यात आला आणि वाड्यावर हल्ला करण्यात आला.

यावेळी बाजीने पाळलेल्या अनंत्या खुरचुला याने पराक्रम गाजवून पाचशे सोनदळवी वाड्याबाहेर काढले. बाजी पासलकराची यावेळी प्रत्यक्ष जावयाबरोबर चकमक होऊन त्याने जावई मकरतरावास धरणीला पाडले.[२९] अशाप्रकारे शिवकाळात तयार झालेले हे पावाडे पुढे पेशवेकाळ व त्यानंतरही मराठी लोकांचे मनोरंजन करण्यास व त्यांच्यामधील शौर्य वृध्दिंगत करण्यास उपयुक्त ठरले.

## ३.५ इतिहासाचे एक साधन पोवाडा

पोवाडा हे एक इतिहासाचे साधन आहे. जेंव्हा आपण इतिहासाच्या साधनाबाबत विचार करतो त्यावेळी त्याच्या वर्गीकरणाबाबत प्रश्न निर्माण होतो. समकालीन पुरावा हा उत्तम आणि विषमकालीन पुरावा हा मध्यम किंवा कनिष्ठ पुरावा होय.[३०] ज्यावेळी पोवाडा लिहणारी व्यक्ती प्रत्यक्ष पोवाड्यात वर्णन केलेल्या घटनेमध्ये सहभागी असते किंवा समकालीन असते त्यावेळी त्या पोवाड्याचा प्राथमिक साधन म्हणून विचार झाला पाहिजे. ज्यावेळी प्रत्यक्ष घटनेची साक्षीदार नसलेली व्यक्ती पोवाडा लिहिते किंवा घटना घडल्यानंतर बऱ्याच दिवसांनी पोवाडा रचला जातो त्यावेळी त्याचा विचार दुय्यम साधन म्हणून केला पाहिजे. पोवाडा हा घटना घडल्यानंतर बऱ्याच दिवसांनी लिहिला गेला तर त्यामध्ये ऐतिहासिक घटनेतील सर्व बाबींचे वर्णन येईल याची खात्री नसते. म्हणून पोवाडा लिहिताना शाहीराने अतिशय दक्ष रहावे लागते. पोवाड्यामध्ये नाव, ठिकाण व काळ यासंदर्भात कांही चुका नसतील तर त्याच्या अस्सलपणाची खात्री होते. पोवाडा हा प्रामुख्याने कवितेवरती आधारलेला असून त्याचे लिखान करणे हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. एखाद्या प्रसंगाचे व्यवस्थित चित्रण पोवाड्यामध्ये केलेले असते. त्यामधील भाषा स्पष्ट असून यमकांचा गोंधळ असत नाही.[३१] पोवाड्यामधील कडव्यांना 'चौक' असे म्हणतात.

वि. का. राजवाडे यांनी ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बखरीपेक्षा पोवाड्यांना वरचे स्थान दिले असून पोवाड्यातील तथ्य पारखून पाहण्याची अपेक्षा केली आहे. पोवाड्यात रंगविलेल्या सर्व घटना ऐतिहासिक दृष्ट्या सत्य असतातच याची खात्री देता येत नाही. पोवाड्यांमध्ये अतिशयोक्ती, पाल्हाळ, दंतकथा, विभूतीपूजा व आंधळी स्वामीनिष्ठा इत्यादी दोष असतात हे मान्य करावे लागते. तरीदेखील अनेक ऐतिहासिक घटनांची माहिती केवळ पोवाड्यामधील वर्णनामधूनच समजू शकली हे मान्य करावे लागते.[३२] डभईच्या लढाईचे वर्णन मल्लारदास

शाहीराच्या पोवाड्यात आहे. इतर कोणत्याही साधनात इतके तपशिलवार व सुसंगत वर्णन आढळत नाही. प्रभाकराने लिहलेल्या खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यामध्ये स्वारीवर गेलेल्या मराठी सरदारांची बिनचुक यादी सापडते तशी पूर्ण यादी इतर साधनांत सापडत नाही. इंग्रज आणि धुळप यांच्यामध्ये झालेल्या संघर्षाची विस्तृत माहिती पोवाड्यामध्येच सापडली आहे. याशिवाय मराठ्यांचे सैन्य आणि त्यांचे सरदार यांची विस्तृत माहितीदेखील वेगवेगळ्या पोवाड्यांमधून आली आहे. म्हणून पोवाड्यांचे ऐतिहासिक महत्व नाकारता येत नाही.

पोवाडा गाणारा शाहीर पोवाड्यामधील पात्रे स्वत: लोकांसमोर सादर करत असतो. पोवाड्याद्वारे तो एखादी कथा गद्य आणि काव्य या माध्यमांच्या सहाय्याने व हावभावाद्वारे लोकांसमोर मांडीत असे. त्यामुळे श्रोतावर्ग त्याच्या कार्यक्रमात रंगून जात होता. पोवाडा आणि लावणी यांच्यामध्ये अतिशय जवळचा संबंध आहे. कारण पोवाड्यांचा इतिहासाला जेवढा उपयोग होतो तितकाच लावण्यांचाही होतो. ज्या शाहीरांनी पोवाडे रचलेत त्यांनीच लावण्या रचल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या समकालीनत्वाविषयी शंका येण्याचे कारण येत नाही.पोवाड्यामधून राजकीय परिस्थितीचे तर लावणीमधून सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडते.[३३] पोवाड्यामधून ऐतिहासिक वीरांनी व मुत्सद्यांनी गाजविलेल्या पराक्रमांचे, त्यांनी केलेल्या कारस्थानांचे व त्याच्या परिणामांचे वर्णन आढळते. तर लावण्यामधून ऐतिहासिक काळातील समाजजीवन, लोकसमजुती व लोकविचारांची माहिती मिळते असे असले तरी कांही पोवाडे समाजस्थितीचे तर कांही लावण्या राजकीय परिस्थितीचे वर्णन करणाऱ्या आहेत. त्यामुळे दोघांचेही ऐतिहासिक मूल्य नाकारता येत नाही. ''ब्राम्हणीराज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई''[३४] या काव्याला पेशवेकालीन लावणी म्हटले असले तरी त्यामधील वर्णन पहाता त्याला पोवाडाच म्हणावा लागेल, असे य. न. केळकरांना वाटते. यावरुन लावण्यादेखील राजकीय परिस्थितीची चांगली ओळख करुन देतात हे स्पष्ट होते.

पोवाडा आणि लावणी या शाहीरी काव्यामध्ये समकालिनत्वामुळे सत्य इतिहासाचे सुवर्णकण चोहोकडे विखुरलेले आढळतात. अशिक्षित शाहीरामुळे व त्यांच्या कलात्मकतेमुळे त्यांच्या हातून कालविपर्यासाचा दोष घडला असला तरी इतिहास संशोधनासाठी तो उपयुक्त ठरतो. आतापर्यंत शाळिग्राम-शितूती सारख्या विद्वानांच्या प्रयत्नामुळे मराठ्यांच्या इतिहासा

संदर्भातील सुमारे तीनशे पोवाडे उपलब्ध झाले आहेत. त्यापैकी शिवकालीन सात, पेशवेकालीन सुमारे दीडशे आणि उर्वरित इंग्रज राजवटीच्या काळातील आहेत.[३५] या पोवाड्यामधून आपणास वास्तव परिस्थितीचे चित्रण पहावयास मिळते. काल्पनिक पद्य आणि युध्दवर्णन याबरोबरच तत्कालीन इतर माहिती देण्याचे व सामाजिक मनोरंजनाचे काम पोवाड्यांनी केले आहे.

## ३.६ पेशवेकालीन पोवाड्यांचे विषय

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर इ.स.१७०७ मध्ये शाहूची मोगली कैदेतून सुटका झाली आणि त्याचे महाराष्ट्रात आगमन झाले. सातारा येथे गादी स्थापन करून सत्तेची सुत्रे पेशव्यांच्या हातात दिली. त्यामुळे हळूहळू पेशव्यांचे राजकीय वर्चस्व वाढत गेले आणि छत्रपती दुबळे बनत गेले. त्यामुळे शाहूच्या काळापासूनचा मराठ्यांचा इतिहास पेशवेकाळ म्हणून ओळखला जातो. या काळात मोठ्या प्रमाणात अनेक राजकीय प्रसंगांचे वर्णन करणारे पोवाडे रचले गेले. पेशव्यांनी आपल्या कारकिर्दीत शाहीरांना सन्मानाची वागणूक दिली. त्यामुळे पोवाड्यांचा विकास झाला. त्यावेळी शाहीरांनी शाहू महाराज, पेशवे, पेशवेकालीन इतर ऐतिहासिक व्यक्ती यांच्या जीवनप्रसंगावर व पेशवाईतील वेगवेगळ्या महत्वाच्या युध्दप्रसंगावर पोवाडे रचून ते लोकप्रिय केले. कोल्हापूर राज्यामधील शाहीरानींही सामाजिक मनोरंजनाचे साधन म्हणून पोवाड्यांचा चांगला विकास घडवून आणला होता. पोवाडे हे तत्कालीन राजकीय प्रसंगांची माहिती देणारे असले तरी कांही पोवाडे आर्थिक, सामाजिक व धार्मिक जीवनाची देखील माहिती देणारे होते. या पोवाड्यांच्या रचनेब-ल शाहिरांना बऱ्याचदा राजकर्त्यांनी मोठे बक्षिस देऊन गौरव केल्याचा उल्लेख देखील त्यांच्या कांही पोवाड्यामध्ये येतो. पेशवेकाळातील पोवाड्यांचा विकास होण्यासाठी शाहीरांना पुढील विषय मिळालेत. त्या विषयावर पोवाडे रचून त्यांनी ते लोकप्रिय करण्याचे कार्य केले.

### ३.६.१. छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू

पेशवेकाळातील सर्वात महत्वाची राजकीय व्यक्ती म्हणजे छत्रपती शाहू महाराज हे होत. मोगलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर त्याने सातारा येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तो सौम्यवृत्तीचा पुरुष होता. सतरा वर्षे कैदेत गेल्यामुळे शिपाईगिरी आणि मुत्सद्देगिरी या राजाला

आवश्यक असणाऱ्या गुणांचा त्याच्याजवळ अभाव होता. मात्र त्याने आपल्या हाताखालच्या लोकांना प्रोत्साहन देऊन आपल्या कर्तृत्वाची उणीव भरुन काढण्याचा प्रयत्न केला.त्याच्या काळात मराठयांच्या लहान राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. त्याने बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व नानासाहेब यांना पेशवाईची वस्त्रे देऊन त्यांच्यावर राज्यकारभाराची जबाबदारी सोपविली. त्यांनी आपली कर्तबगारी दाखविली असली तरी वंशपरंपरागत पेशवाई दिली गेल्यामुळे राजाचे वर्चस्व कमी होत जाऊन पेशवे सर्वाधिकारी बनले. शाहूच्या मृत्यूनंतर शाहीरांनी त्यांच्यावर रचलेले दोन पोवाडे उपलब्ध आहेत. त्यापैकी एक शाहीर दादू याचा तर दुसरा शाहीर फिरंगु नाना याचा आहे. दादूने शाहू हा अवतारी पुरुष गेल्याचे आपल्या पोवाड्यात म्हटले आहे.[३६] शाहीर फिरंगु नानाने शाहूच्या राज्याची तुलना रामराज्याशी केली आहे.[३७] तसेच त्याच्या वर्तणुकीची तुलना भगवान श्रीकृष्णाशी केली आहे. शाहूच्या मृत्यूनंतर निजामाचा नातू मुजफरजंग याने पुढील उदगार काढले आहेत - ''मोगलाईत निजामउल्मुल्क व मऱ्हाट राज्यात शाहूराजे होते. ऐसे माणूस पुढे होणार नाहीत. सर्व राज्य पेशव्यास सोपवून गेले. छत्रपतीसारखा राजा होणे नाही, राज्य बरे नांदविले, अजातशत्रू होते.''

## ३.६.२. पहिल्या बाजीराव पेशव्याचा मृत्यू

बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या मृत्यूने आपल्या पक्षाची फ़ार मोठी हानी झाली आहे असे काही काळ शाहूला वाटले. बाळाजीने आपल्या हुशारीने, मुत्सद्देगिरीने व एकनिष्ठेने शाहूची सेवा केली होती. त्यामुळे शाहूने बाळाजीच्या मृत्यूंनंतर त्याचा पुत्र बाजीराव याला पेशवाईची वस्त्रे देण्याचा निर्णय घेतला.[३८] बाजीरावाच्या उज्वल भवितव्याबद्दल त्याला खात्री वाटल्यामुळे दरबारातील मंडळींच्या विरोधाला न जुमानता मसूर मुक्कामी १७ एप्रिल १७२० रोजी त्याला पेशवेपद देण्यात आले. पेशवे पदावर नियुक्त करण्यास व राजकारणाची उत्तम जाण असणारा बाजीराव हा एकमेव सक्षम व्यक्ति शाहूपुढे होता.[३९] शाहूने त्याच्यावर दाखविलेला विश्वास त्याने सार्थ करुन दाखविला. मराठी राज्याची सर्व दिशांना वृध्दी करण्यात तो यशस्वी ठरला. त्याने आपल्या वीस वर्षाच्या काळात मोठा साम्राज्य विस्तार घडवून आणला. चंबळ व नर्मदा नद्यांमधील प्रदेश, कोकण, गुजराथ, माळवा व बुंदेलखंडामधील प्रदेशावर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले.[४०] एक उत्तम सैनिक, उत्तम सेनापती, कार्यक्षम प्रशासक व थोर राजनितिज्ञ हे

राज्यकर्त्याला आवश्यक असणारे गुण त्याच्या अंगी होते. त्यामुळेच त्याच्या काळात मराठ्यांच्या मोठा साम्राज्यविस्तार झाला असे ग्राण्ट डफ म्हणतो.[४१] अशा कर्तबगार पहिल्या बाजीराव पेशव्याचा एकच पोवाडा उपलब्ध झाला आहे. श्रीगोंद्याचा शाहीर त्रिंबक साळी याने तो रचला आहे. त्यामध्ये बाजीरावाच्या मृत्यूमुळे मराठी दौलतीचा खांब धरणीवर कोलमडून पडला असे त्याने म्हटले आहे.[४२]

### ३.६.३. इ.स. १७६१चे पानिपतचे युध्द

इ.स.१७६१चे पानिपतच्या युध्दामुळे मराठ्यांच्या राजकारणावर गंभीर परिणाम झाले. पानिपत प्रसंगाचे वर्णन करणारे पोवाडे शाहीर सगनभाऊ, रामा सटवा व सटवा रामा यांचे आहेत. यापैकी रामा सटवा व सटवा रामा हे एकाच शाहीराचे नाव आहे.[४३] सगनभाऊने रचलेला पोवाडा हा भाषेच्या दृष्टीने चांगला असला तरी ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचा नाही. शाहीराने पानिपतवर भाऊसाहेबाबरोबर विश्वासरावास रवाना न करता नानासाहेबांना रवाना केल्याचे चुकीचे वर्णन केले आहे. शाळिग्रामांच्या मते हा शाहीर दुसऱ्या बाजीरावाच्या काळातील असून त्याचा हा पोवाडा सातारा, फलटण, मिरज, सांगली इत्यादी ठिकाणी लोकप्रिय होता. मात्र पुण्याच्या परिसरात तो आढळत नाही. पोवाड्याच्या शेवटच्या चौकात माधवरावाच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. त्यावरुन घटना घडल्यानंतर बऱ्याच दिवसांनी पोवाडा रचल्याचे स्पष्ट होते. पानिपत प्रसंगावर रामा सटवा याने लिहिलेला पोवाडा सगनभाऊच्या पोवाड्यापेक्षा ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. पोवाड्याची सुरुवात शाहूने आपल्या मृत्युपूर्वी नानासाहेब आणि भाऊसाहेबांना साताऱ्यास बोलावून आपणच येथून पुढे मराठ्यांचे राज्य चालवावे अशी आज्ञा करुन त्यांना आशीर्वाद दिल्याचा उल्लेख आहे.

### ३.६.४. नानासाहेब पेशव्याचा मृत्यू

बाजीरावाच्या मृत्यूसमयी त्याचा ज्येष्ठ पुत्र बाळाजी उर्फ नानासाहेब व बंधू चिमाजी आप्पा हे आंग्रे प्रकरण मिटविण्यासाठी कुलाब्याकडे गेले होते. त्यांना बाजीरावाच्या मृत्यूची बातमी समजल्यानंतर ते पुण्याला आले. शाहूने नानासाहेबांना साताऱ्यास बोलावून २५ जून

१७४० रोजी पेशवाईची वस्त्रे दिली.[४४] बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनी केलेल्या कामगिरीमुळे शाहुच्या मनात भट घराण्याबद्दल आत्मीयता आणि विश्वास निर्माण झाल्यामुळेच पेशवेगिरी नानासाहेबाकडे चालू ठेवली. पानिपतच्या युध्दापर्यंत नानासाहेबाने मराठी राज्याला वैभवाच्या शिखरावर पोहचविण्याचे काम केले. त्यामुळे शाहीर शिवराम पिंपळगावकर यांनी नानासाहेब पेशवे यांच्या मृत्यूचा पोवाडा रचला.[४५] त्यामध्ये नानासाहेबांच्या राज्यातील वैभवाचे वर्णन केलेले आहे.

## ३.६.५. नारायणरावाचा वध

नारायणराव पेशव्याला माधवरावाच्या मृत्यूनंतर सातारच्या छत्रपतींनी १३ डिसेंबर १७७२ रोजी पेशवाईची वस्त्रे दिली.[४६] त्याचा कारभारी म्हणून सखाराम बापूची नियुक्ती करण्यात आली. मात्र जास्त काळ नारायणयावास राज्य चालविण्याची संधी मिळाली नाही. अवघ्या आठ महिन्यामध्ये त्याचा खून झाला ही मराठ्यांच्या इतिहासातील अतिशय दुर्दैवी घटना होय.त्याच्या खूनाची माहिती देणारा पोवाडा लहरी मुकुंदा या शाहीराने रचला आहे. मूळ पोवाडा सात चौकाचा असून नंतर त्याच्यामध्ये भर घालून तो तेरा चौकाचा कोणातरी शाहीराने नंतरच्या काळात केलेला आहे. इतिहासाच्या कसोटीवर घासून पाहता सात चौकी पोवाडाच अस्सल व शुध्द आहे.[४७] पोवाड्याची सुरुवात माधवराव पेशव्यांच्या मृत्यूच्या वर्णनाने केली असून त्यानंतर नारायणरावाचा वध कसा झाला त्याचे वर्णन केलेले आहे.

## ३.६.६. खडर्याची लढाई

पेशवेकाळातील महत्वाची लढाई म्हणून खडर्याची लढाई ओळखली जाते. निजामाच्या विरोधात खेळलेल्या या लढाईत मराठ्यांनी विजय मिळविला. पेशवेकाळातील अंतिम विजय म्हणून या लढाईचे महत्व अनन्य साधारण आहे. शाहूच्या काळापासून दक्षिणेवर वर्चस्व कोणाचे या वादामुळे मराठे व निजाम यांच्यामध्ये शत्रूत्व निर्माण झाले होते. दक्षिणेतून निजामच्या सत्तेचे उच्चाटन करण्याची संधी मिळूनदेखील मराठ्यांनी ती घालविली होती. मराठ्यांना चौथाई व सरदेशमुखीचे कित्येक वर्षाचे देणे देण्यास निजाम टाळाटाळ करीत होता. तसेच पुण्यावर स्वारी करण्याच्या वावड्या उठवित होता. दक्षिण व उत्तर भारतामध्ये मराठ्यांचा झालेला उत्कर्ष त्याला

सहन होत नव्हता. मराठ्यांना थकबाकी देण्यापेक्षा त्यांच्याशी लढाईच करावी व इंग्रजांची मदत घ्यावी असे त्यांने ठरविले. निजामची युध्दाची खुमखुमी जिरविण्याचे पुणे दरबाराने ठरविले. परशुरामभाऊ पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली पटवर्धन, शिंदे, भोसले, होळकर इत्यादी सरदारांच्या फौजा गोळा केल्या. निजाम पुण्याच्या दिशेने वऱ्हाडातून चालून आल्यावर पुण्यापासून सव्वाशे मैलाच्या अंतरावर असलेल्या खर्ड्यानजीक मराठ्यांच्या सैन्याबरोबर त्याची गाठ पडली. ११मार्च १७९५ रोजी मराठ्यांनी निजामचा पराभव केला आणि त्याला मराठ्यांबरोबर करार करावा लागला. मराठ्यांना साडेचौत्तीस लाखांचा प्रदेश आणि तीन कोटी रोख देण्याचे मान्य करावे लागले.

अशा या खर्ड्याच्या लढाईचे रसभरीत वर्णन सांगणारे दहा वेगवेगळ्या शाहीरांनी लोकप्रिय पोवाडे रचले आहेत. या लढाईचे वर्णन करणारा एक पोवाडा शाहीर प्रभाकराने रचला आहे. त्यामध्ये सुरुवातीला माधवराव पेशव्याच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे. त्यानंतर लढाईमध्ये सहभागी झालेल्या सरदारांच्या नावाची अचूक माहिती दिली आहे.[४८] पोवाड्याच्या विस्ताराच्या मानाने शाहीराने लढाईचे वर्णन थोडक्यात केले असून विजयी मिरवणूकीचे भरघोस वर्णन केले आहे. या मिरवणूकीची शोभा वाढविण्याचे काम जेठी (वज्रमुठी करणारे पैलवान), भांड, भवय्या व धाडी या मनोरंजन करणाऱ्या कलाकारांनी वाढविली होती. खर्ड्याच्या लढाईचा दुसरा पोवाडा लिहिणाऱ्या आप्पा यशवंत या शाहीराने पोवाड्यामध्ये खऱ्या वस्तुस्थितीचे यथार्त वर्णन केल्यामुळे पोवाडा ऐकणाऱ्याचा आनंद द्विगुणित होतो. पोवाड्याच्या सातव्या चौकामध्ये लढाईच्या धुमचक्रीचे बहारदार वर्णन केलेले आहे.[४९]

शाहीर कुशाबा यानेदेखील खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा रचला होता. ऐतिहासिक दृष्टिने या पोवाड्यातील पहिला व चौथा चौक महत्वाचा आहे. पोवाड्यात आढळणारी सरदारांची नावे चुकीची आढळत नाहीत. पोवाड्याचा रंग वाढविण्यासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या चौकामध्ये वृक्षांचे आणि पशुपक्षांचे बहारदार वर्णन केलेले आहे. अनंतफंदी या शाहीराने खर्ड्याच्या लढाईवर रचलेल्या पोवाड्यामध्ये सवाई माधवरावाचे वर्णन करुन नंतर लढाईचेही सुंदर वर्णन केलेले आहे. या लढाईच्या प्रसंगाचे वर्णन करणारा आणखी एक पोवाडा शाहीर बाळा लक्ष्मण या शाहीराने लिहिला आहे, असे शाळिग्राम यांचे मत आहे.[५०] लढाईमध्ये मराठ्यांच्या सैन्याने

विजय मिळविल्याबद्दल सवाई माधवराव पेशव्यांने सरदारांचा मोठा सत्कार केल्याचा उल्लेख शाहीराने शेवटच्या चौकामध्ये केला आहे. त्याचबरोबर आपल्या फडातील सहकाऱ्यांचाही उल्लेख सातव्या म्हणजे शेवटच्या कडव्यात केला आहे.[५१] त्यावरुन हा पोवाडा दुसऱ्या शाहीराचा असावा असे वाटते.

बाळा लक्ष्मण या शाहीराच्या मूळ पोवाड्यामध्ये मराठ्यांच्या फौजेने निजामच्या फौजेची कशी दैन्यावस्था केली त्याचे वर्णन केले आहे. तसेच पोवाड्याच्या शेवटी आपल्या नावाचा उल्लेख केला आहे. याशिवाय होनाजी बाळा, रामचंद्र, बहुरंगी व अज्ञात शाहीराचा पोवाडा या प्रसंगाचे वर्णन करणारा आहे.

## ३.६.७. सवाई माधवराव पेशवा

सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील कांही प्रमुख घटनांवर तत्कालीन शाहीरांनी पोवाडे रचून लोकप्रिय केलेत. मराठी राज्याची सूत्रे पेशव्यांच्या हातात सोपविल्यापासून छत्रपतींची सत्ता संपुष्टात आली. बाजीराव, नानासाहेब व माधवराव या कर्तबगार पेशव्यांनी राज्याची वृध्दी केली. त्यांच्यानंतर कर्तबगार लोकांची परंपरा संपली. नारायणरावाच्या पोरकटपणामुळे व राघोबाच्या नालायकपणामुळे लोकांनी त्यांच्याकडून अपेक्षा केली नाही. मात्र सवाई माधवरावाबद्दल लोकांना अतिशय आशा वाटत होती. त्याचा जन्म मोठ्या अशांततेच्या काळात झाला. सुरुवातीला बारभाई आणि नंतर नाना फडणविस यांनी त्याच्या शिक्षणाची व्यवस्था पाहिली. नानाजवळ तलवारबहादुरी नसल्यामुळे पेशव्यालाही लष्करी डावपेचाचे शिक्षण मिळाले नाही. पेशव्याला नानाने आपल्या वर्चस्वाखाली ठेवल्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास खुंटला होता. अशा सवाई माधवराव पेशव्याचा मृत्यू ही मराठ्यांच्या इतिहासातील वादग्रस्त घटना होय. ज्वरात वातविकृती उत्पन्न होऊन सवाई माधवरावांनी माडीवरुन उडी टाकली आणि त्यामध्ये त्यांचे निधन झाले. मात्र नाना फडणिसांनी केलेल्या अपमानामुळे आणि जाचामुळे त्यांनी आत्महत्या केली असा तत्कालीन लोकप्रवाद झाला होता. सवाई माधवरावाच्या मृत्यूचा पोवाडा प्रभाकर या शाहीराने रचला आहे. शाहीरी काव्य यादृष्टिने तो अतिशय उत्कृष्ट आहे. हा पोवाडा म्हणजे मराठी भाषेचा एक बहुमोल अलंकार असून कलेच्या दृष्टिने अप्रतिम आहे. सवाई माधवरावाच्या विषण्ण मनस्थितीचे केलेले वर्णन ऐकल्यानंतर श्रोता खिन्न होतो आणि यशोदाबाईच्या आंतड्याला पीळ

पाडणाऱ्या शोकांनी त्याच्या हृदयाच्या ठिकऱ्या होत होत्या. पेशव्याच्या मृत्यूची बातमी पुणे शहरात पसरताच संपूर्ण पुण्यावर पसरलेल्या शोककळेचे वर्णन शाहीराने आपल्या पोवाड्यात केले आहे. सवाई माधवरावाला प्राणी, पशू व पक्षी यांचा अतोनात शौक होता. शाहीराने पेशव्याजवळ सात हजार उंट, वीस हजार भीमथडी घोडी, दोन हजार चांगल्या म्हैशी, विविध जातीच्या सहा हजार गाई व बारा हजार बैल एवढी प्रचंड पाळीव प्राणी संपदा असून आता त्यांच्या चारापाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे म्हटले आहे. सवाई माधवरावासारखा दुसरा कोण त्यांना भेटणार असे शाहीराला वाटते. त्याच्या शिकारखाण्यात असणाऱ्या काळवीट, हरिण, भेकर, अस्वल, ससा, मोर, मैना, कबुतर, कवडा, इत्यादी पशुपक्षीही दु:खी झाली असून ती शोकाकूल होऊन बसली आहेत असे वर्णन केले आहे.[५२]

## ३.६.८. दुसरा बाजीराव पेशवा

सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर मराठेशाहीच्या अधोगतीचा वेग वाढला. त्यावेळचा इतिहास म्हणजे कटकारस्थानांनी आणि कटांनी बरबटलेला होता. राघोबाचे बाजीराव, चिमाजी व दत्तकपुत्र अमृतराव हे तीन पुत्र पेशवाईचे वारस राहिले होते. पुणे दरबारात कारस्थाने होऊन शेवटी पेशवे पदावर दुसरा बाजीराव आरूढ झाला. त्याला पेशवाई मिळाल्याबरोबर लगेचच शाहीर होनाजी बाळा याने त्याच्यावर पोवाडा रचला. सत्ताधिश झाल्याबरोबर पुण्याच्या लोकांवर बाजीरावाने कसा प्रभाव पाडला याचे वर्णन शाहीराने पोवाड्यात केले आहे.[५३]

बाजीरावाच्या काळात मराठ्यांची राजवट कशी विनाशाकडे गेली  याचे वर्णन करणारे पोवाडे शाहीरांनी लिहिले आहेत. त्याच्या काळातील अनेक भानगडीपैकी गायकवाडांचा वकील गंगाधर शास्त्री याचा पंढरपुरात झालेला खून ही एक होय.[५४] या घटनेमुळे इंग्रज आणि बाजीराव यांच्यातील संबध बिघडत गेले आणि त्याचे पर्यवसन शेवटी खडकीच्या लढाईत झाले. ५ नोव्हें. १८१७ रोजी बाजीराव व इंग्रज यांच्यामध्ये लढाईस प्रारंभ झाला. त्यामध्ये इंग्रजानी विजय मिळविला आणि पुण्याच्या शनिवार वाड्यावरील मराठ्यांचा ध्वज उतरुन इंग्रजांचे निशाण फडकले.[५५] हे काम एल्फिन्स्टन व स्मिथ या इंग्रज अधिकाऱ्यांनी बाळाजीपंत नातू या मराठ्याकडूनच करुन घेतले. या प्रसंगावर आधारित पोवाडा शाहीर सगनभाऊने रचला. त्याची सुरुवात गंगाधर शास्त्री खून प्रकरणाने केली आहे. त्यामुळे उद्भवलेल्या खडकीच्या युध्दाचे

वर्णन शाहीराने पोवाड्यात केले आहे. पोवाड्याच्या शेवटच्या चौकामध्ये इंग्रजानी पुण्यावर मिळविलेल्या वर्चस्वाचे वर्णन केले आहे. जसे दळणाबरोबर धान्यातील किडे भरडले जातात तसे बाजीरावाच्या शिपायाबरोबर सर्वसामान्य प्रजादेखील भरडली गेल्याचे शाहीर म्हणतो.[५६]

बाजीरावाने खडकीच्या लढाईची जबाबदारी आपला सेनापती बापू गोखले आणि मराठा सरदारांवर सोपवून तो स्वत: आपल्या बायकांना घेऊन पर्वतीवर थांबला होता. तो स्वत: या लढाईत सहभागी न होता पर्वतीवरील इमारतीच्या खिडकीतून लढाईची गंमत पहात होता. इंग्रजांनी विजय मिळवून पुणे ताब्यात घेतल्यावर बाजीरावाने सासवडला पळ काढला. इंग्रजांनी त्याचा पाठलाग सुरु केल्यामुळे त्याने सातारच्या छत्रपतीलाही आपल्यासोबत घेतले होते. मराठ्यांना कोरेगावच्या लढाईत इंग्रजांपूढे माघार घ्यावी लागली.[५७] त्यानंतर बाजीरावाने कर्नाटकात पळ काढला. मात्र तिकडून ज. मन्रो सैन्यानिशी येत असल्याचे समजल्याने त्याला माघारी फिरावे लागले. सोलापूरहून पंढरपूरकडे येत असताना अष्टी येथे त्याची इंग्रज फौजेबरोबर लढाई होऊन सेनापती बापू गोखले ठार झाला. या लढाईत इंग्रज विजयी होऊन बाजीरावाला उत्तरेत पळ काढावा लागला.[५८] रत्नू केरु या शाहीराने खडकीची व अष्टीची लढाई या दोन लढायांच्या प्रसंगावर एक पोवाडा रचला आहे. त्याने पोवाड्याची सुरुवात पंढरपुरात आषाढी एकादशीच्या यात्रेला थांबलेल्या गंगाधर शास्त्री याच्या खूनाने केली आहे. त्यानंतर खडकीच्या लढाईचे आणि त्यानंतर पंढरपूर जवळ झालेल्या अष्टीच्या लढाईचे वर्णन केले आहे. मात्र या पोवाड्यात अष्टीच्या लढाईत बापू गोखले मारल्याचे चुकीचे वर्णन शाहीराने केले आहे.[५९] चंद्रभागेच्या तीरावर हनुमंताच्या पारावर बसून पोवाडा रचल्याचे शेवटी रत्नू केरु म्हणतो.

इ.स.१८१८ मध्ये पुण्यामध्ये इंग्रजांची राजवट स्थापन झाल्यावर पेशव्यांच्या वैभवशाली राजवटीचे आणि पुण्यातील प्रजेला झालेल्या दुख:चे वर्णन करणारे पोवाडे शाहीरांनी लगेचच रचलेत. असे पोवाडे रचणाऱ्यामध्ये शाहीर प्रभाकर, मोतीराम, होनाजी बाळा व सगनभाऊ यांचा समावेश होता.

## ३.६.९. पेशवाई

पेशवेकालीन शाहीरांनी पेशवे वंशाचे, त्यांच्या कर्तबगारीचे व त्यांच्या राजवटीमधील वैभवाचे वर्णन करणारे पोवाडे रचलेत. या पोवाड्यांमधून पेशवेकाळातील विविध घडामोडींचे दर्शन होते. शाहिर प्रभाकराने पेशवे वंशावर पोवाडा रचला आहे. पोवाड्याच्या पहिल्या चौकात बहिरोपंतास सोडवून आणल्याबद्दल शाहूने बाळाजी विश्वनाथास पेशवे पदाची वस्त्रे दिल्याचे वर्णन आहे.[६०] त्यानंतर पहिल्या बाजीराव पेशव्याच्या पराक्रमाचे वर्णन शाहिराने दुसऱ्या व तिसऱ्या चौकामध्ये केले आहे. तर चौथ्या चौकात नानासाहेब पेशव्याने पुण्यामध्ये केलेल्या सुधारणांचे व रमण्याचे वर्णन केले आहे. पाचव्या चौकामध्ये राघोबादादाच्या पराक्रमाचे गोडवे शाहीराने गायले आहेत आणि शेवटच्या चौकात सदाशिवराव भाऊ आणि विश्वासराव यांच्या शौर्याचा उल्लेख केलेला आहे. पेशवाईच्या अंतानंतर पेशव्यांच्या वंशजावर आलेल्या कठिण परिस्थितीचे वर्णन करणारा पोवाडा प्रभाकराने लिहला. त्यामध्ये त्याने पेशवाईचा संक्षिप्त इतिहास मांडला आहे. तसेच पेशवाईतील वैभवाचे व पेशव्यांच्या पराक्रमाचे वर्णन शाहीराने केले आहे.

पेशवेकालीन पुणे शहराचे वैभव सांगणारा पोवाडा शाहीर रामजोशी यांनी लिहिला.यामध्ये पुण्यातील सावकार व सरदारांचे वर्णन शाहीराने केले आहे. त्याचबरोबर पर्वतीस्थानाचे, अनुष्ठानांचे व रमण्याचेही वर्णन त्यामध्ये आले आहे. पुणे शहराच्या वर्णनाबरोबरच त्यांनी शुक्रवार वाड्याच्या वैभवाचे वर्णन करणारा एक पोवाडा लिहिला. हा पोवाडा श्री शंकरराव जोशी यांना सोलापूर येथे उपलब्ध झाला असून त्यांनी तो भारतीय इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिकात 'शनिवार वाड्याचे वर्णन' या नावाने छापला आहे.[६१] मात्र त्यामधील वर्णनाचा विचार करता तो शुक्रवार वाड्याचा आहे हे स्पष्ट होते. कारण पोवाड्यात गोकुळ अष्टमीच्या समारंभाचे वर्णन आले आहे. पेशवे दप्तराच्या नोंदीमध्ये रामजोशांनी गोकुळाष्टमी निमित्त कथा केल्याचा उल्लेख आहे. तिसा मयातेन शके १७३० श्रावण उर्फ जमादिलावर -१०० रु. रामजोसी सोलापूरकर याणी गोकुला अस्टमीस शुक्रवारचे वाड्यात कथा केली. सबब पारण्याचे दुसरे दिवशी त्यास भोजनास बोलावून १०० रुपये दक्षिणा दिली. छ.२३ जमादिलाखर/जमादिलावर (१६-८-१८०८).[६२] पेशवाईमध्ये गोकुळाष्टमी किती थाटामाटात साजरी केली जात होती त्याचे वर्णन पोवाड्यात करण्यात आलेले आहे. त्यामध्ये मधुर संगीताचा

आस्वाद घेत चाललेले जेवण, हरदास, कीर्तनकार व पुराणिकांचा असणारा सहभाग, सायंकाळची दिव्यांची रोशनाई व कार्यक्रमात सहभागी झालेल्या स्त्रियांचे वर्णन शाहीराने केले आहे. पेशवाईच्या अंतानंतर शाहीर प्रभाकराने पेशवाईवर एक पोवाडा रचला आहे. त्यामध्ये पेशव्यामुळे बावन्न सरदार कसे महत्पदास पोहचले याचे वर्णन केले आहे. पेशवाईमुळेच भटभिक्षुकांसह अनेकांना चांगले दिवस आले होते असे या पोवाड्यात शाहीर म्हणतो.

## ३.६.१०. सरदारावरील पोवाडे

पेशवेकाळामध्ये अनेक मराठी सरदारांना आपली कर्तबगारी सिध्द करण्याची संधी मिळाली. त्यामुळे मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. अनेक मराठी सरदारांनी आपल्या कर्तबगारीवर महाराष्ट्राच्या बाहेर मराठी साम्राज्य वाढविले. अशा सरदारांच्या पराक्रमांचे गोडवे गाणारे पोवाडे शाहीरांनी रचले. या सरदारांचा पराक्रम मराठी राज्य वाढविण्यासाठी उपयोगी पडला, मात्र कांहीवेळा या सरदारामधील वादामुळे मराठी राज्याचे मोठे नुकसान देखील झाले. मराठी सरदारामधील वादाचे व त्यामुळे झालेल्या लढाया हादेखील विषय शाहीरांना पोवाडे रचण्याकरिता मिळाला होता. पेशवेकालीन सरदारांच्या कर्तबगारीची स्तुती गाणारे पुढील पोवाडे शाहीरांनी त्यावेळी रचले.

### अ. त्रिंबकराव दाभाडे

मराठ्यांच्या इतिहासामधील दाभाडे या प्रसिध्द घराण्याकडे पुण्याजवळील तळेगावची पाटीलकी होती.[६३] या घराण्यामधील येस पाटील हा शिवाजी महाराजांकडे होता.त्याचा मुलगा खंडेराव यास राजारामाने सेनाखासकल ही पदवी दिलेली होती. शाहूच्या महाराष्ट्रातील आगमनावेळी त्याला अनेक मराठी सरदार मिळाले. त्यामध्ये खंडेराव दाभाड्याचा समावेश असल्याने त्याला सेनापती पदाची वस्त्रे दिली. खंडेरावाने खानदेश, बागलाण, वसईपासून सुरतपर्यंतचा कोकण प्रदेश शाहूस मिळवून दिला.शाहूच्या काळात बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे सेनापतीचे महत्व मागे पडत गेले. कारण खंडेराव दाभाडेचा वृध्दापकाळ आणि धाडशी, शूर व पराक्रमी बाजीराव पेशव्याचा झालेला उदय हे होते. त्यामुळे सेनापतीच्या कर्तृत्वाला विशेष वाव राहीला नव्हता. २७ सप्टेंबर १७२९ रोजी मुतखड्याच्या आजारामुळे

खंडेरावाचे निधन झाले. त्यानंतर ८ जानेवारी१७३०रोजी त्याचा ज्येष्ठ मुलगा त्रिंबकराव यास सेनापतीची व दुसरा मुलगा यशवंतराव यास सेनाखासखेलीची वस्त्रे शाहूने दिली होती.[६४] सेनापती म्हणून त्याच्यावर कर्नाटक व कोल्हापूरकरावरील स्वारीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. याचवर्षी चिमाजीने गुजराथवर स्वारी करुन गुजराथच्या सुभेदाराला नमवून त्याच्याकडून चौथाई-सरदेशमुखीचे हक्क घेतले. शाहूने दाभाड्यांना गुजराथ हे त्यांचे कार्यक्षेत्र म्हणून दिले असल्यामुळे आपल्यावर पेशव्यांनी अतिक्रमण केले असे दाभाड्यांना वाटले. त्यामुळे दाभाडे व बाजीराव पेशवे यांच्यामधील वैमनस्य वाढत गेले. शाहूने दोघांना दरबारात बोलावून दोघांमधील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्रिंबकराव शाहूच्या भेटीलाच न आल्यामुळे तणाव वाढतच गेला. भांडणाऱ्या दोन सरदारांना एकत्र आणून त्यांचा समेट घडवून आणण्यामध्ये शाहूला अपयश आले. बडोद्याजवळील दभईच्या रणमैदानात दाभाडे आणि बाजीराव पेशवे यांच्यामध्ये युध्द होऊन त्यामध्ये त्रिंबकराव गोळी लागून १एप्रिल १७३१ रोजी मारला गेला.[६५] या घटनेनंतर शाहूने त्रिंबकरावाची माता उमाबाई हिला साताऱ्यास आणून तिचे सांत्वन केले. तसेच त्रिंबकरावाचा लहान भाऊ यशवंतराव याला सेनापती पदाची वस्त्रे दिली.

त्रिंबकराव दाभाडे आणि बाजीराव पेशवे यांच्यामध्ये झालेल्या दभईच्या लढाईवर शाहीर मल्लारदास याने पोवाडा रचला आहे. या पोवाड्यामध्ये वर्णन केलेली ऐतिहासिक माहिती अतिशय अचूक आहे.[६६] पोवाड्याची सुरुवात मल्हारदासाने अतिशय रोमांचकारी केलेली आहे. त्रिंबकराव एखाद्या खवळलेल्या सिंहाप्रमाणे चवताळून पेशव्यांच्या फौजेवर तुटून पडल्याचे वर्णन केलेले आहे.[६७] शाहीराचा हा मूळ पोवाडा त्रेचाळीस चौकाचा असून नंतर त्याला कोणा दुसऱ्या शाहीराने चार चौक वाढविले आहेत. कारण त्रेचाळीसाव्या चौकाच्या शेवटी 'बोल मलारदास गाईन शूरांचे प्रेमान।' असा शाहीराने पोवाड्याचा शेवट केला आहे.

### आ. अहिल्याबाई होळकर

मराठे कालखंडात ज्या अनेक घराण्यांचा राजकीय उत्कर्ष झाला त्यापैकी एक होळकर घराणे होय. होळकरांचे पूर्वज दक्षिण भारतातील वाफगाव येथे रहात होते. त्यानंतर ते पुण्याजवळील होळ या गावी स्थायिक झाल्यामुळे त्यांचे होळकर असे नाव पडले.[६८] या घराण्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांचे वडील खंडोजी होळकर हे होळ गावच्या

पाटलाचे मदतनीस होते. मल्हाररावांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर इतिहासामध्ये आपले नाव अजरामर केले आहे. थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मल्हाररावांना माळवा प्रांत ताब्यात घेण्यासाठी पाठविले. दयाबहादूरचा पराभव करुन त्यांनी माळवा प्रांतावर मराठ्यांचा झेंडा १२ ऑक्टोबर १७३१ रोजी रोवला.[६९] माळवा प्रांत कायमस्वरुपी मराठ्यांच्या ताब्यात ठेवण्यासाठी पेशव्यांनी जहागिरी व वतनदारीची प्रथा राबविली. त्यानुसार राणोजी शिंद्यांना उजैन, आनंद पवारांना धार व जीवाजी पवारास देवास दिले. त्यानंतर २० जानेवारी १७३४ रोजी पेशव्यांनी मल्हाररावांकडे माळव्याची सत्ता सुपुर्द केली.[७०] तेंव्हापासून मल्हाररावांनी आपल्या कार्यक्षेत्रात राज्यकारभाराची चांगली घडी बसविली. मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव याचा विवाह अहिल्याबाई यांच्याबरोबर इ.स.१७३३ मध्ये लावला होता. त्या बीड जिल्ह्यातील चौंडी गावच्या माणकोजी शिंदे यांच्या कन्या होत्या.

खंडेरावाच्या व्यसनी स्वभावामुळे अहिल्याबाईनी मल्हाररावांना राज्यकारभारात चांगली मदत केली. त्यांना मालेराव हे पुत्ररत्न इ.स.१७४५ मध्ये आणि १७४८ मध्ये मुक्ता हे कन्यारत्न प्राप्त झाले होते. त्यांनी आपल्या पराक्रमी सासऱ्याच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली राज्यकारभाराचे उत्तम शिक्षण घेतले होते. कुंभेरीच्या वेढ्यावेळी १७५४ मध्ये खंडेराव मारला गेला.[७१] त्यानंतर सती जाणाऱ्या अहिल्याबाईंना प्रजेच्या कल्यानासाठी रोखण्याचे काम मल्हाररावांनी केले.[७२] आपला एकमेव पुत्र मारला गेल्यामुळे मल्हाररावांनी प्रतिज्ञा केली की, 'सुरजमल जाट याचा सिरछेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचे सार्थक नाहीतर प्राणत्याग करीन.'[७३] त्यांच्या प्रतिज्ञेमुळे घाबरलेल्या सुरजमल जाटाने जय्याप्पा शिंद्याकडे बचावाची बोलणी सुरु केली. जय्याप्पाच्या मध्यस्थीने जाट प्रकरण तीस लाखावर रघुनाथरावाने मिटविले. मात्र मल्हारराव जय्याप्पा शिंद्यावर चिडून शिंदे-होळकर तेढ वाढत गेले. राघोबाला जाट प्रकरण मुत्सद्देगिरीने हाताळता आले नाही, हेच मोठे दुर्दैव होय. मात्र रघुनाथरावाच्या पुढील मोहीमामध्येही मल्हाररावाने त्याला साथ दिली, त्यावेळी आपल्या राज्यकारभाराची जबाबदारी अहिल्याबाईवर सोपविली. पानिपतच्या अपयशाचा डाग धुवून काढण्यासाठी मल्हाररावांना सतत उत्तरेत मोहिमा काढाव्या लागल्या. त्यावेळी इंदूरचा कारभार अहिल्याबाईनी दक्षतेने पाहिला. मोहिमेवर असतानाच मल्हाररावांचे १७६६ मध्ये निधन झाले.

त्यामुळे अहिल्याबाईंवर मोठा आघात झाला. पेशव्यांनी मालेरावांसाठी सुभेदारीची वस्त्रे पाठवून दिली, ती अहिल्याबाईंच्या भरोशावर. मात्र मालेराव जास्त उधळपटटी करणारा असल्यामुळे अहिल्याबाईने त्याला वारंवार समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र एक वर्षामध्येच त्याचेही निधन झाले आणि अहिल्याबाई एकाकी पडल्या. त्यानंतर त्यांनी आपल्या उर्वरित कारकिर्दीत राज्यकारभार सांभाळून दानधर्म आणि परोपकार यामध्ये आपले आयुष्य घालविले. होळकरांचा राज्यकारभार सांभाळणाऱ्या तुकोजी होळकरावरही त्यांनी आपला वचक ठेवला होता.[७४]

अहिल्याबाईंनी आपली खाजगी संपत्ती दानधर्मासाठी खर्च केली. प्रजेला सुखी करण्यासाठी केलेल्या या दानधर्माचा त्यांनी कधी गाजावाजा केला नाही. त्यांच्या प्रेमाला, वात्सल्याला व दानधर्माला जातीधर्माच्या सीमा नव्हत्या. त्यांनी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतामध्ये अनेक मंदिरे, धर्मशाळा, नद्यांना घाट, विहिरी बांधल्या. तसेच अनेक तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अन्नछत्रे सुरु केली.[७५] त्यांच्या कार्याची साक्ष महाराष्ट्रात आजदेखील त्र्यंबकेश्वर, नंदुरबार, नाशिक, कोल्हापूर, जांब, जेजुरी, निफाड, परळी, पंढरपूर, पैठण, पुणतांबे, वेरुळ, संगमनेर, सातारा इत्यादी ठिकाणी पहावयास मिळते. त्यांनी सुरु केलेल्या पानपोया आणि अन्नछत्रांना दोनशे वर्षे होऊन गेली तरी ती आजदेखील सुरु आहेत. यावरुन त्यांच्या कार्याची कल्पना येते.

अशा या पुण्यशील, धार्मिक, पराक्रमी, मुत्स-ी, ज्ञानी, न्यायी, प्रजाहितदक्ष, परोपकारी व दानशूर अहिल्याबाईंच्या दानधर्माने प्रभावित होऊन शाहीर प्रभाकराने त्यांच्यावर पोवाडा रचला आहे. पोवाड्याची सुरुवातच कलीयुगातील श्रेष्ठ स्त्री असे अहिल्याबाईचे वर्णन केले आहे. पोवाड्यामध्ये प्रभाकराने त्यांच्या दानधर्माची मुक्त कंठाने स्तुती केली आहे.[७६]

### इ. दुसरे मल्हारराव होळकर

तुकोजी होळकरांना काशीराव, मल्हारराव, यशवंतराव व विठोजीराव असे चार पुत्र होते. यशवंतराव व विठोजीराव हे दासीपुत्र होते तर काशीराव हा ज्येष्ठ असला तरी अगदी नादान व वेडसर होता.[७७] त्यामुळे मल्हाररावास सरदारकीची वस्त्रे द्यावीत असे नाना फडणीसांना वाटत होते. मात्र दुसऱ्या बाजीराव पेशव्याला होळकर घराणे नानाच्या पक्षातून काढून आपल्या ताब्यात ठेवावयाचे होते. म्हणून त्याने नाना फडणीसाची शिफारस डावलून काशीरावास सरदारकीची

वस्त्रे दिली. मल्हारराव हा शूर व कर्तबगार असल्यामुळे स्वत:ला सरदारकी मिळावी असे त्याला वाटत होते.

काशीरावास सरदारकीची वस्त्रे मिळाल्यानंतर मल्हाररावाने यशवंतराव व विठोजीराव या बंधूंना आपल्या बाजूला घेऊन स्वत:ला होळकरांच्या दौलतीचा मालक म्हणून जाहीर केले. तसेच त्याने होळकरांच्या सरंजामी प्रदेशात जबरदस्तीने वसूल गोळा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे काशीरावाने शिंद्यांना पाच लाख रुपये देऊन मल्हाररावांना पकडण्याची जबाबदारी सोपविली. पर्वतीजवळ शिंद्यांनी बेसावध मल्हाररावाच्या फौजेवर हल्ला केला. त्यामध्ये पराक्रम गाजवून स्वत: मल्हारराव होळकर ठार झाला.[७८] हा ऐतिहासिक प्रसंग डोळ्यासमोर ठेऊन त्यावर राणू सुतार या शाहीराने पोवाडा केला. मल्हाररावाने गाजविलेल्या पराक्रमाचे व लाख्या बारगिराच्या धडपडीचे वर्णन पोवाड्यात केले आहे.[७९] पोवाड्याच्या शेवटी शाहीराने आपली ओळख सांगितली आहे.

### ई. महादजी शिंदे

इ.स.१७९४ साली महाराष्ट्रामधील भिन्न पेशातील चार सुप्रसिध्द लोकांचे निधन झाले. १२ फेब्रु.१७९४ रोजी महादजी शिंदे, १२ मार्च रोजी आनंदीबाई, १५ एप्रिल रोजी कवि मोरोपंत आणि २० जून रोजी हरिपंत फडक्यांचे निधन झाले.[८०] महादजी शिंदे हे पेशवेकालीन राजकारणातील असामान्य व्यक्तिमत्व होते. रियासतकार सरदेसाईंच्या मते, ''शिवाजी महाराजानंतर महाराज नावास शोभणारा अखिल मराठीशाहीत महादजी हा एकच पुरुष झाला यात संशय नाही.'' माधवरावाच्या मृत्यूनंतर महादजी आणि नाना फडणविस यांनी मराठेशाहीचा गाडा हाकण्याचे कार्य केले. महादजी जवळ मुत्सद्देगिरी आणि तलवारबहाद्दुरी हे दोन अतिशय चांगले गुण होते. तो स्पष्ट बोलणारा, भीडभाड न ठेवणारा व सत्याचा कैवारी होता. मृत्यसमयी त्याचे वय ६७ वर्षाचे म्हणजेच अहिल्याबाईच्या बरोबरीचे होते. त्याने आपले संपूर्ण आयुष्य श्रम, साहस व काळजीमध्ये घालविले. शेवटच्या दोन तीन महिन्यातही त्याने आपला वेळ कामकाज व शिकारीमध्ये घालविला होता. त्याचा मृत्यू १२ फेब्रु.१७९४ रोजी रात्री आठ वाजता झाला ही बातमी मॅलेटने त्याच तारखेच्या पत्राने लॉर्ड कॉर्नवॉलिसला कलकत्त्याला कळविली होती.[८१]

महादजीच्या व्यक्तिमत्वावर प्रभावित झालेल्या तीन शाहीरांचे पोवाडे उपलब्ध आहेत.त्यापैकी एक अज्ञात शाहीराचा, दुसरा शाहीर काशीरामाचा व तिसरा मल्लारीने रचलेला पोवाडा आहे.

अज्ञात शाहीराच्या महादजीच्या मूळ पोवाड्यामध्ये पाच चौक असून नंतर त्यामध्ये कोणीतरी असंबंधीत दोन चौक घुसडले आहेत.[८२] पोवाड्यामधील कांही माहिती विसंगत असली तरी सैन्यव्यवस्थेबद्दल उत्तम माहीती देणारा हा पोवाडा आहे. पेशवेकालीन सैन्यभरती, मोहिमांची तयारी, प्रवासातील अडचणी, जंगलात फिरणारे हिंस्त्र प्राणी आणि त्यांची तिरंदाजीने शिकार करणारे शिपाई यांचे मनोरंजक वर्णन शाहीराने पोवाड्यात केले आहे. सातपुड्याचा पर्वत ओलांडून फौज पुढे नेताना जंगलातील झाडे तोडून व दगड फोडून रस्ता काढावा लागल्याचे वर्णन पोवाड्यात आहे. मोहीम यशस्वी केल्याबद्दल पेशव्यांनी बक्षीस देऊन केलेल्या गौरवाचा उल्लेख पोवाड्यात आहे.[८३]

शाहीर काशीरामाने आपल्या पोवाड्याची सुरुवात महादजी शिंदे अवतारी पुरुष होता अशी केली आहे.त्याच्या सामर्थ्याचे वर्णन शाहीराने पोवाड्यात केलेले आहे.निराधार झालेला मोगल बादशहा शहा अलम याला दिलेल्या पाठबळाचे आणि बादशहाने दिलेल्या 'वकिल-इ-मुतालिक' पदवीचे वर्णन पोवाड्यात आहे.[८४]

महादजीच्या मृत्यूनंतर शाहीर मल्हारीने त्याच्या कीर्तिच्या प्रसारार्थ महादजीचा पोवाडा रचला. हा शाहीर जुन्नरच्या गोविंदराव साळी नावाच्या अतिशय प्रसिध्द शाहीराचा शिष्य असून बहिरु त्याचा साथीदार होता. हा शाहीर तुरेवाल्या पक्षाचा होता.[८५] महादजीच्या अदभूत पराक्रमाचे व त्याने उत्तरेत केलेल्या राजकारणाचे वर्णन त्याने आपल्या पोवाड्यात केले आहे. त्याबरोबरच महादजी पुण्याला परतल्यावर सवाई माधवरावांनी केलेल्या त्याच्या स्वागताचे वर्णन मल्हारीने पोवाड्यात केले आहे. तसेच पुण्यामध्ये रंग खेळण्याच्या झालेल्या कार्यक्रमाचे सुंदर वर्णनही पोवाड्यात आले आहे.[८६] पोवाड्याच्या अखेरीस महादजीच्या निधनाचे वर्णन शाहीराने केले आहे.

### उ. नाना फडणविस

मराठ्यांच्या इतिहासामधील पेशव्यांच्या भट घराण्याचे आणि फडणविसांच्या भानू घराण्याचे अतिशय जवळचे संबंध होते. भानू घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील वेळास गावचे वतनदार

होते.[८७] वेळास गाव बाणकोट खाडीच्या दक्षिण तीरावर आणि भट घराण्याचे श्रीवर्धन हे गाव उत्तर तीरावर होते. भट घराण्याकडे या प्रांताची देशमुखी असून हा प्रांत हबशांच्या ताब्यात होता. बाळाजी व जानोजी भट यांनी हबशांच्या प्रदेशातील आपले देशमुखी वतन सोडून घाटावर जाण्याचा निर्णय घेतला होता. ही गोष्ट त्यांनी भानू बंधूनांही सांगितली होती. त्यावेळी त्यांनी देखील घाटावर येण्याचा मनोदय व्यक्त केला होता. अंजनवेलच्या ठाणेदारांने भटांना अंजनवेलच्या किल्ल्यात वीस-पंचवीस दिवस अटकेत ठेवले. त्यावेळी किल्लेदाराच्या तावडीतून भट बंधूंची सुटका करण्याचे काम भानू बंधूंनी केले.[८८] त्यावेळी बाळाजीपंतानी भानू बंधूना वचन दिले की, आम्हाला भाकर मिळेल त्यातील चतकोर तरी तुम्हाला देऊ. हे वचन दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत बाळाजी विश्वनाथच्या वंशजानी पाळून भानूंच्या घराण्याला मोठ्या योग्यतेस चढविले.

स्वत:चे नशिब अजमविण्याकरीता घाटावर येताना बाळाजीने भानू बंधूनांही आपल्या बरोबर आणले. सुरुवातीला सर्वांनी सेनापती धनाजी जाधव याच्याकडे नोकरी केली. त्यानंतर बाळाजीने सचिव नारो शंकर याच्याकडे नोकरी केली. शाहूच्या महाराष्ट्रातील आगमनानंतर पेशव्यांना आपली कर्तबगारी दाखविण्याची संधी मिळाली. त्यामुळे शाहू महाराजांनी जाने. १७१४ (माघ शके १६३५) मध्ये पेशवाईची वस्त्रे दिली. त्यावेळी त्यांनी महाराजांकडून फडनविशी आपणाकडे मागून घेऊन तिची वस्त्रे हरी महादेव भानू यास दिली.[८९] तेंव्हापासून या दोन घराण्यांकडे आलेल्या दोन सत्ता मराठी राज्याच्या अखेरपर्यंत टिकून राहील्या.

फडनविसीची वस्त्रे मिळाल्यानंतर चार पाच महिन्यातच हरि महादेव मरण पावले. त्यांना पुत्रसंतान नसल्याने त्यांची फडनिशी पेशव्यांनी त्यांचा भाऊ बाळाजी महादेवास दिली. त्यावेळी ते दिल्लीच्या स्वारीवर होते. यावेळी दिल्लीच्या रहिवाशांनी मराठ्यांच्या छावनीवर हल्ला केला, त्यामध्ये बाळाजी महादेव मारला गेला. यावेळी बाळाजी विश्वनाथने दिल्लीहून चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. बाळाजी महादेवनंतर पेशव्यांनी तिसरा भानू बंधु रामजी महादेव यास फडनिशी दिली. त्यांचाही चार वर्षांनी मृत्यू झाला मात्र पेशव्यांनी भानू घराण्याकडील फडनिशी काढून न घेता ती बाबूराव रामचंद्र आणि जनार्धन बल्लाळ या लहान मुलांना दिली. आणि त्यांच्या नातेवाईकाकडून काम करुन घेतले. पुढे ती मोठी झाल्यावर नानासाहेब,

रघुनाथराव आणि सदाशिवराव भाऊ यांच्याबरोबर मोहिमांवर जाऊ लागली. रघुनाथरावाबरोबर उत्तरेच्या स्वारीवर असताना जनार्धन बल्लाळांचे निधन झाले.त्यांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी त्यांचे चिरंजीव नानास फडनविशीची वस्त्रे १७५६ मध्ये दिली.[१०] पानिपतच्या गंभीर प्रसंगातून नाना आपला जीव वाचवून परत आला होता. यानंतरच्या मराठ्यांच्या राजकारणावर नानाने आपला प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. महादजी शिंद्याकडे उत्तरेची जबाबदारी आणि स्वत:कडे त्याने पुण्याची जबाबदारी घेतली. मुत्सद्देगिरीचे राजकारण करण्यामध्ये तो यशस्वी ठरला. पेशवा माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव व बाजीरावाच्या सुरुवातीच्या काळात नानाने कारभार सांभाळला होता. त्या काळात महादजीची तलवारबहाद्दूरी व नानाची कलमबहाद्दूरी प्रसिध्द होती. त्यामुळे शाहीरांचा महादजी प्रमाणे नाना फडणवीस हा देखील पोवाड्याचा विषय ठरला. नाना फडणवीसाची महती सांगणारे पोवाडे शाहीर बाळा बहिरु आणि अज्ञात शाहिराने रचले आहेत. याशिवाय इतर शाहीरांच्या पोवाड्यामध्येही नानाची कर्तबगारी दाखविण्यात आली आहे.

शाहीर बाळा बहिरुच्या पोवाड्यात सुरुवातीलाच नानाने पेशव्यांच्या राज्याचे मोठ्या युक्तीने संवर्धन केले अशा उल्लेखाने नानाचा गौरव केला आहे. पेशव्यांच्या इतर सरदारांचे गुणगाण करीत शाहीर परत नानाने मुत्सद्देगिरीने राज्य चालविल्याचे सांगतो.[११] त्याकाळातील लोक अतिशय भाविक होते. त्यामुळे सवाई माधवराव म्हणजे परमेश्वरानेच दुष्टांचा संहार करण्यासाठी अवतार घेतला आहे असे त्यांना वाटे.[१२] पेशव्यांना ज्यावेळी वेगवेगळे खेळ खेळावे व शिकारखाने बाळगावेत असे वाटले तेंव्हा नानानी त्यांना ते उपलब्ध करुन दिले. वेगवेगळी श्वापदे, पक्षी, बंगाली मैना, बोलणारे पोपट पिंजऱ्यासह, बदके, पानकोंबडी, मोरांच्या जोड्या, हरणे, काळवीटे, चित्ते व ससे आणून दिले. पर्वतीवर खास बांधकाम करुन वाघ आणून ठेवले. महादजी शिंद्यानी उत्तरेतून गेंडे पाठवून दिले. याशिवाय वज्रमुष्टी, छडी खेळणेवाले, दांड खेळणारे व तिरंदाजी खेळणारे नियुक्त करण्यात आले होते.[१३] शाहीर आपल्या पोवाड्यातही सवाई माधवरावास कृष्णावतार होता असे म्हणतो. शिवाय त्याच्या मागण्या नानाने पूर्ण केल्याचेही तो सांगतो. पोवाड्याच्या शेवटी नाना आयुष्यभर पेशवे वंशाशी एकनिष्ट राहील्याचे सांगतो.[१४]

नाना फडणवीसांचा दुसरा पोवाडा शं. ना. जोशी यांना पुण्यामध्ये एका जुन्या वहीत सापडला. हा पोवाडा अपूर्ण असला तरी समकालीन आणि पूर्णपणे विश्वसनीय आहे.[९५] या पोवाड्यात शिंद्यांनी व परशुराम भाऊ पटवर्धनांनी नाना फडणिसाच्या पक्षपाती लोकांना कैद केल्याचे तपशिलवार वर्णन केले आहे. पोवाड्याच्या सुरुवातीला शाहीराने नानाच्या कर्तबगारीची स्तुती केली आहे.[९६] या पोवाड्यात नानाने रचलेल्या महाडच्या कारस्थानाची माहिती शाहीराने दिली आहे. त्यामध्ये नानाच्या बुध्दीसामार्थ्याची जी चमक शाहीराला दिसली तिचे सुंदर वर्णन त्याने केले आहे. असेच वर्णन शाहीर प्रभाकरानेही दुसऱ्या बाजीरावावरील पोवाड्यात नानाबाबत केले आहे.[९७]

**ऊ. बदामीच्या लढाईतील सरदार**

इ. स. १७८५ मध्ये टिपूने पेशव्यांच्या ताब्यात असणारी नरगुंद व कित्तूर ही संस्थाने जिंकून घेतली होती.[९८] नरगुंदच्या अपयशाचे खापर नानाच्या माथी फुटले होते. टिपूचा वेळीच बंदोबस्त न केल्यास मिरज प्रांतालाही धोका पोहचणार होता. त्यामुळे नानाने होळकर, पटवर्धन, रास्ते, बेहेरे वगैरे सरदारांना मोहिमेचे हुकूम सोडले. नागपूरकर भोसल्यानीही नानावर राग असताना टिपूवरील स्वारीवर पंधरा हजाराची फौज पाठविली. स्वत: नाना मुख्य फौजेनिशी कर्नाटक मोहिमेवर निघाले. निजामाची पंचवीस हजार फौज आणि मोगली फौजही मराठ्यांच्या मदतीस आली होती. नानाने इंग्रजांचीही कुमक मिळविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र टिपूबरोबर त्यांनी अगोदरच तह केला असल्यामुळे प्रत्यक्ष मदत दिली नाही. तरीदेखील नानाने त्यांचा वकील मॅलेट याला आपल्या स्वारीबरोबर घेऊन टिपूला दहशत दाखविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र नानाचा कावा टिपूने ओळखला होता.[९९] एवढी तयारी करुन टिपूच्या ताब्यातील बदामीच्या किल्यावर मराठ्यानी १ मे १७८५ रोजी हल्ला केला. तीन आठवडे चाललेल्या या संघर्षात २० मे रोजी पराक्रमाची शर्थ करुन मराठ्यांना विजय मिळाला.

बदामीच्या मोहीमेत पेशव्यांच्या सैन्याने गाजविलेल्या पराक्रमाचे गोडवे गाणारा पोवाडा शाहीर राघू याने रचला आहे. मुळातच बळकट असणाऱ्या बदामीच्या किल्याची टिपूने उत्तम मजबुती केली होती. त्यामुळे किल्ला जिंकताना सुमारे आठशे सैनिक कामास आल्याचे शाहीर

सांगतो. त्याने पोवाड्यात दिलेली ऐतिहासिक माहिती बरोबर आहे मात्र किल्लेदार हिरकणी प्याला अशी दिलेली माहिती सत्य नाही.[१००]

## ए. परशुराम भाऊ पटवर्धन

पेशवेकाळातील महत्वाचे सरदार म्हणून परशुराम भाऊ पटवर्धन ओळखले जात होते. त्यांनी बदामीच्या मोहीमेत चांगली कामगिरी बजावली होती. शाहीर राघू याने आपल्या बदामीच्या पोवाड्यात भाऊंच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.[१०१] बदामीच्या विजयानंतर परशुराम भाऊ आणि नाना दोघेही महाराष्ट्रात निघून आले. हरिपंत फडके आणि तुकोजी होळकर यांच्यावर मोहिमेची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यांच्याकडे पेशवे, भोसले व निजाम यांचे सव्वा लाख सैन्य असूनदेखील त्यांना फारसे यश मिळाले नव्हते.[१०२] उलट टिपूची थोडी सरशी होत चालली होती. त्यामुळे टिपूवर दुसरी मोहीम काढण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी इंग्रजांचीही मदत घेण्यात आली होती. इंग्रजांना स्वत: पेशवे व नानाने या मोहिमेवर जावे असे वाटत होते. मात्र नानाने परशुराम भाऊच्या नेतृत्वाखाली रास्ते, प्रतिनिधी व मेहंदळे यांच्या फौजा आणि कॅप्टन लिटलच्या हुकमतीखालील इंग्रजांच्या दोन फलटणी कर्नाटकच्या मोहिमेवर पाठविल्या. कर्नाटकच्या मोहिमेत परशुराम भाऊने चांगला पराक्रम गाजवून टिपुच्या ताब्यातील बराच प्रदेश हस्तगत केला होता. इंग्रजांची इच्छा असताना देखील नाना व मोगल सरदार दाराजंह यांच्या प्रयत्नामुळे टिपूबरोबर तह करण्यात आला. त्याने एक कोटी रुपये आणि अर्धे राज्य देण्याचे मान्य केले. त्यापैकी एक कोटी रुपये आणि चाळीस लाखाचा प्रदेश मराठ्यांना मिळाला की जो पूर्वी त्यांच्याच ताब्यात होता.

परशुराम भाऊच्या कर्नाटक स्वारीमुळे भारावलेल्या शाहीर नारो त्रिंबक याने या स्वारीवर पोवाडा रचला. पोवाड्याच्या सुरुवातीलाच परशुराम भाऊच्या पराक्रमाची खात्री असल्यामुळेच त्याच्यावर ही जबाबदारी सोपविल्याचे सांगतो. टिपूची खोड मोडण्यासाठी या मोहिमेवर भाऊची नेमणूक झाल्याची तो सांगतो.[१०३] मोहिमेच्या सुरुवातीस भाऊने धारवाडचा किल्ला जिंकून घेतला याचे रोमहर्षक वर्णन केलेले आहे. पोवाड्याच्या शेवटच्या चौकामध्ये शाहीराने पुढील काळात टिपू आणि भाऊ यांच्यामध्ये भारी युध्द होणार अशी शक्यता वर्तविली आहे. त्याअर्थी हा

पोवाडा धारवाड विजयानंतर शाहीराने लगेचच लिहिला आहे. पोवाड्याचा शेवट आपली ओळख सांगून शाहीराने केला आहे.

## ऐ. परशुरामभाऊ व कोल्हापूर

शाहूच्या आगमनानंतर मराठी राज्याच्या सातारा व कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. सातारकर शाहू व कोल्हापूरकर संभाजी यांच्यामध्ये इ.स.१७३० पर्यंत संघर्ष चालू होता. या संघर्षामध्ये शाहूने संभाजीवर इ.स.१७३० मध्ये मात केली होती. त्यामुळे शाहूला विरोध करुन कांहीच साध्य होणार नाही याची पुरेपूर कल्पना संभाजीला आली. म्हणून त्याने शाहूबरोबर १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह केला.[१०४] या तहामुळे स्वराज्यातील यादवीवर व स्वतंत्र राज्यावर शिक्कामोर्तब झाले. पुढील काळात शाहू व संभाजी यांच्या भेटी जरी होत राहिल्या तरी उभयतांनी मिळून हिंदू पदपातशाहीची वृध्दी करण्यासाठी प्रयत्न केला नाही. शाहूच्या मृत्यूनंतर सातारा व कोल्हापूर या दोन्ही गाद्यांचे एकीकरण करण्याचा नानासाहेब पेशव्याचा बेत होता. मात्र शाहूला हे एकीकरण मान्य नव्हते. त्यामुळे शाहूनंतर सातारच्या गादीवर ताराबाईचा नातू रामराजा याला गादी मिळाली. यानंतरही सातारा व कोल्हापूर यांच्यातील संबंधात सुधारणा झाली नाही. त्यामुळे पेशवे व कोल्हापूरकर यांच्यामध्ये वारंवार संघर्ष होत असे.

इ.स.१७८५-८६ मध्ये कोल्हापूरकरांनी सावंतवाडीकरांचा कांही प्रदेश व किल्ले जिंकून घेतले. सावंतवाडीकर हे सातारकर छत्रपतींच्या शिक्क्याखाली असल्यामुळे पेशव्यांनी कोल्हापूरकरांचे पारिपत्य करण्याची जबाबदारी परशुरामभाऊ पटवर्धनांवर टाकली. ही बातमी कोल्हापूरात पोहचताच त्यांनी पूर्वी भाऊंना दिलेले आळत्याचे ठाणे जबरदस्तीने घेतले. त्यामुळे भाऊनी आपला जेष्ठ पुत्र रामचंद्र आप्पा यास सैन्य देऊन आळत्यावर पाठविले. वेढा देऊन बसलेल्या रामचंद्र आप्पाचा करवीरकर महाराजांनी पराभव केला. ही बातमी परशुरामभाऊना समजताच त्यांनी पेशव्यांकडून मदत घेऊन करवीरकरांचा बिमोड केला.या संघर्षाचे वर्णन करणारा पोवाडा जिवाजी पांचाळ या शाहीराने रचला.[१०५] इ.स. १७९९ मध्ये पट्टनकुडी येथे परशुरामभाऊ व करवीरकर यांच्यात लढाई झाली. या लढाईत परशुरामभाऊचा पराभव झाला.या लढाईचे वर्णन करणारा पोवाडा शाहीर जोतीराम याने रचला.[१०६] शाहीर खेमू ओमू याने याने पट्टनकुडी व कोल्हापुरच्या लढाईचा पोवाडा रचला आहे. त्यामध्ये रामचंद्र आप्पाने

पट्टणकुडीच्या पराभवाचा बदला कसा घेतला याचे वर्णन केले आहे.[१०७] सुलताना पाटील या करवीरकराकडे असणाऱ्या शाहीराने कंपूचा पोवाडा रचला. पट्टणकुडीच्या लढाईत परशुरामभाऊ कामास आला. त्याचा बदला घेण्यासाठी रामचंद्र आप्पाने पेशवे व शिंद्याची मदत घेतली. यावेळी शिंदयांच्या पाच पलटणी किंवा 'कंपू'होते, म्हणून त्याला 'कंपूचा पोवाडा' असे म्हणतात.[१०८]

## ओ. सेखोजी आंग्रे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून मराठ्यांचा पोर्तुगीज, इंग्रज, डच इत्यादी व्यापारी सत्तांशी संबंध येऊ लागला होता. या पराकीय सत्तापासून आपल्या राज्याचे रक्षण करण्याकरिता शिवाजी महाराजांनी आरमाराची उभारणी केली होती. छत्रपति राजारामाने कान्होजी आंग्रे याला मराठी आरमाराचा प्रमुख बनविले होते. त्याचा सरखेल हा किताब देऊन गौरव केला होता. कान्होजीने मराठी आरमाराची वृध्दी करुन सागरावरील परकीय सत्तांवर वचक निर्माण केला होता. दक्षिण कोकणपट्टी त्यांच्या ताब्यात असून विजयदुर्ग हे त्यांचे प्रमुख ठाणे होते. कान्होजी आणि पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्यामधील संबंध बंधुत्वाचे होते. त्यामुळेच बाजीराव व चिमाजीअप्पा कान्होजीला आपल्या पत्रात कान्होजी काका म्हणून संबोधत असत. इ.स.१७२९ मध्ये कान्होजीच्या निधनानंतर त्याचा जेष्ठ पुत्र सेखोजी हा सरखेल झाला. त्याला सरखेल पदाची वस्त्रे छत्रपतींनी ७ ऑगष्ट १७२९ रोजी दिली. कान्होजी आंग्रेच्या निधनाची संधी साधून इंग्रजांनी चौलजवळ मराठ्यांच्या आरमारावर हल्ला केला. यावेळी कान्होजीचा मुलगा सेखोजी यांने या लढाईत इंग्रजांचा पराभव केला. त्याच्या पराक्रमावर खुष होऊन कोणी विद्वान शाहीराने या घटनेवर एक पोवाडा रचला आहे. सेखोजी आंग्रेच्या स्तुतीपर काव्य रचणाऱ्या मयुरेश शैव याने हा पोवाडा रचला असण्याची शक्यता आहे.[१०९] आरमारी शक्तीचा गर्व चढलेल्या इंग्रजांचा नक्षा उतरण्याचे कार्य सेखोजीने या युध्दात केले असे वर्णन या पोवाड्यात करण्यात आले आहे. याशिवाय सेखोजीच्या इंग्रजाबरोबरच्या युध्दाचे वर्णन करणारा दुसरा एक पोवाडा अर्धवट स्वरुपात उपलब्ध झाला आहे. तोदेखील मयुरेश शैवाने रचला असावा.[११०]

## औ. आनंदराव धुळप

इ.स. १७५६ मध्ये पेशव्यांनी तुळाजी आंग्रेचा पाडाव केल्यानंतर विजयदुर्ग येथे आपल्या प्रत्यक्ष देखरेखीखाली आरमार तयार करुन त्या ठिकाणास 'सुभा आरमार' अशी संज्ञा दिली. या आरमाराच्या मुख्य अधिकाऱ्याचा सुभेदार निस्बत सुभा असा किताब होता.[१११] इ.स.१७६४ ते १७९४ पर्यत आनंदराव या पदावर होता. इ.स. १७८३ मध्ये हैदरबरोबर इंग्रजांचे युध्द चालू होते.[११२] यावेळी इंग्रजांचा सेनापती ब्रिगेडिअर जनरल मेक्लाउड आणि इतर अधिकारी रेजर जहाजातून युध्दसामुग्री घेऊन बेदनुरकडे चालले होते. इंग्रजांनी मराठ्याबरोबर तह केल्याची माहिती धुळपांना नसल्यामुळे त्याने इंग्रजांचे जहाज आडविले. यावेळी आनंदरावाने इंग्रजावर मोठा विजय मिळवून जहाजासह अधिकाऱ्यांना विजयदुर्ग किल्ल्यावर नेले. ही बातमी त्याने पेशव्यांना कळविली तेंव्हा पेशवे त्याच्या कामगिरीवर खुश झाले. त्यांनी त्याची स्तुती करुन त्याला मानाचा पोशाख व कंठी पाठविली.[११३] आनंदरावाच्या या पराकमाचे वर्णन सांगणारा पोवाडा शाहीर भिकुबाळाने रचला आहे.[११४] हा शाहीर पुण्याचा असून त्याने तिथे हा पोवाडा लोकप्रिय केला होता.

## अं. हरबाजीराव धुळप

धुळप मंडळी सुरुवातीला आंग्रांच्या पदरी सेवा करत होते. इ.स.१७५५ - ५६ मध्ये पेशव्यांनी आंग्राविरुध्दची मोहीम काढून त्यांचा पाडाव केला. तेंव्हापासून धुळप मंडळी सरळ पेशव्यांच्या सेवेत सामील झाली. भाऊसाहेब पेशव्यांबरोबर उदगीरच्या मोहिमेवर जाण्याचा आदेश रुद्राजी धुळप व जानोजी धुळपांना देण्यात आल्याचा उल्लेख आढळतो.[११५] नारो त्र्यंबकानंतर विजयदुर्गचा आरमारी सुभा रूद्राजी धुळपाकडे होता. त्याच्यानंतर त्याचा मुलगा आनंदराव धुळप हा पेशव्यांचा विजयदुर्गच्या आरमाराचा प्रमुख होता. त्याला मदत करणारे या घराण्यात अनेक योध्दे असून त्यापैकी हरबाजीराव धुळप हा एक होय. त्याने इंग्रजाबरोबर केलेल्या लढाईचे व कोकणातील धार्मिक व आर्थिक परिस्थितीचे वर्णन शाहीर बापू गिरकराने केले आहे.[११६]

## अः. सवाई जानराव धुळप

आनंदराव धुळपाच्या कारकिर्दीत त्याला कृष्णराव, जानराव व हरबाजीराव हे तिघे चुलते मदत करीत असत.[११७] पराक्रमी हरबाजीरावास पुत्ररत्न प्राप्त झाल्यामुळे जो आनंद झाला तो कसा व्यक्त करण्यात आला याचे वर्णन शाहीर बापू गिरकराने सवाई जानराव धुळपाच्या पोवाड्यामध्ये केले आहे.[११८]

## ३.७ पोवाड्यांमधून प्रतिबिंबीत होणारे राजकीय जीवन

पेशवेकालीन पोवाड्यांमधून आपणास तत्कालीन राजकीय परिस्थितीची चांगल्याप्रकारे माहिती मिळते. शाहीर त्रिंबक साळी याने पहिल्या बाजीराव पेशव्याच्या मृत्यूचा पोवाडा रचला आहे.[११९] बाराखडीतील अद्याक्षरे घेऊन रचलेल्या या पोवाड्यात शाहीराने पेशव्याच्या मृत्यूचे भावनिक चित्रण उभे केले आहे. बाजीरावाच्या मृत्यूमुळे मराठी दौलतीचा खांब धरणीवर पडला असे वर्णन त्यामध्ये केले आहे. शाहीर दादू आणि शाहीर फिरंगु नाना या दोन शाहीरांनी शाहू महाराजांच्या मृत्यूवर दोन स्वतंत्र पोवाडे रचले आहेत. शाहीर दादूच्या पोवाड्यात सुरुवातीलाच शाहूच्या राजकीय दराऱ्याचे वर्णन शाहीराने केले आहे. त्यानंतर शाहूचा शुक्रवारचा झालेला मृत्यू आणि त्याचदिवशी योगायोगाने राजधानीती पडलेल्या दाट धुक्याचे यथार्थ वर्णन केलेले आहे. शाहीर फिरंगु नानाने शाहूच्या राज्याची तुलना रामराज्याशी केली आहे.

इ.स. १७६१चे पानिपतचे युध्द ही मराठ्यांच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण राजकीय घटना होय. मराठे आणि अहमदशहा अब्दाली यांच्यामध्ये युध्दाचे वर्णन करणारे तीन पोवाडे उपलब्ध आहेत. त्यापैकी रामा सटवा याचा पोवाडा अतिशय महत्वाचा आहे.तर सगनभाऊचा पोवाडा घटना घडल्यानंतर बऱ्याच दिवसांनी लिहिला असल्याने त्यामध्ये चुका आढळतात. तरीदेखील त्याच्या पोवाड्यात भाऊसाहेबाच्या पानिपत मोहिमेला कोणती राजकीय परिस्थिती कारणीभूत होती याचे वर्णन आढळते. शिवाय त्यावेळी पठाणांकडे साठ हजार फौज असल्याच्या उल्लेखही त्याच्याच पोवाड्यात मिळतो. रामा सटवाने आपल्या पोवाड्याची सुरुवात शाहूने नानासाहेब पेशवा व भाऊसाहेबांकडे मृत्यूपूर्वी राज्याची जबाबदारी सोपविल्याच्या घटनेने केली आहे.त्यानंतर सदाशिवराव भाऊच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे. प्रत्यक्ष पानिपतच्या मैदानावर झालेल्या संघर्षाचे रोमांचकारक वर्णन शाहीराने पोवाड्यात केले आहे.[१२०] त्यामध्ये त्याने भाऊसाहेबाला विषेश महत्व दिले असून गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहंदळे, जनकोजी शिंदे, समशेरबहा-र, विश्वासराव, मानाजी पायघुडे, इब्राहिमखान, सोनाजी भापकर इत्यादींनी केलेल्या लढाईची सविस्तर वर्णने वस्तुस्थितीची यथार्थ माहिती देतात.

परशुरामभाऊच्या कर्नाटक मोहिमेवर शाहीर नारो त्रिंबक याने रचलेल्या पोवाड्यातून त्या युध्दाचे स्पष्ट चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते.[१२१] खर्ड्याची लढाई या प्रसंगावर सर्वाधिक म्हणजे दहा पोवाडे वेगवेगळ्या शाहीरांनी रचले आहेत की ज्यामधून तत्कालिन राजकीय

परिस्थितीचे दर्शन घडते. यापैकी शाहीर प्रभाकराच्या पोवाड्यामध्ये सवाई माधवरावाच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे आणि लढाईचे वर्णन थोडक्यात केले आहे.[१२२] शाहीर आप्पा यशवंताच्या खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यात वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन केले आहे. कुशाबाच्या पोवाड्यामध्ये लढाईत सहभागी असणाऱ्या असंख्य सरदारांची नावे आहेत. अशाप्रकारे पेशवेकालीन पोवाड्यामधून राजकीय परिस्थितीचे चित्रण पहावयास मिळते.

## ३.८ पोवाड्यामधून प्रतिबिंबित होणारे सामाजिक जीवन

### ३.८.१. सतीप्रथा

पेशवेकालीन शाहीरांचा पोवाडे रचण्याचा प्रमुख उद्देश हा राजकीय होता.तरीदेखील समाजामध्ये घडणाऱ्या सामाजिक घडामोडींचे प्रतिबिंबही पोवाड्यामध्ये पडलेले आढळते. १८ व्या शतकामधील आणि १९ व्या शतकाच्या पुर्वार्धामधील सामाजिक चालीरिती आणि प्रथा यांचे वर्णनही शाहीरांनी कांही पोवाड्यामध्ये केले आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये ते लोकप्रिय झाले होते. तत्कालीन समाजामधील सतीप्रथा एक प्रमुख प्रथा होय. इ.स. १७०७ ते १७४९ ही छत्रपती शाहूची कारकीर्द होय.[१२३] त्याच्या निधनानंतर त्याची पत्नी सकवारबाई व दोन नाटकशाळा सती गेलयाचे वर्णन शाहीर दादू याने केले आहे.[१२४] फिरंगु नानाच्या शाहू महाराजांच्या मृत्यूच्या पोवाड्यामध्येही त्याच्यामागून सती गेलेल्या स्त्रियांचे वर्णन आहे.एखाद्या राज्यकर्त्याच्या निधनासमयी किती स्त्रिया सती गेलया हेही मु-ाम सांगण्यात येई. त्यामुळे त्याच्या वैभवाचे व सुकीर्तीचे अनुमान काढण्यास ते उपयोगी पडे.

माधवराव पेशवे यांच्या मृत्यूवेळी त्यांच्या पत्नी रमाबाई सती गेल्या. सती जाण्यापूर्वी रमाबाईने अंगावरील सर्व दागदागीने उतरुन तुळशी पत्राचे हार गळ्यात घातले होते. ती सती जाण्यासाठी जेंव्हा धर्मशिळेवर उभी राहिली तेंव्हा सर्व सरदारांनी तिचे दर्शन घेतले. त्यावेळी तिने प्रसाद म्हणून आपल्याकडील जडजवाहिर वाटून टाकले.[१२५] राघोबादादांना बोलावून नारायणरावांचे हात त्यांच्या हातात देऊन त्यांचा सांभाळ करण्याची विनंती केली. परशुरामपंत भाऊंना माणकांची आंगठी व रघुनाथरावांना पाचूची आंगठी दिली होती.[१२६] या घटनेवर एका अज्ञात शाहीराने पोवाडा रचला आहे. सदर पोवाडा अपूर्ण असल्यामुळे शाहीराचे नाव समजत

नाही. या पोवाड्यात माधवराव व रमाबाई यांच्या उत्तम गुणांचे वर्णन त्याने केले आहे.[१२७] पाषाणासारखा कठोर निश्चय करुन ती सती गेल्याचे वर्णन तो करतो.

पानिपतच्या तिसऱ्या युध्दामुळे मराठ्यांची प्रचंड हानी झाली. या युध्दामध्ये अनेक लहानमोठे मराठी सरदार मारले गेले. त्यामुळे अनेक स्त्रिया सती गेल्या असे वर्णन शाहीर सगनभाऊने आपल्या पाणिपतच्या पोवाड्यात केले आहे.[१२८]

## ३.८.२. नाटकशाळा

शाहूच्या आगोदरच्या काळापासून महाराष्ट्रात नाटकशाळा ठेवण्याची पध्दत प्रचलित होती. पेशवेकाळात दासींना नाटकशाळा, कुणबिनी, बटीक अशा अनेक नावांनी ओळखले जात होते. राजेरजवाडे, पेशवे, सरदार, श्रीमंत व सुखवस्तु लोकामध्ये दासी ठेवण्याची प्रथा होती. दासांपेक्षा दासींची संख्या जास्त असून दासांना पोरगे म्हणत. ज्याप्रमाणे घोडे, गाई, बैल या प्राण्यांची विक्री होई त्याप्रमाणे कुणबिनींची विक्री होत होती.[१२९] त्या प्रामाणिकपणे आपल्या धन्याची सेवा करीत असत. एखाद्या स्त्रीच्या सौंदर्यावर किंवा कलागुणांवर भाळून पुरुषाने तिला आपल्या पदरी पत्नीप्रमाणे ठेवले तर ती त्याची नाटकशाळा होय. घरातील निरनिराळ्या कामासाठी जिला ठेवले जात होते ती कुणबीन होय.[१३०] एखादी कुणबीण आवडल्यास तिचा नाटकशाळा म्हणून उल्लेख केला जातो. शाहूच्या काळापासून नाटकशाळांच्या संदर्भात एक नवी प्रथा सुरु झाली होती. मुघल सत्ताधिशांप्रमाणे त्याने जनान्याचे स्वतंत्र खाते तयार करुन त्यावर अधिकारी नेमण्यास सुरुवात केली होती. मुघलांच्या जनानखाण्यातील अधिकारी खच्ची केलेले खोजे असत त्याप्रमाणे शाहूच्या अधिकाऱ्यांना खच्ची केलेले नसे. तरीदेखील बसवंतराव कासुरडी या अधिकाऱ्याने शाहूची रक्षा विरुबाईला गुहागरला समुद्रस्नानाला घेऊन जाताना स्वत:चे खच्चीकरण करुन घेऊन शाहूची मर्जी संपादन केली होती. शाहूच्या जनानखान्यातील अनेक नाटकशाळांनी शाहूला मृत्यूपर्यंत व त्यानंतरही साथ दिली होती. अशा नाटकशाळांचे वर्णन पेशवेकालीन शाहीरांनी आपल्या पोवाड्यात रंगविले आहे. शाहीर दादू याने शाहूमहाराजांच्या मृत्यूच्या पोवाड्यामध्ये त्याची दुसरी रखेली सखू सती गेल्याचा उल्लेख केला आहे.[१३१] शाहीर शिवराम पिंपळगावकर या शाहीरानेही आपल्या नानासाहेब पेशव्याच्या पोवाड्यामध्ये गुणवंती व केशरी या नाटकशाळाचा उल्लेख केला आहे.[१३२]

मल्हारराव होळकरांना घरातील भाऊबंदकीमुळे शिंद्यांच्या सैन्याशी पुण्याजवळ पर्वतीच्या पायथ्याशी लढाई करावी लागली. या लढाईच्या प्रसंगावर शाहीर राणू सुतार याने पोवाडा रचला आहे.[१३३] या युध्दप्रसंगी मल्हाररावांची दासी त्याच्याबरोबर असून तिने मल्हाररावांना क्षणभर विश्रांतीचा सल्ला दिल्याचे शाहीर सांगतो. इंदूर संस्थानच्या बखरीमध्ये नाटकशाळा देखील लढल्याचे व मारली गेल्याचा उल्लेख आहे.[१३४]

## ३.८.३. पुत्रजन्माचा आनंद, मुंज व विवाह

पेशवेकाळात पुत्रजन्माचा आनंद मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याची प्रथा होती. मात्र मुलगी जन्माला आली तर त्याबद्दल आनंद साजरा केला जात नव्हता.[१३५] पुत्रजन्माचा आनंद ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे व्यक्त केला जात असे. राघोबादादाची पत्नी आनंदीबाईच्या पोटी बाजीराव या पुत्राचा जन्म झाला, त्यावेळी पुण्यामध्ये आनंद साजरा करण्यात आला होता. त्यावेळी बारसे, साखर वाटणे व हेलकरणीस वगैरे एक हजार रुपये खर्च करण्यात आले होते.[१३६] सवाई माधवरावाचा जन्मोत्सव हा तर पेशवेकाळात मोठ्या थाटात साजरा झालेला जन्मोत्सव होय.[१३७] सवाई माधवरावाची आई गंगाबाई हिच्या जीवाला आनंदीबाईकडून धोका असल्यामुळे तिला पुरंदर किल्ल्यावर कारभाऱ्यांनी बदोबस्तात ठेवले होते. तेथेच ती प्रसुत होऊन पुत्ररत्न जन्मास आले. त्यावेळी या पुत्राचे स्वागत करण्यासाठी गुढ्या उभ्या करण्यात आल्या. तोफांची सरबत्ती देऊन साखर वाटण्यात आली होती. अकरा दिवस मराठ्यांच्या बायका हेलकरणी होऊन बाळाला पाणी घालत होत्या. बारशाच्या प्रसंगी बारामती, सुपे, फलटण, सासवड, वाई व पुण्याजवळच्या खेड्यातील सुमारे सात आठ हजार स्त्रिया उपस्थित होत्या. त्यांचा इनाम व आहेर देऊन यथोचित सन्मान करण्यात आला होता. मातुश्री गंगाबाईस ज्यावेळी पुत्र झाला त्यावेळेस ब्राम्हणास दक्षिणा, सर्व देवदेवता व बारशे खर्च रु.७७९४-३ आणे आला होता. शाहीर खंडू संतू याने सवाई माधवरावाच्या जन्माच्या पोवाड्यात पुरंदर किल्ल्यावर सवाई माधवरावाचा जन्म झाल्याचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर हा पेशवा म्हणजे परशुरामाचा अवतार आहे असे म्हटले आहे. तत्कालीन कागदपत्रामध्येही सवाई माधवरावास देवाचा अवतार म्हटल्याचे आढळते.[१३८] शाहीरानेही सवाई माधवराव पेशव्याच्या जन्मावेळी साखर वाटून व

तोफा उडवून आनंद साजरा केल्याचा उल्लेख केला आहे. यावेळी सामान्य जनतेलाही आनंद झाला असल्यामुळे त्यांनी अंगणात सडे घातल्याचा उल्लेख केला आहे.

मुलाच्या वयाच्या सातव्या वर्षी केला जाणारा मुंज हा समारंभ अथवा संस्कार होय.याला उपनयन अथवा व्रतबंध या नावानेही ओळखले जात असून तो पेशवेकाळात रुढ होता. साधारणपणे मुलगा सात ते दहा वर्षे वयाचा झाला की हा संस्कार केला जात होता. सवाई माधवरावाची मुंज समारंभ मोठ्या थाटामाटात पार पडला होता.[१३९] या घटनेला खंडू संतू या शाहीराने आपल्या पोवाड्यात स्थान दिले आहे.[१४०] पेशवेकाळात विवाह समारंभ अतिशय थाटामाटात साजरा केला जात असे. सवाई माधवराव पेशव्याच्या विवाहाची विस्तृत माहिती पेशवा बखरीत पहावयास मिळते. विवाहामध्ये देवकस्थापना, नवरीची उष्टी हळद, आहेर समारंभ, श्रीमंत पूजन, रुखवत, आहेर, मिरवणूक, वरात, मेजवाणी व निरोप समारंभ असे प्रमुख कार्यक्रम होते.[१४१] तत्कालीन समाजावर या विवाह समारंभाचा परिणाम झाला असून खंडू संतूने आपल्या पोवाड्यात देखील विवाहाच्या थाटामाटाचे वर्णन केले आहे.[१४२]

## ३.८.४. रंगाचा समारंभ अथवा होळी

पेशवेकाळात होळीच्या अथवा शिमग्याच्या सणावेळी रंगाचा समारंभ मोठ्या आनंदात साजरा केला जात होता.[१४३] हा समारंभ कमीतकमी पाच दिवस म्हणजेच फाल्गुन पौर्णिमेपासून रंगपंचमीपर्यंत साजरा होत असे. महाराष्ट्रात होळी पेटवून शिमगा साजरा करण्याची पेशवे पूर्वकालामध्ये प्रथा होती. महादजी शिंदे यांनी हा सण उत्तरेतून महाराष्ट्रात आणल्यापासून होळीमध्ये रंगोत्सव सुरु झाला. हातात गुलाल घेऊन तो एकमेकाच्या अंगावर उडविणे किंवा पिचकारीने अंगावर रंग उडवून रंगोत्सव साजरा केला जाऊ लागला. त्यानिमित्ताने मनोरंजनाचे कार्यक्रमही साजरे होत असत.[१४४] समाजाच्या सर्व थरातील लोक आनंद व्यक्त करण्यासाठी त्यामध्ये सहभागी होत. सवाई माधवरावांच्या काळात हा समारंभ अतिशय थाटामाटात साजरा होत होता.[१४५] या समारंभाचे वर्णन करणारा पोवाडा शाहीर प्रभाकराने रचला आहे. त्यामध्ये सुरुवातीलाच शाहीर म्हणतो,

जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनि व्दापारांत।
तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आदरांत।।

या पोवाड्यामध्ये शाहीराने रंगाच्या समारंभानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांचे सुंदर वर्णन केले आहे.[१४६] त्यावेळी नाच-गाण्याचे कार्यक्रम व रंगांची उधळण याप्रसंगी मोठ्या प्रमाणात होत असल्याची माहिती मिळते. त्याबद्दल शाहीर प्रभाकर म्हणतो की रंगाचा कार्यक्रम इतका जोरदार झाला की रंगाचे पाट रस्त्यातून वाहू लागले.

## ३.९ पोवाड्यांमधून प्रतिबिंबीत होणारे आर्थिक जीवन

पेशवेकालीन पोवाड्यांमधून प्रतिबिंबीत होणाऱ्या राजकीय वा सामाजिक जीवनाच्या तुलनेत आर्थिक जीवनाबद्दल कांही पोवाड्यांमधून थोडीफार माहिती उपलब्ध होते.या काळात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे जनतेची अवस्था मोठी दयनीय होत होती. इ.स.१८०४ व इ.स.१८०५ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळे लोकांवर अन्नांन करण्याची वेळ आली होती. त्याचबरोबर असंख्य लोक अन्न न मिळाल्यामुळे रस्त्यावर मरुन पडले होते.[१४७] यावेळी पडलेल्या दुष्काळामुळे प्रजेची झालेली दयनीय अवस्था रामजोशीनी पेंढाऱ्यांचा व दुष्काळाच्या पोवाड्यामध्ये मांडली आहे. सदर पोवाड्यातील वर्णन अतिशयोक्तीचे वाटले तरी ते वास्तविक असल्याचे इतर पुराव्यांमधून स्पष्ट होते.[१४८] दुष्काळामुळे जिकडे तिकडे गुंड पुंड माजले होते की, जे प्रजेची पिळवणूक करत होते. महागाई व दुष्काळामुळे लोक हैराण होऊन गेले होते. चांगली भाजी मिळत नसल्यामुळे करडी व अंबाडीची भाजीही लोकांना आवडीने खावी लागत होती. पोवाड्याच्या शेवटी शाहीराने मुळा, दोडका, मक्याचा कंद, कांदा व जळण किती महाग झाले आहे याचे वर्णन केले आहे.[१४९] शाहीर बापू गिरकरने हरबाजीराव धुळपाचा पोवाडा रचला आहे की, ज्यामध्ये धुळपाने इंग्रजावर मिळविलेल्या विजयाचे वर्णन केले आहे त्याबरोबरच कोकणातील दुष्काळावेळी हरबाजीने दाखविलेले औदार्य सांगितले आहे.

## ३.१० पोवाड्यांमधून प्रतिबिंबीत होणारे धार्मिक जीवन

पेशवेकालीन पोवाड्यांचा मुख्य उद्देश हा जरी राजकीय परिस्थितीचे वर्णन करणे हा असला तरी कांही पोवाड्यांमधून तत्कालीन धार्मिक परिस्थितीचे व दानधर्माचे चित्रण पहावयास मिळते. यावेळचे राज्यकर्ते ब्राम्हण असल्यामुळे धार्मिक बाबींना महत्व आले होते. मराठ्यांच्या राजकारणात अहिल्ल्याबाई होळकर ही एक धार्मिक वृत्तीची, दानशूर व उत्तम राजकारणी स्त्री

म्हणून ओळखली जाते. स्नानाने देहशुध्दी, ध्यानाने मनशुध्दी व दानाने धनशुध्दी होते असे त्यांचे म्हणने होते.[१५०] त्यांनी आपली खाजगी संपत्ती मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी, अन्नछत्रासाठी व दानधर्मासाठी खर्च केली.[१५१] अन्नछत्रे चालविणे, विहीरी बांधणे व धर्मशाळा बांधण्यामध्ये त्यांचा सामाजिक व धार्मिक दृष्टिकोन होता. अन्न, पाणी व निवारा या माणसांच्या प्रमुख गरजा भागविण्यासाठी त्यांनी प्रचंड धडपड केली. माणसातील माणुसपण वाढत रहावे यासाठी त्यांनी मंदिरे व पुजाअर्चा यांना महत्व दिले. त्यांनी केलेला दानधर्म व कामे कायमस्वरुपी चालू रहावीत यासाठी आर्थिक तरतुद करुन ठेवली. त्यामुळे आज दोनशे वर्षे होऊन देखील त्यांनी सुरु केलेली कामे अद्यापही चालू आहेत.[१५२] तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड एलनबरो याने त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव केला आहे. तो एका पत्रात म्हणतो अहिल्याबाई एक सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी आणि आदर्श राज्यकर्त्या आहेत. अन्य धर्मियांचा द्वेष त्यांच्या ध्यानीमनीसुध्दा नाही. एका महाराजाच्या स्वामीनी असूनही त्या तपस्विनीप्रमाणे साध्या राहतात, शुभ्रवस्त्राखेरीज अन्य वस्त्रे त्यांना त्याज्य आहेत.अशा या आदर्श राज्यकर्तीच्या अध्यात्मिक व दानधर्माच्या कार्याचा गौरव करणारा पोवाडा समकालीन शाहीर प्रभाकराने रचला आहे.[१५३] त्यामध्ये गोरगरीबांची लग्ने लावून दिल्याचे आणि तुळस आणि बाळकृष्णाचे लग्न खऱ्या लग्नाप्रमाणे लावल्याचा उल्लेख आहे. धार्मिक तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अन्नक्षत्रे चालविल्याचा, यात्रेकरुंना विविध सुविधा पुरविल्याचा, घाट व मठ बांधल्याचा, ग्रहणकाळी गुळाच्या व सोन्या रुप्याच्या तुला केल्याचे व आपल्याबरोबर अनेकांची काशीयात्रा घडविल्याचे वर्णन केले आहे. [१५४]

शाहीर बापू गिरकरने हरबाजीराव धुळपाच्या पोवाड्यामध्ये इंग्रजावरील विजयाबरोबरच आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचीही थोडक्यात माहिती दिली आहे. त्यामध्ये राजापूरच्या गंगेचे वर्णन केले आहे.[१५५] शाहीर पोवाड्यात सांगतो की राजापूरची गंगा आल्याची बातमी समजल्यामुळे हरबाजी दर्शनासाठी दाखल होतो. मात्र प्रत्यक्षात गंगेचे आगमन झालेले नव्हते. त्यामुळे तो गायमुखाखाली बसला आणि गंगेची विनवणी करु लागला. त्यावेळी त्याला गंगा प्रसन्न होऊन वाहू लागली आणि हरबाजीसह गंगेवरील सर्व ब्राम्हणांना आनंद झाल्याचे शाहीर म्हणतो.

शाहीर म्हादू गोविंदाने मलकोजीबुवाचा पोवाडा रचला आहे.[१५६] त्यामध्ये एका महार साधुच्या अध्यात्मिक कार्याचे वर्णन केले आहे. या पोवाड्यावर वऱ्हाड प्रांतातील भाषेचा प्रभाव आहे. त्यामध्ये सुरुवातीलाच खाकीबुवा या हिंदु अवलियाचा मलकोजी शिष्य असल्याचे सांगितले आहे. आजंती या गावात बुवा कसे गेले व तिथे यात्रा कशी सुरु झाली याचेही वर्णन केले आहे. त्याचबरोबर हा बुवा कसा प्रसिध्द होत गेला आणि नवस करण्यासाठी व फेडण्यासाठी दुरदुरचे लोक येत असल्याचे,नवसांचे आणि बुवाच्या कौटूंबिक जीवनाचे वर्णन शाहीराने केले आहे.

अशाप्रकारे पेशवेकालीन मनोरंजनाच्या इतिहासामध्ये पोवाड्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. तत्कालीन पोवाड्यांनी लोकांचे मनोरंजन करण्याबरोबरच समाजामधील शौर्याला जागृत करण्याचेही कार्य केले. तरुणांच्या मनामध्ये आपल्या पुर्वजाबद्दल अभिमान निर्माण करण्यास पोवाडे उपयुक्त ठरलेत. पोवाड्यांमधील कथानकामुळे आणि ऐतिहासिक व्यक्तिंच्या वर्णनामुळे समाजाची शौर्य परंपरा कायम राखण्यास मदत झाली. शाहीरांनी पोवाड्यांमध्ये ऐतिहासिक व्यक्तिमत्वांच्या वर्णनाबरोबरच सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीचेही वर्णन केले आहे.

मराठ्यांच्या इतिहासामध्ये पोवाड्यांकडे केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून पाहिले जात नसून ऐतिहासिक घडामोडींची माहिती देणारे एक अधिकृत साधन म्हणून पाहिले जाते. म्हणूनच इतिहासाचार्य वि. का. राजवाडे पोवाड्याचे महत्व सांगताना म्हणतात की, ''पोवाडा म्हणजे इतिहासाचे अधिकृत साधन आहे. एखादी ऐतिहासिक घटना घडल्यानंतर लगेचच त्या घटनेवर पोवाडे रचुन ते संबंधित राज्यकर्त्यांसमोर आणि नंतर जनतेसमोर सादर केले जात होते. यामुळे समाजात पोवाडे जास्त लोकप्रिय झाले.'' इंग्रजी पोवाड्यांचे संशोधक प्रो. हर्ट असे सांगतात की, ''पोवाडे हे तेंव्हा उत्कृष्ट असतात जेंव्हा ते एका पिढीकडून दुसऱ्या पिडीकडे हस्तांतरीत केले जातात.'' सुरुवातीचे मराठी पोवाडे हे लिखित स्वरुपात नसून गोंधळ्यांच्या व शाहीरांच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखीक पध्दतीने हस्तांतरीत केले जात होते. कांही शाहीरांनी पोवाडे संग्रहित करुन ठेवल्यामुळेच त्यांचा उपयोग मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी झाला आहे. तथापि पोवाड्याकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहताना त्यामध्ये अनेक उणिवा आढळतात.

कारण पोवाड्याची मांडणी करताना शाहीर त्यामध्ये कलात्मकता आणण्याचा प्रयत्न करतात. तसेच त्यांच्याकडून राजकर्त्यांची प्रशंसा जादा प्रमाणात होत असते.

शाहीरांनी पोवाड्यामध्ये सामान्य व्यक्तीला स्थान दिले नसून राज्यकर्त्यांनी गाजविलेला पराक्रम आणि त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक जीवनातील घटनांना जादा महत्व दिलेले आहे. सामान्य माणसांच्या समस्यांना पोवाड्यात स्थान नसताना देखील त्यांनी मनोरंजनाचे एक साधन म्हणून पोवाड्यांचे स्वागत केले होते. राज्यकर्ते आपल्यावर खुष व्हावेत आणि त्यांच्याकडून पोवाड्याबद्दल चांगले बक्षिस मिळावे म्हणून शाहीर पोवाड्यातील वर्णन अतिरंजक करत असत.

१८व्या शतकातील व १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या शाहीरांना पोवाडे रचण्याकरिता अनेक राजकिय घटना मिळाल्या की, ज्या घटनामुळे मराठ्यांच्या इतिहासाला नवी कलाटनी मिळत होती. अशाच घटनांची निवड शाहीरांनी पोवाडे रचण्यासाठी केली. छत्रपती शाहू, पेशवे, सेनापती व  सामर्थ्यवान सरदार यांचे व्यक्तिमत्व पोवाड्यामध्ये लयबध्दरित्या मांडण्याचे कार्य शाहीरांनी केले. सामान्य जनतेला या व्यक्तिमत्वाबद्दल आदर वाटत असल्यामुळे त्यांनी पोवाड्यांचे कौतुक करण्याचे काम केले. पोवाडे जास्त लोकप्रिय होत गेल्यामुळे शाहीरांना चांगली अर्थप्राप्तीही झाली. अशाप्रकारे पेशवेकाळात पोवाडा परंपरा ही महाराष्ट्राच्या सामाजिक मनोरंजनाचे खास अंग बनले होते. तथापि महाराष्ट्रातील शाहीर पोवाड्यापेक्षा लावणी या काव्यप्रकाराकडे जास्त आकर्षित झाले. साधारणपणे १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन दशकात थरारक अथवा रोमांचकारी घटनापेक्षा शाहीरांना स्वच्छंदी काव्याची ओढ लागली होती. तरीदेखील पोवाड्याचे स्थानही त्यावेळी टिकून राहिले होते.

## ३.११. पोवाडे लोकप्रिय करणारे प्रमुख शाहीर

पेशवेकाळात उदयास आलेल्या असंख्य शाहीरांमुळे पोवाडा हे मनोरंजनाचे साधन लोकप्रिय बनले. पोवाडा गाणाऱ्या शाहीरांना राज्यकर्त्यांपुढे पोवाडा सादर करण्याची संधी मिळाली तर त्यांची लोकप्रियता जास्तच वाढत होती. कुशाबा उर्फ कुशा माळी हा पेशवेकाळातील कूटात्मक व वेदान्तपर लावण्या रचणारा प्रसिध्द शाहीर होऊन गेला. पुण्यामध्ये राहणाऱ्या खंडू संतू या शाहीराचा सवाई माधवरावाच्या जन्माचा पोवाडा अतिशय लोकप्रिय झाला

होता. सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील जंगू भिम या शाहीराचा खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा अतिशय प्रसिध्द झाला होता. त्यामध्ये लढाईवर गेलेल्या नवऱ्याने मिळविलेल्या यशाचे पत्नीच्या तोंडून केलेले वर्णन पोवाड्याची लोकप्रियता वाढविण्यास उपयोगी पडले. जनार्धन, जीवाजी पांचाळ, जोतीराम व तुळसीदास यांनी सामान्य जनतेमध्ये पोवाडा लोकप्रिय करण्याचे कार्य केले. परशराम, प्रभाकर, सगनभाऊ या तमासगिरांनीही पोवाड्याच्या विकासला हातभार लावला होता. श्रीगोंदा येथे राहणाऱ्या त्रिंबक साळी याने पहिल्या बाजीराव पेशव्यावर पोवाडा रचून तो लोकप्रिय केला होता. याशिवाय धोंडी नारायण, नारो त्रिंबक, फिरंगु नाना, बापू खंदेशी, बापू गिरकर, भिकु बाळा, मल्लारी, महादू गोविंदा, राणू सुतार, लहरी मुकुंदा, इत्यादी शाहीरांनी पोवाड्याच्या विकासाला हातभार लावला. पोवाडे रचणारे शाहीर हे सर्व जातीमधून आलेले होते. संतू म्हार हा शाहीर अस्पृश्य जातीमधून आला होता. त्यामुळे पोवाडा हा जातीबंधनाच्या बाहेर गेल्यामुळे त्याची लोकप्रियता जास्तच वाढली होती.

**संदर्भः**


**१.** प्रा. जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खं. ३ पृ.४०५

**२.** नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ.२६२

**३.** सहस्त्रबुध्दे म. ना., मराठी शाहीरी वाङ्मय, पृ. ३७-४०

**४.** कित्ता, पृ. २६१

**५.** केळकर यं. न., वाङ्मयाचा वाफा, पृ. २६९-२७१

**६.** राजवाडे वि. का., महिकावतीची बखर, पृ. ३९

**७.** चव्हाण शि. रा., पीएच. डी. प्रबंध (शिवाजी विद्यापीठ), पृ. १३५

**८.** कित्ता, पृ. १३५

**९.** कित्ता, पृ. १३५

**१०.** कित्ता, पृ. १३६

**११.** सहस्त्रबुध्दे म. ना., पूर्वोक्त, पृ.१८-२०

**१२.** कित्ता, पृ.१९

**१३.** कित्ता, पृ. १८

**१४.** केळकर, य. न. तंत कवि तथा शाहीर, पृ. ९

**१५.** जोशी, वि. कृ. लोकनाट्याची परंपरा, पृ.२५३

**१६.** नसिराबादकर ल. रा., पूर्वोक्त, पृ.२६२

**१७.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ.२४४

**१८.** प्रा. जोग रा. श्री., पूर्वोक्त, पृ. ४०६

**१९.** कित्ता, पृ. ४०६

**२०.** मराठे कृ. बा.,मराठी रंगभूमीचा पूर्वरंग, पृ. ८४

**२१.** प्रा. जोग रा. श्री., पूर्वोक्त, पृ.४०७

**२२.** डॉ. देखणे रामचंद्र, गोंधळ : परंपरा, स्वरुप आणि आविश्कार,पृ. २५, २६

**२३.** प्रा. जोग रा. श्री., पूर्वोक्त, पृ.४०७

**२४.** मराठे कृ. बा., पूर्वोक्त, पृ.८४

**२५.** केळकर य. न., ऐतिहासिक पोवाडे (मराठ्यांचा काव्यमय इतिहास), पृ.५७

**२६.** कित्ता, पृ.३४२,२४३

**२७.** कित्ता, पृ.७०

**२८.** कित्ता, पृ.९३

**२९.** कित्ता, पृ. ९६

**३०.** कित्ता, पृ.१३

**३१.** जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.),मराठी विश्वकोश, खं.१० पृ. ११०

**३२.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.१५

**३३.** कित्ता, पृ. १९

**३४.** कित्ता, पृ.२०

**३५.** कित्ता, पृ.२४

**३६.** कित्ता, पृ.११३

**३७.** कित्ता, पृ.११५

**३८.** कुलकर्णी, कुलकर्णी, देशपांडे (संपा),पेशव्यांची बखर, पृ.७

**३९.** दिघे व्ही. जी., पेशवा बाजीराम फस्ट ॲन्ड मराठा एक्सपायन्शन पृ.४

**४०.** नागोरी एस.एल., नागोरी कान्ता, मराठोंका इतिहास, पृ.१०३

**४१.** डफ जेम्स ग्रान्ड, अ हिस्टी ऑफ मराठा व्हा. १ पृ.३०७

**४२.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १११

**४३.** कित्ता, पृ. १३५

**४४.** सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खं.४ पृ.१५

**४५.** केळकर य. न.,पूर्वोक्त, पृ. १३८

**४६.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.५ पृ.२९९

**४७.** कित्ता, पृ. १४६

**४८.** कित्ता, पृ. १७८

**४९.** कित्ता, पृ. १९६

**५०.** कित्ता, पृ. २०८

**५१.** कित्ता, पृ. २१२

**५२.** कित्ता, पृ. २४३

**५३.** कित्ता, पृ. २४८,२४९

**५४.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.८ पृ.४२३, ४२४

**५५.** कित्ता, खं.८ पृ.५१६

**५६.** केळकर य. न., पूर्वोक्त,, पृ. २८६

**५७.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त,खं.८ पृ.५१७ - ५२०

**५८.** कित्ता, खं.८ पृ.५२२, ५२३

**५९.** केळकर य.न., पूर्वोक्त,पृ. २९१

**६०.** कित्ता, पृ. ३०४

**६१.** कित्ता, पृ. ४१५

**६२.** कित्ता, पृ. ४१६

**६३.** प्रा. कुलकर्णी म. रा., महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणी, पृ.५

**६४.** सरदेसाई गो.स., पूर्वोक्त,खं.३ पृ.३७०

**६५.** सरदेसाई गो.स.,पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं. १२ पत्र ४६

**६६.** केळकर य. न., पूर्वोक्त,पृ. १००

**६७.** कित्ता, पृ. १०८

**६८.** जहागिरदार विजया, तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, पृ. ६

**६९.** कित्ता, पृ. ५

**७०.** कित्ता, पृ. ९

**७१.** प्रा. कामतीकर प्रकाश (संपा.), भाऊसाहेबाची बखर (कृष्णाजी शामरावकृत), पृ.३

**७२.** कित्ता, पृ. ३

**७३.** जहागिरदार विजया, उपरोक्त पृ. १९

**७४.** कित्ता, पृ. ५७, ५८

**७५.** कित्ता, पृ. ६७ ते ७१

**७६.** केळकर य. न. उपरोक्त, पृ. ४६५,४६६

**७७.** कित्ता, पृ. २५०

**७८.** सरदेसाई गो. स., म. रि., खं.८ पृ. ६८

**७९.** केळकर य. न., पूर्वोक्त,पृ. २५१

**८०.** सरदेसाई गो.स., पूर्वोक्त, खं.७ पृ. ३९३

**८१.** कित्ता, खं.७ पृ.३९५

**८२.** केळकर य. न., पूर्वोक्त,पृ. ३११

**८३.** कित्ता, पृ. ३१६

**८४.** खानोलकर गं. दे., मराठी वाङ्मयकोश, खं.१ मराठी ग्रंथकार पृ.२३२

**८५.** केळकर य. न. पूर्वोक्त,पृ. ३९१

**८६.** कित्ता, पृ. ३९७

**८७.** खरे वा. वा., नाना फडनवीस यांचे चरित्र, पृ. १

**८८.** कित्ता, पृ.२

**८९.** कित्ता, पृ.३

**९०.** कित्ता, पृ. ६

**९१.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.३१८

**९२.** खरे वा.वा., पूर्वोक्त, पृ.८०

**९३.** कित्ता, पृ. ८१

**९४.** केळकर य. न., पूर्वोक्त,पृ. ३१९

**९५.** कित्ता, पृ. ३७९

**९६.** कित्ता, पृ. ३८०

**९७.** कित्ता, पृ. २९२

**९८.** कित्ता, पृ. १६७

**९९.** खरे वा. वा., पूर्वोक्त, पृ.८८, ८९

**१००.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १६७

**१०१.** खरे वा. वा., पूर्वोक्त,पृ.८५, ८६

**१०२.** कित्ता, पृ.८७

**१०३.** केळकर य. न. पूर्वोक्त, पृ. १६९

**१०४.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३ पृ.३५८, ३५९

**१०५.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. ३२१

**१०६.** कित्ता, पृ. २५५-२५९

**१०७.** कित्ता, पृ.२६०-२६१

**१०८.** खानोलकर गं. दे., पूर्वोक्त, पृ.४११

**१०९.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.३५०.

**११०.** कित्ता, पृ.३६०

**१११.** केळकर य. न., पूर्वोक्त,पृ.३२४

**११२.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त,खं.७ पृ.२५३ - २५८

**११३.** भा. इति. सं. मं. अहवाल, शके १८३३ पृ.१२०, १२१

**११४.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.३२६, ३२७

**११५.** सरदेसाई गो. स., पे. द. खं.४४ पृ.९९

**११६.** केळकर य. न. पूर्वोक्त, पृ.४६९, ४७०

**११७.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३८ पृ.१३१

**११८.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. ४७२

**११९.** कित्ता, पृ.१११

**१२०.** कित्ता, पृ. १३१ -१३३

**१२१.** कित्ता, पृ. १६९ -१७०

**१२२.** कित्ता, पृ. १७८

**१२३.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४ पृ.१७१

**१२४.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. ११२,११३

**१२५.** भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. २३३

**१२६.** प्रा.आपटे, प्रा. ओतूरकर (संपा), महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, पत्र.१५२

**१२७.** केळकर ,य. न. पूर्वोक्त, पृ. १४३ -१४५

**१२८.** कित्ता, पृ. १२८

**१२९.** भावे वा. कृ. पूर्वोक्त, पृ.२४१

**१३०.** डॉ.शिरगावकर वर्षा, पेशव्यांचे विलासी जीवन, पृ.३०

**१३१.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. ११३

**१३२.** कित्ता, पृ.१४१

**१३३.** कित्ता, पृ. २५१

**१३४.** कित्ता, पृ. २५१

**१३५.** डॉ. गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.१३०

**१३६.** कित्ता, पृ.१३०

**१३७.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं५ पृ.३६६

**१३८.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १६२

**१३९.** कुलकर्णी, कुलकर्णी व देशपांडे (संपा.), पूर्वोक्त, पृ.८८

**१४०.** केळकर य.न., पूर्वोक्त, पृ. १६३

**१४१.** कुलकर्णी, कुलकर्णी व देशपांडे (संपा.),पूर्वोक्त, पृ.८८ - ९६

**१४२.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १६३

**१४३.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.२८८

**१४४.** कित्ता, पृ.२८६

**१४५.** कुलकर्णी, कुलकर्णी व देशपांडे (संपा.), पूर्वोक्त, पृ.११८ -१२२

**१४६.** केळकर य.न., पूर्वोक्त, पृ. १७४,१७५

**१४७.** कित्ता, पृ.२७३

**१४८.** कित्ता, पृ. २७३

**१४९.** कित्ता, पृ. २७९

**१५०.** जहागीरदार विजया, तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, पृ. ६७

**१५१.** कित्ता, पृ. ६१ - ७१

**१५२.** कित्ता, पृ. ७१

**१५३.** केळकर य. न. पूर्वोक्त, पृ. ४६५,४६६

**१५४.** कित्ता, पृ. ४६४

**१५५.** कित्ता, पृ. ४७०

**१५६.** कित्ता, पृ.४८५ - ४८७

प्रकरण

# ४थे

# तमाशा-नव्या मनोरंजन साधनाचा उदय व विकास

४.१ प्रस्तावना

४.२ तमाशाचा उगम

४.३ तमाशाचा विकास

४.४ पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप

४.५ पेशवेकालीन तमाशाची प्रमुख अंगे

४.६ लावण्यांची वैशिष्ट्ये

४.७ पेशवेकालीन लावणीमधील विविध विषय

४.८ तमाशाच्या विकासामधील प्रमुख शाहिरांचे योगदान

## *प्रकरण ४ थे*

# तमाशा-नव्या मनोरंजन साधनाचा उदय व विकास

### ४.१ प्रस्तावना

पेशवेकाळात लोकांच्या मनोरंजनाच्या रुचीमध्ये बदल होत चालला होता.त्यामुळे मनोरंजनाची नवनवीन साधने उदयाला येत होती. पारंपरिक व अध्यात्मिक मनोरंजनाकडून लोकांचा शाहीरांच्या रोमांचकारी व स्वच्छंदी मनोरंजनाकडे कल झुकला होता. मराठी माणसाचे तत्कालीन शाहीरांच्या पोवाड्यांनी रोमांचकारी मनोरंजन आणि तमाशाने स्वच्छंदी मनोरंजन करण्याचे काम केले. पेशवे काळाच्या उत्तरार्धात तमाशाचा उदय व विकास झाला. तमाशाच्या कार्यक्रमाचे आयोजन होळीच्या सणावेळी, गणपतीच्या उत्सवकाळात आणि ग्रामदेवतांच्या यात्रा अथवा उत्सवप्रसंगी प्रामुख्याने केले जात होते. सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन करणारा तमाशा हा कलाप्रकार असल्यामुळे त्याला जास्त लोकप्रियता मिळत गेली. महाराष्ट्रामध्ये कुलाचार पाळण्यासाठी गोंधळ आणि वाघ्यामुरळीच्या जागरणचा कार्यक्रम करण्याची परंपरा आहे.या कार्यक्रमाबद्दल मराठी माणसाच्या मनामध्ये आत्मियतेची भावना आहे. या कलाप्रकारातील कांही महत्वाची तत्वे स्वीकारुन आणि त्यामध्ये कांही नव्या घटकांची भर घालून तमाशा हा मनोरंजन प्रकार तयार झाला आहे. पेशवेकालीन तमाशात गण, गौळण, लावणी, भेदिक कवने आणि मुजरा अशी पाच अंगे सादर केली जात होती.[१] ज्याप्रमाणे गोंधळ, जागरण व दशावतार या कलाप्रकाराप्रमाणे पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग असतात त्याप्रमाणे पेशवेकालीन तमाशाचे दोन भाग नसून तो एकाच भागात सादर केला जात होता. तरी देखील हा कार्यक्रम दीर्घकाळ चालत असे. पेशवाईनंतरच्या तमाशामध्ये (आधुनिक तमाशात) पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग होते. उत्तररंगात 'वग' हा नाटकासारखा भाग सादर केला जातो. पेशवेकालीन तमाशामध्ये नृत्य, नाट्य, संगीत व अभिनय याला अतिशय महत्व होते.

पेशवेकालीन तमाशाला ‘ढोलकीचा तमाशा’ किंवा ‘नाच्या पोऱ्याचा तमाशा’ असे म्हटले जात होते. कवने रचणारा शाहीर हाच या तमाशा फडाचा मालक असे. त्यावेळी तमाशामध्ये नाचगाण्याला विशेष प्राधान्य दिले जात होते. सरदार, सोंगाड्या आणि नाच्या या तिघांवर तमाशाचे यश अवलंबून होते. सुरुवातीच्या काळात नाच्याची भूमिका पुरुष करत होता.पेशवाईच्या अखेरच्या काळात नाच्याऐवजी नाचीची म्हणजेच स्त्री पात्राची योजना करण्यात आली. प्राचीन काळापासून भारतीय लोकांच्या जीवनात धर्म या प्रबळ प्रेरणेचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे विविध कलाप्रकारावरही धर्मप्रेरणेचा प्रभाव जाणविल्याशिवाय रहात नाही. त्यामुळे तमाशा या मनोरंजनाच्या कलाप्रकारावरही धर्मप्रेरणेचा प्रभाव निर्माण झालेला होता. जसे भारतीय परंपरेतील नाटकाची सुरुवात ईश्वरवंदनपर नांदीने होते, त्याप्रमाणे तमाशाची सुरुवातही गण गाऊन  केली जात असे. असा गण गाण्याची प्रथा गोंधळामध्ये होती. गणानंतर गौळणी सादर केल्या जात होत्या. संतांच्या गौळणी आणि पेशवेकालीन शाहीरांनी तमाशासाठी रचलेल्या गौळणी यामध्ये फरक होता. गौळणीनंतर तमाशात सादर होणारा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे लावणी हा होय. दिर्घकाळ चालणाऱ्या या भागामध्ये वेगवेगळ्या विषयाच्या लावण्यांचे गायन व नाच्याचा नाच यामुळे या कार्यक्रमाला चांगला रंग चढत असे. तमाशात आलेले सोंगाड्या हे पात्र यापूर्वीच्या कोणत्याही कलाप्रकारात आढळत नाही. लावण्यांच्या सादरीकरणानंतर भेदिक कवने सादर केली जात होती. या भागामध्ये शिवपक्ष व शक्तीपक्ष यांच्यामध्ये चांगलाच तात्विक वाद होऊन कार्यक्रम रंगतदार होत असे. तमाशाच्या अखेरच्या भागात मुजरा गाऊन कार्यक्रमाचा समारोप होत असे.

पेशवेकाळाचा उत्तरार्ध हा तमाशाच्या भरभराटीचा काळ होय. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तर तमाशाने लोकप्रियतेची परमोच्च सीमा गाठली होती. राजदरबारी यावेळी जे तमाशांचे कार्यक्रम झालेत ते होळीच्या सणावेळी. या सणामुळे तमाशाला राजदरबारात प्रवेश आणि प्रतिष्ठा मिळाली. राजदरबारात तमाशाला प्रतिष्ठा मिळाल्याने सामान्य जनतादेखील या मनोरंजन प्रकाराकडे जास्त आकर्षित झाली.

## ४.२ तमाशाचा उगम

'तमाशा' ही संकल्पना मुळची पर्शियन आहे की, ज्याचा अर्थ प्रदर्शन अथवा सामान्य ग्रामीण नाटक असा होतो.[२] ही पध्दत प्रथम पर्शियनांच्याकडून उर्दुमध्ये घेण्यात आली आणि त्यानंतर ती मराठीमध्ये आली. उर्दूत आणि पर्शियन भाषेत तिचा अर्थ मौजेचे, आनंद देणारे किंवा आश्चर्यकारक दृश्य असा आहे.[३] या संकल्पनेचा प्रथम उल्लेख एकनाथांच्या भारुडामध्ये आढळतो. त्यांनी मनोरंजन करणाऱ्या सर्व कलाप्रकारांवर भारूडे लिहिली. मात्र त्यांचे तमाशा या प्रकारावर एकही भारुड नाही. त्यांच्या बाजेगारी या भारूडात 'दुनिया में बडा बडा तमाशा, बडे बडे हुन्नेर लगे'[४] असे लिहिले असले तरी तमाशावर मात्र भारुड नाही. यावरुन एकनाथांच्या काळापर्यंत तमाशा नावाचा मनोरंजनाचा प्रकार अथवा स्वंतत्र खेळ अस्तित्वात नव्हता. तमाशाच्या उदयाबाबत दोन विचारप्रवाह महत्वाचे मानले जातात. वि. कृ. जोशींना तमाशा खास मराठी मातीतून जन्मास आला असे वाटते तर पु. गो. काणेकरासारख्या कांही विद्वानांना तमाशा हा इस्लामी संस्कृतीची फलश्रृती वाटते.

पेशवेकाळात 'तमाशा' हा शब्दप्रयोग प्रथम आढळत असला तरी त्यापूर्वीही महाराष्ट्रात तमाशासारखा मनोरंजनाचा प्रकार प्रचलीत होता. त्याला 'गंमत' या नावाने ओळखले जात असून गावच्या जत्रा व सणांच्या निमित्ताने तो सादर केला जात असे. 'गंमत' हा मनोरंजन प्रकार पुढे 'खेळ-तमाशा' या नावाने ओळखला जाऊ लागला.[५] ज्ञानदेवांच्या काळातही या कार्यक्रमासाठी गावकीच्या उत्पन्नातून 'देकार' नावाची देणगी बाजूला काढून ठेवली जात होती.[६] खेळ-तमाशे करणाऱ्याच्या यादीमध्ये कोल्हाटणी, अस्वलवाले, दरवेशी, बहुरुपी, वासुदेव, पिंगळे, हिजडे इत्यादिंचा समावेश होता. याशिवाय गावातील बारा बलुतेदारांनाही होळीच्या सणावेळी मनोरंजनाचा खेळ करावा लागत होता. मात्र त्यांना त्याब-ल 'देकार' मिळत नव्हता. फक्त बाहेरुन आलेल्या गंमतवाल्यांनाच 'देकार' मिळत होता. गावकीच्या खेळ-तमाशाबाबत प्रबोधनकार ठाकरे लिहतात, ''गावकीच्या खेळ-तमाशात सगळ्या बलुत्यांनी भाग घेतला पाहिजे. त्यांत स्पृश्यास्पृश्य किंवा हिंदू-मुसलमान असे भेद मुळीच नसत. नाच्या पोऱ्या महाराचा. न्हाव्याने तेल लावून त्याचा 'चेहरा' नि रंग-रंगोटी करावी. कुंभाराने हिलाल धरावयाचा, तेल्याच्या हातात तेलाची बुधली असायची. सुतार डफ किंवा कडे वाजवायचा. गावातील बकरी कापणारा मुलाणा (मुसलमान)

ढोलकी वाजवायचा. गुरव सोंगाड्या, परीट तुणतुणेंवाला. दोन-तीन लोहार 'री' ओढणारे (जी जी म्हणणारे) त्यांनीच झांज वाजवायचा. कवने रचून देणारे अनेक जातीचे असत त्यात कित्येक ब्राम्हणही असत. आपली कवने ठसदार म्हणून दाखवायला तेही खेळकऱ्यांत सामील व्हायचे. देशमुख, इनामदार, हुजारदार, पाटील हे इतमामांत चावडीवर बसून लोकांसह खेळ पहात. यांत नऊ रसांचा भरपूर परिपोष आढळायचा. विडंबनाच्या तडाख्यातून गावचा भिक्षुक भट जसा सुटावयाचा नाही, तसा वेसकर-महार नि महारीणहि सुटावयाची नाही. देशमुख-पाटील चुकायचे नाहीत.''[७] पेशवाई पूर्वी तमाशा होता हे सांगताना वि. कृ. जोशी म्हणतात की, ''पेशवाईत नावारुपास आलेला 'तमाशा' हा एकाएकी उदयास आला, असे नसून पेशवाईच्या आधिपासूनच प्रचलीत असलेल्या खेळ व गंमत या प्रकारातून त्याचा विकास झाला. पेशवाईत तमाशाची उत्पत्ती झाली असे नव्हे तर त्याचा उत्कर्ष झाला.''[८]

तमाशाचा उदय ही इस्लामी संस्कृतीची फलशृती आहे असे दुसऱ्या विचारप्रवाहाच्या विद्वानांना वाटते. त्यांच्या मते 'तमाशा' ही संस्था आणि तिचे शिल्पकार म्हणजे 'शाहीर' ही दोन्ही नावे इस्लामी असल्यामुळे त्यांनीच तमाशा महाराष्ट्रात आणला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मुघल सम्राट औरंगजेब मराठ्यांची सत्ता संपविण्याचा चंग बांधून महाराष्ट्रामध्ये आला होता. त्यावेळी सत्तावीस वर्षे त्याचा तळ मराठी मुलखात पडला होता. अकबराने मोठ्या प्रमाणात साम्राज्यविस्तार केल्यामुळे शहाजहानच्या काळात मुघल सैन्यात ऐषआराम व विलास वाढला होता. औरंगजेबाच्या काळात तर त्यांच्या सुखासीन वृत्तीला ऊत आला होता. अशावेळी दीर्घकाळ महाराष्ट्रात राहिलेल्या त्याच्या सैनिकांना त्यांच्या घराची व कुटूंबाची आठवण होऊ नये म्हणून मन रमविण्यासाठी त्यांना करमणुकीची गरज होती. म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील गोंधळी, डौरी, कोल्हाटी, डुगडुगे, महार या जातीच्या कलावंत मंडळीना त्यांनी आश्रय दिला आणि त्यांचे ताफे उभे केले. त्यांच्याकडे असणारी कला त्यांना स्वच्छंदी शैलीमध्ये सादर करण्यास सांगितले. उत्तरेकडील नायकिणींच्या नाचगाण्याचा छंद असणाऱ्या या सैनिकांना त्यापध्दतीच्याच मनोरंजनाची आवश्यकता होती. त्यांची ही गरज मराठी कलाकारांनी पूर्ण केली. त्यामुळे स्वच्छंदी मनोरंजनाचा तमाशा नावाचा नवा कलाप्रकार महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात उदयास आला असे नामदेव व्हटकर म्हणतात.[९]

तमाशाचा उदय मुघल सैन्याच्या तळावर झाला असे सांगणाऱ्या व्हटकरांना त्यासंबंधीचा अस्सल दाखला अथवा पुरावा देता आलेला नाही. त्यांनी सांगितलेला तमाशाचा उगम हा केवळ काल्पनिक वाटतो. वि.कृ जोशी यांनी मांडलेल्या विचाराप्रमाणे तमाशाचा उगम हा मराठी मातीतच झाला आहे. पेशवेकाळापूर्वी प्रचलीत असणाऱ्या 'खेळ-तमाशा' या प्रकारातून तमाशा विकसित झाला. महाराष्ट्रात त्यावेळी विविध प्रकारच्या लोककला सादर करणाऱ्या लोकांचे तमाशाचा उदय घडवून आणण्यामध्ये मोठे योगदान आहे. त्यामध्ये गोंधळी, वाघ्यामुरळी, डौरी, कोल्हाटी, भराडी इत्यादींचा समावेश होता.तमाशा आणि शाहीर हे शब्द फक्त परकीय आहेत, मात्र हा मनोरंजनाचा प्रकार पूर्णपणे मराठी आहे. तमाशाला परिणत स्वरुप हे पेशवे काळातच लाभले यात कांही संदेह नाही.

## ४.३ तमाशाचा विकास

सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन करणारा तमाशा हा प्रकार उदयास आणण्यामध्ये पेशवेकालीन राज्यकर्त्यांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. छत्रपती शाहूला नृत्याचे अतिशय वेड होते. इ.स.१६८९ ते १७०७ या कालखंडात जेंव्हा तो मोंगलांच्या कैदेत होता तेंव्हा त्याच्यावर नृत्याचा जबरदस्त प्रभाव पडला होता. त्यामुळेच त्याने चांगल्या नृत्य करणाऱ्या मुली साताऱ्याला राजवाड्यात पाठविण्याबाबत आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले होते.[१०] नानासाहेब पेशव्याने तर लक्ष्मण नावाच्या सरदारास औरंगाबादला पाठवून औरंगाबादच्या नृत्यमंडळींना राजधानीत बोलावून घेतले.[११] छत्रपती रामराजाच्या पुणे भेटीप्रसंगी इ.स. १७७२ मध्ये नृत्य करणाऱ्या नर्तिका चंदा, आनंदी, गुलाब व मीरा यांच्या नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.[१२] अशाप्रकारे नृत्यगायनाला हळूहळू महत्व येत गेल्यामुळे दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळापर्यंत तमाशा परंपरेचा सुनिश्चित असा ढाचा तयार झाला होता. श्रीमंतांचे मनोरंजन करण्यासाठी जशा नृत्य करणाऱ्या कलावंतिणी किंवा नाईकिणी उपलब्ध केल्या जात होत्या तशा तमाशामध्ये काम करण्यासाठी महाराष्ट्रात स्त्रिया मिळत नव्हत्या.त्यामुळे सुंदर व गोड गळ्याचा मुलगा तमाशामध्ये नाच्या म्हणून काम करत असे. होळीच्या सणावेळी सरकार दरबारात आणि वर्षभर गावोगावी फिरुन तमासगिर आपली कला सादर करत होते. त्यावेळच्या

तमासगिरांना हरदासाइतका समाजामध्ये बहुमान मिळत नव्हता. तरीदेखील सामान्य लोकांचे मनोरंजन करणारे तमाशाचे अनेक फड यावेळी उदयास आले होते. शिमग्याच्या सणाचे पाच दिवस हे तमासगिरांना भरपूर कमाई करुन देणारे दिवस होते. शिमगा हा ख्याली-खुशालीचा, नाचरंगाचा आणि बिभत्स शृंगाराचा सण म्हणून साजरा केला जात होता. त्यावेळी समाजाच्या सर्वच थरातील लोकांनी या सणात जणू धर्माज्ञाच समजून सहभागी झाले पाहिजे अशी रुढी होती.अशा शिमग्याच्या सणामध्ये तमासगिरांना अतिशय मानाचे स्थान दिले जात होते. पेशव्यांच्या शनिवारवाड्यामध्ये तर यावेळी महाराष्ट्रातील अनेक नामांकित कलावंत, शाहीर, तमासगीर, कसबिणी, कलावंतिणी, नाचे आपली हजेरी लावून गुणाप्रमाणे बक्षिस मिळवत होते.त्यामुळे शिमग्याचा सण म्हणजे पुण्यातील लोकांना मनोरंजनाची चांगली मेजवानी होती. पेशवे दप्तरामध्ये शिमग्याच्या सणावेळी तमासगिरांना दिलेल्या बिदागी वरुन कोणकोणत्या कलाकारांना आपली कला दरबारात सादर करण्याची संधी मिळाली होती याची माहिती मिळते ती पुढीलप्रमाणे-[१३]

**१. इ.स. १७६८-६९**

तिस्सासितैन राजमंडळ स्वारी पंतप्रधान खर्च खेरीज मुशाहीरा सिमगाकर्च पोतापैकी

छ.२०

रोज वाड्यात खेळ केला त्यास इनाम रसानगी चिठ्ठी रुपये ७.सिदू राऊळ शाहीर ५ संतापा गवळी शाहीर (होनाजीचा आजा)

२० बाळा नाचणार

**२. इ.स.१७७०**

सिमगाखर्च माहेजिल्हेज

७ रु.देणे सिदू राऊळ शाहीर शिमग्याचा वाड्यात खेळ केला सबब इनामतर्फे खुद्द

**३. इ.स.१७७१**

७ रु.सटवा न्हावी.हल्ली वस्ती पुणे याणे सालमजुरी सिमग्यात राधेचे सोंग घेतले सबब.

**४. इ.स.१७८३-८४** मध्ये खालील कलाकारांनी आपली कला सादर केल्याबद्दल त्यांना बिदागी देण्यात आली होती.

| | |
|---|---|
| १२ रु. राणू शिंपी पेठ शुक्रवार शहर पुणे | १२ रु. सिदू राऊळ |
| १२ रु. रामा गवंड्या | १० रु. संतू बिडकर |
| २० रु. गोविंद भराडी | १५ रु. मानसिंग जोहरी |
| २० रु. दादू गोपाळ वगैरे वानवडीकर | १० रु. गर्भ्या पुणकर |
| २० रु. गोविंदा इंदुलकर वगैरे सोंगडी | १० रु. गर्भ्या पुणकर |
| २० रु. भवानी बाबाजी चांबळीकर | १० रु. बापूजी शिंपी |
| २० रु. भिक्या जंगम आहिरेकर | रविवार पेठ |

**५. इ.स.१७८४-८५**

१५ रु. धोंडी शंकर

१० रु. लहरी मुकुंदा

१० रु. होन्या गवळी

**६. इ.स.१७९१-९२** मध्ये तमासगिरांना देण्यात आलेली बिदागी पुढीलप्रमाणे-

१० रु.गोविंदा भराडी, १० रु. गिरी विश्वनाथ, १५ रु. बाळा ब्राम्हण, १५ रु. चाकणकर, १० रु. कर्नाटकी, ८ रु. गोविंदा श्रीगोंदेकर, १२ रु. राणोजी शिंपी, १५ रु. मानसिंग जोहरी, १५ रु. हरि माहादू, १२ रु. सिदू राऊळ, १० रु.गोविंद इंदूलकर, १० रु. बापू शिंपी, १५ रु. भवानी बाबाजी,१० रु.सिदू बेलसकर,१० रु. संतू वाणी,१२ रु. महादू गुराखी, १० रु. बाळा बहिरु, राणू बाळ्या, ८ रु.तुळ्या सोंगाड्या, १५ रु. होनाजी गवळी, १० रु. रामा गवंड्या, गर्ग्या, १० रु. लहरी, १० रु. सुभाना राऊळ,१० रु. गंगू पोट्या, १० रु. धोंडी सिंपी, १० रु. गंगू भोरकर, ८ रु. मोघ्या, ८ रु. सदाशिव पेठकर, १० रु.सेवगावकर, १० रु. भवई, १० रु. धावजी परीट, मुकुंदा , जाजती आले ते.

२० रु. बाळ्या धोंड्या, १५ रु.जागेसरी गोसावी, १० रु.भोरकर, १० रु.हरीसिंग, ८ रु.नारु बापू सिंपी, १० मानकू मैराळा या रोख देणग्याबरोबरच त्यांना कापडही देण्यात आले होते.

**७. दिनांक २५/१/१७९२** रोजीच्या एका नोंदीमध्ये तमाशा कलावंतांना मानाचा पोशाख दिल्याची नोंद आहे.[१४] पोशाख मिळाल्यामध्ये मानसिंग जोहरी, गोविंदा इंदुलकर, बापू सिंधी, सुभाना राऊळ, सिदू राऊळ, भवानी बाबाजी, राणोजी सिंपी, बालाजी केलकर, संतू वाणी, हरि माहादू, सिदू बेलसकर, राणू बेल्या, माहादू गुराखी, तुल्या सोंगाडी, बाळा बहिरु, होना गवली, रामा गवंडी, गंगू पोट्या, लहरी मुकुंदा, गंगू भोरकर, बेल्या धोंड्या, धोंडी सिंपी, धावजी परीट, नारोबा सिंपी, हरिसिंग व जोगेसरी गोसावी यांचा समावेश आहे. या पोशाखामध्ये तिवटे, सेले गोलदार, लुगडी, खण, जोट, ताफ्तेकद, गजनी, धोत्रजोडा इ. प्रकारचे पोशाख दिले होते. नाच्याची भूमिका करणाऱ्या कलाकारांना लुगडी दिली होती. त्यामध्ये पैठणी लुगड्याचाही समावेश आहे.

**८. शके १७१०** चैत्र व फाल्गुन महिन्यातील खर्च. [१५]

६ रु.शिमग्याचा पोर नाचविला त्यास सिरपाव तीवट १ छ ९ रोज
बागेत खेळ केला ते समई रात्रीस लक्ष्मण जामखेडकर

४.रु. शिमग्याचा खेळ बागेत पोरगा नाचविला त्यास बिदागी छ ९ ताा
प्रभाकरभट वैद्य जामखेडचा पोरगा लक्ष्मण मराठे

फाल्गुन श.१७०९ मध्ये -

२० शिमग्याच्या खर्चाचे छ. २९ रोज ताा प्रभाकरभट वैद्य
१० बाळ्या पोरगा पेठ शुक्रवार नाचणार
५ गंजपेठचा पोरगा नाचणार
५ मोघया सोंगाडी
______
२०

**या सर्व नोंदीवरुन पुढील निष्कर्ष काढता येतात-**

**१.** शिमग्याच्या प्रसंगी अनेक तमासगिरांना आपली कला पेशवे दरबारात सादर करण्याची संधी मिळत होती.

**२.** शिमग्यामध्ये पेशवे दरबारात हजेरी लावणारे कलाकार हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येत होते.

३. पेशव्याकडून कलाकारांना रोख रक्कम आणि कापड या रुपाने मोबदला मिळत होता.

४. तमासगिर म्हणून उदयास आलेले कलाकार हे विविध जातींमधून आलेले आढळतात.

५. एकाच कलाकाराचे नाव अनेक वर्षांच्या नोंदीमध्ये आढळते. त्यावरुन ते दरवर्षी आपली कला सादर करण्यासाठी येत असल्याची माहिती मिळते.

६. तमासगिर कलावंतांना पेशव्यांच्या काळात इनाम, वतन किंवा इतर कोणती भरीव देणगी दिलेली आढळत नाही.

पेशवेकाळात अनेक गावांमध्ये तमासगिरांचे फड होते. मात्र त्यापैकी जे नामांकित होते, त्यांनाच पेशवे सरकारपुढे कला सादर करण्याची संधी मिळत होती. इतर कलाकार गावागावामध्ये फिरुन आपला खेळ सादर करत होते. त्यामुळे समाजाचे चांगले मनोरंजन होत होते. पारसनिसांनी आपल्या इतिहाससंग्रहात तमासगिरांचे खेळ शिमग्यामध्ये कसे होत होते याचे वर्णन करणारी १६ मार्च व २० मार्च १७८६ रोजीची दोन पत्रे छापली आहेत त्यामधील मजकूर पुढीलप्रमाणे आहे- [१६]

१. हुताशनीचे दिवशी श्रीमंत दिल्ली दरवाजाने बाहेर सायंकाळी दोन घटिका रात्री होळीजवळ येऊन दर्शन घेऊन दरवाजाचेवरती एक क्षण बसून मग आत गेले. दुसरे दिवशी खेळ तमाशेबीन चारपाचशेपर्यत होते. रात्री डफगाणे चार फड आणिले होते. गोविंदा सोंग्या वा राणू पाटलाचा पुतण्या पोर्ये पाच जण होते. त्यात एक चांगला होता. काल दुसऱ्या वाड्यात खेळ भवानीपंताचा जाला.श्रीमंत दोन घटिका रात्री येऊन चाफेखणात फड तेथे बैठक दोन-तीन पोरे नाचणार होते. मागे डफगाणे. भवानीपंताचा अस्कारा मात्र. सोंगे कांही चमत्कारीक नव्हती.

२. खेळ डफगाणे, पोऱ्यांचा नाच, गोविंदाची सोंगे, सहा घटिकापर्यंत खेळ जाहला. सायंकाळी डफगाणे, पोऱ्यांचा नाच.गोविंदा राणू यांनी सोंगे आणली. दुसरे दिवशी त्याचप्रमाणे भवानीपंताचा फड व तिसरे डफगाणे. महादू सुतार याने लाकडाची बाहुली कळासूत्री व सूर्याचा रथ केला तो चवथे दिवशी दिल्लीचे कळासूत्री मजालस पातशाही अमीरपसंत तो खेळ चांगला जाहला. पाचवे दिवशी दिवसा रंग रात्री

डफगाणे पोरे नाचणारे सासवडकर येक, दुसरा जंगमाचा. शाहीरही गाणारे त्यांचेच, हे चांगले बाकीचे कनिष्ट भरती आणले होते. सोंगात भवानीपंतापैकी दोन सोंगे १ दाईचे व दुसरे मोगलाचे. गोविंदपंतापैकी गणपतीचे व दुसरे मुरळीचे. राणूपैकी तपकीरीची नक्कल व सुतारापैकी सूर्याचे याप्रमाणे तमाशा जाहला.

बाजीरावाने अनेक शाहीरांना आश्रय दिल्यामुळे पुणे शहर हे पश्चिम भारतामधील महत्वाचे तमाशा केंद्र म्हणून उदयास आले होते. पुण्यापाठोपाठ वाई, सातारा, सांगली या भागामध्येही तमाशाची लोकप्रियता वाढत गेली. त्याच्या काळातच तमाशा संस्थेला अधिक प्रतिष्ठा मिळाली. तो बायकांचा, नाच्या पोऱ्यांचा, शास्त्रोक्त गायनवादनाचा आणि तमाशाचा अतिशय भोक्ता होता. त्याच्या सोबत नेहमी नट, नर्तकी, गवय्ये, कलावंतिणी, शाहीर व तमासगिरांचा ताफा असे. तरी देखील त्याने नाचगाणे करणाऱ्या इतर कलाकाराप्रमाणे तमासगीर आणि शाहीरांना मोठ्या देणग्या किंवा इनाम दिलेले आढळत नाही. इ.स.१८०२ मधील एका पत्रामध्ये तो नाचगाण्यावर किती अमाप पैसा खर्च करत होता यासंबंधी मिळणारी माहिती पाहण्यासारखी आहे. '२४ जानेवारी १८०२ रोजी, श्रीमंतांनी व्यंकटनरसीचा नाच व रामचंद्र पैठणकर यांचे गाणे तीन रात्र सतत केले. त्यावरुन बहुत प्रयत्न होऊन व्यंकटनरसी इजला २६ हजार रुपये व रामचंद्र गोसावी यांस १० हजार रुपये येणेप्रमाणे बक्षिस दिले'.[१७] दुसऱ्या बाजीरावाची जी विविध शेलकी प्रीतीपात्रे होती, त्यापैकी रामचंद्र गोसावी हा गवई प्रमुख होय.बाजीरावाच्या सतत सहवासात राहणारा व त्याच्या आवडीच्या विलासवस्तूंची सोय करणारा असा तो त्याचा खास मित्र किंवा सल्लागार होता.पूर्वी तो काशीकडे राहिल्यामुळे त्याने बाजीरावाला उत्तरेतील विलासी ढंगाची ओळख करुन दिली होती.त्यामुळेच त्याला शुक्रवार वाड्यासमोर वाडा बांधण्यासाठी पन्नास हजार रुपये दिले होते.तसेच त्याच्या नातेवाईकांना वारंवार पोशाख केले होते, तर त्याचे कर्ज निवारण्याकरिता ७००० रु दिले होते. यावरुन असे म्हणता येते की पेशव्यांच्या वैयक्तिक मनोरंजनासाठी असणाऱ्या कलाकारांना जादा मोबदला दिला जात होता आणि संपूर्ण समाजाचे मनोरंजन करणाऱ्या तमासगिरांना व शाहीरांना अल्प मोबदल्यावर समाधान मानावे लागत होते.

महाराष्ट्रात उदयास आलेल्या तमाशा या मनोरंजनाच्या साधनामुळे मराठी लोकांच्या मनोरंजनाच्या रुचीमध्ये बदल घडवून आणण्याचे काम केले. प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेने या मनोरंजन साधनाचे मोठ्या प्रमाणात कौतुक केले. कारण तमाशा हा तत्कालीन पारंपरिक मनोरंजन प्रकारापेक्षा जास्त आकर्षक होता. त्यामध्ये आकर्षक नृत्य, शृंगारिक लावण्या, नाटकीय मूल्ये, विनोद आणि उत्तम दर्जाचे संगीत होते.स्वत:ला आधुनिक समजणाऱ्या ब्राम्हण कुटुंबातील राम जोशी व प्रभाकर यांच्यासारखे लोकदेखील तमाशाकडे आकर्षित झाले. त्यामुळे तमाशा हा पेशवेकालीन सामाजिक मनोरंजनाचे एक महत्वाचे साधन बनले. लोकांना आकर्षित करण्यामध्ये तमाशाने इतर मनोरंजन प्रकारावर बाजी मारल्यामुळेच पुढे इंग्रज राजवटीच्या काळात आणि त्यानंतर स्वांतत्र्योत्तर काळातही तो आपले अस्तित्व टिकवून आहे. सामान्य लोकांच्या भाव भावना आणि इच्छा आकांक्षा त्यामधून व्यक्त होत असल्यामुळेच कितीही टीका होऊनही पेशवाईत उदयास आलेला हा मनोरंजन प्रकार आपले अस्तित्व आजही टिकवून आहे.

## ४.४ पेशवेकालीन तमाशाचे स्वरुप

पेशवेकालीन तमाशाच्या संचाला ‘तमाशाचा फड’ असे म्हणतात. या फडामध्ये पुढील कलाकार असून त्यांच्या वाद्यावरुन व कामावरुन तमाशाचे स्वरुप समजण्यास मदत होते.

### ४.४.१. पुढारी किंवा सरदार

पुढारी किंवा सरदार म्हणजे तमाशाच्या फडाचा मालक होय. कवने रचणारे शाहीर हेच तमाशाचा फड काढीत. तमाशाचे यश हे शाहीरांची कवने आणि त्याचे साथीदार यांच्यावर अवलंबून होते. कार्यक्रम सादर करताना त्याच्या हातामध्ये ‘कडे’ किंवा ‘हालगी’ हे वाद्य असते. साधारणपणे जेवणाच्या ताटाच्या आकाराएवढे आणि तीन ते चार इंच जाडीचे लाकडाचे किंवा लोखंडी कडे घेऊन त्याला एका बाजूने चामडीने मढवून कडे किंवा हालगी हे वाद्य तयार करतात. तमाशाचा पुढारी हे वाद्य वाजवित असल्यामुळे त्याला ‘कडेकरी’[१८] असेही म्हणतात. पुढारी हलगी छातीच्या डाव्या बाजूला धरुन तिच्यावर उजव्या हाताची थाप आणि डाव्या हातात

धरलेल्या काडीचे आघात करुन ती वाजविण्याचे काम करतो. हलगी हे वाद्य शाहीरांच्या डफापासून आले आहे. मात्र ते वाजविण्याचे तंत्र महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या लेझिमात सापडते.

पेशवेकालीन तमासगिर आपल्या तमाशामध्ये स्वत:च्या लावण्यांना प्राधान्य देत असत. यावेळचे पुष्कळ लावणीकार स्वत: गायक असल्यामुळे ते स्वत:च लावण्यांचे गायन करीत. आजच्या चित्रपटांच्या अथवा नाटकांच्या दिग्दर्शकाप्रमाणे त्यावेळच्या तमाशाच्या पुढाऱ्याला तमाशातील नाच गाणी बसविणे, संवादांचे दिग्दर्शन करणे, पात्रांची निवड करणे आणि योजना करणे ही कामे करावी लागत होती.[१९]

## ४.४.२. ढोलक्या

तमाशामध्ये 'ढोलकी' हे वाद्य वाजविणाऱ्या कलाकाराला ढोलक्या असे म्हणतात. महाराष्ट्रातील मेंढपाळीचा व्यवसाय करणाऱ्या धनगर या जमातीच्या 'ढोल' आणि कसरतीचे खेळ करुन लोकांचे मनोरंजन करणाऱ्या कोल्हाटी या जमातीच्या 'ढोलके' या दोन वाद्यांपासून ढोलकी हे संगीतवाद्य तयार झाले होते. तमाशामध्ये ढोलकी हे वाद्य अत्यंत महत्वाचे मानले जात होते. साधारणपणे दोन ते सव्वादोन फुट खैराचे अथवा शिसवाचे खोड पोखरुन त्यापासून ढोलकी बनविली जात होती. ती मढविण्याकरीता शेळी किंवा बोकडाच्या कातडीचा उपयोग केला जात होता. ढोलकीची एक बाजू रुंद असून तिला धिमपुडा म्हणतात तर दुसऱ्या अरुंद बाजूला शाईपुडा म्हणतात. तमाशातील ढोलकी आणि भजनामधील मृदंग दिसण्यास एकसारखे दिसले तरी त्यांच्यामध्ये खूप फरक आहे.[२०] मृदंगाप्रमाणे ढोलकीचा स्वर दोरीखाली खडू लावून न चढविता दोरीच्या तिढ्यात बारीक खंट्या घालून, त्यानी दोरीला पीळ वाढवून खाली वर नेतात. तमाशामधील लावणी सादर करताना ढोलक्या अतिशय कसबिने तिचा उपयोग करुन घेत असे. तमाशातील लावणी नेहमी उंच फडकत्या स्वरात गायली जात असल्याने तिची जोडीदारीन ढोलकी ही चढ्या स्वरात कडक बोलणारी होती.

## ४.४.३. सोंगाड्या

तमाशामध्ये विनोद निर्माण करुन रात्रभर प्रेक्षकांना हसवित ठेवण्याचे काम 'सोंगाड्या' या पात्राचे होते. पारंपरिक नाटकामधील विदुषकाचे काम किंवा आधुनिक नाटक तमाशातील विनोदी नटाची भूमिका हीच पेशवेकालीन तमाशातील सोंगाड्याची भूमिका होती.[२१] कोणत्याही कलाप्रकारात गंभीर भूमिका करण्यापेक्षा विनोदी भूमिका करणे अवघड आणि विषेश चातुर्याचे काम असते. त्यात आणखीन तमाशात विनोदी पात्र म्हणजे सोंगाड्याचे पात्र करणे फारच अवघड. कारण इतर कलाप्रकाराप्रमाणे त्याचे संवाद तयार करुन ते त्याच्याकडून पाठांतर करुन घेतलेले नसत. प्रसंगानुसार तो प्राप्त परिस्थितीत जे सुचतिल ते विनोद करुन दाखवत असे. पेशवेकालीन तमाशात 'वग' हे अंग नसतानादेखील लावणी चालू असताना मधून मधून विनोदी कोट्या करुन प्रेक्षकांना हसवत ठेऊन तमाशाचे वातावरण तल्लख ठेवण्याची जबाबदारी सोंगाड्याची होती.[२२] सोंगाड्याचे विनोद हे सर्वसामान्य लोकांच्या नित्याच्या जीवनातील असल्यामुळे लोकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत असे. शाहीर परशुरामाच्या फडातील भवानी तेली उर्फ बाकेराव हा तमाशात नाच्या आणि सोंगाड्या अशी दोन्ही कामे करणारा होता. तो पेशवेकालखंडात अतिशय प्रसिध्दीस आला होता.

## ४.४.४. गोड आवाजाचा नाच्या

पेशवेकालीन तमाशामध्ये नाच्या हे एक वैशिष्ट्यपूर्ण पात्र होते आणि त्याचे लोकांना अतिशय आकर्षण होते. त्यामुळेच पेशवेकालीन तमाशा 'नाच्या पोऱ्याचा तमाशा'[२३] या नावाने ओळखला जात होता. १४-१५ वर्षाचा कोवळा पण दिसायला सुंदर दिसणारा मुलगा तमाशात नाच्या म्हणून काम करी. स्त्रीसुलभ हावभाव करणे, मुरके मारणे, नेत्रकटाक्ष टाकणे, लचकत मुरकत चालणे असे त्याचे काम होते. त्याला गाणे म्हणावे लागत नसुन ते काम सरदार करीत असे. तरीदेखील नाच्याचा आवाज गोड असावा लागत होता. यावरुन कार्यक्रमामध्ये त्याचे कांही संवाद असावेत असा निष्कर्ष निघतो. आपले काम उठावदार होण्यासाठी त्याला काष्टा घातलेले नऊवारी लुगडे, अंगात खडीची चोळी, गळ्यात गळसरी, कानात झुबे, बुचड्यात फुलांचा गजरा, डोळ्यात काजळ असा शिणगार करावा लागत होता.

### ४.४.५. सुरते (२ ते ४)

पेशवेकालीन तमाशामध्ये सूर देण्याचे अथवा झील धरण्याचे काम सुरते करीत. सूर देणे म्हणजे पुढे म्हटलेल्या गाण्याचे पालुपद सारखे उचलत रहाणे किंवा 'जी जी' देणे; याला तमासगीर झील धरणे, सवाई उचलणे असेही म्हणतात.[२४] सुरत्यांकडे 'झांज' किंवा 'टाळ' आणि 'तुणतुणे' ही दोन वाद्ये असत. काहीवेळा ते 'दा जी हे जी जी', 'अहो माझ्या रामा', 'अग नारी ग', असे शब्दप्रयोग झील धरण्यासाठी वापरत असत. तमाशाच्या कार्यक्रमामध्ये रंग भरण्यासाठी सुरत्यांची भूमिकाही महत्वाची होती.

## ४.५ पेशवेकालीन तमाशाची प्रमुख अंगे

महाराष्ट्रातील प्राचीन मनोरंजनाच्या प्रकारापेक्षा तमाशा हे एक वेगळ्या स्वरुपाचे मनोरंजनाचे साधन आहे. प्राचीन मनोरंजनामधून फक्त धार्मिक स्वरुपाचे मनोरंजन होत होते तर नव्याने उदयास आलेल्या तमाशा कलाप्रकारामुळे स्वच्छंदी मनोरंजन होऊ लागले. त्यामुळे तमाशाचा जन्म हा केवळ स्वच्छंदी मनोरंजनासाठीच झाला होता. त्यामध्ये वापरण्यात येणारी संगीत साधने आणि सादरीकरण हे अलौकिक होते.

### ४.५.१. गण

पेशवेकालीन तमाशाचा आरंभ 'गण' गाऊन केला जात होता. गण म्हणजे गणेशनमनाची गीते. कोणत्याही मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा आरंभ हा नमनाने करण्याची प्रथा संस्कृत नाटकामध्यही आढळते. संस्कृत नाटकारंभी शंकराचे अथवा नटराजाचे नमन करण्याची प्रथा आहे. तमाशाच्या आरंभी सरदार आपल्या साथीदारासह आणि संगीत वाद्यासह उंच आवाजात गणेशनमन करतो त्यालाच गण असे म्हणतात. गणपती या नावामध्ये कांही एक अर्थ दडलेला आहे. गण म्हणजे लोक किंवा समुह आणि पती म्हणजे पालनकर्ता. या नावामधून गणपती हा सामान्य लोकांचा देव आहे असे दिसते. त्यामुळे भारतातील सर्वसामान्य लोकांनी गणपती या प्राचीन देवतेस प्रथम पुजेचा मान दिलेला आहे. गणपती हा त्यांचा सुखकर्ता, दुख:हर्ता, आणि बुध्दीचा दाता देव आहे अशी त्यांची भावना होती. त्यामुळे शतकानुशतके जीवनातील कोणत्याही शुभकार्याचा आरंभ गणेशाच्या पुजनाने, स्तोत्रगीताने वा आवाहनाने करण्याची प्रथा प्रचलीत

आहे. सर्व लोककलांच्या आरंभी गणेशस्तुती केली जात असल्याचे आढळते. मात्र अभिजनंच्या कलारंभी मात्र शंकराचे नमन आढळते. सर्वसामान्य लोकांना गीतेचा भावार्थ मायबोलीमधून समजावा म्हणून संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा टिकाग्रंथ लिहिला. त्याची सुरुवात -

ओम नमोजी अद्या । वेद प्रतिपद्या ।

जयजय श्री स्वयंविद्या । आत्मरुपा ।[२५]

अशाप्रकारच्या सुंदर रुपकाची योजना करुन आळवणी केलेली आढळते. हीच परंपरा अनेक महाराष्ट्रीय लोककलांनीही स्वीकारलेली आढळते. सर्व लोककलांच्या आरंभी गणेशस्तुती केली जात असल्याचे आढळते, मात्र अभिजनंच्या कलारंभी मात्र शंकराचे नमन आढळते. तमाशा हे सर्वसामान्यांच्या मनोरंजनाचे साधन असल्याने त्याची सुरुवात गण गाऊन होत असे. गणेशाने तमाशातील गीतगायनाला स्फूर्ती द्यावी आणि कार्यक्रम यशस्वी करावा हा गणगायन करण्यापाठीमागील तमासगिरांचा हेतू होता. शिवाय या कालखंडात महाराष्ट्रावर राज्य करणारे राज्यकर्ते पेशवे हे धार्मिक वृत्तीचे असून त्यांचे कुलदैवतही गजानन होते. त्यामुळे तमाशातील गणगायनाला जास्तच महत्व आले.[२६] पेशवेकालीन नामवंत शाहीर होनाजी बाळा कार्यक्रमाची सुरुवात -

श्री वक्रतुंड गणपती, गणाधिपती तुझी स्तुति
नर निशी दिनी करती । ते नर निरविघ्न
प्रपंची जगी विचरती ।। [२७]

हा गण गाऊन करीत असे. या गणामध्ये होनाजीने गणेशाची महती गाऊन त्याला अवगत असणाऱ्या चौसष्ट कला आणि चौदा विद्यांचेही वर्णन केले आहे. गणपती हा ग्रामीण लोकांचा देव आहे ही गोष्ट स्पष्ट करुन रामजोशीने गणातून गणपती पंचायतनाची कल्पना मांडली आहे. गणपती, शंकर, विष्णू, सूर्य आणि भवानी यांचा समावेश या पंचायतीमध्ये केला आहे.पुराणातील अनेक गोष्टींचा संदर्भ देऊन गरीबावर कृपा करावी अशी विनंती गणपतीकडे करतो.[२८] शाहीर सगनभाऊ हा मुसलमान असूनही त्याने अतिशय समर्थपणे गणेशस्तुती रचली आहे. तो म्हणतो -

जय श्रीमंगलमूर्ती नमो पूर्ण कृपाळा ।
दीन दयाळा स्मरता यावे रे बापा ।।धृ।।
जयश्री सिध्दविनायक तो ज्ञानदिपा ।[२९]

## ४.५.२. गौळण

तमाशामध्ये गण सादर करुन झाल्यानंतर गौळणी सादर केल्या जात असत. गौळण म्हणजे गोपी आणि कृष्ण यांच्या लीलाविषयीची गीते. या भागामध्ये सुरुवातीला कृष्णाच्या विविध खोड्यांचे वर्णन करणाऱ्या व त्यानंतर त्याच्या स्तुतिपर गौळणी गायल्या जात. सर्वसामान्य जनतेला रिझवत - खिजवत उपदेश करण्यासाठी संतांनी जी काव्यरचना केली त्यांना गौळणी म्हणतात. त्यांच्या गौळणीमधून अध्यात्मिक अर्थ निघत होता. त्यांनी कृष्णलीलांचे वर्णन केले असले तरी त्यांचा संयम कुठेही सुटलेला दिसत नाही. त्यांच्या रचनेतील सूक्ष्मस्वरुपाचा सूचक शृंगार अध्यात्माच्या आवरणाखाली दडून प्रकट झालेला होता. संतांच्या गौळणींची विकसीत अवस्था म्हणजे शाहीरांनी रचलेल्या गौळणी होत. पेशवेकालीन शाहीरांनी तमाशामध्ये सादर करण्यासाठी रचलेल्या गौळणी शृंगारप्रधान व अध्यात्मिक अशा दोन्ही भावनांचे प्रकटीकरण करणाऱ्या आहेत. त्या केवळ गायन करुन सादर केल्या जात नव्हत्या तर त्या साभिनय व संवादासह सादर केल्या जात होत्या. बालपणापासूनचा कृष्णाच्या विविध खोड्या आणि गोपीबरोबरचा त्याचा शृंगार हे गौळणींचे मुख्य विषय असत. महाभारतामध्ये राधा नावाचे पात्र नसले तरी संतकवींनी ते निर्माण केले आणि पेशवेकालीन शाहीरांनीही कृष्ण राधा आणि गौळणी यांच्या शृंगारावर अधारित गौळणी रचून त्या तमाशामध्ये सादर केल्या. अनंत फंदी यांच्या चंद्रावळ या गौळणीमधून शृंगाराचे शाहीर किती भडक वर्णन करत होते ते लक्षात येते.

राहीचीधाकुटी बहीण ऐका चंद्रावळ ।। फुल सव्वाशेर भार वजन चंद्रावळ ।
मृगनयना एक एक डोळा दिसे चंचल । कुच उरी हालती दोन्ही मुक्ताफळ ।
अंगीवीर्य असे कुपींतीलजल निर्मळ। हृदयावर जोबन दोन्ही हालतीकमळ। [३०]

दुसऱ्या एका गौळणीमध्ये श्रीकृष्णाने सोळा हजार नायिकांबरोबर केलेल्या विलासाचे वर्णन शाहीर सिदराम याने केले आहे. श्रीकृष्णाच्या खोड्यांचे वर्णन करणाऱ्या गौळणी तर भरपूर प्रमाणात रचल्या गेल्या होत्या. त्यापैकीच सगनभाऊ 'सांगा सांगा या श्रीहरीला' या गौळणीमध्ये म्हणतो -

जात होतो आम्ही मथुरेशी।
आडवा होतो हा हृषीकेशी ।
हे दुखः सांगावे कोणाशी?।[३१]

राधेचा कृष्णाबरोबरचा संबंध हा किती उच्च पातळीवरचा होता याचा विचार न करता परशुराम म्हणतो की, एकदा राधा कृष्णाला कडेवर घेऊन घरी येते आणि त्यांनी केलेल्या शृंगाराचे वर्णन करतो की -

राधिकेचा मानस जाणून उपवर झाला सखा ।।

लावी दार घाली कडी खिटी । रुप सुंदर अति गोमटी ।।

राधेला धरी मनगटी । धरी स्तन गळा घाली मिठी ।।

कविवर्य रामजोशींनी तर कृष्णाने गोपीकाबरोबर केलेले चाळे अतिशय भडकपणे आपल्या गौळणीमधून रंगविले आहेत. चाळे करणारा कृष्ण लगेचच बालरुप धारण करुन असे दाखवितो की यामध्ये पापवासना नाही. मात्र ते गौळणीच्या शेवटच्या भागात सांगायचे. संपूर्ण गौळणीत शृंगाराचे वर्णन करण्यात तो किती पटाईत आहे हे पुढील गौळणीत आढळते. तो म्हणतो -

भरले डोळे बाई अजून जाईना लाली। फेडी लुगडी कुच रगडा या काय चाली।।

अंगे भिजली रंगामध्ये दंग जाहले मी वेडी। तशामध्ये बाई हळुच कंचुकी सोडी।।[३२]

अशाप्रकारचा कृष्ण गोपी शृंगार अतिशय भडकपणे पेशवेकालीन शाहीरांनी आपल्या गौळणीमधून दाखविला. त्यामध्ये अध्यात्माचा भाग थोडाफार असला तरी तो शृंगारामध्ये पूर्णपणे झाकून गेला होता. यावेळच्या तमाशामध्ये कोवळा मुलगा नाच्या म्हणून काम करीत असे. पुरुष स्त्रीरुपात आल्याने शृंगार अधिक मुक्तपणे व्यक्त केला जात होता. गौळण हा भाग अतिशय मनोरंजक असल्याने तत्कालीन लोकांना तमाशाचे चांगलेच वेड लागले.

## ४.५.३. लावणी

तमाशामध्ये गण व गौळण हे दोन भाग सादर केल्यानंतर लावणी सादर केली जाते.आजपर्यंत अनेक विद्वानांनी लावणी या शब्दाची उत्पत्ती सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे तो पुढीलप्रमाणे : -

**१.** लावणी - एक प्रकारचे ग्राम्यगीत (A kind of rural erotic song)[३३]

**२.** लापनिका या संस्कृत शब्दावरुन 'लावणी' शब्द आला [३४]

३. लावणी हा शब्द संस्कृत 'hu' म्हणजे तोडणे या संस्कृत धातूवरुन आला असावा.[३५]

४. शेतात लावणी करताना म्हटले जाते ते लावणीगीत.[३६]

५. प्रा. पां. दा. गुणे यांनी त्यांच्या अपभ्रंश वाङ्मयावरील निबंधात 'लापनिका' म्हणजे ग्रामीण गीत असा अर्थ सांगतात.[३७]

६. हृदयाला चटका लावते ती लावणी असे अ. ब. कोल्हटकरांना वाटते.

७. प्रा. म. वा. धोंड यांनी मऱ्हाटी लावणी या ग्रंथामध्ये लावणी म्हणजे 'सुभग रचना' असे म्हटले आहे.[३८] या मताच्या समर्थनासाठी त्यांनी १ मे १९६५ च्या लोकराज्य अंकामध्ये मराठी शाहीरी परंपरा नावाचा लेख लिहिला आहे. त्यात ते लिहितात - पंडित सामवेद हा शिवाजीचे वडील शहाजी यांचे दरबारातील एक पंडीत होता. त्याने सांगितलेल्या बारा नृत्यप्रकारात 'लावणम्' नावाचा एक प्रकार आहे. त्याची लक्षणे एक हात पताकेसारखा उभारलेला आणि दुसरा हात कमरेवर अर्धचंद्राकृती ठेवलेला; आणि नंतर दोन्ही हात कमरेवर ठेवून रुपकासारखे केलेले जे नृत्य ते लावण नृत्य होय. रुपकाचा अर्थ 'यत्र नृत्तगीतांनां समन्वय: तत्रृत्तं रुपकम्' असा आहे. म्हणजे लावण हे नृत्तगीत होते. पंडीत सामवेदाने या नृत्याला 'लावणम्' हे संस्कृत नाव दिले असले तरी त्याचा पिता दामोदर याने 'संगीतदर्पन' या ग्रंथात त्याचा निर्देश 'लावणी' या देशी नावाने केला आहे. त्यावरुन 'लावणी' या नावाच्या देशी नृत्यप्रकारावरुन 'लावणी' आलेली आहे यात शंका उरत नाही.[३९]

लावणी हा तमाशामधील महत्वाचा, जास्त काळ चालणारा आणि लोकांचा सर्वात आवडता कार्यक्रम होय. त्यामुळेच तमाशाला लावण्यांचा कार्यक्रम या नावानेही ओळखले जात होते. यावेळच्या बहुतेक लावणीकार शाहीरांनी पेशव्यांच्या दरबारात हजेरी लावलेली दिसते. त्यामुळे लावणी श्रीमंतांच्या आश्रयाने वाढली किंवा पैशासाठी लाचार बनलेल्या शाहीरांनी लावण्यांची रचना केली असे मत मांडले जाते. मात्र नाशिक (गोदातीर), बार्शी, मराठवाडा, तुळजापूर, नागपूर संगमनेर,जुन्नर,सातारा, कराड, कोकण, कोल्हापूर, बालाघाट या भागात लावण्यांची निर्मिती करणारे शाहीर उदयास आले होते.[४०] लावणीब-ल दुसरे मत असे मांडले जाते की, यावेळची लावणी ही शृंगारिक, बीबत्स व अश्लिल होती. पेशव्यांच्या आश्रयाने

वाढलेल्या शाहीरांच्या लावणीत अश्लिलतेचे व उत्तान शृंगाराचे जे प्रमाण दिसते, त्याच्या अल्पांशाने लोकाश्रयाने व लोकरंजनासाठी निर्माण झालेल्या लावण्यामध्ये ते दिसत नाही.[४१]

## ४.६ लावण्यांची वैशिष्ट्ये

### ४.६.१. लावण्यांची रचना लोकांच्या मनोरंजनासाठी

मध्ययुगीन महाराष्ट्रामधील काव्यप्रकाराचे संतकाव्य, पंडिती काव्य व शाहीरी काव्य असे तीन भेद मानले जातात.[४२] ईश्वराची आळवणी करण्यासाठी त्याबरोबरच अज्ञानाच्या अंधारात वाट चुकलेल्या व अनीतीत फसलेल्या जनतेला सन्मार्ग दाखविण्यासाठी संतकाव्याची रचना झाली. संस्कृतमधील कथा व काव्य पंडित कवींनी मराठी भाषेत आणण्याचे कार्य केले. संतकवी व पंडित कवीपेक्षा शाहिरांच्या काव्यरचनेचा हेतू वेगळा होता. संसारात शिणलेल्या, मुलुखगिरीत गुंतलेल्या व विलासात रमलेल्या लोकांच्या मनोरंजनासाठी लावण्या रचल्या जात होत्या. त्यामुळे शाहीरांनी लौकिक विषयावर जास्त लावण्या लिहिल्या. त्याबरोबरच त्यांनी पौराणिक आणि अध्यात्मिक विषय त्याज्य न मानता ते देखील वेगळ्या ढंगामध्ये लोकांसमोर सादर केले.

### ४.६.२. लावण्या लोकसमुहासमोर गायल्या जात -

पेशवेकालीन तमाशाच्या सादरीकरणासाठी आजच्याप्रमाणे रंगमंच हवाच अशी अट नव्हती. त्याचे सादरीकरण चौकामध्ये, देवळाच्या समोरील कठड्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी होत असे. या तमाशामध्ये शाहीर स्वरचीत लावण्या मोठ्या जनसमूहासमोर गात असत. कित्येकदा या लावण्या तिथल्या तिथेच रचून म्हटल्या जात असत.[४३] जनसामान्यांच्या मनोरंजनासाठी सादर होणाऱ्या तमाशाचा कार्यक्रमाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळावा म्हणून शृंगार, उत्तानता, उथळपणा व सूचकतेचा अभाव असणाऱ्याच लावण्या जास्त प्रमाणात गायल्या जात होत्या.

### ४.६.३. लावणीकारामध्ये परस्पर स्पर्धा होती -

लोकांसमोर लावणी रचून म्हणावयाची आणि त्यांच्याकडून बिदागीची अपेक्षा करावयाची म्हणजे साहजिकच इतर शाहीरांशी स्पर्धा आली.[४४] या स्पर्धेमुळे प्रतिस्पर्ध्याला कमी लेखणे आणि स्वत:चा गौरव करणे शाहीरांना भाग पडत असे. 'होना गवळ्याचा झाला चुना' असे नाव घेऊन इतर शाहीरांचा अवमान केला जात होता. क्वचित प्रसंगी 'फंदी अनंत कवनाचा सागर' असा प्रतिस्पर्ध्याचा गौरव केलेला आढळतो. या स्पर्धेचा परिणाम परस्परांची नालस्ती करण्यासाठी झाला नाही तर स्वत:च्या लावण्या जास्तीत जास्त सुधारण्यासाठी झाला.

### ४.६.४. लावणीकारांनी प्रौढी मिरविली ती रचनाकौशल्याची-

निर्गुण, निराकार, ब्रम्ह आणि त्याची माया यांत व्यावहारिक म्हणजे सृष्टीच्या नजरेने कोणाला किती महत्व द्यावयाचे याबाबत शाहीरांमध्ये मतभेद होते. निर्गुण ब्रम्हाचे महत्व मानणारे ते तुरेवाले आणि मायावादी ते कलगीवाले असे भेद होते.[४५] शाहीर रामजोशी तुरेवाला आणि प्रभाकर हा कलगीवाला होता. गोविंदनाथ, सिध्दनाथ व सगनभाऊ हे नाथपंथी शाहीर होते. या सर्व शाहीरांनी लोकप्रिय लावण्यांची रचना केली असून त्यांच्या लावण्यांच्या शेवटी स्वत:ची प्रौढी मिरविलेली आढळते. प्रश्नोत्तराच्या रुपाने एकमेकांच्या ज्ञानाची परीक्षा घेण्यामध्ये ते तरबेज होते. प्रतिस्पर्ध्याला कोडे घालून निरुत्तर करावयाचे आणि स्वत:च्या सफाईदार व घोटीव रचनेने त्याला मुग्ध करण्यामध्ये त्यांना एक कलावंत म्हणून आनंद वाटत होता.

लावणीची वरील वैशिष्ट्ये विचारात घेऊन म. वा. धोंड यांनी लावणीची व्याख्या केली आहे. त्यांच्यामते, ''सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रुचतील अशा लौकिक, पौराणिक वा आध्यात्मिक विषयावर रचलेली, कडे वा ढोलके यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली, खटकेबाज व सफाईदार पद्मावर्तनी वा भृगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी.''[४६]

## ४.७ पेशवेकालीन लावणीमधील विविध विषय

### ४.७.१ शृंगारिक लावण्या

तमाशामध्ये सादर करण्यासाठी शाहीरांनी मोठया प्रमाणात या प्रकारच्या लावण्या रचल्या आहेत. कृष्णगोपींचा शृंगार आणि लौकिक शृंगार असे या लावण्यांचे उपप्रकार आहेत.

होनाजी, रामजोशी, प्रभाकर, आदि लावणीकार कृष्णगोपींचा शृंगार रंगवण्यामध्ये आघाडीवर आहेत. परशुरामाच्या लावणीतील गोपी कृष्णाला कृतककोपाने म्हणते -

मी चांगट फाकडी रूपाने तू काळा बेंदरा।
दूर होय वाट नको धरू पदरा; चित्त चोरट्या।
भीड नंदाची म्हणून गई केली मुरवत धरली जरा।
कान कातरून हातात देईन मुकाच जाशील घरा।[४७]

गोपिकोस्तवात राधाकृष्ण एकत्र आले आहेत.त्या तन्मयतेचे व तृप्तीचे मनोहर चित्र रंगविताना रामजोशी म्हणतो -

या सार सुखां नाहिं पार काय संसार हरीच्या पायीं ।
या चित्तवृत्तिला दुजें सुचेना काहीं।।[४८]

ज्याप्रमाणे शाहीरांनी कृष्णगोपींच्या लीला सांगणाऱ्या शृंगारिक लावण्याची रचना केली त्याप्रमाणेच त्यांनी लौकिक जीवनातील शृंगाराचे सुंदर वर्णन करणाऱ्या लावण्यांची रचना करुन तत्कालिन समाजाचे मनोरंजन करण्याचे कार्य केले. महाराष्ट्रातील सामाजिक जीवन गाथासप्तशतीच्या परंपरेतील सामाजिक जीवनधारणेतून आलेले आहे. या जीवनात शृंगाराबाबत आडपडदा ठेवण्यात येत नाही हे उघड आहे. पेशवेकालीन शाहीरांनीही नटूनथटून सजलेली सौंदर्यवती, संभोगासाठी उत्सुक स्त्री, पतीला एकांतात पाहण्यासाठी उत्सुक स्त्री, पतिभेटीसाठी हुरहुरणारी, मुलबाळ होत नाही म्हणून तळमळणारी, पती लहान किंवा बिजवर आहे म्हणून तक्रार करणारी स्त्री, सवतीमत्सर करणारी, पती पेहलवान आहे म्हणून तक्रार करणारी, प्रियकराला विनवणारी स्त्री, नवऱ्याच्या परस्त्रीगमनाबाबत तक्रार करणारी स्त्री, परपुरुषाशी संभोग करणारी स्त्री असे कितीतरी विषय आपल्या लावणीत रंगविले.सर्वसामान्य प्रेक्षकांच्या आवडीचे हे विषय असल्याने ते तमाशाचा चांगला अस्वाद घेत. यावेळच्या शाहीरांनी शृंगारातील अनेक अवस्थांचे केलेले चित्रण अतिशय सुंदर आहे. नववधुची पतीला एकांतात भेटण्यासाठी चाललेली धडपड होनाजीने पुढीलप्रमाणे चित्रित केली आहे.

कांताला एकान्ती कधि पाहु गे सखये।
वाटते असे पुढे जाऊनि उभी राहू गे सखये।

नणंदा सासू याणी काही मज पुसावे।

मजहुनी पती भिडसा युक्ती कैसी करावी।

कुठवरि तरी मर्यादा वडिलांची याणी धरावी।[४९]

स्त्रीपेक्षा उतावळ्या पुरुषाचेही चित्र रंगवितांना होनाजी आपल्या लावणीत म्हणतो की, 'नको अधिर होऊ थांब सख्या पदर सावरू दे। निऱ्या सुटल्या चिर आवरू दे।'[५०] यावेळी वीस वर्षे वयाची स्त्री म्हणजे पोक्त समजली जात होती. अशी पत्नी आपल्या आसुसलेल्या नवऱ्यास म्हणते -

साडी नेसू द्या, धीर धरा तुम्हि, नका घाबरे करूं।

सा चौ महिन्या कुठे नागवी तुम्ही क्षणभरी।

नित्य उठुन हे काय पाडितां रगत माझे उरी।

प्रौढ आतां वय विसांत, सखया, अजून का लेकरू।[५१]

पेशवेकालीन शाहीरांनी आपल्या अनेक लावण्यांमधून संभोग वर्णनेही रंगेलपणाने रंगविली होती. प्रभाकराच्या एका लावणीतील नायिका वयाने लहान असून तिच्या प्रथम संभोगाचे वर्णन करताना तो म्हणतो -

पहिल्या हो नहाणाची हळुहळु करा विषय

मी नव्हे नार गहाणाची ।[५२]

अपत्यप्राप्ती होत नाही म्हणून तक्रार करणारी स्त्री, लेकुरबाळी होण्यासाठी विविध उपाय करणारी स्त्री, अतिरिक्त संभोगाला कंटाळलेली स्त्री, पती लहान किंवा बुळा आहे अशी तक्रार करणारी स्त्री असे विषयही शाहीरांनी आपल्या लावण्यांमधून रंगविले आहेत. लग्न होऊन बरेच दिवस लोटले तरी अपत्यप्राप्ती होत नसलेल्या एका स्त्रीची व्यथा शाहीर अनंत फंदी आपल्या लावणीमध्ये पुढीलप्रमाणे मांडतो -

बोल गड्या मशीं नरम नको होऊ  गरम पोकळ भरम कशाला

ज्वानी जाईल सरुन।

भर गेल्यावर पोर होईल मग रंग येई ना असा फिरुन।[५३]

प्रत्येक स्त्रीची माता होणे ही मोठी महत्वाकांक्षा असते. अशाच एका माता होण्यास उत्सुक असणाऱ्या स्त्रीच्या मनातील भावनांचे चित्र प्रभाकर आपल्या लावणीत रेखाटताना म्हणतो-

भर महिना लोटे ना, चुकेना अजून बाई पाळी।
कधी ग होईन लेकुरवाळी।[५४]

आपणास मुलबाळ होत नाही म्हणून एका निपुत्रिकेच्या मनातली तळमळ व्यक्त करणारी लावणी होनाजीने रचली आहे. त्यामधील स्त्री म्हणते -

हीन माझे प्रारब्ध वांझपणा कधी फिटेल ग ।
एक बाळक पोटी नाही ।। [५५]

अशाप्रकारे पेशवेकालीन शाहीरांनी पतीपत्नीच्या जीवनातील शृंगाराचे उघडपणे प्रदर्शन लावण्यामध्ये केलेले आढळते. त्याचप्रमाणे त्यांनी त्यावेळच्या समाजातील कसबीन, वेश्याव्यवसाय करणारी किंवा व्यभिचारिणी स्त्री, नाटकशाळा अथवा अंगवस्त्र असणारी स्त्री यांचाही शृंगार लावण्यामध्ये मांडला आहे. होनाजी बाळाच्या अशा एका लावणीतील स्त्री म्हणते-

रातीची जेंव्हा पाहिजे तेंव्हा बलाऊ पाठवा।
हौसेने मला द्या बांधुन दुसरा वाडा ।।[५६]

या लावणीतील स्त्री ही पत्नी नसल्यामुळेच ती बोलावणे पाठविण्याची आणि दुसरा वाडा बांधुन देण्याची मागणी करीत आहे.त्याच्या दुसऱ्या एका लावणीतील स्त्री असे म्हणते की -

तुम्ही नित माझे घरी यावे। सुखशयनी सुरत व्हावे
कधी मधी तरी भेटत जावे। [५७]

यावरुन ही स्त्री त्या नायकाची पत्नी नसल्याचे स्पष्ट होते. आपल्या बालपणीच्या मित्राबरोबर चोरुन प्रेम करणाऱ्या व्यभिचारिणीचे चित्र देखील शाहीरांनी आपल्या लावणीत रेखाटले होते. त्याची भेट झाल्यावर ती त्याला म्हणते -

तीस दीवसांचा आहे हुकूम माहेरी राहण्याचा।
बेत तदनंतर होईल सासरी जाण्याचा।
तोवर तूं आपला सुखसोहळा पुरीव निजण्याचा।[५८]

अशाप्रकारे पेशवेकालीन तमाशामध्ये शृंगारिक लावण्या जास्तप्रमाणात सादर करुन लोकांचे मनोरंजन करण्याचे काम शाहीरांनी केले. तत्कालीन लोकांच्या मनोरंजनाची रुची ओळखून शाहीरांनी शृंगारिक लावण्यांना तमाशात जादा महत्व दिले होते. अशा लावण्यांमधून स्त्रियांचे व तरुणींचे सौंदर्य हा या लावण्यांचा प्रमुख विषय होता. अशा लावण्या कोणताही आडपडदा न ठेवता प्रेक्षकासमोर सादर केल्या जात होत्या. एखाद्या लावणीतील शृंगारिक वर्णन अतिशय खालच्या पातळीवरील देखील असण्याची शक्यता असे. प्रभाकर एका लावणीत वेश्या स्त्रीच्या भावनांचे वर्णन करतो. त्यामधील स्त्री म्हणते, 'फुकट की निजते तुजखालती'.[५९] वेश्या आणि तिच्या वर्तणुकीचे वर्णन करणारा कदाचित हा धाडसी मार्ग असावा.

## ४.७.२ विविध विषयपर लावण्या

### अ. व्यक्तिवर्णनपर लावण्या

शाहीर रामजोशी यांचा तमाशा पेशवेकालखंडात अतिशय लोकप्रिय झाला होता. अशावेळी त्याच्या तमाशाची कीर्ति ऐकून चिमा आणि बयाबाई यांचे त्याच्या तमाशात आगमन झाले. रामजोशींच्या लावणीने त्यांच्यावर चांगलीच भुरळ घातली होती. आपल्या सौंदर्याने समोरच्यांना घायाळ करणारी बया आपल्या सुरेल आवाजात रामजोशीच्या लावण्या तमाशात सादर करत असे. तिच्या आगमनामुळे रामजोशींच्या फडाची लोकप्रियता अधिकच वाढली. त्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रामध्ये बया आणि रामजोशी ही नावे लोकांच्या ओठावर खेळू लागली.[६०] त्यांच्या तमाशाचा आस्वाद घेण्यासाठी लोकांची प्रचंड गर्दी होत असे. त्यामुळे तिची पडलेली गाठ हा दैवयोग आहे असे रामजोशींना वाटे. या भेटीचे वर्णन सांगणाऱ्या लावणीमध्ये बयाबाईचे चित्र रेखाटताना शाहीर म्हणतो -

दैवें ही गाठ बयाबाईची । मज पडली साची ।
कविता इजसंगे रंगा आली। नानाविध चाली।
वाणी काय परिक्षा झाली । गाणारी धाली।[६१]

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात रयतेच्या छळाचा आणि हालअपेष्टांचा कळस झालेला होता. अशावेळी त्याचा आश्रीत असलेला रामजोशी त्याच्याबद्दल अतिशयोक्तिपूर्ण म्हणतो -

दाता शुर गुणज्ञ, दयार्णव, सत्यशील त्यापरी ।
नृपोत्तम कैचा पृथ्वीवरी ।
सदैव धर्म समृध्दी प्रतियुगी जो खलजन संहारी ।
तोच हा जाणा हर की हरी ।।[६२]

यावेळच्या शाहीरामध्ये बिदागीच्या अपेक्षेमुळे मोठी स्पर्धा असल्यामुळे प्रतिस्पर्ध्याचा ते गौरव करण्याची शक्यता कमी होती. अनंत फंदीच्या कामगिरीची दखल घेऊन होनाजीने मात्र त्याच्या शाहीरीचा गौरव करणारी रचना केली. त्यामध्ये तो म्हणतो -

फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा।
चमत्कार चहुकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा।[६३]

आपल्याच क्षेत्रातील कवीवर टिका[६४] करण्याची भाषा ज्या पेशवेकाळात बोलली जात होती त्याचवेळी होनाजीसारखा दुसऱ्या कवीचा आदर करणारा कवीदेखील होता.

## आ. अनेक भाषिक लावण्या

पेशवेकालीन शाहीरांवर सनातनी मंडळी असंस्कृतपणाचा व गावंढळपणाचा आरोप करीत असत. अशावेळी रामजोशींनी संस्कृतबरोबर इतर भाषांमधून लावण्यांची रचना करुन सनातन मंडळीचा आरोप खोडून काढला. त्यांनी संस्कृत, मराठी, हिंदी, कानडी या चार भाषामध्ये[६५] लावणी लिहून प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन केले होते. संस्कृतमध्ये लिहिलेल्या त्यांच्या दोन लावण्यांही प्रसिध्द आहेत. हिंदीमध्ये शृंगारिक लावणीची रचना रचन्यामध्ये तर अनंत फंदी अतिशय कुशल होता. 'बार बरसका पठा देखो'[६६] ही सुंदरीचे रसभरीत वर्णन करणारी लावणी रचली होती.पाणवठ्यावर उभ्या असणाऱ्या स्त्रीचे सुंदर वर्णन करुन त्याने प्रेक्षकांची दाद मिळविली होती. त्यामध्ये तो म्हणतो की, ती सुंदरी म्हणजे गजगामिनी आहे.तिची चाल हरिणीसारखी, डोळे मृगनयनी, भुवया कमानदार, दात डाळिंबाच्या दाण्यासारखे असून लालभडक गझनी लेहंगा व त्यावर चंद्रकळा नेसली आहे. त्याने 'जोरु कसम का कज्या सुनो' या लावणीत पतिपत्नीमधील लौकिक झगडा लोकांसमोर मनोरंजकपणे पुढीलप्रमाणे मांडला आहे.[६७]

तू क्या कमाती फत्तर चुडयेल क्यों करती हाय हाय ।
ऐसे लगकार जुया मारु एक बाल नही रहने पाया ।
क्या पशम चरखेके कमाई हम शिपाई हारगिस न खाया ।
दर रकिब मारे तलवार लोह खनाखन तुटता जाय ।
ये दु:ख काल काल में तेरे नाबाप जगावे मरयेते ।। बडा ।।

## इ. विनोदी लावण्या

लोकरंजनासाठी रचलेल्या लावणीमध्ये विनोदाला महत्वाचे स्थान होते.या प्रकारच्या लावण्या रचण्यात परशरामाचा चांगला हातखंडा होता. इतर शाहीरांच्या लावण्यात निरपवाद, निरागस व निर्मळ विनोदापेक्षा अश्लील विनोद आढळतात. परशरामाने लोकांना हसविण्यासाठी रचलेल्या विनोदी लावण्यामध्ये मात्र अश्लिलता आढळत नाही. सवतीसवतींची भांडणे हा परशरामाने एका लावणीसाठी विषय निवडला आहे. त्या लावणीत तो म्हणतो, 'दोन सवती भांडती, पती भंगड भुंगा।'[६८] दुसऱ्या एका लावणीत एका शेंदाड शिपायाच्या फजितीची कथा सांगितली आहे. तो बायकोपुढे बढाया मारुन सैन्यात शिपाई म्हणून राहण्यासाठी गेला होता.प्रत्यक्षात त्याला सैन्यात कामठी अथवा मजूर म्हणून कामावर ठेवले होते. मोहीम जास्त दिवस चालल्यामुळे तो तेथून पळून आला होता. सैन्यामध्ये आपण अतिशय सुखी असताना देखील केवळ तुझ्यासाठी मी नोकरी सोडून घरी राहिल्याचे सांगत असतो. तो पत्नीला सांगत असतो की, 'लष्कराचे काय सुख सांगू गे तूज नारी। तुझप्रीतीस्तव ते सोडून राहिले घरी।'[६९] हे त्याच्या तोंडचे बोल लावणीमध्ये शाहीराने घातले आहेत. त्यामुळे त्याची पत्नी त्याच्यावर खुष होते.मात्र ज्यावेळी त्याला शोधण्यासाठी जेंव्हा सरदार आला आणि त्याने खरी हकिगत सांगितली तेंव्हा या नवऱ्याची झालेली फजिती शाहीराने अतिशय विनोदी पध्दतीने माडूंन लोकांचे मनोरंजन केले आहे.

## ई. प्रासंगिक लावण्या

पेशवेकाळात पडलेल्या भयंकर दुष्काळाचे वर्णन लावण्यांमध्ये आढळून येते. दुष्काळामुळे समाजात माजलेली अनीती व अधर्म पाहून लावणीकार अतिशय अस्वस्थ होत असे.

कारण यावेळी कोणी कोणाला घाबरत नव्हते. सेवक स्वामीला मानीत नव्हता. शेतकऱ्यांचे शेत कापून त्याला बिगारी म्हणून नेण्यात येई. दुष्काळामध्ये अन्नावाचून असंख्य लोक मरण पावले होते. अशी निर्माण झालेली भयानक परिस्थिती लावणीमध्ये मांडताना शाहीर अनंत फंदी म्हणतो-

उलटा दमान आया जी आया । सेवक स्वामीचे मानीना ।।

जिकडे तिकडे माजले टोळ । दुनियेचे केले वाटोळे।

मुलुख कूल उजाड हलकल्लोळ। अंगावरती चमक्याची ओळ ।।[७०]

या प्रासंगिक लावणीमधून तत्कालीन परिस्थितीचे चित्र समजण्यास मदत होते. लावणीमधील सर्वच वर्णन खरे नसले तरी त्यामध्ये शाहीरांनी वस्तूस्थिती मांडली असल्याचेही आढळते. इ.स.१८०३ मध्ये पुणे आणि परिसरामध्ये मोठा दुष्काळ पडला होता. यावेळी पेशव्यांचे राज्य डळमळीत झाले असून अंतर्गत बंडाळ्या उदभवल्या होत्या. होळकरांनी लूट करुन प्रदेश बेचिराख करुन टाकला होता. अशा परिस्थितीचे वर्णन रामजोशीनी दुष्काळाच्या लावणीमध्ये केले आहे. जनतेचा चाललेला छळ, नैतिकतेचा झालेला अध:पात, महागाईचा कहर आणि सामान्यांची अगतिकता यांचे करुणाजनक चित्र मांडताना तो म्हणतो -

कोणा न कुणि मना येईल तसें जनासि जन वंचिती ।

धनानिमित्तें मरती किती गरती धरुनि यवन अन्न चारिती।

आठ दिवसामधीं पटाण निंदा लुटावया धांवती ।[७१]

दुष्काळ आणि यवनांचा जुलूम यामुळे सामान्य जनता कंटाळलेली होती.यवनांचे अनुकरण करणारी जनता अधर्माकडे झुकते आहे अशी समाजाची तक्रार होती.होळकरांनी केलेल्या दंग्याची जनतेच्या मनातील भावना रामजोशीनी होळकरांचा दंगा या लावणीत पुढीलप्रमाणे मांडली आहे -

धरिती ब्राम्हणादिकांची शेंडी, गवसल्या न संडी।

घेती मोहरांनी भरलली गुंडी, जडिताची करंडी।[७२]

## उ. लौकिककथा सांगणाऱ्या लावण्या

पेशवेकालीन शाहीर लौकिककथा लावणीमधून सांगुन लोकांचे मनोरंजन करत असत. या लौकिककथा सिंहासनबत्तिशी व वेताळपंचविशी अशामधून परंपरेने आलेल्या असत. शाहीर भवानी साळी याने वामन नावाच्या ब्राम्हणाच्या पत्नीने (कमळाने) आपल्या नवऱ्याला संकटातून कसे सोडविले ती मनोरंजक कथा आपल्या लावणीमधून सांगितली आहे.[७३] अनंत फंदीची 'तीन थानीची कथा' हीदेखील अतिशय लोकप्रिय काव्यकथा आहे.या लावणीत शाहीरांने ईश्वरीकृपेमुळे विपरीताचे सुपरीत घडते असा संदेश दिला आहे. आंधळ्याला दृष्टी आल्याचे, कुबड्याचे कुबड बसल्याचे आणि तीन थानीचे थान जिरल्याचे सांगतो.[७४] तमाशाचा कार्यक्रम त्यावेळी रात्रभर चालत असल्याने प्रेक्षक कंटाळणार नाहीत याची काळजी तमासगीरांना घ्यावी लागत होती. यासाठी एखादी लौकिककथा निवडून ती लावणीरुपात अथवा पद्यामध्ये सांगितली जात असे. आधुनिक तमाशात जो वग नावाचा नाट्यप्रकार उदयास आला त्याचे मूळ स्वरुप या लौकिक कथापर लावण्यामध्ये आहे. अशाप्रकारे शाहीरांनी विविध विषयावरील लावण्यांची रचना करुन लोकांचे मनोरंजन केले.

## ४.७.३. अध्यात्मिक व भेदिक लावण्या

पेशवेकालीन तमाशामध्ये शृंगारिक आणि विविध विषयावरील लावण्या सादर केल्यानंतर अध्यात्मिक अथवा भेदिक लावण्या सादर केल्या जात होत्या. अध्यात्मिक प्रकारची लावणी पंथीय वाङ्मय व संतांची स्फुटरचना या परंपरेमधून आलेली आहे. ऐहिक जीवन जगण्यात पूर्णपणे रमलेल्या समाजाला आदर्श जीवनाचे स्वरुप सांगण्यासाठी, तसेच विश्वाचा अर्थ, भक्ती, ज्ञान, वैराग्य, आत्मज्ञान इत्यादींचे स्वरुप सांगण्यासाठी अशा लावण्याची रचना शाहीरांनी केली. अशा लावणीत साक्षात्काराचे व गुरुकृपेचेही वर्णन आढळते. या प्रकारातील लावण्यांची रचना करणारे शाहीर अध्यात्मिक अनुभवाने संपन्न असलेले दिसतात. निखळ अध्यात्मिक अनुभवाचे वर्णन त्यांनी आपल्या लावणीत केल्याचे आढळते. परमेश्वराच्या भेटीसाठी गंगूहैबतीची चाललेली विनवणी पुढील लावणीत आढळते -

दे गा पायी जागा पंढरीच्या पांडूरंगा ।
शरण तुला मी आलो अरे जगदीशा।
सोडवी मजला भक्त-भव-भय-भंगा ।।[७५]

नामाचे महत्व मध्ययुगीन संतांनी आपल्या अभंगातून आणि काव्यातून व्यक्त केलेले आढळते. त्याप्रमाणेच शाहीरांनी आपल्या लावण्यांमधूनही नामाचा महीमा गायलेला आढळतो. गंगूहैबती नामाचा गजर करताना म्हणतो -

पंढरीनाथा श्रीभगवंता नाम तुझे अमृत ।

उदार देहाचा देता झाला तरले साधुसंत ।

भक्तासाठी धरला अवतार या कलित ।

करा दासावर दया महाराज रुक्मिनीच्या कांत ।। [७६]

होनाजी बाळाने शास्त्रीय संगीताच्या शैलीत लावण्या सादर केल्या. 'घन:श्याम सुंदरा'[७७] ही त्याची लावणी भूपाळी रागावर आधारित असून अध्यात्मिक लावणीचे ते एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अद्यापही त्याची ही लावणी महाराष्ट्रीय जनतेला मोहित करते.

अध्यात्मिक लावण्यांबरोबरच भेदिक लावण्याही सादर करुन लोकांचे मनोरंजन केले जात होते. या भेदिक लावण्या पौराणिक व लौकिक स्वरुपाच्या होत्या. पौराणिक लावण्यामध्ये रामायण-महाभारत यासारख्या धार्मिक ग्रंथांचा आधार लावणीकार घेत होते. काही भेदिक लावण्यामध्ये लौकिकाशी असलेले प्रश्न विचारुन त्यांची उत्तरे दिली जातात. परशरामाच्या लावणीत काही अध्यात्मिक प्रश्नाची सोडवणूक केलेली आढळते. बापा आधी लेक जन्मली [७८] या त्याच्या लावणीत त्याने पहिला कोण? पुरुष की स्त्री? अशाप्रकारचे प्रश्न निर्माण करुन लोकांचे मनोरंजन केले. शाहीरांनी जशा अध्यात्मिक लावण्या लिहिल्या, त्याचप्रमाणे उपदेशपर अथवा बोधपर लावण्यांचीही रचना केली. अशा लावण्यांतून समाजातील दोषावर बोट ठेवून लोकांना चांगला उपदेश केला आहे. कोणातरी गुरुच्या प्रभावामुळे शाहीर नीतीचा सदुपदेश लोकांना सांगू लागले होते. संसार हा असार आहे. धनाला जो मातीसमान मानतो तोच खरा साधु होय. हरीनामचिंतन करुन परमार्थसाधना कर, आणि पंढरीची आषाढी कार्तिकी वारी कर असे सांगताना अनंत फंदी आपल्या लावणीत म्हणतो -

दे सोडूंनि तरी फंद वाऊगे - विषयाची तरी काय मजा ।

हरीनामाचा लाव ध्वजा ।

पंढरीस कार्तिकी आषाढी दु वक्त येत जात जा ।[७९]

लंडे गुंडे हिरसे तटू ही अनंत फंदी यांची प्रसिध्द उपदेशपर लावणी होय. ही लावणी उपदेशपर फटका म्हणून प्रसिध्द आहे. त्यामध्ये तो म्हणतो -

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको ।
संसारामधी ऐस आपला उगाच भटकत फिरु नको ।
चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलू नको ।
पर धन पर नार पाहुनि चित्त भ्रमु हे देउ नको ।[८०] या फटक्यामुळे अनंत फंदी यांना खूप लोकप्रियता मिळाली. या फटक्यामधून त्यांनी सामान्य माणसाला सावधानतेचा, दक्षतेचा, स्वरक्षणाचा, स्वहिताचा आणि सुरक्षित व संपन्न जीवन जगण्याचा सल्ला दिला आहे. मानवी जीवन आणि शरीर क्षणभंगूर असल्यामुळे त्यात गुंतून पडू नका.जोपर्यंत तुमच्याजवळ ज्वानीचा जोर आहे आणि धनदौलत आहे तोपर्यंत सगळे तुमच्या मागे लागतील. मात्र ज्यावेळी तुमच्याजवळील या गोष्टी संपतील त्यावेळी तुम्हाला कोणी विचारणार नाही हे सांगताना रामजोशी म्हणतो -

दो दिवसांची तनु ही साची, सुरतरसाची करुनि मजा ।
गमजा करितां मनिं उमजाना हें सुख न पुढे पडेल वजा ।
भाई सावध व्हा ।[८१]

अशाप्रकारच्या अनेक लावण्यांची रचना करुन त्यांनी सामान्य लोकांना उपदेश केला होता. पेशवेकालीन शाहीरांनी अध्यात्मिक व भेदिक प्रकारातील लावण्यांची मोठ्याप्रमाणात निर्मिती करुन सामान्य लोकांचे मनोरंजन करत करत त्यांना अध्यात्माचे आणि उपदेशाचे धडे देण्याचेही काम केले.

## ४.७.४. मुजऱ्याची लावणी

नाटकातील भरतवाक्याप्रमाणे तमाशाच्या शेवटी 'मुजरा' गाण्याची पध्दत होती. मुजऱ्यामध्ये निरनिराळ्या शाहीरांना वंदन करण्यात येऊन त्यांचा आशीर्वाद मागण्यात येई. त्याबरोबरच साधू, संत, बैरागी, अवलिये यांनाही वंदन केले जाई. लावणीकारांची परंपरा

समजण्यासाठी मुजऱ्याच्या लावण्या उपयोगी पडतात. 'मुजऱ्याची लावणी'[८२] या लावणीत पूर्वसूरींची नावे उपलब्ध होतात. हरदासगुनी, शहाजी बाबा, तुकनगीर, दळमीड, रणभीड, सुप्याचा कादर, व्दारकादास, धोंडी सीपाई, फकांडा, लहरी मुकिंदा, सताप्पा, बाळा बहिरु, सिदरावळ इत्यादी रचनाकारांचे उल्लेख आढळतात. लावणीमध्ये ज्या अनेक परंपरा दिसतात, त्यातील कांही संदर्भ या लावण्यावरुन समजण्यास मदत होते.

## ४.८ तमाशाच्या विकासामधील प्रमुख शाहिरांचे योगदान

### ४.८.१ होनाजी बाळा (इ.स.१७५४-इ.स.१८४४)

होनाजी बाळा हा पेशवेकालीन प्रसिध्द शाहीर होय. हा जातीने नंदगवळी असून त्याचे आडनांव शिलारखाने असे होते. त्याला वंशपरंपरेने कवित्वाची देणगी लाभली होती. त्याचा आजोबा साताप्पा हा पहिल्या बाजीरावाच्या काळापासून पेशव्यांच्या पदरी होता. तो पुढे वरदी सत्पुरुष म्हणून तमासगीर शाहीरात प्रसिध्द पावला होता.[८३] सताप्पाला बाळा, कुशाबा व सयाजी असे तीन मुलगे होते. या तिघापैकी बाळाला बहिरु रंगारी नावाचा साथीदार मिळाल्यामुळे 'बाळा बहिरुचा तमाशा' जास्त प्रसिध्दीस आला होता. थोरल्या माधवराव पेशव्याच्या काळात त्याचा तमाशा पुण्यामध्ये गाजत होता. कुशाबादेखील तमाशामध्ये गात असे. सयाजीबद्दल मात्र जास्त माहिती मिळत नाही. त्यावरुन तो तरुणपणी वारला असावा आणि त्याचाच मुलगा म्हणजे होनाजी बाळा हा होय. होनाजीला अशी त्याच्या घराण्याकडून शाहीरी परंपरेची देणगी लाभलेली होती. त्यामुळेच उत्तर पेशवाईत त्याचा तमाशा लोकप्रिय बनला होता.

सवाई माधवरावाच्या काळात होनाजीने स्वत:चा तमाशाचा फड सुरु केला. त्याला बाळा करंजकर नावाचा साथीदार मिळाल्यामुळे त्यांचा तमाशा 'होनाजी बाळाचा तमाशा' या नावाने आणि तोसुध्दा होनाजी बाळ या नावाने प्रसिध्दीस आला.[८४] होनाजीने लावणी रचावी आणि बाळा करंजकराने ती तमाशामध्ये उत्तमपणे गावी असा त्याच्या तमाशाचा प्रघात होता.होनाजीला वंशपरंपरागत कवित्वाचे वरदान लाभल्यामुळे त्याच्या तमाशामध्ये इतर शाहीरांच्या लावण्या गाण्याची वेळ येत नव्हती. बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीत तर होनाजीचा तमाशा जास्त प्रसिध्दीस आला होता. दुसऱ्या बाजीराव पेशव्याला नाचगाण्याचे खास वेड होते आणि त्याचा

सेनापती त्रिंबकजी डेंगळे बाजीरावाच्या चैनबाजीच्या शोकांत कांहीही कमतरता पडणार नाही याची काळजी घेत असे.होनाजी आणि त्रिंबकजीचे जवळचे संबध होते. शिमग्याच्या सणावेळी शनिवार वाड्यापुढे पाच दिवस तमाशा करण्यासाठी होनाजीला दरवर्षी तीनशे रुपये मिळत होते. त्याने पेशव्याकडून मिळालेले शेले, दुपट्टे व रोख देणग्यांचा संचय त्रिंबकजीच्या शुक्रवार पेठेतील वाड्यामध्ये केला होता. या वाड्यामध्ये होनाजीची एक खोली असून त्यामध्ये त्याने आपली डफ, तंबोरी, मंजीरी इत्यादी वाद्ये व मिळकत ठेवली होती. पेशवाई गेल्यावर होनाजीला बडोद्याच्या दरबाराचा आधार घ्यावा लागला.

होनाजीने चार पाच पोवाडे आणि सुमारे दिडशे लावण्या रचल्या आहेत.त्यापैकी रंगाचा पोवाडा[८५] आणि बाजीरावाची स्तुती करणारा पोवाडा[८६] प्रसिध्द आहे. त्याने शृंगारिक, ईश्वरस्तुतीपर, पौराणिक कथापर, क्षेत्रवर्णनपर व सामाजिक आशय असणाऱ्या लावण्यांची रचना केली. 'घन:शाम सुंदरा'[८७] ही त्याची भूपाळीची लावणी अजरामर झाली आहे. त्याने अनेक शृंगारिक लावण्या लिहिल्या असून त्यापैकी 'लटपट लटपट तुझे चालणे' ही लावणी आजही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे.[८८] होनाजीच्या काव्याचा प्रभाव आधुनिक मराठी काव्यावर पडला होता. गोविंदाग्रजांनी होनाजीच्या भूपाळीपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्राची भूपाळी लिहिली असून त्यामध्ये होनाजीचा गौरव पुढीलप्रमाणे केला आहे.

तुला जागवी ऐन पहाटे गवळी गोपाळ। धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ।।

## ४.८.२ अनंत फंदी (इ.स.१७४४-इ.स.१८१९)

अनंत फंदी याचा जन्म इ.स.१७४४ मध्ये यजुर्वेदी कौंडिण्य गोत्री ब्राम्हण कुटूंबात झाला होता.त्यांचे आडनाव घोलप असून वडीलार्जित गोंधळीपणाचा व सराफीचा व्यवसाय होता. त्यांच्या छंदीफंदी वर्तनावरुन लोक त्यांना फंदी म्हणू लागले आणि तेच नाव पुढे रुढ झाले.[८९] त्यांचे वडील अनंताच्या लहानपणीच वारले असल्यामुळे त्यांचा सांभाळ आई राऊबाई हिने केला होता. त्यांचे बालपण खोड्या व उनाडग्या करण्यात गेले होते. एके दिवशी त्यांच्या आईने त्यांच्याच गावातील म्हणजे संगमनेर मधील भवानीबुवा यांच्या मठात नेले. त्यांच्याकडे अनंताच्या खोडकरपणाची तक्रार केली. त्यावेळी तक्रार ऐकून भवानीबुवांनी अनंताला धोंडा भिरकावून

मारला आणि अनंताला काव्य स्फुरले असे सांगितले जाते. यावरुन भवानीबुवा हे गुरु लाभल्यामुळे अनंतामधील कवित्व बहरत गेले होते.

अनंत फंदीच्या पूर्वजांचा गोंधळ्याचा पिढीजात व्यवसाय असल्यामुळे, त्याच्या अंगातील गुणामुळे व त्याने घेतलेल्या परिश्रमामुळे त्याच्या शाहीरीचा विकास होत गेला.त्याच्या मागच्या पिढीकडून आलेली कवित्वाची देणगी त्याने व त्याच्या पुढच्या पिढ्यानीही चालू ठेवली. पेशवेकाळात तो शाहीराबरोबरच कीर्तनकार म्हणूनही प्रसिध्दीस आला होता. एक शाहीर म्हणून त्याच्या थोरवीचे गुणगान करताना शाहीर होनाजी बाळा म्हणतो -

फंदी अनंत कवनाचा सागर । अजिंक्य ज्याचा हातखंडा ।
चमत्कार चहुंकडे चालतो । सृष्टीवर ज्याचा झेंडा ।[१०]

अनंत फंदीच्या हयातीतच ही स्तूतीपर दीर्घ लावणी रचली होती. या लावणीवरुन तत्कालिन शाहीरामध्ये अनंत फंदीला एक विद्वान शाहीर म्हणून मानसन्मान असल्याचे स्पष्ट होते. त्याने सवाई माधवराव व दुसऱ्या बाजीरावाच्या दरबारामध्ये एक कवी म्हणून स्थान, वजन व दबदबा निर्माण केला होता. वयाच्या पंचवीसाव्या वर्षी स्वत:चा तमाशा फड उभा केला होता. त्याच्या तमाशातील साथीदार मलीक फंदी हा जातीने मुसलमान असून तोदेखील अनंत फंदीचा गुरु होता. राघव फंदी हा त्यांच्या तमाशातील दुसरा झिलकरी अथवा साथीदार असून तो जातीने गुरव होता. रतन फंदी हा त्यांच्या तमाशातील नाच्या असून तो दिसायला अतिशय नाजूक व कोमल होता. तो दिसावयास अतिशय सुंदर असून बायकी हावभाव करण्यात कुशल होता.[११]

अनंत फंदीने तमाशा कलेत शिखर गाठले होते. तमाशे करण्याकरिता अनेक प्रांतामध्ये फिरुन त्याने लौकिक मिळविला होता.त्याबद्दल होनाजी म्हणतो, ‘मोठ्या मोठ्या राज्यामधी महशूर। जगजाहिर चारी तर्फा।।’[१२] संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर माळवा, इंदूर, ग्वाल्हेर, महेश्वरी, बडोदे या ठिकाणी फड गाजवून शाब्बासकी, वाहव्वा आणि बक्षिसे मिळविली होती. तसेच महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये तमाशाची कला सादर करुन प्रसिध्दी मिळविली होती. प्रसंगी जागेवरच शीघ्रकविता सादर करुन श्रोत्यांना चकीत करुन सोडण्याचे सामर्थ्य त्याच्या काव्यामध्ये होते. त्यामुळे रात्र पडताच सुरु केलेला तमाशा दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चालविण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ होते.[१३]

अनंत फंदीचे नऊ पोवाडे, तीस चाळीस लावण्या आणि श्रीमाधव हा ग्रंथ उपलब्ध आहे. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर पेशवे दरबारात घडलेल्या राजकीय घडामोडींची माहिती देणारा हा उत्तम ग्रंथ आहे. राजकीय घटनाबरोबरच प्रजेवरील अन्याय अत्याचाराचाही पाढा व दुष्काळाचेही वर्णन केलेले आहे. त्यांने रचलेल्या बिकट वाट वहिवाट नसावी। धोपट मार्गा सोडू नको। या फटक्यामुळे त्याचे नाव अजरामर झाले आहे.

## ४.८.३ परशुराम (इ.स.१७५४ - इ.स.१८४४)

महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेमध्ये लोकप्रिय असणारा आणखी एक पेशवेकालीन शाहीर म्हणजे परशुराम हा होय. गोदावरीच्या काठावरील वापी या गावचा तो रहिवाशी होता. त्याचा वडीलार्जित शिंप्याचा व्यवसाय होता. वयाच्या पंधरा- सोळाव्या वर्षी त्याने मंजूर गावाजवळील जंगलात विठ्ठलाच्या मंदिरात ज्ञानेश्वरीचे पारायण सात दिवस केले आणि त्याला विठ्ठलाचा साक्षात्कार झाला, अशी अख्यायिका सांगितली जाते.[९४] तो आपल्या लावणीच्या शेवटी स्वत:च्या नावाचा उल्लेख करण्यापूर्वी ‘नामी विठ्ठल’, ‘नामें विठ्ठल’ किंवा ‘वरदी विठ्ठल’ असा उल्लेख करतो. विठ्ठलाचा साक्षात्कार झाल्यामुळे तो असा उल्लेख करत असावा असे एक मत आहे तर दुसऱ्या मतानुसार त्याच्या गुरुचे नाव विठ्ठल खत्री असे असल्याने तो हा उल्लेख करीत असावा.[९५] लावणीकारातील कलगीवाले व तुरेवाले या दोन पक्षापैकी परशुराम हा कलगीवाला होता.

परशुरामाने रचलेल्या पोवाड्यांपैकी दहा पोवाडे आणि सुमारे एकशे पासष्ट लावण्या उपलब्ध आहेत. त्याने ईश्वरवर्णनपर, अध्यात्मिक व भेदिक, पौराणिक कथाकथनपर, बोधपर किंवा उपदेशपर, समाजस्थितीवर, स्थलवर्णनपर व मोठ्या प्रमाणात शृंगारिक लावण्या रचल्या. त्याच्या अध्यात्मिक व धार्मिक लावण्यामुळे त्याला तत्कालीन तमासगिरातील ‘वरदी’ पुरुषाचा मान मिळाला होता.[९६] त्याने ऐन तारुण्यात स्वत:चा तमाशाचा फड सुरु केला होता.त्याचा तमाशा नाशिकजवळील तीस मैल अंतरावरील धनवटांत गाजत होता.गोदावरीच्या काठावरील या प्रदेशात त्याला कोणी प्रतिस्पर्धी नव्हता, एवढी त्याच्या तमाशाला प्रसिध्दी मिळाली होती. तो स्वत: उत्तम कवी असल्यामुळे त्याला इतरांच्या लावण्या गाण्याची गरज भासली नाही. त्याच्या

तमाशात नाच्यापोऱ्या, सोंगाड्या, गाणारे, आणि सुरते ही सगळी चांगली कलाकार मंडळी होती.त्यामध्ये बाबा सातभाई, मलुराज, नारायण, सका शिंपी, भवानी तेली उर्फ बाकेराव, बापू, रामा कुंभार, गोविंद सोनार, बाबाजी शिंपी, येसू रामकृष्ण, महादू इत्यादी कलाकार होते.[९७] यापैकी भवानी तेली उर्फ बाकेराव हा खूप प्रसिध्दीस आला. तो मुळचा रुंभोडीचा एका तेल्याचा मुलगा होता. सुरुवातीला त्याला दरवर्षी दहा रुपये पगारावर ठेवले होते. त्याचे काम अतिशय लोकप्रिय होत गेल्यामुळे त्याचा पगार दहावरुन पंधरा रुपये व पुढे वीस रुपये केला गेला. तमाशात स्त्रीचे सोंग काढण्यामध्ये तो अतिशय तरबेज होता.

दुसऱ्या बाजीरावापूर्वीचे पेशवे ख्यालीखुशाली आणि रंगढंगामध्ये बाजीरावाइतके वेळ घालविणारे नव्हते. फक्त होळीच्या सणावेळी मात्र ते चार दिवस शौकामध्ये घालवित असत. पेशवे दप्तरात होळीच्या सणावेळी गाणारे, नाचणारे, शाहीर, तमाशेवाले यांना दिलेल्या बिदाग्यांच्या अनेक नोंदी आढळतात.त्यापैकी एका नोंदीमध्ये शिमग्यामध्ये पेशव्यांच्या वाड्यामध्ये तमाशाचे खेळ करणाऱ्या कलाकारांना ९८७॥ रु. आणि पोशाख दिल्याची माहिती मिळते.[९८] बाजीरावाच्या काळापर्यंत परशुरामाच्या नावाचा उल्लेख मात्र आढळत नाही. बाजीराव हा नाचगाण्याचा आणि तमाशाचा शौकी असल्यामुळे त्याचा एकही दिवस गाणे किंवा तमाशाविना जात नव्हता. परशुरामाचा तमाशा पुण्याला आला असताना बाजीरावाने त्या तमाशातील नाच्या भवानी तेली उर्फ बाकेराव यास स्वहस्ते ५०० आणि १५०० एवढी देणगी दिली होती. बाजीरावाची एकदा कोपरगाव मुक्कामी स्वारी असताना त्याच्यासोबत सगनभाऊ, होनाजी बाळा, धोंडी मेहत्या, बापू डांग्या, मार्तंड इत्यादी तमासगीर त्याच्याबरोबर होते.[९९] त्यावेळी त्रिंबकजी डेंगळेला बावीस पाठवून परशुरामाला बोलावून घेण्यात आले. परशुरामच्या आगमनानंतर प्रत्येक तमासगीराने आपआपला तमाशा बाजीरावासमोर सादर केला. यावेळी होनाजीने गंगेवर रचलेल्या लावणीचे कडवे गायले. ज्यावेळी परशुरामाची पाळी आली त्यावेळी त्याने तिथल्या तिथेच उत्स्फूर्तपणे 'पश्चिम वाहीनी गोदा, प्रतिमूळ गंगा ' ही गंगेवर रचलेली लावणी सादर केली.[१००] या लावणीत त्याने गंगेच्या स्तुती बरोबरच राघोबा व बाजीरावाचीही स्तुती केली होती. यावेळी बाजीरावाने भवानी नाच्यास हजार रुपये बक्षिस दिल्याची दिनचर्येमध्ये आहे. ती अशी की, 'श्रीमंत फराळ करुन पोरग्याचा तमाशा करंविला. मरजी खुस होऊन भवानी

नाच्यास हजार रुपये बक्षीस दिले व गाणाऱ्यास ५० रुपये देऊन बारा घटकास निद्रेस गेले. छ ६ रोज शुक्रवार मुक्काम कोपरगांव.'[१०१] याप्रसंगी परशुरामासही तो जहागीर देत होता मात्र त्याने ती नाकारली होती. त्याब-ल परशुराम म्हणतो -

'पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा ।
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बंदा
सुईदोऱ्याला हयात असो द्या तोची इनाम मोकासा ।
निजकर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा।।'[१०२]

असे नि:स्पृह आणि चोख उत्तर देण्याचे धाडस त्याच्याजवळ होते. त्याच्याजवळ इतर तमासगीरापेक्षा प्रेक्षकांना हसविण्याची विनोदी कला जास्त होती. अश्लिल लावण्यापेक्षा त्याने उपहासात्मक व हास्यकारक लावण्यांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचे कार्य केले. सवती सवतींचे झगडे, दोन बायकांच्या नवऱ्याची फजिती, गंगा गौरी किंवा पार्वती आणि गंगा यांनी एकमेकींची काढलेली वर्मे असे विषय त्याने लावण्यासाठी निवडले होते. पेशवाईचा अंत झाल्यावर मात्र सर्वच तमासगीरांचा आधार तुटला. त्यामुळे इ.स.१८१८ -१८४४ पर्यंत त्याने उत्तरेत तमाशा नेऊन बक्षिसी मिळविली.

## ४.८.४ रामजोशी (इ.स.१७६२ - इ.स.१८१२)

पेशवेकाळात गाजलेला एक शाहीर आणि कीर्तनकार म्हणजे रामजोशी हा होय. रामजोशीचे घराणे मुसलमानी राजवटीच्या काळापासून सोलापूरात रहात असल्यामुळे त्यांना सोलापूरकर रामजोशी असे म्हणतात.[१०३] त्यांच्या घराण्याकडे सोलापूरच्या जोशीपणाचे वतन देण्यात आले होते. या घराण्याचा ज्योतिषाचा आणि कीर्तनकाराचा अथवा पुराणिकाचा पेशा होता. त्यांच्या वडीलांचे नाव जगन्नाथ जोशी असे असून ते अतिशय विद्वान व वेदशास्त्रसंपन्न होते. बाळाजी बाजीराव पेशव्यांनी त्यांचा 'ज्योतिषविश्व अतिनिपुण व सिध्दान्तवक्ते' अशा शब्दात गौरव केला होता.[१०४] तसेच त्यांचा व बंधु अनंत जोशी याला पेशव्यांनी इ.स. १७५८ मध्ये पुणे मुक्कामी तीस बीघे जमीन इनाम दिल्याची सनद दिली होती.[१०५] रामजोशीचे वडील बंधू मुगदलशास्त्री हेदेखील वेदाध्ययन केलेले आणि काव्याशास्त्राचा चांगला व्यासंग असणारे

होते. वडीलांच्या निधनामुळे त्यांनी रामजोशींचा सांभाळ केला होता. अशा प्रखर विद्वत्तेची परंपरा लाभलेल्या घराण्यात रामजोशींचा जन्म झाला, मात्र तो तेथे न रमता तमासगीर म्हणून उदयास आला हे खास वैशिष्ट्य होय.कारण ब्राम्हण वर्गातील लोक आतापर्यंत तमाशाकडे वळले नव्हते. महाराष्ट्रातील इतर जातींनी तमाशाची कला विकसित करण्यामध्ये महत्वाचे योगदान दिले होते. मात्र रामजोशीच्या तमाशातील आगमनामुळे तमाशा कलेच्या विकासाला गती मिळाली होती.

रामजोशी अतिशय हुशार असूनही त्याने लहानपणी बिलकूल अभ्यास केला नाही.त्याने आपले बालपण उनाडग्या करण्यामध्येच घालविले होते. त्यामध्येच त्याने घरासमोर असणाऱ्या धोंडी शाहीराच्या फडावर जाऊन बैठक थाटली. सुरुवातीला रामजोशीने धोंडी शाहीराला अनेक लावण्या रचून दिल्या होत्या. रामजोशीची ही वागणूक भावाला आवडली नाही. त्यामुळे दोघांनी एकमेकापासून कायदेशीर फारकत घेतली. धोंडीच्या फडावरच त्याला तमाशाची गोडी लागली आणि असंख्य लावण्यांच्या निर्मितीला त्याच्याकडून सुरुवात झाली. आपल्या भावाला दु:ख होईल म्हणून त्याने लावणीच्या शेवटी ‘कविराय’ असा उल्लेख केलेला आढळतो.[१०६]

इ.स.१७८० ते १७८२ या काळात महाराष्ट्राच्या राजकीय जीवनामध्ये अनेक घडामोडीनी घडत होत्या. त्याचवेळी रामजोशीच्या वैयक्तिक जीवनामध्येही अनेक घडामोडी चालू होत्या. अनेक मित्रांची त्याला संगत मिळाली असून त्याचे फडामध्ये चांगले मन रमत चालले होते. धोंडीच्या फडामध्ये एकरुप झालेल्या रामने स्वत:चा तमाशा फड काढण्याचा निर्णय घेतला. इ.स. १७८२ ते १७९२ या काळात त्याने संपूर्ण महाराष्ट्राला तमाशामध्ये तल्लीन करुन सोडले.[१०७] त्याचा आवाज अतिशय पहाडी असून डफ, हालगी, तबला, ढोलकी यासारखी वाद्ये वाजविण्याचे ज्ञान त्याने धोंडीच्या फडामध्येच घेतले होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या गावागावातील लोकांना तमाशा कलेकडे आकर्षित करण्याचे काम त्याने केले. तो जनसमुदायासमोर लावण्या सादर करु लागला की लोकांच्या मुखातून चित्कार आणि शिट्ट्यांची बरसात होत होती. हिलालाच्या प्रकाशात त्याच्या तमाशात शृंगाररसाची उधळण होत होती. उत्तररात्रीपर्यंत चाललेला खेळ संपल्यानंतरही प्रेक्षकांना अजूनही तमाशा चालला पहिजे होता

असे वाटे. त्याचा तमाशा अतिशय लोकप्रिय झाल्यामुळे त्याला अनेक गावांची निमंत्रणे येत असत. त्यामुळे अफाट लोकप्रियता आणि अमाप पैसा मिळवत त्याने महाराष्ट्रभर भ्रमंती केली.

रामजोशीच्या भ्रमंतीमध्ये त्याची गाठ चिमा आणि बया या दोन गणिकांशी पडली आणि त्या दोघींना त्याने आपल्या फडामध्ये सामावून घेतले. आपल्या सौंदर्याने समोरच्यांना घायाळ करणाऱ्या बयाबाईचा आवाजही अतिशय चांगला होता. रामजोशीने लावणी रचावी आणि बयेने त्याला सुरेल चाल लावून ती पेश करावी. यामुळे हा हा म्हणता साऱ्या महाराष्ट्रात रामजोशी आणि बया ही नावे लोकांना चांगली परिचित झाली. तिच्या आगमनामुळेच आपला तमाशा जास्त लोकप्रिय झाला असे रामजोशीला वाटत होते. त्यामुळे बयेची आपल्याशी पडलेली गाठ हा दैवयोग आहे असे तो म्हणतो.

बयाबाईच्या गायनाबरोबरच त्याचा तमाशा लोकप्रिय होण्यामध्ये चिमाचा देखील महत्वाचा वाटा होता. ती उत्तम नर्तिका असून तिच्या नृत्याने रसिकांची झोप उडविली जात असे.[१०८] अशी नाच करणारी नाची त्याच्या तमाशामध्ये होती. त्यामुळे पेशवेकाळातील एक प्रसिध्द तमाशा फड रामजोशीला उभा करता आला. स्वत: रामजोशी उत्तम दर्जाचा शाहीर असल्याने एकापेक्षा एक सरस अशा शृंगारिक लावण्याची रचना करुन त्या तमाशामध्ये सादर केल्या. त्याच्या शृंगारिक लावण्यातील लोकप्रिय लावणी सुंदरा मनामध्ये भरली ही होय. ती सादर करताना तो म्हणतो -

'सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्याचा भांग ।
अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाहीं फिरली कुणाची सांग।।'[१०९]

या लावणीत स्त्रीसौंदर्याचे मोहक आणि उन्मादक वर्णन शाहीराने केले असून त्याच्या सर्वच लावण्यांमध्ये शिष्टपणा आढळतो. त्याच्या लावण्यातील स्त्रीच्या यौवनाची, प्रियकरासाठी होणाऱ्या तळमळीची वर्णने असली तरी ती सर्व वैवाहिक जीवनातील आणि प्रस्थापित नीतीच्या मर्यादेतील आहेत. त्यामुळे इतर समकालीन शाहीर आणि रामजोशी यांच्यामध्ये फरक जाणवतो. त्याने शृंगारिक लावण्याबरोबरच देवतावर्णनपर, उपदेशपर, समाजस्थितीपर आणि विविध विषयावरील लावण्या रचल्या. अनंत फंदीचे उपदेशपर फटके जसे अजरामर झाले आहेत, त्याप्रमाणे रामजोशीच्या उपदेशपर लावण्यांही मानवी मनाची पकड घेणाऱ्या होत्या. मानवी

जीवन किती क्षणिक आहे हे सांगाताना तो म्हणतो की, ज्यावेळी तुमच्याजवळील तारूण्य आणि धनदौलत संपेल त्यावेळी तुम्हाला कोणीही विचारणार नाही. [११०]

अशाप्रकारच्या लावण्यांमधून समाजाला उपदेश करण्याचे कार्य केले. त्यासाठी सामाजिक विषयदेखील लावण्यामध्ये हाताळले होते. त्यामधून लोकांचे मनोरंजन आणि प्रबोधनही होत होते. विविधप्रकारच्या लावण्या सादर करणाऱ्या रामजोशीचा तमाशाचा ताफा अतिशय थाटामाटामध्ये महाराष्ट्रातील गावांगावांमध्ये फिरत असे. त्याच्या ताफ्यामध्ये त्याचे शार्गिद, वादक, हरकामे, चिमा, बया यांच्याबरोबरच एक उमदा घोडा, दोन कुत्री, दोन माकडे, दोन राघू असा भव्य सरंजाम होता. रामजोशीने गावोगावी फिरत असताना चैन आणि विलासाची परिसिमा गाठली होती. गांजा, भांग व दारु अशी व्यसनेदेखील त्याला जडली होती.[१११] अशाप्रकारे तारुण्य तमाशामध्ये घालविलेल्या रामजोशीला उतारवयात पश्चाताप होऊन तो अध्यात्माकडे वळला आणि एक प्रसिध्द कीर्तनकार म्हणून लोकप्रियता मिळविली.

### **४.८.५ सगनभाऊ** (इ.स.१७७८ - इ.स.१८५०)

मूळचा जेजुरीचा पण पुण्यामध्ये वास्तव्याला असणारा एक प्रसिध्द मुसलमान शाहीर म्हणजे सगनभाऊ शिकलगार हा होय. तलवारींना धार लावणे आणि म्यानें तयार करण्याचा त्याचा व्यवसाय होता.[११२] पुण्यामध्ये होनाजी बाळाचा फड 'गवळ्याचा फड' आणि 'रावळाचा फड' असे दोन तमाशाचे फड गाजत असून त्यांच्यामध्ये खूप स्पर्धा होती. सगनभाऊ रावळाच्या फडामध्ये असून तो तुणतुणे वाजविण्यात वाक्‌बगार होता. त्याची आणि होनाजीची चुरस वाढत जाऊन एके ठिकाणी सगनभाऊ म्हणतो, 'होना गवळ्याचा झाला चुना'[११३] ज्या होनाजीने अनंत फंदी या शाहिराबद्दल गौरव उद्‌गार काढले होते, त्याच्याबद्दल मात्र असे वाईट उदगार काढणारा सगनभाऊ हा त्याचा प्रतिस्पर्धी शाहीर होता. असे असले तरी जन्माने मुसलमान असणाऱ्या सगनभाऊचे मराठी भाषेवर चांगले प्रभुत्व असल्यामुळेच त्याने उत्तम लावण्यांची व पोवाड्यांची रचना केली. तो जसा मराठेशाहीच्या पराक्रमाचे पोवाडे प्रेमाने गात होता तसाच तो मराठी संतांच्या भावनातही रंगून जात असे. मराठमोळ्या लोकांच्या चालीरीती आभिमानाने वाखाणनाऱ्या या शाहीरावर मराठी लोकांचे अतिशय प्रेम होते. विद्वानांनी गजबजलेल्या आणि

ब्राम्हण पेशव्यांच्या दरबारात सगनभाऊ या मुसलमान शाहीरांने आपल्या काव्यगुणांनी मान्यता मिळविली होती. पेशव्यांनी देखील कलाकाराकडे पाहताना त्याच्या जातीधर्माकडे पाहिले नव्हते. रामा गोंधळी हा उत्कृष्ट गायक सगनभाऊला साथीदार म्हणून मिळाला होता. त्यामुळे त्याच्या फडाला प्रसिध्दी मिळाली होती. 'लावणी रचावी सगनभाऊने आणि ती वाजवून म्हणावी रामा गोंधळ्याने' अशी म्हण त्यावेळी तयार झाली होती. रामा गोंधळ्याची लावणी गाण्याची ऐट अप्रतिम असल्यामुळे ती ऐकण्यासाठी प्रचंड जनसमुदाय त्याच्या कार्यक्रमाला हजर रहात होता. त्यामुळे सगनभाऊ आपल्या लावणीच्या शेवटी रामा गोंधळ्याचा मोठ्या गौरवाने उल्लेख करीत असे. 'आ गे सखे घडी वरुषाची' या लावणीचा शेवट करताना तो म्हणतो -

भाऊसगन गुणीजन गाती ।
रामजी चाल गाई नखऱ्याची ।
घडी वरुषाची ।।[११४]

'उभी द्वारी मी वाट किती पाहू' या लावणीच्या शेवटी तो म्हणतो, सगनभाऊचे गुण ऐकुन घेणे। रामा दर्दीचे नवे छंद गाऊ। रामा गोंधळ्याची भरभरुन स्तुती करताना 'गोरे गाल मज पाहाल' या लावणीच्या शेवटी म्हणतो, नाथ सिध्द सगनभाऊ कवन गाई रावळी। रामा दर्दीचे गुण चौमुलखी चौघडे।।[११५]

सगनभाऊने अनेक विषय आपल्या लावण्यांमध्ये हाताळून लोकांचे चांगलेच मनोरंजन केले.त्यामध्ये शृंगारिक, पौराणिक, सामाजिक नितीपर, देवतावर्णनपर, कथनपर अशा अनेक विषयांचा समावेश होता. मुसलमान असूनही त्याने हिंदूदेवदेवतांचे व तिर्थक्षेत्रांचे चांगले दाखले दिले आहेत. अनंत फंदीपासून तमाशात शृंगाराला आलेल्या भरतीने मर्यादा ओलांडण्याचे काम सगनभाऊच्या लावण्यांनी केले. त्याच्या तमाशात कोणताही आडपडदा न ठेवता उत्तान शृंगाराची वर्णने मोठ्या आवडीने म्हटली जात होती. 'दुर्बिन घेऊन हाती' या लावणीमध्ये तो म्हणतो -

चवथा दिवस अहो सिरताज जाते न्हाया ।
चाकपाक येते बनुन, नका पाठवू बोलवाया ।
केस वाळवीत उभी, न कळत याल चोरुनीया ।
आणि आपल्या नादात हळूच कुच धराल धावुनीया ।[११६]

## ४.८.६ प्रभाकर व गंगु हैबती

पेशवेकालीन लोकप्रिय शाहीर म्हणून प्रभाकर ओळखला जातो. त्याचे संपूर्ण नाव प्रभाकर जनार्दन दातार असे असून त्याचा जन्म नाशिकजवळ गंगापूर येथे इ.स.१७५५ मध्ये झाला होता. त्याचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्हातील हर्णेजवळील मुरुड या गावचे.त्याच्या वडीलांचा कारकुनी पेशा असल्यामुळे प्रभाकरास लहानपणापासूनच शिक्षण दिले गेले होते. त्याने गंगापूर सोडून पुण्यामध्ये रास्त्यांकडे कारकुनाची नोकरी केली होती.[११७] यावेळीच त्याने नोकरी करीत दुसरीकडे तमाशाच्या शौकाची हौस फेडून घेतली होती. त्याने गंगु हैबतीच्या फडामध्ये आपल्या शाहीरीला प्रारंभ केला. हा फड पुण्यामध्ये त्यावेळी अतिशय लोकप्रिय होता. या तमाशााच्या फडातील गंगु हैबती, महादबा सुतार, गुणीराज व गंगाधर यांचा सहवास व प्रभाकराची प्रतिभाशक्ती यामुळे तो चांगली काव्यरचना करु लागला. सुरुवातीला गंगु हैबतीची कवने गाणारा हा शाहीर स्वत: चांगल्या लावण्या रचू लागला. त्यामुळे प्रभाकराने लावणी रचावी आणि ती फडातील इतरांनी म्हणावी अशी परिस्थिती त्याने फडामध्ये निर्माण केली. त्याने विविध विषयावर लावण्या रचल्या. त्याने पंढरपूरच्या विठोबावर, कृष्णाच्या मुरलीवर व पौराणिक कथावर रचलेल्या लावण्या अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या. शृंगार हा लावण्यांचा प्राण हे त्याच्या शृंगारिक लावण्यांमधून दिसून येते. त्याचा शृंगारिक लावण्यामध्ये अश्लिलता असली तरी त्यामध्ये अडाणीपणा दिसत नाही.[११८] दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत त्याची कीर्ती कळसाला पोहचली होती. बाजीरावाच्या विलासवर्णनाचे हुबेहुब चित्रण त्याने आपल्या लावण्यांतून केले. रावबाजीवर कोसळलेल्या आपत्तीचे प्रभाकराने केलेली वर्णने अतिशय ऱ्हदयस्पर्शी व करुणरसाने ओथंबलेली होती.त्याच्या लावण्या व पोवाड्यांतून त्यावेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचे चित्रण आढळते. त्याने पेशवाईचा उत्कर्ष व ऱ्हास हे दोन्ही पाहिल्यामुळे त्याचे रेखाटन कवनामध्ये केलेले आढळते.

## ४.८.७ इतर शाहीर

पेशवेकालखंडात तमाशाचा उत्कर्ष घडवून आणण्यामध्ये वरील शाहीराप्रमाणेच इतरही अनेक शाहीर होते. त्यांनी रचलेल्या आणि गायलेल्या अनेक लावण्यामुळे तमाशाला लोकप्रियता मिळत गेली. त्यामध्ये शाहीर कुशाबा, गंगु हैबती, ज्योतीराव, दासमाळू, देवराज, धोंडी,

नागेश, बचू फंदी, बापू, बाळा बहिरु, रामचंद्र, सताप्पा इत्यादी शाहीरांचा समावेश होतो. ज्योतीराम हा १८ व्या शतकाच्या सुरुवातीस उदयास आलेला कवी व लावणीकार होता. त्याने आठ लावण्या लिहून तमाशाच्या विकासाला हातभार लावला होता. त्याच्या लावण्याचा विषय अध्यात्मिक व गुरुस्तुती असा होता. याचवेळी सगनभाऊचा शिष्य दास मालू याने प्रापंचिक व व्यवहारिक जीवनाचे चित्रण लावण्यांमध्ये केले. मुलुखगिरीवर गेलेल्या एका मराठा सरदाराची पत्नी सतत त्याची आठवण काढत बसत असे. त्याची स्वारी बराचकाळ लांबल्यामुळे तो घरी येऊ शकला नाही. म्हणून त्याने जासूदाबरोबर घराकडे एक पत्र आणि दोन तसबिरा काढून पाठविल्या. त्या पाहून त्याच्या भेटीला अंतरलेल्या पतिव्रतेचे वर्णन करताना तो म्हणतो -

स्वामीभेटीचे चिन्ह सांगा, सख्यांनो डोळे झाले पाखरु ।

आज तिसरा महिना माझ्या पतिरायासी।ग्वालेराहुनि आलें पत्र ।।

पत्राखेरिज दोन तसबिरा।त्यांचीन् माझी बहुत मजेचीं चित्रे ।।

उभयतांच्या पाहतां तसबिरा । द्रव येई पाण्यानें भरले नेत्र ।।[११९]

होनाजी बाळाचा आजोबा सात्तापा आणि काका बाळा हे पेशवेकाळातील सुरुवातीचे पुण्यामधील शाहीर म्हणून ओळखले जातात. बाळाला बहिरु रंगारी नावाचा साथीदार मिळाल्यामुळे पुण्यामध्ये बाळा बहिरुचा तमाशा लोकप्रिय झाला होता. शाळीग्रामांनी होनाजी बाळाची म्हणून संपादित केलेली पुढील लावणी बाळा बहिरुची आहे असे य. न. केळकर यांचे मत आहे.[१२०]

अस्त्री प्रलयंगता, तुझी ग बुध नाही कामाची ।

आम्हाला आली पत्रें धन्याची, जलदी करण्याची ।

माधवराव पेशव्याच्या काळापासून बाळा बहिरुचा फड पुण्यामध्ये प्रसिध्द होता. वरील लावणीतील वर्णन केलेल्या कर्नाटक स्वारीच्या प्रसंगावरुन त्याने सवाई माधवरावाचीही सर्व कारकीर्द पाहिली होती. त्याला सहजस्फूर्त अशी कवित्वाची देणगी लाभल्यामुळे त्याची कवने अतिशय रसाळ झाली होती. त्याने बैठकीच्या म्हणजे शांत सुराच्या लावण्या रचल्या होत्या. अशाप्रकारे असंख्य शाहीरांनी पेशवेकाळात तमाशाच्या उत्कर्षाला हातभार लावलेला दिसून येतो.

## संदर्भ


१. जोशी वि. कृ.,लोकनाट्याची परंपरा,पृ.१२६,

पं. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतिकोश, खं. ४, पृ.३९

२. पटवर्धन, एम. टी.(संपा.), फारशी मराठी कोश पृ.९०

३. व्हटकर नामदेव, मराठीचे लोकनाट्य - तमाशा कला आणि साहित्य, पृ.३६

४. कित्ता, पृ.३८

५. जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ.९५

६. कित्ता, पृ. ९५

७. कित्ता, पृ.९५

८. कित्ता, पृ.९८

९. व्हटकर नामदेव, पूर्वोक्त, पृ.४०

१०. सरदेसाई गो. स. पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं.८ पृ.२३

११. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.१११

१२. कित्ता, पृ. ११३

१३. केळकर य. न., मराठेशाहीतील वेचक वेधक, पृ.१११,११२

१४. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं ४३ क्र.१८

१५. चापेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ.३०१

१६. केळकर य. न. पूर्वोक्त, पृ.११३

१७. केळकर य. न. कांही अप्रसिध्द ऐतिहासिक चरित्रे पृ.१५६

१८. व्हटकर नामदेव, पूर्वोक्त, पृ.५५

१९. जोशी, वि. कृ. पूर्वोक्त, पृ.१२४

२०. व्हटकर नामदेव, पूर्वोक्त, पृ.५४

२१. कित्ता, पृ.७३

२२. जोशी, वि. कृ. पूर्वोक्त, पृ. १२३

२३. डॉ. शिंदे विश्वनाथ, पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य, पृ.९२

२४. कित्ता, पृ. ९३

२५. व्हटकर नामदेव, पूर्वोक्त, पृ. ६५, ६६

२६. कित्ता, पृ. ४४

२७. केळकर य. न., होनाजी बाळा यांच्या लावण्या, पृ. ९

२८. डॉ. कुलकर्णी वि. म. डॉ. मोरजे गंगाधर (संपा.), रामजोशीकृत लावण्या, पृ. २५ ते २७

२९. डॉ. मोरजे गंगाधर, डॉ. वाडकर धोंडीराम (संपा.), सगनभाऊकृत लावण्या व पोवाडे, पृ. १०५, १०६.

३०. डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा.), अनंत फंदी यांच्या कविता व लावण्या, पृ. ४३

३१. डॉ. मोरजे गंगाधर, डॉ. वाडकर धोंडीराम (संपा.), पूर्वोक्त, पृ. ९८

३२. डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा.), पूर्वोक्त, पृ. ५७

३३. कुलकर्णी, कृ. पा., मराठी व्युत्पत्तीकोश, पृ.६७६

३४. कित्ता, पृ.६७६

३५. कित्ता, पृ. ६७६

३६. धोंड म. वा., मऱ्हाटी लावणी, पृ.१७

३७. सहस्त्रबुध्दे म. ना., मराठी शाहीरी वाङ्मय पृ. १५

३८. धोंड, म. वा. उपरोक्त, पृ.२२

३९. प्रा. जोग रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खं.३ पृ. ४४७

४०. कित्ता, पृ.४४४

४१. कित्ता, पृ.४४५

४२. धोंड म. वा., पूर्वोक्त, पृ.१४

४३. कित्ता, पृ. १५

४४. कित्ता, पृ.१५

४५. कित्ता, पृ. १६

४६. कित्ता, पृ.१६

**४७.** शाळिग्राम शं. तु. (संपा.), परशराम कवीच्या लावण्या, लावणी क्रं.९

**४८.** डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा.), पूर्वोक्त, पृ.७५,७६

**४९.** शाळिग्राम शं. तु.(संपा.), होनाजी बाळा यांच्या लावण्या, पृ.१६७

**५०.** कित्ता, पृ. ७७

**५१.** केळकर य. न. (संपा.), अंधारातील लावण्या, पृ. १८१

**५२.** जोशी शं. ना.(प्रका), प्रभाकरकृत पदे, कविता, पोवाडे व लावण्या, पृ. १८८

**५३.** डॉ. मोंढे, मधुकर काशीनाथ (संपा), पूर्वोक्त, पृ. ५३

**५४.** जोशी शं. ना. (प्रका), पूर्वोक्त, पृ. १०२

**५५.** शाळिग्राम शं. तु.(संपा.), पूर्वोक्त, पृ. ३१

**५६.** केळकर य. न. (संपा.), पूर्वोक्त, ला. क्र १४ पृ.२२

**५७.** कित्ता, ला. क्र१२ पृ.१८

**५८.** जोशी शं. ना.(प्रका.), पूर्वोक्त, पृ. १५६

**५९.** देशमुख बी. बी., लावणी वाङ्मय उगम आणि विकास, पृ. ३

**६०.** गंधे शिरीष, महाराष्ट्राचे शिल्पकार रामजोशी, पृ. ३१

**६१.** डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा), पूर्वोक्त, पृ.९८

**६२.** धोंड म. वा., पूर्वोक्त, पृ. ३८

**६३.** शाळिग्राम शं. तु. (संपा.) पूर्वोक्त, ला. क्र १३५

**६४.** कित्ता, पृ. १५

**६५.** गंधे शिरीष, पूर्वोक्त, पृ.१००

**६६.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ, पूर्वोक्त, पृ.५७

**६७.** कित्ता, पृ.५८

**६८.** डॉ. मोरजे गंगाधर, मराठी लावणी वाङ्मय, पृ. १२१

**६९.** कित्ता, पृ.१२१

**७०.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा), पूर्वोक्त, पृ. ६१, ६२

**७१.** डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा), पूर्वोक्त, पृ.१२२

**७२.** कित्ता, पृ. १३२.

**७३.** केळकर य. न. (संपा), पूर्वोक्त, पृ.२११ - २१४

**७४.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा), पूर्वोक्त, पृ.५९, ६०

**७५.** केळकर य. न. (संपा), पूर्वोक्त, पृ.१७२

**७६.** जोशी वि. कृ., शाहीर हैबती(चरित्र व काव्य ), पृ. ५०

**७७.** देशमुख बी. बी., पूर्वोक्त, पृ.१२९

**७८.** प्रा. जोग रा. श्री, पूर्वोक्त, खं.३ पृ.४६८

**७९.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा), पूर्वोक्त, पृ.६८

**८०.** कित्ता, पृ. ७२

**८१.** डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा), पूर्वोक्त, पृ. १०२

**८२.** डॉ. मोरजे गंगाधर, पूर्वोक्त, पृ.१२१

**८३.** केळकर य. न., तंत कवि तथा शाहीर, पृ.४०

**८४.** कित्ता, पृ. ४३

**८५.** केळकर, य. न., ऐति. पोवाडे ,पृ.१७६

**८६.** कित्ता, पृ.२४८

**८७.** केळकर य. न. तंत कवि तथा शाहीर पृ.५०

**८८.** शाळिग्राम शं. तु., पूर्वोक्त, पृ.१७०

**८९.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा.), पूर्वोक्त, पृ.३१

**९०.** जोशी, वि. कृ., पूर्वोक्त, पृ. १८६

**९१.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा.) पूर्वोक्त, पृ.३७

**९२.** केळकर य.न., पूर्वोक्त, पृ.६०

**९३.** डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ (संपा.), पूर्वोक्त, पृ.३८

**९४.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १९

**९५.** प्रा. जोग रा. श्री., पूर्वोक्त, पृ.४६७

**९६.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.२७

९७. कित्ता, पृ. २०

९८. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त, खं ४३ ले.१८, आणि खं.७ ले.२४७

९९. केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.२४

१००. नसिराबादकर ल. र., मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ.२७१

१०१. केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.२५

१०२. नसिराबादकर, ल. र. पूर्वोक्त, पृ.२७१

१०३. केळकर य. न. पूर्वोक्त, पृ.६५

१०४. डॉ. कुलकर्णी वि. म. डॉ. मोरजे गंगाधर (संपा.), पूर्वोक्त, प्रस्तावना

१०५. गंधे शिरीष, पूर्वोक्त, पृ.५

१०६. डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा.), पूर्वोक्त, प्रस्तावना

१०७. गंधे शिरीष, पूर्वोक्त, पृ.३५

१०८. कित्ता, पृ.३२

१०९. डॉ. कुलकर्णी वि. म., डॉ. मोरजे गंगाधर (संपा), पूर्वोक्त, पृ. ९३

११०. कित्ता, पृ. १०२

१११. जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. १८८

११२. कित्ता, पृ. १८९

११३. कित्ता, पृ. १८९

११४. डॉ. मोरजे गंगाधर, डॉ. वाडकर धोंडीराम, पूर्वोक्त, पृ.१९

११५. कित्ता, पृ.२८

११६. कित्ता, पृ.१९

११७. केळकर य.न., पूर्वोक्त, पृ.८६

११८. कित्ता, पृ.९५

११९. भावे वि. ल. महाराष्ट्र सारस्वत खं.१ आ.६ वी पृ.५८४

१२०. खानोलकर गं. दे. मराठी वाङ्मयकोश पृ.२०९

प्रकरण

५ वे

# धार्मिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

५.१ प्रस्तावना

५.२ सण, समारंभ व उत्सवामधील सामाजिक मनोरंजन

५.३ कौटुंबिक कार्यक्रमातील सामाजिक मनोरंजन

५.४ प्रमुख तिर्थक्षेत्रे व ग्रामदेवतांच्या यात्रामधील सामाजिक मनोरंजन

५.५ धार्मिक सण, समारंभ, उत्सव व यात्रामधील मनोरंजनाची साधने

५.६ मुस्लीम समाजातील सण - उत्सव आणि मनोरंजन

**प्रकरण पाचवे**

# धार्मिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

## ५.१ प्रस्तावना

पेशवेकाळात शाहीरी मनोरंजनाला अतिशय महत्व प्राप्त झाले होते. शाहीरांनी लावण्या आणि पोवाडे गाऊन मराठी लोकांचे चांगले मनोरंजन केले. पेशवाईच्या उत्तरार्धात तमाशाला अतिशय बहर आला होता. त्याने रगील आणि रंगेल लोकांचे चांगले मनोरंजन केले. याशिवाय अध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकांचे मनोरंजन करण्यासाठी कांही पारंपरिक तर कांही नवी मनोरंजनाची साधने उदयास आली होती. या साधनांना धार्मिक मनोरंजनाची साधने म्हणून ओळखले जाते. या साधनामध्ये कीर्तन, भजन, पुराणपठण, लळीत, गोंधळ, जागरण, दशावतार इत्यादी साधनांचा समावेश होता. ही साधने जरी अध्यात्मिक उन्नती करण्याच्या उद्देशाने उदयास आली असली तरी त्यामधूनही लोकांचे मनोरंजन होत होते. त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या साधनांचा अभ्यास करण्यापूर्वी तत्कालीन धार्मिक जीवनाची थोडक्यात माहिती जाणून घेणे आवश्यक वाटते.

यावेळी मराठी राज्याचा कारभार पेशव्यांच्या हातात गेला होता. ते जातीने ब्राम्हण असल्याने समाजात ब्राम्हणांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. ब्राम्हण वर्गाच्या प्रभावामुळे समाजामध्ये अनेक धार्मिक चालीरीतींना व श्रध्दांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. जर एखादयाच्या हातून सत्कृत्ये झाली तर त्याला त्याचे चांगले फळ मिळते, आयुष्यभर पुण्यसंचय वाढवत नेला तर पुढील जन्मी चांगले सुख मिळते असा तत्कालीन लोकांचा समज होता. त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात दानधर्म करीत. जन्म, विवाह, मृत्यू, मुंज, ग्रहण, आजारपण अशा विविध कारणाने मोठ्याप्रमाणात दानधर्म केला जात होता. दान स्वीकारणाऱ्यामध्ये विद्वान, ब्राम्हण, पंडीत, भिक्षूक, विद्यार्थी व राज्यातील विविध देवदेवतांचा समावेश होता. पेशवेकालीन दानधर्माचे उत्तम उदाहरण म्हणजे ‘श्रावणमास दक्षिणा’ हे होय. अशाप्रकारची दक्षिणा वाटण्याची

सुरुवात सेनापती दाभाडे यांनी केली. त्यांच्या मृत्यूंनंतर पहिल्या बाजीराव पेशव्यांनी त्यांचा उपक्रम पुढे चालू ठेवला की, ज्याची ख्याती संपूर्ण हिंदुस्थानामध्ये झाली. पुण्यामध्ये श्रावणमासात चालणाऱ्या कार्यक्रमाला रमणा असे म्हणतात. यावेळी संपूर्ण हिंदुस्थानातून विद्वान ब्राम्हणवर्ग पुण्यात दाखल होत असे. त्यांची विद्वता व चारित्र्य पाहून दक्षिणा दिली जात होती. पेशवेकालीन पत्रव्यवहारांमधून दक्षिणेकरता खर्च झालेली रक्कम[१], दक्षिणा वाटणारे व त्यांच्याजवळ बसणारे यांची यादी[२], दक्षिणा वाटपाचा अहवाल[३], दक्षिणेकरीता अजून किती पैसा लागेल याचा अंदाज [४] व्यक्त केल्याची माहिती मिळते. पहिल्या बाजीरावांच्या काळात रमण्यामध्ये इ.स.१७३६ मध्ये १६,३५४ रुपये वाटण्यात आले होते. पुढे पानिपतच्या युध्दापर्यंत या रकमेत मोठी वाढ होत गेली. पानिपतच्या प्रसंगानंतर काही वर्षे कमी रक्कम वाटलेली आढळते. पुढे इ.स.१७६५ मध्ये १,३२,०४३रुपये, इ.स. १७६८ मध्ये २,८८,७४५ रुपये, इ.स. १७७६ मध्ये ५,०५,१२८ रुपये अशी दक्षिणेची रक्कम वाढत गेली.[५] कर्जबाजारी झालेल्या विद्वान ब्राम्हणांना कर्ज फेडणे अशक्य झाल्यास त्यांचे कर्ज पेशवे आपल्या सरदारांमध्ये वाटून घेऊन फेडत असत.[६] कांहीवेळा आजारी व्यक्तिला उतार पडावा म्हणून अथवा ग्रहशांती करण्यासाठी ब्राम्हणाला तुलादान करण्याची पध्दत होती. तुलादानातील सोने, चांदी, नारळ इत्यादी वस्तू ब्राम्हणांना वाटल्या जात होत्या. नानासाहेब पेशव्यांनी शाहूची राणी सगुणाबाई ही आजारातून बरी व्हावी म्हणून तुलादान केले होते.[७] पौष शु।। १२ शके १६८४ रोजी झालेल्या तुलादान प्रसंगी वाजविण्यास असणाऱ्या कर्णेकऱ्यांना मिरवणुकीच्या वाटेतच १० रुपये देण्यात आले होते.[८] पेशवेकाळात ब्राम्हणांना जमीनदान देणे हाही प्रकार प्रचलित होता. ब्राम्हणवर्गाने आपली कर्तव्ये कायम चालू ठेवाावीत म्हणून छत्रपती शाहूने त्यांना मोठ्या प्रमाणात जमीनी दान दिल्या होत्या.[९] एखाद्या गावातील संपूर्ण जमीन ब्राम्हणांना दान देत त्याला 'अग्रहार खेडे' असे म्हणत. पुण्यप्राप्तीच्या उद्देशाने छत्रपती, पेशवे व त्यांचे सरदार पाण्याचे तलाव बांधणे, धर्मशाळा बांधणे, घाट बांधणे, कालवे व विहिरी खोदणे, पाणपोया उभारणे व अन्नछत्रे चालविणे अशी सार्वजनिक हिताची कामे करत.

यावेळी समाजामध्ये देवाला नवस करण्याची पध्दत होती. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन लोक केलेला नवस मोठ्या समारंभाने फेडत असत.[१०] त्यावेळी लोकांनी विविध कारणासाठी

देवदेवतांना नवस केलेले आढळून येते. पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून लोक नवस व कोणकोणते उपाय करत होते ते पुढील प्रकारामधून समजत.[११] गंगाबाईस पुत्र व्हावा म्हणून शेकडो ठिकाणच्या देवतांना नवस करण्यात आला होता. नवस फेडण्याचा खर्च एकंदर १,३४,००० एवढा होता. त्यापैकी एक लाख रुपये जेजुरीच्या खंडोबास द्यावयाचे होते. याशिवाय पुरंदर, पुणे, मोरेश्वर, गणपतीपुळे, गिरीचा व्यंकोबा, लोहगड, भीमाशंकर, बारामतीचा विठोबा, सोमेश्वर, आडिवऱ्याची महाकाली, त्र्यंबकेश्वर, परशुराम, थेऊर, औंढानागनाथ इत्यादी देवतांना केलेले नवस मागाहून फेडण्यात आले. वृध्द नवऱ्याला दिलेल्या घाशीरामच्या मुलीला मुल होईना म्हणून तिला पुढील उपाय सांगितले होते. त्यामध्ये राहूचा जप करावे, ग्रहाची दाने ब्राम्हणांना द्यावी, ताबुताच्या घोड्याला सव्वा मण रेवड्या वहाव्या, गारपीरास चादर चढवावी, सटवाईला खेळणे व पाळणे वहावे, मोहरमच्या महिन्यात भावी मुलाला पाच वर्षे फकिरी देण्याचा, पंचमुखी मारुतीला दर शनिवारी तेल घालण्याचा, जेजुरीच्या खंडोबास मुल वाहण्याचा इत्यादी नवस व उपायांचा समावेश होता. खंडोबाच्या नवसामुळे जर मुलगा झाला तर त्याला वाघ्या म्हणून आणि मुलगी झाली तर मुरळी म्हणून देवाला वाहिली जात होती. खाजगीवाल्यांच्या घराण्यातील गोविंदराव यांची स्त्री रमाबाई हिनेसुध्दा पुत्रप्राप्तीसाठी अनेक देवदेवतांना नवस केला होता. याशिवाय आजारातून बरे होण्यासाठीही नवस केले जात होते. सौ. गोपीकाबाई यांचा डोळा बरा व्हावा म्हणून रांजणगावच्या गणपतीला केलेला नवस फेडण्यासाठी झालेल्या खर्चाची नोंद हिशेबामध्ये आली आहे.[१२] चि. विश्वासराव व माधवराव यांना देवी रोगातून मुक्त करण्यासाठी सोन्याच्या देवीच्या मूर्ती दान केल्या होत्या. तर रघुनाथराव, जनार्धनपंत व सदाशिवराव भाऊ यांना देवीचा त्रास होऊ नये म्हणून अनेक हिंदू-मुस्लीम देवतांना नवस करण्यात आले होते. यावेळी श्री मार्तंड जेजुरी, सैद सादत पीर पुणे, श्री देव कुरकुंब या देवतांच्या नवसासाठी ३४४।। रुपये खर्च केले होते.[१३] युध्दामध्ये विजय मिळावा म्हणूनही नवस बोलण्याची प्रथा पेशवाईत प्रचलित होती. तळेगाव पर्यंत चालून आलेल्या इंग्रजांचा पराभव व्हावा म्हणून अनंतभट पित्रे यांच्या मार्फ़त श्रीमार्तंड जेजुरी यास नवस केला होता. इंग्रजाचे पारिपत्य झाल्यानंतर तो फेडण्यासाठी एक लाख रुपये खर्च करण्यात आले होते.[१४] टिपूचे पारिपत्य व्हावे म्हणून वालवलीचे नारायणास ५०,००० रुपयांचे, पंढरपूरच्या श्री पांडूरंगास १२,०००

रुपयांचे व दक्षिणेकडे वाहणाऱ्या कृष्णा नदीतीरावर लक्ष दिप लावण्याचे व शंभर सुवासिनी भोजणास घालण्याचे नवस करण्यात आले होते. अशाप्रकारचे नवस तत्कालीन समाजामध्ये प्रचलीत होते. देवाला संतुष्ट करुन घेण्यासाठी अथवा आपली इच्छा देवामार्फत पूर्ण करुन घेण्याच्या हेतुने अनुष्ठान केले जात होते. पर्जन्याकरिता अनुष्ठानावर झालेल्या खर्चाची नोंद पेशव्यांच्या जमाखर्चात आढळते[१५] ती पुढीलप्रमाणे-

२१० रु. पर्जन्यानिमीत्त अनुष्ठानबाा देणे जनार्दन देव (श.१६७७ कार्तिक)

३५० रु. जनार्दन देव पर्जन्याचे अनुष्ठानाबाा (श.१६७९ आश्विन)

।॰ पर्जन्याबद्दल श्रीत्रिंबकेश्वरास अभिषेक (श.१७०९ आषाढ)

अशाप्रकारच्या अनुष्ठानाच्या खर्चाच्या अनेक नोंदी आढळतात. इ. स.१७४९ मध्ये छत्रपती शाहू महाराज आजारी पडले तेंव्हा त्यांना बरे वाटावे म्हणून अनुष्ठाने करण्यात आली होती. त्यापैकी आचरे या ठिकाणी केलेल्या अनुष्टानाचा खर्च २२४४१ रुपये आला होता.[१६] शत्रूचा पराजय व्हावा म्हणूनही अनुष्टाने केली जात होती. माधवरावाच्या काळात मराठ्यांनी कर्नाटक प्रांताची मोहीम हाती घेतली होती. तिच्यामध्ये शत्रूचा पराभव व्हावा म्हणून ब्राम्हणवृंदास अनुष्ठान करण्याची अज्ञा देण्यात आली होती.[१७]

वरील प्रमुख धार्मिक चालीरिती व श्रध्दाशिवाय तत्कालीन समाजात रोगशांती, ग्रहशांती, वास्तुशांती, होम, यज्ञ अशा अनेक चालीरिती प्रचलीत होत्या. त्यावरुन समाज धार्मिकदृष्टया खुप श्रध्दाळू होता हे स्पष्ट होते. समाजाच्या या श्रध्दांना कांही विद्वान अंधश्रध्दा म्हणूनही ओळखतात.

## ५.२ सण, समारंभ व उत्सवामधील सामाजिक मनोरंजन

पेशवेकालीन समाजाचे मनोरंजन करणाऱ्या विविध साधनांचा अभ्यास करताना धार्मिक मनोरंजनाच्या साधनांचाही विचार करणे आवश्यक ठरते. कारण धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी सादर होणाऱ्या कार्यक्रमांचा उद्देश हा जरी अध्यात्मिक असला तरी त्यामधूनही सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन होत होते. असे अध्यात्मिक उन्नतीचे व मनोरंजनाचे कार्यक्रम प्रामुख्याने सण, समारंभ व उत्सवांच्यावेळी होत असत. त्यामुळे मनोरंजनाची साधने आणि तत्कालीन सण,

समारंभ व उत्सव यांचा घनिष्ठ संबंध होता हे स्पष्ट होते. तसेच थोरामोठ्यांच्या व राज्यकर्त्यांच्या घरी होणारे विविध समारंभ हे सर्वसामान्यांना आनंद देणारे व त्यांचे मनोरंजन करणारे होते. त्यामुळे अशा कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लोक उपस्थित रहात होते. सण समारंभांच्या निमित्ताने समाजाच्या सर्व थरातील लोक एकत्र येऊन आनंद व्यक्त करीत, त्यामुळे त्यांचे मनोरंजन होत होते. यावेळी दसरा, दिवाळी, होळी, रंगपंचमी, मकरसंक्रांती इत्यादी प्रमुख सण आणि गणपती उत्सव, गोकुळाष्टमी, महाशिवरात्री, रामनवमी, हनुमानजयंती यासारखे धार्मिक उत्सव साजरे केले जात होते. वैयक्तिक अथवा कौटुंबिक स्वरुपाचे गर्भदान, जन्मसोहळा, जातककर्म, नामकरण, व्रतबंध किंवा उपनयन आणि विवाह असे कार्यक्रम साजरे केले जात होते. हे समारंभ त्या कुटुंबामध्ये जरी धार्मिक दृष्टिने महत्वाचे म्हणून साजरे केले जात असले तरी समाजातील अनेक लोकांना त्यामध्ये सहभागी होता येत होते. त्यामधून त्यांना आनंद मिळत होता.राज्यकर्ते म्हणजे पेशवे जेंव्हा एखादा मोठा विजय मिळवून येत त्यावेळी विजयी पेशव्यांचे स्वागत करण्यासाठी मिरवणूक काढली जात होती. त्यावेळी साजरा होणारा विजयोत्सव हा सर्वसामान्यांना आनंद देणारा व त्यांचे मनोरंजन करणारा होता. याशिवाय समाजात उत्तरक्रिया, सतीचा सोहळा, केशवपन, व्रतवैकल्ये, अभिषेक, यज्ञविधी, शांतीकार्य, तिर्थयात्रा इत्यादी धार्मिक कार्यक्रमांना किंवा विधींना खास महत्व प्राप्त झालेले होते. हिंदू लोकांच्या सर्व सण व उत्सवामध्ये धार्मिक विधी आणि व्रते यांना महत्वाचे स्थान आहे.[१८] हिंदू धर्मशास्त्रामध्ये सोळा संस्कार सांगितले आहेत. यापैकी कांही संस्कार अपरिहार्य म्हणून तर कांही हौसेने करण्याची प्रथा होती. त्यात गर्भाधानापासून ते अंतेष्टीपर्यंतच्या संस्कारांचा समावेश होतो. पेशवेकाळात महाराष्ट्रामध्ये मुस्लीम लोकांची संख्यादेखील बरीच असून तेसुध्दा आपल्या धर्माप्रमाणे सण साजरे करत होते. त्यांच्या सणामध्ये हिंदू लोक सहभागी होत असल्यामुळे दोन्ही धर्मियात सामंजस्याचे वातावरण राहण्यास मदत होत होती. पेशवेकालीन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या उपरोक्त सण, समारंभ व उत्सव यांची माहिती जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते.

### ५.२.१ होळी (शिमगा)

आधुनिक काळामध्ये होळी अथवा शिमगा या सणाला अत्यंत विकृत स्वरुप प्राप्त झाले आहे. शिवीगाळ सारख्या ग्राम्य प्रकारांना उत आल्यामुळे या सणाचे सांस्कृतिक महत्व कमी झालेले आहे. त्यामुळे सणातील सामर्थ्य आणि सुख पार लोप पावले आहे. याउलट पेशवेकाळात राज्यकर्ते आणि प्रजा यांचा धर्म एक व सुखदु:खही एक. त्यामुळे एकमेकाबद्दल आदर व आपलेपणा असल्याचे जाणवते. त्यामुळे सर्वांच्या घरोघरी आणि सार्वजनिक पध्दतीने आपआपल्या समजुतीप्रमाणे हा सण साजरा केला जात होता. होळी हा सण फाल्गुन महिण्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. पेशवेकाळात हा सण छत्रपति, पेशवे, श्रीमंत, गरीब, सरंजामदार, सरदार, अबालवृध्द अशा सर्व थरांतून मोठ्या आनंदाने साजरा केला जात होता. खेड्यातील लोक तर हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करीत असत. कारण शेतातील कामे संपून समाजात एकप्रकारची शांतता व सुबत्ता यावेळी निर्माण झालेली असते. त्यामुळे पाच दिवस हा सण अतिशय मौजमजेत साजरा करण्याची प्रथा त्यावेळी निर्माण झाली होती.

गावाच्या मध्यभागी मैदानावर होळी पेटविली जात असे.गावचा प्रमुख पाटील व ब्राम्हणाच्या हस्ते होळीची पुजा करुन तिला पुरण पोळीचा नैवद्य दाखविला जाई. त्यानंतर रात्रभर होळीभोवती नाचगाण्यांचा कार्यक्रम चालत असे. दुसरा दिवस धुळवड म्हणून साजरा केला जाई. कोकणातील प्रत्येक गावामध्ये होळीचा मांड या निश्चित केलेल्या जागेवर होळी साजरी केली जाई.होळीनिमित्त ग्रामदेवतेची पालखी गावातील प्रत्येक घरामध्ये वाजत-गाजत जात असे.[१९] या पालखीसोबत गावातील सर्व मानकरी आणि गावकरी सहभागी होत. तसेच पालखीसोबत असणारे खेळे नृत्य गायन करुन लोकांचे मनोरंजन करण्याचे काम करीत. रात्रीच्या वेळी पालखी मांडावर आणून तेथे होळीभोवती नाचविली जाई. पालखी नाचविल्यानंतर मनोरंजनाचा कार्यक्रम चालत असे. अशाप्रकारे चालणाऱ्या या उत्सवाची समाप्ती 'शिपणे' या कार्यक्रमाने होई. शिपणे हा रंगपंचमी सारखाच कार्यक्रम होता. कोकणाव्यतिरिक्त इतर महाराष्ट्रात पाचव्या दिवशी रंगपंचमीच्या कार्यक्रमाने होळी या सणाची समाप्ती होत असे. या सणामध्ये पुरुषाबरोबर स्त्रीयादेखील सहभागी होत होत्या.[२०] इ.स. १७८६ मध्ये पेशवे दरबारात होळीचा सण साजरा करण्यात आला. तेंव्हा स्वत: श्रीमंतांची स्वारी सायंकाळी होळीच्या दर्शनाला आली होती.

त्यावेळी अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम झाले होते. त्यामध्ये पहिल्या दिवशी जेठीची झोंबी, वाघ बकरीचा खेळ, सायंकाळी डफ गाणे, पोऱ्याचा नाच, कळसुत्री बाहुल्यांचा खेळ, अनेक सोंगे, नाच गाणे, तमाशा अशा कार्यक्रमांचा समावेश होता.[२१] या सणाच्या निमित्ताने दरबारामध्ये कलाकारांना बिदागी व कापडाचे वाटप केले जात असे.

होळीच्या सणाचा शेवटचा दिवस म्हणजे रंगपंचमीचा दिवस होय. हा सण मराठ्यांच्या दरबारात मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात असे.होळीमध्ये रंगोत्सव साजरा करण्याची पध्दत पेशव्यांच्या काळात उत्तर भारतातून आली. उत्तरेतील रजपूत राजे आपल्या राण्यांबरोबर आणि दास-दासींबरोबर या आनंदोत्सवात सहभागी होत असत. त्यावेळी गरीब-श्रीमंत, जेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच असा भेदभाव केला जात नव्हता. रजपूत राजे राजवाड्याच्या गच्चीवरुन, खुल्या मैदानामध्ये किंवा घोड्यावर बसून रंग खेळत असत.[२२] रजपुतांचा हा रंगोत्सव शिंदे आणि होळकरांनी आपआपल्या संस्थानामध्ये सुरुवातीला आणला होता. मेजर ब्राउटन याने शिंद्यांच्या छावनीत साजरा झालेल्या उत्सवाचे बहारदार वर्णन केले आहे. तो लिहितो की, 'एका खास उभारलेल्या तंबुमध्ये शिंदे आणि त्यांच्या सरदारांचे आगमन झाले त्यावेळी त्यांच्याबरोबर नर्तकीसुध्दा होत्या. सर्वांना रंग खेळण्यासाठी आबीर आणि वेगवेगळ्या रंगांच्या पाण्याची भांडी भरुन ठेवण्यात आली होती. प्रथम शिंद्यानी पाहुण्यांचा अंगावर लाल रंग उडवून या रंगाच्या क्रीडेला सुरुवात केली आणि नंतर सर्वांनी त्यांचे अनुकरण केले. या उत्सवामध्ये नृत्य करणाऱ्या नर्तकींनी कार्यक्रमाची शोभा वाढविली होती. विविध रंगांच्या छटांनी भरुन जाणारा आसमंत आणि लोकांच्या उत्साहाला आणि आनंदाला आलेले उधान असे दृश्य आपण यापूर्वी कधीही पाहिलेले नाही'.[२३]

उत्तरेत साजऱ्या होणाऱ्या रंगोत्सवाची पध्दत महादजी शिंदे यांनी महाराष्ट्रामध्ये आणली. तेथे साजरा होणाऱ्या रंगोत्सवाचे रसभरित वर्णन जेंव्हा महादजीने पेशव्यांच्या दरबारात केले, तेंव्हा पेशव्यांनी असा उत्सव करण्यास परवानगी दिली. यावेळी फाल्गुन महिना उलटून गेला असल्यामुळे तो चैत्र शुध्द प्रतिपदेला सवाई माधवराव, नाना फडणीस, रास्ते, विंचुरकर, ओंढेकर, राजे बहाद्दर इत्यादींच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्याचे वर्णन पेशवे बखरीत पुढीलप्रमाणे आढळते -

"शिंदे यांनी रंगाची तयारी केली.रस्तोरस्तीच्या लोकांना रंगाची तयारी करण्याची आज्ञा दिली, जागोजागी हौद भरुन ठेवले.गुलालाची तयारी झाली. सरदार, मानकरी, पथके, शिलेदार, मुत्सद्दी असे तयार होऊन वाड्यापाशी आले. वाड्यापाशी रंग खेळण्यास प्रारंभ झाला.हजारो गुलाल गोटे उडू लागले.रंगाचे बंब चालू लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यात उडाला ............. दोन घटकापर्यंत रंगाचा मारा झाला. रंगाच्या योगाने रस्त्यात चिखल झाला. शेकडो पल्ले गुलाल उधळला. ................. मग स्वारी बानवडीस दाखल झाली. मंग तिथे श्रीमंतासह सर्व कचेरीत येऊन बसले. दोन घटिकापर्यंत नाच व गाणे झाले. नंतर रंग खेळण्यास प्रारंभ झाला. रंग खेळता खेळता रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापरयुगी श्रीकृष्ण भगवान खेळले. तसा कलियुगी श्रीमंत सवाई माधवराव खेळले. असा कोणीं पुढे खेळावयाचा नाही व मागेंही कोणी खेळला नाही. स्नाने झाल्यानंतर मग श्रीमंतास शिंदे यांनी पोशाख, जवाहिर, शिरपेच दिला. इतरांना पोशाख वाटून नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब, हारतुरे, गजरे दिले."[२४]

अशाचप्रकारचा रंगाचा खेळ पानिपतवर जाण्यापूर्वी साजरा करण्यात आला होता. त्यानंतर सदाशिवराव भाऊ पानिपतावर जाण्यास निघाले होते. ग्वाल्हेरजवळ असताना तेथे साजऱ्या केलेल्या रंगपंचमीचा वृत्तांत कृष्णाजी नाईक गायकवाड याने कळविला आहे.[२५] अशाप्रकारे पेशवेकाळात होळी व रंगपंचमी साजरी केल्याची अनेक उदाहरणे तत्कालीन कागदपत्रामध्ये आढळतात. रंगपंचमी साजरी करण्यासाठी सर्व सरदार, मानकरी, पथके, शिलेदार, कारकून या सर्वांना आमंत्रण दिले जाई.

पेशवेकालीन होळी सणाबद्दल माल्कम लिहितो, "लोक आठाहून अधिक दिवस होळीच्या सणात मौजमजा करीत."[२६] एलफिस्टन होळी सणाबद्दल म्हणतो, "होळी या क्रिडोत्सवात सर्व प्रकारचे लोक भाग घेतात. हा उत्सव वंसत ऋतूच्या गौरवार्थ असून सर्व लोक एकत्र येतात. यावरुन यावेळी होळीचा सण हा लोकांना आनंद देणारा सण होता हे दिसून येते. या सणानिमीत्त मनोरंजन करणाऱ्या लोकांना आपली कला सादर करुन पैसा मिळविण्याची संधी मिळत होती. रंगाच्या सणामध्ये समाजातील सर्व लोक एकत्र येऊन उत्सवात भाग घेत असल्यामुळे सामाजिक ऐक्य आणि एकोपा निर्माण होण्यास मदत होत होती."

## ५.२.२ दसरा

हिंदुस्थानमधील वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळे सण साजरे केले जातात. त्यापैकी दसरा अथवा विजयादशमी हा सण मोठ्या आनंदाने सर्वत्र साजरा करण्याची परंपरा आहे. पेशवेकाळात होळी आणि दसरा या सणांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. होळी किंवा शिमगा हा समाजाच्या ख्यालीखुशालीचा आणि करमणुकीचा प्रतिक असणारा तर दसरा हा त्याच्या पराक्रमाचे प्रतिक असणारा सण होता. या सणाला अनेक प्राचीन संदर्भ आहेत. प्रजेवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या दुष्ट राक्षसाचा संहार करण्यासाठी दुर्गामातेने रणचंडीकेचा अवतार घेतला आणि एकाएकाला ठार केले. त्यापैकी महिषासुर राक्षस या दिवशी मारला म्हणून हा दिवस 'विजयोत्सव' म्हणून साजरा केला जातो. असेही सांगितले जाते की, प्रभु रामचंद्रानी अन्यायी रावणाचा नि:पात करण्याचा निश्चय करुन, याच दिवशी शमी वृक्षाचे पूजन करुन, लंकेच्या स्वारीला प्रस्थान केले होते.[२७] दुसऱ्या एका कथेनुसार अज्ञातवास संपल्यावर पांडवानी शमीच्या झाडावर ठेवलेली आपली शस्त्रे या दसऱ्याच्या दिवशीच काढून पुन्हा हाती घेतली व भारतीय युध्दामध्ये विजय मिळविला. या जरी पौराणिक कथा असल्या तरी त्यामधून हा सण केवळ उत्सव म्हणून साजरा करण्याचा नसून तो समाजातील क्षात्रपरंपरेशी व क्षत्रियांच्या कर्तव्यकर्माशी निगडीत होता. त्यामुळे शिवकाळ व पेशवेकाळात हा उत्सव अतिशय थाटात साजरा केला जात होता. श्रीरामचंद्रांनी रावणाच्या मोहिमेवर या दिवशी प्रस्थान केल्याचे स्मरण ठेऊन मराठे आपल्या शत्रूचे दमन करण्यासाठी व प्रदेश जिंकण्यासाठी या शुभदिनी मोहिमेला प्रस्थान करु लागले. शिवकाळातील व पेशवेकाळातील अनेक मोहिमांची सुरुवात दसऱ्याच्या वेळी झाल्याचे स्पष्ट होते.[२८] यावेळी प्रत्येक ग्रामदेवतेच्या मंदिरामध्ये दसरा साजरा केला जात असून गावातील सर्व लोक या उत्सवामध्ये सहभागी होत.दसऱ्यानिमित्त ग्रामदेवतेची सवाद्य पालखी मिरवणूक काढली जात असे. गावातील कांही लोक आणि विशेषकरुन स्त्रिया नऊ दिवसांचा उपवास करीत. नवरात्रीनिमित्त मंदिरामध्ये भजन, कथा, कीर्तन व गोंधळ असे कार्यक्रम चालत. इ.स.१७९०-९१ मध्ये काशीनाथ उपाध्याय नावाच्या पुण्यातील ब्राम्हणाने धर्मसिंधू नावाचा धर्मशास्त्रावरील ग्रंथ लिहिला असून त्यामध्ये त्याने तत्कालीन दसऱ्याचे वर्णन केले आहे.[२९] त्या ग्रंथानुसार त्यावेळी शमी वृक्षाची पाने सोने म्हणून वाटणे आणि सिमोल्लंघन करणे ही प्रथा

महाराष्ट्रासह राजस्थान व बडोद्यामध्ये होती. यादिवशी रजपूतामध्ये तोफांची पूजा करणे या गोष्टीला अतिशय महत्व होते.[३०] महाराष्ट्रातील लोकही यादिवशी शस्त्रपूजन करत असत.

शिवकाळात राजधानीत विजयादशमीचा दरबार भरवला जात असे. त्यावेळी छत्रपतींना मुजरे व नजरा दिल्या जात असत. तसेच छत्रपतीकडूनही कर्तबगार सरदारांचा यावेळी सन्मान केला जात होता. याचवेळी परमुलखावरील स्वाऱ्यांची घोषणा केली जात होती. पुढे पेशवेकालखंडात छत्रपतीऐवजी पेशव्यांचे स्थानमहात्म्य जसे वाढले तसे दसऱ्याचे महत्वही वाढतच गेले. पावसाळा संपताच पेशव्यांचे सरदार पुण्याला गोळा होत. दसऱ्याचे सिमोल्लंघन करुन स्वाऱ्या दसऱ्याच्या मुहुर्तावर बाहेर पडत. या मुहुर्तावरील त्यांची श्रध्दा रणांगणावर त्यांचे नितीधैर्य वाढविणारी होती. शिवाजी महाराजांनी सुरु केलेल्या या क्षात्रपरंपरेची जोपासना पुढे मराठ्यांच्या कित्येक पिढ्यांनी केली, त्यामुळे मराठ्यांना आपली सत्ता लाहोर मुलतानपर्यंत वाढविता आली. दसरा सणाची सुरुवात घटस्थापनेने होत असून त्याचा समारोप सिमोल्लंघनाने होत असे. त्यामुळे हा सण दहा दिवस चालत असे. अश्विन शुध्द प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस नवरात्र उत्सव[३१] आणि दहाव्या दिवशी विजयादशमी असे या उत्सवाचे स्वरुप असे. पहिल्या नऊ दिवसात कथा, कीर्तन, गोंधळ अशा कार्यक्रमांनी वातावरण भक्तीमय होऊन जात होते.[३२] दसऱ्यावेळी बळी देण्याची प्रथा पेशवेकाळात प्रचलीत होती. अनेक ठिकाणी बकऱ्यांचा बळी देवीला दिला जात असे.[३३] बळी दिलेल्या बकऱ्याचे मांस वाटले जात असे. सिमोल्लंघनानंतर होणाऱ्या कार्यक्रमात पेशव्यांना नजराणा दिला जात असे. त्याचबरोबर पेशवे देखील अनेक सरदारांचा मानाचा पोशाख देऊन त्यांच्या कामगिरीचा गौरव करीत असत.[३४]

मराठ्यांचे छत्रपती शाहू यांची गादी सातारा येथे होती. येथे अदालवाड्याच्या शेजारी असणारी रंगमहाल ही वास्तू मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी वापरली जात होती. या इमारतीच्या वरच्या उंच मजल्यावर राणीसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी स्वतंत्र कक्ष होता तर खालच्या मजल्यावर इतर लोकांनी मनोरंजनाचे कार्यक्रम पाहण्याची व्यवस्था होती. या इमारतीसमोर असणाऱ्या मोकळ्या मैदानाचा उपयोग मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी केला जात होता. दसऱ्यादिवशी सोने स्वीकारण्यासाठी राजकुटुंबिय याच वाड्याचा उपयोग करीत असत.

यादिवशी आणि इतर समारंभाचे दिवशी महत्वाचे खेळाचे सामने भरवले जात असत. त्यामध्ये जिंकणाऱ्यांना राजकुटूंबाच्या हस्ते इनाम व बक्षिसे दिली जात असत.[३५]

सवाई माधवरावाच्या काळात मराठी साम्राज्याने पुन्हा एकदा परमोच्च बिंदू गाठला होता. त्यावेळच्या दसरा समारंभाचे वर्णन सर जॉन माल्कम याने लिहून ठेवले आहे. तो म्हणतो, ''नवरात्र संपून दसऱ्याच्या दहाव्या दिवशी शिलंगणाचा मोठा समारंभ असतो. त्यावेळी तमाम मराठी फौज साऱ्या वैभवानिशी पहावयास मिळते. सारे सरदार, शिलेदार, दरकदार, एकांडे शिपाई, पायदळ, तोफा, सर्व सजून स्वारीस निघतात. मराठ्यासारखे घोड्यावर बसणारे बाळाभ्यासी तेच! काय ती त्यांची उमदी घोडी! त्यावर तऱ्हेतऱ्हेचे साज घातलेले आणि बहुमोल पोशाख करुन त्यावर बसलेले उमदे मराठी शिलेदार त्या गर्दीतही लीलेने आपआपल्या घोड्याकडून विविध कसरती करीत चालतात; त्याचे वर्णन काय करावे! नानाविध रंगाच्या पोशाखांना आणि हजारो जरीलग्याच्या उजाळ्यांनी लाटा उठल्याप्रमाणे डहुळलेला तो समुदायसमुद्र पाहून दृष्टिचे पारणे फिटल्यासारखे वाटते. नौबती, नगारे, तुडुम-ताशे, मर्फे, झांजा, तंबूर, ढोल आणि लेजिमा या जयवाद्यांनी वातावरण धुंद झालेले असते. खास पेशव्यांची स्वारी रुप्याच्या अंबारीत स्वार झालेली असते. मागे इतर मोठमोठे मानकरी आपआपल्या सजवलेल्या घोड्यावरुन हत्यारे परजीत चाललेली असतात. शिलंगणाची ही स्वारी मोठ्या समारंभाने पुण्यानजीक एखाद्या विविक्षीत ठिकाणी सायंकाळी जाऊन पोचते. तेथे खासा पेशवा आधी शमीपूजन करतो. तसेच शेजारीच एक शेत मुद्दाम राखून ठेवलेले असते. त्यातील कणसे पेशवा खुडतो. ते होताच मग त्याठिकाणी सोने लुटण्यासाठी व कणसे लुटण्यासाठी एकच सर्वांचा तोबा होऊन जातो. पेशव्याने शमीची पाने खुडताच सगळीकडून तोफांचे व बंदुकींचे शातावधी आवाज होऊ लागतात. अशा रीतीने समारंभ उरकल्यावर अंधार पडल्यावर स्वारी परतते; यावेळी हजारो चंद्रज्योती आणि महतापा पाजळत असतात. त्यांचा दिवसासारखा लख्ख प्रकाश पडलेला असतो. गर्दी इतकी झालेली असते की 'झुगारिल्या जरी वरुनी ताट तरि ते खाली कधी पडेना'. म्हणजे बत्ताशाचे ताट वरुन फेकले तरी एकही बत्तासा पायदळी पडणे शक्य नाही, इतके मानसाला माणूस भिडले.''[३६] पेशव्यांची स्वारी शनिवार वाड्यात परतल्यावर दरबार होत असे. त्यावेळी शाहीर आपल्या नव्या पोवाड्यांचे गायन दरबारात करुन पेशव्याकडून बक्षिस

मिळवत. दसऱ्यानिमीत्त सर्व लहानमोठे सरदार पेशव्यांना नजराणा करीत. त्यानंतर पेशव्याकडूनही अनेक सरदारांना बहुमानाचा पोशाख, पालखी, दिवट्या व अफ्तगिरी देऊन त्यांचा गौरव केला जाई. सवाई माधवराव पेशव्यांनी इ.स. १७९४ मध्ये दसरा दरबारावेळी आपल्या प्रजेतील सन्माननीय मंडळींना सन्मानार्थ जो पोशाख प्रदान केला, त्यासाठी २,२०,१४४ रुपये खर्च केले होते.त्यातील प्राप्तकर्ते मानकरी पुढीलप्रमाणे[३७] -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सातारचे छत्रपती, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. २७३८३ |
| २. | पंतप्रतिनिधी, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. १२८३ |
| ३. | पंत सचिव, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ६०३ |
| ४. | चिंतामणराव पटवर्धन, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. १२३८ |
| ५. | परशुराम रामचंद्र,त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. १०८९ |
| ६. | तुकोजी पवार,त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ७८९ |
| ७. | खंडेराव विठ्ठल विंचुरकर,त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. २७५६ |
| ८. | कृष्णराव बळवंत, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. २३९८ |
| ९. | हणमंतराव दरेकर, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ८२७ |
| १०. | दौलतराव घोरपडे, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु ६०४ |
| ११. | रघुजी भोसले, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ६४४० |
| १२. | हैद्राबादचा निजाम, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ५८८८ |
| १३. | चिंतामणराव हरि फडके, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ११२० |
| १४. | दौलतराव शिंदे, त्यांचे कुटुंब आणि सरदार | : | रु. ११२९७ |
| १५. | अली बहादूर | : | रु. २०१५ |

याशिवाय घोडदळातील उच्चाधिकारी आणि शिलेदार यांचाही सन्मान करण्यात आला होता. त्यांच्या वस्त्र व पोशाखासाठी अनुक्रमे ३४,०३३ आणि ७९,७०३ रुपये खर्च करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या ब्रिटिश रेसिडेंट सर चार्ल्स मॅलेट यालाही रितीरिवाजानुसार ६०० रुपये १२ आणे किंमतीची मानसन्मानाची वस्त्रे आणि त्याचा वकील नुरुद्दीन हुसेन याला २०४ रुपये ८ आणे किंमतीची वस्त्रे देण्यात आली होती. सर्व

लष्करी आणि प्रशासकीय आधिकाऱ्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला होता.या सत्कार समारंभात रघुनाथरावांच्या नाटकशाळांचादेखील सन्मान करण्यात आला होता. दसऱ्यादिवशी मानसन्मान करण्याची ही पध्दत पेशवाईच्या अस्तापर्यंत (१८१८) सुरु होती. पुढे ब्रिटिशांनी ही पध्दत चालू ठेवली, मात्र ती त्यांच्या राजाच्या किंवा राणीच्या वाढदिवसाला. अशा प्रकारचा दरबार भरवून मान्यवरांचा सत्कार समारंभ होत असे. पेशवेकाळात दसऱ्याच्या सणानिमित्त अनेक लष्करी पध्दतीचे खेळ आणि स्पर्धा यांचे आयोजनही केले जात होते. त्यांना जनतेचा चांगला प्रतिसाद लाभत असे. त्याच पध्दतीच्या स्पर्धा पुढे ब्रिटिशांनीही आपल्या समारंभाच्या निमित्ताने चालू ठेवल्या होत्या.

पेशव्याप्रमाणेच त्यांच्या अनेक सरदारांकडेही दसरा साजरा केला जात होता.दौलतराव शिंद्यांनी साजरा केलेल्या दसऱ्याच्या समारंभावरुन याची कल्पना येते. शिंद्याची सिमोल्लंघनाची मिरवणूकही पेशव्याप्रमाणेच थाटामाटामध्ये निघत असे. या मिरवणुकीच्या आघाडीवर शिंद्यांचा जरीपटक्याचा हत्ती असे. त्याच्यामागे शिंद्यांच्या नागनिशाणी झेंड्याचा सजविलेला हत्ती असे, त्याच्या मागे नगारे-नौबतीचे हत्ती, त्याच्या मागे शेकडो भालदार, बाणदार, निशाणदार चालतात. त्याच्यामागे शिंद्यांचा सारे घोडदळाचा रिसाला असतो. तो मिरवणूक चालण्यासाठी रस्ता रिकामा ठेवण्याचे काम करत असतो. यावेळी घोड्यांच्या कसरती चाललेल्या असतात. त्यामुळे या अपूर्व सोहळ्याचे दृश्य सर्वसामान्यांना अतिशय आनंद देणारे होते. अशारीतीने रमत गमत मिरवणूक शमीचे झाड आगोदरच पुरुन ठेवलेल्या ठिकाणी जात असे. तिथे शिंद्यांच्या हस्ते दहीदुधाने शमीचे पुजन होऊन ते तलवारीने शमीच्या झाडाची फांदी तोडीत. यावेळी शुभशकुन म्हणून चाष अथवा निलकंठ पक्षी हवेमध्ये उडविले जात.[३८] हे पक्षी उडालेले दिसले की जिकडे तिकडे आनंदाचा गदारोळ होऊन तोफा-बंदुका उडवून आनंद साजरा केला जात होता. त्यानंतर सर्व लोकांची शमीचे सोने आणि धान्याची कणसे लुटण्यासाठी गर्दी उडत असे. सोने लुटून परत चाललेली मिरवणूक दारुकाम करीत व हवायांच्या उजेडात परतत असे. त्यानंतर दरबार भरवून नजरांचा समारंभ होत असे.

दुसऱ्या बाजीरावाच्या काळात पेशव्यांच्या शत्रूमुलखावरील स्वाऱ्या थांबल्या. त्याच्या काळात विजयादशमी दरबारी थाटमाट, नाचगाणे व भव्य मिरवणुक एवढ्या पुरतीच मर्यादित

झाली. पुढे इंग्रजांनी जरी मराठी राज्य खालसा केले तरी विजयादशमीच्या दरबाराची प्रथा त्यांनी चालू ठेवली होती. विजयादशमीचा दरबार हे मराठी संस्कृतीचे इतके अविभाज्य अंग होते की, ते इंग्रजासारख्या परक्या राज्यकर्त्यांसही या मराठी परंपरेचा मान राखावा लागला होता.[३९]

## ५.२.३ गणेशोत्सव

भारतामध्ये इ. स. ५व्या शतकाच्या अगोदर पासून गणेशपूजन करण्याला सुरुवात झाली होती.[४०] भाद्रपद चतुर्थी हा गणेशपूजन करण्याचा महत्वाचा दिवस असल्याची माहिती प्राचीन ग्रंथामध्ये मिळते. महाराष्ट्रामध्ये गणपतीपूजेचे महत्त्व मोरया गोसावी यांनी वाढविले. मोरया गोसाव्यांनी खडतर तपश्चर्या केल्यामुळे त्यांना गणपती प्रसन्न झाला होता असे मानतात. त्यांनी स्थापन केलेल्या गणपती संस्थानामुळे महाराष्ट्रात गणपती पूजनाची परंपरा फैलावत गेली आणि त्याबरोबरच मोरया गोसाव्यांचीही कीर्ती पसरत गेली. त्यामुळे औरंगजेब बादशहाने व शहाजीराजांनी त्यांच्या संस्थानाला इनामे व देणग्या दिल्याचे अनेक उल्लेख मिळतात.[४१] जिजाबाई व शिवाजी महाराज यांची विशेष गणेशभक्ती पाहता त्यांनी ती शहाजी राजाकडून उचलली असावी असे दिसते. जिजाबाईंनी पुण्यातील कसब्यामध्ये गणपतीचे देऊळ बांधले. या देवळातील गणपतीचे त्या दररोज दर्शन घेत असत. शिवाजी महाराजांनंतर मात्र भोसले घराण्यातील संभाजी, राजाराम, शाहू किंवा पुढचे छत्रपती यांनी गणेशभक्ती केल्याचे उल्लेख आढळत नाहीत.[४२]

१७ व्या शतकाच्या अखेरीला कोकणामध्ये चिपळूण येथील ब्रम्हेंद्रस्वामी नावाच्या गुरूंचे महत्व वाढले होते. द. ब. पारसनीसांच्या श्री. ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर चरित्र व पत्रव्यवहार या ग्रंथामध्ये असा उल्लेख आहे की, 'श्री गजानन व भार्गव तुला महत्पद देईल' असा आशीर्वाद बाळाजी विश्वनाथ भट याला स्वामींनी दिला होता.[४३] पुढे शाहूच्या आगमनानंतर बाळाजीला पेशवेपद मिळाले आणि पेशव्यांचे राजकीय महत्वही हळूहळू वाढत गेले. गणपती हे पेशव्यांचे आराध्य दैवत असल्यामुळे त्यांनी गणपती उत्सवाचे महत्वही वाढविले. कारण पेशवे हे मुळचे कोकणातील व कोकणातील लोकांमध्ये देशावरील लोकांपेक्षा या उत्सवाची लोकप्रियता अधिक जाणवते. पेशव्यांनी हा उत्सव आपणाबरोबर देशावर आणून तो मोठ्या प्रमाणावर साजरा

करण्याची परंपरा सुरु केली. ब्रम्हेंद्रस्वामींनीही इ.स.१७२८ पासून आपले वास्तव्य कोकणातून साताऱ्याजवळील धावडशी येथे हलविले. तेंव्हापासून साताऱ्यामध्येही मोठ्या प्रमाणात गणपती उत्सव साजरा होऊ लागला. नानासाहेब पेशव्यांच्या काळापासून महाराष्ट्रात गणपती उत्सवाचे महत्व दिवसंदिवस वाढत गेले. त्यांनी पुण्याच्या वाड्यामध्ये सुरु केलेला गणपती उत्सव पुढे कायमस्वरुपी चालू राहिला. श्रावणमासात लाखो रुपये खर्च करुन विव्दत्परामर्श घेण्याचा रमण्याचा मोठा उत्सव जसा पहिल्या बाजीरावाने सुरु केला, तसा गणपती उत्सव सुरुवातीला नानासाहेबाने सुरु केला. त्यापूर्वी पेशव्यांच्या घरामध्ये असा उत्सव होत नसल्याब-ल शकावलीकार म्हणतात, ''राजे भोसले यांचा बंदोबस्त सातारियास राखून आपण राज्य केले पुणियाची वस्ती वाढविली. गणपतीचा उच्छाह करु लागले. वाडीयात सात खणी इमारत बांधून नाचाचा दिवाणखाना केला. गणपतीचा उच्छाह तेथे करीत होते.''[४४] गणपती उत्सवानिमित्त गणेश महाल उत्कृष्टरित्या सजविण्यात येई. त्याठिकाणी मनोरंजनाचे सर्व कार्यक्रम संपन्न होत असत.[४८] या महालात केळाच्या खुंटाएवढ्या मेणबत्त्या हरिदासांच्या दोन्ही बाजूंस लावीत आणि प्रत्येक झुंबरात व स्पटिकसम हंड्यातही दिवे लावीत. त्यामुळे संपुर्ण महाल प्रकाशमय होऊन जात होता. त्याबरोबरच या महालातील आरशामुळे प्रकाश मोठ्या प्रमाणात परिवर्तित होत असे. सभागृहातील विविध प्रकारची चित्रे, झुंबरे, हंड्या यांचे विलोभनिय सौंदर्य अवर्णनीय असे. यावेळी मनोरंजनाचे अनेक प्रकार सभागृहात राजदरबारी आणि उच्चभ्रू लोकांपुढे सादर केले जात असत. त्यामध्ये कलावंतिणींचे नृत्य, कथाकथन, संगीतबारी, सोंगे, दशावतारी खेळ इत्यादी कार्यक्रमांचा समावेश असे. नानासाहेबांची कारकीर्द ही वैभवशाली होती. त्यामुळे त्यांच्या काळात हा उत्सव अतिशय उत्साहाने साजरा केला जात होता. खु- पेशव्यांचा मुक्कामही यावेळी पाऊसकाळामुळे पुण्यामध्ये असे. तसेच श्रावणमास दक्षिणेच्या देकारामुळे अनेक विद्वान व कलाकार यांचे पुण्यामध्ये आगमन झालेले असे. त्यामुळे श्रावणास जोडूनच भाद्रपदात होणाऱ्या या उत्सवाला फारच रंग भरत असे.

हा उत्सव प्रतिवर्षी भाद्रपद चतुर्थी पासून अनंत चतुर्थी पर्यंत साजरा करण्याचा प्रघात आहे. त्यामध्ये श्रींची प्रतिष्ठापना व विसर्जन मोठ्या धुमधडाक्यात साजरे केले जाते. दरम्यानच्या काळात भजन, कीर्तन, नाचगाणे, डफगाणे इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल असे. त्याचबरोबर

हरदास, गवई, कलावंतीनी, गुरव , पखवाजा, सोंगे घेऊन येणारे यांना मोठ्या प्रमाणात त्यांनी केलेल्या मनोरंजन कार्यक्रमाबद्दल चांगली बिदागी दिली जात होती.[४६] इ.स.१७६१ मधील गणपती उत्सवामध्ये ५१ हरदास किंवा गोसावी, १०६ नृत्यकुशल कलावंतिणी, ४४ गवई व नटवे, पखवाज वाजविणारे १७, गुरव व कर्णेकरी १० इतक्या लोकांनी आपले कार्यक्रम सादर करुन लोकांचे मनोरंजन केले. त्यावेळी त्यापैकी ५१ हरदासांना ६३२ रुपये, कलावंतिणींना ५२६ रुपये, गवई नटव्यांना १८५ रुपये, गुरवांना ९० व कर्णेकऱ्यांना १५ नक्त बिदागी व कापड पोशाख देण्यात आले.[४७]

नानासाहेब पेशव्यांचा पुत्र थोरला माधवराव पेशवा हा वडीलापेक्षाही निस्सीम गणेशभक्त होता. त्यामुळे त्याच्या काळात गणपतीउत्सव अतिशय थाटामाटात साजरा केला जात होता. त्याच्या काळात १७६७ मध्ये साजरा झालेल्या गणपती उत्सवात २६८२ रुपये खर्च झाले आहेत. त्यामध्ये हरदास, गवई, कलावंतिणी यांच्या बिदागीवरही रक्कम खर्च झालेली आढळते.[४८] माधवरावाने आपले अखेरचे दिवस थेऊरच्या गणपतीच्या मंदिरातच घालविले होते. गजानन गजानन करीत त्याने एखाद्या योग्याप्रमाणे प्राण सोडला होता. यावरुन त्याच्या गणेशावरील श्रध्देची कल्पना येते. एका अज्ञात शाहीराने माधवरावाच्या मृत्यूच्या प्रसंगावरील रमाबाईचा पोवाडा रचला आहे. त्यामध्ये रमाबाईने गणपतीची ऱ्हदयद्रावक आळवणी पुढीलप्रमाणे केलेली आढळते.

स्वारी पुण्याहून गेली थेऊराला । त्या गणपतीच्या सेवेला।।
रमाबाई विनवी त्या गणपतीला । चुडेदान दे तूं मजला ।।
एवढे वरीस राख साहेबाला । अवघ्या सोन्याने मढवीन तुजला।।[४९]

माधवरावाच्या मृत्यूंनंतर नारायणरावाची अवघी सात आठ महिण्याची कारकिर्द झाली. त्याच्या कारकिर्दीतील पहिल्याच गणपतीउत्सवात म्हणजे शु.१३ या दिवशी गारद्यांनी नारायणरावाचा शनिवारवाड्यातच खून केला, ही अतिशय दुर्दैवी घटना होय. त्यानंतरची दोन वर्षे पुण्याच्या दौलतीला फार संकटांची गेलीत.इ.स.१७७४ मधील गणपती उत्सवासंबंधीची नाना फडणविसाची दोन आज्ञापत्रे सापडतात. त्यापैकी एकामध्ये कलावंतांचे व हरदासांचे कार्यक्रम करावेत व त्यांना दरवर्षी प्रमाणे बिदागी द्यावी असे म्हटले आहे.[५०] दुसऱ्या अज्ञापत्रात

ललीताच्या दिवशीचा समारंभ साध्या पध्दतीने साजरा करावा, बंदोबस्त चांगला ठेवावा व गणपतीच्या विसर्जण मिरवणुकीस वाजंत्र्यांचा एक ताफा द्यावा आणि थोडक्यात समारंभ आटोपता घ्यावा असे सांगीतले आहे.[५१] यावरुन नारायणरावाच्या वधाचा विपरीत परिणाम या उत्सवावर झाल्याचे जाणवते.

इ. स.१७७८ मध्ये सवाई माधवराव पुरंदर किल्ल्यावर असल्यामुळे तेथे गणपती उत्सव मोठ्या थाटात संपन्न झाला होता.[५२] याचवर्षीचा पुण्यातील उत्सवही पहिल्या चार वर्षापेक्षा चांगला झाल्याचे परशुरामभाऊ पटवर्धनांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील शेवटचा गणपतीउत्सव मनोरंजनाच्या अनेक कार्यक्रमामुळे अतिशय आनंदात साजरा झाला होता.[५३] इ.स.१७९५ मध्ये साजरा झालेल्या या गणपती उत्सवात कथाकिर्तन केल्याबद्दल १८१ कथेकऱ्यांना २१५५ रुपये बिदागी आणि पोशाख देण्यात आला होता. ३९ गवयांना ३२९ रुपये बिदागी आणि कलावंतिणींच्या चार ताफ्यांना १०२६ रुपये बिदागी-बक्षीस देण्यात आली होती. याशिवाय कांही पखवाज वाजविणारे गुरव संगीतकार होते त्या ४३ गुरव पखवाजींना १२१ रुपये व वाजंत्र्यांच्या २५ ताफ्यांना २४० रुपये नक्त अशी बिदागी देण्यात आली होती. यावेळच्या गणपती उत्सवात इंग्रज रेसीडेंट मॅलेट हा देखील सहभागी झाला होता. गणपती उत्सवात राजवाड्यातील सर्व नोकरचाकर, सरदार, मानकरी व पुण्यातील जनता सहभागी होत असल्यामुळे तो यशस्वीरित्या पार पडत असे. त्यामुळे या काळात ब्राम्हण भोजने आणि गोरगरीबांना मिठाई आणि फराळाचे वाटप मोठ्या प्रमाणात केले जात होते. दररोज पाचशे असामींचे ब्राम्हण भोजन चौदा दिवस चाले. ज्यास एकादशीला फराळ करावयाचा त्यास साहित्य, साखरभात व दुसरे पक्वान्न, पुरणाच्या पोळ्या अथवा पक्वान्न असेल ते, दहा भाज्या, कुलपी विडा पिकले दहा पानांचा, त्यात लवंग, वेलदोडे, कातगोळ्या, चुना, वाढणारे खटपटे यासाठी मोठा खर्च केला जाई.[५४] पेशव्यांच्या गणपतीची विसर्जन मिरवणूक अतिशय थाटात निघत असे. तिच्यामध्ये स्वत: पेशवे त्यांचे सरदार आणि पुण्यातील प्रजा सामील होत होती. दुसरा बाजीराव पेशवा हा राघोबाइतकाच शिवभक्त होता. मात्र त्याचा भाऊ अमृतराव हा गणेशभक्त होता. बाजीरावाच्या काळातही पूर्वीप्रमाणेच कुळाचार म्हणून गणपतीउत्सव साजरा केला जात होता.

पेशवेकाळातील शेवटच्या गणेशोत्सवाचा उल्लेख १८१५ सालचा सापडतो.[५५] त्यावेळी मूर्तीसाठी १५०० रुपये खर्च केले होते.

पेशवे दरबारात साजरा होणाऱ्या गणेशउत्सवाचे वर्णन करताना पारसनिस म्हणतात, ''On this occasion the Ganpati Rang Mahal was gaily decorated and all the functions were held there. Beautiful crystal chandeliers and crystal globes as well as mirrors and paintings multiplied the beauties of the scene and shed a brilliant light over the assemblage. These in the center the Peshwas mansad with gold broecate work was seen shining. On the both sides the principal Maratha nobles, sardars, shileders, and other Darbaries all arrayed in brilliant costume and jewels, where stated according to their ranks and admidst this cires of the chopdars and bhaldars. The Peshwa Sawai Madhavrao entered the darbar hall and with a dignitying bearing took his seat on the thrown.The whole darbar preseted a picture of varied character and colouring.The singing of masicins the natch of dance.The Kathas or religious and all other performances that were arranged in the program where duly carried but to the enjoyment of all."

गौरी-गणपतीच्या सणानिमित्त कोकणात व देशावर स्त्रियांच्या नाचाचे व गायनाचे कार्यक्रम चालत. गौरी आगमन, गौरी पुजन आणि गौरी विसर्जन असा तीन दिवसांचा गौरीचा कार्यक्रम होत असे. त्यामध्ये फुगडी,झिम्मा, घुमा, आगोटा-पागोटा व देवतांच्या विशेषकरुन गौरी-गणपतीच्या गीतांच्या गायनाचा कार्यक्रम चालत असे. लहान मुलींपासून जेष्ठांपर्यंत सर्व स्त्रिया यामध्ये सहभागी होत असतात.बसून फुगडी घालणे, वाकून फेर धरुन गाणी म्हणणे, घागरी फुंकणे, सुप उडविणे असे अनेक प्रकार स्त्रियांना आनंद देणारे होते. गौरीच्या मांडावर एकत्र जमून स्त्रिया रात्रभर हा नृत्यगायनाचा कार्यक्रम करत असत. त्यांच्या गीतांमध्ये देवदेवतांची स्तूती, माहेरचे मोठेपण आणि सासरचा जाच हे प्रमुख विषय व्यक्त होत असत. त्या गात असणाऱ्या अनेक गीतांपैकी एक प्रसिध्द गीत पुढीलप्रमाणे -

ऊठ ऊठ माळी दादा बैल जूंप रे ऱ्हाटाला
बैल जुंप रे ऱ्हाटाला पाणी जाऊ दे पाटाला
पाणी जाऊंदे पाटाला बाय, हेशीच्या बेटाला
पाच हेशी तोडं द्या हो गौराईच्या हौशाला
पाच सुपे येऊ द्या हो आमच्या गौराईच्या हौशाला

अशाप्रकारे पेशवे कालखंडात साजरा होणारा गणेशोत्सव हा सर्वसामान्य लोकांना मनोरंजनाची चांगली मेजवाणी घेऊन येत असे. पेशव्यांचे अनुकरण करुन अनेक सरदारानींही आपल्याकडे हा उत्सव सार्वजनिक स्वरुपात सुरु केला होता. त्यामुळे भाद्रपद महिन्याचा पहिला पंधरवडा लोकांना मनोरंजन देणारा व आनंद देणारा असे. तासगाव, सांगली व कुरुंदवाड येथील पटवर्धनांच्या संस्थानांमध्ये तर अतिशय उत्साहात गणपती उत्सव साजरा होत असे.या गणपतींच्या मिरवणुकीमध्ये अनेक नागरिक सहभागी होऊन आंनद घेत असत.

## ५.२.४ दिवाळी

दिवाळी किंवा दीपावलीचा सण पेशवेकाळात अतिशय आनंदामध्ये साजरा केला जात होता. वसुबारसेला या सणाची सुरुवात होत असून तुळशी विवाहापर्यंत हा सण साजरा केला जात होता. तरीदेखील अश्विन वद्य चतुर्थीपासूनचे चार दिवस या सणामध्ये महत्वाचे होते. त्यामध्ये नरक चतुर्थदिशी किंवा दीपावली, लक्ष्मीपूजन, दीपावली पाडवा , व भाऊबीज हे महत्वाचे कार्यक्रम  साजरे केले जात असत. दीपावली दिवशी प्रात:काली अभ्यंगस्नान केले जात असे तर सायंकाळी आतषबाजीचा कार्यक्रम होत असे.[५६] श्रीमंत वर्गाकडून केली जाणारी विविध प्रकारच्या दारुकामाची आतषबाजी सामान्य लोकांना आनंद देणारी होती.या सणाच्या चार दिवसामध्ये सोंगट्या, गंजिफा व जुगार खेळला जात होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरामध्ये लक्ष्मीपूजन केले जात होते व कांही लोक या रात्री रात्रभर जुगार खेळत असत. ऐतिहासिक लेखसंग्रहामध्ये शनिवारवाड्यामध्ये दिवाळीच्या तीन  दिवसात ६४ लोक रात्रंदिवस सोंगट्या खेळत असल्याचा उल्लेख आहे. दीपावली पाडवा हा दिवस सर्वात पवित्र दिवस मानला जात असून या दिवशी आजच्याप्रमाणेच व्यापारी वर्गाच्या नववर्षाची सुरुवात होत असे. भाऊबिजेला आलेल्या भावाचे औक्षण करुन त्याला दीर्घायुष्य मिळावे म्हणून प्रार्थना केली जात असे. त्याला शेलापागोटा देऊन त्याचा सन्मान केला जात होता.[५७] तुळशी विवाहाने या सणाची सांगता होत असे.[५८] तुळसी विवाहाची जय्यत तयारी करुन तो थाटामाटात साजरा केला जात होता.

दीपावलीच्या निमित्ताने अनेक गावांमध्ये प्राण्यांच्या कसरतीचे कार्यक्रम केले जात. त्यामध्ये धनगर लोक त्यांच्या मेंढ्यांची शर्यत व उड्या मारण्याची कसरत करीत, गवळी लोक

त्यांच्या म्हैशींच्या शर्यती व रेड्यांच्या कसरतीचे कार्यक्रम करीत तर शेतकरी लोक आपल्या बैलांच्या शर्यती व झुंजीचे आयोजन करुन आनंदामध्ये दिवाळी साजरी करीत.[५९]

## ५.२.५ मकर संक्रांत

मकर संक्रांत तीलशर्करा देऊन साजरी करण्याची पध्दत पेशवेकाळात असून त्यामुळे स्नेह निर्माण केला जात होता.[६०] आजच्याप्रमाणे त्यावेळीही तिळगुळ पाठविण्याची प्रथा होती. छत्रपती शाहूने बाजीराव पेशवे मोहीमेवर असतांना त्यांच्यासह प्रमुख सरदारांना तिळगुळ पाठविले होते. तिळगुळ द्यावयाच्या सरदारांची यादीदेखील पाठविण्यात आली होती.[६१] नानासाहेब पेशव्यांनी पाठविलेल्या तिळगुळ पोहचल्याची पोहच देताना जानोजी निंबाळकर लिहितात की, ''पत्र संक्रमणाचे तिल शर्करायुक्त पाठविले ते पावोन परम समाधान जाले. कित्येकांनी या तिळाचे लावण्य पाहून तिलोतमाच्या लावण्याचे मूळ हेच तीळ असतील ऐसे मानिले. अस्मत् चित्ताने कृपा श्रेहमये जाणोन आवडीने शर्करासहित सेविता रसनेस गोडी व चित्तास प्रतिक्षणी अभिवृधि लक्षणी श्रेहवशता प्राप्त जाली, तो विस्तर लिहिणियाहून विशेषतर असे हे विनंती.''[६२] संक्रातीच्या सणानिमीत्त पार्वतीबाई आणि सगुणाबाई यांनी इ. स.१७७४-७५ मध्ये केलेल्या खर्चाची नोंद चिटणीस दप्तरात सापडते.[६३] पेशवेकालीन शाहीर प्रभाकर याने एका लावणीमध्ये त्यावेळी साजऱ्या होणाऱ्या संक्रांत सणाचे वर्णन केलेले आहे.[६४] या सणानिमित्त दारुकामाची आतषबाजी करुन मजा लुटली जात होती.[६५]

## ५.२.६ गोकुळाष्टमी

श्रावण महिण्यातील कृ.अष्टमीला भगवान विष्णूने कृष्णाच्या रुपाने मनुष्यावतार धारण केला होता. यादिवशी भाविक लोक दिवसभर कोणत्याही प्रकारचे अन्न सेवन न करता अनेक धार्मिकविधी करण्यामध्ये आपला दिवस घालवत.त्याचप्रमाणे कृष्ण, रुक्मिणी, सत्यभामा, बलभद्र, रोहीनी, वासुदेव, देवकी, नंद इत्यादिंच्या मूर्तींची पूजा केली जाते.[६६] पेशवेकाळात हा उत्सव अतिशय थाटामध्ये सार्वजनिकरित्या साजरा केला जात होता. महादजी शिंदे यांच्या डेऱ्यामध्ये साजरा झालेल्या गोकुळाष्टमीच्या उत्सवाला सवाई माधवराव उपस्थित होता. त्यावेळी

महादजीने त्याला पोशाख भेट दिला होता. या उत्सवामध्येही दारुकामाची आतषबाजी करुन आनंद व्यक्त केला जात होता.[६७]

राज्यकर्त्यांप्रमाणे सामन्य लोकही आपल्या गावागावामध्ये गोकुळाष्टमीचा उत्सव साजरा करीत. श्रावण वद्य कृ. अष्टमीला पूर्वरात्री शाळिग्रामपूजा (ज्याला 'गोकुळे पुजणे' अशी संज्ञा आहे) होते.[६८] सहस्त्र तुलसीदले शाळिग्रामला वाहिली जातात. मध्यरात्री कृष्णजन्मोत्सवाने कार्यक्रमाची सांगता होत असते. तोपर्यंत भजन-कीर्तन हे मनोरंजनाचे कार्यक्रम केले जात होते.

### ५.२.७ महाशिवरात्री

हा उत्सव माघ शु.१४ यादिवशी साजरा केला जातो. या दिवशी खाणे, पिणे, झोपणे न करता संपूर्ण दिवस अध्यात्मिक कार्यामध्ये घालविला जातो. हा उत्सव शैव सांप्रदायिक करत असल्याचे वर्णन ड्युबॉईसने केले आहे.[६९] मात्र इतर संप्रदायाचे लोकही या उत्सवात सहभागी होत होते. महाराष्ट्रातील सर्व शंकराच्या मंदिरामध्ये हा वार्षिकोत्सव अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. पेशव्यांची जशी गणपतीवर श्रध्दा होती, तसेच ते शंकराचेही भक्त होते. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रातील शंकराच्या अनेक देवस्थानांच्या खर्चाचा बंदोबस्त केलेला आढळतो.[७०] त्यामधुन तेथे पुजाअर्चा, नंदादीप, होम, अभिषेक, अनुष्ठाने व शिवरात्री उत्सव हे कार्यक्रम नियमीत पार पडत असत. त्याचबरोबर मूर्तीची प्रतिष्ठापना, मंदिरांचा जिर्णोधार, पाण्याची सुविधा व आवश्यक बांधकामेही पेशव्यांनी केली होती. जयगड किल्ल्यावरील प्राचीन शंकराच्या स्वंयभू पाच लिंगापैकी एका लिंगाची शकल खपली निघाली आहे तो बसवावा अथवा धर्मशास्त्रानुसार योग्य कारवाई करण्याचे आदेश पेशव्यांनी दिले होते. त्रिंबकेश्वर येथील श्रीगंगाकुंडाचा जिर्णोधार करुन त्याला गोमुख बसवावे, औदुंबराचा पार बांधावा व नंदी महादेवाची स्थापना करावी अशी आज्ञा पेशव्यांनी घनसेट करजे यांना केली होती. मौजे नसरापूर येथील श्री बनेश्वर देवस्थानसाठी त्यांनी इ.स. १७७३-७४ पासून ४६१ रुपये दरवर्षासाठी मंजूर केले होते. श्री महादेव शिखर शिंगणापूर यास पुजा नैवद्याबद्दल मौजे शिंगणापूर गाव इनाम देण्यात आला होता.[७१]

महाशिवरात्रीच्या रात्री शंकराच्या मंदिरामध्ये कथा कीर्तनाचे कार्यक्रम होत असत. या कार्यक्रमांना लोकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असे. कोपरगावी आनंदीबाईने महाशिवरात्रीचा उत्सव साजरा केल्याचे ४ ऑगष्ट १७८८ रोजी कृष्णाजी जनार्धन याने कोपरगावहून पुण्याला पाठविलेल्या पत्रामध्ये नमुद केले आहे.[७२]

## ५.२.८ वसंतपंचमी

पेशवेकाळात माघ शुध्द पंचमीला जो उत्सव साजरा केला जात होता त्याला वसंत पंचमी असे म्हणतात.यावेळी उन्हाच्या तीव्रतेला सुरुवात झालेली असते. रंगपंचमीचा सण दीड महिने पुढे राहिलेला असतो. या सणालाही रंगपंचमीप्रमाणे रंग खेळण्याची प्रथा पेशवेकालखंडात होती. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात वसंतपंचमी कशी थाटामध्ये साजरी झाली याचे वर्णन कारभारी त्रिंबकजी डेंगळ्यांना मल्हारराव भोसल्याने लिहून कळविले होते.[७३] त्यामध्ये तो लिहितो, ''श्रीमंत राजश्री निंबकजी तात्या डेंगळे साहेबाचे शेवेशी - आज्ञाधारक मल्हारराव भोसले रामराम विनंती विज्ञापना तागाईत माघ शु।। ६ शनिवार पावेतो साहेबाचे कृपा व लोकणे, करोण यथास्तित असो. विशेष काल वसंतपंचमीस विश्रामबागेत स्वारी श्रीमंत बाबासाहेब आले होते. केसरी रंग जाला होता. शास्त्री पुराणिक यांची बैठक भोजन उत्तर होऊन सायंकाळी मागील चार घटका दिवस राहताणी ग्रहस्त लोक व मानकरी यांची बैठक जाली. नाच कलावंतणी व्यंकटनरसी होती. दुसरे शेनवारचे वाड्यात श्रीमंत आप्पासाहेब यांनी रंग करुन चार लोक वगैरे त्या मंडळीतील जितके होते तितक्यास रंग जाला.''[७४]

वसंत ऋतूच्या सुरुवातीला शेतामध्ये जी जी पिके येतात त्यांचे द्योतक म्हणून या सणाला एकमेकांना फळे व धान्याची भेट दिली जात असे.[७५] वसंती या देवतेलाही या वस्तू अर्पण करणे आणि ब्राम्हणभोजन घालणे असे कार्यक्रम केले जात होते. शेतामध्ये मुबलक धनधान्य आल्यामुळे झालेला आनंद व्यक्त करण्यासाठी लोक नाचगाण्याचे कार्यक्रम करीत असत.[७६] त्यामधून लोकांचे चांगले मनोरंजन होत होते.

## ५.२.९ नारळी पौर्णिमा किंवा राखी पौर्णिमा

पेशवेकाळात समुद्रकिनारी राहणारे कोळी लोक नारळी पौर्णिमेचा सण साजरा करीत होते. याशिवाय इतर लोकही हा सण राखी पौर्णिमा अथवा पवती पौर्णिमा या नावाने साजरा करीत होते. हा सण साजरा करण्याच्या पध्दतीमध्ये कोकणामध्ये आणि देशावर वेगवेगळ्या पध्दती होत्या.कोकणातील कोळी लोक यादिवशी समुद्राला नारळ अर्पण करुन त्याला शांत होण्याची आणि भरपूर मासळी देण्याची विंनंती करतात. या सणानिमित्त कोळी स्त्री-पुरुष विशिष्ट प्रकारचे नृत्य करतात, त्याला कोळी नृत्य असे म्हणतात.[७७] हे नृत्य त्यांचे सागराशी असणारे जिव्हाळ्याचे नाते दर्शविणारे असते.या सणादिवशी कोकणातील लोक नारळी भाताचे जेवण घेत असत.

हा सण सर्वत्र साजरा करतांना बहीण भावाला राखी बांधत असे. याशिवाय थोरामोठ्या व्यक्तिंना राख्या बांधून स्नेह निर्माण केला जात होता. फक्त पुरुषानाच नव्हे तर स्त्रियांनांही राख्या बांधल्या जात होत्या, हे पुढील नोंदीवरुन स्पष्ट होते. [७८]

१ ८ /// राख्या कलाबतुच्या गुाा जामदार

.।।. श्रीमंतास

.।.जावई यास

८-।।। चिरंजीव नीळकंठराव यास

८ - । चिरंजीव सौ. येमुनाबाईस

इतर सणाप्रमाणे राखी पौर्णिमेनिमित्त श्रीमंत पेशव्यांना नजराणा देण्याचीही पध्दत यावेळी प्रचलीत होती.

## ५.२.१० जोगणी

जोगणी हा पेशवेकाळातील एक प्रतिष्ठेचा उत्सव म्हणून साजरा केला जात असून त्यासाठी लोक बलीदान द्यायलाही तयार होते. त्यामुळे अनेक वेळा या उत्सवामध्ये वाद निर्माण होऊन ते पंचायतीकडे निवाड्यासाठी येत असल्याची माहिती तत्कालीन कागदपत्रामध्ये आढळते. जोगा आणि जोगी ही आपल्या हातातील तलवारीने जीवंत कोंबडे किंवा मेंढरु मारुन त्याचे रक्त चांदीच्या वाटीत भरुन घेतात व नंतर त्या बाहेर पडतात. त्यांच्या डाव्या हातात रक्ताने भरलेली

चांदीची वाटी आणि उजव्या हातात नंग्या तलवारी असतात. त्यांच्या हातात असणारी चांदीची वाटी हे त्यांचे सर्वस्व असून ती कोणी पळवून नेण्याचा प्रयत्न केल्यास त्याला तलवारीने ठार मारले जाते. पूर्वी बागणीच्या एका माणसाने अष्टेकऱ्यांच्या जोगण्यांच्या हातातील चांदीची वाटी पळविली. तोच जोगण्यांनी त्याचे शिर उडविले पण डोके अष्ट्याच्या हद्दीत पडले. त्यामुळे साहाजिकच वाटी बागणीच्या हद्दीत गेली आणि बागणीकरांनी त्या वाटीवर आपला हक्क सांगितला. तेंव्हा हा लढा पंचायतीत जाऊन निवाडा बागणीकरासारखा झाला व ती वाटी त्यांना मिळाली.[७९]

या जोगण्यामध्ये जोगा व जोगीण असे दोन घटक असतात. ज्या दिवशी जोगण्या निघणार त्यादिवशी लोक देवीच्या देवळासमोर जमा होतात. रात्री अकरा ते एक या दरम्यान जोगण्यांची तयारी होत असे. जोगा व जोगीन होणाऱ्यांना गुडघ्यापर्यंत झालरीप्रमाणे लुगडे नेसून अंगावर पांढऱ्या रंगाचे पट्टे ओढण्यात येत. त्यानंतर त्यांचे लग्न लावून ते मिरवणुकीसाठी रात्री एक वाजता बाहेर पडत. ही मिरवणुक पाहण्यासाठी लोक रात्र जागून काढत होते. यावरुन त्यांचे मनोरंजन भरपूर होत होते हे सिध्द होते. ही मिरवणूक चालू असताना त्यांच्यापुढे ज्यांच्या अंगात भूत येते अशा बायका येऊन किंकाळ्या फोडीत, आडव्या पडत. त्यांना ओलांडून जोगण्या पुढे जात. अशाप्रकारे मिरवणूक रात्रभर फिरुन पुन्हा अंबाबाईच्या देवळात येऊन, जोगण्यांच्या पुजनाने समाप्त होई. नवरात्रामध्ये जोगीनी उदगार घालत असत.[८०]

## ५.२.११ इतर उत्सव

वरील प्रमुख उत्सवाखेरीज इतर अनेक उत्सव पेशवेकाळात गावागावांमध्ये साजरे होत होते. त्यापैकी रामनवमीचा उत्सव चांगला थाटामध्ये यावेळी साजरा केला जात होता. हा उत्सव चैत्र नवमीस विष्णूने रामाच्या रुपाने मनुष्यावतार धारण केला, म्हणून तो श्री रामजन्मोत्सव म्हणून साजरा केला जात होता.रामदासी संप्रदायाचे भाविक हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. इ.स. १६४८ मध्ये रामदास स्वामींनी हा उत्सव चाफळ येथे सुरु केला होता. तेंव्हापासून सुरु झालेला हा उत्सव पेशवेकाळात आणि नंतरही चालू राहिला. हा उत्सव साजरा करण्यासाठी लागणारे साहित्य, देणग्या, इनाम व वर्षासने दिल्याचे उल्लेख समकालीन

कागदपत्रात आढळतात. पेशव्यांचे सरदार तुळशीबागवाले हेसुध्दा चांगले रामभक्त होते. त्यांनी शके १६८४ मध्ये श्रीरामाच्या मूर्तीवर घालण्यासाठी १७० ।// रुपयांचा शिरपेच केला होता.[८१] तसेच ते रामनवमीच्या उत्सवामध्ये दरवर्षी भरपूर पैसे खर्च करत असल्याचे पुढील नोंदीमधून लक्षात येते.[८२]

शा.१६८५ ३२५० रु. ह्यात १ रु.आपाजी वाणी देहुकर; २ रु. विठोबा चावर; ४४ रु. गुणीजन व नटवे असा खर्च आहे.

शा. १६९० २२४७ रु. खर्च

शा. १६९१ २५९३ रु. खर्च

शा. १६९५ २१९४ रु. खर्च

शा. १६९७ २२६३ रु. खर्च

शा. १६९९ २०८२ रु. खर्च

शा. १७०८ १३३३ रु. खर्च याप्रमाणे रामनवमी उत्सवावर खर्च केला जात होता. शा.१६८५ च्या खर्चामध्ये गुणीजन आणि नटवे यांच्यावर केलेला खर्च स्वतंत्र दाखविण्यात आला आहे. त्यामुळे रामनवमी उत्सवावेळी मनोरंजनाचे कार्यक्रम होत होते याची माहिती मिळते. या खर्चाशिवाय त्यांनी केलेल्या श्रीरामचंद्र, सीता व लक्ष्मण यांच्या अलंकारावरही खर्च पडला आहे. संत तुकाराम महाराज यांची जयंतीही पेशवेकाळात श्री तुकोबादेव यांचा उत्सव म्हणून साजरी केली जात होती.[८३] हा उत्सव फाल्गुन वद्य पंचमीला देहू येथे साजरा होत असून त्याला पेशव्यांकडून मदत केली जात होती. शिवाय गावकऱ्यांचाही त्यामध्ये मोठा सहभाग असे. याशिवाय दत्त जयंतीचा उत्सव हेदेखील अतिशय उत्साहात साजरे केले जात होते.[८४] या उत्सवांच्या प्रसंगी भजन, कीर्तन, पुराणकथन असे कार्यक्रम होत असत. त्यामध्ये सहभागी होणाऱ्या लोकांची अध्यात्मिक उन्नती होत होती, त्याबरोबरच त्यांचे मनोरंजनही होत होते. त्यामुळे अशा समारंभामध्ये तत्कालीन लोक चांगला सहभाग घेत होते.

## ५.३ कौटुंबिक कार्यक्रमातील सामाजिक मनोरंजन

पेशवेकालीन समाज विविध कौटुंबिक कार्यक्रमांच्या निमित्ताने एकत्र येत होता. या कार्यक्रमप्रसंगी होणारे विधी आणि त्यामधील प्रथा-पध्दती यामुळे लोकांना आनंद मिळत होता, त्याबरोबर त्यांचे मनोरंजन होत होते. यावेळी पुढील कार्यक्रम समाजात अतिशय आनंदात साजरे केले जात होते.

### ५.३.१ गर्भाधान

याकाळी स्त्रीची ऋतुप्राप्ती ही विषयानंदानुभवाची तयारी होय अशा समजुतीने रजस्त्रावाचे दिवस हे उत्सवाचे दिवस म्हणून साजरे केले जात होते. समाजामध्ये यावेळी बालविवाह प्रथा असल्याने विवाहितेच्या ऋतुप्राप्तीचे स्वागत करण्यासाठी हा समारंभ केला जात होता. गावातील लोक याप्रसंगी न्हाणवलीला आनंदात ठेवण्यासाठी तिला चांगले जेवण देत, त्याला 'वाढून नेणे' असे म्हणत. त्याशिवाय तिला भेट आणि आहेर दिला जात होता. तिला पहिल्या दिवशी हिरवे, दुसऱ्या दिवशी गुलाबी, तिसऱ्या दिवशी पिवळे व चौथ्या दिवशी पांढरे लुगडे देण्याची वहिवाट होती. स्त्रीला रजोदर्शन झाल्यानंतर एका समारंभामध्ये त्या स्त्रीमध्ये पुरुष वीर्याची स्थापना करणे यालाच गर्भधान असे म्हणतात.[८५] पेशवेकाळात याप्रसंगी आहेर देण्याची प्रथा प्रचलीत होती.[८६] या आहेरामध्ये उंची वस्त्राबरोबर दागिने देखील दिले जात होते. हा समारंभ साजरा करण्यासाठी भरपूर पैसा खर्च केला जात होता.त्याबरोबरच यावेळी अनेक प्रथा पाळल्या जात होत्या, हे पुढील खर्चाच्या यादीवरुन लक्षात येते.[८७]

सौ. अनुताईस यांस रजोदर्शन प्राप्त झाले सबब आहेर वगैरे खर्च

६१५ ॥/। याचा तपशील

३१।। // चवथे दिवशी वोटी भरावयासी घरी आणिली ते समई

२८ सेलार १

३।।//खण १

---

३१।।//

४९।।=।। बिछाना

१०।   झोलणा किनखापी

४१६।।।   गर्भदानाचे दिवशी आहेर सर्वांस वस्त्रे

२।।=।।   भवानी खिजमतगार सांगावयासी आला त्यास तिवट १

११   खण व पातळ

९३ ८//   दुसरीयाणें न्हाण आले ते समई सनगे

५१ पातळ पिवळे केसरी १

३। चोळी गुलाली १

१   चोळी केशरी १

३७।।। खण लोकांचे बायकांस द्यावयासी वगैरे ४१

---

६१५ ८⁄।

गर्भाधान समारंभाबाबत डॉ. पांडे म्हणतात की, `The rite through which a man placed his seed in a women was called Garbdhan.' हा समारंभ श्रीमंतांच्या घरी मोठ्या थाटाने तर सामान्यांच्या घरी त्यांच्या कुवतीप्रमाणे साजरा केला जात होता. या समारंभप्रसंगी स्त्रिया गाणी गाऊन उपस्थितांचे मनोरंजन करीत असत. सधन कुटुंबात गरोदर स्त्रीचे कौतुक करण्यासाठी डोहाळे जेवणाचा कार्यक्रम आयोजित केला जात होता. ती कोणत्या वस्तू आवडीने खाते, तिला कसले डोहाळे लागले आहेत, ती चालते कशी, तिला कोणती स्वप्ने पडतात या साऱ्या गोष्टी रिकामटेकड्या स्त्रियांचा चघळीत बसण्याचा विषय होता. ज्यामुळे त्यांना वेळ घालविणे सोपे जात असे.

### ५.३.२ जन्मोत्सव

भारतीय समाजात व संस्कृतीत स्त्री-पुरुष असा भेद करुन स्त्रीला नेहमीच कमी लेखण्यात आले आहे. त्याचा परिणाम म्हणजे मुलीचा जन्म ही अनादरनीय व अशुभ घटना मानली जात असे. याउलट मुलाचा जन्म ही शुभ घटना मानून आनंदोत्सव साजरा केला जात असे. श्रीमंतांच्या व राज्यकर्त्यांच्या घरामध्ये हा सोहळा मोठ्या दिमाखाने पार पाडला जात होता. त्याप्रसंगी मोठ्या प्रमाणात दानधर्म, वस्त्रालंकाराचे वाटप, नाचगाण्याचा कार्यक्रम व वाजंत्र्यांच्या मंगल वाद्यांचा

गजर करुन पूत्र जन्माचा आनंद साजरा केला जात होता.या आनंदाच्या प्रसंगी कांही कैद्याची मुक्तताही केली जात असे.

राघोबादादास पुत्ररत्न झाल्याचे १६/०८/१७६४ रोजी जाहिर करण्यात आले.त्यावेळी पुत्रजन्माचा आनंद साजरा करण्यासाठी २६५।। रुपये खर्च करण्यात आले.[८८] सौ. आनंदीबाईस पुत्रप्राप्ती झाली म्हणून लोकांनी तिला नजरा केल्या. पुत्रप्राप्तीचा आनंद साजरा करण्यासाठी साखर वाटण्यात येत असे. तसेच वाजंत्री कर्णेकरी व गुढ्या घेऊन आलेले महार यांना इनाम देण्यात आले होते.[८९] पहिल्या माधवरावांच्या पोटी ज्यावेळी नारायणराव जन्मले तो शनिवारचा दिवस कायमचा चौघडी वाजविण्याचा दिवस म्हणून ठरविण्यात आला व तो दिवस सर्व मराठी राज्यात पाळण्यात यावा असे फर्मान इ. स.१७७४ मध्ये काढण्यात आले. गंगाबाईस पूत्र झाला तेंव्हा कांही कैदी सोडून द्यावेत अशी आज्ञा करण्यात आली होती. मन्याबापू भोसले याला पुत्र झाला त्यावेळी हत्तीवरुन साखर वाटण्यात आली होती. अशाप्रकारे पेशवेकालीन लोक पुत्रजन्माचा आनंद साजरा करत होते. यावेळी समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात असल्याने मुलीचा जन्म झाल्यानंतर मात्र आनंद साजरा केला जात नव्हता.

ज्यावेळी मुलगी आपल्या वडीलांच्या घरी बाळंतपणासाठी प्रथम जाते त्यावेळी जातक कर्म हा समारंभ साजरा केला जात असे.[९०] बाळंतविडा देण्याची प्रथा पेशवेकाळात प्रचलीत होती. माधवराव नगरकर यांना नातू झाल्यानंतर बाळंतविड्यावर ४३।। रुपये खर्च झाले होते.[९१] त्याचा तपशिल खालीलप्रमाणे खर्चामध्ये दाखविला आहे.

१५ बिंदली जोड १ वजन तोळा १ किंमत येशवंतरावाचे पुत्रास

१४।।मोहोर १ बाळंतविड्यावर छ.३० रजब (श.१७१०)

१४ मुलाचे हाती छ.साबान मोहोर १ किंमत

४३।। या तपशिलावरुन असे दिसते की बाळंतविड्याच्या वेळी बाळाला दागिणे देण्याची व त्याच्या हातामध्ये पैसे देण्याची पध्दत होती.

### ५.३.३ नामकरण

मुलाच्या जन्मानंतर अकराव्या किंवा बाराव्या दिवशी हा समारंभ साजरा केला जात होता याला बारशे असे म्हणतात. या समारंभात पहिल्यांदा बाळाचे कान टोचले जातात. कुटुंबाचा पुरोहित भविष्य पाहून चार नावांची शिफारस करतो. मुलाचा बाप या चार नावाचा उच्चार सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात करतो. यानंतर पुरोहित बाळाला 'दिर्घायुष्य लाभो' असा आशीर्वाद देतो. त्यानंतर मुलाचे आईवडील निरनिराळ्या देवदेवतांची पुजाअर्चा करतात व इतर समारंभ होऊन नामकरणाचा कार्यक्रम संपतो. पेशवेकालीन कागदपत्रात नामकरण समारंभाचे उल्लेख सापडतात. सवाई माधवरावाच्या नामकरण समारंभाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे - 'श्रीमंत गंगाबाई प्रसुत झाली पुत्र झाल्याचे वृत्त आपणास कळलेच असेल.आकरा दिवशी नामकरण झाले, समारंभ मोठाच झाला. राजश्री बाबूजी नाईक कुटुंबसुध्दा आले होते. पुण्यातील मातबर आले होते. नांव राजश्री माधवराव साहेब ठेवले.समारंभ चांगलाच झाला. हेलकरणी बायका मराठ्यांच्या अकरा दिवस पाणी घालीत असतात. त्यास बारामती, सुपे, फलटण, वाई, सासवड तालुक्याच्या गांव खेड्यांच्या म्हणता सात-आठ हजार जाहला. त्यास लुगडी व चोळखण याच प्रमाणे दिले. पुण्यातील वाड्यातील व पुण्यातील बायका दहा हजार जाहल्या.त्यास चोळखण दिले. अबाल वृध्दास मोठा संतोष झाला.'[१२] या समारंभप्रसंगी स्त्रिया गाणी गाऊन कार्यक्रमाची शोभा वाढवत असत. त्यामध्ये बाळ कर्तबगार व्हावा व त्याला दीर्घायुष्य लाभावे अशी भावना व्यक्त केलेली असे.

### ५.३.४ उपनयन

हा समारंभ प्रामुख्याने ब्राम्हण वर्गात होत असे. साधारणपणे तो मुलाच्या सात ते दहा वर्षे वयाच्या दरम्यान शुभमुहुर्तावर साजरा केला जात असे. याप्रसंगी सर्व नातेवाईकांना आणि मित्रमंडळींना निमंत्रित केले जात होते. समारंभादिवशी सकाळी १२ पाटावर जानवे घातलेले ब्रम्हचारी बसवून त्यांना जेवण वाढतात. मुलगा स्वत:च्या आईबरोबर जेवण घेतो. त्यानंतर मुलगा आपल्या आईवडीलांना मी 'मी ब्राम्हण होऊ इच्छितो' असे सांगतो. यावेळी वडील व मुलगा यांना एका उपरण्यात गुंडाळलेले असते. वडील मुलाच्या उजव्या कानात मंत्र म्हणून मुलाला

जानवे घालतो. मुलाच्या हातावर पवित्र जल सोडून वडील म्हणतो की, 'आतापर्यंत तू शुद्र होतास तू ब्राम्हण व ब्रम्हचारी झालास.' संध्याकाळी मुलाला देवदेवतांच्या दर्शनाला जाण्यासाठी काढलेली मिरवणूक हो लोकांना आनंद देणारी होती. देवदेवतांचे दर्शन घेऊन परत आल्यावर तुळशीची पुजा करुन तो ब्राम्हण कुटूंबात सहभागी होत असे. शेवटी जेवणावळ होऊन हा समारंभ संपतो.[९३]

पेशवेकाळातील कागदपत्रामध्ये या समारंभाचे वर्णन मुंज, वृतबंध व उपनयन असे आढळते. पेशवा बाजीराव, नानासाहेब, सदाशिवराव, विश्वासराव, रामराजा, आप्पासाहेब आणि जनार्धनभाऊ यांच्या उपनयन समारंभाची माहिती पेशवे दप्तरात मिळते.[११३] सवाई माधवराव पेशव्याचा मुंज समारंभ पर्वती येथे २१ एप्रिल १७७९ रोजी मोठ्या थाटामाटात पार पडला होता. यावेळी अनेकांनी त्यांना आहेर व नजर केली होती. तुळशीबागवाल्यांच्या खर्चामध्ये या मुंजीसाठी ७४।। रु. खर्च झाल्याची नोंद झाली आहे.[९४] त्यामध्ये ६० सनगे, १फेटा, १दुपटा, १विजार, १झगा आणि १४ ।। मोहोर व नाणे १ असा खर्च आहेर व नजर यावरती केला होता. या समारंभप्रसंगी काढण्यात येणारी मिरवणूक लोकांना आनंद देणारी व लोकांचे मनोरंजन करणारी असे.

## ५.३.५ विवाह

विवाह हा एक असा संस्कार आहे की, ज्यामध्ये स्त्री आणि पुरुष यांना गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येते. विवाह या शब्दाचा अर्थ सांगताना पंढरीनाथ प्रभू म्हणतात की, ``The meaning of 'Vivaha' refers mainly to the ceremony of Carrying away the bride to the house of the bridegroom.''[95](vivaha = to carry) लग्नसमारंभामध्ये अनेक सामाजिक आणि धार्मिक चालीरीतींचा समावेश असल्याने या समारंभाचे महत्व अनन्यसाधारण होते. हा समारंभही लोकांना आनंद देणारा असून त्यामधील विविध कार्यक्रमामध्ये लोकांचे चांगले मनोरंजन होत होते. हिंदू धर्मामध्ये प्रचलीत असणाऱ्या सोळा प्रमुख संस्कारापैकी विवाह हा एक संस्कार होता. या संस्कारात धर्मशास्त्राने सांगितलेल्या विधी आणि नियमांचे पालन करुन पेशवेकाळातील विवाह संपन्न होत होते. विवाहापूर्वी कुलदैवतांना आणि ग्रामदेवतांना लग्नाची दक्षिणा आणि वस्त्रे दिली जात होती.[९६]

विवाह ठरविण्यापूर्वी वधू-वर परीक्षा व वाङ्:निश्चय हे कार्यक्रम होतात. त्यामध्ये वधुवरासंबधीचा कुल, शील, गोत्र, प्रवह, वय व ज्योतिषशास्त्राच्या दृष्टिने गृहांचे बलाबल व इतर गुण तपासले जातात. त्यानंतर विवाहासंबंधी बोलणी करुन विवाह निश्चीत केला जातो. यालाच वाङ:निश्चय असे म्हणतात. विवाहप्रसंगी देवकस्थापना, नवरीची उष्टी हळद, आहेर, श्रीमंत पूजन, देकार, तेलफळ , रुखवत , वरात इत्यादी समारंभ होत.[९७] औरंगजेबाने छत्रपती शाहूचा विवाह मराठ्यांच्या चालीप्रमाणे करुन घेतला असून तो स्वत: लग्नसंमारंभास हजर होता. त्याने लग्न समारंभासाठी एक लाख रुपये दिले होते.[९८] तर शाहू महारांजांची (सकवारबाईची) कन्या गजराबाई हिच्या लग्नासाठी दहा लाख रुपये खर्च करुन मोठ्या थाटामाटात लग्नसमारंभ पार पडला होता.[९९] इ.स. १७७२ मध्ये सवाई माधवराव पेशव्यांच्या विवाहाचे वर्णन पेशवा बखरीमध्ये इत्यंभूत सांगीतले आहे. लग्नाचे निमंत्रण अनेक प्रांतांच्या राजांना, जहागिरदारांना, सरदारांना पाठविण्यात आले होते. लग्नसमारंभ प्रसंगी त्यांचे यथोचित स्वागत करुन त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. लग्नसमारंभ थत्ते यांच्या घरी होणार असल्याने पुण्यातील सर्व प्रतिष्ठितांना निमंत्रण देण्यात आले होते. लग्नामध्ये देवकस्थापना, नवरीची उष्टी हळद, आहेर समारंभ, श्रीमंत पूजन, देकार, तेलफळ, रुखवत,मधुपर्क विधी, पाणीग्रहण, प्रत्यक्ष लग्न आणि चार दिवसांनी वरात असे समारंभ पार पडले. लग्नाच्या वरातीची मिरवणूक व त्यावेळी केलेले दारुकाम हे सर्वसामान्य लोकांना आनंद देणारे व त्यांचे मनोरंजन करणारे होते. यावेळी पुढीलप्रकारचे दारुकाम केले.[१००]

| | | |
|---|---|---|
| १. तावदानी रोषणाई | - | म्हणजे काचेच्या कमानी करुन व त्यास आरशे लावून जे दारुकाम होत होते त्याला तावदानी रोषणाई असे म्हणत. |
| २. आकाशमंडळ तारांगण | - | दारुकामाची उंच झाडे तयार करुन त्यातून आकाशातील ताऱ्यांप्रमाणे तारे उडवित त्याला आकाशमंडळ तारांगण असे म्हणत. |
| ३. चादरी दारुकाम | - | तप्त सुवर्णाप्रमाणे लाल व पिवळ्या रंगाची जी फुलांची झाडे तयार करीत त्याला चादरी दारुकाम म्हणत. |

४. नारळी झाडे - नारळी झाड म्हणजे उंच झाडे तयार करुन त्यातून तोफाप्रमाणे व बंदुकाप्रमाणे आवाज निघत व सर्पाकार तोटे फिरत व फुले दृष्टिस पडत.

५. प्रभाचमक - जसा प्रात:काली सूर्योदय होतो व त्यावेळी प्रभा चमकते त्याप्रमाणे देखावा दृष्टिस पडण्याकरिता जे दारुकाम करीत त्याला प्रभाचमक असे म्हणतात.

६. कैचीची झाडे - यातून हवाई लोट उडत असत.

७. बादल गर्ज - ज्या दारुकामाचा मेघगर्जनेप्रमाणे आवाज होत असे त्याला बादलगर्ज असे म्हणतात. .......याशिवाय बाण, पाणकोंबडी, हातनळे, कोठ्याचे नळे, फुलबाज्या, महताफा वगैरे दारुकामाचे अनेक प्रकार होते.

त्यावेळी सामान्य लोकांमध्ये लग्नाची वरात हे विवाहामधील खास आकर्षण होते. कारण त्यामधून त्यांचे मनोरंजन होत होते व आनंद मिळत होता. मात्र अनेकदा वरात काढण्यावरुन समाजामध्ये संघर्ष निर्माण होऊन तो निवाड्यासाठी पेशव्यांकडे व त्यांच्या अधिकाऱ्याकडे येत असे. असाच एक खटला निवाड्यासाठी श्रीनिवास पंडीत प्रतिनिधी यांच्याकडे इ.स.१७६५ मध्ये आला होता. तो कराडमधील लिंगायत वाणी आणि कासार यांच्यामध्ये कासाराच्या वरातीवरुन निर्माण झाला होता. त्याचा निकाल देताना त्यांनी कासारांना त्यांच्या लग्नाची वरात कलसासहित उभ्या पेठेतून मिरवित नेण्यास कायमस्वरुपी परवानगी दिली.[१०१] दुसऱ्या एका निर्णयानुसार माधवराव पेशव्यांनी कुंभार जातीच्या वधु-वराची वरात घोड्यावरुन काढण्यास इ.स.१७७७ मध्ये परवानगी दिली होती.[१०२] याशिवाय सामाजिक व धार्मिक चालीरितीप्रमाणे विवाह होत नसेल तर त्याबद्दलच्याही भरपूर तक्रारी येत असत.[१०३] त्यांची दखल घेऊन निवाडा करावा लागत होता. त्यामधून तत्कालीन विवाह पध्दतींची व त्यामधील प्रथांची माहिती मिळते. विवाह समारंभामध्ये आहेर आणि मेजवाणी यावर श्रीमंत कुटुंबामध्ये मोठ्या प्रमाणात खर्च केला जात होता.

## ५.३.६ अक्षत समारंभ

मराठेकाळात गणपती आणि देवी या दोन देवतांना विशेष महत्व प्राप्त झालेले होते. त्यामुळेच राजमाता जिजाबाईंनी पुण्यामध्ये कसब्याच्या गणपतीची स्थापना केली होती. नानासाहेब पेशव्यांनी बुधवार पेठेत जोगेश्वरीची स्थापना केली होती. पुण्यामध्ये याच देवता मुख्यत्वेकरुन ग्रामदेवता म्हणून प्रसिध्द झाल्या होत्या. त्यामुळे शहरवाशी जनता लग्न व मुंज यासारख्या मंगलकार्याच्या प्रसंगी ते निर्विघ्नपणे पार पडावे म्हणून या दोन्ही देवतांना प्रथम अक्षत देत. त्यानंतर शहरातील इतर नागरिकांना अक्षत वाटून निमंत्रण देत. हा उत्सव मोठ्या थाटामध्ये पार पाडण्याचा प्रघात पेशवेकाळात पडलेला होता.[१०४] अक्षत देण्याची मिरवणूक सायंकाळी चार घटका दिवस असताना निघत असे. सर्वसामान्यांच्या व मध्यमवर्गीयांची अक्षत मिरवणूक त्यांच्या ऐपतीप्रमाणे काढली जात होती. श्रीमंतांच्या घरातील अक्षत मिरवणूक मात्र अतिशय थाटामाटामध्ये काढली जात असे. त्यामुळे या मिरवणुकीचा थाटमाट पाहणे हे सर्वसामान्यांना आनंददायी व मनोरंजक वाटत होते.

ज्यांच्या घरी लग्न अथवा मुंजीसारखा मंगल कार्यक्रम असे त्यांच्या घरी सायंकाळी सर्व निमंत्रित एकत्र जमत. त्यांना पानसुपारी व अत्तर गुलाब देऊन अक्षत मिरवणुकीला प्रारंभ होत असे. गणपती व जोगेश्वरीच्या मंदिराकडे जाण्यासाठी निघालेल्या मिरवणुकीचा थाट अतिशय सुंदर असे. मिरवणुकीच्या अग्रभागी नगारा वाजविणारे, त्यांच्या पाठीमागे डंके, निशाने, शृंगारलेले हत्ती, भालदार, चोपदार, गुरव व न्हावी यांची वाजंत्री, कर्णे, तुतार्‍या, शिंगे इत्यादी, त्यांच्यामागे नळे, चंद्रज्योती, झाडे इत्यादींची अतिशबाजी, त्याच्या पाठीमागे कागदाची बाग असे. त्यामध्ये यजमान व त्यांचे साथीदार असत. मध्यभागी लग्न असेल तर घोड्यावर स्वार झालेला नवरा आणि मुंज असेल तर पालखीमध्ये बसलेला बटू असे. त्यांच्यामागे सरदार व मानकरी आणि त्याच्यामागे गावातील मानकरी अशाप्रकारे मिरवणुक निघत असे. ही मिरवणुक प्रथम गणपतीला अक्षता देऊन नंतर जोगेश्वरीला जात असे. तेथे अक्षता देऊन मिरवणुकीचा शेवट होत असे व लोक आपआपल्या घरी जात असत. पुण्याप्रमाणेच इतर गावातील लोकही आपल्या ऐपतीनुसार अक्षत मिरवणूक काढत असत. त्यावेळी ग्रामदेवतांना अक्षता देऊन कार्य निविघ्न पार पडावे असे गार्‍हाणे घातले जात होते.

## ५.३.७ मेजवानी समारंभ

पेशवेकाळात श्रीमंत वर्गामध्ये विविध कारणाने मेजवानी दिली जात असे. या निमित्ताने कलावंतिणीच्या नाचाचा कार्यक्रम ठेऊन उपस्थितांचे मनोरंजन केले जात असे. इ.स.१७७२ मध्ये पेशव्यांनी छत्रपती महाराजांना मेजवानी दिली, त्यावेळी अनेक कलावंतिणींना नाच करण्याची संधी मिळाली होती. त्यामध्ये चंदा नाईकीन वदनकर, पीरा नाईकीण वदनकर, आछा नाईकीन कोळेकर, सदा नाईकीन खेडकर, जैना नाईकीन खेडकर, मैना नाईकीन खेडकर, आनंदी सुपेकर, सगा सुपेकर, गुलाब पुणेकर, मोहिना पालकर, मिरा पालकर, हिरा पालकर, अना सातारकर यांचा समावेश होता.[१०५] सरकार दरबारी कला सादर करण्याची संधी ज्यावेळी कलाकारांना मिळत असे तेंव्हा राज्यकर्त्यांकडून त्यांच्या कलेची कदर केली जात असे. त्यांना चांगले बक्षिस व इनाम दिले जात होते. पुण्याहून सातारला परत जातेवेळी पेशव्याने छत्रपतींना नजर केली होती.

निरनिराळ्या व्रतवैकल्याच्या उद्यापनावेळी, लग्नसमारंभानिमित्त किंवा पाहुण्यांच्या स्वागतप्रसंगी मेजवानी देण्यात येत असे. तसेच ब्राम्हणभोजन घालण्याची पध्दतही यावेळी मोठ्या प्रमाणात होती. मेजवानी समारंभामधून तत्कालिन महाराष्ट्राच्या वैभवाची व विलासाची प्रचिती येते. सवाई माधवरावाच्या लग्नसमारंभात देण्यात आलेल्या मेजवानीमधून त्याची चांगली जाणीव होते.[१०६] इ.स. १८०३ च्या सुमारास पुण्याचा रेसिडेंट सर बारी क्लोज याने एका मेजवाणी समारंभाचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. त्यावेळी दुसऱ्या बाजीरावाने लॉर्ड व्हॅलेंटिया याला भोजनास बोलाविले होते. क्लोज लिहितो की, ''आम्हा इंग्रजी गृहस्थाकरिता केळीची पाने मांडली होती. त्यावर ब्राम्हणी पध्दतीचे जेवण वाढले असून त्यात भात, पापड, पापड्या, करंजा इत्यादी पदार्थ होते. एका ओळीला रंगारंगाची पक्वान्ने होती व दुसऱ्या ओळीला सात प्रकारच्या चटण्या, कोशिंबिरी होत्या. पानाच्या एका अंगाला खीर, तूप व दुसरे पातळ पदार्थ होते. हे सर्व पदार्थ उत्कृष्ट बनविले होते. आम्ही आपल्याकरिता स्वत:बरोबर काटे, चमचे व सुऱ्या आणिल्या होत्या.''

## ५.४ प्रमुख तिर्थक्षेत्रे व ग्रामदेवतांच्या यात्रांमधील सामाजिक मनोरंजन

पेशवेकाळात महाराष्ट्रामध्ये अनेक तिर्थक्षेत्रांना महत्व प्राप्त झालेले आढळते. त्यामध्ये तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणुका आणि सप्तक्षृंगी गडावरील सप्तक्षृंगी या शक्तीदेवता[१०७] म्हणून प्रसिध्द होत्या. आदिमातेची ही साडेतीन पीठे धार्मिकदृष्ट्या महत्वाची मानली जात होती. देवीच्या एका स्तोत्रामध्ये त्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

एक पीठ ते तुळजापूर। द्वितीय पीठ ते माहूर ।

तृतीय पीठ ते कोल्हापूर ।अर्धपीठ सप्तशृंती।।[१०८]

या देवतांचे असणारे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन तत्कालीन राज्यकर्त्यांनी त्यांच्या खर्चाचा बंदोबस्त केलेला होता. श्रीदेवी तुळजापूर हिला छत्रपती शाहूने मौजे सिराढोण व मौजे तुळजापूर हे गाव इनाम दिले होते,[१०९] तुळजापूरची पाटीलकी व भोपीपणाचा हक्क ही वतने शाहूने अनामत करुन जिवाजी रायजीकडे दिली होती.[११०] कोल्हापूरच्या महालक्ष्मीला मौजे करडू परगणे हवेली कोल्हापूर हा गाव इनाम दिला होता.[१११] प्राचीन काळापासून प्रचलीत असणारी शिवपूजाही पेशवेकाळामध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित असून बारा ज्योतिर्लिंगापैकी पाच महाराष्ट्रामध्ये आहेत. भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ आणि घृष्णेश्वर ही ती पाच तिर्थक्षेत्रे असून त्यांचे महत्वही अनन्यसाधारण होते. याशिवाय कोल्हापूरजवळील वाडी रत्नागिरीच्या (जोतीबा) डोंगरावरील केदारलिंग उर्फ जोतीबा हा देवही प्रसिध्द होता. त्याला वाडी रत्नागिरी[११२] प्रांत पन्हाळा हा गाव इनाम दिला होता. ब्राम्हणापासून अस्पृश्यापर्यंत सर्व जातींनी कुलदेवतेचा मान दिलेला खंडोबा हा देवही पेशवेकाळात प्रसिध्द होता.[११३] त्याच्या अकरा स्थानांपैकी सहा महाराष्ट्रात आणि पाच कर्नाटकात आहेत. जेजुरी, निमगाव, शेगुंड, सातारा, नगदुर्ग, पाली या खंडोबाच्या तिर्थक्षेत्रांनाही महत्व प्राप्त झाले होते. शाहूमहाराज, पेशवे, शिंदे व होळकर यांची जेजुरीच्या खंडोबावर अतिशय भक्ती असून त्यांनी त्याची व्यवस्था उत्तम ठेवली होती. शाहूने जेजुरीच्या खंडोबाच्या पुजा नैवेध्याबद्दल मौजे आकुर्डी तर्फ करेपठार पैकी जमीन चाहूर ।।[११४] इनाम दिली होती. त्याचप्रमाणे पालीच्या खंडोबाला सासवडे गाव इनाम दिला होता.[११५]

गणपती उपासनाही पेशवेकाळात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रुढ होती.पेशव्यांचे व पटवर्धनांचे अराध्य दैवत हे गणपती असल्यामुळे यावेळी गणपतीचे महात्म्य वाढत गेले होते. अष्टविनायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोरगावचा मयुरेश्वर, सिध्दटेकचा सिध्दीविनायक, पालीचा बल्लाळेश्वर, महाडचा वरदविनायक, थेऊरचा चिंतामणी, लेण्याद्रीचा गिरिजात्मक, ओझरचा विघ्नेश्वर, आणि रांजनगावचा विनायक या तिर्थक्षेत्रांचे महत्वही वाढलेले होते. चिंचवड येथे १७व्या शतकात मोरया गोसाव्यांनी गणपतीचे महात्म्य वाढविले होते. या देवाला शाहूने मौजे राहाटणी व मौजे टुडुलगाव तर्फ हवेली पुणे पैकी इनाम जमीन चाहूर २ दिली होती. अनेक ठिकाणी गणपतीच्या मंदिरामधून गणपतीउत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात होता. या उत्सवांच्या खर्चाची तरतुद म्हणून पेशव्यांनी इनाम जमिनी दिल्या होत्या.[११६] सर्वसामान्य जनतेचे अराध्य दैवत म्हणून प्रसिध्द असणाऱ्या पंढरीचा विठ्ठल याची लोकप्रियताही प्रचंड होती. ब्राम्हणापासून अंत्यजापर्यंतच्या सर्व भाविकांचा तो लाडका देव होता. त्याच्या आषाढी व कार्तिकी यात्रेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणात वारकरी येत होते. त्यावेळी पंढरपुरात अध्यात्मिक मनोरंजनाच्या सर्व साधनांचा आस्वाद यात्रेला आलेल्या लोकांना घेता येत होता. यात्रेला येणाऱ्या लोकांकडून यात्रेचा कर आकारला जात होता.[११७] पंढरपूर क्षेत्राला मातोश्री अहिल्याबाई होळकरांनी बोधली गाव इनाम दिले होते.[११८] या प्रमुख तिर्थक्षेत्राप्रमाणेच हरिहरेश्वर, शिखरसिंगणापूर, औंधची यमाई, कोकणातील गणपतीपुळे व परशुराम इत्यादी अनेक तिर्थक्षेत्रांना पेशवेकाळात महत्व प्राप्त झाले होते. या सर्व तिर्थक्षेत्रांच्या दैनंदिन खर्चाची आणि वार्षिक उत्सवाच्या खर्चाची व्यवस्था छत्रपतींनी व पेशव्यांनी केलेली होती. श्री लक्ष्मी करवीर यांस मौजे कुरडू परगणे हवेली कोल्हापूर हा गाव इनाम दिला होता. श्री भवनी मुक्काम प्रतापगड यांसी कसबे मेढें तर्फ मजकूर हा गाव मोकासा देण्यात आला होता. श्री देव यमाई औंध यांस पुजा नैवेध्याबद्दल खटाव गाव इनाम दिला होता. [११९] नानासाहेब पेशव्यांने श्रीमार्तंड जेजूरी यात्रेमध्ये आकारले जाणारे आठ प्रकारचे कर न घेण्याचा आदेश कमाविसदारास दिला होता.[१२०] या करामध्ये देवद्वारचा कर, खुटफेलीचा हासील व भेट, बगाड व जावळ, खोडाबेडी, तीर्थाचा कर, भंदी, डांका, बकरकसाई अशा आठ कलमावरील कर कायमस्वरुपी माफ केला होता. पेशव्यांनी व मराठी सरदारांनी महाराष्ट्रातील अनेक प्रमुख

तिर्थक्षेत्रांचा जिर्णोध्दार करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. इस्लामी राजवटीच्या नियंत्रणातून पुर्णपणे महाराष्ट्र मुक्त झाल्यामुळे या तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विविध सुविधा निर्माण केल्या. नवस फेडण्याच्या कारणाने व आनंदाप्रित्यर्थ देवदेवतांना सोन्याचे दागिने व मुखवटे दान करुन त्यांचे वैभव वाढविले. पेशव्यांनी जसा स्वत:चा बडेजाव वाढविला तसाच राज्यकर्ते या नात्याने महाराष्ट्राचाही वाढविला. महाराष्ट्राचा जो लौकिक तोच आपला लौकिक आणि महाराष्ट्राचा जो उणेपणा तो आपला उणेपणा असे मानणारे पेशवे होते.

तुळजाभवानी ही महाराष्ट्रातील अनेकांची कुलदेवता असल्यामुळे पेशवेकालीन लोक नेहमी मोठ्या प्रमाणात या देवीच्या दर्शनाला जात असत. तुळजाभवानी ही भोसले घराण्याची कुलस्वामीनी असल्यामुळे या तिर्थक्षेत्राच्या विकासाकडे छत्रपती शाहू व पेशव्यांचे लक्ष होते. प्रत्येक मंगळवारी व पौर्णिमेला, गुढीपाडवा व बलिप्रतिपदा यादिवशी रात्री निघणाऱ्या छबिन्याला भक्ताची उपस्थिती प्रचंड असते. यावेळी नवस फेडण्यासाठी आलेले, लग्नानिमित्त, मुंजीनिमित्त अथवा नवस फेडण्याच्या निमित्ताने तुळजापूरला आलेले लोक येथेच देवीचा गोंधळ घालतात. तुळजापूरच्या देवीचे मुख्य हक्कदार गोंधळी त्यांच्या गोंधळामधून आलेल्या लोकांचे मनोरंजन करतात.[१२१] तुळजाभवानी प्रमाणेच कोल्हापूरची महालक्ष्मीही अनेकांची कुलदेवता आहे. चैत्र पौर्णिमा, नवरात्र, दिवाळी, व वर्षातून दोनवेळा होणाऱ्या रथोत्सव कार्यक्रमामधून लोकांचे चांगले मनोरंजन होत असे. महाशिवरात्रीचा उत्सव सर्व शिवमंदिरामधून मोठ्या प्रमाणात साजरा केला जात होता. त्यावेळी भजन-कीर्तन असे कार्यक्रम रात्रभर चालत होते. महाराष्ट्रामध्ये खंडोबाच्या तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दसरा, चैत्र, पौष व माघ महिण्यामध्ये यात्रा भरतात.[१२२] त्यामध्येही भक्त लोक लग्न अथवा मुंजीच्या निमित्ताने जागरणाचा कार्यक्रम करीत. यामधूनही लोकांचे मनोरंजन होत असे. पेशवेकाळात भाद्रपद महिण्यात गणपती उत्सव घरोघरी जसा थाटामाटाने साजरा होत होता तसाच विविध ठिकाणांच्या गणपती मंदिरामध्येही साजरा होत होता. त्याचबरोबर संकष्ट चतुर्थदिशी आणि माघी गणेश जयंती हे उत्सवही साजरे केले जात होते. त्यावेळी भजन कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. पंढरीचा पांडूरंग अथवा विठ्ठल हे तमाम मराठी लोकांचे अराध्य दैवत होय. आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपूरला मोठी यात्रा भरते. या यात्रेच्या निमित्ताने वारकऱ्यांचा मोठा मेळावा पंढरपूरमध्ये भरतो.

याठिकाणी कोणताही भेदभाव केला जात नसल्यामुळे सर्व जातीचे भक्त विठठलाच्या पायाचे दर्शन घेतात. पंढरपूरच्या यात्रेला जाण्यासाठी पायपीट करतात, त्याला पंढरीची वारी असे म्हणतात. वारीसाठी खेड्यापाड्यांतून भाविकांच्या दिंड्या वाजत गाजत पंढरपूरमध्ये दाखल होतात. या यात्रेमध्ये कथाकीर्तनाला बहर येत होता.[१२३] अशाप्रकारे पेशवेकाळात विविध तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मोठ्या यात्रा भरत असत. त्यामध्ये लोकांची अध्यात्मिक उन्नती करणारे आणि मनोरंजन करणारे कार्यक्रम चालत असत. याशिवाय देवतांची निघणारी मिरवणूक किंवा पालखी सोहळ्यामधून लोकांचे मनोरंजन होत असे. जोतिबाच्या यात्रेमध्ये नाचविल्या जाणाऱ्या सासनकाट्या हे या यात्रेचे खास वैशिष्ट्य होय. अनेक गावामधून कुलप्रतिक म्हणून या सासनकाट्या चैत्र पौर्णिमेच्या यात्रेला जोतिबाच्या डोंगरावर आणल्या जातात आणि त्या नाचविण्याचा कार्यक्रम होतो[१२४] अशाप्रकारच्या कार्यक्रमामधून लोकांचे मनोरंजन होत होते.

प्रत्येक गावामध्ये वास्तव्य करुन असलेल्या ग्रामदेवतेला अतिशय महत्व होते. या ग्रामदेवतांची पुजाअर्चा नियमित चालू रहावी म्हणून छत्रपती शाहू आणि पेशव्यांनी विशेष तरतुद केलेली आढळते. छत्रपती शाहूने श्री देव महाबळेश्वर यास पुजा नैवेद्याबद्दल जावळी परगण्यातील मौजे बोरगाव वगैरे गाव इनाम दिली होती. [१२५] याशिवाय मौजे चिंद्रवली तर्फ हातखंबे प्रांत राजापूर येथील श्रीदेव गणपती यास बिघे '२ जमीन इनाम दिली होती.[१२६] त्याचप्रमाणे प्रतापगडावरील श्री भवानी देवीला कसबे मेंढे तर्फ मजकूक हा गाव मुकासा दिला होता. कराड प्रांतातील श्री धानाई मौजे कारवे परघने कराड प्रांत या देवीला इनाम जमीन बिघे'१५ दिली होती. अशाप्रकारे कितीतरी ग्रामदेवतांच्या खर्चाची तरतुद त्यावेळी राज्यकर्त्यांनी केलेली आढळते. या देवदेवतांचे पुजारी म्हणून ब्राम्हण, गुरव किंवा इतर जातीतील लोकांवरही जबाबदारी टकलेली आढळते. त्यांच्याकडून हे कार्य अखंडपणे चालू रहावे म्हणून त्यांना इनाम जमीन वतन अथवा वर्षासन दिले होते. श्री देव फिरंगाई मुक्काम कुरकुंब तर्फ पाटस येथील न्हावी भगताला शाहूने वतन दिले होते.[१२७] त्यानुसार या देवीचा गुरव म्हणून न्हावी समाजावर जबाबदारी सोपविली होती. अशाप्रकारच्या उपाययोजना गावागावांतील ग्रामदेवतांच्या बाबत पेशवेकाळात केल्यामुळे ग्रामदेवतांना महत्व प्राप्त झाले. त्यांच्या यात्रा व उत्सव दरवर्षी अतिशय थाटामाटात साजरे केले जात होते. या उत्सवांचे स्वरुप धार्मिक व सामाजिक असे दुहेरी असे.

त्यामध्ये रात्रौ पुराण, कीर्तन, आरत्या, पालखी मिरवणूक, सुखासन व रथ अशा भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असे.[१२८] या यात्रामधून लोकांना मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध झाली.अनेक गावांच्या यात्रांमध्ये रात्रभर चालणारा जुगार हेदेखील काही लोकांच्या मनोरंजनाचे एक महत्वाचे साधन होते.कार्तिक ते माघ या कालावधीमध्ये अनेक देवस्थानामधून 'काले' होत असत. या काल्यामध्येही सुरुवातीला देवापुढे भजन, कीर्तन व पुराण हे कार्यक्रम झाल्यानंतर मध्यानरात्रीला दशावतारी खेळाचा कार्यक्रम होत असे. त्याला दशावतारी काला किंवा रातकाला असे म्हटले जाते.[१२९] कांही देवस्थानांमधून दुसऱ्या दिवशी दुपारी दहिकाला किंवा गवळणकाला होत असे.त्यामध्ये श्रीकृष्णाच्या बाललीलांवर अधारित कार्यक्रम केला जाई.

## ५.५ धार्मिक सण, समारंभ, उत्सव व यात्रामधील मनोरंजनाची साधने

### ५.५.१ कीर्तन

अध्यात्मिक जीवनामध्ये कीर्तन संस्था ही अतिशय महत्व प्राप्त झालेली सांस्कृतिक संस्था होती.मध्ययुगीन महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संत नामदेव, सावता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादीनी या संस्थेचा विकास केला. तत्कालीन जनतेला सन्मार्गाचा उपदेश करण्याचे, त्यांची अध्यात्मिक उन्नती घडविण्याचे, त्यांचे मनोरंजन करण्याचे व त्यांना शांतीसमाधान मिळवून देण्याचे कार्य कीर्तनकार करीत होते. हीच परंपरा पेशवेकालीन कीर्तनकारांनी पुढे चालविली होती. पेशव्यांनी कीर्तन परंपरेच्या विकासाल हातभार लावल्यामुळे कीर्तन संस्थेला बहर आला होता. यावेळचे अनेक कीर्तनकार स्वत: रचलेली कवने कीर्तनामध्ये गात होते. त्यामुळे त्यांच्या कीर्तनाला आणि काव्यालाही चांगली प्रसिध्दी मिळत होती.[१३०] कांही कीर्तनकारांच्या कीर्तनावर खुष होऊन राज्यकर्ते त्यांना चांगले इनाम देत होते. छत्रपती शाहूने निळकंठ भट बिन मोरेश्वरभट पुराणीक यास मौजे गौंडगाव परगणे हवेली माहुर सरकार मजकूर हा गाव इनाम दिला होता.[१३१] कीर्तनकार ज्यावेळी कीर्तनाच्या निमित्ताने गावोगावी फिरत तेंव्हा त्यांना त्या गावातील इनामदार, सरदार, शिलेदार, सावकार अशा श्रीमंत लोकांकडून चांगली बिदागी मिळत असे. पेशवेदरबारात अनेक हरदासांनी गणपतीउत्सव व इतर उत्सवप्रसंगी हजेरी लावल्याचे उल्लेख तत्कालीन कागदपत्रांमध्ये सापडतात. जर पेशव्यापुढे

कीर्तन करण्याची संधी मिळाली तर त्या कीर्तनकाराला चांगले बक्षीस मिळत होते.कीर्तनानिमित्त झालेल्या खर्चाची नोंद जमाखर्चात पुढीलप्रमाणे आली आहे.[१३२]

१७।। //।। कथा नागोदा गोसावी याची वाा ११ (श.१७११मार्गशीर्ष) छ.२४ रोज.

।।' क्षीरापतीस बत्तासे

१५ गोसावीबाबास १५

१ गुरव निाा गोसावी यांना

१ ८।। हार, तुरे गजरे गुाा लक्ष्मण

१७ ।।//।।

या नोंदीवरुन कीर्तनकाराला त्यावेळी चांगली दक्षिणा मिळत असल्याचे दिसून येते.ते सर्वसामान्य जनतेला भक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी आणि निरुपणासाठी संतांच्या अभंगाचा आपल्या कीर्तनामध्ये समावेश करत असत. मात्र असे अभंग सादर करतांना ते आपल्या पांडित्याचे जास्त प्रदर्शन श्रोत्यांपुढे करत असत.[१३३] कीर्तनामध्ये संस्कृतचा जास्त वापर केला तर तो कीर्तनकार फार विद्वान आहे असे लोकांना वाटेल असा त्यांचा समज होता. त्यामुळे सामान्यांना अध्यात्माचे ज्ञान देणारा व त्यांचे मनोरंजन करणारा कीर्तनकारांचा एक वर्ग आणि दुसरा संस्कृतनिष्ठांचे मनोरंजन करणारा वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले होते.[१३४] पेशवेकाळात कीर्तनास उपस्थित असणाऱ्या सर्व समाजघटकांचे मनोरंजन होईल याकडे हरिदासांचे लक्ष असे. त्याकरिता त्यांनी कीर्तनामध्ये कथा आणि काव्यालाही महत्वाचे स्थान दिले होते. कीर्तनाला असलेली स्त्रियांची उल्लेखानीय उपस्थिती लक्षात घेऊन सीतागीत, सावित्रीगीत यासारख्या गीतांना कीर्तनात स्थान दिले जात होते. याशिवाय लवकुशाख्यान, मदालसाख्यान, हरिश्चंद्राख्यान अशी आख्याने यावेळच्या कीर्तनविश्वात मान्यता पावली होती.या अख्यानामधील व्यक्तिरेखा सर्वसामान्य लोकांना मानवी वाटत असल्यामुळे अशी अख्याने ऐकण्याच्या उद्देशाने मोठा जनसमुदाय कीर्तनाला उपस्थित रहात होता. अनेक कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनामध्ये मोरोपंतांच्या आर्यांना अतिशय महत्व दिले होते. मोरोपंतांचे शिष्यतुल्य स्नेही रामजोशी, मैराळबुवा, विठोबा ताहराबादकर इत्यादींनी पंतांच्या समक्ष त्यांच्या आर्या कीर्तनात म्हणण्याचा प्रघात पाडला होता. पंतांच्या आर्यावर शेकडो कीर्तने करुन पुणेकरांना

कीर्तनाची गोडी लावण्याचे कार्य वामनबोवा इंदापूरकरांनी केले. त्यामुळे पेशव्यांच्या काळात कीर्तनसंस्थेचा विकास झाला. पंतांच्या आर्यांना महाराष्ट्राबाहेरही मोठा श्रोतावर्ग मिळवून देण्याचे कार्य नागेशकवी, बजाबा हरिदास, त्र्यंबकबोवा, गोविंदबोवा इत्यादींनी केले.

पेशवाईच्या उत्तरार्धात शाहीरांची लावणी व तमाशा अतिशय बहरास आला होता. तरीदेखील अनंत फंदी, रामजोशी, होनाजी बाळा, प्रभाकर, सगनभाऊ, परशुराम इत्यादी शाहीर तमाशाचा फड सोडून कीर्तनाकडे वळले.[१३५] या शाहीर कीर्तनकारांनी लावणीच्या ढंगाची पदे रचून ती कीर्तनामध्ये गाण्यास प्रारंभ केला. त्यामुळे कीर्तनाची लोकप्रियता वाढतच गेली. अमृतराय नावाचे प्रसिध्द कवी व कीर्तनकार पेशवेकाळात होऊन गेले.[१३६] त्यांना कटाव या काव्यप्रकाराचे जनक व प्रवर्तक म्हणूनही ओळखले जाते. मध्वमुनीश्वर या गुरुंच्या उपदेशामुळे नोकरीचा त्याग करुन ते अध्यात्माकडे वळले. इ.स १७४४ मध्ये संन्यास घेऊन उर्वरीत आयुष्य त्यांनी हरिकीर्तनामध्ये घालविले होते. कीर्तनाला उपयुक्त अशी पद्यरचना करुन महाराष्ट्रातील एक रसाळ कीर्तनकार म्हणून त्यांची ख्याती झाली होती· ‘कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा । भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा।।’ असे उद्गार मोरोपंतानी त्यांच्याबद्दल काढले आहेत. यावरुन अमृतरायाच्या लोकप्रियतेची कल्पना येते. नाथसंप्रदायामध्ये गंगानाथ नावाचा कवी व कीर्तनकार धनगर समाजामध्ये जन्माला आला होता.[१३७] पुण्यामध्ये मठ स्थापन करुन त्यांनी मोठी शिष्यपरंपरा निर्माण केली होती. कीर्तनामध्ये सादर करण्याकरीता त्यांनी अनेक पदे अभंग व आख्याने रचली होती. कीर्तन परंपरेमध्ये ब्राम्हण जाती व्यतिरिक्त इतर जातीचे लोकही सामील झाले होते, हे गंगानाथाच्या कार्यावरुन समजते. संत तुकारामाचे पणतू गोपाळबाबा देहूकर हेदेखील याच कालखंडातील ख्यातनाम कीर्तनकार होत.[१३८] कीर्तनाला जमलेल्या श्रोत्यांचे चांगले मनोरंजन व्हावे म्हणून ते कीर्तनामध्ये प्रचलीत दंतकथांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत. तुकाविप्र हे आणखी एक पेशवेकाळातील प्रसिध्द कीर्तनकार होत. दररोज कीर्तन करण्याचा त्यांचा संकल्प असून त्याकरिता ते संपूर्ण महाराष्ट्रभर फिरले. त्यांना सातारकर छत्रपती, नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे फार मानीत असत. अनेक मराठा सरदारांनी व जहागीरदारांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले होते.[१३९] असे असंख्य कीर्तनकार पेशवाईत उदयास आले आणि त्यांनी या परंपरेचा विकास घडवून आणला. कीर्तन करणे ही

केवळ पुरुषांची मक्तेदारी नसून स्त्रीहरदास आणि बालहरदासही यावेळी कीर्तन करत असल्याचा उल्लेख पेशवेकालीन कागदपत्रामध्ये सापडतो.

५ रुपये बच्याबाई गोसावीण चाफळकर यांनी कीर्तन केले त्याची बिदागी

१७०२ भाद्रपद,

५रुपये जिऊबाई कथेकरीन १६८८ श्रावण.

४।। रु. मार्गशिर्ष वाा १४ श.१७११, गंगाधर गोसावी शेवगावकर

उमर वर्षे १४ याने वाा ११ स कीर्तन केलें त्याचे बिदागी पुतळी बाा

रोख.[१४०]

पेशवेकाळात कीर्तनकारांना समाजामध्ये अतिशय मानाचे स्थान असून त्यांनी कीर्तन केल्यानंतर त्यांची अतिशय सन्मानपूर्वक पाठवणी केली जात असे.

## ५.५.२ भजन

यादव काळापासून लोकप्रिय असणारा भजन हा धार्मिक मनोरंजनाचा प्रकार पेशवेकाळातही लोकप्रिय होता. देवाची आळवणी करण्यासाठी गायले जाणारे भजन हे समाजाचे चांगले मनोरंजन करत होते. त्याबरोबरच समाजाची अध्यात्मिक उन्नती घडवून आणत होते. या काळातील भजनीबुवांनी संत ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, जनाबाई, एकनाथ, निळोबाराय, रामदास, वेणाबाई इत्यादी संतांच्या आणि स्वत:च्या ओव्या, अभंग व पदे गाऊन ती लोकप्रिय केली. त्याबरोबरच पेशवेकाळात उदयास आलेल्या कवींच्याही रचना गाऊन त्यांना लोकप्रियता मिळवून दिली. याकाळात अनेक भजनीबुवा लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहचले होते. निळोबा पिंपळनेरकर हे १८ व्या शतकातील प्रसिध्द संतकवी होत. [१४१] त्यांनी वंशपरंपरागत कुलकर्णीपणाची जबाबदारी सोडून पारमार्थिक कार्यात लक्ष गुंतविले होते. त्यांनी संत तुकारामाचा भजनीसंप्रदाय व त्यांची कीर्तनपरंपरा मोठ्या उत्साहाने व निष्ठेने चालविली होती. त्यांनी सुमारे तेराशेच्या आसपास अभंग रचले असून ते भजनामधून गायले जात होते. त्यांच्या अभंगात भक्ती, ज्ञान व वैराग्याचा सुरेख संगम झाला असल्यामुळे ते लोकप्रिय झाले होते. महिपतीबोवा ताहराबादकर किंवा महीपती हे पेशवेकाळातील आणखी एक प्रसिध्द भजनीबुवा व कीर्तनकार

होत.[१४२] वडीलांच्या निधनानंतर यांच्यावरही ताहराबादची कुलकर्णीपणाची जबाबदारी पडली होती. त्यांनी वडीलांची वृत्ती सोडून भजन, कीर्तन हा ईश्वराच्या उपासनेचा मार्ग पत्करला. त्यांनी उतारवयात भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय (अपूर्ण) या चार संतचरित्र ग्रंथांची रचना इ.स.१७६२ ते १७८९ या काळात केली.त्यांनी समाजाला ईश्वरभक्तीकडे आकर्षित करण्याचे मोठे कार्य केले. मुलाला आईविषयी आणि आईला मुलाविषयी जसे प्रेम वाटते तसेच भक्त व ईश्वर यांच्यामध्ये प्रेम असते असे ते म्हणत.

पेशवेकालीन भजन प्रकाराचा विकास करण्यामध्ये तत्कालीन असंख्य कवींचे योगदान मोठे आहे. वेगवेगळ्या संप्रदायाच्या या कवींनी रचलेल्या काव्यामुळे भजन प्रथेचा विकास होत गेला. त्यांनी रचलेले व गायलेले अभंग, पदे, ओव्या, गौळणी, आरत्या यामुळे प्रत्येक गावागावामध्ये भजनाचे कार्यक्रम होऊ लागले. या परंपरेच्या विकासामध्ये अनंतमुनि तळेगावकर, अनंतसुरि, गंगाधर कोकिळ, गिरीधर, गोपाळनाथ, गोपाळबाबा देहूकर ,गोविंद, गोसावीनंदन किंवा गोसावीसुत, चतुर साबाजी, नयराम अनंत वाबळे, दाजीकवी, दिनकरराव, नागाजी महाराज, दीनानाथ, नरसोबा, निरंजनस्वामी, माध्वमुनिश्वर, संतुबाई इत्यादी कवींचे योगदान मोठे आहे. तत्कालीन लोकांमध्ये अध्यात्माची आवड निर्माण करण्याचे आणि लोकांना आनंद देण्याचे कार्य यांच्या भजनाने केले.

गावागावातील अनेक देवळाध्ये सण, समारंभ, यात्रा, उत्सव व वेगवेगळ्या तिथीनुसार भजनाचा कार्यक्रम होत असे. काही देवस्थानांमध्ये ‘सप्ताह’ नावाचा एक उत्सव साजरा केला जात असे.[१४३] या उत्सवामध्ये सात दिवस आहोरात्र देवळामध्ये भजनाचा कार्यक्रम चालत असे. त्याकरिता देवळाच्या सभागृहात मध्यभागी मोठी समई तेवत ठेऊन तिच्याभोवती भजनीमंडळी उभ्याने भजन करीत. अहोरात्र चालणाऱ्या या कार्यक्रमात दर तीन तासांना म्हणजेच दर प्रहराला भजन करणारी माणसे बदलली जात.

## ५.५.३ पुराणकथन

पुराणकथन हा हिंदु धर्मियांचा अध्यात्मिक मार्ग होता.त्यामधून तत्कालीन लोकांचे मनोरंजन देखील होत होते. गावोगावातील देवळामधून चालणाऱ्या पुराणकथनाच्या कार्यक्रमाला

लोकांची चांगली उपस्थिती रहात होती. संस्कृत ग्रंथामध्ये असणारे ज्ञान मराठी भाषेमधून सोपे करुन लोकांना सांगितले जात असल्यामुळे लोकांना हा प्रकार जास्त आवडत होता. पुराणातील विविध कथा लोकांना सांगण्याचे काम विद्वान ब्राम्हण करत असत. त्याबद्दल सरकार कडून त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून इनाम आणि रोख रक्कम प्राप्त होत असे. या काळातील कागदपत्रामध्ये अनेक पुराणिकांना जमिनी इनाम दिल्याचा उल्लेख आढळतो. बाळाचार्य बिन आश्वःथाचार्य पुराणिकांना कसबे कराड गाव इनाम व लक्ष्मणभट बिन रामभट पुराणिक यास वडगाव गाव इनाम अशी शाहूने इनामे दिली होती. रंगभट पुराणिक यास २०० रुपयाचे वर्षासन सुरु केले होते. इ.स. १७९१ मध्ये वैद्य यांच्या खर्चामध्ये सदाशिवभट पुराणिक, खासगतजवळ पुराण सांगतात त्याबद्दल त्यांना श्रावण महिण्यात १०० रु.दिल्याची नोंद आहे. त्यांच्याच दप्तरातील इ.स.१७९८ च्या ताळेबंदामधून तत्कालीन लोकांना पुराणश्रवणाचा किती नाद होता हे पुढील खर्चावरुन दिसून येते. [१४४]

धर्मादाय -

रु.२६ मोक्षधर्म पुराणसमाप्तीबद्दल श. १७२० आषाढ.

रु.३ बृहन्नारदी समाप्ती समयी ।।।।। भूयसी श. १७२३ माघ

रु.५० पुराणीक जनार्धन भट गाडगीळ सालमजकूर सरसाल तेवज

रुपये २०० पाो जेष्टमासीं पावती रुपये १५० बाकी हल्ली देणे शके १७७२

१।।।// ।।. भोजनदक्षिणा पुराणसमाप्तीबाा भोजन केलें सबब

१५० पुराण भागवत समाप्त दशमस्कृंध जाहंले ते समयीं व्यासपूजेस दक्षिणा.

यावेळी चातुर्मासामध्ये पुराणकथनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात चालत असे.[१४५] वेदमूर्ती राजश्री कासी उपाध्ये आणि संगमेश्वरकर जोसी यांच्यामध्ये वाद (कजिया) चालू होता. तो सोडविण्यासाठी पहिल्या बाजीराव पेशव्यांनी उपाध्यांना पाठवून देण्याबाबत सरखेल कान्होजी आंग्रेंना कळविले होते. त्यावेळी चातुर्मासातील पुराणश्रवण झाल्यावर पाठऊन देतो असे कळविले होते. यावरुन त्यावेळी पुराणकथनाला अतिशय महत्व दिले जात होते हे स्पष्ट होते. कृष्णाजी जनार्धन हा आनंदीबाईच्या हालचाली नियमितपणे नाना फडणीसास कळवित असे. त्याने ४ ऑगष्ट १७८८ रोजी दोन प्रहरी बाई बागामध्ये पुराणश्रवणास गेली होती असे

कळविले आहे.[१४६] यावरुन स्त्रीया पुराणश्रवणासाठी घराबाहेर पडत होत्या हे स्पष्ट होते. परशुराम राहतेकरांने पाठविलेल्या पत्रामध्येही सौ. आनंदीबाईसाहेब यांची दिनचर्या कळविली आहे. त्यामध्येही पुराणश्रवणासाठी त्या वेळ देत असल्याचे दिसून येते.

### ५.५.४ ललित

उत्सवाच्या प्रसंगी ललिते करण्याची प्रथा महाराष्ट्रामध्ये फार प्राचीन काळापासून प्रचलीत आहे. ललिताची ही परंपरा पुढे पेशवेकाळातही सुरु राहिली होती. कोकण व घाटमाथ्यावरील प्रदेशामध्ये धार्मिक मनोरंजनाचा हा प्रकार जास्त लोकप्रिय झाला होता. सर्वसामान्य लोकांपासून ते श्रीमंत वर्गापर्यंत सर्वांना या प्रकाराची विशेष आवड होती. गणपती उत्सवामध्ये ललिताचा कार्यक्रम पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात केला जात होता. तो व्यवस्थित पार पाडण्यासाठी खूप दक्षता घेतली जात असल्याचा उल्लेख पेशवे दप्तरात आढळतो. जुन्नर येथील गणपती उत्सवाचे ललित योग्यप्रकारे पार पडल्याबाबत परशुराम खंडेराव राहतेकराने पत्राव्दारे कळविले होते.[१४७] ललित सादर करणाऱ्या कलाकारांना सरकार दरबारी कला सादर करण्याची संधी मिळाली तर सरकार कडून त्यांचा चांगला आदरसत्कार होत होता. श्री. व्यंकटेशाच्या उत्सवानिमित्त उत्सवाच्या रात्री रामचंद्र गोसावी यांनी ललिताचा कार्यक्रम सादर केला. त्याब-ल दुसऱ्या बाजीराव पेशव्यांने आपल्या खाजगी जमाखर्चामध्ये ४५० रुपये खर्च केल्याची नोंद १४/१०/१८०६ रोजी केली आहे.[१४८]

### ५.५.५ गोंधळ

महाराष्ट्रामध्ये वेळोवेळी देवीसमोर 'गोंधळ' घालण्याची प्रथा फार जुनी आहे. देवीचा गोंधळ घालणे म्हणजे तिची स्तुति व पूजा करण्याचा एक प्रकार होय. देवाच्या नावावर गोंधळ घालणाऱ्या लोकांना गोंधळी असे म्हणतात. त्यांच्यामध्ये ब्राम्हण गोंधळी, कुंभार गोंधळी आणि इतर गोंधळी तसेच कडमराय, रेणुकाराय व अकरमाशी अशा पोटजाती होत्या.[१४९] तुळजाभवानीचा गोंधळ घालणारे पोतराज म्हणून आणि भैरवनाथाचा गोंधळ घालवारे डवरी म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राचे मुख्य उपास्य दैवत 'शक्ती' किंवा 'देवी' असल्यामुळे मागील सात-आठशे वर्षांपासून तिची उपासना केली जात आहे.[१५०] पेशवेकाळातही ही परंपरा

अखंडपणे सुरु होती. कुलाचार पाळण्यासाठी लग्न, मुंज, नवरात्रोत्सव अशा शुभप्रसंगी गोंधळ घालण्याची प्रथा सर्वसामान्यांपासून श्रीमंत वर्गांपर्यंत सर्वांमध्ये प्रचलीत होती. तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, मातापूर किंवा माहूरची रेणुका आणि वणीची सप्तशृंगी या देवता यावेळी अतिशय लोकप्रिय होत्या. त्यांच्याबरोबरच आडिवऱ्याची महाकाली, पुण्याची चतु:शृंगी व तुकाई, इळकलची बनशंकरी, करमाळ्याची भवानी, केळशीची दुर्गा, माढेंची पार्वती, नरसिंगपूरची लक्ष्मी, साताऱ्याची कमलभैरवी, ठाण्याची वज्रेश्वरी, कार्लेची एकवीरा व औंधची यमाई या महाराष्ट्रातील देवतांनाही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे या देवींचा गोंधळ घालून त्यांना प्रसन्न करुन घेण्याकडे लोकांचा ओढा होता. समाजाच्या सर्व थरामध्ये पसरलेली अशी ही उपासना असल्यामुळे सारा महाराष्ट्र देश देवीचे नांव ऐकून खडबडून जागा झाला होत असे. पुढे शिवाजी महाराजांनी तर भवानीच्याच प्रेरणेने स्वराज्यस्थापनेचे महत्कार्य सिध्दीस नेले असे म्हणतात.[१५१] त्यांच्या काळातच गोंधळी लोकांनी वीररसात्मक पोवाडे गाण्यास प्रारंभ केला. गोंधळामध्ये अंबेचा 'उदो उदो' करणाऱ्या गोंधळ्यांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्याला लावलेला हातभार विसरुन चालणार नाही. त्याबरोबरच त्यांनी आपले वंशपरंपरागत गोंधळ घालण्याचे कामही अखंडपणे चालू ठेवले. देवीच्या गोंधळाबरोबरच महाराष्ट्रात खंडोबा, भैरवनाथ व ज्योतिबानाथ या देवांचाही गोंधळ घालण्याची प्रथा होती.

समकालीन कागदपत्रांमधून विविध प्रसंगी गोंधळ घातल्याचे अनेक दाखले मिळतात. नवरात्र खर्चामध्ये वार्षिक नवरात्राचा गोंधळ घातलेवेळी झालेल्या खर्चाची नोंद आढळते.[१५२] यावरुन दरवर्षी गोंधळ घालून देवदेवतांना प्रसन्न करुन घेण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे लक्षात येते. नवरात्र खर्चामध्ये गोंधळासाठी झालेला खर्च पुढीलप्रमाणे नोंदविलेला आढळतो.

**१.** नवरात्रखर्च

१७८ //नवरात्राचा गोंधल वार्षिक घातला ताा हरि विश्वनाथ भावे रुपये

१६ गोंधळी यास

१ ओवाळणीस खुर्दा ३.।//।। ३ याो

८ //खाा नाडापुडी वगैरे

---

१७८ //

**२.** नवरात्र निमित्तानेच केलेल्या गोंधळाच्या खर्चाची नोंद २३/२/१७९६ रोजी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.[१५३]

छ.१३ माहे साबान सीन तिसैन (खर्च)

नवरात्र खर्च वाड्यांत गोंधळ जाहला; सबब गोंधळी वगैरे यास साल गुा प्रमाणे साल मजकुरी रसानगी याद चिठ्ठी

छ. १४ जाखर कापड आंख

५० गोंधळी यास

३ ८।।। काकडे वातीस सेला साधा धुवट उतारी सनग ।।

१६ श्रीदेवीस लुगडे व खण मिळोण

१३। मथी माळीन इजकडून फुलाच्या माळा घेतल्या सबब

८।।। जोगीनी उदगार घालितात त्यास आा ५ येकूण आंख

या खर्चाच्या नोंदीवरुन असे लक्षात येते की गोंधळ घालणाऱ्या गोंधळ्यांना त्यांच्या कामाचा मोबदला पैशाच्या रुपामध्ये दिला जात होता. त्यांना सन्मानार्थ कपडे देखील दिली जात होती. पेशवेकाळात श्रावण महिना हा अध्यात्मिक दृष्टीने अतिशय महत्वाचा मानला जात होता. त्यामुळे या महिन्यात धार्मिक कार्यक्रमांची व सणांची भरपूर रेलचेल आढळते. श्रावणी पौर्णिमेनिमित[१५४] त्यावेळी गोंधळ घालण्याची परंपरा होती. अशाप्रकारे पेशवेकाळामध्ये विवाह, नवरात्र, श्रावणमास व शुभप्रसंगी घातल्या जाणाऱ्या गोंधळामधून लोकांचे चांगले मनोरंजन होत होते.

## ५.५. ६ जागरण

महाराष्ट्रामध्ये खंडोबा या देवतेचे महात्म्य अनन्यसाधारण आहे. त्याचा महाराष्ट्रातील उदय यादवकाळातील असून ब्राम्हणापासून शुद्रापर्यंत सर्वांचे उपास्य दैवत म्हणून तो लोकप्रिय झाला होता. बहुजन समाजाचा देव म्हणून त्याची महाराष्ट्रात विशेष प्रसिध्दी आहे. त्याच्या अकरा प्रसिध्द स्थानापैकी सहा महाराष्ट्रात आणि पाच कर्नाटकात आहेत. महाराष्ट्रात जेजुरी, निमगाव, शेंगुड, सातारा, नळदुर्ग, व पाली ही महाराष्ट्रातील स्थानके होत. त्यापैकी जेजुरी हे ठिकाण अकरा स्नानामध्ये सर्वात महत्वाचे स्थान मानले जाते. खंडोबाला प्रसन्न करुन घेण्यासाठी त्याचा

जागर किंवा जागरण घालण्याची प्रथा आहे. तो घालण्यासाठी वाघ्या-मुरळी यांच्या ताफ्याला निमंत्रण दिले जाते. मुले न होणाऱ्या किंवा मुले झाली तरी ती अल्पवयी ठरतात अशा मुलांची आई खंडोबाला नवस करी की, 'मला मुल झाल्यास ते तुला अर्पण करीन'.[१५५] तिला मुलगा झाला तर तो वाघ्या म्हणून आणि मुलगी झाली तर ती मुरळी म्हणून देवाला अर्पण केली जात होती. वाघ्यामध्ये घरवाघे आणि दारवाघे असे दोन प्रकार आहेत. घरवाघे हे नवस फेडण्यापुरते वाघे बनतात व दारवाघे हे आजन्म वाघ्यांचे कर्तव्य बजावत असतात. वाघ्याबरोबर भंडार ठेवण्यासाठी व्याघ्रचर्माची पिशवी, भिक्षापात्र, वाखाची दोरी, दिवटी, तेलाची बुधली, पताका, पोवते, तलवारीच्या मुठीसारखे एक विशिष्ट प्रकारचे वाद्य, शंख किंवा डमरु, त्रिशूळ याप्रकारचे साहित्य असते. वाघ्याला गृहस्थ जीवन जगण्याचा अधिकार होता, मात्र मुरळीला लग्न करण्याचा अधिकार नव्हता. यमुना मुरळीने आपली बहीण मैना मुरळी हिचे लग्न लावून दिले होते. नवऱ्याने तिला टाकले तेंव्हा जेजुरीच्या गावकऱ्यांनी मैनीचे दागिने व आणखी चारशे रुपये तिच्या नवऱ्यास देऊन तिला पुन्हा देवाची मुरळी केली. त्यावेळी तिचा नवरा पुन्हा हरकत घेऊ लागला तेंव्हा पेशव्यांनी मैनीला कोणताही उपद्रव होऊ नये असा बंदोबस्त केला. यावरुन असे लक्षात येते की एकाच घरातील दोन मुली देखील मुरळ्या म्हणून देवाला वाहिल्या जात होत्या. क्वचित एखाद्या मुरळीचे लग्न झाले आणि ते यशस्वी झाले नाही तर समाज तिला पुन्हा मुरळी बनविण्यास तयार होता. मुरळ्यांचे लग्न देवाबरोबर लाऊन दिले जात असल्यामुळे त्यांना देवळाची झाडलोट करणे, देऊळ सारवणे व पुजेची उपकरणे साफ करणे अशी देवाची सेवा करावी लागत होती. याशिवाय त्या देवाला रिझविण्यासाठी नृत्यगायन करीत. काही मुरळ्या जेजुरीला कायमच्या रहात तर अनेक वाघ्याबरोबर महाराष्ट्रामध्ये जागर घालत गाणी गात व भिक्षा मागत फिरत.[१५६] त्यामुळे महाराष्ट्रामध्ये अनेक वाघे आणि मुरळ्या फिरतांना आढळतात.

महाराष्ट्रातील अनेक लोकांचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबाला भाविक भक्त आपल्या मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी नवस बोलतात. असे नवस फेडण्यासाठी किंवा विवाहासारख्या शुभ प्रसंगानंतर जागरण-गोंधळ घातला जातो. श्रीकृष्णाने श्री खंडोबा देवाचे गुणगाण करुन पहिले जागरण घातले व आदिमाया शक्ती म्हाळसाबाईसाठी गोंधळ घातला होता असे मानले जाते. त्यामुळे खंडोबाच्या भक्तामध्ये जागरण-गोंधळ घालण्याची पध्दत रुढ झाली. हा

जागरणाचा कार्यक्रम खंडोबाच्या यात्रेच्या वेळी मोठ्या प्रमाणात घातला जात होता. जागरणाचा कार्यक्रम वाद्यांच्या गजरामध्ये व दिवट्यांच्या उजेडामध्ये रात्रभर चालत असतो. त्यामध्ये खंडोबाची पदे गाऊन उपस्थितांचे मनोरंजन केले जाते. ही पदे गाऊन नाचण्याचे काम वाघ्या-मुरळी करत असल्याने त्यांना वाघ्यामुरळीची गाणी असे म्हणतात. त्यामध्ये 'चैताच्या महिण्यात देव खंडोबा झाला येडा, बानू लोटती तुजा वाडा।। सकाळ उदरली कुतऱ्याचा घेगा, देवा माझ्या मल्लारीची बानू काढून नेली बगा।।' अशा प्रकारच्या अनेक गाण्यांचा समावेश असतो.

चैत्र पौर्णिमा, आषाढ शुध्द प्रतिपदा, चंपासष्टी, पौष पौर्णिमा, माघ पौर्णिमा, महाशिवरात्र व सोमवती अमावास्या यावेळी खंडोबाची यात्रा भरत असते.[१५७] जागरणाबरोबरच खंडोबाला केलेल्या नवसामध्ये तळी भंडार, लंगर तोडणे, दीपमाळ पाजळणे, भंडारा व खोबरे उधळणे, वारी मागणे, खेटे घालणे, कावड घालणे, तुला करणे अशा कमी त्रासाच्या नवसांचा समावेश असतो. तर बगाड घेणे, पवाड करणे, रक्ताचा टिळा लावणे व विस्तवावरुन चालणे या त्रासदायक नवसांचा समावेश होता.[१५८]

महाराष्ट्रातील अनेक देवांच्या यात्रामध्ये बगाडाचा कार्यक्रम होत असे. बगाड म्हणजे गाड्याला जोडलेल्या उंच लाकडाच्या टोकाला लावलेल्या गळाला टोचून घेणे व लोंबकळत राहणे होय.तर पवाड करणे म्हणजे पायामध्ये पहार आरपार घुसवून काढणे होय. ही दोन प्रकारच्या नवसांची फेड लोक कसे करतात हे पाहणे अतिशय रोमहर्षक व अंगावर काटा आणणारे असे होते. हे पाहून लोकांचे चांगले मनोरंजन होत असल्यामुळे ते या कार्यक्रमाला अतिशय गर्दी करत असत.

## ५.५.७ कुंभारांचे डहाक

महाराष्ट्रातील समाजामध्ये कुंभारांच्या मराठे कुंभार, गुजराथी, कोकणी, आहिर क़िंवा लहान चाके, लाड किंवा थोर चाके, परदेशी व तेलंगी कुंभार अशा अनेक उपजाती होत्या. कुंभार समाजामध्ये व कांही मराठा लोकामध्ये मृतात्म्यांच्या शांतीसाठी डाक किंवा डाहाकाचा विधी करण्याची प्रथा असून आजही ती सुरु असल्याचे आढळते. डहाक वाजविणारे आणि गाणी म्हणणारे हे प्रामुख्याने कुंभार जातीचे असल्यामुळे या प्रकाराला कुंभारांचे डहाक म्हणून ओळखले जाते.[१५९] डाक किंवा डहाका हे एका वाद्याचे नाव असून ढोलकीच्या आकाराचे

डमरुसारखे ते असते. चामडीपासून बनविलेले हे वाद्य एकीकडून दांडक्याने व दुसरीकडून हाताच्या पंजाची थाप मारुन वाजविले जाते. डहाकाचा विधीचे स्वरुप गोंधळ, खंडोबाचे जागरण किंवा भराडासारखेच असते. त्यामध्ये रात्रभर देवदेवतापर गीते, कथात्म गीते व अध्यात्मपर गीते गायली जातात. त्यांची पुढीलप्रमाणे कांही गाणी लोकांना विचार करण्यास भाग पाडणारी असतात. आत्मा टाकून गेला कुडी, कुडीला इचारिना कुणी । तुटली सर्गीची दोरी, करु नको अनमानी ।। [१६०] अशा गाण्याबरोबरच त्यांची कथागीतेही अतिशय लोकप्रिय असतात. त्यामध्ये पांडवांची उत्पत्ती आणि त्यांनी केलेली पांडू राजाची उत्तरक्रिया व दशक्रिया यासंबंधीची कथागीते गाऊन रात्रभर डहाकांचा कार्यक्रम करतात.

## ५.५.८ धनगरांची गाणी

पेशवेकाळात बकऱ्या व म्हैशी ही जनावरे पाळण्याचा व्यवसाय करणारी धनगरांची जात होती.[१६१] मेंढके म्हणजे बकऱ्या मेंढ्या पाळणारे व म्हस्के म्हणजे म्हैशी पाळणारे धनगर, दरवर्षी मेंढ्यांचे कळप घेऊन कोकणात उतरणारे हाटकर व घोंगड्या विणून राहणारे खुटेकर अशा त्याच्यामध्ये उपजाती होत्या. त्यांचा प्रमुख देव म्हणून बिरोबा हा देव ओळखला जातो.[१६२] ज्या ज्या ठिकाणी धनगरांची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे त्याठिकाणी बिरोबाची मंदीरे आहेत. बिरोबाच्या उपासनेच्या निमित्ताने आणि यात्रेच्या निमित्ताने धनगर लोक जी गाणी गातात त्यांना सुंबरान गीते असे म्हटले जाते. बिरोबाच्या यात्रेवेळी, दसऱ्याच्या सणानिमित्त आणि इतर सणांच्या निमित्ताने धनगरांच्या गीतांचे कार्यक्रम होत असत. या कार्यक्रमाला धनगरी ओव्या या नावानेही कांही भागामध्ये ओळखले जात होते. त्यांची ही गीते कथागीते, बिरोबाचे महात्म्य सांगणारी गीते व स्फुट गीते या प्रकारची असतात. त्यांच्या सुंबरान गाण्याची सुरुवात पुढीलप्रकारच्या गीताने होत असते.

सुंबरान मांडिल, सुंबरान मांडिल
आदि नमन गणाला, मग सरस्वती मातेला
कैलाशीच्या महादेवाला पतिव्रता पार्वतीला
तैहतीस कोटी देवाला हो देवाला
इनंती करतो यावं तुमी सुंबरानाला
सुंबरानाला हो सुंबरानाला [१६३]

सुंबरान गीताप्रमाणेच धनगरांचा हुईक हा विधीप्रसंग किंवा भाकनूक हा भविष्यकथनाचा प्रकार अतिशय लोकप्रिय आहे. बिरोबाच्या यात्रेप्रसंगी जमलेल्या लोकांना पुढील वर्ष कसे असेल याचे भविष्य धनगरामधील भगत करतो. याप्रसंगी बिरोबाची गाणी धनगरी ढोल या वाद्याच्या तालावर गायली जातात. या गाण्यामधून आणि हुईक विधीमधून धनगरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडते.

## ५.५.९ भराड

महाराष्ट्राची लोकजीवनात भराडी किंवा डवरी हे भैरवनाथाचे उपासक म्हणून ओळखले जातात. भैरवनाथ हे अनेक घराण्यांचे कुलदैवत असल्यामुळे कुलाचार पाळण्यासाठी म्हणून भराड घालण्याची प्रथा प्रचलीत झालेली आहे. त्यावेळी कथागीते व विधीगीते गाऊन लोकांचे मनोरंजन करण्याचे काम डौरी किंवा भराडी करतात. या समाजातील मुलाला वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षी नाथपंथाची दिक्षा दिल्यानंतर तो भराड घालण्याचे काम करतो. भराड हा शुभप्रसंगी कुलाचार पार पाडण्यासाठी घातले जाते. भराडाचा कार्यक्रम हा देखील गोंधळ - जागरणाप्रमाणेच असतो. पूर्वरंग आणि उत्तररंग अशा दोन भागामध्ये हा कार्यक्रम सादर केला जात असे. भराडाची सुरुवात पुढीलप्रमाणे गण गाऊन केली जात होती. [१६४]

गणराया लौकर यावे, भेट सकळासी द्यावे

गणराया नाचत नाचत यावे, सुख सर्वांसी द्यावे

मुळारंभी नमितो गणाला, विघ्नहर्त्या त्या देवाला

मोदकाचा ठिवला नैवद्य गणपतीला, मुळारंभी नमितो गणाला [१६५]

पूर्वरंगात विविध प्रकारच्या आरत्या व भैरवाची गीते गायली जातात तर उत्तररंगात आख्याने सादर केली जातात. ती पौराणिक व लौकिक कथावर अधारित असतात. त्यावेळी मध्यंतरी एखादे स्मरणात असणारे पारंपरिक गीत गाऊन कार्यक्रमामध्ये रंग भरतात. त्यामुळे त्यांचा कार्यक्रम लोकांना खूप आवडत असे.

## ५.५.१० दशावतार

धार्मिक मनोरंजनाच्या आकर्षणाने दशावतार हा नवा मनोरंजन प्रकार पेशवेकाळात उदयास आला होता. त्याच्या उगमाबद्दल अनेक मते मांडली जातात. तरीदेखील रामदासांच्या दासबोधामध्ये दशावतार या संकल्पनेचा उल्लेख आढळतो. दशावतारी नाटकाबद्दल ते म्हणतात, 'खेळता नेटके दशावतारी। तेथे येती सुंदर नारी। नेत्र मोडिती कळाकुसरी। परी अवघे घटिंगण।।'[१६६] यावरुन रामदासांच्या काळात दशावतारी नाटके महाराष्ट्रात प्रचलीत असावीत, मात्र त्यांच्या स्वरुपा ब-लचा पुरावा मिळत नाही. रामदासानंतर जनता जसजशी लढाईच्या कामामध्ये अधिकाधिक गुंतत गेली तसतसे त्यांचे या मनोरंजनाच्या साधनाकडे दुर्लक्ष होत जाऊन ती लुप्त झाली असावीत. मात्र यावेळी तंजावर प्रांतामध्ये पौराणिक संविधानकांवर आधारलेली अशी नाटके निर्माण होत राहिली होती. त्यानंतरचा महाराष्ट्रातील दशावताराची माहिती देणारा पहिला पुरावा इ.स. १७२८ मधील उपलब्ध होतो. त्यानुसार हा मनोरंजन प्रकार कर्नाटकातून महाराष्ट्रात आणून तो लोकांसमोर सादर करण्याचे काम शामजी नाईक काळे यांनी केले.त्यांनी राजापूर प्रांतातील आडिवरे या आपल्या छोट्याशा गावामध्ये दशावतारी खेळाची सुरुवात केली.[१६७] दशावतार आणि मराठी नाटके यांच्या स्वरुपामध्ये अतिशय साम्य आहे. काही हावभाव आणि कृतीच्या माध्यमातून विष्णूच्या दहा अवतारांचे सादरीकरण दशावतारामध्ये केले जाते. दशावतारी खेळ सुरु करण्यापूर्वी स्नान करुन पेटाऱ्याची पूजा केली जाते. पेटारा म्हणजे दशावतारी खेळाचे साहित्य ठेवण्याची पेटी. ही पेटी बांबूपासून तयार केलेली असून तिच्यामध्ये लाकडी मुखवटे ठेवलेले असतात. पेटीतून गणपती, सरस्वती व ब्रम्हदेवाचा चार तोंडाचा मुखवटा काढून त्यांची पुजा केली जाते. ही पुजा म्हणजेच रंगदेवतेची पूजा होय.[१६८] प्रत्येक दशावतारी खेळाची सुरुवात सर्व विद्या आणि कलांची देवता असणाऱ्या गजाननाची आळवणी करुन केली जाते. त्याबरोबरच 'काळे या' अशी आळवणी शामजी काळेंना करुन त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला जातो. त्यानंतर रंगमंचावर गोपाळनृत्य व ब्रम्हदेवाची उपस्थिती दाखविली जाते. कथानक सांगणारा जो सूत्रधार किंवा संयोजक असतो त्याला नाईक असे म्हणतात.[१६९] तो संस्कृत नाटकातील सुत्रधाराची भुमिका पार पाडत असतो. कथा रंजक करण्यासाठी भारतीय अध्यात्मामधील कांही प्रश्न, स्तोत्र व वेदउच्चार लोकांना सांगितले जात होते.

दशावताराचा प्रवाह सर्वप्रथम आडिवरे येथे सुरु झाला आणि नंतर त्याचा प्रसार कोकणातील कुवेशी, नाटे, ओणी इत्यादी भागामध्ये झाला. मराठ्यांचे आरमार प्रमुख सरदार आंग्रेनी इ. स. १७३६ मध्ये शामजी काळेंना दशावताराचा खेळ करण्यास निमंत्रित केले होते.[१७०] त्यामुळे पुढील काळात दशावतार हा कोकणातील लोकांच्या मनोरंजनाचे प्रमुख साधन बनले. विशेषकरुन सावंतवाडी व मालवण परिसरामध्ये या प्रकाराला अतिशय लोकप्रियाता लाभली होती. मनोरंजनाच्या या प्रकाराला कांही नाटकीय मूल्ये असून त्यातील संवाद विशिष्ट शैलीमध्ये सादर केले जात असत. यामध्ये वापरली जाणारी भाषा ही ग्रामीण व गावरान होती. मात्र ती सर्वसामान्य लोकांना जास्त आवडणारी असून त्यांचा या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद लाभत होता. वेगवेगळ्या देवतांची आणि दानवांची पात्रे सादर करणारे कलाकार मुखवटे आणि केसांचे टोप घालून अभिनय करीत असत. त्यासाठी त्यांना अभिनयाचे कौशल्यही आवश्यक होते. मृदंग आणि झांजाच्या तालावर ते नृत्य करुन आपली कला सादर करीत होते. देव आणि दानव यांच्यामधील युध्द हे दशावताराचे मुख्य वैशिष्ट्य होय. त्यामधून असे स्पष्ट होते की, त्यावेळच्या लोकांच्यावर प्राचीन दंतकथा आणि पुराणांचा खूप प्रभाव होता. दशावतारी खेळातील संवाद, कथाकथन, गीते आणि नृत्य यामधून लोकांचे चांगले मनोरंजन झाले. कोकणातील राजापूर प्रांतात उदयास आलेला हा मनोरंजन प्रकार पुढे पेशव्यांच्या दरबारात जाऊन पोहचला. इ.स.१७८५ मध्ये होळी उत्सवामध्ये सुप्याच्या बाललिंग नाईक व लक्ष्मण गुरव या दोन कलाकारांनी पेशव्यांच्या समोर शनिवारवाड्यात दशावतार सादर केला.त्यानिमित्त श्रीमंतांनी (पेशव्यांनी) दोघांना प्रत्येकी तीस रुपये बक्षिसी आणि मानाची वस्त्रे दिली होती.[१७१]

दशावताराचे खेळ देवतांच्या यात्रा व उत्सवप्रसंगी सादर करुन लोकांचे मनोरंजन केले जात होते. इ.स.१८१३ मध्ये वैद्य यांच्या खर्चामध्ये श्रीरामजीच्या देवळात दशावतारी खेळ केल्याबद्दल कलाकारांना १० रुपये दिल्याची नोंद आढळते.[१७२] या खेळाच्यावेळी हरताळ, राळ वगैरेसाठी १८।। रुपये खर्च करण्यात आले होते. पेशवेकाळात उदयास आलेल्या या मनोरंजन प्रकाराला स्वच्छंदी मनोरंजना-एवढी लोकप्रियता लाभली नाही. कारण १८ व्या शतकातील जास्त लोकांची स्वच्छंदी मनोरंजनाची मागणी होती. दशावतार हा धार्मिक मनोरंजन प्रकार असल्यामुळे तो लोकांची ही मागणी पूर्ण करु शकणारा नव्हता. अध्यात्मिक वृत्तीच्या लोकांचे

मनोरंजन करण्याच्या उद्देशाने उदयास आलेला हा प्रकार आजपर्यंत टिकून आहे. त्यावरुन त्याची आवश्यकता व लोकप्रियता लक्षात येते.

## ५.६ मुस्लीम समाजातील सण-उत्सव आणि मनोरंजन

महाराष्ट्रामध्ये मुस्लीम समाजाची लोकसंख्या पेशवे कालखंडाच्या अगोदर पासूनच बरीच होती. राज्यकर्ते या नात्याने महाराष्ट्रातील हिंदू समाजाला कांही शतके मुसलमानांचा सहवास लाभल्यामुळे त्यांच्यामध्ये साजरे केल्या जाणाऱ्या सण व उत्सवामध्ये हिंदूही सहभागी होत होते. अहमदनगर जवळचा एक गाव औरंगजेब बादशहाने हुसेन शहा नावाच्या फकीरास इनाम दिला होता. पूर्वीच्या अमलात जी उत्पने चालू असतील ती कायम करण्याचे धोरण सर्व पेशव्यांनी राबविले होते. त्यानुसार हा गाव फकीराकडेच इनाम म्हणून ठेवण्याचा आदेश माधवराव पेशव्यांने दिला होता.[१७३] मुस्लीमांच्या पीरांचा हिंदू समाजावर मोठा प्रभाव पडलेला होता. मिरजेचा पीर मिरासाहेब हा आजूबाजूच्या परिसरात प्रख्यात असून पुष्कळ पैसा खर्च करुन तेथे दर्गा बांधण्यात आला आहे. दरवर्षी त्याचा मोठा उरुस भरतो. मिरजेचा पीर गोविंद हरीच्या स्वप्नात येत असल्याबद्दल त्याने गोपाळरावास लिहिले आहे की, ‘‘ग्रामाधिपती पीर सर्व प्रकारे अनुकूल.रोज दोन स्वप्ने. एक स्वप्न नाही असा दिवस नाही. सर्व प्रकारे रक्षण करतो. मोठा चमत्कार पाहिला.’’[१७४] या पत्रावरुन हिंदू लोकांची पीरावर असणारी श्रध्दा स्पष्ट होते. मिरजेच्या किल्ल्यावर पेशव्यांच्या फौजेने केलेले हल्ले गोविंदपंताने मारुन परतावले हाच पीराचा चमत्कार होय. विजयाचे श्रेय पीराला देणारे भोळेभाबडे लोक यावेळी समाजामध्ये होते.

मुसलमान राज्यकर्त्यांच्या काळामध्ये ज्याप्रमाणे काही हिंदू देवदेवतांची व विद्वान ब्राम्हणांची उत्पन्ने चालू ठेवण्यात आली, त्याप्रमाणे पेशव्यांनीही आपल्या हद्दीतील मुसलमानांच्या पीरांची आणि इतर धर्मियांची उत्पन्ने चालू ठेवली होती. पेशव्याप्रमाणेच सातारा[१७५] व कोल्हापूरच्या छत्रपतींनी व त्यांच्या अधिकाऱ्यांनीही हेच धोरण चालू ठेवले होते. त्यांनी आपल्या राज्यातील अनेक पिरांच्या उदफुलाबाबत कायमस्वरुपी उत्पन्नाची व्यवस्था करुन ठेवली होती.[१७६] विशाळगडच्या पंतप्रतिनिधींकडे जेंव्हा कसबा येथील जाफरशा पीर या जागृत देवस्थानच्या दिवाबत्तीची आणि ऊरुसाच्या खर्चाचा बंदोबस्त करण्यासाठी बापूजी कुलकर्णी

यांनी अर्ज केला त्यावेळी पंतप्रतिनिधींनी लगेचच कायमस्वरुपी पीराच्या खर्चाची व्यवस्था केली.[१७७] यावेळी कोणतीही नवी इमारत बांधावयाची झाली तर पीरापुढे दक्षिणा ठेवली जात होती. पेशव्यांनी पुण्यामध्ये शनिवार वाडा बांधण्याचा मुहूर्त इ. स.१७२९ मध्ये केला. त्यावेळी देव व पीर यांच्यापुढे चार आणे दक्षिणा ठेवली होती.[१७८] हिंदू देवाप्रमाणे पीरालाही नवस केला जात होता. राजश्री रघुनाथपंथास व जनार्धनपंथास देवी आल्याबद्दल मातोश्री काशीबाई यांनी पुण्यातील शेख सला या पीराला मलिद्याचा नवस केला होता. तो फेडण्यासाठी २।। रुपये खर्च करण्यात आले होते. तसेच सदाशिवराव भाऊ यांना लहानपणी देवी आल्या होत्या, त्यावेळी कंदोरीचे नवस केले होते. ते फेडण्यासाठी ३ रुपये खर्च करण्यात आले होते.[१७९] त्यामधील एक रुपया पीरास नजर आणि दोन रुपयाचा खुर्दा फकिरास वाटण्यास खर्च झाला होता.

पेशवेकालीन महाराष्ट्रात मुस्लीमांची संख्या बरीच असल्यामुळे त्यांचे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जात होते. मुस्लीमांचे धार्मिक सण आणि उत्सव चांगल्या प्रकारे साजरे करता यावेत म्हणून राज्यकर्तेही मानधनाची व्यवस्था करीत. तरी देखील कांहीवेळा त्यांच्यामध्ये आपसात तंटे होऊन त्याच्या तक्रारी पेशव्यांकडे मिटविण्यासाठी येत असत. त्याकाळात पुढील सण व उत्सव मुस्लीम लोक साजरे करीत होते. त्यामधून हिंदू व मुसलमान लोकांना आनंद मिळत होता त्याबरोबर त्यांचे मनोरंजन होत होते.

## ५.६.१ रमजान ईद

ईद या शब्दाचा अर्थ मेजवानीचा दिवस असा आहे. इद-उल-फीत्र किंवा रमजान आणि इद-उल अजहा  हे दोन मोठे मुसलमानी सण होत.[१८०] ते पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात साजरे केले जात होते. रमजान या सणामध्ये रमजान व्रताचे पारणे असते. शव्वाल या दहाव्या महिण्याच्या पहिल्या दिवसापासून हे पारणे करावयाचे असते म्हणून त्याला ईद-उल-फीत्र असे म्हणतात. या सणापेक्षा बकरी ईदचे अधिक महत्त्व असल्यामुळे बकरी ईदला मोठी ईद आणि रमजान ईदला लहान ईद असे म्हणतात. यादिवशी दानधर्म केला जातो म्हणून त्याला 'ईदस्सदका' असेही म्हणतात.

यादिवशी सर्व स्त्री-पुरुष उत्तम पोशाख परिधान करुन व अलंकार घालून गावाबाहेरील 'इदगाहवर' (प्रार्थनेच्या जागी) जमून सामुदायिक प्रार्थना करतात. तिथे इमाम खुत्बा म्हणजे कौटुंबिक, सामाजिक व अध्यात्मिक कर्तव्यांचा उपदेश करतो. त्यानंतर 'आमीन' म्हणजे शांती असा घोष केल्यावर ही प्रार्थना संपते. प्रार्थनेनंतर दहीभात व साखर यांचे जेवण होते. त्याबरोबर खारका देखील खाण्यासाठी दिल्या जात असत. कारण महमद पैगंबर व त्याच्या कुटुंबियांना हाच पदार्थ उपलब्ध होता अशी समजूत आहे. यादिवशी घरी आल्यानंतर शेवयाची खीर खाण्याची प्रथा आहे.[१८१] रमजान ईद निमित्त पेशव्यांनी शिवनेरी किल्यावर तोफांची सरब्बती करण्याकरिता नेमणूक केलेली होती.[१८२]

## ५.६.२ बकरी ईद

बकर ईद हा मुसलमान समाजाचा दुसरा महत्वाचा सण होय. बकर या शब्दाचा अर्थ गाय किंवा बैल आणि ईद म्हणजे आनंद किंवा प्रसन्नता होय. ज्यादिवशी अल्लाच्या प्रित्यर्थ आनंदाने बळी देऊन साजरा केल्या जाणाऱ्या सणाला बकर - ईद असे म्हणतात. याचे मुळ नाव ईद - उल-अजहा (बलीदानाचा उत्सव ) असे आहे. हा सण मुळचा इस्लामी नसून इस्लाम धर्माच्या स्थापनेपूर्वी तो मध्यआशियात प्रचलीत होता. इस्लाम धर्मामध्ये त्याचा प्रवेश कसा झाला याबाबत भिन्न मते मांडली जातात. काहींच्या मते पैगंबर मक्केहून मदिनेला गेला तेंव्हा तेथील यहुदी लोकांमध्ये प्रचलित असलेले एक उपवास व्रत आपल्या अनुयायांसाठी आहे तसे स्वीकारले. पुढे यहुदी - इस्लाम संघर्षानंतर या व्रताचे स्वरुप बदलून त्याला आनंदोत्सवाचे रुप प्राप्त झाले व उपवासाऐवजी बलिदानाची प्रथा पडली. काहींच्यामते हजरत इब्राहिम यांच्या काळापासून हा सण इस्लाममध्ये प्रचलित असून बलीदान प्रथाही तेंव्हापासून रुढ आहे. यादिवशी सर्व मुसलमान स्त्री- पुरुष स्नान करुन गावाबाहेर प्रार्थनास्थळी जाऊन तेथे नमाज पडतात. मग पशुचे मक्केकडे तोंड करुन धार्मिक मंत्रोच्चारात त्याचे बलीदान केले जाते. बळी दिलेल्या पशुच्या मांसाचे तीन भाग करुन त्यापैकी एक भाग बलीदान कर्त्याच्या नातेवाईकांना, दुसरा गरीबांना व तिसरा खुदाचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.[१८३] पेशव्यांनी बकरी ईदप्रसंगी शिवनेरी किल्यावर तोफांच्या बाराकरिता नेमणूक केलेली होती.[१८४]

### ५.६.३ मोहरम

मोहरम हा मुसलमानी वर्षाचा पहिला महिना व त्यामधील एक उत्सव होय. 'मोहरम' या मुळ अरबी शब्दाचा अर्थ निषिध्द किंवा धिक्कार करण्यासारखा असा आहे. इस्लाम धर्माच्या उदयापूर्वी अरबस्थानात या महिन्यात युध्द किंवा रक्तपात करणे या गोष्टी धार्मिकदृष्ट्या निशिध्द मानल्या जात होत्या. त्यामुळे या महिन्याला मोहरम असे नाव पडले. सुरुवातीपासूनच हा महिना पवित्र मानला जात असे. जेव्हा या महिन्यात हजरत इमाम हुसेन यांचा वध झाला, तेंव्हापासून या महिन्याला अशुभत्व प्राप्त झाले.

महमद पैगंबरांच्या मुलीचे मुलगे हसन व हुसेन यांना त्यांच्या शत्रूने ७व्या शतकात अमानुषपणे मारले. त्या दु:खद प्रसंगाची स्मृती म्हणून मोहरम नावाचा उत्सव साजरा केला जातो.या उत्सवामध्ये ताझीयाला किंवा ताबुताला फार महत्व असते. मोहरमच्या उत्सवकाळात सर्व सुखोपभोगाचा त्याग करुन मुसलमान स्त्री पुरुष व्रतस्थ राहतात. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी ताबुताची मिरवणूक काढली जाते. पेशवेकाळात या उत्सवामध्ये आणि मिरवणुकीमध्ये हिंदू लोकदेखील मोठ्या प्रमाणात सहभागी होत असत. ..................गरीबांना अन्न व पैसा वाटला जात असे.[१८५] ताबुतावर विश्वास ठेवणारे अनेक लोक अपत्यप्राप्तीसाठी, रोग निवारणासाठी, भूताटकीपासून मुक्ती मिळविण्यासाठी नवस करत. नवस केलेल्या स्त्रिया नवस फेडण्यासाठी आपल्या मुलांना हिरवे कपडे घालून भिक्षा मागावयास लावतात. त्याचप्रमाणे यावेळी अनेक सोंगे काढली जात असत. शेवटी मिरवणुक गावाबाहेरील स्मशानामध्ये जाऊन तिथे मनुष्याप्रमाणे ताबुताचा अंत्यविधी केला जातो. श्रीमंत लोक घरी आल्यानंतर गोरगरीबांना अन्न, वस्त्र व द्रव्यदान करीत.[१८६]

पुण्यामध्ये ताबुताच्या मिरवणूक मार्गावरुन फकिरांच्या दोन गटामध्ये वाद निर्माण झाला होता. हा वाद विकोपास जाऊन परस्परांना जखमी करण्यात आले होते. त्यावेळी चिमाजी आप्पांनी वाद मिटवून त्यांच्यामध्ये समझोता घडविला होता. त्यानुसार दरवर्षी दोन्ही पिराकडील पिरजादियास बोलावून चिमाजी आप्पांनी ठरवून दिलेल्याच मार्गाने मोहरमची मिरवणूक न्यावी अशी ताकीद पेशव्यांनी दिली होती.[१८७]

कुरंदवाडकर पटवर्धनांनी तर हिंदू-मुस्लीम ऐक्य निर्माण करण्यासाठी पेशवेकाळात गणपती आणि ताबुत एकत्र बसवण्याची सुरु केलेली परंपरा आजही पहावयास मिळते.[१८८] अनेकदा एकाच वेळी येणारा गणपती उत्सव आणि ईद हे दोन्ही सण मोठ्या उत्साहात पेशवेकाळात साजरे केले जात होते.

## ५.६.४ उरुस

पेशवेकालीन महाराष्ट्रामध्ये हिंदू आणि मुस्लीम समाज एकत्र येऊन अनेक पीरांचे उरुस साजरे करत होता. त्यामधून या समाजामध्ये निर्माण झालेले ऐक्य दिसून येते. शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरु झालेले अनेक दर्ग्यातील उरुस आजपर्यंत सुरु असलेले आढळतात. इंदापूरच्या चांदखान दर्ग्यामध्ये सुरु झालेला उत्सव पेशवेकाळातही अतिशय आनंदात साजरा केला जात होता. त्यामध्ये हिंदू-मुस्लीम बांधव उत्साहाने सहभाग घेत होते. छत्रपती शाहूने फातमा हीस पीर बाजी जमाल याच्या उरुसासाठी कल्याण येथील जमीन इनाम म्हणून दिली होती.[१८९] कोल्हापूर येथे हजरत सय्यद मुबारक दर्गा आहे. या दर्ग्यातील घुडणपीर बाबाचा उरुस हिंदू मुस्लीम बांधव अतिशय भक्तिभावाने व आनंदाने साजरा करत. त्यानिमित्त काढण्यात येणारी ‘गलेफ’ मिरवणूक लोकांना आनंद देणारी होती. पेशवेपूर्व काळापासून ही मिरवणूक भोसल्यांच्या वाड्यात जाण्याची परंपरा आहे.[१९०] भोसले वाड्यात दुवा व खतम झाल्यानंतर मिरवणूक परत दर्ग्यात जाण्याची परंपरा आहे. कोकणामध्ये लांजा येथे सय्यद चाँदशहा बुखारी बाबांचा उरुसही अतिशय उत्साहात साजरा केला जात होता. या उरुसामध्येही हिंदू लोक सहभागी होत असून दोन्ही समाजातील मानकऱ्याच्या पुढाकाराने तो साजरा केला जात होता.[१९१] त्यानिमित्त चुन्याचा लेप लावणे, चंदल संदल व गिलीफ आणि मिरवणूक असे कार्यक्रम होत असत. या उरुसानिमित्ताने होणारा शस्त्रास्त्रांचा खेळ हा एक महत्वाचा मनोरंजनाचा कार्यक्रम होता.

## संदर्भ


१. सरदेसाई गो. स., पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं ४३ पत्र ८२ व ८३

२. कित्ता, खं.४३ पत्र ८५ व ८९

३. कित्ता, खं.४३ पत्र ८६

४. कित्ता, खं.४३ पत्र ८७

५. पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश, पेशवेकालीन पुणे, पृ.४३

६. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. २९७

७. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३ पत्र १२०,१६२,१६७

८. चापेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ. १६४

९. शाहू रोजकिर्द, रु.२ पु.२ का.२१४८, ५/४/१७ व १/१५/१५४

१०. डॉ. देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन, पृ.१७९

११. डॉ. गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ११५, ११६
देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ. १७९,१८०

१२. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं ४३ पत्र १०३

१३. कित्ता, पत्र १०६

१४. कित्ता, खं.३२ ले.२०३

१५. चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ. १६४.

१६. वैद्य एस. एल.(संपा), वैद्य दप्तर, खं.४ क्रं.२०, २९, ३२, ३४, ३५
डॉ. गवळी पी. एल., पूर्वोक्त, पृ.१०९

१७. सरदेसाई गो. स. पूर्वोक्त, खं. ४३ पत्र ७६

१८. पं. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खं.४ पृ. २११

१९. दै. प्रहार, दि.२७/३/२०१३ पृ. ४

२०. पोतदार द. वा.(संपा.), भा. इ. सं. मं.१९२२-२३ खं.३ अंक.१. पृ. ३४-३५

२१. बाँबे स्टेट गॅझेटर, पुणा डिस्ट्रिक्ट, व्हा.२० पृ.१३८

२२. टोड जेम्स, ॲलन अँड अँटिक्विटज ऑफ राजस्थान, खं. २ पृ. ६६२

२३. ब्राउटन टी. डी., लेटर्स रिटर्न इन ए मराठा कॅम्प ड्युरिंग दी इयर १८०९ पृ.६७-६८
२४. प्रा. कुलकर्णी वि. म., प्रा. कुलकर्णी अ. रा., प्रा. कुलकर्णी अ. ना.(संपा.), पेशव्यांची बखर (कृष्णाजी सोहनीकृत), पृ.१२०-१२२
२५. जोशी श. ना., भाऊसाहेबांची बखर, पृ. ९७
२६. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं. ४१ पृ.२९४ २९५
२७. डॉ. पवार जयसिंगराव, मराठेशाहीचे अंतरंग, पृ. ७४
२८. कित्ता, पृ. ७५- ८१
२९. काणे पां.वा., हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र, खं.२.भा.१ पृ १९२
३०. जेम्स टोड, पूर्वोक्त, पृ. ६८५
३१. गर्गे स.मा.(संपा.), करवीर रियासतीची कागदपत्रे, खं.३ ले.१९५
३२. सरदेसाई गो.स., पूर्वोक्त, खं.४५ ले.६
३३. कित्ता, ले.६
३४. कित्ता, ले .१३
३५. महाराष्ट्र स्टेट गॅझेटर ऑफ सातारा डिस्ट्रिक्ट, पृ. ८९४-८९५
३६. केळकर य. न., मराठेशाहीतील वेचक वेधक, पृ. १२७- १२८
३७. पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश, पूर्वोक्त, पृ. ९७
३८. केळकर य. न., पूर्वोक्त, पृ. १३०
३९. डॉ. पवार जयसिंगराव, पूर्वोक्त, पृ.८१
४०. काणे पां. वा., पूर्वोक्त, पृ. २१३
४१. केळकर य. न., भूतावर भ्रमण (ऐतिहासिक लेखसंग्रह), पृ. ८२
४२. कित्ता, पृ.८३
४३. डॉ. शिरगावकर वर्षा, पेशव्यांचे विलासी जीवन ,पृ.४८
४४. पुरंदरे कृ. बा.(संपा.), पुरंदरे दप्तर भाग ३ पृ. ११५
४५. पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश, पूर्वोक्त, पृ. ९३
४६. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४ पृ २९, ३०

**४७.** कित्ता, खं.१८ पृ.१२५

**४८.** कित्ता, खं.२२ पृ.१०८

**४९.** केळकर य. न., ऐतिहासिक पोवाडे, पृ. १४३

**५०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३२ पत्र २७

**५१.** कित्ता, खं.३२ पत्र २८

**५२.** कित्ता, खं.३२ पत्र २९

**५३.** पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश उपरोक्त, पृ.९४, ९५

**५४.** वाड ग.चि., पेशवे रोजनिशी, खं.८ पृ. ३०९, ३१०

**५५.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३२ पत्र ३०

**५६.** कित्ता, खं.४ ले. २५

**५७.** कित्ता, खं.४ ले. २४

**५८.** शाहू दप्तर, रु.४२ पु.१ का. ५८८२९, ८३०, ८५७

**५९.** दै. प्रहार, दि.१४/९/२०१० अक्षरकोकण पुरवणी पृ.१

**६०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ ले.४८

**६१.** कित्ता, खं.३० पत्र १५३

**६२.** कित्ता, खं.४३ ले.६

**६३.** चिटणीस दप्तर, रु.१२ पु.३ का.६१२४

**६४.** जोशी शं. न. (मुद्रक व प्रकाशक), प्रभाकरकृत कविता पदे, पोवाडे व लावण्या, पृ.१६६

**६५.** डॉ. शिरगावकर वर्षा, पूर्वोक्त, पृ.५४

**६६.** ॲब. डुबॉइस जे. ए. (अनु.) हेनरी के. बेन व्हॅप, - हिंदू मॅनरस, कस्टमस् ॲन्ड सेरेमनीस पृ.२७१

**६७.** शाहू दप्तर, रु.४१ पु.४ का ५७९८९

**६८.** डॉ. आकलेकर भालचंद्र , कोकणचा सांस्कृतिक इतिहास, पृ. २९

**६९.** कित्ता, पृ. २९

**७०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं. ४३ ले ९०,९३.१३०

**७१.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.२ पु.२ का.१३५

**७२.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४५ ले. १५

**७३.** भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.८१

**७४.** सरदेसाई गो.स., पूर्वोक्त, खं.४१

**७५.** देसाई सुधा, सोशल लाईफ इन महाराष्ट्र अंडर दि पेशवाज, पृ. १५१

**७६.** डॉ. शिरगावकर वर्षा, पूर्वोक्त, पृ.५४

**७७.** डॉ. आकलेकर भालचंद्र, पूर्वोक्त, पृ. १८३

**७८.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.२९३

**७९.** डॉ. गवळी पी. ए., पूर्वोक्त, पृ.१२७

**८०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.७ पत्र २४६

**८१.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.२४६

**८२.** कित्ता, पृ.२४७,२४८

**८३.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ ले.१०१

**८४.** चिटणिस दप्तर , रु.३८ पु.२ का.२०३८१

**८५.** महाराष्ट्र स्टेट गॅझेटर कोल्हापूर डिस्ट्रिक्ट , पृ.११८

**८६.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४५ पत्र.१९

**८७.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.३१४

**८८.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४५ पत्र २९

**८९.** वाड ग. चि., पेशवे रोजनिशी, खं.९ पृ. ९९,१००

**९०.** डॉ. गवळी पी. ए., पूर्वोक्त, पृ.९०

**९१.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.३१५

**९२.** खरे वा. वा. अधिकारयोग पृ.१४

**९३.** डॉ. गवळी पी. ए., पूर्वोक्त, पृ.९२

**९४.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.३

**९५.** प्रभू पंढरीनाथ, हिंदू सोशल ऑरगनायझेशन्स, पृ. १४८,१४९

**९६.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३२ पत्र १९६

**९७.** डॉ. गवळी पी. ए. पूर्वोक्त पृ.९३

**९८.** चिटणीस मल्हार रामदास, थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, पृ. ५

**९९.** कित्ता, पृ.१४

**१००.** डॉ गवळी पी. ए., पूर्वोक्त, पृ.९४

**१०१.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं. ४३ पत्र ९

**१०२.** कित्ता, खं. ४३ पत्र १४

**१०३.** कित्ता, खं. ४ पत्र ३, ११, १२, १३, ३७, ३८, ४७, ४८, ४९, ५७, ५८

**१०४.** खरे ग. ह., भा. इति. संकलन मंडळ, पुणे नगर संशोधन वृत्त, खं.४ पृ. ४५ - ४९

**१०५.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.७ ले २२६

**१०६.** डॉ. शिरगावकर वर्षा, पूर्वोक्त, पृ.५५, ५६

**१०७.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ पत्र ४०

**१०८.** प्रा.शेनोलीकर, डॉ.देशपांडे महाराष्ट्राची संस्कृती (घडण आणि विकास ), पृ. १३८

**१०९.** शाहू दप्तर रोजकिर्द , रु.१ पु.१६ पत्र ६२

**११०.** शाहू दप्तर, रु. ४६ पु.५ का. ६४८१०

**१११.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.१ पु.१६ का.३२

**११२.** कित्ता, रु.३ पु.१ का.१०

**११३.** प्रा.शेनोलीकर, डॉ. देशपांडे , पूर्वोक्त, पृ.१४४

**११४.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.२ पु.१ का.३३

**११५.** शाहू दप्तर, रु.४७ पु.२ का.६७७३४

**११६.** चिटणिस दप्तर, रु.१ पु.२ का.६९३

**११७.** शाहू दप्तर, रु.४९ पु.३ का.७१९६९

**११८.** चिटणीस दप्तर, रु.४४ पु.३ का. २१९५१

**११९.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.३ पु. २ का. १८४

**१२०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ पत्र ७०

**१२१.** प्रा. शेनोलीकर, डॉ. देशपांडे , पूर्वोक्त, पृ.१४१

**१२२.** कित्ता, पृ.१४८

**१२३.** कित्ता, पृ.१५७

**१२४.** दै. लोकमत, सोमवार दि. २९ मार्च २०१०, हॅलो कोल्हापूर पुरवणी, पृ.३

**१२५.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.५ पु.१ का ३९

**१२६.** कित्ता, रु.१.पु.१५ का. ०४

**१२७.** कित्ता, रु. ५ पु. ५ का. १२१

**१२८.** डॉ. आकलेकर भालचंद्र, पूर्वोक्त, पृ. २५

**१२९.** कित्ता, पृ. २६

**१३०.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.९०

**१३१.** शाहू दप्तर रोजकिर्द रु. ६ पु. ३. का. २२

**१३२.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ. ३०७

**१३३.** प्रा. डॉ. पाठक यशवंत, नाचू कीर्तनाचे रंगी पृ. ६८

**१३४.** कित्ता, पृ. ६८

**१३५.** कित्ता, पृ.७६

**१३६.** आजगावकर ज. र. महाराष्ट्र कविचरित्र खं.१ पृ.३५२

**१३७.** खानोलकर गं. दे.(संपा.), मराठी वाङ्मयकोश , खं.१ पृ.५८

**१३८.** कित्ता, पृ. ७१

**१३९.** कित्ता, पृ. ११६

**१४०.** चापेकर ना. गो. , पूर्वोक्त, पृ.१६७

**१४१.** आजगावकर ज. र. , पूर्वोक्त, खं.३, पृ.६८

**१४२.** कित्ता, खं.२ पृ. ४५

**१४३.** डॉ.आकलेकर भालचंद्र, पूर्वोक्त, पृ. २६

**१४४.** चापेकर ना. गो. पूर्वोक्त, पृ.१७२

**१४५.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ पत्र ९८

**१४६.** कित्ता, खं.४ ले ६७

**१४७.** पेशवे दप्तर, रु.३० पु.२ का.१६७२६

**१४८.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.२२ ले.२६१

**१४९.** ओतुरकर रा. वि., पेशवेकालीन सामाजिक आर्थिक पत्रव्यहार ,ले.३९

डॉ. गवळी पी. ए. , पूर्वोक्त, पृ.१६३

**१५०.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. ६७

**१५१.** कित्ता, पृ. ७१

**१५२.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.७ ले.१७८

**१५३.** कित्ता, ले.२४६

**१५४.** शाहू दप्तर, रु.४२ पु.१ का.५८७१०

**१५५.** डॉ.देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन, पृ.२०७

**१५६.** कित्ता, पृ.२०८

**१५७.** कांबळे बळवंत, देवदासी, पोतराज, वाघ्या-मुरळी, रुप-स्वरुप-विकृती, पृ.१४७,१४८

**१५८.** कित्ता, पृ.१५०

**१५९.** डॉ. हंडीबाग भारत, मराठी लोकगीतातील समाज दर्शन, पृ. १०७,

डॉ. मांडे प्रभाकर, लोकगायकांची परंपरा, पृ.१९३

**१६०.** डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ. १०८

**१६१.** डॉ. गवळी पी. ए., पूर्वोक्त, पृ. ६१

**१६२.** डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ. १०८

**१६३.** कित्ता, पृ. १०८

डॉ. व्यवहारे शरद, लोकसाहित्य संकलन व स्वरुप, पृ.१२३

**१६४.** डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.१०९

**१६५.** कित्ता, पृ.११०

डॉ. व्यवहारे शरद, मराठी लोकगीत स्वरुप विशेष पृ. २०

**१६६.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ. १६

**१६७.** कित्ता, खं.१ पृ. ७६

**१६८.** डॉ. आकलेकर भालचंद्र, पूर्वोक्त, पृ. ९१

**१६९.** जोशी वि. कृ., पूर्वोक्त, पृ.१५

**१७०.** कित्ता, पृ.१५

**१७१.** पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश, पूर्वोक्त, पृ.९९

**१७२.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.१८५

**१७३.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.३१९

**१७४.** वाड ग. चि., पेशवे रोजनिशी खं.८ पृ.२५७

**१७५.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.५ पु.५ का.४७

**१७६.** शाहू दप्तर रोजकिर्द, रु.१.पु.१६ का.२९

**१७७.** गर्गे स. मा., पूर्वोक्त, ले.१६८

**१७८.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.३१८

**१७९.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ ले.१०६

**१८०.** पं. जोशी महादेवशास्त्री, महाराष्ट्र संस्कृतीकोश, खं.१ पृ.५७८

**१८१.** कित्ता, खं.७ पृ.७२०

**१८२.** भावे वा.कृ., पूर्वोक्त, पृ.३१९

**१८३.** पं. जोशी महादेवशास्त्री, पूर्वोक्त, खं.६ पृ. ३६

**१८४.** भावे वि. कृ., पूर्वोक्त, पृ.३१९

**१८५.** पं. जोशी महादेवशास्त्री, पूर्वोक्त, खं.७ पृ.५४१,५४२

**१८६.** कित्ता, खं.७ पृ.५४१

**१८७.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.४३ पत्र ३३

**१८८.** दै. सकाळ, कोल्हापूर , १०/०९/१० पृ.१

**१८९.** शाहू दप्तर, रु.४० पु.४ का. ५६६१०

**१९०.** दै. सकाळ, कोल्हापूर, १७/९/२०१० पृ. ४

**१९१.** दै. प्रहार १९/२/११ पृ. ५

# पारंपरिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

**प्रकरण**

**६ वे**

६.१ प्रस्तावना

६.२ धर्माच्या नावाखाली केले जाणारे मनोरंजन

६.३ शारीरिक कसरतीद्वारे मनोरंजन

६.४ प्राण्यांच्या मदतीने केले जाणारे सामाजिक मनोरंजन

६.५ शरीर कमविणे, खेळ व व्यायामाद्वारे होणारे मनोरंजन

६.६ खेळ व शिकार यामधील मनोरंजन

६.७ लोकगीत व खेळगीतांतून होणारे मनोरंजन

६.८ लहान मुलांची मनोरंजनाची साधने व खेळ

प्रकरण सहावे

# पारंपरिक मनोरंजनाची साधने व सांस्कृतिक जीवनप्रवाह

## ६.१ प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रवाहामध्ये पारंपरिक मनोरंजनाच्या साधनांचे अतिशय महत्वाचे स्थान आहे. या मनोरंजन साधनांचा उगम प्राचीन काळामध्ये झाला असून त्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये मोलाची भर घातली आहे. अशी ही साधने पेशवेकाळातही लोकप्रिय असून त्यांनी लोकांचे चांगले मनोरंजन केले होते. पेशवेकाळानंतरही आजपर्यंत यापैकी कांही मनोरंजन प्रकार खेड्यामध्ये पहावयास मिळतात तर कांही कलाप्रकार नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. प्राचीन काळापासून पारंपरिक मनोरंजनाचे शिक्षण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत गेले. पेशवेकाळात लोकप्रिय असणारे पारंपरिक मनोरंजन प्रकार पुढीलप्रमाणे.

## ६.२ धर्माच्या नावाखाली केले जाणारे मनोरंजन

हिंदू लोकांच्या सांस्कृतिक परंपरेचा एक महत्वाचा भाग म्हणजे विविध देवदेवतांच्या उपासना निरनिराळ्या कलामाध्यमांच्या संयोगातून करणे हा होय. असे कलाप्रकार सादर करणाऱ्या लोकांना लोककलावंत म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये लोकसंस्कृतीची जपणूक करणारे अनेक लोककलावंत असून त्यांची कला आजच्या आधुनिक युगात काळाच्या पडद्याआड जाण्याची भिती निर्माण झाली आहे. कलेच्या माध्यमातून देवतांची उपासना करण्याची परंपरा कशी आणि का सुरु झाली हे समजून घेण्यासाठी धर्म आणि कला यांचा परस्परसंबंध स्पष्ट करणे आवश्यक ठरते. कला हा संस्कृतीचा एक बहुमोल ठेवा असून कलेमुळे माणसाच्या जीवनात सौंदर्य निर्माण झाले आहे. परंपरेने चालत आलेल्या या कला पेशवेकाळात अतिशय प्रसिध्द होत्या. धर्माच्या नावाखाली वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, पोतराज, अराधी, भराडी, भुत्ये, देवदासी, डवरी, चित्रकथी व पिंगळा जोशी किंवा कुडमुडे जोशी इत्यादी कलावंत

आपली कला लोकांपुढे सादर करुन त्यांच्याकडून भिक्षा मिळवत असत. या कलाकारांना मराठी लोकजीवनात वेगवेगळ्या देवदेवतांचे भगत म्हणून ओळखले जाते. अशा देवतांच्या उपासना विधीप्रसंगी त्यांची उपस्थिती महत्वाची मानली जाते. इतरवेळी हे कलावंत आपली उपजिवीका भिक्षा मागून भागवितात. भिक्षा मागण्यासाठी एखाद्या घरासमोर उभे राहिल्यानंतर ते आपल्याजवळील गाणी सहअभिनय करुन उपस्थितांना दाखवत असत. त्याबदल्यात त्यांना भिक्षा मिळत होती. खासकरुन सुगीच्या दिवसामध्ये हे कलाकार अनेक गावांना भेटी देऊन धान्यरुपाने भिक्षा गोळा करत होते.[१] प्राचीन काळापासून लोकप्रिय असणारी मनोरंजनाची ही साधने पेशवेकाळात व त्यानंतरही प्रचलीत होती. अलीकडील काळात मनोरंजनाचे हे प्रकार बंद होण्याच्या मार्गावर आहेत. पेशवेकाळात त्यांच्याकडून लोकांचे पुढीलप्रमाणे मनोरंजन केले जात होते.

## ६.२.१ वासुदेव

वासुदेव या लोककलावंताचा उल्लेख पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथात आढळतो.[२] त्यावरुन इ. स. २ऱ्या शतकाच्या पूर्वार्धापासून तो लोकप्रिय होत गेला आहे. महानुभव साहित्यामध्येही 'श्रीडी' या नावाने त्याचा उल्लेख आला आहे. त्याने कृष्णभक्ती लोकप्रिय करण्याचेही कार्य केले. श्रीकृष्णाचा भक्त म्हणून ओळखला जाणारा व उपजिविकेसाठी भिक्षा मागत फिरणारा कलाकार म्हणून तो ओळखला जातो. [३] डोक्यावर मोरपिसांचा टोप, गळ्यात कवड्याची माळ, अंगात झगा, एका हातात टाळ व दुसऱ्या हातात चिपळ्या, काखेला झोळी व पायात चाळ अशी वेशभूषा धारण करुन तो स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी बाहेर पडतो. गोविंदप्रभु चरित्रात त्याच्या वेषभूषेचे वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे.

जेथे मोरपिसांची वैठी पीलांचे नेसला होता माथा दौंडी अंगी

नीलवर्ण उटी : हातीची पोळी दौंडीचे वाजवीत [४]

मराठी लोकजीवनाच्या श्रध्दा जोपासणारी त्याची गाणी आणि त्या गाण्यांना नृत्य, संगीत व अभिनयाची जोड देऊन तो लोकांचे चांगले मनोरंजन करीत असे. प्राचीन काळापासून लोकप्रिय असणारा हा कलाप्रकार पेशवेकाळातही तसाच लोकप्रिय होता. तो आपल्या

कथागीतामधून पुराणातील आदर्श व्यक्तिंच्या जीवनाचे, शौर्याचे व विविध घटनाप्रसंगांचे साभिनय सादरीकरण करत असे. त्यामुळे सकाळी सकाळी आलेल्या वासुदेवाची कथागीते ऐकण्यासाठी स्त्री-पुरुष मंडळी भक्तिभावाने एकत्र जमत होती. सकाळच्या वेळी भिक्षा मागतांना तो गीतातून श्रीकृष्णाच्या लीला, देवकी-यशोदेचे प्रेमभाव व गौळण अशी गीते गाऊन लोकांचे चांगले मनोरंजन करतो. सुरुवातीला तो तेहतीस कोटी देवांना नमन करण्यासाठी पुढीलप्रमाणे गीत गातो.

श्रीधराला - दान पावलं

कृष्णामाईला - दान पावलं

महादेवाला - दान पावलं [५]

अशाप्रकारे वेगवेगळ्या देवांच्या नावानं 'दान पावलं' असं पालुपद आळवून झाल्यावर तो इतर गाणी गाऊन त्यामधून लोकांना उपदेश करण्याचे कार्य करतो. त्याचे गाणे संपल्यानंतर सुवासिनी सूप भरुन धान्य त्याच्या झोळीत टाकते. तसेच त्याला कुंकवाचा टिळा लावून नमस्कार करत असे. त्यावेळी वासुदेव तिच्या पूर्वजांचे नाव विचारुन त्यांच्या नावाने दान पावल असे म्हणत दुसऱ्या घराकडे प्रस्थान करीत असे. काहीवेळा त्याला धान्याबरोबरच जुने वस्त्र, भांडी, चोळखण असेही दान मिळत असे. विविध देवदेवतांची नावे घेऊन त्यांच्या नावाने घरोघरी भिक्षा मागणारा हा वासुदेव इतर भगत-मागत्याप्रमाणे घरोघरी जाऊन भिक्षा मागत असला तरी तो भिकारी नसतो. लोक त्याला भिक नाही तर दान देत असून ते त्याच्या झोळीत टाकतात. त्याला दानधर्म केल्यामुळे घरात समृध्दी येते अशी लोकांची भावना आहे. पेशवेकालीन लोक वासुदेवाचे अतिशय भक्तीभावाने स्वागत करत असत.

## ६.२.२ गोंधळी

मराठी संस्कतीची जपणूक करणारा दुसरा कलावंत म्हणून गोंधळी ओळखला जातो. देवीचा भगत म्हणून तो ओळखला जात असून देवीच्या उपासनेमध्ये त्याचे मानाचे स्थान आहे. आनंदाच्या प्रसंगी एखाद्या घरी गोंधळ घातल्याबद्दल त्याला चांगला मोबदला मिळत होता. इतरवेळी तो वासुदेवाप्रमाणे गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करतो.[६] यादवकाळापासून

महाराष्ट्रात गोंधळ्याची लोकप्रियता खूप वाढली होती. यादवकाळातील गोंधळाचा उल्लेख ओवीमध्ये पुढीलप्रमाणे आला आहे.

मडौराचां बंबाळी : योगिनीचक्राचा गोंदळी ।

काळरात्री उदा म्हणविली : रणामजि ।[७]

अंगात मखमली अंगरखा, गळ्यात कवड्याच्या माळा आणि डोक्यावर कंणगीदार पगडी घालून ते आपली कला सादर करीत.[८] सुगीच्या दिवसामध्ये ते आपल्या हक्काच्या गावामध्ये जाऊन लोकांकडून धान्य मागत. पेशवेकाळात गोंधळ्याचा समावेश कांहीवेळा बलुतेदार तर कांहीवेळा अलुतेदारामध्ये केलेला आढळतो. ग्रँट डफने सांगितलेल्या बलुतेदारांच्या यादीत गोंधळ्याचा समावेश आहे.[९] बलुते मागण्यासाठी जेंव्हा ते दारोदारी जात तेंव्हा देवीची गाणी सादर करुन लोकांचे मनोरंजन करीत. घरातील सुवासिनीने त्यांना धान्य वाढल्यानंतर एक गोंधळी तिच्याकडून सासऱ्यांचे नाव विचारुन घेत असे. त्यानंतर लांब उभ्या असणाऱ्या दुसऱ्या गोंधळ्याला विशिष्ट खुनेद्वारे ते नाव कळविण्यात येई. त्यानंतर दुसरा गोंधळी ते नाव ओळखुन गाण्यामध्ये म्हणून दाखवी. पेशवाईच्या काळात कांही गोंधळ्यांनी पोवाडे गाऊन लोकांमध्ये राष्ट्राभिमान जागृत करण्याचे काम केले. त्याचबरोबर मराठी तमाशाच्या जडणघडणीमध्येही गोंधळी लोकांचे योगदान मोठे आहे. गोंधळ्याच्या तमाशातील कार्याचा पुरावा म्हणून पुण्याच्या रामा गोंधळ्याचा उल्लेख करावा लागेल. त्याच्या प्रसिध्दीब-ल शाळीग्राम म्हणतात, ‘‘तो प्रतिगंधर्वच होता. त्याच्या म्हणण्याची योग्यता अप्रतिम होती. त्याच्या गोड सुरावर पुणे शहर इतके लुब्ध होऊन जाई, पाव पाव मैलपर्यंत त्याच्या तमाशाभोवती मनुष्यांचे कडे असे, त्याचप्रमाणे त्यास देणग्याही अशा कांही मिळत की, त्या ऐकल्या तर आता खऱ्या देखील वाटत नाहीत.’’[१०] मात्र महाराष्ट्रातील सर्वच गोंधळ्यांची घराणी ही पोवाडे आणि तमाशाकडे वळली नव्हती. तर त्यांनी आपला पारंपरिक व्यवसाय चालू ठेवला होता. [११]

## ६.२.४ वाघ्या-मुरळी

खंडोबा या देवाला केलेले नवस फेडण्यासाठी जन्माला येणारे मुल देवाला सोडण्याची परंपरा अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. नवसामुळे मुलगा झाला असे मानून त्याला ‘वाघ्या’ म्हणून आणि मुलगी झाली तर तिला ‘मुरळी’ म्हणून देवाला सोडले जात होते. अशी

देवाला सोडलेली अनेक मुले व मुली जेजुरी व पाली या खंडोबाच्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी कांही काळ राहिल्यानंतर उदरनिर्वाहासाठी महाराष्ट्रभर भटकत असत. खंडोबा हे कुलदैवत असणारे लोक नवस फेडण्यासाठी किंवा शुभप्रसंगी वाघ्या-मुरळीकडून खंडोबाचे जागरण करुन घेत. त्यावेळी त्यांना कामाचा चांगला मोबदला दिला जात होता. त्यांच्या जागरणाचे स्वरुप हे गोंधळासारखेच असते. सुगीच्या दिवसामध्ये हे लोक खळी मागत किंवा भिक्षा मागत फिरतात.[१२] त्यांच्या या फिरण्याला 'वारी मागणे' असे म्हणतात.[१३] त्यावेळी ते खंडोबा-म्हाळसा आणि बाणाई यांच्याविषयीची गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करतात. त्यांच्या गाण्यामध्ये धार्मिक आणि सामाजिक आशय असल्यामुळे ती लोकांना खूप आवडतात. या गाण्यापैकी आजही लोकप्रिय असणारे गाणे पुढीलप्रमाणे-

मल्हार वारी मोतीयानी द्यावी भरून ।
नाहीतर देवा मी जाते दुरुन ।
नाही तर देवा मी येतो फिरुन ।।[१४]

वाघ्या मुरळीच्या अनेक गाण्यामध्ये जेजुरीच्या यात्रेचे वर्णन केलेले आढळते. जेजुरीला भरणारी प्रचंड मोठी यात्रा व आनंदाने गडाच्या नवलाख पायऱ्या चढणाऱ्या भक्तांचे वर्णन एका गाण्यात पुढीलप्रमाणे आढळते.

यात्रा भरली की घनदाट। बोला मल्लारीचा यळकोट।।
नवलाखाची ही पायरी ।खंडेरायाची ही जेजुरी

दुसऱ्या एका गाण्यामध्ये पेशवेकाळात जेजुरीला होळकरांनी मंदीर बांधले. त्याचप्रमाणे पायऱ्या बांधून अचाट करणी केल्याचा उल्लेख देखील त्यांच्या गाण्यामध्ये आढळतो. वाघ्यामुरळीच्या गाण्यामध्ये होळकरांच्या कार्याची दखल पुढील प्रमाणे घेतली आहे.

दखनात खंडेराया नांदे हौसेनं। लई पैसा खरचला त्या की होळकरानं।।
देवाचं देणं त्याला प्रसन्न मलुखान। पायऱ्या बांधील्या दाट दिवट्यांचा लखलखाट।।[१५]

## ६.२.५ पोतराज

महाराष्ट्राच्या धार्मिक परंपरेत धर्मप्रसारक म्हणून बहुजन समाजातील अनेक जाती जमातीच्या लोकांनी भूमिका बजावली होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पायपीट करुन त्यांनी धर्मप्रसाराचे काम केले. त्यापैकीच पोतराज हा एक महालक्ष्मी, मरीआई अथवा अंबाबाईचा भक्त होय. घरात सुख-समृध्दी लाभावी, रोगराई, करणी इत्यादीपासून घरातील लोकांचे संरक्षण व्हावे म्हणून देवीला नवस करुन झालेला पहिला मुलगा पोतराज म्हणून सोडला जात होता. [१६] पोतराज स्त्रियांप्रमाणे डोक्यावर केस, कपाळाला हलदीकुंकू व हातामध्ये हिरव्या बांगड्या व गळ्यात माळ घालतो. त्याच्या कंबरेभोवती चोळीचे खण गुंडाळलले असून पायात चाळ बांधून हलगी वाजवित तो देवीची गाणी म्हणून भिक्षा मागत फिरत असतो. काही पोतराज उघड्या अंगावर चाबूक मारुन घेऊन रक्तबंबाळ होऊन भिक्षा मागत असतात. त्याच्याबरोबर त्याची पत्नी देवीचा पेटारा डोक्यावर घेऊन ढोलासारखे वाद्य वाजवत लक्ष्मीची गाणी गात असते. त्यामुळे त्यांना कडकलक्ष्मीवाले म्हणूनही ओळखतात. देवीची ओवाळणी करुन स्त्रिया त्यांना भिक्षा वाढण्याचे काम करतात. [१७]

पोतराज भिक्षा मागत फिरताना वेगवेगळे चमत्कार करुन दाखवून लोकांचे चांगले मनोरंजन करत होते. सुतळ्याच्या गोट्यांचा खेळ करणे, कापूर खाणे, तोंडातून विस्तव काढून दाखविणे, अंगाला सुया टोचून दाखविणे, चाबकाचे फटकारे मारुन रक्तबंबाळ होणे, जिभेतून आरपार दाभण काढणे, पिंगा घालणे व विचित्र अंगविक्षेप करुन ओरडणे अशा त्याच्या अनेक मनोरंजक चमत्कारांचे लोकांना खास आकर्षण वाटत होते. एखाद्या गावात भिक्षा मागण्यासाठी प्रवेश केल्यानंतर प्रथम मांगवाडा व महारवाड्यात भिक्षा मागून नंतर ते इतर लोकांकडे भिक्षा मागण्यासाठी जात असत.[१८] त्यावेळी तो स्त्रियांच्या ओवीगीतांच्या स्वरुपाची गाणी गात असतो. मरीआईच्या सामर्थ्याचे वर्णन सांगण्यासाठी तो म्हणतो -

आली आली मरीबया हिच कळंना अनुभव। भल्यभल्यांचा घेती जीव ।
आली आली मरीबया का सुटलासा वारा। दुनिया कापती चळाचळा ।

तो जेंव्हा अशी गाणी गाण्यास प्रारंभ करतो, तेंव्हा लोक जमा होत असत आणि पोतराजाचे गायन आणि त्याबरोबर नृत्य सुरु होई. त्याच्या नृत्यामध्ये कौशल्यदर्शनाचा चांगला

भाग असल्यामुळे त्याचा कार्यक्रम पहाण्यासाठी लोकांची गर्दी होत असे. त्यावेळी तो भिक्षा वाढण्यासाठी सुपातून आणलेले धान्य आणि सुपातील कुंकवाचा करंडा पडणार नाही अशा रितीने घिरक्या मारत फिरवत असे. त्यामुळे भोळ्या भाबड्या लोकांना तो त्याचा चमत्कार खुप आवडत असे.

### ६.२.६ भोपी

भोप्याला आराधी व भुत्या या नावानेही ओळखले जाते.तो तुळजाभवानीचा उपासक असून देवीची पूजा व आराधना करतो म्हणून त्याला आराधी असेही म्हटले जाते. गळ्यात कवड्याची माळ, डोक्यावर कवड्यांचा टोप, अंगात झगा, एका हातात जळता पोत व दुसऱ्या हातात तुणतुणे, कंबरेला कवड्यांनी गुंफलेला कंबरपट्टा, गळ्यात देवीचा टाक व हळदीकुंकवाची पिशवी असा पारंपरिक पोशाख परिधान करुन भोपे देवीची गाणी गाऊन भिक्षा मागत फिरतात. आराध्यांच्या किंवा भोप्याच्या भिक्षा मागण्याला 'जोगवा' मागणे असे म्हणतात.[१९] त्यावेळी ते कथात्म गीते व देवीचे महात्म्य सांगणारी गीते गाऊन लोकांचे मनोरंजन करतात. त्यांच्या गाण्यामध्ये देवीचे, मंदिरांचे व मंदिराच्या परिसरातील तीर्थादिकांचेही उल्लेख असतात. तुळजापुरच्या भवानीचा मंदिर परिसर कसा आहे याचे वर्णन त्यांच्या गाण्यामध्ये पुढीलप्रमाणे आढळते.

तुळजापुरामंधी मला दिसतो गं कल्लोळ, बाई कल्लोळ
दिसतो गं कल्लोळ, भक्त करत्याती अंधोळ .....
तुळजापुरा जाया ग मला दिसते पटांगण,ग पटांगण
दिसते पटांगण ग, भोपी घेत्याती लोटांगन, ग लोटांगन

दुसऱ्या एका गीतामध्ये मला भुत्या केले हे आदिशक्तीचे मोठे कौतुक असल्याचे म्हटले आहे. त्या गाण्यामध्ये तो असे म्हणत असतो की -

आदिशक्तीचे कौतुक मोठे भुत्या मज केले ।। धृ।।
पंचभुताचा देह पोत हा त्रिगुण गुणे वाळिला ।'[२०]

मंगळवार व शुक्रवार देवीचे वार मानले जात असल्याचा उल्लेखही या गीतामधून मिळतो. गोंधळ्या प्रमाणे भोपेदेखील ज्या घरामध्ये भिक्षा मागतात त्या घरातील जेष्ठ व्यक्तिचे

नाव विचारुन हाताच्या बोटाच्या इशाऱ्यांने व संकेताने आपल्या दुसऱ्या साथीदाराला सांगतात. ते नाव ओळखून त्या नावाचा उध्दार दुसरा भोपी करतो हे पाहणे लोकांना अतिशय मनोरंजक वाटत होते. त्यामुळे गावामध्ये आलल्या भोप्याच्या पाठीमागून लहान मुले व स्त्री पुरुष फिरत असत.

## ६.२.७ देवदासी किंवा जोगती

देवाला सोडलेल्या किंवा देवाला वाहून घेतलेल्या स्त्रीयांना 'देवदासी' किंवा 'जोगती' असे म्हणतात. [२१] स्त्रीयांप्रमाणे देवाला वाहिलेल्या पुरुषांना 'जोगता' असे म्हटले जात असून ते स्त्रीयांचा वेश धारण करुन भिक्षा मागतात. जोगता व जोगती हे यल्लम्मा देवीचे भक्त असून त्यांचा विवाह या देवीबरोबर लावलेला असतो. गळ्यात कवड्याची माळ घालून ते जोगवा मागण्यासाठी गावागावामध्ये फिरत. यल्लमा देवीला मुलं-मुली सोडण्यामागची कारणे अनेक आहेत.त्यापैकी सर्वात महत्वाचे कारण म्हणजे धार्मिक भय हे होय. महाराष्ट्रीय सनातन समाजाची धार्मिक भावना व परंपरेने ही प्रथा समाजामध्ये रुढ होत गेली होती. देवदासी परंपरा खंडीत केली तर देवीचा कोप होऊन कुटुंबाला त्रास होईल किंवा जीवावर बेतणारे संकट ओढवेल, घरात रोगराई येईल अशी भीती लोकांना वाटत असल्याने ही परंपरा अखंडपणे पेशवेकाळात व त्यानंतरही चालू राहिली होती.

एका टोपलीमध्ये यल्लम्मा देवीची मूर्ती ठेऊन ते भिक्षा मागत फिरतात. त्या टोपलीला 'जग' असे म्हणतात. तो बांबूच्या बेळापासून तयार केला जात होता. देवीचा पितळी मुखवटा जगाच्या मध्यभागी ठेऊन तो मोरपिसांनी सजविला जात असे. देवीला वारा घालण्यासाठी म्हणून प्राण्यांच्या केसांचा झुपकेदार गोंडा त्यांच्याबरोबर असे, त्याला 'चौरी' असे म्हणत. जगाच्या सभोवती लहान लहान मूर्ती अडकविलेल्या असत त्यांना 'रस्त्या' असे म्हणत. जोगवा मागत फिरतांना ते चौंडके या वाद्याच्या तालावर यल्लम्माची गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करतात. चौंडके हे त्यांचे पवित्र वाद्य होय. त्याच्याबरोबरच ते गाणी गाताना टाळाचाही उपयोग करत होते. त्यामुळे त्यांची गाणी लोकांना आवडणारी होती. सुगीच्या दिवसामध्ये अनेक जोगत्यांचा समावेश असलेला एक संच की ज्याला ताफा किंवा मेळा म्हणून ओळखले जाते, तो गावोगावी फिरण्यासाठी बाहेर पडत असे. त्यावेळी ते यल्लमाची गाणी गाऊन व रात्रीच्या वेळी यल्लमाची कथा भारुड पध्दतीने कथन करुन लोकांचे मनोरंजन करीत. सुगीच्या दिवसाव्यतिरिक्त ते

मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी गावामध्ये फिरुन जोगवा मागत. त्यावेळी देखील ते यल्लमाची गाणी गाऊन लोकांचे मनोरंजन करत.

जोगती लोक गात असणारी यल्लमाची गाणी ही मौखिक परंपरेने पुढील पिढीकडे सुपुर्त केली गेली आहेत. त्यांच्या गाण्यांमध्ये सामाजिक आशय, यल्लम्माचा महिमा, तिचे चमत्कार व उपदेश असल्यामुळे लोकांना ती जास्त आवडतात. यल्लमाची दैवतीकरणाची लौकिक आणि अलौकिक पातळीवरील वर्णने या गीतामध्ये आढळतात. भिक्षा मागण्यासाठी गेल्यानंतर संबंधित घरातील लोकांना 'भंडारा' म्हणजे हळद लावून त्यांना आशीर्वाद देत.

## ६.२.८ कोकेवाला किंवा किंगरीवाला

सुगीच्या दिवसामध्ये शेतकऱ्यांच्या शेतावर आणि गावामध्ये फिरुन कोकेवाला किंवा किंगरीवाला भिक्षा मागत असतो. त्याला पाहिल्यानंतर शेतात काम करणारे लोक आपले काम अर्धवट सोडून शेताच्या बांधावर, खळ्यावर किंवा अंगणामध्ये जमा होत असत. तो खास करुन कथात्म स्वरुपाचे गीत गात असे. त्यांच्या गीतातून पुराणातील व्यक्तिंचे महात्म्य, रुप, गुण किंवा चमत्कार अशा बाबींचे बहारदार वर्णन केलेले असे.किंगरी या वाद्याच्या लयीत ते गीत गाण्याचे काम करीत. त्यांच्या कथागीतांचे हरिश्चंद्र-तारामती, रुक्मिणी स्वयंवर, श्रावणबाळ, द्रौपदी वस्त्रहरण, श्रीयाळ-चांगुणा असे विषय[२२] असल्यामुळे ते लोकांना आवडत. संत जनाबाईची विठ्ठलभक्ती सांगणारे कोकेवाल्याचे एक कथागीत अतिशय लोकप्रिय आहे. त्यामध्ये जनाबाईवर पंढरपूरातील बडव्यांनी घेतलेला चोरीचा आळ कसा खोटा ठरतो आणि जनाई व विठ्ठलाचे प्रेमळ नाते कसे आहे याचे बहारदार वर्णन ऐकावयास मिळते. या कथागीताची सुरुवात कोकेवाला पुढीलप्रमाणे करत असे -

दोन पार रात झाली, स्वारी विठठला तुझी आली
देव गेला जनीच्या महाली, जनाई म्हणूनी हाक मारिली
जनाई आलो तुझ्यासाठी, जेवाय वाढ गं विठ्ठलाशी [२३]

## ६.२.९ एकतारीवाला

एकतारीवाला हा एका हातात एकतारी व दुसऱ्या हातात चिपळ्या वाजवीत भजनाप्रमाणे गाणी म्हणतो. तो एखाद्या गावात जाऊन प्रत्येक घरापुढील अंगणात बसून गाणी म्हणतो.त्याची गाणी इतकी श्रवणीय असतात की, शेजापाजारील लोक अंगणात ताबडतोब जमा होऊन त्याला साथ देतात. त्यामुळे तर त्याच्या कार्यक्रमाला अतिशय रंगत येत असे. एकतारीवाल्याच्या गीतातून कोकेवाल्याप्रमाणे, पुराणांतील व्यक्ति, घटना, प्रसंग यांचे गुणवर्णन, माहात्म्य, धर्माचरण सांगितले जाते. [२४] परमेश्वरभक्ती व उपदेश हे त्याच्या गीताचे प्रमुख उद्देश असले तरी त्यातून लोकांचे चांगले मनोरंजन होत होते. त्यांच्या गीतांचे स्वरुप पुढीलप्रमाणे असते.

गर्व अहंता सोडा, तुम्ही विठ्ठल सोयरा जोडा ।

पत्र पाठवा संताघरी, रातोरात यावे पंढरपुरी, पंढरपुरी ।

अबीर बुक्क्याचा पुडा सोडा, तुम्ही विठ्ठल सोयरा जोडा ।।[२५]

## ६.२.१० चित्रकथी

चित्रकथी या जातीसंबंधीचे उल्लेख अगदी प्राचीन काळापासून आलेले आढळतात. चित्रे दाखवून कथागीत गाण्याची आणि त्याचबरोबर कथाकथन करण्याची परंपरा प्राचीन काळापासून आढळते. वैदिक, बौध्द व जैन साहित्यात चित्रांच्या साह्याने कथा सांगणाऱ्यांचे उल्लेख आढळतात. महाराष्ट्रात चित्रे दाखवून कथा सांगणाऱ्यांची एक जात निर्माण झाली होती, त्यांना चित्रकथी असे म्हणतात. सोमेश्वराच्या 'मानसोल्लास' या ग्रंथामध्ये चित्रकथींचे वर्णन पुढीलप्रमाणे आले आहे.

वर्णकै : सह यो वक्ति सचित्रकथको वर : ।।

गायका यत्र गायन्ति विना तालैर्मनोहरम् ।।[२६]

महाराष्ट्रातील पैठण व पिंगुळी ही दोन ठिकाणे चित्रकथी या लोककला प्रकारासाठी लोकप्रिय आहेत. इ.स.१७ व्या व १८ व्या शतकात ज्यावेळी सिनेमा व नाटक यासारखे मनोरंजन प्रकार उपलब्ध नव्हते त्यावेळी चित्रकथी हा प्रकार लोकप्रिय होता.[२७] सर्वसाधारणपणे २५ x ४० इंच आकाराची चित्रे तयार करुन त्याद्वारे लोकांचे मनोरंजन केले जात होते. चित्रांच्या

सहाय्याने लोकांचे मनोरंजन करणाऱ्या लोकांना चित्रकथी असे म्हणतात. पुण्यातील राजा केळकर संग्रहालयामध्ये १८ व्या शतकातील रामायण, महाभारत, वेताळ पंचवीसी व चलचड्डू अख्यान यावर अधारित असंख्य कथा सांगणारी चित्रकथींची चित्रे उपलब्ध आहेत. त्यावेळी समाज हा धार्मिक वृत्तीचा असल्यामुळे त्यांना चित्रकथींच्या कथा आवडत होत्या. प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेले पैठण शहर पेशवेकाळात महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक हालचालींचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास आले होते. येथील चित्रकथींनी आपली कला महाराष्ट्रभर लोकप्रिय केली होती. मध्यकालीन महाराष्ट्रातील चित्रशैलीचा उत्तम नमुना असणारी त्यांची चित्रे अतिशय दर्जेदार असून त्यांच्यावर वेरुळ येथील चित्रकलेचा प्रभाव जाणवतो. [२८] ही चित्रे हातावर तयार केलेल्या कागदावर तयार केली आहेत. कागदाच्या दोन्ही बाजूला चित्रे काढली असल्यामुळे कथा सांगताना चित्रे दाखविणे सोपे जात होते. या कथाचित्रामध्ये रामायनातील श्रीराम, लक्ष्मण व हनुमान भेट, लंकापती रावण व त्याचा भाऊ बिभीषण यांचा सीता हरणावेळचा संघर्ष, लव व कुश ऋषी वाल्मिकीबरोबर खेळताना, हनुमानाचा लंकादहनाचा प्रताप, लक्ष्म्णाकडून शूर्पणखेचे नाक कापणे, श्री रामाकडून कांचनमृगाची शिकार, सीतेकडे भीक मागण्यासाठी आलेला रावण, वाली व सुग्रीव यांच्यातील मुष्टीयुध्द, मंदोदरी व रावण, रावण व जटायू संघर्ष, रावणाचा हनुमानावर हल्ला, लक्ष्मणरेषा, सीतेच्या शोधाचा वृत्तांत सांगणारा हनुमान, अशोक वनात सीतेला रामाची अंगठी देणारा हनुमान, भारतातून लंकेकडे सेतूवरुन जाणारा राम व त्याची सेना, रामाच्या सैन्याबरोबर युध्द करणारा मेघनाद, राम रावण युध्द, सीतेची अग्निपरीक्षा, सीतेची वनामध्ये पाठवणी, अश्वमेध घोडा आडविणारे लव कुश इत्यादी कथांचा समावेश होता.

रामायणाप्रमाणे महाभारतातील कथाही चित्रकथी लोकांना सांगून लोकांचे मनोरंजन करत होते. त्या कथामध्ये राजकन्या रुक्मिणीचे ऋषीमार्फत श्रीकृष्णाला प्रेमपत्र, विवाहासाठी श्रीकृष्णाकडून रुक्मिणीचे हरण, पांडवांचा वनवास, नारद मुनी व कीचक भेट, भीम व कीचक यांचे मुष्टीयुध्द व कीचकाचा वध, महायोध्दा अर्जुनाचा योगगौरी बरोबरचा विवाह, अर्जुन पुत्र अभिमन्यूचे बालपण, अभिमन्यू वत्सला विवाह, अभिमन्यू व घटोत्कच विवाह, इत्यादी कथा चित्रकथी सांगत होते.

कोकणामध्ये ठाकर समाजातील लोकांनी चित्रकथी हा सामाजिक मनोरंजनाचा लोककलाप्रकार ऐतिहासिक काळापासून जोपासला आहे.[२९] चित्रांच्या सहाय्याने चित्रकथी कोणत्याही तालवाद्याशिवाय गायनाच्या मदतीने लोकांचे मनोरंजन करत असतो. चित्रकथींच्या चित्रकला प्रकारामध्ये पंधरा इंच लांब व बारा इंच रुंद आकाराचा कागद घेऊन त्यावर चित्रकथी कलाकार आशयपूर्ण चित्र काढीत होते. निसर्गामध्ये मिळणारी लाल रंगाची माती आणि वनस्पतींच्या पानांच्या रसांचा उपयोग करुन ती रंगविली जात होती. त्यांच्या चित्रांचे विषय हे रामायण, महाभारत अशा पौराणिक कथावर अधारलेले असत. आपल्या कार्यक्रमांची सुरुवात ते गणपतींच्या स्तवनाने करुन नंतर इतर कथा लोकांपुढे सादर करीत. आजही पिंगुळी हे ठिकाण चित्रकथी लोककलेसाठी लोकप्रिय आहे.

## ६.२.११ पिंगळा किंवा कुडमुडे जोशी

महाराष्ट्रामध्ये धर्माच्या नावाखाली गावोगावी फिरुन भिक्षा मागणाऱ्यापैकी पिंगळा किंवा कुडमुडे जोशी हा एक लोककलावंत होय.[३०] पिंगळा या लोककलेचा उदय पहारेकऱ्यांच्या गरजेतून निर्माण झाला आहे. पिंगळा नावाचा पक्षी पहाटेच्या शांतवेळी जे ओरडतो ते त्याचे ओरडणे नसून कांहीतरी सांगत असतो. तो शुभ-अशुभ शकुन सांगत असतो अशी लोकांची समजूत आहे. त्यांची भाषा कुडमुडे जोश्यांना समजते असा लोकांचा विश्वास असल्याने लोक त्याचे शुभशकुन ऐकून मोठ्या प्रेमाने त्याला दान करतात. त्याच्या हातात डमरु नावाचे वाद्य असून ते वाजविण्याच्या विशिष्ट शैलीमुळे त्याला कुडमुडे असे म्हणतात. मौखिक परंपरेने चालत आलेली गाणी गाऊन तो लोकांचे मनोरंजन करण्याचे व त्यांना ज्ञान देण्याचे काम करत आला आहे. महाराष्ट्रामध्ये परंपरागत जशी लहान मुलांना झोपविण्यासाठी अंगाईगीते आहेत तशीच झोपलेल्यांना पहाटे उठविण्याचे काम पिंगळा जोशी करत होता.[३१]

## ६.२.१२ बहुरुपी

बहुरुपी या लोककलावंताला महाराष्ट्रात रायनंद किंवा रायंदर म्हणून ओळखले जाते.श्रीपतीभट्टाच्या ज्योतिषरतनमाला या ग्रंथामध्ये त्याचा बोहर्पी असा उल्लेख आढळतो.[३२] बहुरुप्यांची परंपरा अनेक शतकांची असून अनेक राजांनी त्यांचा उपयोग हेरगिरीसाठी करुन

घेतला होता.[३३] बहुरुपी लोक शिवाजी महाराजांच्या गुप्तचर विभागातील बहिर्जी नाईक हे आपल्या समाजातील असल्याचे अभिमानाने सांगतात. हे लोक लोकांचे मनोरंजन करुन भिक्षा मागत फिरण्याचे काम पेशवेकाळातही करत होते. विविध प्रकारची सोंगे घेऊन गाणी म्हणत ते लोकांचे चांगले मनोरंजन करत. संत कवी जनी जनार्दन यांच्या 'जानकी स्वयंवर' या काव्यामध्ये बहुरुप्याचा उल्लेख पुढीलप्रमाणे आढळतो.

येकु बहुरुपी केली शक्ती, नाना स्वांगी नाचविली ।
मतंगळा अमंगळा आकृती, श्री रघुपती धरविती ।।[३४]

मराठी संतांच्या अगोदरपासून समाजात बहुरुपी या लोककलाकाराचा वावर असलेला आढळतो. कोणतेही सोंग काढताना तो हुबेहुब वेशांतर, अभिनय, आवाजातील चढउतार व नाट्यमयता इतकी परिणामकारकपणे साधतो, की कित्येकदा अस्सल व नक्कल याताल फरक प्रेक्षकांना सहजासहजी समजत नाही.तो कित्येकदा सोंगाना विनोदी गाण्याची जोड देत असतो. त्यांच्या सोंगामध्ये क्षमादायी हाल्या, श्यामशिंगी, बाळंतीण, नंदी, शंकर-पार्वती, म्हातारी इत्यादी सोगांचा समावेश असे. तो जेंव्हा एखाद्या घरापुढील अंगणात उभा राहून गाणी म्हणण्यास सुरुवात करत असे त्यावेळी शेजापाजारील लोक त्याचे सोंग पाहण्यासाठी आणि गाणी ऐकण्यासाठी जमा होत असत. काहीवेळा तो इतके हुबेहुब सोंग घेऊन येत असे की, पाहणाऱ्यांच्या ते लक्षातदेखील येत नसे. 'लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला' हे त्याचे अतिशय लोकप्रिय गीत होय. इतर लोककलावंताप्रमाणे ते वहिवाटीप्रमाणे ठरलेल्याच गावी जातात असे नाही तर कोणत्याही गावी जातात म्हणून त्यांना उपलाणी असे म्हणतात.[३५]

## ६.३ शारीरिक कसरतीद्वारे मनोरंजन

परंपरेने चालत आलेल्या विशिष्ट कलागुणांच्या आधारे अनेक लोकसमूह गावोगावी भटकत असतात. अशा भटक्या समाजात कष्टाची कामे करुन उदरनिर्वाह करणारे कांही लोक आहेत तर कांही लोकांचे मनोरंजन करुन पोट भरणारे आहेत. कोल्हाटी, डोंबारी व गोपाळ या भटक्या समाजातील लोक शारीरिक कसरती करुन लोकांचे मनोरंजन करत होते. सुगीच्या दिवसात गावोगावी फिरुन ते लोकांच्या मनोरंजनाचे काम करीत व त्याबद्दल त्यांना धान्याच्या

स्वरुपात व रोख पैशाच्या स्वरुपात मोबदला मिळत होता. [३६] पेशवेकाळात या जमातीकडून लोकांचे पुढीलप्रमाणे मनोरंजन केले जात होते.

## ६.३.१ कोल्हाटी

गावोगावी भटकत चरितार्थ चालविणारा कोल्हाटी समाज हा मनोरंजन करणारा एक महत्वाचा समाज होता. कसरती करुन व नाचतमाशा करुन तो लोकांचे मनोरंजन करीत असे.[३७] कलावंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या समाजातील लोकांनी मध्ययुगीन महाराष्ट्रातील जनतेचे मनोरंजन केले. हा समाज मूळचा महाराष्ट्रातील नसून, आपल्या अंगचे कलागुण दाखविण्याच्या निमित्ताने पोट भरण्यासाठी उत्तर प्रदेशातून आला आहे.[३८] त्यांचे १२ व्या शतकात महाराष्ट्रात आगमण झाले असून, तेंव्हापासून ते लोकांचे मनोरंजन करत आहेत. कसरतीच्या प्रयोगावेळी काठीवरुन विशिष्ट प्रकारे मारल्या जाणाऱ्या उडीच्या नावाने या समाजास 'कोल्हाटी' हे नाव रुढ झाले. कोल्ह म्हणजे उडी आणि हाटी म्हणजे काठी, म्हणून कठीवरुन उडी मारणारा तो 'कोल्हाटी' असे नाव मिळाले.

या समाजाच्या नाचगाण्याबद्दल अशी पुराणकथा सांगितली जाते की, या समाजाची निर्मिती गंधर्वकन्येला शंकराने शाप दिल्यामुळे झाली आहे. शापित गंधर्वकन्या शिळा बनून पृथ्वीवर शंकराचा धावा करीत पडली होती. तिचा पार्वतीच्या आग्रहास्तव शंकराने उध्दार केला. त्यावेळी तिने मनोभावे शंकराला वंदन केले आणि आपल्या उपजीविकेसाठी वर मागितला.तेंव्हा शंकराने तिला वर दिला की, ''तुझ्या पोटी जन्म घेणारी संतती कलावंत होईल आणि लोकांचं मनोरंजन करुनच पोट भरेल.'' [३९] यावरुन प्राचीन काळापासून या लोकांनी कसरती व नाचतमाशा करुन चरितार्थ चालविलेला आढळतो. पेशवेकाळात नाचतमाशा करणाऱ्या अनेक स्त्री कलावंताना राज्यकर्त्यांकडून बक्षिसे इनाम मिळालेले आढळते. त्यामध्ये या समाजातील कलावंत स्त्रीयांचाही समावेश होता. कारण त्यावेळी नाचगाण्यामध्ये याच समाजातील स्त्रीया पुढे होत्या. शाहू दप्तरात जयाल नाईकीण कलावंतिण हीस सासवडे येथील जमीन इनाम देण्याचे पत्र आढळते.[४०] दुसऱ्या बाजीराव पेशव्याला तर नाचगाण्याचा अतिशय नाद होता. त्यामुळे त्यांने शुक्रवारच्या वाड्यासमोरची जागा खरेदी करुन त्यावर कलावंतिणींना बिऱ्हाड थाटण्याची

परवानगी दिली होती.[४१] तसेच त्याने हिरी कलावंतिणीस १०५० रुपये खर्च केल्याचे खाजगी जमाखर्चात स्वहस्ते लिहून ठेवले आहे. [४२]

## ६.३.२ डोंबारी

डोंबारी ही भटकी जमात असून पेशवेपूर्व काळापासून सामाजिक मनोरंजन करणारी म्हणून ती ओळखली जाते. कसरतीचा खेळ करुन लोकांचे मनोरंजन करण्याचे काम ते करीत.[४३] गावातील देवळाच्या पटांगणावर किंवा सार्वजनिक जागेवर त्यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत. सध्या त्यांची लोककला नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. खेळाला सुरुवात करण्यापूर्वी डोंबारी पुरुष मंडळी मोठे ढोल वाजवून कार्यक्रमाची वातावरण निर्मिती करतात. डोंबारी स्त्रीपुरुष ढोलाच्या तालावर वेगवेगळ्या अवघड  कसरती करुन लोकांचे चांगले मनोरंजन करतात. स्त्रिया लहान दोरीवरुन चालणे, लहान वर्तुळातून बाहेर पडणे यासारख्या कसरती करतात. लहान मुलाला झाडावरुन फेकून झोळीत पकडणे किंवा त्याला उंच झाडाला झोके देणे ही थरारक कसरत मुलांच्या मदतीने करतात. पुरुष मंडळी तर पोलादी गज हाताशिवाय गळ्यास लावून वाकविणे, उंच काठीवर उभे राहणे व चालणे, दातावर मोठे ओझे तोलणे व लहानशा वर्तुळातून स्त्रीपुरुष बाहेर पडणे अशा जीवावर उदार होऊन कसरती करतात. त्यामुळे गावातील लोकांचे मनोरंजन होत होते आणि डोंबाऱ्याला धान्याच्या रुपामध्ये मोबदला दिला जात होता.

## ६.३.३ गोपाळ

गोपाळ लोक स्वत:ला हनुमानाचे वंशज मानतात आणि ते रामभक्त म्हणून ओळख सांगतात. [४४] चारपाच लोकांचा समुह करुन ते गावोगावी फिरुन लोकांचे मनोरंजन करत असत. ज्या गावात खेळ करावयाचा आहे त्या गावच्या पाटलाची परवानगी काढून ते दुसऱ्या दिवशी खेळ करत. गावातून ढोल आणि डफ वाजवित फेरी मारुन गोपाळ आल्याची आणि रात्री गावामध्ये कार्यक्रम होणार असल्याची वार्ता सांगत. मंदिराच्या समोरील पटांगणात किंवा सार्वजनिक जागेवर त्यांच्या खेळाचा कार्यक्रम होत असे. कार्यक्रमाची सुरुवात करताना ते हनुमानाची वेशभुषा करुन प्रेक्षकासमोर येतात. त्यावेळी त्यांनी कमरेला लंगोटी, पाठीमागे शेपटी, हातात गदा, पायात वाकी, गळ्यात रामाची मूर्ती व अंगावर रंगीबेरंगी ठिपके दिलेले

असतात. त्यांच्या खेळाची सुरुवात नमनाने होत असून राम-लक्ष्मणाला वंदन करुन ते कार्यक्रम सुरु करतात. त्यावेळी पुढीलप्रमाणे नमन म्हणतात.

करितो रामाला वंदन, करितो रामा वंदन
राम लक्ष्मण गुणी, संगे देवी जानकी
भक्त हो त्याचा हनुमान, आम्ही करितो सारे वंदन ।। [४५]

अशाप्रकारचे गीत गाऊन राम, लक्ष्मण व हनुमान यांच्या पराक्रमाचे वर्णन करुन त्यांना वंदन करुन ते आपला खेळ सुरु करीत. त्यांचे खेळ म्हणजे उंच झाडावरुन किंवा मंदिरावरुन उडी मारणे, उडी मारताना स्वत:भोवती दोनतीन वेळा फिरणे, लहान अकाराच्या गोलातून किंवा चौकटीमधून स्पर्श न करता उडी मारणे, पेटत्या गोलातून किंवा चौकटीमधून स्पर्श न होता उडी मारणे असे रोमांचकारी खेळ करुन ते दाखवत. त्यामुळे गावातील लोक त्यांचा खेळ पाहण्यासाठी उपस्थित रहात. खेळ करताना ते अधूनमधून गाणी म्हणत. विविध प्रकारच्या कवायती व कसरती करण्यामध्ये हे लोक अतिशय तरबेज होते. त्यांनी केलेल्या खेळाबद्दल लोक त्यांना रोख बक्षिस आणि धान्य देत असत. काळाच्या ओघामध्ये या खेळाचे अस्तित्व आता संपण्याच्या मार्गावर आहे.

## ६.४ प्राण्यांच्या मदतीने केले जाणारे सामाजिक मनोरंजन

विविध पाळीव व जंगली प्राण्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत लोकांचे मनोरंजन करण्याची पध्दत भारतात प्राचीन काळापासून प्रचलीत होती. पेशवेकाळातही सामान्य लोकांच्या मनोरंजनासाठी कांही कलावंत जातीचे लोक वंशपरंपरागत असा व्यवसाय करणारे होते. त्यामध्ये नंदीबैलवाला किंवा पांगुळ, अस्वलवाला, वाघवाला, माकडवाला, गारुडी इत्यादींचा समावेश होता. सुगीच्या दिवसात हे लोक आपल्या प्राण्यासह गावोगावी फिरुन प्राण्यांचे खेळ दाखवत. त्याचा मोबदला त्यांना धान्य व पैशाच्या स्वरुपात मिळत होता. छत्रपती शाहू व पेशव्यांनी देखील सरकारमार्फत अनेक प्रकारच्या प्राण्याचे पालन शिकारखाण्यात करुन त्यांना प्रशिक्षित केले होते. त्यांचा उपयोग कसरतीच्या कार्यक्रमासाठी व इतर कारणासाठी केला जात होता. सण-समारंभानिमित्त व पाहुण्यांच्या स्वागताकरिता या प्राण्यांच्या कसरती आयोजित केल्या जात

होत्या. सामान्य जनतेचे व राज्यकर्त्यांचे प्राण्यांच्या मदतीने पुढील प्रमाणे मनोरंजन केले जात होते.

### ६.४.१ पांगुळ किंवा नंदीबैलवाला

सार्वजनिक ठिकाणी नंदीबैलाच्या साहाय्याने खेळ करणारा नंदीवाला हा एक प्रमुख कलावंत होय.[४६] सुगीच्या दिवसामध्ये आपल्या कुटुंबासह नंदीला घेऊन ते भटकंतीवर निघतात. नंदी हे महादेवाचे वाहन असल्यामुळे लोकांकडून नंदीबैलवाल्याचे चांगले स्वागत होते. डोक्यावर गुलाबी रंगाचा फेटा, पाठीवर सेमला, अंगात अंगरखा, कंबरेला धोतर, त्यावर बांधलेला शेला, गळ्यात अडकवलेला ढोलक व एका हातात धनुकली असा त्याचा पोशाख असतो. नंदीवाल्याप्रमाणे त्याचा नंदीही चांगला सजविलेला असतो. त्याची रंगविलेली शिंगे, त्यांना घातलेल्या पितळी शेंब्या व बांधलेले गोंडे, अंगावर टाकलेली रंगीत झूल, त्यावर दान मिळालेले कपडे, गळ्यात घागऱ्यांची माळ, पायात झांजरे व कपाळावर महादेवाचा टाक यामुळे तो अतिशय सुंदर दिसतो. त्याचा खेळ पाहण्यासाठी अबालवृध्दांची गर्दी होत असे.

नंदी बनविण्यासाठी निवडलेल्या गोऱ्हाला दोन दात आल्यानंतर त्याचा विधी केला जातो.तोपर्यंत त्याला शिक्षण दिले जाते. नंदी बनण्याचा विधी केल्यानंतरच त्याला खेळ करण्यासाठी व भिक्षा मागण्यासाठी बाहेर काढले जाते. ज्यावेळी नंदीचा विधी केला जातो त्यावेळी महादेवाच्या मंदिरासमोर त्याचा पहिला खेळ होतो. नंदीवाल्याचा खेळ म्हणजे एकप्रकारचे पथनाट्य असते. संगीत वाद्याच्या तालावर नंदी वेगवेगळ्या कसरती करुन लोकांचे मनोरंजन करतो. त्यामध्ये नंदीचा नाच, त्याचे रुसणे, मालकाच्या पोटावर चारही पाय ठेऊन उभे राहणे, गळ्यातील घागरमाळेचा आवाज होऊ न देता धावणे अशा कसरतींचा समावेश असतो. मराठी लोकसंस्कृतीत नंदीवाल्याच्या खेळातून घडणारा कलाविष्कार हा आगळावेगळा असून सामाजिक मनोरंजनाच्या पारंपरिक साधनांत त्याचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.पांगुळ भल्या पहाटे गावात येऊन एखाद्या झाडावर चढून बसतो आणि गाणी गातो. त्या गाण्यामधून लोकांना दान करण्यासाठी पुढीलप्रमाणे आवाहन करतो.

अरे! कोणी आपल्या वडिलांच्या नावानं
रामप्रहरामध्ये धर्म करा!
कोणी आपल्या देवाधर्माच्या नावानं वस्त्रदान करा!
कोणी पुण्य जोडण्यासाठी पांगुळाला पै-पैसा दान करा![४७]

अशाप्रकारची गीते गाऊन दानधर्म करणाऱ्याचा उध्दार करण्याचे व त्याचे भविष्य कथन करण्याचे काम करतो. त्यामुळे दानधर्म करणारी व्यक्ति संतुष्ट होत असे.वासुदेव आणि पांगुळ यांच्या दान मागण्याच्या पध्दतीमध्ये साम्य आढळते. कोकणामध्ये नंदीबैलवाल्याला पांगुळवाला असे म्हणतात. [४८] कोकणातील ठाकर समाजातील लोक हा नमुनेदार कलाप्रकार गावोगावी सादर करुन लोकांचे मनोरंजन करतात. त्यांनी नंदीबैलाची रंगीबेरंगी वस्तूंच्या सहाय्याने केलेली सजावट लोकांचे चित्त वेधून घेणारी असल्यामुळे कोकणामध्येही हा लोककला प्रकार समाजाचे मनोरंजन करण्यासाठी फार उपयुक्त ठरला आहे. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून आढळणारी पांगुळ ही संस्था क्षीण झालेली आढळते.

## ६.४.२ दरवेशी

दरवेशी लोक हे मुस्लीम धर्मीय असून ते जंगली प्राण्याद्वारे लोकांचे मनोरंजन करतात. त्यांच्यामध्ये अस्वलाचा खेळ करणारे अस्वलवाले व वाघांचा खेळ करणारे वाघवाले म्हणून ओळखले जात. पेशवेकाळात कांही दरवेशी हे दोन्हीही प्राणी त्यांच्या ठरलेल्या गावी नेऊन लोकांचे मनोरंजन करत असत. त्यांच्या वतनाबद्दल वाद निर्माण झाल्यामुळे पुढील अज्ञापत्र काढण्यात आले होते.

१) एकूण तर्फे साहा सु।। सलास असेरीन व अलफ शेख रुस्तम वा। शेख दावल शेख इमाम वा। येऊन विदित केले की तर्फ निमारचे गावगना वाग आसवले आपण घेऊन जातो त्यास दर गावी दर घरास दरसाल दोन पैसे प्रमाणे भिकणे व वोझे यास हजीरी बेगारी व रात्री चौकी या प्रा। वतनाची चाल चालत आली. आलीकडे गावगना दिकत करितात येविसी ताकीदपत्र दिले पाहिजे (म्हणोन) त्याजवरुन सेख रुस्तम रखेसी याजवळ मागील सरकारची ताकदी पत्रे आहेत ती पाहोन हे आज्ञापत्र सादर केले आसे तर पूर्वीपासून चालत आले असेल त्या प्रा। दर गावी दर

घरास दरसाल दोन पैसे प्रो देत जाणे व पोटास भाकरी व वझ्यास हजरी व चौकी पहारा करीत जाणे फिरते दरवेशी कोन्ही आल्यास त्यास भीक न देणे जाणिजे.[४९]

या आज्ञापत्रावरुन पेशवेकाळात खेडेगावातील लोकांचे मनोरंजन करण्यासाठी दरवेशी लोक येत असल्याचे स्पष्ट होते. त्यांना नेमून दिलेल्या गावामध्येच वतनाचा अधिकार प्राप्त होत होता. दुसरा दरवेशी गावात आल्यास त्याला भीक देऊ नये असे अज्ञापत्रात नमूद केले आहे. ते पुढीलप्रमाणे लोकांचे मनोरंजन करत असत.

## अ. अस्वलवाले

अस्वलवाले लोक जंगलातील अस्वलाला पकडून त्याला खेळ शिकवत.[५०] अस्वल हा जंगली प्राणी असला तरी त्याला लहान असताना पकडून वेसन घातली जाते. त्यानंतर त्याला मानसाळवून वेगवेगळे खेळ शिकवले जात. फुगडी घालणे, रुसण्याचे सोंग, राजाचे सोंग काढणे, नवऱ्याचे सोंग इत्यादी सोंगे काढून लोकांचे मनोरंजन करण्याचे काम ते करत. अस्वलवाले सुगीच्या दिवसात गावोगावी फिरुन लोकांना अस्वलाचा खेळ करुन दाखवीत व लोकांचे मनोरंजन करीत. त्याबद्दल त्यांना धान्यरुपाने किंवा पैशाच्या रुपाने कामाचा मोबदला मिळत होता.

## आ. वाघवाले

जिवंत वाघ लोकासमोर आणून त्याच्यामार्फत लोकांचे मनोरंजन करणारे लोक वाघवाले म्हणून ओळखले जात होते.[५१] सुगीच्या दिवसात अस्वलाप्रमाणे वाघ देखील गावोगावी फिरवून लोकांचे मनोरंजन केले जात होते. पेशवेकाळात राज्यकर्त्यांचे मनोरंजन करण्यासाठीही वाघाचे खेळ केले जात होते. तुळशीबागवाल्यांच्या खर्चामध्ये शके १७३४ मध्ये वाघ खेळवल्याबद्दल ८।।।.खर्च झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की ८।।।. चिरंजीव नाना पर्वतीस देवदर्शनास गेले तेथे वाघ खेळवले.[५२] इ.स.१८१३ मध्ये वैद्य यांच्या खर्चामध्ये वाघ घेऊन आलेल्या वाघ्यास किंवा वाघवाल्यास पैसे दिल्याची नोंद आढळते.[५३]

## इ. गारुडी

गारुडी लोक जीवंत साप पकडून त्यांचे खेळ व नजरबंदीचा खेळ करतात.[५४] पेशवेकाळातही सापापुढे पुंगी वाजवून त्याला डोलायला लावण्याचे काम ते करत होते. सापाच्या खेळाबरोबरच चमत्कार किंवा हातचलाखी करुन ते दाखवीत असल्यामुळे त्यांचा खेळ पाहण्यासाठी अजूनही गर्दी जमते. नाकातून दोरा काढणे, कानातून एखादी वस्तू काढणे, हातातील वस्तू गायब करणे असे ते खेळ करतात. हे खेळ म्हणजे गारुड्यांची जादू समजून लोकांचा त्याच्या खेळाला चांगला प्रतिसाद असतो. त्याचबरोबर गारुड्यालाही चांगले बक्षिस आणि धान्याच्या रुपामध्ये चांगला मोबदला मिळत होता. आता अशा कलेची कदर करणारे लोक कमी होत चालल्यामुळे आणि त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटत नसल्याने गारुडी लोक आपल्या पारंपरिक व्यवसायापासून दूर चालले आहेत.

## ६.४.३ राज्यकर्त्यांचे प्राण्यामार्फत होणारे मनोरंजन

शाहूमहाराजांच्या आगमनापासून विविध विलासांचा व शौकिपणाचा उगम महाराष्ट्रात झाला. [५५] त्यावेळी महाराष्ट्रातील लोक घोडा व कुत्रा हे दोन प्राणी मोठ्या प्रमाणात पाळत. या प्राण्यांची विविध कारणासाठी लोकांना गरज होती. मात्र शाहूने या प्राण्यांबरोबरच इतर अनेक प्राणी भारत व भारताबाहेरुन आपल्या शिकारखान्यात आणले. शिकारीसाठी चांगली कुत्री व घोडी त्यांने जशी मिळविली होती तशी मनोरंजनासाठी अनेक पक्षी व प्राणी मिळविले होते. दरबारात येणाऱ्या लोकांच्या मनोरंजनासाठी त्यांची मदत होत होती. त्याच्या प्राणीसंग्रहात हत्ती, वाघ, चित्ते, बहिरी ससाणे, बदके, कबुतरे इत्यादिंचा संग्रह होता. त्यांची निगा राखण्यासाठी व प्रशिक्षणासाठी खास प्रशिक्षक नेमले होते. आपल्या शिकारखान्यात वनगाई, कस्तुरीमृग व हुमे हे प्राणी काश्मिरमधून मिळवण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केला होता. शाहुच्या मागणीनुसार वाघ किंवा वाघीण पाठविण्यासाठी अधिकारी व कारकुनांनी खूप प्रयत्न केले होते. छत्रपतींना देण्यासाठी मल्हारराव होळकराकडून चित्ता आणला होता.[५६] तो पाठविल्यावर त्याच्या खाण्यापाण्याची उत्तम व्यवस्था शाहूने केली होती. इ.स.१७४९ मध्ये शाहूमहाराज मृत्यू पावल्यानंतर सातारच्या गादीवर रामराजा आला. सुरुवातीला त्याने प्राणीसंग्रहाकडे फारशे लक्ष

दिले नाही. तो नाकर्ता निघाल्यामुळे सत्तेचे केंद्र साताऱ्याहून पुण्यास आले.त्याबरोबर साताऱ्यातील प्राणीसंग्रही 'जेथे सत्ता तेथे वैभव' या न्यायाने पुण्याला आला. [५७]

बाजीराव व चिमाजीअप्पा यांनी पुण्यामध्ये प्राणीसंग्रहाला प्रारंभ केला होता. बाजीरावाने पत्र पाठविल्यामुळे पुरंदऱ्यांनी साताऱ्याहून पुण्याला पाखरु पाठविले होते. ते पाठवितांना पाखरास तांदूळ कैली एक शेर पाठविले होते. [५८] यावरुन पक्षांची त्यावेळी किती काळजी घेतली जात होती याची जाणीव होते. नानासाहेबानेही सतत प्राणीसंग्रह वाढविण्यासाठी प्रयत्न चालविले होते. त्याच्या प्राणीसंग्रहावरील मुख्य अधिकारी त्रिंबक सदाशिव या नावाचा होता. नानासाहेबास कोणा मराठा सरदाराने तितर नावाचे वीस पक्षी पाठविले होते. त्यासोबत पाठविलेल्या पत्राचा मजकुर असा होता की, 'दंडवत विनंती उपरी-तितर सुमारे वीस पाठविले आहेत. घेऊन बागात सोडावे. काही श्रीमंताकडील वर्तमान आलें असल्यास लेखन करावे.......... तितर चार दिवाळीच्या बागात सोडले तरच राहतील व तमाशा दिसेल. रमण्यात सोडले तर दृष्टिस पडणार नाहीत.कलावे ही विनंती.'[५९] या पत्रामध्ये प्राणीसंग्रहाचा हेतू लेखकाने स्पष्ट केला आहे.त्याच्यामते पाठविलेली तितरे ही लोकांना पहाण्यासाठी आहेत. म्हणजेच त्यांच्याकडून लोकांच्या मनोरंजनाची अपेक्षा आहे. म्हणून त्याने तितरांना ठराविक जागेत सोडावित म्हणजे त्यांचा तमाशा दिसेल असे म्हटले आहे. नानासाहेबाच्या काळात पेशव्यांचा प्राणीसंग्रह एकापेक्षा अनेक ठिकाणी असल्याचेही या पत्रामधून स्पष्ट होते. माहुलीचा किल्ल्यावरील किल्लेदाराला त्या परिसरातील पशुपक्षी पकडून पाठविण्याची आज्ञा केली होती. नानासाहेबाच्या काळात पेशव्यांचा शिकारखाना अतिशय मोठा झाला असून त्यामध्ये अनेक अधिकारी काम करीत होते. इ.स.१७५४ च्या नोंदीनुसार शिकारखान्यात २३ हरणबाज किंवा खबुतरबाज, ४ मीरसिकार, ५ वाघवान, २ पायेदामी, ३ शहागोशवाले, ९ अवांतर, २ फदाईतवाले इत्यादींची नेमणूक करण्यात आली होती. त्यांना दिडमहा ३ ते ७ रुपये आणि फदाईतवाल्यांना मात्र ७ ते १० रुपये पगार दिला जात होता. माधवरावाच्या काळात पेशव्यांचा प्राणीसंग्रह वाढल्यानंतर रामराजालाही आपल्याकडे प्राणी असावेत असे वाटू लागले. त्यामुळे त्याच्या मागणीप्रमाणे माधवरावाने पुण्याहून साताऱ्याला प्राणी पाठविले होते. माधवरावाने रामराजास पाठविलेल्या एका वाघाला रोज तीन शेर मांस दिले जात असून त्यावेळी मांसाचा भाव रुपयास सहा शेर इतका होता.

माधवरावाप्रमाणेच राघोबादादाने आनंदवल्लीस रहावयास लागल्यावर तिथे आपल्यासाठी वेगळा शिकारखाना तयार केला होता. शिकारखान्यातील जनावरे जिवंत आहेत तोपर्यंत ती मनोरंजन करतात व मेल्यानंतर त्यांच्या अवयवांचा विविध कारणासाठी उपयोग केला जात होता. [६०]

पेशवेकाळात हत्तींची झुंज पाहणे हा राज्यकर्त्यांचा आवडता छंद होता. [६१] त्याकरिता हत्तींना खास प्रशिक्षण दिले जात होते. इ.स. १७५९ मध्ये विल्यम प्राईस हा मुंबईमधील ब्रिटीश शासनातील एक सदस्य पुण्यास आला होता. त्याने आपल्या रोजनिशीमध्ये लिहून ठेवले आहे की, ''रविवारी तीस तारखेला नानासाहेब उर्फ बाळाजी बाजीराव पेशव्याने मला निमंत्रण धाडले. त्यात त्यांनी शहराबाहेरच्या एका तंबूत येण्याविषयी कळविले होते. या तंबूत मी गेलो तिथे त्याने मला हत्तीच्या झुंजी पाहावयास लावून माझे चांगलेच मनोरंजन केले. या झुंजी जवळ जवळ तीन तास चालल्या होत्या.'' इ.स.१७९१ मध्ये मेजर प्राईस याने पुण्याला भेट दिली होती. त्यावेळी त्याने पुण्यातील पेशव्यांचा प्राणीसंग्रह ही आपल्या चिरंतन स्मरणात राहणारी गोष्ट आहे असे नमुद केले आहे. तेथील सिंह, गेंडा, वाघ व इतर प्राण्यांची चांगली जोपासना केली जात असल्याचे विस्तृत वर्णन केले आहे. [६२] या प्राणीसंग्रहातील हरिणे आणि काळविटांना संगीताच्या तालावर डुलण्याची शिकवण दिली होती. तसेच प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी ती झोपाळ्यावर झोप घेत असत. इ.स.१७९२ मध्ये श्रीमंत माधवरावांनी ब्रिटीश रेसिडेंट सर चार्ल्स मॅलेट यांचे जे मनोरंजन केले त्याचा वृत्तांत त्याने पुढीलप्रमाणे लिहून ठेवला आहे.

''पेशव्यांनी मला अपूर्व देखावा पाहण्यासाठी आमंत्रित केले होते. हा देखावा पर्वतीच्या पायथ्याला असलेल्या खास बागेत म्हणजेच रमण्यात होता, पुण्यापासून सुमारे चार मैलावर. मी दुपारी दोन वाजता माझे कांही मित्र व लवाजमा घेऊन निघालो आणि लवकरच तिथे पोहचलो, तेंव्हा तिथे एक भव्य शामियाना उभारला होता. आमचे दारावरच कांही मातब्बर सरदारांनी स्वागत केले. त्यानंतर आम्ही सर्वजण शामियान्यात जाऊन भारतीय बैठकीवर बसलो. त्यानंतर थोड्या वेळाने श्रीमंत सवाई माधवरावांची स्वारी आली. त्यावेळी चार सुरेख व अंगाने भरलेली गोंडस काळविटे शाही थाटात हळुवारपणे शामियान्याकडे येत होती. त्यांच्यामागे घोडेस्वारांचे अर्धवर्तुळ पथक संरक्षणार्थ कड्यासारखे केले होते. प्रत्येक घोडेस्वाराच्या हातात लाल रुमाल बांधलेली लांब काठी होती. काळविटे शामियान्याजवळ येताच ताशे, वाजंत्री, चौघडे, नौबती

इत्यादी वाद्ये जोराने वाजू लागली. चार काळविटापैकी तीन काळविटे मंद गतीने आत शिरली. पेशव्यांच्या बैठकीसमोर भारतीय करमणुकीसाठी वापरतात तसे दोन झोपाळे बांधले होते. पेशव्यांच्या प्रवेशाबरोबर वाद्यांचा कर्कश आवाज थांबविण्यात आला आणि सनई व तबला ही सौम्य वाद्ये सुरु झाली. त्यांच्या सुरात प्रत्येकी एक काळवीट तेथील झोपाळ्यावर बसले आणि उरलेल्यापैकी एक पाय दुमडून ऐटीत समोर बसले; मात्र जे लाजरे-बुजरे मागे रेंगाळत होते, तेही नंतर पुढे येऊन त्याच पध्दतीने गवताची काडी चघळत बसले; त्यानंतर वाद्यांचा आवाज कमी करण्यात आला. त्याक्षणी नृत्यांगणांचा एक संच आत आला अणि सौम्य मंजुळ सुर-संगीताच्या साथीत त्यांनी काळविटांसमोर नृत्य सादर केले. त्यावेळी झोपाळ्यावर काळविटांना झोके देण्यात आले. काळविटे गवताची काडी चघळत शांतपणे व समाधानाने बसली होती. त्यांच्यात कोणतीही चलबिचल नव्हती. अशा पध्दतीने मनोरंजनाचा कार्यक्रम चालू होता. पेशव्यांनी थांबण्याचा इशारा देईपर्यंत नृत्य चालू होते. नृत्य थांबताच काळविटे उठली. हार घालून त्यांचे कौतुक करण्यात आले आणि नंतर ते चार प्राणी हळूहळू शामियान्यातून एकत्र बाहेर पडले.'' [६३]

## ६.५ शरीर कमविणे, खेळ व व्यायामाद्वारे होणारे मनोरंजन

पेशवेकाळात शिक्षणाचे लष्करी शिक्षण, व्यावहारीक शिक्षण व धार्मिक शिक्षण असे तीन प्रमुख विभाग होते. लष्करी शिक्षण देणाऱ्या शाळा व पुस्तके त्यावेळी उपलब्ध नव्हती.या शिक्षणामध्ये मल्लविद्या व युध्दोपयोगी हत्याराचा वापर यांचे शिक्षण दिले जात होते [६४] मल्लविद्येमध्ये जोर, बैठका, सूर्यनमस्कार, मल्लखांब, लेझीम, वज्रमुष्टी, वजन (गुंड) उचलणे या व्यायामाचा समावेश होता. घोड्यावर बसणे, तलवारबाजी, भालाफेक, दांडपट्टा इत्यादींचे शिक्षण चांगला सैनिक तयार करण्यासाठी दिले जात होते. हे शिक्षण देण्यासाठी चांगले प्रशिक्षक नेमले जात होते. गावागावातील तालमीमध्ये अनुभवी व्यक्तिवर ही जबाबदारी सोपविली जात होती. त्यामुळे शरीर कमविणे, खेळ व व्यायाम याला अतिशय महत्व प्राप्त झाले होते. समाजाच्या सर्व थरातील लोक या खेळामध्ये सहभागी होत असल्यामुळे त्यामधून लोकांचे चांगले मनोरंजन झाले. स्वत: राज्यकर्त्यांना या खेळाची आवड असल्यामुळे या खेळांना उत्तेजन मिळाले. विविध सण-समारंभ प्रसंगी व दरबारात आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी राज्यकर्ते

या खेळांचे आयोजन करत असत. तसेच गावातील यात्रा व सणसमारंभ या निमित्तानेही अशा खेळांचे आयोजन गावागावामध्येही केले जात होते. लोकांचे मनोरंजन करणाऱ्या या खेळांचा विकास पेशवेकाळात पुढीलप्रमाणे झाला होता.

## ६.५.१ कुस्ती

पेशवेकाळातील सर्वात लोकप्रिय खेळ म्हणजे कुस्ती किंवा मल्लविद्या हा होय. पेशवेपूर्व काळापासून हा खेळ महाराष्ट्रात उदयास आला होता. मात्र पेशवेकाळात या खेळाचा खूपच विकास झाला. मराठ्यांचा छत्रपती शाहू व पेशवे यांना कुस्तीची अतिशय आवड होती. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व चिमाजीआप्पा यांना युध्दकलेचा व मर्दानी खेळाचा शौक होता मात्र त्यांच्या कुस्तीच्या शौकाची फारशी माहिती मिळत नाही. चिमाजीआप्पाच्या कुस्तीच्या शौकाबद्दल एका पोवाड्यात उल्लेख आला आहे. पोवाडा जरी निंदात्मक असला तरी पेशवाईवरील या पोवाड्यात तिघांच्या शौकाची माहिती पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

थोरले ते तप करिती जानव्ही-काठी । (अमृतराय)
मधल्यांच्या भोवती असे ती बायकांची दाटी । (बाजीराव)
धाकटे लाविती कुस्त्या पाळुनिया जेठी। (चिमाजी आप्पा)
करोनिं ऐसे ढंग त्यांनी हो राज्य लाविली काठी ।। [६५]

वरीलप्रमाणे जरी पोवाड्यात वर्णन असले तरी नानासाहेब, भाऊसाहेब, राघोबादादा, विश्वासराव, माधवराव व बाजीराव यांच्या कुस्तीशौकाची माहिती अनेक समकालीन कागदपत्रात मिळते. त्यांनी जसे आपल्या दरबारात कलाकारांना आश्रय दिला होता तसाच पैहिलवानांनाही दिला होता. दुसरा बाजीराव हा जसा ख्यालीखुशाली व रंगढंगामध्ये मश्गुल होता तसाच पहिलवान पदरी बाळगून कुस्तीचा शौक करणारा होता. त्याने आपली ही हौस ब्रम्हवर्तास गेल्यावरही कायम चालू ठेवली. त्याच्या पदरी बालंभट्ट नावाचा प्रख्यात पहिलवान होता. त्याने लखनौचा नबाब वजीद अल्लीशहा याच्याकडून आलेल्या एका गर्विष्ठ पहिलवानाचा गर्व एका क्षणात परिहार केला होता. [६६] बाळभट्टाप्रमाणेच सिद्दी, बडा हरि व छोटा हरि असे तीन प्रसिध्द पहिलवान त्याच्याजवळ होते. पहिलवान तयार करणे ही अतिशय खर्चिक बाब होती. त्यामुळे

श्रीमंत लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या मदतीवर त्यावेळी अनेक पहिलवान तयार होत होते. कांही पहिलवांनांना सरकारी तिजोरीतून पगार (रोजमारा) दिला जात असे.२५ सप्टेंबर १७३४ रोजी दोन पहिलवानांना १३ रुपये मासिक रोजमारा दिल्याची नोंद आहे. [६७] त्यापैकी एकाला ७ रुपये व दुसऱ्याला ६ रुपये असा रोजमारा होता.त्यामध्ये समानता नाही त्यावरुन पहिलवानांच्या कामगिरी नुसार त्यांचा रोजमारा ठरत असल्याचे स्पष्ट होते. राज्यकर्त्यांच्या पदरी असणाऱ्या पहिलवानांना चांगला खुराक देण्याची व्यवस्था केली जात होती.[६८] त्यामुळे सामान्य कुटुंबातील मुलांना कुस्तीकडे वळता येत होते. पेशवे दरबारात कुस्तीला मानसन्मान मिळत गेल्यामुळे ब्राम्हण समाजातही कुस्त्यांचा शौक निर्माण झाला. नरसोबा पंतोजी नावाच्या ब्राम्हणाने इ.स.१७६५ मध्ये पेशव्यांच्या वाड्यामध्ये कुस्ती केली होती. सामान्याबरोबरच श्रीमंतांची मुले देखील कुस्ती खेळत असत. कुस्तीचा सराव करण्यासाठी तालमीमध्ये हौदा तयार करुन त्यामध्ये लाल माती आणून टाकत. [६९] स्वत: पेशव्यांना व त्यांच्या सैनिकांनाही व्यायाम व कुस्तीची आवड होती. त्यामुळे त्यांच्या सैन्याचा जिथे तळ असे तेथेही आखाडा तयार करुन ते व्यायाम करीत. खर्ड्याच्या लढाईहून विजयी होऊन परत आलेल्या फौजेच्या विजयी मिरवणुकीचे वर्णन करताना शाहीर प्रभाकर म्हणतो -

पाहुन पूर्वापार शिरस्ते । भवानी पेठेपासुनी रस्ते ।
दिपोस्तव शोभती दुरस्ते । शृंगारून गज तुरंग बस्ते।
शहरामाजी पदार्थ सस्ते। पहिलवान आणि जेठी मस्ते।
खुराक त्यांना बदाम पिस्ते। सदा जिलीबींत चालती।।[७०]

थॉमस ब्राऊटन हा १८०९ मध्ये दौलतराव शिद्यांच्या सैन्याबरोबर 'कमांडर ऑफ दि रेसिडेन्स एस्कॉर्ट ॲट दि कोर्ट ऑफ शिंद्या' या हुद्दयाने फिरत होता. त्यावेळी सैन्यातील सामान्य शिपाई देखील आपल्या तालमीच्या शौकामध्ये खंड पडणार नाही याची ते कशी काळजी घेत होते याचे वर्णन केले आहे. तो आपल्या एका पत्रात लिहितो की, ''सर्व हिंदुस्थानातील लोकांना तालमीचे किंवा कसरतीचे अगदी वेडच आहे म्हटले तरी चालेल. आखाड्यात त्यांचे कांही नियम आणि समारंभ ठरलेले असतात आणि ते अत्यंत कसोशीने पाळण्यात येतात. खडक नसलेली अशी मऊ मातीची ऐसपैस जागा, शक्य झाली तर झाडाच्या सावलीखाली निवडून, ती

खणून, त्यातला खडानखडा वेचून काढून ती भुसभुशीत करण्यात येते. अशा जागेला ते आखाडा म्हणतात. ते तो फार पवित्र मानतात. त्याच्याजवळ जोडा आणू देत नाहीत. त्याच्या एका टोकास मातीचा एक ओटा तयार केला जातो. तालमीत येणाऱ्या प्रत्येकाने ओट्याला मुजरा करुन मूठभर माती वहावयाची असते. तालमीत येणाऱ्या सर्व तालीमबाजात जो विशेष सरस आणि लढाऊ पठ्ठा असेल त्याला त्या मोसमापुरता आखाड्याचा 'खलिप' नेमण्यात येत असे. खलिप म्हणजे व्यवस्थापक आणि शिक्षक. त्याने आखाड्याची झाडलोट करविणे, कुस्ती वगैरे खेळ शिकविणे ही कामे करावयाची. आखाड्यातल्या प्रत्येकाचा लंगोट कसलेला असतो आणि विशिष्ट जातीची पांढरी माती अंगाला फासलेली असते. पहिला व्यायामाचा प्रकार म्हणजे दंड. दुसरा व्यायाम कुस्ती. हिंदुस्थानातले लोक या कलेत अत्यंत प्रविण आहेत. कुस्तीत अर्थात निव्वळ शक्तीपेक्षा कौशल्यावरच अधिक भर असतो. दंड-कुस्तीनंतर दुसरे दोन व्यायाम प्रकार म्हणजे मुगदळ आणि लेझीम.'' [७१] या पत्रामध्ये पुढे त्याने व्यायाम कसा केला जात होता व पहिलवान कसा तयार होत होता याचे वर्णन केले आहे.

अशाप्रकारे तयार झालेले पहिलवान कुस्ती करुन लोकांचे मनोरंजन करत होते.त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना रोख बक्षिस दिले जात होते. आनंदराव नावाचा पहिलवान नानासाहेबाकडे होता. एकदा नानासाहेब साताऱ्यात असताना शाहू छत्रपतीकडे कांही जेठी आव्हान देऊन आले. तेव्हा नानासाहेबाने आनंदरावाला त्या जेठीबरोबर लढविले. त्यात आनंदरावाने कुस्तीत जेठी जिवे मारीला. म्हणून शाहूने खूष होऊन आनंदरावाला जमीन इनाम दिली. [७२] पेशवे देखील कुस्ती करणाऱ्या पहिलवानांस मोठे बक्षिस देत असत. इ.स.१७५४ मध्ये लच्छा व कन्हैया या दोन पहिलवानांना कुस्ती केल्याबद्दल २५ रुपये बक्षिस देण्यात आले होते.तर याचवर्षी येगा जेठी याला ७५ रुपये बक्षिस दिल्याची नोंद आढळते. इतर कांही पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतात -

१. खमसखमसेन रमजान छ.२० खर्च जामदार इनाम देणे पहिलवान कुस्ती लढ, सबब रसानगी चिठ्ठी आसामी २ दर आसामी आंख २४.
२. इनाम देणे सदू पाथरवट पहिलवान यांस कुस्ती लढला, सबब रसानगी चिठ्ठी आं ३०.

या पत्रावरुन असे लक्षात येते की, छत्रपती व पेशवे कर्तबगार पहिलवानांचा यथोचित सन्मान करत होते. कांहीवेळी दोन्ही पहिलवान समतुल्य असतील तर त्यांची कुस्ती बराच वेळ चालल्यानंतर सोडविली जात असे. त्यावेळी दोन्ही पहिलवानांना बक्षिस मिळत होते. इ.स.१७८६ मध्ये सवाई माधवरावापुढे होळीच्या दिवशी आबाजी व इश्रा या दोन जेठींची कुस्ती लावण्यात आली होती. त्यांची लढत दोन घटका झाल्यानंतर सोडविण्यात आली. दौलतराव शिंदेला पहिलवानांचा फार शौक असल्याचे थॉमस ब्राउटनने लिहिले आहे. त्याच्याजवळच्या पहिलवानास दररोज एक बकरे व दहा शेर दुध इतका खुराख देत होता.हे वर्णन जरी अतिशयोक्तीचे असले तरी त्यावरुन लक्षात येते की तो पहिलवानास भरपूर खुराक देत होता. त्याच्या या मराठा पहिलवानाने एका मथुरेच्या पहिलवानास चीत मारले. त्याब-ल दौलतरावाने तिथेच ५०० रुपयाचे कडे पहिलवानाच्या हातात घातले. मराठ्यांच्या लहानथोर सरदारापासून छत्रपतीपर्यंत प्रत्येकाला पहिलवान बाळगणे भूषण वाटत होते. त्यांची पहिलवानांवर इतकी खुषमर्जी होती की, वेळप्रसंगी ते पहिलवानांना वापरण्यासाठी हत्तीघोडे देखील देत होते. मोरो अप्पाजीच्या एका पत्रामध्ये कर्नाटकातून आलेल्या तीन जेठीबरोबर पुण्यातील पहिलवानांच्या कुस्त्या झाल्याचे कळविले आहे. त्यामध्ये मखवा गौळी व कल्ल्या गौळी या दोघांनी दोन पहिलवानांना चित केले व कर्नाटकातील एका जेठीने आबाजी सुतारास चित केले असे म्हटले आहे. [७३] यावरुन त्यावेळी बाहेरील प्रांतातून पहिलवान आणून त्यांच्या कुस्त्या लावल्या जात होत्या आणि सामान्य गवळी व सुतार कुटुंबातील लोकांनाही कुस्तीचा छंद होता हे स्पष्ट होते. या प्रमुख कुस्त्या पार पडल्यानंतर कांही स्थानिक पहिलवानांच्या कुस्त्या झाल्याचे मोरो अप्पाजी म्हणतो.

राघोबादादाने जनार्दन बाजीरावास पाठविलेल्या एका पत्रात लिहले आहे की, 'महंमद हुसेन याची व ढोल्याची झोंबी लावावी.आज नानापाशी मी बोललो की, महंमद हुसेन पाडील. त्यास तीर्थरुप राजश्री भाऊस सांगून झोंबी लावून कोण पाडतो कसे होते ते सविस्तर लिहावे. सत्वर झोंबी लावावी. तीर्थरुपास कागद वाचून दाखवून कसे होते ते लिहिणे हे आशिर्वाद.' या पत्रावरुन तत्कालीन लोकांना कुस्तीबद्दल किती आतुरता होती याची कल्पना येते. बऱ्याचवेळा एखादा पहिलवान हमखास कुस्तीमध्ये यश मिळवेल असा त्यांना विश्वास वाटत असे. त्यामुळे

अशा पहिलवानावर ते पैज देखील लावत होते. राघोबादादाचेच याबाबतचे एक पत्र असून त्यामध्ये तो भाऊसाहेबास लिहितो की, 'तीर्थरुपाची आमची पैज पडली आहे. तरी महंमद हुसेनची झोंबी लावावी.'[७४]

पुरुषाप्रमाणेच पेशवेकालीन कांही स्त्रीयांनी देखील पहिलवांनी पेशा स्विकारलेला होता.[७५] त्यांनी वस्तादांकडून शिक्षण घेऊन आपले शरीर कुस्तीसाठी कमावले होते. आपले शरीर तंदुरुस्त ठेऊन त्या गावोगावी कुस्त्या मारण्यासाठी फिरत. त्यावेळी स्त्री-पुरुष पहिलवानांच्याही कुस्त्या लावल्या जात होत्या. कांही स्त्रिया ह्या अतिशय तरबेज असल्यामुळे त्यांच्याबरोबर कुस्ती धरण्यासाठी नावाजलेले मल्लही घाबरत असत. कारण जर स्त्रीकडून पराभूत झालो तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही या भीतीने ते स्त्रियांशी कुस्ती खेळणे टाळीत असत. शिंद्याच्या लष्करातील मेजर थॉमस ब्राऊटन याच्या रोजनिशीमध्ये स्त्रीमल्लांबद्दल असे लिहले आहे की, "The act is sometimes practiced by women, who study to make their bodies hardy and their flesh firm. These amazons sometimes attain to such a degree of proficiency that it is rare for the most experienced of their male opponents to over-throw them. The best wrestlers often decline engaging in these contests from the fear incurring the disgrace of being worsted by women." [७६]

## ६.५.२ वज्रमुष्टी

पेशवेकालीन खेळामध्ये वज्रमुष्टी हा अत्यंत आवडता खेळ असून त्यामध्ये मुष्टीयुध्द व मल्लयुध्द यांचे मिश्रण असे. जे खेळाडू या क्रीडाप्रकारात सहभागी होत, त्यांना जेठी असे म्हणत. खासकरुन श्रीमंत वर्ग व राज्यकर्त्यांच्या मनोरंजनासाठी त्यांची झोंबी लावली जात असे. पेशवेकाळात जसे कुस्ती करणारे पहिलवान होते तसेच वज्रमुष्टीत पटाईत असणारे जेठी देखील होते. सर चार्ल्स मॅलेट व त्याच्या सहकाऱ्यांना या खेळाची अतिशय आवड असल्याने तो ते पाहण्यासाठी खास करुन राजवाड्यावर हजर राहत असत. त्यापैकी मेजर प्राईस याने आपल्या रोजनिशीत या खेळाचा वृत्तांत पुढीलप्रमाणे लिहून ठेवला आहे.

''या खेळाडुविषयी (मुष्टियोध्दे) आणि त्यांच्या खेळाविषयी मला असे म्हणावे वाटते की, या खेळासाठी नेहमी एक वर्तुळाकार सात फूट खोल हवदा खणीत, त्याच्या बाजू जमिनीशी

काटकोनात असत व त्याचा परिघ साधारणत: तीस फूट असे. हौद्याच्या तळात माती घालीत. जेठी लंगोट हे तोकडे वस्त्र सोडल्यास जवळजवळ नग्न असत. त्यांच्या हातांच्या बोटात नखांचा आकार दिलेले शिंगापासून बनविलेल्या मुठी असत. या क्रीडाप्रकारात कुस्ती व वज्रमुष्टी या दोन्हींचा अंतर्भाव असे. या खेळाडूंना योग्यप्रकारे आणि काळजीपूर्वक प्रशिक्षण दिलेले या प्रसंगी दृष्टोत्पत्तीस आले. पेशवे हे दृश्य पाहून अतिशय आनंदीत झालेले दिसले. शिवाय मुष्टीयोध्दे ज्यावेळी पेशव्यांचा उल्लेख 'दख्खन का बादशहा ' असा पुकारा देऊन मुजरा करीत, त्यावेळी ते बेहद खुश होत. या सुमारास पेशवा वीस वर्षाचा असावा, पण तारुण्याने मुसमुसलेले त्याचे व्यक्तिमत्व अतिशय आकर्षक होते.'' [७७]

सवाई माधवरावाच्या काळात गोविंद जेठी, मीना जेठी आणि तिम्मा जेठी हे दसऱ्याच्या पोशाखाचे सन्माननीय मानकरी होते. [७८] त्यांना माधवरावाने अनुक्रमे १५०। रुपये १४७। रुपये व ९९ रुपये आठ आणे किंमतीची वस्त्रे प्रदान केली होती. हा खेळ पेशव्यापासून सर्व मराठा सरदारांना व त्यांच्या सैनिकांचा आवडता असून त्यांचे मनोरंजन करणारा होता. त्यामुळे ते त्यामध्ये रस घेत होते. सवाई माधवरावाला वज्रमुष्टी हा खेळ अतिशय आवडत होता हे त्याच्या दिनचर्येत आलेल्या पुढील नोंदीवरुन लक्षात येते. [७९]

१. 'शिंदे, पोरगे यांच्या वज्रमुष्टीच्या लढाया लावतात. एखादा थकून पडला तथापि ढालाइताकडून सोडगे मारवावे, बळेच उभे करुन पुन्हा लढवावे. नाकातून, तोंडातून रक्ते आली तत्रपि सोडू देत नाहीत. दोनचार मुले दुखण्यास पडली आहेत.' या दिनचर्येवरुन असे लक्षात येते की, वज्रमुष्टीचा खेळ अतिशय चुरशीचा असून समोरच्या जेठीने कितीही हाल केले तरी सहजासहजी खेळ सोडता येत नव्हता.
२. 'दोनपरी मुले घेऊन बसावे.मनस्वी खेळ करावे. वज्रमुष्टीच्या ध्वजा कराव्या असे होत असते.' यामध्ये त्याने व्यायामाची व वज्रमुष्टीच्या खेळाची मनापासून आवड निर्माण झाल्याचे मान्य केले आहे.
३. 'गणेशपंत पेठे यांचा पुतण्या नमस्कारास येत असतो. त्याचे शरीर वायुबध्द आहे. स्थूल बहूत आहे. त्याजला दोन दिवस चौसोपीत एक प्रदक्षिणा धाववितात, बैठका करवितात.' आपल्या

सोबत व्यायाम करणाऱ्या मुलांच्या तंदुरुस्थीचे सुक्ष्म निरीक्षण सवाई माधवराव करत होता, हे या दिनचर्येतून समजते.

## ६.५.३ भालाफेक

भालाफेक हा पेशवेकाळात खेळला जाणारा एक खेळ होय. हा खेळ प्रामुख्याने पेशवे कुटुंबात व मराठा सरदार वर्गामध्ये खेळला जात होता. हा खेळ सामान्यांना परवडण्यासारखा नव्हता. युध्दकलेचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने तो खेळला जात असला तरी तो पाहणाऱ्यांचे मनोरंजन करणारा हा खेळ होता. नारायणराव पेशव्याला विविध मर्दानी खेळांपैकी भालाफेकीची विशेष आवड होती. या खेळासाठी लागणारे भाले लवकर पाठवावे या आशयाची नाना फडणिसास पाठविलेली पत्रे उपलब्ध आहेत. नाना फडणिसाला त्याने लिहिले आहे की, 'दहा बोथाट्या उत्तम बोंडाच्या बुढ्यासमवेत त्यात दोन आम्हा जोग्या बारा हात लांब आखूड रामेच्या व दाहा भाले फली बढ्या समेत तयार करुन पाठविणे. दोहोचहूं दिवसी घोडी फेरावयास जाण्यामुळे बोथाट्या फार मोडतात. बोथाट्या व भाले सत्वर पाठवणे.'[८०] नारायणरावाच्या सोबतीला भालाफेकीचा खेळ खेळणारे इतर सोबती असल्यामुळे त्याने स्वत:ला व इतरांना असे मिळून दहा भाल्यांचे साहित्य मागविले होते.

रॉबर्ट मेबॉन हा सवाई माधवराव पेशव्यांच्या इ.स.१७९४ मधील घोड्यावरुन भाला फेकण्याच्या प्रयोगावेळी हजर होता. त्याने चक्षुर्वैसत्यम पाहिलेली चित्तथरारक घटना पुढील शब्दात व्यक्त केली आहे -

''लांब भाला घेऊन राजपुत्रास (सवाई माधवराव) खेळताना पाहून मी आनंदीत झालो. त्याच्याबरोबर परशुरामभाऊ पटवर्धन आणि इतर मराठा सरदार होते. या खेळाकरिता म्हणूनच पर्वती टेकडीच्या पायथ्याला पेशव्यांनी एक प्रशस्त मैदान बनवून घेतले होते. पर्वती टेकडीवरील त्याच नावाच्या देवतेमुळे या टेकडीला पर्वती हे नाव पडले होते. या मैदानाभोवती अनेक शिपाई व हुजरे उभे होते. मैदानाच्या मध्यभागी एक लगोऱ्यांची रास रचून ठेवली होती. पेशव्यांनी आपला घोडा मंडळाभोवती फिरविला.त्यांच्या भाल्याच्या टोकाला (अणकुचीदार सुळाला) लाल कापडात गुंडाळलेला चेंडू बसविलेला होता. पेशवे हातात भाला धरुन घोडा चौखुर उधळत (भरधाव) लगोऱ्यांच्या राशीपाशी आले. त्यांनी घोड्यावरुनच निमिषार्धात लगोऱ्यांची रास

पाडली तिथे चेंडू पडला आणि विजय उत्साहाने ते मागे फिरले.सर्वांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या यशस्वी प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांच्या मागून परशुरामभाऊ त्याच पध्दतीने घोड्यावर बसून भरधाव आले. पण त्यांना लगोऱ्या पाडण्याचे तंत्र जमले नाही. दुसऱ्या अन्य सरदारांनीही प्रयत्न करुन पाहिला, पण त्यापैकी कुणालाही ते जमले नाही, इतर कोणत्याच सरदाराला ते साधता आले नाही. मात्र एका सरदाराने आपला घोडा त्या मंडळाभोवती उत्तमपणे फिरविला. तेंव्हा पेशव्यांनी त्याचा पाठलाग करुन त्याला भाल्याने डिवचून खाली पाडण्याचा प्रयत्न केला. अर्थात त्याने माघार घेत असताना बचावात्मक पवित्रा घेतला तरीसुध्दा या राजपुत्राने भालाफेकीच्या प्रावीण्यामुळे अखेर त्यास खाली पाडण्यात यश मिळविलेच! अश्वविद्येतील हे श्रेष्ठ दर्जाचे कौशल्य व कसब पाहून मी अक्षरश: थक्क झालो. एकूण सर्व मराठे राजे, सरदार, शिलेदार आपल्या घोड्यांना उत्तम वळण लावीत आणि शिक्षण देत. ते आपल्या उमद्याजनावरांना तरबेज करण्यात ना श्रमाकडे पाहत, ना पैशाकडे पाहात! त्यामुळे या सर्वांचे शिकविलेले घोडे एवढे तरबेज होते की, भरधाव सुटलेले असले, तरी घोडेस्वाराच्या इशाऱ्याच्या शब्दाबरोबरच जागच्या जागी खाडकन थांबत असत.''[८१]

दुसरा बाजीराव व त्याच्या भावांना कोपरगावास ठेऊन त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था आनंदीबाई व नानाने केली होती. पेशवेपदाच्या प्राप्तीपूर्वीच बाजीराव लष्करी शिक्षणात तरबेज झाला होता. नानाने त्याला पुढे जुन्नरला आणून ठेवले होते. परशुरामभाऊ पटवर्धनाबरोबर तो जुन्नरहून पुण्यास जाण्यास निघाला, त्या प्रसंगाचे वर्णन करताना खरेशास्त्री म्हणतात, ''नारायणगांव सोडल्यावर पुढे लांबदस्त मैदान पाहून (बाजीरावसाहेब) भाले खेळावयास लागले. श्री. रा. दादास व हरिपंतबाबास व नारायणरावसाहेब (पटवर्धन) यांस भाले खेळावयास बोलावले. भाले खेळून स्वारी मौजे वडगांवनजीक कळंब घोडनदी तीरीं मुक्कामास दाखल झाले. तेथून छ.१९ रोजी इंदूवासरी कूच करुन अंबारींत स्वारी झाली होती..... पेठ म्हणून गाव आहे तेथील आंबराईत दोन प्रहरी स्वारी आली.तिथे निद्रा जाहली..... सहा घटका दिवसास तेथून स्वारी चालती जाहली. घोड्यावर स्वारी होती. मार्गी भाले खेळले....''[८२]

### ६.५.४ इतर मर्दानी खेळ

पेशवेकाळात वरील प्रमुख मर्दानी खेळाव्यतिरिक्त तलवारबाजी, दांडपट्टा, लेझीम, मल्लखांब व वजन उचलणे इत्यादी खेळ खेळले जात होते. हे खेळ व्यायामाच्यादृष्टिने व लष्करी प्रशिक्षणासाठी उपयुक्त होते, त्याबरोबर ते मनोरंजन करणारे होते. सवाई माधवरावाला या मर्दानी खेळांची आवड असून तो ते खेळत होता. [८३] त्याला अशा प्रकारचे शिक्षण देणारे प्रशिक्षक नेमण्यात आले होते. त्यावरुन समाजामध्ये हे खेळ किती लोकप्रिय होते ते समजते. त्यावेळी महाराष्ट्रातील शिपाईगिरीची आवड असलेल्या प्रत्येकाला याप्रकारचे शिक्षण स्वप्रयत्नाने घ्यावे लागत होते.

## ६.६ खेळ व शिकार यामधील मनोरंजन

### ६.६.१ बुध्दीबळ

बुध्दीबळ हा एक बैठा खेळ असून प्रारंभी तो 'चतुरंग' या नावाने ओळखला जात होता.[८४] या खेळाचा शोध कसा लागला त्याबद्दल दोन आख्यायिका सांगितल्या जातात. त्यापैकी पहिल्या अख्यायिकेनुसार रावणाने हा खेळ शोधून काढला असे म्हणतात. मात्र रामायणात रावण बुध्दीबळ खेळत असल्याचा उल्लेख सापडत नाही. दुसऱ्या आख्यायिकेनुसार रावणाची पत्नी मंदोदरी हिने या खेळाचा शोध लावला असे म्हणतात. परंतु त्यालाही कोणताही अधार नाही. रामायणात अयोध्येचे वर्णन अष्टपदकाटा असे आले आहे. रामायणाच्या तिलक या टिकाकाराने अष्टपदाचा अर्थ द्यूतफलक किंवा बुध्दीबळाचा पट असा केला आहे. अष्टपद म्हणजे आठ पंक्ती असलेला व प्रत्येक पंक्तीत आठ घरे असलेला पट असा आहे. टायलर या पाश्चात्य संशोधकाने या खेळाचे श्रेय हिंदूना दिले आहे.[८५] अनेक प्राचीन हिंदू, बौध्द व जैन ग्रंथामध्ये या खेळाचा उल्लेख मिळतो. त्यावरुन हा खेळ प्राचीन काळापासून भारतात खेळला जात असल्याचे स्पष्ट होते. बुध्दीबळाच्या पटावर ६४ घरे असतात आणि मोहरी व प्यादी मिळून त्यांची संख्या ३२ असते. राजा, मोहरी व प्यादी यांची चाल निरनिराळ्या प्रकारे असते. प्राचीन काळापासून प्रचलीत असणारा भारतातील हा खेळ आज जगातील सर्व देशात खेळला जातो हे त्याचे खास वैशिष्ट्य होय.

पेशवेकाळात आजच्याप्रमाणे बुध्दीबळ खेळाला अतिशय महत्व होते.[८६] बुध्दीची कसरत व विचारक्षमता वाढविण्यासाठी या खेळाचा चांगला उपयोग होत होता. त्यामुळे श्रीमंत कुटुंबामध्ये अभ्यासाबरोबरच मुलांना बुध्दीबळ खेळण्याची सवय लावली जात होती. सवाई माधवरावाला अभ्यास आटोपल्याबरोबर बुध्दीबळ खेळावयास बसविले जात होते. लहान मुले बौध्दीक क्षमता वाढविण्यासाठी बुध्दिबळ खेळत असत तर तरुण लोक मनोरंजनासाठी बुध्दीबळ खेळत होते. परशुराम खंडेराव राहतेकरांनी सौ. आनंदीबाईसाहेब यांची दिनचर्या एका पत्रामधून पाठविली आहे.[८७] त्यामध्ये त्या बुध्दीबळाचा खेळ खेळत असल्याचा उल्लेख आहे. यावरुन केवळ पुरुषच नव्हे तर पेशवेकालीन स्त्रियांदेखील बुध्दीबळ खेळत असल्याचे स्पष्ट होते. बुध्दीबळासाठी त्यावेळी वेगवेगळ्या प्रकारचे पट वापरले जात होते.

### ६.६.२ गंजिफा

भारतात मुघल काळापासून गंजिफा हा खेळ खेळला जात होता. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला मुघल सत्ताधिशांनी हा खेळ मध्य आशियातून भारतात आणला. या खेळाची माहिती बाबरनामा, ऐने अकबरी, श्री तत्वनिधी इत्यादी ग्रंथामध्ये आढळते.[८८] मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबराने त्याचा मित्र शाह हुसैनला जून १६२७ मध्ये गंजिफा मीर अली कोर्ची याच्या हस्ते पाठविला होता असा उल्लेख बाबरनामामध्ये सापडतो. तठ्ठा (सिंध) मधील त्याच्या मित्राने गंजिफ्याचा उत्तम संच पाठविण्याची केलेली विनंती बाबराने पूर्ण केली होती. अकबराच्या ऐने अकबरी या ग्रंथामध्येही भारतातील बुध्दीबळ व गंजिफाखेळाची माहिती आढळते. अबुल फझलच्या वर्णनानुसर पत्त्यांचा खेळ मूलत: १२ संच आणि प्रत्येक सचात १२ पत्ते असे एकूण १४४ गोलाकार पत्त्यांचा होता. असे असले तरी आठ, नऊ, दहा, बारा अशा संचाचे गंजीफे पुढील काळात वापरले जाऊ लागले. अष्टदिग्पाल गंजिफाआठ संचाचा, दशावतार गंजिफा दहा संचाचा, बारा राशींचा गंजिफा व नवग्रह गंजिफा या नावाने ते ओळखले जात होते. मुघलामार्फत हा खेळ भारतीय राजांच्या दरबारात पोहचला व त्याचा सर्वत्र प्रसार झाला. या खेळातील हिंदू राजे व मुघल राजे यांचे पत्ते भिन्न होते. हिंदु लोकांमध्ये लोकप्रिय झालेल्या गंजिफ्यावर रामायण, महाभारत, कृष्णलीला व दशावतार यासंबंधी चित्रे असत. हिंदू राजांपाठोपाठ हळूहळू तो हिंदू तत्कालीन उच्चवर्गीय समाजामध्येही लोकप्रिय होत गेला. त्यामुळे हस्तीदंत, सोने, चांदी व मोती

इत्यांदिचा वापर करुन बनविलेले गंजिफे आढळतात. पेशवेकाळातील श्रीमंतांचे गंजिफे मोठ्या प्रमाणात हस्तीदंताचे आढळतात. उच्चवर्णीयांनी लोकप्रिय केलेला हा मनोरंजनाचा खेळ पुढे सामान्य वर्गामध्येही लोकप्रिय झाला होता. भारतीय सैन्यात असणारे विविध विभाग जसे घोडदळ, पायदळ, चिलखती पायदळ, गजदळ, किल्ले किंवा आरमार, कोषाध्यक्ष धनपती या नावांचे पत्ते वापरले जात. या व्यतिरिक्त पाच संचामध्ये प्रत्येकी एक स्त्री, सुर, असुर, पशु व सर्प यांच्यासाठी असे. पेशवे दप्तरात बारा राशींचा गंजिफापाठविणेबाबत पुढीलप्रमाणे यादी पाठविलेली आढळते.[८९]

**श्री**

**यादी राशीचा गंजिफाकरुन पाठविणेची सन सलासील माहे रौबल**

| राशी | चित्रे | रंग | वाहने |
|---|---|---|---|
| १ मेष | १ बकरेवर राजा | १ तांबडा | १ वजीर मेंढा |
| १ वृषभ | १ बैलावर राजा | १ पांढरा | १ वजीर बैलावर |
| १ मिथुन | १ स्त्रीपुरुष उभयता | १ हिरवा | १ वजीर घोडेवर |
| १ कर्क | १ कुरलेवर राजा | १ प्याजी गुलावी | १ वजीर माणुस कुरले पुढे |
| १ सिंव्ह | १ सिंव्हावर राजा | १ अस्मानी रंग | १ वजीर सिंव्हावर माणुस |
| १ कन्या | १ बायको राजा असावा | १ पंचरंगी | १ वजीर बायको घोडेवर |
| १ तुळ | १ तागडी धरलेला राजा | १ काळा रंग | १ वजीर घोडावर तागडी धरलेला |
| १ वृश्चिक | १ विंचू राजा | १ पिरुराई विंचवाचा रंग | १ वजीर घोडेवर पुढे विंचु |
| १ धन | १ राजा घोडेवर तोंड मानसाचे कृष्णासारखी बिंदुकली पानावर | १ घोडेचा रंग | १ वजीर घोडवर त्यास तोंड मानसाचे |
| १ मकर | १ तोंड हरणाचे खाली सुस्वर | १ तबकीर रंग | १ वजीर तोंड हरणाचे |
| १ कुंभ | १ राजा पुरुष घागर असावी | १ पिवळा रंग | १ वजीर घोडवर पुढे घागर |
| १ मीन | १ मच्छासारिखा राजा | १ केसरी | १ वजीर मच्छासारिखा |
| **१२** | **१२** | | **१२** |

पेशवेकालीन महाराष्ट्रात बारा संचाच्या गंजिफ्याप्रमाणेच दशावतारी गंजिफाही लोकप्रिय होता. दशावतारी गंजिफ्यामध्ये विष्णूच्या मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुध्द व कलंकी या दहा अवतारांची राजा, वजीर आणि एक्का ते दश्श्या अशी प्रत्येकी १२ पाने मिळून १२० पाने वापरतात.[९०] जेंव्हा हा खेळ सकाळी खेळला जात असे तेंव्हा

ज्याच्या हातात राम राजा असेल तो खेळ सुरु करत असतो. रात्रीच्या खेळात ज्याच्या हाती कृष्ण राजा असेल तो खेळ किंवा डाव सुरु करत असतो. डाव सुरु करणाऱ्याला सुर्क्या असे म्हणतात.

### ६.६.३ सारीपाट

प्राचीन काळापासून सारीपाट किंवा द्युत हा खेळ भारतात लोकप्रिय होता. संस्कृत भाषेतील चतुरंगदिपीका या आचार्य शूलपाणी यांच्या ग्रंथामध्ये या खेळाची माहिती मिळते. [९१] सारी म्हणजे जे चालवायचे ते अर्थात सोंगटी आणि पाट म्हणजे ज्यावर चालवायचे ते. हा बैठ्या प्रकारातील खेळ असून त्याला सोंगट्यांचा खेळ असेही म्हणतात. [९२] इ.स.सातव्या शतकातील बाणभट्टाच्या कादंबरीत एका नगराचे वर्णन करताना म्हटले आहे की, 'तिचे रिकामी घरे काय ती सोंगट्याचीच होती.' यावरुन इ.स.सातव्या शतकात हा खेळ भारतात खेळला जात होता. पारंपरिक दृष्टिने शंकराला या खेळाचा प्रवर्तक मानतात. ऋग्वेदकाळापासून द्यूत खेळणे वाईट अशी कल्पना जरी असली तरी तो तेंव्हापासून खेळला जात होता. मनूने द्यूताचा आठरा व्यसनामध्ये उल्लेख केला आहे. वैरभाव निर्माण करणारा हा खेळ असल्याने तो करमणूकीसाठी खेळू नये असे तो म्हणतो. शिव-पार्वती यांच्यामध्ये झालेल्या खेळामध्ये पार्वतीने शंकराला हारविले होते. तेंव्हा परत संधी मागणारा शिव वेरुळ येथील लेण्यामध्ये दाखविला आहे. महाभारतामध्ये कौरव व पांडव यांच्यामध्ये झालेल्या द्यूताच्या खेळामध्ये कौरवांनी पांडवांना हारविले. असा या खेळाचा प्राचीन काळापासूनचा इतिहास असताना तो पेशवेकाळातही खेळला जात होता. खासकरुन सामान्य जनता यात्रा व सण-समारंभ या निमित्ताने एकत्र आल्यानंतर हा खेळ खेळत असे. दीपावलीच्या दिवसामध्ये विशेषकरुन तो मोठ्या प्रमाणात खेळला जात होता.त्यावेळची ही प्रथा अजुनही महाराष्ट्रात कांही ठिकाणी आढळते.

सोंगट्याचा खेळ खेळण्याचे दोन फाशांनी आणि तीन फाशांनी खेळावयाचा खेळ असे दोन प्रमुख प्रकार आहेत. या खेळासाठी १६ सोंगट्या, चौकट (पट) आणि तीन किंवा दोन फासे लागतात. सोंगट्या ह्या शक्यतो लाकडाच्या व शंक्वाकृती बनविल्या जातात. त्यापैकी चार तांबड्या, चार काळ्या, चार पिवळ्या व चार हिरव्या असतात. चौपट किंवा पट हा रंगीत

कापडाचा तयार केलेला असतो. सोंगट्याचे कांही खेळ स्त्रियांचे, कांही पुरुषांचे तर कांही स्त्रीपुरुषांचे आहेत.

## ६.६.४ शिकार

प्राचीन काळापासून अन्नाची गरज भागविण्यासाठी म्हणून सामान्य लोक शिकार करताना आढळतात तर श्रीमंत लोक व राज्यकर्ते मौजमजा, मनोरंजन व छंद म्हणून शिकार करत असल्याचे आढळते.[९३]सामान्य लोकांचे देखील शिकारीमधून मनोरंजन होत होते.मध्ययुगीन काळात अकबर, जहाँगिर, शहाजहान, शहाजीराजे व छ. संभाजीराजांना शिकारीचा छंद होता.[९४] पेशवेकाळातील लोक मोठ्या प्रमाणात शिकार करताना आढळतात. [९५] छत्रपती शाहू, पेशवे त्याचबरोबर अनेक सरदार आपला मोठा लवाजमा घेऊन शिकारीसाठी जात असत. त्यावेळच्या भित्तीचित्रामध्ये शिकारीची भरपूर चित्रे आढळतात. कांहीवेळा एकापेक्षा जादा गट एकाच जंगलात शिकारीला गेले तर त्यांच्यामध्ये तंटादेखील होत होता. बापूजी पाटलांनी त्रिंबकजी डेंगळेना पाठविलेल्या पत्रामध्ये शिकारीच्यावेळी झालेल्या तंट्याची हकीगत दिली आहे. त्यामध्ये धोंडपकरांनी पळवून लावलेल्या सांबरावरुन दुधखेडकरांशी संगमनेरकर व सावरेकर यांच्यात झालेल्या तंट्याचे वर्णन केले आहे. [९६]

रघुनाथराव १५ वर्षाचा झाल्यानंतर नानासाहेबाने त्याला छत्रपती शाहूकडे शिकारीसाठी ठेवले होते. त्यावेळच्या हकीकतीचे वर्णन करणारे पुढील पत्र त्याने भाऊसाहेबास पाठविले होते. त्यामध्ये तो लिहितो की, ‘‘तीर्थरुप भाऊ स्वामी वडिलांचे सेवेसी (सन २-२-४९) अपत्ये रघुनाथरावानें चरणावरी मस्तक ठेवून सा. नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत माघ वद्य ११ शुक्रवार मुक्काम जांभ नजीक जरांडा पावेतों वडिलांचे आशीर्वादेवरुन सुखरुप असो विशेष …….. यानंतर राजश्री (शाहूमहाराज) शुक्रवारी खेडहून तिरुपटीस आले. आम्ही शनिवारी जांबास आलों. त्याजपासून तेथेच मुक्काम आहे.त्यास कारण हेंच की, बाईसाहेबास बरे वाटत नाही. दोन तीन शिकारी राजश्रीबरोबर केल्या…….तूर्त आम्हास निरोप लवकर होईल सा दिसत नाही. दहावीस रोज स्वारीस लागतील.’’ शाहूमहाराजांना शिकारीचा अतिशय छंद असल्याने साताऱ्याजवळील जंगलमय प्रदेशात ते लव्याजम्यानिशी ऐषआरामात शिकारीचा आनंद लुटत असत. जाब जरंडाच्या परिसरातून पुढे वर्धनगडाकडे शाहूची स्वारी फिरल्याचे कळविताना तो

दुसऱ्या पत्रात लिहतो की, ''मुक्काम कुवटेनजीक वर्धनगड पावेतों वडिलांचे आशीर्वादेंवरुन सुखरुप असो..... विशेष काल आमचे जांबाहून कूच जाहले ते येथे आलो. राजश्रींचे तेरबांच्याच दिवशीं कूच होऊन कोरेगांवास आले. आमचें काल जाहले. आज उद्या निरोप व्हावासा आहे. येथून जेजुरी-कुरकुंबे करुन येतीलसे वाटते. राजश्री निरोप द्यावयास फार चुकावतात. शिकारीस जातात, नजर येत नाहीत.....'' या पत्रावरुन शाहूच्या शिकारीच्या छंदाची कल्पना येते. तो शिकारीच्या मोहिमेवर असला की तो इतर गोष्टीकडे लक्ष देत नव्हता. त्यामुळे राघोबाची सुटका होत नव्हती.

शाहूला शिकारीचा अतिशय शौक असल्याने त्याने उत्तम कुत्री आणि जातीवंत घोडी शिकारीसाठी निवडली होती. त्याच्याजवळील एका कुत्तेवानांने पुण्यात चिमाजी अप्पाच्या कुत्रीस चांगली पिल्ली झाल्याची खबर दिली. [९७] त्यावेळी शाहूने अप्पाला त्या कुत्रीची किंवा दुसरीची चांगली पिल्ली पाठविण्यासाठी पत्र पाठविले. चिमाजीने पाठविलेल्या चाळीस पिल्लापैकी एकही त्याला पसंद न पडल्यामुळे दुसरी पाठवावीत असे कळविले. यावरुन कुत्र्यांची निवड करण्यामध्ये तो अतिशय चोखंदळ होता असे दिसते. तसेच त्याच्याजवळ गोपड, सीतर, वसंता, बंटा, बंधू, मिठू हे इ.स. १७४५ मध्ये कुत्तेवान होते. यापैकी बहुतेकजण उत्तर हिंदुस्थानातील मुसलमान असून त्यांच्याकडे महाराष्ट्रीयन लोकांपेक्षा कुत्र्यांचा सांभाळ करण्याची कला चांगली होती.[९८] कुत्र्याप्रमाणेच चांगली घोडी न मिळाल्यास ती तो परत करीत असे.त्यामुळे त्याला शिकारीची मोहीम काढल्यानंतर या प्राण्यांची चांगली मदत होत होती.

शाहूप्रमाणेच पेशवे व मराठा सरदारांनाही शिकारीचा भरपूर शौक होता. सवाई माधवराव पर्वतीच्या पश्चिमेकडील जंगलात शिकारीला जात असे. इ.स.१७९३मध्ये त्याने शिकारीला गेल्यावर बऱ्याच हरणांचा पाठलाग करुन त्यापैकी कांही जिवंत पकडली. यावेळी त्याच्याबरोबर असणाऱ्या शिकारी मंडळीमध्ये महादजी शिंदेदेखील होता. त्याने माधवरावाकडे त्यापैकी एक काळविट मागितले; पण माधवरावाने ते देण्याचे नाकारले. माधवरावाला वाटले की महादजीची काळविटाची मांसासाठी मागणी असेल. पण महादजीने त्याची शंका दूर केल्यावर एक काळविट त्याच्या स्वाधीन केला.[९९] यावरुन हे स्पष्ट होते की पेशव्यांचा प्राणीसंग्रह वाढण्याचे शिकार हे देखील एक महत्वाचे कारण होते.

छत्रपती शाहूचा शिकारीबरोबर मासेमारी करणे हादेखील आवडता छंद होता.[१००] मासे पकडण्याच्या जाळ्याच्या गळाचे सूत त्याला जसे पाहिजे होते तसे सातारा व पुण्यामध्ये मिळत नसल्यामुळे ते मिळविण्यासाठी त्याने बऱ्हाणपुरला जासूद पाठविण्याची आज्ञा केली होती.दसरा दिवाळीचा हंगाम हा मासेमारीचा हंगाम असून त्यावेळेपूर्वीच बारीक सूत बऱ्हाणपूराहून पाठविण्यास सांगितले होते. यावरुन शाहू हा मासेमारीच्या तंत्राचा चिकित्सक विचार करणारा होता असे दिसून येते.

## ६.७ लोकगीत व खेळगीतांतून होणारे मनोरंजन

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक अतिशय महत्वाचा भाग म्हणजे मराठी लोकांची लोकगीते हा होय. प्राचीन काळापासून लोकगीत परंपरा या प्रदेशातील लोकांना लाभली असून अजूनही तिचे अस्तित्व कांही प्रमाणात दिसून येत आहे. सर्वसामान्य लोक विविध सणसमारंभाच्या निमित्ताने किंवा विविध कारणांनी एकत्र आल्यानंतर आपली गीते अणि नृत्य सादर करीत असतात. आपल्या वयाचे भान विसरुन सामुदायिक जीवन जगण्याचा मराठी लोकांचा स्वभाव दिसून येतो. पेशवेकाळात लोकगीत गाण्यामध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचा सहभाग जास्त जाणवतो. [१०१]

पेशवेकाळात खेड्यापाड्यात राहणाऱ्या लोकांचे सर्वात महत्वाचे मनोरंजनाचे साधन म्हणजे त्यांची लोकगीते हे होय. महाराष्ट्राला प्राचीन काळापासून लोकगीतांची परंपरा असून यादव काळापासून ती फार लोकप्रिय झाल्याची पहावयास मिळतात. सोमेश्वर नृपतीच्या 'मानसोल्लास' या ग्रंथामध्ये दळणकांडणाच्या वेळी स्त्रिया गात असलेल्या ओव्यांचा उल्लेख आढळतो.[१०२] पेशवेकाळात बहुसंख्य लोकांचा शेती हा व्यवसाय असून शेतातील कष्टाची कामे करताना, दिवसभर उपसलेल्या कष्टाचा श्रमपरिहार म्हणून आणि घरातील दळणकांडणासारखी कामे करताना लोकगीते गायली जात होती. ही गीते मौखिक परंपरेने चालत आली असल्यामुळे ती लिखीत स्वरुपात कमी प्रमाणात आढळतात. मात्र आजही ती खेड्यातील लोकांच्या मुखातून ऐकावयास मिळतात. कांही लोकगीते ही खेळनृत्याच्या वेळी गायली जात असत तर कांही धार्मिक विधी व सण समारंभ प्रसंगी गायली जात असत. या सर्व गीतामधून तत्कालीन लोकांचे

चांगले मनोरंजन होत होते. त्यामुळे त्यांनी या गीतांचा वारसा पुढील पिढीसाठी मौखिक परंपरेने जपून ठेवला आहे. महाराष्ट्रातील तत्कालीन समाजामध्ये निरक्षरता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही लोकगीते मौखिक परंपरेने जतन करुन ठेवली जात होती. केवळ पाठांतराच्या जोरावर लोकगीते समाजजीवनात प्रचलित राहिली. काही प्रकारच्या लोकगीतांचे गायन करताना वाद्यसंगीताची जोड दिली जात असे तर कांही लोकगीते ही वाद्यसंगीताच्या शिवाय गायली जात असत.

पेशवे पूर्वकालापासून प्रचलीत असणाऱ्या या लोकगीतांचे निर्दोष वर्गीकरण करणे त्यांच्या विविधतेमुळे शक्य होत नाही. प्रत्येक लोकगीत हे एकाच वेळी अनेक गोष्टींशी संबंधित असल्यामुळे वर्गीकरण करण्यात अडचणी निर्माण होतात. तरीही मराठी साहित्याच्या अभ्यासक श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. विद्या चव्हाण, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. शरद व्यवहारे इत्यादींनी आपआपल्यापरीने लोकगीतांचे वर्गीकरण केलेले आहे. त्यांच्या वर्गीकरणाचा संदर्भ विचारात घेऊन पेशवेकालीन लोकगीतांचे पुढीलप्रमाणे दोन वर्ग केलेले आहेत.

## ६.७.१ पेशवेकालीन स्त्रियांची लोकगीते

पेशवेकाळातील स्त्रियांनी मराठी संस्कृती जतन करण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. अनेक सण, उत्सव व विधीप्रसंगी तिची उपस्थिती महत्वाची मानली जात असून त्यावेळी ती विविध प्रकारची लोकगीते गात असे. यावेळची मराठी स्त्री ही भावनाशील, हळवी, प्रेमळ व कोमल अंत:करणाची असल्यामुळे तिच्या जीवनात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटना ती लोकगीतांच्या माध्यमातून व्यक्त करीत असे. तत्कालीन सर्वसामान्य स्त्रीला आपल्या भावनादेखील उघडपणे दुसऱ्याजवळ मांडता येत नव्हत्या. त्यामुळे त्यांनी त्या लोकगीतांतून मांडल्या. त्याबरोबरच त्यांनी सण, कुलाचार विधी, व्रत वैकल्ये, नवस सायस इत्यादीतूनही लोकगीतांची निर्मिती केली. त्यांनी जात्याला ईश्वर मानून त्याच्या साथीने गायलेल्या ओव्या आशय आणि अभिव्यक्तिच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण अशा आहेत. पहाटे उठल्याबरोबर तिला दळण कांडण ही कामे करावी लागत होती. ती करताना तिला आपोआप ओव्या सुचत असत. त्यामुळे तिला कामाचा शिण येत नव्हता आणि त्याबरोबरच तिचे मनोरंजनही होत होते. अशाप्रसंगी ती प्रामुख्याने नातेसंबंधावर अधारित ओव्या गात असे. कौटुंबिक नात्यातील भावसंबंधांचे चित्रण ती ओवीमधून अत्यंत

हळूवारपणे करत असे. या प्रकारच्या ओवीमधून ती आई, वडील, भाऊ, बहिण, बाळ, नणंद, सासू, सासरा, मामा, मामी, शेजारीण इत्यादी नात्यातील रेशीमगाठी आपल्या ओव्यामधून उकलण्याचा प्रयत्न करत असे. कौटुंबिक संबंधातील सर्वात जवळचे माणूस म्हणजे आई ही होय. ती आपल्या मुलीचे पालनपोषण किती काळजीने करीत होती हे पुढील गीतामधून आढळते - 'मांडीचा पाळणा आणि डोळ्याचा दिवा करून माझ्या मायबाईनं मला वाढवलं, त्याचा उपकार कसा फेडू.'[१०३] त्यामुळे तिच्यावरती मोठ्या प्रमाणात ओव्या गायल्या जात होत्या. अशाच एका ओवीमध्ये आईची थोरवी गाताना स्त्री म्हणते - 'विसाव्याची जागा बाई माजी ती मावली। आउक्षाची ओवी तुला गाते बयाबाई।। '

स्त्रीयांची कांही लोकगीते बापाला उद्देशून म्हटलेली आढळतात मात्र बापापेक्षा त्यांनी भावाबहिणीच्या नात्याचा गोडवा मोठ्या प्रमाणात गायलेला आहे. बहिण भावामधील जवळीकता व्यक्त करताना ती म्हणते - 'भनी भावंड एका शिंपल्याचे मोती।'

पेशवेकालीन स्त्री जशी कौटुंबिक बंधनात अडकलेली होती तसाच तिच्यावर धर्माचा देखील चांगलाच प्रभाव होता.[१०४] त्यामुळे त्यांच्या ओव्यामध्ये देवदेवता, साधुसंत व पौराणिक कथातील संदर्भ आढळतात. त्यामुळे याकाळातील स्त्रिया श्रध्दाळू आणि संस्कारीत अशा वाटतात. त्यांच्या ओव्यामध्ये शंकर-पार्वती, श्री विष्णू लक्ष्मी, तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई, पंढरपूरचा विठोबा, जेजुरीचा खंडोबा इत्यादी देवदेवता बद्दलची श्रध्दा व्यक्त झालेली आढळते. पंढरीच्या विठ्ठलाचे व पंढरपुराचे वर्णन करताना तर त्यांना उचंबळून येत असे.[१०५] तो युगाने युगे उभा असल्याचे सांगताना त्या म्हणतात -

इटेवरी उभा युग झाल्यात अठ्ठाईस ।
देवा माझ्या इटूला कुनी म्हनना खाली बस।।

पेशवेकाळातील स्त्रियांच्या लोकगीतावर पुराणग्रंथांचाही चांगलाच प्रभाव पडलेला होता. कथा कीर्तनातून ऐकलेल्या गोष्टींना त्यांनी आपल्या लोकगीतात स्थान दिलेले आढळते. त्यामुळे त्यांच्या गीतामध्ये राम, लक्ष्मण, मारुती, श्रीकृष्ण व पांडव यांच्याबद्दल आदर व्यक्त केलेला आढळतो. त्याचबरोबर सीता, द्रौपदी, मंदोदरी व सावित्री अशा स्त्रियांचे जीवन म्हणजे त्यांच्या

श्रध्देचा मूलस्त्रोत होय. त्यांच्या श्रध्दाळू मनाच्या या अवस्थेमुळेच पुढील ओवी सारख्या अनेक ओव्यांचा जन्म झाला होता.

रामराया आला घाम, सीताबाई घाली वारा ।
पतीसंगतीत प्रेमे, वनवास कंठी सारा ।।

राजकीय जीवनामध्ये घडत असलेल्या घडामोडी बाबत पेशवेकालीन समाज अलिप्त होता. मात्र कांही राजकीय घटनांचा त्यांच्यावर विशेष परिणाम झालेला आढळतो. अशा घटनांना त्यांनी आपल्या ओवीमध्ये स्थान दिलेले आढळते. शाहीरांनी आपल्या पोवाड्यांमधून जशा राजकीय घटना रंगविल्या त्याप्रमाणे सामान्य स्त्रियांच्या ओव्यामध्ये देखील राजकीय घडामोडीवर प्रकाश टाकलेला आढळतो. नारायणराव पेशव्याचा झालेला खुन ही पेशवेकाळातील एक दु:खद घटना होय.या घटनेचा तत्कालीन स्त्रीवर्गावर झालेल्या परिणामामुळे त्यांनी आपल्या ओवीमध्ये हा प्रसंग रेखाटला आहे. त्याचे परिणाम काय झाले होते ते ओवीव्दारे सांगण्याचा प्रयत्न पुढीलप्रमाणे केला होता.

मारिले नारायणरावु रक्ता सारविले वाडे
घेईना चारा-पाणी कोठीवालियांचे घोडे ।।१।। [१०६]

पेशवेकालीन खेड्यातील सर्वसामान्य स्त्रिया नागपंचमी, मंगळागौर, हरताळका जागविणे, हतगा इत्यादी सण-समारंभाच्या निमित्ताने लोकगीतांचे सादरीकरण करत असत. त्यामध्ये फुगडी, झिम्मा, कोंबडा, आगोटा पागोटा, पिंगा, सुपनृत्य, फेरनृत्य, गोफ इत्यादी खेळनृत्यांचा समावेश होतो. हे खेळ खेळताना स्त्रिया विविध गाणी गातात किंवा उखाणे म्हणतात. त्यामुळे खेळ पाहणाऱ्यांचे आणि खेळात सहभागी झालेल्यांचे चांगले मनोरंजन होत होते. खेळ खेळताना म्हणावयाची गाणी व उखाणे ठरलेले असत. फुगडी घालतांना त्या उखाणे म्हणत असत.

अशाप्रकारे लोकगीतांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपल्या संस्कृतीचे जतन करत सांस्कृतिक जीवनाचा उलगडा करण्याचे काम केले आहे. मराठी लोकगीतांमध्ये पुरुषापेक्षा स्त्रीगीतांची संख्या प्रचंड आढळते. कारण त्यावेळच्या समाजव्यवस्थेत सर्वसामान्य स्त्रीला दुय्यम स्थान दिले

असल्यामुळे तिला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी लोकगीतांचा आधार घ्यावा लागला होता. स्त्रीचे जिणे किती दुर्दैवी होते याचे दु:ख पुढील लोकगीतात व्यक्त केलेले आहे.

लेकीचा व जलम । घातला कुन्या येड्यानं

माझे सखे मैनाबाई । बैल राबती भाड्यान

पेशवेकाळातील स्त्रीया गात असलेल्या विविध गीतामध्ये वात्सल्य, संसारप्रेम, नात्यागोत्यातील माणसावरचा लोभ अशा भावनांना स्थान दिलेले आढळते. उच्च दर्जाच्या या रचना कोठून आल्या व त्यांची रचना कोणी केली हे सांगणे कठीण आहे. [१०७] मौखिक परंपरेने आलेल्या या गीतांनी समकालीन स्त्रीयांचे चांगले मनोरंजन केले हे आपणास मान्य करावे लागते.

## ६.७.२ पुरुषांची लोकगीते

स्त्रीयांच्या लोकगीतांच्या परंपरेप्रमाणेच पुरुषांच्या लोकगीतांनाही चांगली परंपरा आहे. वैदिक काळापासून पुरुषांच्या लोकगीतांची परंपरा आहे असे मानले जाते. वेदकाळात सोमयाग यज्ञावेळी पुरुष मंडळी जी गाणी गात होते त्याबद्दल पाश्चिमात्य विद्वान असे म्हणतात की, ‘सोमयाग हा लोकप्रिय उत्सव होता.या उत्सवप्रसंगी कवी कविता म्हणत. ऋचा करुन, म्हणून दाखवीत व गवई त्या ऋच्यांच्या आधारे सोमगायन करीत.’[१०८] कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही मौर्यकालीन उत्सवामध्ये पुरुष नृत्यगायन करीत असल्याचा उल्लेख मिळतो. तसेच गाथा परंपरेतही पुरुषांच्या लोकगीतांची परंपरा सापडते. सण-उत्सवप्रसंगी, सामुदायिक उत्सवप्रसंगी, श्रमपरिहारार्थ व उदरनिर्वाह या कारणांनी पुरुष लोकगीतांचे गायन करत आल्याचे आढळते. पेशवेकाळात पुरुषांमध्ये ही गीतगायनाची परंपरा चालू होती.

पेशवेकालीन महाराष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा होता. या व्यवसायामध्ये काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी आपल्या श्रमपरिहारार्थ अनेक गीतांची रचना केलेली होती. त्यांचे गायन केल्यामुळे काम करण्याचा उत्साह त्यांच्यामध्ये निर्माण होत होता. शेताची नांगरणी करताना, धान्याची पेरणी करताना, पिकाची राखण करताना, पिकाची कापणी करताना, धान्याची मळणी करताना व मोट हाकतांना ते वेगवेगळ्या प्रकारची गाणी गात असत. त्यामुळे त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे चांगले मनोरंजन होत होते. विहिरीत मोटेचे भरणं, मोट वर येणं, वर येताना चाक, कणा, याचं कुईकुई वाजणं, पाणी थारोळ्यात पडणं, बैलांच चालणं, त्यांच्या

पायांचा आवाज अशा नैसर्गिक संगीतावर मोटेवरचं गाणं मोटकरी सुरेल आवाजात गात होता. त्याच्या गाण्यात सामजिक अर्थ दडलेला आढळतो. [१०९] अनेकवेळा मोटकऱ्यावर भाळलेली एखादी तरुणी धुणे धुण्याचे निमित्त करुन जेंव्हा त्याला भेटण्यासाठी येते त्यावेळी त्याच्या ओठावर पुढील गीतासारखे गीत येत असे.

मी गातो मोटेवरचं गाणं । तुझ कळलं गं मला न्हाण ।।
नको लुगडं भिजवू गं थारोळी । ह्या ग पाण्यानं वाळंल साळी ।
बरं न्हव अस येणं जाणं ।।

शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांची दसऱ्याच्या दिवशी पूजा करुन त्यांना सोने वाहिले जात होते. शेतकऱ्याला त्याची अवजारे तेहतीस कोटी देवांच्या समान वाटतात. त्यामुळे त्याच्या अनेक गीतांमध्ये अवजारांचा उल्लेख आढळतो. त्याच्या गीतांमध्ये नांगर, तिफण, बैलगाडी, मोट अशा अवजारांचाही वारंवार उल्लेख आढळतो. त्याचे जसे नांगरावर प्रेम आहे तसेच त्याच्या बैलावरही कसे प्रेम आहे हे पुढील लोकगीतात आढळते.

वाटंच्या वाटसरा नको बघू नांगराला । दिष्ट लागल रं बैलाला ।। [११०]

शेती हे शेतकऱ्यांचे सर्वस्व असल्यामुळे धरतीमातेबद्दल किंवा काळ्या आईबद्दल त्याची असणारी कृतज्ञतेची भावना त्याच्या अनेक गीतामध्ये आढळते. पोळा हा बैलांचा सण तो अतिशय आनंदाने साजरा करीत असे. त्याबद्दलच्या अनेक गीतामध्ये बैलाबद्दलची कृतज्ञता आढळते.

शिमगा व गणपती उत्सव हे पेशवेकाळातील महत्वाचे सण-समारंभ होत.यावेळी पुरुषांच्या गाण्यांना बहर येत असे. होळीच्या सणावेळी विविध प्रकारची सोंगे काढून गीते गायली जात होती[१११] या गाण्यांमध्ये शृंगार भावाचा उत्कृष्ट अविष्कार होत होता. गणपती उत्सवावेळी पारंपरिक मनोरंजन करणारी गाणी सादर केली जात होती. सणाच्यावेळी एकत्र जमलेले तरुण काठी चालविणे, तलवार चालविणे, भालाफेक करणे यासारखे खेळ खेळत. त्यावेळी त्यांचे साथीदार त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी गाणी गात असत.

महाराष्ट्रातील लोककलांवंतानी लोकगीतांची जपणूक मोठ्या प्रमाणात केलेली आढळते. त्यांनी आपल्या उदरनिर्वाहासाठी ही गीते गाण्याचे काम केले. मौखिक परंपरेने

पुरुषांच्या गीतांची जपणूक केलेली आढळते. ही गीते प्रामुख्याने वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, पोतराज, आराधी भराडी, भुत्ये, कुंभार इत्यादींनी गाण्याचे काम केले. त्याचे वर्णन धर्माच्या नावाखाली केले जाणारे मनोरंजन या घटकामध्ये दिलेले आहे.

## ६.८ लहान मुलांची करमणुकीची साधने व खेळ

प्राचीन काळी भारतीय लोक लहान मुलंना खेळण्यासाठी दगडाची खेळणी तयार करत असत. त्यानंतर मध्ययुगामध्ये मुलांसाठी लाकडी खेळणी तयार केली जात असून पेशवेकाळातही अशी खेळणी वापरली जात होती. तुळशीबाग वाल्यांच्या खर्चामध्ये सवाई माधवराव पेशव्याला वाघ व कासव ही खेळणी तयार करुन दिली, त्यासाठी ३१। रुपये खर्च केल्याच्या उल्लेख आढळतो.[११२] सुताराकडून ही खेळणी तयार करुन घेण्यात आली होती. याशिवाय नाना फडणिसाने वेगवेगळी श्वापदे, बंगाली बोलणाऱ्या सातआठ मैना, तसेच पोपट, चंडोल, बदके, मोर, पाणकोंबड्या, ससे, हरणे, चित्ते, इत्यादी राजवाड्यात आणून ठेवले होते.[११३] असे जिवंत प्राणी सामान्य कुटुंबातील मुलांना मिळत नसल्याने त्यांना लाकडी खेळणी व बाहुल्या यांच्यावर समाधान मानावे लागत होते. गावागावांमध्ये भरणाऱ्या जत्रामध्ये लाकडाच्या एकठोकळी बाहुल्या अगदी स्वस्तामध्ये मिळत होत्या. [११४] ज्यांची त्याही विकत घेण्याची ऐपत नव्हती ते घरीच बाहुल्या तयास करीत. एक जाड आकाराची काटकी घेऊन तिला चिकण मातीचा मुखवटा तयार करुन त्याला चिंधी नेसवून छान बाहुली केली जात होती. श्रीमंतासाठी मात्र बाजारात हस्तीदंती व काचेच्या बाहुल्या मिळत होत्या.[११५] बाहुल्यांच्या दागिण्यावर आणि कपड्यावर ते भरपूर रुपये खर्च करीत. युरोपमधील सुंदर बाहुल्यांबरोबर जरी त्यांची तुलना होत नसली तरी महाराष्ट्रातील मुलींची गरज भागविण्याचे व त्यांचे मनोरंजन करण्याचे काम त्या करीत. या बाहुल्याबरोबर विविध प्रकारचे खेळ करुन लहान मुली आपले मनोरंजन करीत असत.

## संदर्भ


१. आत्रे त्रिं. ना., गावगाडा, पृ.१२७

२. डॉ. मांडे प्रभाकर, लोकगायकांची परंपरा, पृ.६३

३. आत्रे त्रिं. ना., पूर्वोक्त, पृ.१२६

४. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.६४

५. डॉ. हंडीबाग भारत, मराठी लोकगीतातील समाज दर्शन, पृ.१०३

६. कित्ता, पृ.१०४

७. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.९३

८. डॉ. देखणे रामचंद्र, गोंधळ : परंपरा,स्वरुप आणि आविष्कार, पृ.८०

९. डॉ. गवळी पी.ए.,पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.२८३

१०. डॉ. देखणे रामचंद्र, पूर्वोक्त, पृ.८१

११. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ. १०४

१२. आत्रे त्रिं. ना., पूर्वोक्त, पृ.८१

१३. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.१४०

१४. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.१०६,
डॉ बाबर सरोजिनी, महाराष्ट्र लोकसाहित्य पुष्प पाचवे पृ.७२

१५. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.१४४

१६. कांबळे बळवंत, देवदासी, पोतराज, वाघ्या-मुरळी रुप-स्वरुप-विकृती, पृ. ८१

१७. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.१०६

१८. कांबळे बळवंत, पूर्वोक्त, पृ. ८१

१९. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.९८

२०. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.९८

२१. आत्रे त्रिं. ना., पूर्वोक्त, पृ.१२५

२२. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.११६,११७

२३. डॉ. बाबर सरोजिनी, मराठी लोकगीत, पृ.१२१ - १२३

२४. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.११७

२५. डॉ. बाबर सरोजिनी, पूर्वोक्त, पृ.१८९ ,

२६. डॉ. मांडे प्रभाकर, उपरोक्त पृ.२८६

२७. ऑ. डायरेक्टर, केळकर संग्रहालय, चित्रकथी (माहिती पुस्तीका), पृ. ९

२८. कित्ता, पृ.१०

२९. डॉ. आकलेकर भालचंद्र, कोकणचा सांस्कृतिक इतिहास, पृ.८६

३०. आत्रे त्रिं.ना., पूर्वोक्त, पृ.१२६

३१. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. ३४७

३२. तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खं.१० पृ. १६६
डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.११२

३३. कित्ता, पृ.११२

३४. तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.१० पृ.१६५

३५. आत्रे त्रिं.ना., पूर्वोक्त, पृ.१२१

३६. कित्ता, पृ.१२७

३७. चव्हाण रामनाथ, जाती आणि जमाती, पृ.३८

३८. कित्ता, पृ.३६

३९. शाहू दप्तर, रु. ३७ पु.१ का. ७८६

४०. सरदेसाई गो. स., पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खं.२२ पत्र.२६१

४१. कित्ता, खं.२२, पत्र २६३

४२. आत्रे त्रिं. ना. पूर्वोक्त, पृ.१२७

४३. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.११४

४४. कित्ता, पृ.११५

४५. डॉ. मांडे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.३४०

४६. कित्ता, पृ.३४०

४७. डॉ. आळतेकर भालचंद्र, पूर्वोक्त, पृ.८६

४८. ओतुरकर रा. वि., पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार, पत्र ३५

४९. आत्रे त्रिं. ना., पूर्वोक्त, पृ.१२७

५०. कित्ता, पृ.१२७

५१. चापेकर ना. गो., पेशवाईच्या सावलीत, पृ.१८६

५२. कित्ता, पृ.१८५

५३. कित्ता, पृ.१२७

५४. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र पृ.१३०

५५. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं. ७ पत्र ९६

५६. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.१३३,१३४

५७. कित्ता, पृ.१३४

५८. कित्ता, पृ.१३४

५९. कित्ता, पृ.१३६

६०. पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश र., पेशवेकालीन पुणे, पृ.१०२

६१. कित्ता, पृ.१०३ - १०५

६२. कित्ता, पृ.१०६

६३. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.४५

६४. केळकर य. न., भूतावर भ्रमण (ऐति. लेखसंग्रह), पृ.११०

६५. कित्ता, पृ.११०

६६. सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.७ पत्र.९६

६७. चिटणिस दप्तर रु.३७ पु.१ का.१९६९०, १९६९२

६८. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.५०

६९. केळकर य. न., ऐतिहासिक पोवाडे, पृ.१९०

७०. केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.१११

७१. कित्ता, पृ.१०५

७२. कित्ता, पृ. १०९

**७३.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.१८ पत्र ८९

**७४.** डॉ. देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री-जीवन, पृ.५२

**७५.** कित्ता, पृ.५३,

केळकर य. न., इतिहासातील सहली, पृ.२३१ - २३६

**७६.** पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश र., पेशवेकालीन पुणे, पृ.१०१

**७७.** कित्ता पृ. १०१,

**७८.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.५३

**७९.** केळकर य. न., भूतावर भ्रमण पृ.१०८

**८०.** सरदेसाई गो. स., पूर्वोक्त, खं.३२ पत्र ४३

**८१.** पारसनिस द. ब., अनु. डॉ. देशपांडे सुरेश र., पूर्वोक्त, पृ.१०२

**८२.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.५५

**८३.** केळकर य. न., पूर्वोक्त, पृ.१०७

**८४.** पं. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खं.६ पृ.२०२

**८५.** कित्ता, पृ.२०२

**८६.** भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.६६

**८७.** पेशवा दप्तर सं. नि. का. ३०/२/१६७२२

**८८.** पं. जोशी महादेवशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.२ पृ.६७६

**८९.** चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.१९७

**९०.** पं. जोशी महादेवशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.२ पृ.६७६

**९१.** तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.६.पृ.५५५

**९२.** पं. जोशी महादेवशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.९ पृ.७५७

**९३.** तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, खं.१७ पृ.७६३

**९४.** कित्ता, पृ.७६३

**९५.** शाहू दप्तर, रु.४६ पु.५ का. ७१८६७

**९६.** पेशवा दप्तर, सं. नि. का., रु.२९ पु.६ का.१६४५३

९७. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.१३०

९८. कित्ता, पृ.१३७

९९. कित्ता, पृ.१३७

१००. कित्ता, पृ.१३७

१०१. डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ.१९२

१०२. डॉ. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरुप पृ.३२३

१०३. डॉ. बाबर सरोजिनी, महाराष्ट्र लोकसाहित्य, पुष्प पाचवे, पृ.१६

१०४. डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ.१७७

१०५. डॉ. बाबर सरोजिनी, पूर्वोक्त, पृ.३१

१०६. बेंद्रे सुयोग (संकलक), दै. सकाळ ५ जून २०११, चतुरंग पुरवणी, पृ.११

१०७. डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ.१९३

१०८. डॉ. हंडीबाग भारत, पूर्वोक्त, पृ.१०१

१०९. कित्ता, पृ.१४४

११०. कित्ता, पृ.१३४

१११. डॉ. गवळी पी. ए., पूर्वोक्त,पृ.१२६,१२७, भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.२८६,२८७

११२. चापेकर ना. गो., पूर्वोक्त, पृ.३

११३. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ.५२

११४. डॉ. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ.४१

११५. कित्ता, पृ.४१

प्रकरण

७वे

# उपसंहार

**प्रकरण सातवे**

# उपसंहार

भारतीय इतिहासामधील एक महत्वाचा कालखंड म्हणून पेशवेकाळ ओळखला जातो. याकाळात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रवाहाला गतिमान करण्याचे काम मनोरंजनाच्या विविध साधनांनी केले. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला शाहूच्या सुटकेनंतर गती प्राप्त झाली होती. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करुन आपल्या राज्यातील सामान्य जनतेला सुखसमाधान देण्याचे कार्य केले. त्यांच्या काळातील राजकीय धामधुमीमुळे त्यांनी मनोरंजनाच्या साधनांच्या विकासाकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळे त्यांच्या काळात पांरपरिक मनोरंजनाची साधने प्रचलित असून त्यामध्ये शाहिरांच्या पोवाड्यांची भर पडली होती. महाराजांच्या निधनानंतर मात्र इ.स. १६८३ ते इ.स.१७०७ या काळात औरंगजेबाच्या प्रत्यक्ष स्वाऱ्यामुळे व त्याच्या महाराष्ट्रातील वास्तव्यामुळे येथील जनतेची राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राची प्रगती खुंटली होती. यावेळी मोगली कैदेत असलेल्या शाहूला मुक्त करण्याचा विचार औरंगजेबाच्या मनात आला होता. त्याला मांडलीक ठरवून सोडून दिले तर आपणास आराम पडेल असे बादशहाला वाटत होते. परंतु शाहूला सोडून दिल्यानंतर मराठे अधिकच प्रबळ बनतील व दख्खन आपल्या ताब्यातून जाईल या भितीने औरंगजेबाने त्याला सोडले नाही. शुक्रवार दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे औरंगजेबाचे निधन झाले. त्याच्या मृत्यूनंतर शहाजादा अझम याने बादशहा झाल्याचे घोषीत केले. त्यावेळी निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन ताराबाईने मोगलांच्या ताब्यात गेलेले किल्ले जिंकून घेण्याचा सपाटा लावला. त्यामुळे मराठ्यामध्ये दुही निर्माण करण्यासाठी शाहूला सोडण्याचा निर्णय अझमशहाने घेतला. त्यावेळी शाहूने बादशहाचे वर्चस्व मान्य करुनच राज्यकारभार चालवावा असे ठरले होते. दि. ८ मे १७०७ रोजी मुगल छावनी सोडून शाहू भरतपूर, जयपूर यामार्गाने महाराष्ट्रात आला. मराठ्यांच्या राज्याचा ताबा मिळविण्यासाठी शाहू व ताराबाई यांच्यामध्ये वैचारिक संघर्ष होऊन त्याचे रुपांतर खेडच्या लढाईत झाले. १२ ऑक्टोबर

१७०७ रोजी खेडच्या लढाईत ताराबाईचा पराभव करुन त्याने मराठ्यांच्या राज्यावरील आपला हक्क शाबीत केला. त्यानंतर त्याने सातारा येथे स्वत:चा राज्याभिषेक करुन तो छत्रपती बनला. ताराबाईने कोल्हापूर येथे राज्याची स्थापना केल्यामुळे मराठी राज्याची दोन छकले पडली. शाहूची मोगली कैदेतून सुटका झाल्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनप्रवाहाला गती मिळाली. शाहू हा जरी छत्रपती झाला तरी त्याने राज्यकारभाराची सर्व जबाबदारी आपल्या पेशव्यांवर सोपविली होती. त्याने पेशवेपद हे श्रीवर्धनच्या भट घराण्याकडे सोपविले आणि ते वंशपरंपरागत त्या घराण्याकडे ठेवले. शाहूप्रमाणेच त्याच्यानंतरच्या छत्रपतीनींही हेच धोरण पुढे चालू ठेवले. त्यामुळे छत्रपती नामधारी सत्ताधिश आणि त्यांचे प्रधान कार्यकारी सत्ताधिश बनले. त्यांची कारकिर्द मराठ्यांच्या इतिहासात 'पेशवेकाळ' म्हणून ओळखली जाते.

पेशवेकाळात समाजाची उभारणी परंपरेनुसार चालत आलेल्या चातुर्वण्य व्यवस्थेवर आधारीत होती. स्थायी समाज व अस्थायी समाज अशा दोन गटामध्ये समाज विभागलेला होता. अस्थायी लोकांना फिरस्ते लोक असेही म्हणत असून त्यांच्यामध्ये कलाकार आणि व्यवसायिक असे दोन गट होते. त्यापैकी सामाजिक मनोरंजनामध्ये कलाकार लोकांची भूमिका महत्वाची होती. स्थायी समाजातील लोक मोठ्या प्रमाणात खेड्यात राहणारे होते. त्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने दिवसभर त्यांना शारीरिक कष्टाची कामे करावी लागत होती. त्यामुळे त्यांना श्रमपरिहारार्थ मनोरंजनाची आवश्यकता होती. यावेळी मराठ्यांच्या राज्याचे साम्राज्यात रुपांतर होण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे अनेक मराठ्यांनी शिपाईगिरीचा पेशा स्विकारला होता. उत्तरेकडील मोहिमांच्या निमित्ताने मराठा सरदार आपल्या फौजा घेऊन वर्षातील सुमारे आठ महिने घराबाहेर पडत. त्यावेळी मोघली सैन्याप्रमाणे त्यांनादेखील मनोरंजन साधनांची गरज वाटू लागली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये फक्त लढणाऱ्या सैनिकांचा समावेश होता. मात्र पेशवेकालीन सैन्यामध्ये मुस्लीम सत्ताधिशांच्या सैन्याप्रमाणे कलाकार व बाजारबुणग्यांचा समावेश मोठ्या प्रमाणात झाला होता. त्यामुळे त्यांच्या छावनीमध्ये मनोरंजनाचे कार्यक्रम होऊ लागले होते. यावरुन असे लक्षात येते की, गावामध्ये राहणाऱ्या लोकांचे व मोहिमेवर गेलेल्या सैन्यांचे मनोरंजन करण्यासाठी मनोरंजनाची साधने निर्माण झाली होती. पेशवेकाळात सामाजिक मनोरंजनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सण, उत्सव, यात्रा, उरुस व

सुगीच्या दिवसात केले जात होते. अस्थायी किंवा फिरस्ते लोक सुगीच्या दिवसात गावोगावी फिरुन लोकांचे मनोरंजन करत होते. पेशवेकाळातील मनोरंजनाच्या विविध साधनांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला गती देण्याचे काम केले होते. त्यामुळे महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन समृध्द होण्यास मदत झाली.

छत्रपती शाहूने बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिल्यानंतर त्याने पराक्रमाच्या जोरावर मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर केले. त्यामुळे अनेक मराठ्यांची घराणी पुढे येऊन त्यांना कर्तबगारी सिध्द करण्याची संधी मिळाली. याबरोबरच मराठ्यांचा संबंध उत्तर भारताशी आल्यामुळे ते मनोरंजनाकडे जास्त आकर्षित होण्यास सुरुवात झाली. कोणत्याही राज्यकर्त्याच्या दरबारात जर कलाकारांना मानसन्मान व त्यांच्या कलेला उत्तेजन मिळाले तरच ती कला उत्कर्षाला पोहचत असते. छत्रपती शाहूची सतरा वर्षे मोगली कैदेत गेल्यामुळे त्याला नाचगाण्याची चांगली आवड होती. त्यामुळे त्याने दूरदूरच्या ठिकाणाहून गवई, नट, भाट, नायकिणी इत्यादींचा संच जमविला होता. उत्तर हिंदुस्थानातील कलावंतिणी व कर्नाटकातील गुणी कलाकारांना दरबारात आणले होते. त्यामुळे शाहूच्या काळात महाराष्ट्रात नाचगाण्याच्या विकासाला सुरुवात होऊन राज्यकर्त्यांपाठोपाठ सामान्य लोकांच्याही मनोरंजनाची सोय झाली. ज्या मराठ्यांच्या राज्यामध्ये लावण्यवती आणि उत्कृष्ट कपडे परिधान करणाऱ्या नर्तकी दिसणे ही दुर्मिळ बाब होती, त्या राज्यात शाहूच्या काळापासून ती दरबारी वातावरणाचे एक अविभाज्य अंग बनली. नाचगाणे करणाऱ्या कलावंतिणींना शाहूने जमिनी इनाम देऊन त्यांच्या कलेची कदर केली. त्यामुळे त्यांनी आपले आयुष्य राज्यकर्त्यांचे व समाजाचे मनोरंजन करण्यासाठी घालविले.

छत्रपतीप्रमाणे पेशव्यांनीही कलाकारांचा यथोचित सन्मान करण्याचे धोरण पुण्यामध्ये चालविले होते. पहिल्या बाजीराव पेशव्यांना छत्रसाल बुंदेला याच्याकडून मस्तानी भेट मिळाली होती. तिच्या पुण्यातील आगमणामुळे साताऱ्यापाठोपाठ पुण्यामध्येही नाचगाण्यांचे विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होऊ लागले. यावेळी विविध सण, उत्सव आणि समारंभप्रसंगी नाचगाण्यांचे कार्यक्रम आयोजित केले जात असत. नानासाहेब पेशव्याचा भाऊ रघुनाथराव हा अतिशय रसिक असल्यामुळे त्याने उत्तरेतील अनेक नर्तकींना पुण्यामध्ये आणून ठेऊन त्यांना सरकारी खजिन्यामधून मासिक पगार देण्याची व्यवस्था केली होती. सवाई माधवराव पेशव्यांच्या

काळात तर  नाचगाण्यांच्या परंपरेचा चांगलाच विकास झाला होता. पुढे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात व्यंकट नरसी आणि धर्मी पारी या दोन नर्तकींना अतिशय लोकप्रियता मिळाली होती. व्यंकट नरसी ही नुसती नाचणारी व गाणारी नसून, कोणतेही वाद्य वाजविण्यात ती अतिशय कुशल होती. त्यावेळी उत्तम कलावंतांना चांगली मागणी असून त्यांना भरपूर पगार दिला जात होता. आपल्याकडे येणाऱ्या कलावंतांची काळजी घेण्याचे काम राज्यकर्ते करत होते, त्यामुळेच दूरदुरचे कलाकार आपली कला सादर करण्यासाठी त्यांच्या दरबारात येत होते. इ.स १८०२ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यांने व्यंकट नरसी हिला सतत तीन रात्री नृत्य केल्याबद्दल २६,००० रुपये बक्षिस दिले होते. त्याबरोबरच तिला वैजापूर तालुक्यातील करंजगाव हा गाव इनाम दिला होता. नानासाहेब पेशव्यांच्या काळापासून पेशवे दरबारात छैया गोसावी पैठणकर हा हरदास अतिशय लोकप्रिय झाला होता. त्याचाच नातू रामचंद्र गोसावी हा दुसऱ्या बाजीरावाच्या दरबारात गवय्या म्हणून आणि मर्जितील व्यक्ती म्हणून लोकप्रिय झाला होता. पहिल्या बाजीरावापासून दुसऱ्या बाजीरावापर्यंतचे सर्वच पेशवे हे कलाप्रेमी असून त्यांनी कलाकारांना दिलेला आश्रय, इनाम जमिनी आणि चांगली बक्षिसे यामुळे मनोरंजनाच्या विविध प्रकारांचा अथवा साधनांचा विकास झाला होता.

पेशवे दरबारात अनेक कीर्तनकार, शाहीर, तमासगिर, गायक, गायिका, वादक, कलावंतिणी इत्यादींना आपली कला सादर करण्याची संधी विविध कार्यक्रमांच्या प्रसंगी मिळत होती. त्यावेळी त्यांच्या कलेची कदर केली जात होती. पेशवे हे ब्राम्हण धर्माभिमानी असल्यामुळे धार्मिक सण, समारंभ व उत्सव प्रसंगी लोकांच्या मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्याची प्रथा पडली होती. तत्कालीन सर्वसामान्य जनता ही राज्यकर्त्यांचे अनुकरण करणारी होती. त्यामुळे राज्यकर्त्यांचे अनुकरण करुन विविध सण, समारंभ व उत्सव ते साजरे करत असत. त्यानिमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमातून सामान्य जनतेचे चांगले मनोरंजन होत होते. अशाप्रकारे महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन समृध्द होण्याची सुरुवात शाहूच्या आगमनानंतर झाली. पुढील काळात पेशव्यांनीही शाहूचेच धोरण अंगिकारले होते. त्यामुळे त्यांच्या काळात मराठ्यांची सत्ता राजकीय व सांस्कृतिक दृष्टिने सर्वश्रेष्ठ सत्ता म्हणून हिंदुस्थानात ओळखली जाऊ लागली.

मनोरंजन साधनांच्या विकासाचा आणि भरभराटीचा काळ म्हणून पेशवेकाळ ओळखला जातो. यावेळी मनोरंजनाची कांही नवी साधने उदयास आली त्याबरोबरच पारंपरिक साधनेही लोकप्रिय होत गेली. त्यापैकी रोमांचकारी मनोरंजन प्रकार म्हणून शाहीरांच्या पोवाड्याचा विकास झाला. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या बुध्दीमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय. प्राचीन काळापासून ते शिवकाळापर्यंत पोवाड्यांचा विकास होत गेला होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे महान कार्य केल्यापासून वीररसात्मक पोवाडे गाण्याचे काम गोंधळ्यांनी केले. शिवकाळात गोंधळ्यांनी सुरु केलेल्या हे कार्य पुढे नेण्याचे काम पेशवेकाळात वेगवेगळ्या जातीधर्मातील शाहीरांनी केले. त्यामुळे शाहीर नावाची वेगळी जात महाराष्ट्रात अस्तित्वात नाही हे सिध्द होते. शाहीर खुशाबा, त्रिंबक साळी, गणू महादू, जिवाजी पांचाळ, दाजी रामा, धोंडी नारायण, परशराम, प्रभाकर, फिरंगु नाना, बापू खंदेशी, बापू गिरकर, राणू सुतार, लहरी मुकुंदा, सगनभाऊ, संतू महार इत्यादी शाहिरांनी पोवाड्यांचा विकास केला. हे शाहीर विविध जाती-धर्माचे प्रतिनिधीत्व करणारे होते. पोवाडे रचणारे व गाणारे जसे ब्राम्हण शाहीर होते तसे अस्पृश्य जातीतील देखील शाहीर होते. संतू महार हा अस्पृश्य जातीतील शाहीर करवीरकर छत्रपतींच्या आश्रयाला होता. हिंदु शाहीरांप्रमाणे सगनभाऊ हा मुस्लीम शाहीर पोवाड्यांमधून लोकांचे मनोरंजन करत होता.

तत्कालीन शाहिरांनी मराठी विरांच्या पराक्रमाचे गोडवे गाण्याचे व राजकीय परिस्थितीच्या वर्णनातून लोकां च्या मनामध्ये एक वादळ निर्माण करण्याचे, कामही पोवाड्यांमधून केले. पेशव्यांनी शाहिरांना सन्मानाची वागणूक दिल्यामुळे पोवाड्यांचा विकास घडून आला. त्यावेळी शाहीरांनी शाहू महाराज, पेशवे, पेशवेकालीन इतर ऐतिहासिक व्यक्ती यांच्या जीवनप्रसंगावर व पेशवाईतील वेगवेगळ्या महत्वाच्या युध्दप्रसंगावर पोवाडे रचून ते लोकप्रिय केले. त्यामुळे पेशवेकालीन मनोरंजनाच्या इतिहासामध्ये पोवाड्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. तत्कालीन पोवाड्यांनी लोकांचे मनोरंजन करण्याबरोबरच समाजामधील शौर्याला जागृत करण्याचेही कार्य केले. तरुणांच्या मनामध्ये आपल्या पुर्वजाबद्दल अभिमान निर्माण करण्यास पोवाडे उपयुक्त ठरलेत. पोवाड्यामधील कथानकामधून आणि ऐतिहासिक व्यक्तींच्या वर्णनामधून समाजाची शौर्य परंपरा कायम राखण्यास मदत झाली. शाहीरांनी

पोवाड्यांमध्ये ऐतिहासिक व्यक्तिमत्वांच्या वर्णनाबरोबरच सामाजिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीचेही वर्णन केले आहे. शाहिरांनी पोवाड्यामध्ये सामान्य व्यक्तीला स्थान दिले नसून राज्यकर्त्यांनी गाजविलेला पराक्रम आणि त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक जीवनातील घटनांना जादा महत्व दिलेले आहे. तरीदेखील सामान्य जनतेने मनोरंजनाचे एक साधन म्हणून पोवाड्यांचे स्वागत केले होते.

विविध समारंभ प्रसंगी राज्यकर्त्यांसमोर शाहिरांना आपले पोवाडे सादर करण्याची संधी मिळत होती. खासकरुन दसऱ्याच्या सणावेळी ते आपले नवे पोवाडे सादर करुन बक्षिस व सन्मानाची वस्त्रे मिळवत होते. राज्यकर्ते आपल्यावर खुष व्हावेत आणि त्यांच्याकडून पोवाड्याबद्दल चांगले बक्षिस मिळावे म्हणून शाहीर पोवाड्यातील वर्णन अतिरंजक करत होते. सर्वच शाहिरांना सरकार दरबारी पोवाडा सादर करण्याची संधी मिळत नव्हती. ज्यांना संधी मिळाली त्यांचे त्यावेळी राज्यकर्ते कौतुक करुन त्यांना चांगले बक्षिस देत होते. अनेकदा शाहिरांनी पोवाड्याच्या शेवटी पोवाडा गाणाऱ्याचे व राज्यकर्त्यांनी दिलेल्या बक्षिसाचे वर्णन केले आहे. तत्कालीन शाहिरांना प्रजेचे पोवाड्याव्दारे मनोरंजन करुनच आपला उदरनिर्वाह चालवावा लागत होता. त्यामुळे हा वर्ग पोवाड्याकडे जादा आकर्षित व्हावा म्हणून राजकीय विषयाबरोबरच सामाजिक, आर्थिक व धार्मिक विषय देखील पोवाड्यामध्ये घेतले होते. त्यामुळे पेशव्यांचे राज्य गेल्यानंतरही मराठी जनतेच्या मनातून शाहिरांच्या पोवाड्यांचे महत्व कमी झाले नाही.

तमाशा हा पेशवेकाळात उदयास आलेला सामाजिक मनोरंजनाचा नवा प्रकार होय. लोकांच्या मनोरंजनाच्या रुचीमध्ये बदल होत गेल्यामुळे या मनोरंजन प्रकाराचा उदय झाला होता. पारंपरिक व अध्यात्मिक मनोरंजनाऐवजी लोकांचा शाहिरांच्या रोमांचकारी व स्वच्छंदी मनोरंजनाकडे कल झुकला होता. मराठी माणसाचे तत्कालीन शाहिरांच्या पोवाड्यांनी रोमांचकारी मनोरंजन आणि तमाशाने स्वच्छंदी मनोरंजन करण्याचे काम केले. त्यावेळच्या तमाशाला ढोलकीचा तमाशा किंवा नाच्या-पोऱ्याचा तमाशा असे म्हटले जात होते. कवने रचणारा शाहीर हाच या तमाशा फडाचा मालक असे. पेशवाईच्या उत्तरार्धात तमाशाला राजदरबारात प्रवेश व प्रतिष्ठा मिळाली होती. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तर तमाशाने लोकप्रियतेचे परमोच्च शिखर गाठले होते. राजदरबारात या प्रकाराला प्रतिष्ठा मिळाल्याने सामान्य जनतादेखील त्याकडे जास्त

आकर्षित झाली होती. तमाशाचे ताफे गावोगावी हिंडून लोकांचे मनोरंजन करत होते. श्रीमंतांचे मनोरंजन करण्यासाठी जशा नृत्य करणाऱ्या कलावंतिणी किंवा नाईकिणी उपलब्ध केल्या जात होत्या तशा तमाशामध्ये काम करण्यासाठी महाराष्ट्रात स्त्रिया मिळत नव्हत्या. त्यामुळे सुंदर व गोड गळ्याचा मुलगा तमाशामध्ये नाच्या म्हणून काम करत असे. तमाशामध्ये नृत्य, नाट्य,संगीत व अभिनय याला अतिशय महत्व होते.

गण, गौळण, लावणी, भेदिक कवने आणि मुजरा अशा पाच प्रमुख अंगामध्ये तमाशाचे सादरीकरण होत होते. आरंभी गण म्हणजे गणेशनमनाची गीते गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली जात होती. सरदार आपल्या साथीदारासह आणि संगीत वाद्यासह उंच आवाजात गणेशनमन करतो, त्यालाच गण असे म्हणतात. शतकानुशतके जीवनातील कोणत्याही शुभकार्याचा आरंभ गणेशाच्या पुजनाने, स्तोत्रगीताने वा आवाहनाने करण्याची प्रथा प्रचलीत आहे. हीच प्रथा अनेक महाराष्ट्रीय लोककलांनी आणि तमासगिरांनी स्वीकारलेली आढळते. त्यामुळे सर्व लोककलांच्या आरंभी गणेशस्तुती केली जात असल्याचे आढळते. तमाशा हे सर्वसामान्यांच्या मनोरंजनाचे साधन असल्याने त्याची सुरुवात गण गाऊन होत असे. गण सादर करुन झाल्यानंतर गौळणी सादर केल्या जात असत. गौळण म्हणजे गोपी आणि कृष्ण यांच्या लीलाविषयीची गीते. या भागामध्ये सुरुवातीला कृष्णाच्या विविध खोड्यांचे वर्णन करणाऱ्या व त्यानंतर त्याच्या स्तुतिपर गौळणी गायल्या जात. पेशवेकालीन शाहीरांनी तमाशामध्ये सादर करण्यासाठी रचलेल्या गौळणी शृंगारप्रधान व अध्यात्मिक अशा दोन्ही भावनांचे प्रकटीकरण करणाऱ्या होत्या. त्या केवळ गायन करुन सादर केल्या जात नव्हत्या तर त्या साभिनय व संवादासह सादर केल्या जात होत्या.

लावणी हा तमाशामधील महत्वाचा, जास्त काळ चालणारा आणि लोकांचा सर्वात आवडता कार्यक्रम होय. त्यामुळेच तमाशाला लावण्यांचा कार्यक्रम या नावानेही ओळखले जात होते. नाशिक (गोदातीर), बार्शी, मराठवाडा, तुळजापूर, नागपूर, संगमनेर, जुन्नर, सातारा, कराड, कोकण, कोल्हापूर, बालाघाट या भागात लावण्यांची निर्मिती करणारे शाहीर उदयास आले होते. पेशव्यांच्या आश्रयाने वाढलेल्या शाहीरांच्या लावणीत अश्लिलतेचे व उत्तान शृंगाराचे जे प्रमाण दिसते, त्याच्या अल्पांशाने लोकाश्रयाने व लोकरंजनासाठी निर्माण झालेल्या लावण्यामध्ये ते दिसत नाही. संसारात शिणलेल्या, मुलूखगिरीत गुंतलेल्या व विलासात

रमलेल्या लोकांच्या मनोरंजनासाठी लावण्या रचल्या जात होत्या. त्यामुळे शाहीरांनी लौकिक विषयावर जास्त लावण्या लिहिल्या. त्याबरोबरच त्यांनी पौराणिक आणि अध्यात्मिक विषय त्याज्य न मानता ते देखील वेगळ्या ढंगामध्ये लोकांसमोर सादर केले. तमाशाचे सादरीकरण चौकामध्ये, देवळाच्या समोरील कठड्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी होत असे. या तमाशामध्ये शाहीर स्वरचीत लावण्या मोठ्या जनसमूहासमोर गात असत. कित्येकदा या लावण्या तिथल्या तिथेच रचून म्हटल्या जात असत. जनसामान्यांच्या मनोरंजनासाठी सादर होणाऱ्या तमाशाच्या कार्यक्रमाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळावा म्हणून शृंगार, उत्तानता, उथळपणा व सूचकतेचा अभाव असणाऱ्याच लावण्या जास्त प्रमाणात गायल्या जात होत्या. शाहीरांमधील स्पर्धेमुळे प्रतिस्पर्ध्याला कमी लेखणे आणि स्वत:चा गौरव करणे शाहीरांना भाग पडत असे. तमाशामध्ये सादर करण्यासाठी शाहीरांनी मोठया प्रमाणात शृंगारिक लावण्या रचल्या आहेत. कृष्णगोपींचा शृंगार आणि लौकिक शृंगार असे या लावण्यांचे उपप्रकार आहेत. होनाजी, रामजोशी, प्रभाकर, आदि लावणीकार कृष्णगोपींचा शृंगार रंगवण्यामध्ये आघाडीवर होते. त्याशिवाय व्यक्तिवर्णनपर, अनेक भाषिक, विनोदी, प्रासंगिक, लौकिक कथा सांगणाऱ्या, अध्यात्मिक, भेदिक व मुजऱ्याच्या लावण्या गाऊन लोकांचे मनोरंजन केले. पेशवेकाळातील तमाशा लोकप्रिय करणारे होनाजी बाळा, अनंत फंदी, परशुराम, रामजोशी, सगनभाऊ, प्रभाकर, गंगु हैबती हे प्रमुख तमासगीर होते.

होळीच्या सणावेळी सरकार दरबारात आणि वर्षभर गावोगावी फिरुन तमासगीर आपली कला सादर करत होते. त्यावेळच्या तमासगिरांना हरदासाइतका समाजामध्ये बहुमान मिळत नव्हता. तरीदेखील सामान्य लोकांचे मनोरंजन करणारे तमाशाचे अनेक फड यावेळी उदयास आले होते. शिमग्याच्या सणाचे पाच दिवस हे तमासगिरांना भरपूर कमाई करुन देणारे दिवस होते. शिमगा हा ख्याली-खुशालीचा, नाचरंगाचा आणि बिभत्स शृंगाराचा सण म्हणून साजरा केला जात होता. पेशव्यांच्या शनिवारवाड्यामध्ये तर यावेळी महाराष्ट्रातील अनेक नामांकित कलावंत, शाहीर, तमासगीर, कसबिणी, कलावंतिणी, नाचे आपली हजेरी लावून गुणाप्रमाणे बक्षिस मिळवत होते. त्यामुळे शिमग्याचा सण म्हणजे पुण्यातील लोकांना मनोरंजनाची चांगली मेजवानी होती. पेशवे दप्तरामध्ये शिमग्याच्या सणावेळी तमासगिरांना दिलेल्या बिदागी वरुन

कोणकोणत्या कलाकारांना आपली कला दरबारात सादर करण्याची संधी मिळाली होती, याची माहिती मिळते. त्यामध्ये सिदू राऊळ, सतापा गवळी, बाळा बहिरु, सटवा न्हावी, राणू शिंपी, रामा गंवड्या, गोविंदा इंदुलकर सोंगाडी, होना गवळी, लहरी मुकुंदा, तुळ्या सोंगाड्या इत्यादी कलाकारांचा समावेश होता. या कलाकारांच्या नावावरुन लक्षात येते की, ते वेगवेगळ्या जातींमधून आलेले होते. त्यामुळे सर्व जातींच्या कलाकारांना या कलाप्रकारात सहभागी होण्याची संधी होती असा निष्कर्ष निघतो. त्यांना बक्षिसाप्रमाणेच पोशाख किंवा वस्त्रे देखील देण्यात येत असत. नाच्याची भूमिका करणाऱ्या कलाकारांना पैठणी व औरंगाबादी लुगडे दिल्याचे उल्लेख मिळतात. तमाशामधील नाच्या पोराला आणि सोंगाड्याला जास्त बक्षिस मिळत होते. त्यामुळे पेशवे दरबारात कला सादर करण्यासाठी हे कलाकार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येत होते. एकाच कलाकाराचे नाव अनेक वर्षांच्या नोंदीमध्ये सापडते.त्यावरुन ते दरवर्षी कला सादर करत असल्याचे सिध्द होते. मात्र एवढ्या लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचलेल्या कलाकारांना पेशव्यांकडून इनाम जमीन किंवा मोठे बक्षिस मिळालेले दिसत नाही. उलट कीर्तनकार व पुराणिकांना मात्र इनाम जमीन व चांगले मानधन दिलेले आढळते. व्यंकटनरसिंह व रामचंद्र गोसावी यांना दिलेल्या रक्कमा पाहता तमासगिरांना दिलेल्या देणग्या अतिशय कमी वाटतात. बाजीरावाने रामचंद्र गोसाव्याला शुक्रवार वाड्यासमोर वाडा बांधण्यासाठी पन्नास हजार रुपये व कर्ज निवारण्याकरिता ७०००रु. दिले होते. यावरुन असे म्हणता येते की, पेशव्यांच्या वैयक्तिक मनोरंजनासाठी असणाऱ्या कलाकारांना जादा मोबदला दिला जात होता आणि संपूर्ण समाजाचे मनोरंजन करणाऱ्या तमासगिरांना व शाहीरांना अल्प मोबदल्यावर समाधान मानावे लागत होते.

पेशवेकाळात अनेक गावांमध्ये तमासगिरांचे फड होते. मात्र त्यापैकी जे नामांकित होते, त्यांनाच पेशवे सरकारपुढे कला सादर करण्याची संधी मिळत होती. इतर कलाकार गावागावामध्ये फिरुन आपला खेळ सादर करत होते. त्यामुळे समाजाचे चांगले मनोरंजन होत होते. बाजीरावाने अनेक शाहीरांना आश्रय दिल्यामुळे पुणे शहर हे पश्चिम भारतामधील महत्वाचे तमाशा केंद्र म्हणून उदयास आले होते. पुण्यापाठोपाठ वाई, सातारा, सांगली या भागामध्येही तमाशाची लोकप्रियता वाढत गेली. त्याच्या काळामध्ये तमाशामध्ये स्त्री नाची हे पात्र आल्यामुळे तर तमाशाची लोकप्रियता जास्तच वाढली.

महाराष्ट्रात उदयास आलेल्या तमाशा या मनोरंजनाच्या साधनामुळे मराठी लोकांच्या मनोरंजनाच्या रुचीमध्ये बदल घडवून आणण्याचे काम केले. प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेने या मनोरंजन साधनाचे मोठ्या प्रमाणात कौतुक केले. कारण तमाशा हा तत्कालीन पारंपरिक मनोरंजन प्रकारापेक्षा जास्त आकर्षक होता. त्यामध्ये आकर्षक नृत्य, शृंगारिक लावण्या, नाटकीय मूल्ये, विनोद आणि उत्तम दर्जाचे संगीत होते. स्वत:ला आधुनिक समजणाऱ्या ब्राम्हण कुटुंबातील रामजोशी व प्रभाकर यांच्यासारखे लोकदेखील तमाशाकडे आकर्षित झाले. त्यामुळे तमाशा कलाप्रकाराला लोकाश्रय व राजाश्रय मिळाला. व्यापक अर्थाने तत्कालीन संपूर्ण समाजाचे तमाशा हे मनोरंजनाचे प्रमुख साधन बनले. लोकांना आकर्षित करण्यामध्ये तमाशाने इतर मनोरंजन प्रकारावर बाजी मारल्यामुळेच पुढे इंग्रज राजवटीच्या काळात आणि त्यानंतर स्वांतत्र्योत्तर काळातही तो आपले अस्तित्व टिकवून आहे. स्वातंत्र चळवळीतही तमाशांचा लोकजागृतीसाठी काही ठिकाणी वापर करण्यात आला. सामान्य लोकांच्या भाव भावना आणि इच्छा आकांक्षा त्यामधून व्यक्त होत असल्यामुळेच टीका होऊनही पेशवाईत उदयास आलेला हा मनोरंजन प्रकार आपले अस्तित्व आजही टिकवून आहे. या मनोरंजन साधनामधील लावणी हा नृत्यप्रकार तर आज महाराष्ट्राचे लोकनृत्य बनले आहे.

रगील व रंगेल लोकांच्या मनोरंजनासाठी ज्यावेळी तमाशाला बहर येत चालला होता, त्याचवेळी अध्यात्मिक प्रवृत्तीच्या लोकांच्या मनोरंजनासाठी धार्मिक मनोरंजनाची साधनेही उदयास आली होती. यापैकी कांही पारंपरिक तर कांही नवी साधने होती. कीर्तन, भजन, पुराणपठण, लळीत, गोंधळ, जागरण, दशावतार इत्यादी साधनांचा त्यामध्ये समावेश होता. ही साधने जरी अध्यात्मिक उन्नती करण्याच्या उद्देशाने उदयास आली असली तरी त्यामधूनही लोकांचे मनोरंजन होत होते. यावेळी मराठी राज्याचा कारभार पेशव्यांच्या हातात गेला होता. ते जातीने ब्राम्हण असल्याने समाजात ब्राम्हणांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. ब्राम्हण वर्गाच्या प्रभावामुळे समाजामध्ये अनेक धार्मिक चालीरितींना व श्रध्दांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे समाजात दानधर्म, नवस, तिर्थयात्रा, अनुष्ठान इत्यादी धार्मिक चालीरिती समाजामध्ये दृढ झाल्या. तत्कालीन समाज धार्मिकदृष्टया खूप श्रध्दाळू असल्याने या चालीरितींनी उग्र रुप धारण केले होते. त्यामुळे धार्मिक कार्यक्रमाच्या प्रसंगी सादर होणाऱ्या कार्यक्रमांचा उद्देश

हा जरी अध्यात्मिक असला तरी त्यामधूनही सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन होत होते. असे अध्यात्मिक उन्नतीचे व मनोरंजनाचे कार्यक्रम प्रामुख्याने सण, समारंभ व उत्सवांच्यावेळी होत असत. त्यामुळे मनोरंजनाची साधने आणि तत्कालीन सण, समारंभ व उत्सव यांचा घनिष्ट संबंध होता हे स्पष्ट होते. तसेच थोरामोठ्यांच्या व राज्यकर्त्यांच्या घरी होणारे विविध समारंभ हे सर्वसामान्यांना आनंद देणारे व त्यांचे मनोरंजन करणारे होते. त्यामुळे अशा कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लोक उपस्थित रहात होते. सण समारंभांच्या निमित्ताने समाजाच्या सर्व थरातील लोक एकत्र येऊन आनंद व्यक्त करीत, त्यामुळे त्यांचे मनोरंजन होत होते. यावेळी दसरा, दिवळी, होळी, रंगपंचमी, मकरसंक्रांती इत्यादी प्रमुख सण आणि गणपती उत्सव, गोकुळाष्टमी, महाशिवरात्री, रामनवमी, हनुमानजयंती यासारखे धार्मिक उत्सव साजरे केले जात होते. वैयक्तिक अथवा कौटुंबिक स्वरुपाचे गर्भदान, जन्मसोहळा, जातककर्म, नामकरण, व्रतबंध किंवा उपनयन आणि विवाह असे कार्यक्रम साजरे केले जात होते. हे समारंभ त्या कुटुंबामध्ये जरी धार्मिक दृष्टिने महत्वाचे म्हणून साजरे केले जात असले तरी समाजातील अनेक लोकांना त्यामध्ये सहभागी होता येत होते. त्यामधून त्यांना आनंद मिळत होता. राज्यकर्ते म्हणजे पेशवे जेंव्हा एखादा मोठा विजय मिळवून येत त्यावेळी विजयी पेशव्यांचे स्वागत करण्यासाठी मिरवणूक काढली जात होती. त्यावेळी साजरा होणारा विजयोत्सव हा सर्वसामांन्यांना आनंद देणारा व त्यांचे मनोरंजन करणारा होता. पेशवेकाळात महाराष्ट्रामध्ये मुस्लीम लोकांची संख्यादेखील बरीच असून तेसुध्दा आपल्या धर्माप्रमाणे सण साजरे करत होते. त्यामधूनही लोकांचे मनोरंजन होत होते.

होळी हा सण पाच दिवस अतिशय मौजमजेत साजरा करण्याची प्रथा त्यावेळी निर्माण झाली होती. गावाच्या मध्यभागी मैदानावर होळी पेटविली जात असे. गावचा प्रमुख पाटील व ब्राम्हणाच्या हस्ते होळीची पुजा करुन तिला पुरण पोळीचा नैवद्य दाखविला जाई. त्यानंतर रात्रभर होळीभोवती नाचगाण्यांचा कार्यक्रम चालत असे. दुसरा दिवस धुळवड म्हणून साजरा केला जाई. पाचव्या दिवशी रंगपंचमीच्या कार्यक्रमाने होळी या सणाची समाप्ती होत असे. या सणामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांदेखील सहभागी होत होत्या. पुण्यामध्ये होळीच्या सणामध्ये जेठीची झोंबी, वाघ बकरीचा खेळ, सायंकाळी डफ गाणे, पोऱ्याचा नाच, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, अनेक

सोंगे, नाच गाणे, तमाशा अशा कार्यक्रमांचा समावेश होता. या सणाच्या निमित्ताने दरबारामध्ये कलाकारांना बिदागी व कापडाचे वाटप केले जात असे. होळीच्या सणाचा शेवटचा दिवस म्हणजे रंगपंचमीचा दिवस होय. हा सण मराठ्यांच्या दरबारात मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात असे. या सणामध्ये लोक मौजमजा करत होते असे माल्कम म्हणतो. एलफिस्टनच्या मते, 'लोकांना आनंद देणारा, कलाकारांना कला सादर करण्याची संधी देणारा व लोकांना एकत्र आणणारा हा सण होता.' पेशवेकाळात दसरा किंवा विजयादशमी हा सण मोठ्या आनंदाने सर्वत्र साजरा केला जात होता. होळी आणि दसरा या सणांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. होळी किंवा शिमगा हा समाजाच्या ख्यालीखुशालीचा आणि करमणुकीचे प्रतिक असणारा तर दसरा हा त्याच्या पराक्रमाचे प्रतिक असणारा सण होता. शिवकाळातील व पेशवेकाळातील अनेक मोहिमांची सुरुवात दसऱ्याच्या वेळी झाल्याचे स्पष्ट होते. यावेळी प्रत्येक ग्रामदेवतेच्या मंदिरामध्ये दसरा साजरा केला जात असून गावातील सर्व लोक या उत्सवामध्ये सहभागी होत.दसऱ्यानिमित्त ग्रामदेवतेची सवाद्य पालखी मिरवणूक काढली जात असे. गावातील कांही लोक आणि विशेषकरुन स्त्रिया नऊ दिवसांचा उपवास करीत. नवरात्रीनिमित्त मंदिरामध्ये भजन, कथा, कीर्तन व गोंधळ असे कार्यक्रम चालत. अश्विन शुध्द प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस नवरात्र उत्सव आणि दहाव्या दिवशी विजयादशमी असे या उत्सवाचे स्वरुप असे. पहिल्या नऊ दिवसात कथा, कीर्तन, गोंधळ अशा कार्यक्रमांनी वातावरण भक्तीमय होऊन जात होते. छत्रपती शाहू यांची गादी सातारा येथे होती. येथे अदालवाड्याच्या शेजारी असणारी रंगमहाल ही वास्तू मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी वापरली जात होती. या इमारतीच्या वरच्या उंच मजल्यावर राणीसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी स्वतंत्र कक्ष होता तर खालच्या मजल्यावर इतर लोकांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम पाहण्याची व्यवस्था होती. या इमारतीसमोर असणाऱ्या मोकळ्या मैदानाचा उपयोग मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी केला जात होता. पेशव्यांनी इ.स. १७९४ मध्ये दसरा दरबारावेळी आपल्या प्रजेतील सन्माननीय मंडळींना सन्मानार्थ जो पोशाख प्रदान केला, त्यासाठी २,२०,१४४ रुपये खर्च केले होते. पेशव्यांप्रमाणेच त्यांच्या अनेक सरदारांकडेही दसरा साजरा केला जात होता.

पेशवेकाळात गणपती उत्सवही अतिशय उत्साहात साजरा केला जात होता.यावेळी मनोरंजनाचे अनेक प्रकार सभागृहात राजदरबारी आणि उच्चभ्रू लोकांपुढे सादर केले जात असत. त्यामध्ये कलावंतीनींचे नृत्य, कथाकथन, संगीतबारी, सोंगे, दशावतारी खेळ इत्यादी कार्यक्रमांचा समावेश असे. हा उत्सव प्रतिवर्षी भाद्रपद चतुर्थी पासून अनंत चतुर्थी पर्यंत साजरा करण्याचा प्रघात आहे. त्यामध्ये श्रींची प्रतिष्ठापना व विसर्जन मोठ्या धुमधडाक्यात साजरे केले जाते. दरम्यानच्या काळात भजन, कीर्तन, नाचगाणे, डफगाणे इत्यादी कार्यक्रमांची रेलचेल असे. त्यावेळी हरदास, गवई, कलावंतीनी, गुरव, पखवाजी, सोंगे घेऊन येणारे यांनी केलेल्या मनोरंजन कार्यक्रमाबद्दल चांगली बिदागी दिली जात होती. इ.स.१७९५ मध्ये साजरा झालेल्या या गणपती उत्सवात कथाकिर्तन केल्याबद्दल १८१ कथेकऱ्यांना २१५५ रुपये बिदागी आणि पोशाख देण्यात आला होता. ३९ गवयांना ३२९ रुपये बिदागी आणि कलावंतिणींच्या चार ताफ्यांना १०२६ रुपये बिदागी-बक्षीस देण्यात आली होती. याशिवाय कांही पखवाज वाजविणारे गुरव संगीतकार होते. त्यापैकी ४३ गुरव पखवाजींना १२१ रुपये व वाजंत्र्यांच्या २५ ताफ्यांना २४० रुपये नक्त अशी बिदागी देण्यात आली होती. गौरी-गणपतीच्या सणानिमित्त कोकणात व देशावर स्त्रियांच्या नाचाचे व गायनाचे कार्यक्रम चालत. गौरी आगमन, गौरी पुजन आणि गौरी विसर्जन असा तीन दिवसांचा गौरीचा कार्यक्रम होत असे. त्यामध्ये फुगडी, झिम्मा, घुमा, आगोटा-पागोटा व देवतांच्या विशेषकरुन गौरी-गणपतीच्या गीतांच्या गायनाचा कार्यक्रम चालत असे.

दिवाळी या सणामध्ये दारुकामाची आतषबाजी, सोंगट्या, गंजिफा व जुगार इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम होत होते. संक्रांतीच्या सणानिमित्ताने आजच्याप्रमाणे तिळगूळ वाटप व दारुकामाची आतषबाजी केली जात होती. गोकुळअष्टमी व महाशिवरात्रीच्या निमित्ताने गावागावांध्ये भजन, कीर्तन यासारखे मनोरंजनाचे कार्यक्रम होत होते. वसंतपंचमीचा उत्सव रंगपंचमी प्रमाणे साजरा केला जात होता. नारळी पौर्णिमेला रक्षा बंधनाचा व कोळी लोकांचा नृत्य गायनाचा कार्यक्रम होत होता. हे सर्व सण, उत्सव व समारंभ लोकांना आनंद देणारे व लोकांचे मनोरंजन करणारे होते.

कौटुंबिक पातळीवर साजऱ्या केल्या जाणाऱ्या कार्यक्रमातून देखील लोकांचे मनोरंजन होत होते. गर्भदान, जन्मोत्सव, नामकरण, उपनयन, विवाह, अक्षत समारंभ व मेजवानी समारंभ यामधील नृत्य, गायन, मिरवणूक, आतषबाजी इत्यादीमुळे सहभागी लोकांचे मनोरंजन होत होते. अनेक तिर्थक्षेत्रांच्या व ग्रामदेवतांच्या देवळामध्ये साजरे होणारे उत्सव लोकांचे मनोरंजन करणारे होते.

धार्मिक सण, उत्सव व समारंभाच्या निमित्ताने कीर्तन, भजन, पुराणकथन, ललित, गोंधळ, जागरण, कुंभाराचे डहाक, धनगरांची गाणी, भराड्याच्या कथा व गीते व दशावताराचा कार्यक्रम केले जात होते. भजन, ललीत व दशावतार या प्रकारांचे सादरीकरण विविध जातींचे लोक एकत्र येऊन करत. या प्रकारांव्यतिरिक्त इतर सर्व कलाप्रकार सादर करणारे कलाकार हे पारंपरिक पध्दतीने सादरीकरण करत असून त्यांचा तो पिढीजात व्यवसाय होता. दशावतार हा पेशवेकाळात कोकणामध्ये आडिवरे येथे उदयास आलेला नवा प्रकार होता. नंतर त्याचा प्रसार दक्षिण कोकण व गोव्यापर्यंत प्रामुख्याने झाला, तो आजही फारच लोकप्रिय आहे. कीर्तनकार, भजनीबुवा व पुराणिक हे प्रामुख्याने ब्राम्हण समाजातील असून त्यांना चांगली सामाजिक प्रतिष्ठा होती. नाथ संप्रदायातील गंगानाथ हा धनगर समाजात जन्माला आलेला किर्तनकार यावेळी अतिशय प्रसिध्द होता. त्यामानाने इतर जातीच्या कलाकारांना प्रतिष्ठा मिळत नव्हती, तसेच त्यांना कामाचा मोबदलाही कमी मिळत होता.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहामध्ये पारंपरिक मनोरंजन साधनांचे महत्व देखील खूप आहे. त्यांचा उदय प्राचीन काळामध्ये झाला असून त्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये मोलाची भर घातली आहे. अशी ही मनोरंजन साधने पेशवेकाळात व त्यानंतर आजपर्यंत लोकप्रिय होती. मात्र आता यापैकी अनेक कलाप्रकार नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या प्रकारचे मनोरंजन करणाऱ्या कलावतांना दरवर्षी आपल्या ठरलेल्या गावामध्येच जाऊन लोकांचे मनोरंजन करावे लागत होते. दुसऱ्याच्या गावामध्ये जाण्याचा त्यांना अधिकार नव्हता. एका दरवेशाच्या गावात दुसरा दरवेशी गेला तर त्याला भिक्षा किंवा मोबदला देऊ नये असे आज्ञापत्र पेशवेकाळात काढलेले आढळते. त्यामुळे पारंपरिक मनोरंजन करणारे कलाकार आपल्या वतनाच्या किंवा ठरलेल्या गावामध्येच जाऊन लोकांचे मनोरंजन करत होते. धर्माच्या नावाखाली मनोरंजन

करणाऱ्या लोकांनी जरी धर्माला जास्त महत्व दिले असले तरी त्यांच्यामार्फतही मोठ्या प्रमाणात सामाजिक मनोरंजन होत होते. अशा लोकामध्ये वासूदेव, गोंधळी, चित्रकथी, भुत्ये, डौरी, लक्ष्मी- आईवाले, कुडमुडे जोशी, वाघ्या-मुरळी, गुरुबाळ, पांगूळ, कानफाटे, उदासी, गोसावी इत्यादी लोकांचा समावेश होता. हे कलाकार वेगवेगळ्या देवतांचे भगत म्हणून ओळखले जातात. अनेकदा देवतांच्या उपासना विधी प्रसंगी त्यांची उपस्थिती महत्वाची मानली जात होती. इतर वेळी सुगीच्या दिवसात ते आपली उपजिविका भिक्षा मागून भागवत होते. बहुरुपी हा खेडेगावातील लोकांचे मनोरंजन करणारा कुशल कलावंत होता. निरनिराळी सोंगे काढून गावोगावी फिरुन तो लोकांचे मनोरंजन करीत असे.


अस्थायी किंवा फिरस्ते लोक सुगीच्या दिवसात गावोगावी फिरुन लोकांचे मनोरंजन करत होते. डोंबारी, कोल्हाटी, गोपाळ हे लोक शारीरिक ताकदीची व कसरतीची कामे करुन लोकांचे मनोरंजन करत होते. कोल्हाटी लोक कसरतीच्या खेळाबरोबर नाच-तमाशा सुध्दा करीत. नंदीवाले, दरवेशी, वाघवाले व गारुडी हे लोक आपआपल्या जनावरांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून खेळ करुन लोकांचे मनोरंजन करीत. छत्रपतींनी व पेशव्यांनी मनोरंजनासाठी मोठा प्राणीसंग्रह केला होता.

पेशवेकालीन सर्वसामान्य लोकांमध्ये कुस्ती, वज्रमुष्ठी, भालाफेक, दांडपट्टा, काठीचे खेळ इत्यादी मर्दानी प्रकार लोकप्रिय झालेले होते. पेशवेकाळात कुस्ती या क्रीडा प्रकाराला अतिशय महत्व प्राप्त झाले होते. या प्रकाराचा विकास करण्याचे काम पेशव्यांनी केले. त्यामुळे अनेक जातीधर्माचे पहिलवान त्यावेळी उदयास आले. त्यांनी स्वत:चे शरीर कमविण्याबरोबरच जनतेचे मनोरंजन करण्याचे काम केले. पेशव्यांनी अनेक गरीब पहिलवानांच्या खुराकाची व्यवस्था सरकारी तिजोरीमधून केली होती. त्यामुळे अनेक नामांकित पहिलवान तयार होऊ शकले. इतर प्रांतातून आलेल्या पहिलवानांचा पराभव करून आपला व मराठ्यांच्या राज्याचा नावलौकिक वाढविण्याचे काम या पहिलवानांनी केले. कुस्तीबरोबरच वज्रमुष्ठी या प्रकारामधील काही मल्ल पेशव्यांनी तयार केले होते. त्यांनीदेखील जनतेचे मनोरंजन करण्याचे व पेशव्यांचा नावलौकिक वाढविण्याचे कार्य केले. भालाफेक हा खेळ मात्र श्रीमंत वर्गामध्येच लोकप्रिय होता.


यात्रा आणि उरुसामध्ये कुस्त्या आणि नाचगाण्याचे कार्यक्रम आयोजित केले जात होते. याशिवाय पेशवेकालीन लोकांचे शिकार, सोंगट्या व गंजीफा, बुध्दीबळ यासारखे खेळही मनोरंजनाची साधने होती. सामान्य लोक उपजिविकेसाठी तर श्रीमंतांमध्ये मनोरंजनासाठी शिकार केली जात होती. शिकारीमधून व मासेमारीमधून राज्यकर्त्यांचे व प्रजेचे मनोरंजन होत होते. बुध्दीबळ हा खेळ पुरूषांप्रमाणेच स्त्रीयांमध्येही लोकप्रिय होता. विविध सण समारंभाच्या निमित्ताने लोकगीतांचा व लोकनृत्यांचा कार्यक्रम करण्याची आवड लोकांना होती. ही परंपरा देखील प्राचीन काळापासून महाराष्ट्रात प्रचलीत होती. मौखिक परंपरेने स्त्रियांनी व पुरुषांनी ही परंपरा पेशवेकाळात कायम ठेवली होती. लहान मुलांच्या मनोरंजनासाठी अनेक खेळ व खेळणी उपलब्ध होती.

मनोरंजनाच्या या विविध साधनांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन प्रवाहाला गती देण्याचे काम केले होते. सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी या मनोरंजनाच्या साधानांचा जसा पेशवेकाळात समाजाला उपयोग झाला तसाच सांस्कृतिक अभिरूची वाढविण्यासाठी झाला. याच पारंपरिक करणूकीच्या साधनांचा ब्रिटिश काळात महाराष्ट्रातील देशप्रेमींनी स्वातंत्र्य चळवळीसाठी वापर केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अभिसरणाच्या चळवळीत म्हणूनच पेशवेकालीन मनोरंजनाची साधने महत्वपूर्ण ठरतात. पेशवेकाळात या साधनांचे सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना राजाश्रय मिळाल्यामुळे समाजाच्या सर्व स्तरातील कलावंत मनोरंजनाच्या विविध प्रकारात जात-पात विसरून सहभागी झाले. परिणामी जाती व्यवस्था मजबूत असूनही सामाजिक समरसता निर्माण होण्यास काही प्रमाणात मनोरंजनाची साधने सहाय्यभूत ठरली. महाराष्ट्रात समाजप्रबोधनाचा जो उदय झाला, त्याचे प्रेरणास्थान म्हणून पेशवे कालाखंडातील मनोरंजनाच्या काही साधनांचा उल्लेख करावा लागेल.


## १) नारायणराव पेशव्याच्या वधाचा पोवाडा (प्रकाशित)




## २) गर्भदान समारंभ (अप्रकाशित)




## ३) हरिहरेश्वर येथे अनुष्ठान (प्रकाशित)



## ४) संक्रांत खर्च (अप्रकाशित)



## ५) इ.स. १७७५ मधील श्रावणमास दक्षिणा (प्रकाशित)



[illegible]

[illegible]

[illegible]

१५००० मीरा

७८०० [illegible]

१५०० [illegible]

[illegible]

१२०० [illegible]

३०१८

[illegible]

८०० [illegible]

१५०००

८४००० [illegible]

[illegible] १५००० [illegible]

[illegible] ११८८ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

१२८०००

[illegible]

[illegible]


## ६) कुरधे येथील गणपती उत्सवासाठी इनाम जमिन (अप्रकाशित)




## ७) पुरंदर किल्ल्यावरील गणपती उत्सव(प्रकाशित)




## ८) गणपती उत्सव हरिदास व गुणीजनांवरील खर्च (प्रकाशित)




## ९) दसऱ्यामध्ये बळी देण्यासाठी बकरी (अप्रकाशित)




## १०) दत्तजयंती उत्सवाबाबत पत्र (अप्रकाशित)




## ११) संत तुकाराम महाराजांच्या उत्सवाबाबत पत्र (प्रकाशित)



## १२) जेजुरी येथील यात्रेचे आठ कर माफ करणेबाबत (प्रकाशित)



## १३) पहिलवानांना दिला जाणारा रतीब (अप्रकाशित)


F 19692

# फोटो

## १)राज्यकर्त्यांचे मनोरंजन



मस्तानी महाल



नृत्य पेटींग



नृत्य पेटींग

## २) पेशवेकालीन भित्ती चित्रातील स्त्रियांचे नृत्य, वादन व गायन

(मराठा वॉल पेटिंग - डॉ. आपटे)



१. मृदंग व झांज वादन (वाई)



२. विणा व डफ वादन (वाई)



३) फुगडी (वाई)



४) मृदंग वादन (तासगांव)



५. नृत्य (वाई)




६. गायन (तासगांव)

**३) भित्ती चित्रामधील गणेशभक्ती** (मराठा वॉल पेटिंग-डॉ. आपटे)



१. गणेश (वाई)



२. बालगणेश (वाई)



३. गणपती मखर (राजा केळकर संग्रहालय)



४. गणेश (मेणवली)




५. गौरीचे मुखवटे (राजा केळकर संग्रहालय)

**४) कथा चित्रामधील विवाह विधी** (राजा केळकर संग्रहालय)





**५) भित्ती चित्रामधील सण व उत्सव** (मराठा वॉल पेटिंग - डॉ. आपटे)



१. रंगपंचमी (वाई)



२. रासक्रीडा (मेणवली)

**६) कळसूत्री बाहूल्या** (राजा केळकर संग्रहालय)






**७) चित्रकथींची कथाचित्रे** (राजा केळकर संग्रहालय)



१. रूक्मिणी हरण



२. भिक्षा मागणारा रावण

## ८) मनोरंजनाचे विविध खेळ



१. सारीपाट (राजा केळकर संग्रहालय)



२. भारतोलन (कणदूर)



३. गंजिफा (राजा केळकर संग्रहालय)



४. बुध्दीबळ (राजा केळकर संग्रहालय)

# संदर्भसूची

**अ) प्राथमिक साधने (अप्रकाशित)**

१) चिटणिस दप्तर - पुणे पुराभिलेखागार, पुणे

२) पेशवा दप्तर - पुणे पुराभिलेखागार, पुणे

३) शाहू दप्तर - पुणे पुराभिलेखागार, पुणे

४) शाहू रोजनिशी - पुणे पुराभिलेखागार, पुणे

**आ) प्राथमिक साधने मराठी (प्रकाशित)**


| | | | |
|---|---|---|---|
| **१** | आपटे द. व.<br>प्रा. ओतुरकर रा. वि. (संपा.) | : | महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, पुणे.अ.वि.गृह<br>प्रकाशन, शके १८६२ |
| **२** | ओतुरकर रा. वि. | : | पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार<br>भा. इति. सं. मंडळ पुणे,१९५० |
| **३** | प्रा. कुलकर्णी अ. रा.<br>डॉ. कुलकर्णी म. रा.<br>डॉ. कंटक म. रा.(संपा.) | : | मराठ्यांचा इतिहास साधन परिचय<br>डायमंड पब्लिकेशन्स, १६९१<br>सदाशिव पेठ, पुणे ३०<br>प्रथमावृत्ती जून, २००८ |
| **४** | खरे वा.वा. | : | ऐतिहासिक लेख संग्रह भा. ५,१३<br>संपा य. वा. खरे मिरज, १९२६ |
| **५** | पारसनिस द. ब. | : | इतिहास संग्रह खं.२<br>प्रकाशन वर्ष - १९१० |
| **६** | गर्गे स. मा.(संपा.) | : | करवीर रियासतीची कागदपत्रे खं.३<br>प्रकाशक स. मा. गर्गे, न्यू पॅलेस कोल्हापूर<br>पहिली आ. ९ मार्च १९७२ |
| **७** | पुरंदरे कृ. वा. (संपा.) | : | पुरंदरे दप्तर भाग ३<br>भा. इति. सं. मंडळ, पुणे |
| **८** | वाड ग. चि. (संपा.) | : | पेशवे रोजनिशी खं. १, ५, ८, ९<br>इंदुप्रकाश प्रेस मुंबई, १९०६ - १९११ |
| **९** | वैद्य शं. ल. | : | वैद्य दप्तरातून निवडलेले कागद खं.४<br>(इ.स.१७४२-१७४९) पुणे, १९४९ |
| **१०** | सरदेसाई गो.स. | : | पेशवे दप्तरातून निवडलेले कागद खं.<br>३, ४, ७, ८, १२, १८, २२, ३०,<br>३२, ३८, ४१, ४२, ४३, ४४, ४५<br>गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई<br>१९३१-१९३४ |

## इ) प्राथमिक साधने इंग्रजी (प्रकाशित)

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | ब्राऊटन टी. डी. | : | लेटर्स रिटर्न इन अ मराठा कँप ड्युरिंग दी इयर १८०९<br>आर्चिकॉन्स्टेबल ॲन्ड कंपनी,<br>लंडन, १८१३ |

## ई) पोवाडे संग्रह व लावणी संग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | डॉ. कुलकर्णी वि. म.<br>डॉ. मोरजे गंगाधर (संपा.) | : | रामजोशीकृत लावण्या<br>पद्मगंधा प्रकाशन ,पुणे<br>पा. आ. नोंव्हे.१९९८ |
| **२** | केळकर य. न. | : | ऐतिहासिक पोवाडे -<br>मराठ्यांचा काव्यमय इतिहास<br>डायमंड पब्लीकेशन पुणे<br>प्र. आ.१९२८, पुनर्मुद्रण मे २००८ |
| **३** | केळकर य. न. (संपा.) | : | अंधारातील लावण्या<br>प्रका. ग. ल. ठोकळ<br>प्र.आ. १९५६ |
| **४** | केळकर य. न. (संपा.) | : | होनाजी बाळा यांच्या लावण्या<br>चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे |
| **५** | जोशी श. ना. (प्रका.) | : | प्रभाकरकृत पदे, कविता, पोवाडे व लावण्या<br>चित्रशाळा प्रकाशन, पुणे<br>प्र.आ. १९१० |
| **६** | डॉ. मोरजे गंगाधर<br>डॉ. वाडकर धोंडीराम (संपा.) | : | सगनभाऊकृत लावण्या व पोवाडे<br>पद्मगंगा प्रकाशन पुणे ४११०३८<br>प्र.आ. फेब्रु. २००४ |
| **७** | डॉ. मोंढे मधुकर काशीनाथ | : | अनंत फंदी यांच्या कविता व लावण्या<br>पद्मगंगा प्रकाशन, पुणे ४११०३८ |
| **८** | शाळिग्राम शं. तु. (संपा.) | : | परशराम कवीच्या लावण्या<br>प्रका. गं. गो. गोंधळेकर, इ. स.१९०७ |
| **९** | शाळिग्राम शं. तु. (संपा.) | : | होनाजी बाळा यांच्या लावण्या<br>आ. ४थी, चित्रशाळा प्रकाशन, पुणे १९६३ |

## उ) दुय्यम साधने (मराठी)

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | प्रा. डॉ. अत्रे शुभांगना<br>प्रा. रायरीकर कल्पना<br>केंजळे सौमित्र | : | महाराष्ट्र संस्कृती<br>डायमंड पब्लिकेशन,१६९१<br>सदाशिव पेठ, पुणे ३०<br>प्र. आ. नोव्हें. २००८ |

२ डॉ. आकलेकर भालचंद्र : कोकणचा सांस्कृतिक इतिहास
इतिहास संशोधन मंडळ, १७२
दादर, मुंबई १४

३ आजगावकर ज. र. : महाराष्ट्र कविचरित्र खं.१
संपा. ज. र. आजगावकर
मुंबई १९०७-२४

४ आत्रे त्रिं. ना. : गाव - गाडा
वरदा बुक्स, सेनापती बापट मार्ग, पुणे १६
प्र. आ. १९१५
पुनर्मुद्रण १ जाने. १९९५

५ अग्नीहोत्री डी. एच. : महाराष्ट्र संस्कृतीचे तात्वीक आधिष्टान
सविचार प्रकाशन मंडळ, नागपूर १९७७

६ कुलकर्णी अ.रा. : शिवकालीन महाराष्ट्र
राजहंस प्रकाशन, पुणे १९९३

७ कुलकर्णी ए. व्ही : मराठी रंगभूमी
व्हिनस बुक स्टॉल, पुणे, व्दि. आ. १९६१

८ प्रा. कुलकर्णी म. रा. : महाराष्ट्रातील प्रसिध्द सरदार घराणी
डायमंड पब्लिकेशन, १६९१
सदाशिव पेठ, पुणे ३०
प्र. आ. १५ ऑक्टो. २००९

९ केळकर य. न. : तंत कवि तथा शाहीर
प्रका. न. शं. कुलकर्णी, पुणे
प्र. आ. १९५२

१० केळकर य. न. : इतिहासातील सहली खं २
चित्रशाळा प्रेस, पुणे, प्र. आ. १९६४

११ केळकर य. न. : मराठेशाहीतील वेचक वेधक
(य. न. केळकरांचे अप्रकाशित लेख)
डायमंड पब्लिकेशन्स, १६९१
सदाशिव पेठ, पुणे ३०

१२ केळकर य. न. : भूतावर भ्रमण (ऐतिहासिक लेखसंग्रह)
डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
प्रथम आवृत्ती १९४०
पुनर्मुद्रण - मे २००८

१३ केळकर य. न. : वाङ्मयाचा वाफा
प्रका. य. न. केळकर, प्र.आ. - १९५८

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कांबळे बळवंत | : | देवदासी, पोतराज, वाघ्या-मुरळी,<br>रुप-स्वरुप-विकृती<br>पद्मगंधा प्रकाशन, पुणे<br>प्र.आ. जून २००८ |
| १५ | खरे वा. वा. | | अधिकार-योग,<br>महाराष्ट्र बुक डेपो पुणे, १९०८ |
| १६ | खोबरेकर वि.गो. | : | कोकणचा राजकीय इतिहास<br>इतिहास संशोधन मंडळ, दादर<br>मुंबई प्र.आ., १९९७ |
| १७ | खोबरेकर वि. गो. | : | मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन<br>इतिहास संशोधन मंडळ, दादर, मुंबई<br>प्र.आ., १९९७ |
| १८ | डॉ. गवळी पी. ए. | : | पेशवेकालीन महाराष्ट्र<br>कैलाश पब्लिकेशन्स, गोकुळवाडी,<br>औरंगपुरा, औरंगाबाद १<br>प्र.आ., १८ मे २००० |
| १९ | चव्हाण रामनाथ | : | जाती आणि जमाती<br>मेहता पब्लीकेशन, पुणे, प्र. आ.१९८९ |
| २० | चाफेकर ना. गो. | : | पेशवाईच्या सावलीत, आर्य संस्कृती<br>मुद्रणालय, पुणे, २, शके १८५९ |
| २१ | प्रा. जोग रा. श्री. (संपा) | : | मराठी वाङ्मयाचा इतिहास खं. ३<br>कार्यवाह महाराष्ट्र साहित्य परिषद,<br>टिळक रस्ता, पुणे ३०, प्रसिध्दी १९७३ |
| २२ | जोशी प्र. न. | : | मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास<br>नितीन प्रकाशन, ११८२ सदाशिव, पुणे<br>प्र. आ. १५ ऑगस्ट १९७२ |
| २३ | डॉ. जोशी वासंती | : | एकनाथांची निवडक भारुडे<br>मेहता पब्लीकेशन हाऊस, १२१६,<br>सदाशिव पेठ, पुणे ३० |
| २४ | जोशी वि. कृ. | : | लोकनाट्याची परंपरा<br>ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९६१ |
| २५ | जोशी वि. कृ. | : | शाहीर हैबती चरित्र आणि काव्य<br>संपदा प्रकाशन पुणे, प्र. आ. १९५६ |
| २६ | डॉ. देखणे रामचंद्र | : | भारूड वाङ्मयातील तत्वज्ञान<br>पद्मगंगा प्रकाशन, पुणे<br>प्र. आ. २० जुलै २००२ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | डॉ. देखणे रामचंद्र | : | गोंधळ : परंपरा, स्वरूप अणि आविष्कार<br>पद्मगंगा प्रकाशन, पुणे<br>द्वि. आ. जाने. २००८ |
| २८ | डॉ. देखणे रामचंद्र | : | वारी स्वरुप आणि परंपरा<br>पद्मगंगा प्रकाशन, पुणे<br>प्र.आ. १ जुलै २००७ |
| २९ | देशमुख बी. बी. | : | लावणी वाङ्मय<br>साहित्यसेवा प्रकाशन, सातारा. |
| ३० | डॉ. देशमुख शारदा | : | शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन<br>कार्यवाह टिळक महाराष्ट्र विद्यापीठ<br>विद्यानगर, गुलटेकडी, पुणे<br>प्र. आ. १९७३ |
| ३१ | धोंड म. वा. | : | मराठी लावणी<br>मौज प्रकाशन प्रा.लि.<br>गिरगाव, मुंबई<br>प्र. आ. १५ ऑगस्ट १९५६ |
| ३२ | नसिराबादकर ल. रा. | : | प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>फडके प्रकाशन, कोल्हापूर<br>नवी संस्कारीत व विस्तारित आ.<br>ऑगस्ट, २००६ |
| ३३ | पगडी सेतुमाधवराव | : | मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द<br>जोशी-लोखंडे प्रकाशन पुणे, १९६२ |
| ३४ | पटवर्धन वासुदेव व<br>केळकर गणेश | : | तुकारामाच्या अभंगाची चर्चा<br>श्री गणेश प्रिंटींग वर्क्स पुणे, १९२७ |
| ३५ | डॉ. पवार जयसिंगराव | : | मराठेशाहीचे अंतरंग<br>सुमेरु प्रकाशन, डोंबिवली पू.<br>प्र. आ. जाने २००६ |
| ३६ | पवार जयसिंगराव | : | मानवजातीचा इतिहास<br>अजब पुस्तकालय कोल्हापूर, १९७२ |
| ३७ | पानसे मुरलीधर गजानन | : | यादवकालीन महाराष्ट्र (इ.स.१०००-<br>१३५०), प्रमुख कार्यवाह, मुंबई मराठी<br>ग्रंथसंग्रहालय, मुंबई प्र. आ. १९६३ |
| ३८ | प्रा. डॉ. पाठक यशवंत | : | नाचू किर्तनाचे रंगी<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३० |
| ३९ | पारसनीस द. ब.<br>डॉ. देशपांडे सुरेश र. (अनु) | : | पेशवेकालीन पुणे<br>डायमंड पब्लिकेशन पुणे ३०<br>प्र. आ. मे २००७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | डॉ. पिसुर्लेकर पां. स. | : | पोर्तुगीज - मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दरबारातील मराठ्यांचा इतिहास पुणे विद्यापीठ पुणे, १९६७ |
| ४१ | डॉ. बाबर सरोजिनी | : | कारागिरी लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, पुणे प्र. आ. १९९२ |
| ४२ | डॉ. बाबर सरोजिना | : | महाराष्ट्र लोकसाहित्य पुष्प पाचवे, महाराष्ट्र राज्य, लोकसाहित्य समिती १९६१ |
| ४३ | डॉ. बाबर सरोजिना | : | मराठी लोकगीत बहि:शाल शिक्षण ग्रंथमाला, बहि:शाल शिक्षण मंडळ |
| ४४ | ब्रम्हे मो. द. (कार्य संपा.) | : | मराठी नाट्यतंत्र सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे प्र. आ. ५/११, १९६४ |
| ४५ | भावे विनायक लक्ष्मण | : | महाराष्ट्र सारस्वत पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पा. आ. १९६३ |
| ४६ | भावे वा. कृ. | : | पेशवेकालीन महाराष्ट्र वरदा प्रकाशन प्रा. लि. सेनापती बापट मार्ग, पुणे १६ प्र. आ.१९५७, |
| ४७ | भावे वा. कृ. | : | मुसलमान पूर्व महाराष्ट्र (लोकजीवन ) खं २ प्रकाशक स्वत: २२६, सदाशिव पेठ, पुणे एप्रील १९४२, वैशाख शके १८६९ |
| ४८ | मराठे कृ. बा. | : | मराठी रंगभूमीचा पूर्वरंग श्रीविद्या प्रकाशन नागपूर, प्र.आ. १९७९ |
| ४९ | माटे म. श्री. | : | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामा. व सांस्कृ.) (इ.श.१३००-१६५०) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. ऑक्टो.२००२ |
| ५० | डॉ. मांडे प्रभाकर | : | लोकगायकांची परंपरा गोदावरी प्रकाशन, सिडको औरंगाबाद प्र.आ. १२ एप्रिल २०११ |
| ५१ | डॉ. मांडे प्रभाकर | : | लोकसाहित्याचे स्वरुप कु. सविता प्रभाकर मांडे, मंगलप्रभा' १०९, एन ५ दक्षिण, सिडको औरंगाबाद / सविता प्रकाशन औरंगाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| **५२** | संपा मोघे पांडूरंग, काटकर वामन | : | किर्तन तरंगिनी खं. १<br>समर्थ साधन प्रकाशन, पुणे १९३५ |
| **५३** | व्हटकर नामदेव | : | मराठीचे लोकनाट्य - तमाशा - कला आणि साहित्य<br>जयवंत व्हटकर, यशश्री, जवाहरनगर, कोल्हापूर |
| **५४** | डॉ. व्यवहारे शरद | : | लोकसाहित्य संकल्पना व स्वरुप<br>कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद<br>प्र. आ. जाने.१९९९ |
| **५५** | डॉ. व्यवहारे शरद | : | मराठी लोकगीत स्वरुप विशेष<br>विश्वभारती प्रकाशन,<br>सीताबर्डी, नागपूर १२, प्र.आ. १९९० |
| **५६** | डॉ. शिरगावकर वर्षा | : | पेशव्यांचे विलासी जीवन<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर<br>पुणे ३०, प्र.आ. २००१ |
| **५७** | शिंदे विश्वनाथ | : | पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य,<br>प्रतिमा प्रकाशन पुणे,प्र.आ. १९९४ |
| **५८** | प्रा. शेणोलीकर ह. श्री.<br>डॉ. देशपांडे प्र. न. | : | महाराष्ट्र संस्कृती (घडण आणि विकास )<br>मोघे प्रकाशन, कोल्हापूर<br>प्र. आ. २२/१२/१९७२ |
| **५९** | संपा. सरदार गं. बा. | : | महाराष्ट्र-जीवन<br>(परंपरा,प्रगती आणि समस्या) खं.२<br>मेसर्स जोशी अँड लोखंडे प्रकाशन, पुणे |
| **६०** | सरदेसाई गो. स. | : | मराठी रियासत खंड २, ३, ४, ५, ७, ८<br>पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई २६<br>पुनर्मुद्रण जानेवारी २०११ |
| **६१** | सहस्त्रबुध्दे म. ना. | : | मराठी शाहीरी वाङ्मय<br>ठोकळ प्रकाशन पुणे |
| **६२** | सहस्त्रबुध्दे पु. गो. | : | महाराष्ट्र संस्कृती<br>कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९ |
| **६३** | डॉ. हंडीबाग भारत | : | मराठी लोकगीतातील समाजदर्शन<br>चिन्मय प्रकाशन औरंगाबाद<br>प्रकाशन क्र.२२ |

## ऊ) दुय्यम साधने (इंग्रजी)


| | | | |
|---|---|---|---|
| १ | अॅबे. जे. ए. डुबॉइस<br>अनु. हेन्री के बेन - व्हॅम्प | : | हिंदु मॅनरस, कस्टमस् अॅन्ड सेरेमनीस<br>ओरीएन्टल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली |
| २ | काणे पां.वा. | : | हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र खं.२, भा.१, भांडारकर<br>ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटयूट पुणे,<br>दु. आ. १९७४ |
| ३ | किशोरे ब्रिज | : | ताराबाई अॅन्ड हर टाईम्स<br>आशिया पब्लि. हाऊस, बॉम्बे १९६३ |
| ४ | किंनखेड, पारसनिस | : | हिस्ट्री ऑफ द मराठाज व्हावेल २<br>ऑक्सफर्ड युनि. प्रेस न्यूयॉर्क, १९२२ |
| ५ | चाफेकर नलिनी | : | एंशन्ट इंडीया अॅन्ड ग्रिस<br>अजिंठा पब्लिकेशन्स दिल्ली, १९७७ |
| ६ | चिटणिस के. एन. | : | सोशो इको अस्पेक्टस ऑफ मिडीवल इंडीया<br>इंडीया प्रिंटींग प्रेस, पुणा १९७९ |
| ७ | टोड जेम्स | : | अॅनल्स अॅण्ड अँटिक्विटज ऑफ राजस्थान<br>व्हॉ.२, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली,पाटणा |
| ८ | डफ जेम्स ग्रान्ड | : | अ हिस्ट्री ऑफ मराठा, व्हा.१.<br>जंब्रे अॅन्ड कंपनी, कलकत्ता, १९१८ |
| ९ | डी क्रुझ एडवर्ड | : | ए सर्वे ऑफ वर्ल्ड सिव्हिलायझेशन<br>पब्लिशिंग हाऊस, बॉम्बे १९७० |
| १० | त्रिपाटी राम शंकर | : | हिस्ट्री ऑफ एंशन्ट इंडीया<br>मोतीलाल बनारशीदास पब्लिशर प्रा. लि. |
| ११ | दिघे व्ही. जी. | : | पेशवा बाजीराव फस्ट अॅन्ड मराठा एक्सपान्शन,<br>कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, बाँबे, १९४४ |
| १२ | देसाई सुधा | : | सोशल लाईफ इन महाराष्ट्रा अंडर द पेशवाज<br>पॉप्युलर प्रकाशन, बाँबे १९८० |
| १३ | प्रभु पी. एच. | : | हिंदु सोशल ऑरगनायझेशन<br>पॉप्युलर प्रकाशन बाँबे, १९६३ |
| १४ | फायरबँक जे. के. अॅन्ड<br>एडविन रिश्युअर | : | चायना ट्रॅडिशन अॅन्ड ट्रान्सफॉरमेशन<br>हौग्टन मिल्टन कंपनी<br>यु.एस.ए. १९७८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | फुकाजावा हिरोशी | : | दि मेडीव्हल डेक्कन : पेसंटस् , सोशल सिस्टिमस् अॅन्ड स्टेटस (१६ टू १८ सेंचुरी) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, मद्रास, १९९१ |
| १६ | महाजन व्ही. डी. | : | ए हिस्ट्री ऑफ इंडीया एस. चांद अँन्ड कंपनी लि.न्यू दिल्ली, व्दितीय आवृत्ती १९९६ |
| १७ | मिश्रा आर. जी. | : | इंडीयन रिस्टनस टू दि अर्ली मुस्लीम इनव्हाडर्स अपटू १२०६ ए. डी. अनु. बुक्स, मिरत सिटी, १९८३ |
| १८ | मुजुमदार आर. सी. | : | अॅन अॅडव्हान्स हिस्ट्री ऑफ इंडीया मॅकमिलन इंडीया लि. चतुर्थ आवृत्ती, १९७८ पुनर्मुद्रण १९९६ |
| १९ | रानडे एम. जी. | : | राईस ऑफ दि मराठा पॉवर मिनिस्ट्री ऑफ इनफॉरमेशन अॅन्ड ब्रॉडकास्टींग, गव्हर्नमेंट ऑफ इंडीया, दिल्ली १९७० |
| २० | व्हॅन लुन हेनड्रिक | : | ए स्टोरी ऑफ मॅनकाइंड वॉशिंग्टन स्क्रेअर प्रेस आयएनओ न्यूयॉर्क २६वी आ. १९६८ |
| २१ | शर्मा एस. आर | : | दि फाउंडींग ऑफ मराठा फ्रिडम ओरिएंट लाँगमन लि. बाँबे पुर्नरावृत्ती १९६४ |
| २२ | शास्त्री निळकंठ अॅन्ड श्रीनिवासाचारी | : | अॅडव्हान्स हिस्ट्री ऑफ इंडीया अॅलाईड पब्लीशर लि. व्दि.आ. १९७५, पुनर्मुद्रण १९९६ |
| २३ | सरदेसाई जी. एस. | : | न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज व्हॉ. २ (१७०७ ते १७७२) फिनिक्स प्रका. मुंबई १९६८ |
| २४ | सिंग वाय. बी. | : | सोशल लाईफ इन एंशन्ट इंडीया लाईट अॅन्ड लाईफ पब्लिशरर्स दिल्ली, १९८१ |

## ए) दुय्यम साधने (हिंदी)

०१ नागोरी एस. एल., नागोरी कान्ता : मराठोंका इतिहास सबलाइम पब्लिकेशन्स, शान्तिनगर जयपुर ०६

## ऐ) पीएच.डी. प्रबंध

०१ कुंटे बी.जी. : छत्रपती शाहू, मुंबई विद्यापीठ मुंबई, १९६४

०२ डॉ.चव्हाण एस.आर. : मराठी अध्यात्मिक शाहीरी : परंपरा व वाङ्मय शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९८०

## ओ) नियतकालिके

१) दै. सकाळ कोल्हापूर १०/०९/२०१०, १७/०९/२०१० व ५/६/२०११

२) दै. प्रहार १९/०९/२०१० अक्षरकोकण पुरवणी आणि १९/०२/२०११

३) दै. लोकमत २९/०३/२०१० हॅलो कोल्हापूर पुरवणी

४) भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक, जाने ते मार्च २०११

५) भारत इतिहास संकलन मंडळ, अहवाल शके १९३३

६) भारत इतिहास संकलन मंडळ, पुणे, नगर संशोधन वृत्त, खंड ४

७) भारत इतिहास संकलन मंडळ, खंड ३, १९२२-२३

८) श्रीमती भोळे तारा ‘ज्ञानदूत’ दिवाळी अंक १९८५

## औ) गॅझेटियर

१) बॉम्बे स्टेट गॅझेटर, पुणा डिस्ट्रीक्ट, डिस्ट्रीक्ट सेरीज व्हॉ. २०, १९५४

२) महाराष्ट्र स्टेट गॅझेटर, सातारा डिस्ट्रीक्ट पुनर्मुद्रण, १९६२

**३**) महाराष्ट्र स्टेट गॅझेटर, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट
पुनर्मुद्रण, १९६०

**४**) महाराष्ट्र स्टेट गॅझेटर, औरंगाबाद डिस्ट्रीक्ट
पुनर्मुद्रण, १९७७

## अं) बखरी व चरित्रे

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | प्रा. कामतीकर प्रकाश (संपा) | : | भाऊसाहेबांची बखर (कृष्णाजी शामरावकृत) साहित्य सेवा प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्र.आ. १९९५ |
| **२** | प्रा. कुलकर्णी वि. म. प्रा. कुलकर्णी अ. रा. प्रा. देशपांडे अ. ना, (संपा.) | : | पेशव्यांची बखर (कृष्णाजी सोहनीकृत) देशमुख प्रकाशन, पुणे ०२ प्र. आ. १९६३ |
| **३** | खरे वा. वा. | : | नाना फडनवीस यांचे चरित्र (आत्मचरित्रासह) वरदा प्रकाशन प्रा. लि., ३९७/१ सेनापती बापट मार्ग, पुणे, १६ |
| **४** | जहागीरदार विजया | : | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर (चरित्र) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १४ तृ. आ. फेब्रुवारी २००६ |
| **५** | जोशी श. ना. (संपा.) | : | भाऊसाहेबांची बखर पु. वि. गृ. प्रकाशन, पुणे तृ. आ. १९७२ |
| **६** | चिटणीस गोविंद खंडेराव | : | शाहू महाराजांची बखर भारतवर्ष, फेब्रु. मार्च १९०० |

७ चिटणीस मल्हार रामराव : संभाजी राजे यांचे चरित्र, संपा. साने का. ना. १९३०

८ चिटणीस मल्हार रामराव : शाहू महाराज यांचे चरित्र, व्हिनस प्रकाशन पुणे, १९७६

९ राजवाडे वि. का. (संपा.) : महिकावतीची बखर, चित्रशाळा प्र. पुणे, इ. स.१९५४

१० गंधे शिरीष : महाराष्ट्राचे शिल्पकार रामजोशी महाराष्ट्र रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई प्र.आ. जून २००४

**अः) कोश (मराठी व इंग्रजी)**

१ डांगे एस. ए. : एन्सायक्लोपीडिया ऑफ पुराणिक बिलीप्स अँण्ड प्रॅक्टिसेस, नवरंग, न्यू दिल्ली

२ खानोलकर गं. दे.(संपा.) : मराठी वाङ्मयकोश खं.१ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई प्र. प्रकाशन १९७७

३ जोशी महादेवशास्त्री (संपा.) : भारतीय संस्कृतीकोश भाग १, २, ३, ४, ६, ७, ८, ९ कार्यवााह भारतीय संस्कृतिकोश मंडळ शनिवार पेठ, पुणे

४ तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) : मराठी विश्वकोश खं.६,१०,१७ सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ, मुंबई

५ पटवर्धन एम. टी. (संपा.) : फारशी मराठी कोश भा. इ. सं. मंडळ ग्रंथमाला, पुणे, १९२५

**क) माहिती पुस्तिका**

१) चित्रकथी - माहितीपुस्तिका
राजा केळकर संग्रहालय, शुक्रवार पेठ, पुणे.